म. ग्रं. सं. ठाणे
केंद्र
सं. नं.

स्वतः

तर मग आम्ही काय करावे?



लिओ टॉलस्टॉय

REFBK-0005238

किं. रुपये

अनुवादक :
मा. ज. कानेटकर
बी. ए.

अभिजात सारस्वत



REFBK-0005238

तर मग आम्ही काय करावें ?

लिओ टॉल्स्टॉय



तर मग आम्ही काय करावें?

लिओ टॉल्स्टॉय

यांच्या रशियन भाषेंतील ग्रंथाचें
एमर मॉड यांनी इंग्रजींत केलेलें भाषांतरः

What then must we do?

याचा मराठी अनुवाद

अनुवादक
माधव जनार्दन कानेटकर बी. ए.
'शामकाका', 'World Crisis' इ०चे कर्ते व
'निःस्पृह'चे संपादक

सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड
शके १८५७] नागपूर [सन १९३५

गांधीजींचा पुरस्कार

Dear Kanetkar

Here is my
whatever you
wish to call it
way this trans-
lation I volotary
great respect
affect the lives
of those who
worked for it.
with love Yours sincerely
21.7.35 Mahatma

Dear Kanetkar

Here is my whatever you wish to call it.

May this translation of Tolstoy's great message affect the lives of those who would read it.

Wardha
21-7-35

Yours Sincerely
M. K. Gandhi

प्रिय कानेटकर,

हें माझें–त्यास तुम्ही काय वाटेल तें नांव द्या—मी पाठवीत आहें.—

टालस्टॉयच्या महान् संदेशाचा हा अनुवाद जे वाचतील त्यांच्या आयुष्यास त्याच्यामुळे योग्य वळण लागो.

वर्धा
२१–७–३५

तुमचा सुहृद्
मो. क. गांधी

१७८०

अभिजात सारस्वत

स्वभाषेच्या द्वारें उच्च दर्जाच्या ज्ञानाचा प्रसार जनतेंत सर्वत्र करण्याच्या उद्देशाने 'नवभारत ग्रंथमाला' सुरू केली त्यास चार वर्षांवर काळ लोटला आहे. मालेच्या चालकांनी आपले निर्वाहाचे व्यवसाय संभाळून ही माला चालविलेली असूनही तिचें कार्य या मुदतींत अव्याहत चालत आलें आहे. इतकेंच नव्हे, तर तें अतिशय नमुनेदार रीतीने चाललेलें असून अधिकारी विद्वानांनी लिहिलेले उत्कृष्ट ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत मालेने असामान्य यश मिळविलें आहे, ही गोष्ट महाराष्ट्रीय वाचकांस पटलेली आहे. मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रांत 'नवभारत ग्रंथमाला' आता दृढमूल झाली आहे आणि तिचें कार्य आजवर चालत आलें तसेंच पुढेही चालेल अशी कोणीही खात्री बाळगण्यास हरकत नाही.

'माले'चें कार्य याप्रमाणें मार्गास लागत चाललेलें आहे, असें पाहून तितकेंच उपयुक्त परंतु त्याहीपेक्षा जोखमीचें दुसरें एक कार्य अंगावर घेण्याचें धाडस चालकांनी करण्याचें योजिलें आहे. 'नवभारत ग्रंथमाला' ही Home University Library च्या धरतीवर सुरू करण्यांत आली होती. म्हणजे, ज्ञानाच्या प्रांतांतील महत्त्वाचे विषय आखून घेऊन त्या विषयांवर अधिकारी लेखकांनी स्वतंत्र रीतीने लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध करणें हें त्या मालेचें ध्येय होय. आता नवीन सुरू करण्यांत यावयाचा उपक्रम **'अभिजात सारस्वत'** या नांवाचा असून त्याचें धोरण व स्वरूप इंग्रजींतील Everyman's Library, World's Classics, Modern Library, या विख्यात मालांच्या सारखें राहणार आहे. म्हणजे जगांतील निरनिराळ्या भाषांत आजवर जे नामांकित व चिरंतन महत्त्वाचे असे ग्रंथ झाले आहेत ते मराठी स्वरूपांत यथातथ्य रीतीने वाचकांस उपलब्ध करून देणें हें या मालेचें उद्दिष्ट राहील.

विश्वसाहित्यांत मानास चढलेले व त्यांतल्या त्यांत मराठी वाचकांस विशेष उपयुक्त वाटतील असे ग्रंथ निवडून काढून त्यांचें सुयोग्य लेखकांकडून मराठींत सुंदर रूपांतर करवून तें या मालेतर्फे मराठी वाचकांस सादर केलें जाईल.

जागतिक साहित्यांत भारतीय भाषांतील साहित्याचा समावेश अर्थात होतोच. निकटत्वामुळे त्यांचें महत्त्व आपणास अधिक हें तर आहेच, परंतु प्रांताप्रांतांमधील सांस्कृतिक दळणवळणाचें महत्त्व जें आपणास अलीकडेच पटूं लागलें आहे, त्या दृष्टीने तर परप्रांतीय भाषांमधील नामांकित ग्रंथांचीं पद्धतशीर रीतीने भाषांतरें करणें अतोनातच उपयुक्त व महत्त्वाचें ठरणार आहे. 'अभिजात सारस्वता'साठी ग्रंथांची योजना करतांना या गोष्टीकडे पूर्ण लक्ष देण्यांत येईल. त्याबरोबरच मराठी भाषेंतील मान्य व संग्राह्य अशा ग्रंथांचाही यांत यथावकाश समावेश करण्यांत येईल.

'अभिजात सारस्वता'चा आकार नेहमीचा क्राउन षोडश पत्री राहील. तथापि 'नवभारत ग्रंथमाले' प्रमाणें पृष्ठांची व किमतीची मर्यादा आखलेली राहणार नाही. त्याचप्रमाणें कायम ग्राहकांस विशिष्ट सवलत देण्याची योजना केलेली नाही. पुस्तकांच्या किमती अर्थात् नेहमी माफकच राहतील.

या 'अभिजात सारस्वता'मधून प्रसिद्ध करण्यास मराठींतील पहिलेच अभिजात गद्य लेखक जे **विष्णुशास्त्री चिपळूणकर** त्यांच्या लेखांइतकी सुयोग्य सामग्री दुसरी कोणती मिळणार? आजपर्यंत चिपळूणकरांची निबंधमाला व त्यांचे इतर लेख अनेकवार प्रसिद्ध करण्यांत आले असले तरी त्यांचें प्रकाशन शास्त्रोक्त रीतीने झालेलें नाही. ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांच्या निवडक लेखांची मुळाबरहुकूम शास्त्रोक्त रीतीने संपादलेली आवृत्ति 'अभिजात सारस्वतां'तून प्रसिद्ध करावयाचें योजिलें आहे. मालाकारांच्या लेखांत आजच्या वाचकांस अडणारे जे उल्लेख आहेत, ते स्पष्ट करणाऱ्या टीपा, निबंधमालेचें स्वरूपोद्घाटन करणारा एक प्रबंध, इत्यादि सामग्रीने हा ग्रंथ मंडित केला जावयाचा

आहे. प्रस्तुत आवृत्तीच्या संपादनाचें काम खुद्द श्री. श्री. ना. बनहट्टी यांनी स्वीकारलें असून तें पूर्ण होतांच ग्रंथ प्रसिद्ध केला जाईल.

उपर्युक्त ग्रंथ प्रसिद्ध होण्यास अद्याप अवकाश असला तरी औचित्याच्या दृष्टीने त्याला 'अभिजात सारस्वता'चा प्रथम ग्रंथ कल्पिलें असून प्रस्तुतचा 'तर मग आम्ही काय करावें?' हा ग्रंथ दुसरा गणिला आहे. प्रस्तुत ग्रंथाची थोरवी जगाच्या वाङ्मयांत केवढी आहे हें एमर मॉड यांच्या इंग्रजी भाषांतरास जोडलेल्या प्रस्तावनेवरून उघड होत आहे. आणि आम्हां हिंदुस्थानांतील लोकांस त्याचें महत्त्व किती आहे हें महात्मा गांधी यांच्या पुरस्कारावरून व आचार्य कालेलकर यांच्या प्रस्तावनेवरून उत्कृष्ट रीतीने दिग्दर्शित होत आहे. तेव्हा त्या संबंधाने आम्हांस येथे अधिक कांही लिहिण्याचें कारणच नाही. अशींच उत्तमोत्तम पुस्तकें 'अभिजात सारस्वता'मधून प्रसिद्ध होत जातील इतकें मात्र आश्वासन आम्ही देतों.

थोर ग्रंथकारांचे अभिजात ग्रंथ हेच आपले मार्गदर्शक गुरु व आह्लाददायक सन्मित्र होत. अर्थात् प्रस्तुतसारख्या प्रयत्नाचें महत्त्व व उपयुक्तत्व किती आहे, हें वर्णन करून सांगण्याची जरूरी नाही. इंग्रजींतील सुविख्यात Everyman's Library मध्ये आजतागायत सुमारें १७५ पुस्तकें प्रसिद्ध झालीं असून त्या मालेच्या पुस्तकांच्या प्रती ५० कोटीच्या पेक्षाही अधिक खपल्या आहेत. यावरून अशा प्रकारच्या माला किती लोकप्रिय आहेत व केवढें उपयुक्त कार्य बजावीत आहेत याची कल्पना येईल. अशा तऱ्हेची पुस्तकमाला यशस्वी रीतीने चालू असण्याचें तर राहोच, परंतु या धर्तीचा नुसता उपक्रमही आजवर मराठींत कोणी केला असल्याचें दिसत नाही. तेव्हा प्रस्तुत प्रयत्नाची अपूर्वता व उपयुक्तता लक्षांत घेऊन गुणज्ञ मराठी वाचक त्यास भरपूर आश्रय देतील अशी अपेक्षा केल्यास ती व्यर्थ होईल काय?

सुविचार प्रकाशन मंडळ, लि०

नागपूर

अनुक्रमणिका

विषय		पृष्ठ
महात्मा गांधींचा पुरस्कार		
मराठी भाषांतराची प्रस्तावना	...	(१)
मनोव्यथा (आचार्य दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर)	...	(३)
एमर मॉड यांची इंग्रजी भाषांतराची प्रस्तावना	...	(९)
डाइव्ज आणि लाझारस यांची दृष्टांतकथा	...	(२२)
तर मग आम्ही काय करावें ?	...	१ ते ३२४

प्रकरण		पृष्ठ
पहिलें	...	१
दुसरें	...	६
तिसरें	...	१३
चवथें	...	२१
पांचवें	...	२५
सहावें	...	३०
सातवें	...	३४
आठवें	...	३८
नववें	...	४५
दहावें	...	४८
अकरावें	...	५५
बारावें	...	५९
तेरावें	...	६४
चवदावें	...	७२
पंधरावें	...	८०
सोळावें	...	८८
सतरावें	...	९४
अठरावें	...	१०३
एकोणिसावें	...	११६
विसावें	...	१२२

प्रकरण		पृष्ठ
एकविसावें	...	१३५
बाविसावें	...	१४७
तेविसावें	...	१५३
चोविसावें	...	१५७
पंचविसावें	...	१७४
सव्विसावें	...	१८५
सत्ताविसावें	...	१९५
अठ्ठाविसावें	...	२०४
एकोणतिसावें	...	२०९
तिसावें	...	२१६
एकतिसावें	...	२२६
बत्तिसावें	...	२३३
तेहतिसावें	...	२३८
चवतिसावें	...	२४१
पसतिसावें	...	२५३
छत्तिसावें	...	२५५
सदतिसावें	...	२६५
अडतिसावें	...	२७२
एकोणचाळिसावें	...	२९५
चाळिसावें	...	३१३
सूची	...	३२५

मराठी भाषांतराची प्रस्तावना

राजकीय कैदी या नात्याने १९३० सालीं खांडवा जेलमध्ये असतांना "What then must we do?" हें पुस्तक प्रथम माझ्या वाचण्यांत आलें, तेव्हाच त्यांचें भाषांतर करावें अशी इच्छा माझ्या मनांत उद्भवली. पण पुढे सुटून बाहेर आल्यावर निरनिराळ्या व्यापांत गुंतल्यामुळे भाषांतर कल्पनेंतच राहिलें.

१९३२ सालीं पुण्याच्या डे. व्ह. ट्रान्सलेशन सोसायटीने ज्या निवडक पुस्तकांचीं भाषांतरें मागविलीं त्यांत या पुस्तकाचें नांव दिसल्याबरोबर माझी जुनी इच्छा पुनः बळावली व तिचें या भाषांतरांत रूपांतर झालें.

भाषांतर कसें बठलें आहे हें ठरविणें वाचकांचें काम आहे, पण माझा प्रयत्न अर्धामुर्धा जरी यशस्वी झाला असेल, तरी वाचक तो गोड करून घेतील असा भरवसा आहे. भाषांतर शक्य तों शब्दशःच केलें आहे पण कांही क्लिष्ट भाग फक्त सारांश रूपाने दिले आहेत.

जगाच्या वाङ्मयक्षेत्रांत टॉल्स्टायचें स्थान किती उच्च आहे, हें मुद्दाम सांगण्याची गरज नाही. त्यांच्या शिकवणीची टर उडविल्याबद्दल रशियाला तंतोतंत त्यांच्या भविष्याप्रमाणें राजकीय क्रांतीच्या ज्वालामुखीला तोंड देऊन त्या महात्म्याच्या अपमानाचें प्रायश्चित्त भोगावें लागलें ही गोष्ट आता इतिहासांत नमूद झाली आहे. म. गांधींवरसुद्धा टॉल्स्टायच्या या पुस्तकाने कल्पनातीत परिणाम केला असून अंशतः टॉल्स्टाय म. गांधींना गुरु आहेत. अशा थोर विभूतीचे एका अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नासंबंधीं गंभीर विचार वाचकांना मननीय वाटतील यांत बिलकुल शंका नाही.

पुस्तकाचें भाषांतर करण्याचे कामीं प्रोत्साहन दिल्याबद्दल डे. व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीचे व पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याच्या कामीं साहसपूर्वक मदत केल्याबद्दल सुविचार प्रकाशन मंडळाच्या चालकांचे आभार मानून ही छोटीशी प्रस्तावना संपवितों.

सीताबर्डी, नागपूर
ता. १ सप्टेंबर १९३५

मा. ज. कानेटकर

श्री. कालेलकरांची कृपा

What then must we do? या पुस्तकाचें गुजरातींत एक उत्कृष्ट भाषांतर प्रसिद्ध झालें असून त्याची दुसरी आवृत्ति सध्या बाजारांत आहे. सदरहू भाषांतराला श्री. काकासाहेब कालेलकर यांनी लिहिलेला 'मनोव्यथा' या नांवाचा परिचायक लेख जोडलेला आहे. टॉल्स्टायच्या मतांचें व कर्तृत्वाचें रहस्य इतक्या वेचक शब्दांनी आणि परिणामकारक वाणीने ज्यांत वर्णिलें आहे अशा या लेखाचा लाभ मराठी वाचकांसही मिळावा या इच्छेने आम्ही श्री. काकासाहेबांस विनंती केली. त्यांनी आम्हांस सदरहू लेख उद्धृत करण्यास परवानगी दिली, इतकेंच नव्हे तर स्वतःच 'मनोव्यथे'चें रूपांतर करून पाठवून 'आंधळा मागतो एक डोळा तर देव देतो दोन' अशी आमची अवस्था केली. श्री. काकासाहेबांच्या या कृपेबद्दल आमच्याप्रमाणेंच आमचे सर्व वाचकही त्यांचे ऋणी राहतील याबद्दल आम्हांस संशय नाही.

प्रकाशक

मनोव्यथा

Who touches this book touches a man.

Walt Whitman

कोणच्याही पुस्तकाच्या प्रस्तावनेचा सामान्य उद्देश एवढाच असतो की वाचकांना त्या पुस्तकाचा आणि त्यांतील विषयाचा थोडा बहुत परिचय करून द्यावा. पण प्रस्तुत पुस्तक, पुस्तक नसून एका अत्यंत दयावान् पवित्र हृदयाची ती कालवाकालव आहे, व या कालवाकालवीमधून उत्पन्न होणारा जीवनशुद्धीचा रहस्यभेदी शोध आहे. आणि त्याहून अधिक महत्त्वाची गोष्ट म्हणजे महावीराला साजेल असा हा आर्यसंकल्प आहे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे कारुण्य, औदार्य, गांभीर्य आणि माधुर्य या मंगलमय आर्यवृत्तींचें तें एक ओजस्वी रसायन आहे.

अशा वस्तूचा परिचय करून द्यावयाचा नसतो. त्याची उपासना करावयाची असते, त्याचें सेवन करावयाचें असतें.

टॉल्स्टाय शक्तिसम्पन्न कलाधर होता. त्याच्या प्रत्येक कृतीमध्यें औचित्य आणि प्रसाद असणारच, पण हृदयाला अस्वस्थ करून सोडणारें समवेदित्व अथवा सहानुभूति ही टॉल्स्टायच्या कलेची विशेष खुबी आहे. "तर मग आम्ही काय करावें?" ही टॉल्स्टायची सर्वोच्च कोटीची कृति मानली जाते. हिची सुरुवात अगदी एखाद्या कादंबरीप्रमाणें झाली आहे. कादंबरींतून येणारें शब्दचित्रण, भावप्रदर्शन आणि लोकजीवनाचें अवगाहन प्रथमपासून यांत दिसून येतें. आणि मग मनुष्याच्या सामाजिक, किंवा व्यापक अर्थानें, धार्मिक जीवनाचा ठाव पाहणारें विवेचन येथे आपणांस वाचावयास मिळतें. अशा वस्तूचें केवळ कलेच्या दृष्टीने अवलोकन करण्यांत औचित्यभंग होतो, पदरीं हीनता येते आणि एका प्रकारें धर्मजीवनाचा अपमान होतो. सीतेचा विलाप, द्रौपदीवरील आणीबाणीचा प्रसंग आणि तिने केलेला धावा, सहगमनास निघालेल्या सतीचें चितारोहण इत्यादि प्रसंग काव्यासाठी किंवा कलाविलासासाठी नसून जीवनाची दीक्षा देण्या-

साठी असतात. धर्मपूत हृदयानेच आपण त्यांचें दर्शन केलें पाहिजें. केवळ कलेचीच दृष्टि असेल तर अशा प्रसंगीं डोळे मिटून घेणें चांगलें.

येथे टॉल्स्टायनें वर्णिलेले प्रसंग काल्पनिक नाहीत. त्यानें केलेली मीमांसा 'तात्त्विक' नाही. आणि त्याने केलेलें जीवनपरिवर्तनही क्षणिक नाही. ग्रंथाची सुरुवात रस्त्यावर भटकणाऱ्या भिकाऱ्यांच्या सुखदुःखापासून झाली आहे. पण टॉल्स्टायने अखिल मनुष्यकोटीच्या कल्याणाची मीमांसा येथे केली आहे.

पुराणान्तरीं आपण पृथ्वीला भार झाल्याचीं वर्णनें वाचतों. पृथ्वीला काय लोकसंख्या वाढल्याने भार होत असतो ? अथवा जंगलें माजल्याने किंवा हिमालयासारखा पहाड पाण्यांतून बाहेर निघाल्याने ? अशा गोष्टीनें पृथ्वीचा भार वाढण्याचें कांहीच कारण नाही. पृथ्वीला भार होतो तो आळसाचा, ऐदीपणाचा, अनाचाराचा, पापाचा, द्रोहाचा ! टॉल्स्टायला दिसून आलें की आज पृथ्वीचा भार फार वाढला आहे; भार असह्य झाला आहे. आता एखादा उत्पात होणारच. ज्वालामुखी पेट घेणारच अथवा एखादा अभूतपूर्व वणवा भडकणारच. हें दुःख कसें टाळावें, हया महती विनष्टीपासून समाजाला कसें वाचवावें याची विवेचना या पुस्तकांत टॉल्स्टायने केलेली आहे.

टॉल्स्टायने पाहिलें की रशियामध्ये, युरोपमध्ये, समस्त दुनियेमध्यें प्रतिष्ठित ऐदी लोकांची संख्या बेसुमार वाढलेली आहे,–अझूनही वाढत आहे; आणि कांही केल्या थांबत नाही. यांची चैन, यांच्या अमर्याद वासना आणि सुखोपभोगाचीं साधनें वाढतच चाललीं आहेत. हे आयतोबा गरीब जनतेचा घाम पिळून काढतात, त्याचें रक्त शोषीत असतात आणि त्याच्या बदला समाजाला कांहीच देत नाहीत. एवढेच नाही तर सरकारी जबरदस्ती आणि पैशाचें जाळें यांची मदत घेऊन दबले गेलेल्या लोकांना डोकें उंच करणेंच अशक्य करुन टाकतात. स्वतःच्या मनाच्या समाधानासाठी आणि दुनियेच्या डोळ्यांत धूळ टाकण्यासाठी हे लोक तऱ्हेतऱ्हेचें तत्त्वज्ञान रचतात. स्वतःचो स्थिति यथायोग्य आहे, चालू समाजव्यवस्थेमध्येंच सर्वांचें कल्याण आहे, असें सिद्ध करण्यासाठी कृत्रिम धार्मिक सिद्धान्त उत्पन्न करतात, खोटेंनाटें समाजशास्त्र जमवतात आणि स्वतःच्या फायद्यासाठी

विज्ञान आणि कला दोहोंना भ्रष्ट करतात. ही सर्व फसवेगिरी उघडी करणें कांही सोपी गोष्ट नाही. विचार करण्याचा आणि त्याचा प्रचार करण्याचा मक्ता ज्यांच्या हातीं आहे अशा सर्वच मानवी कम्पूविरुद्ध– आपण देखील याच कम्पूमधील आहोंत–वीरबाळ अभिमन्यूने चालवलेल्या युद्धासारखें हें असमान युद्ध आहे; एकाकी युद्ध आहे. पण टॉल्स्टायची लेखक म्हणून असलेली शक्ति आणि हरिश्चन्द्रासारखी अढळ श्रद्धा या कार्याला पुरेशी होती असें दिसून आलें. त्याला माहीत होतें की; दुनियादार व्यवहारचतुर लोक कितीही जरी असले तरी त्यांचें बळ अपर्याप्त आहे. आणि स्वत: एकटा असूनही सत्यस्वरूप जगदीश आपल्या पक्षाला असल्याने स्वत:चें बळ पर्याप्त आहे.

आणि टॉल्स्टायने पृथ्वीचा हा भार हलका करण्याकरितां कोणचा उपाय सुचविला ? प्राचीन काळापासून जो उपाय सुचविला गेला आहे तोच: **' त्यक्तेन भुञ्जीथाः । मा गृधः कस्यस्वित् धनम् । '** केवळ हा ग्रंथ लिहूनच टॉल्स्टायने उपाय सुचविण्याचें काम आटोपलें नाही. तर स्वत: अकिंचन होऊन, यथाशक्ति स्वत: अपरिग्रहव्रत पाळून, आणि शेवटीं बुद्धभगवानाप्रमाणें महाभिनिष्क्रमण–गृहत्याग–करून या उपायाची पारमार्थिकता जगाच्या मनावर त्याने ठसविली आहे.

टॉल्स्टायची ख्याति प्रथम पंक्तीची होती. त्याच्या साहित्यकलेवर सारा युरोप फिदा होता. पण जेव्हा टॉल्स्टायने स्वत: जीवन निष्पाप करण्यासाठी सर्वस्वाचा त्याग केला तेव्हा युरोपमध्ये हाहाकार झाला. नट, विट आणि गणिका या कोटीच्या पण समाजामध्ये प्रतिष्ठित होऊन बसलेल्या व्यक्तींना वाटलें की हें काय ? कलेचा घात झाला ! टॉल्स्टायने कलेची मर्यादा सोडली ! सत्यामध्ये प्रवेश केला. 'अति सर्वत्र वर्जयेत्' हा तुर कलेचा सर्वोत्तम नियम. तो याने तोडला. कला हेंच जीवनसर्वस्व असें मानणाऱ्या इन्द्रियाराम लोकांना वाटलें की टॉल्स्टाय जीवनाशींच बेवफा झाला. पशुकोटीशीं आपली जी समानता आहे तिचा त्याग केला, तर त्या मानानें जीवन संकुचित नाही का होणार ? पण खऱ्या नैष्ठिक जीवनकलाधरांना स्पष्ट दिसून आलें की टॉल्स्टायच्या हातीं कला कृतार्थच झाली आहे.

कांही लोकांनी तर असें निदानें केलें की टॉल्स्टायने मांसाहार सोडला तेव्हापासूनच त्याच्या कलेचा उन्मेष मन्दावला आणि त्याच्या

प्रतिभेला क्षय लागला. टॉल्स्टायनें मनुष्यजातीनें घडवून आणलेल्या प्रगतीचा मार्ग सोडून जंगलीपणालाच आदर्श मानलें. ह्या पुस्तकामध्ये यासारख्या अनेक आक्षेपांना त्याने सडेतोड उत्तर दिलें आहे. पण 'लोचनाभ्यां विहीनस्य दर्पण: किम् करिष्यति ?'

तटस्थपणें विचार करणारा टॉल्स्टायचा चरित्रकार मॉड यानें म्हटल्याप्रमाणें टॉल्स्टायच्या सिद्धान्ताच्या विरुद्ध समर्पक लिहिण्याचें किंवा बोलण्याचें आतापर्यन्त कोणाला सुचलेंच नाही. जो उठला तो एवढेंच ठोकून देतो की टाल्स्टायचें कथन लोकविलक्षण आहे. त्याचा उपदेश अमलांत आणण्यासारखा नाही. टॉल्स्टायच्या सांगण्याप्रमाणें करूं गेलें तर सर्वत्र अनवस्थाच माजेल. त्यांच्या या आक्षेपांना असंदिग्ध उत्तर म्हणून जीं असंख्यात पवित्र जीवनें दृष्टोत्पत्तीस येतात त्यांचा ते विचारच करीत नाहीत. अमुक एखादी सुधारणा स्वत:च्या हातून घडत नाही तेव्हा अर्थात् मनुष्यमात्रासाठी ती अशक्यच आहे असें माणसाला वाटूं लागतें. टॉल्स्टायला दृढविश्वास आहे की ज्याप्रमाणें मनुष्य जातीने गुलामीची प्रथा समूळ नाहीशी केली त्याचप्रमाणें सत्तेची आणि मत्तेची ही प्रथा देखील यथाकाळीं जावयाचीच आहे. लहान मोठीं सरकारें, मालमत्ता, पैसा, ऐदी लोकांचा वर्ग आणि त्यांचा दरारा आणि अंमल टिकवण्यासाठी आणि गरिबांचें डोकें ठेचण्यासाठी तयार केलेलीं सैन्यें या सर्व गोष्टी मनुष्यजातीने आपण होऊन निर्माण केलेल्या आपत्ति आहेत. निष्पाप आणि समृद्ध जीवनासाठी ह्यांपैकी एकाही गोष्टीची -संस्थेची आवश्यकता नाही. बुद्धिमान माणसाने साधेपणाने राहून समाजाची अधिकाधिक सेवा केली पाहिजे. शक्य तितक्या ऐषआरामांत लोळत राहणें आणि झाडावरील बाण्डगळाप्रमाणें समाजाचें रक्तशोषण करणें हें कोणाही बुद्धिमानाला शोभत नाही. हेंच एक तत्त्व लोकांच्या मनावर ठसविण्याचा टॉल्स्टायने या पुस्तकांत प्रयत्न केला आहे. विज्ञान आणि कलेला त्याचें सांगणें आहे की ज्यांचें मीठ खाऊन तुम्ही जगतां आहांत त्यांचाच तिरस्कार केल्याने तुमचा निभाव कसा लागेल ? जनतेची कांही तरी सेवा करा. अथवा तेंही राहूं द्या. जनतेची असेवा करतांना तरी निदान लाजा.

टॉल्स्टायचा हा धर्मबोध सुखासीनांना लालचावलेल्या लोकांना रुचला नाही आणि शेवटीं तीस वर्षांच्या आंत या पुस्तकांत टॉल्स्टायने जसें स्पष्ट शब्दाने भविष्य भाकलें होतें तसेंच घडून आलें. श्रमजीवी वर्गाचा

धीर खुंटला. प्रजाक्षोभाचा स्फोट झाला आणि जनतेच्या खांद्यावर बसून जनतेला लाथा मारणाऱ्या वर्गाचा चकाचूर झाला. पण अज्ञाने गरिबांचें दुःख मात्र दूर झालें नाही. हिंसेचें दुःख हिंसेनेंच दूर होईल ? रक्ताने माखलेले हात रक्तानेच धुवून काढल्याने कधी साफ होतील ? टॉल्स्टायचा उपदेश रशियापेक्षा हिंदुस्थानालाच अधिक लागू पडण्याजोगा आहे.

गरीब जनतेवरील ओझें जोंपर्यंत हलकें झालें नाही आणि जबरदस्तीचा अंमल नाहीसा झाला नाही तोंपर्यंत राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगति व्हावयाची नाही. ही गोष्ट कळकळीने देशाचा विचार करणाऱ्या मनुष्याच्या मनामध्यें हें पुस्तक वाचीत असतां आल्यावाचून राहत नाही. लोकांवर अगदी बेमालुमपणें व्यापक जबरदस्ती करण्याचें मोठ्यांतलें मोठें साधन म्हणजे पैसा हें होय एवढें समजल्यानन्तर हिन्दुस्थानापुढील कोडें बऱ्याच अंशीं सुटेल.

हिंदुस्थानामध्यें रशियासारखा उत्पात होणेंच शक्य नाही असें जर कोणी समजत असेल तर ती चक आहे. त्याबरोबर हेंही पण खरें आहे की रशियाप्रमाणें या देशांत भीषण स्फोट झालाच पाहिजे असेंही नाही. हिन्दुस्थानामध्यें संतफकीरांचें राज्य इतर देशांपेक्षा अधिक पसरलेलें होतें. आज देखील आपली बुद्धि कितीही चळली असली तरी आपल्या हाडांत द्रोह नाही. हिंसा नाही. आपल्या आद्य आचार्यांनी शारीरिक परिश्रमाचें महत्त्व समजावलें आहे. अंगमेहनत सोडली म्हणजे सत्वहानि होते. मनुष्याच्या किंवा पशूच्या खांद्यावर बसून केलेली (जीवन) यात्रा निष्फळ आहे, घातक आहे, हें तत्त्व आपणां सर्वांच्या कानावरून गेलेलें आहे.

यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तं ।
अर्थमनर्थं भावय नित्यं ।
मूढ जहीहि धनागमतृष्णाम् ॥

'निजकर्मोपात्तं' म्हणजे स्वकष्टार्जित. स्वतःच्या अंगमेहनतीने जें कांही मिळेल तेवढ्यानेच सन्तोष मानावा. पैशाच्या मागे लागूं नये. पैसा हा अनर्थाचें मूळ आहे. त्याची तहान टाकली पाहिजे. हा उपदेश अजून सर्वथैव पुराणांतील बांगीं बनला नाही. पैसा-नाणें ही अपवित्र वस्तु आहे, ही गोष्ट देखील टॉल्स्टायने कांही नवी सांगितली नाही.

द्रव्यं तु मुद्रितं स्पृष्ट्वा त्रिरात्रेण शुचिर्भवेत् ।

असलीं वचनें आपल्या शास्त्रग्रंथांतही सांपडतात, पण आपण तीं सर्व धर्म-तत्त्वें साधुसंन्याशांना बहाल करून मोकळे झालों आणि धर्माला दूरचा दूर ठेविला. पण धर्म थोडाच टाळून टाळला जाणार आहे ? माशाला ज्याप्रमाणें पाणी त्याचप्रमाणें माणसाला धर्म आहे. सामोपचाराने जी गोष्ट आपण ऐकत नाही ती अद्दल घडली म्हणजे मूकाटचाने ऐकणार यांत शंका नाही.

पाप कांही नाण्यामध्ये–पांढऱ्या किंवा पिवळ्या चकाकणाऱ्या धातूच्या चकत्यांमध्ये–नाही. पाप असतें तें समाजाच्या हृदयांतच. ही गोष्ट खरी आहे. तरीपण आज याच चकत्या–हींच नाणीं–लोभी निर्दय आणि शिरजोर अशा वर्गाच्या हातांतील अमोघ अस्त्र–दास्यास्त्र–बनलें आहे ही गोष्ट कोणाला नाकबूल करतां येणार नाही. निरोगी मनुष्याला औषधाची जितकी जरूर तितकीच निष्पापपणें जीवन कंठूं पाहणाऱ्या समाजाला नाण्याची–पैशाची–जरूर असणार असें टॉल्स्टायचें मत आहे.

धर्मसम्राट अशोकाने भारतीय संपत्तिशास्त्र फक्त दोनच वाक्यांत सांगून टाकलें आहे. 'अल्पव्ययः साधु । अल्पभाण्डता साधु ।' फार खर्च न करणें चांगलें; फार धनसंग्रह न करणें चांगलें. पण ही गोष्ट काय सहज पटण्याजोगी आहे ? मग टॉल्स्टायच्या या पुस्तकाविषयीं ?

हें पुस्तक फार वाईट आहे, कारण तें आपल्याला जागृत करतें, धर्मभीरु बनवितें. हें पुस्तक वाचल्यानंतर ऐषआराम आणि चैनविलास यांच्या दुधामध्यें पश्चात्तापरूपी मिठाचा खडा पडतो. जेव्हा स्वतःचें जीवन सुधारण्याचा आटोकाट प्रयत्न करावा तेव्हाच मनोव्यथा कांहीशी कमी होते. हृदयांत वसत असलेल्या माणुसकीची गळचेपी करून टाकली तर मात्र कांहीं प्रश्न राहत नाही.

या पुस्तकाचें वाचन सोपें नाही. पण संस्कारी अथवा तात्त्विक वृत्तीच्या मनुष्याला हें पुस्तक एकदा सुरू केलें म्हणजे अगदी शेवटपर्यन्त खेचीत नेल्यावाचून राहत नाही.

गुजरातला जर आपल्या साधुसंतांपेक्षा स्वतःच्या द्रव्यार्जनशक्ती-विषयीं अभिमान असेल तर गुजरातनें हें पुस्तक अवश्य वाचलें पाहिजें. त्याला विचार करावाच लागेल.

दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर.

५२३८

टॉलस्टायचे चरित्रकार व भाषांतरकार

ऐमर मॉड

यांची इंग्रजी भाषांतराची प्रस्तावना

टॉलस्टायच्या सर्व लिखाणांत त्याचें हें पुस्तक मला अत्यंत जोमदार वाटतें. यांतील निरनिराळ्या प्रकरणांतून त्याच्या प्रतिभेचें पूर्णत्वाने प्रदर्शन होतें. वास्तव जीवनामधील प्रत्यक्ष प्रसंगांच्या त्याने केलेल्या वर्णनानें वाचक त्याच्या स्वत:च्या भावनांशीं कल्पनातीत समरस होतो आणि (आश्चर्य हें की) टॉलस्टायने केलेला सोडचिठ्ठी दिलो असा. आरोप त्याच्या टीकाकारांनी ज्या वेळीं सुरू केला त्याच वेळीं त्याने हें प्रभावशालित्व प्रकट केलें! उत्पादक प्रतिभेने निर्मिलेले ग्रंथ आणि चिकित्सक प्रतिभेने निर्मिलेले ग्रंथ यांतील विभाजक रेषा पुष्कळ वेळां फारच अस्पष्ट असते. या पुस्तकांत टॉलस्टायने स्वत:चे अनुभव व सदसद्विवेकबुद्धीची टोचणी यांचें वर्णन केलें असून डाइव्ज आणि लॅझॅरस यांच्या संबधींच्या प्रश्नाचा विचार करणारा एक अर्थशास्त्रीय प्रबंधच यांत समाविष्ट केला आहे; आणि जगाच्या शारीरिक श्रमांत सर्वांनी भाग घ्यावा अशी अत्यंत कळकळीची विनंती केली असून अखेर एक विलक्षण भविष्यवाणी कथन केली आहे. हें भविष्य आधुनिक वाङ्मयांत अपूर्व असून एका खंद्या कलावंताला शक्य अशा पद्धतीने टॉलस्टायने तें सांगितलें आहे.

महायुद्धकालीं टॉलस्टायच्या नांवावर दुसरेंच एक भविष्य विकलें गेलें. त्याच्या स्वरूपावरूनच तें बनावट होतें हें उघड दिसत होतें, तरीही त्याचा पुष्कळच प्रचार झाला. त्या भाकितांत पूर्वी घडलेले, त्या वेळेस घडणारे व–थोड्याशा अस्पष्ट रीतीने–कांही भविष्यकालीं घडणारे अशा प्रसंगांचा समावेश केला होता. त्या भविष्यांत व टॉलस्टायने लिहिलेल्या

कोणत्याही मजकुरांत यत्किंचित् साम्य नसून त्याने खरोखरीच लिहिलेल्या आणि या पुस्तकाच्या २९७–९८ पानावर नमूद केलेल्या (व खाली उध्दृत केलेल्या) रशिअन राज्यक्रांतीच्या भविष्याशीं तें फारच विसंगत होतें:—

"आम्ही आमच्या डोळ्यांवर कितीही कातडें ओढलें तरी, ज्यांवर आम्ही जुलूम करीत आहोंत, त्यांची सहनशक्ति संपून (तें उलटण्याचा) स्पष्ट, साधा व भयंकर धोका आहे हें निर्विवाद आहे. आम्ही वाटेल तशी ठकबाजी, जुलूमजबरदस्ती अगर शब्दच्छल केला तरी हा धोका प्रतिक्षणीं वाढतच आला आहे; व आज तो इतका परिपक्व झाला आहे की, आमच्या लहानग्या बोटीवरून या भयानक समुद्राचे तुषार सर्रास उडूं लागले असून यांच्या असंतोषसमुद्रांत घटकोघटकीं आम्ही गडप होतों की काय अशी भीति वाटत आहे. कामकऱ्यांच्या रक्तपातपूर्ण आणि विध्वंसक क्रान्तीचें आम्हांला प्रतिक्षणीं भय आहे; इतकेंच नव्हे, तर गेलीं तीस वर्षें आम्ही या तोफेच्या तोंडाशींच उभे आहोंत. येन केन प्रकारेण आम्ही ही तोफ डागली जाण्याचा समय लांबवीत आहोंत इतकेंच. हीच स्थिति युरोपमध्यें आहे. आमची हीच परिस्थिति आहे व आमचेकडे सेफ्टीव्हाल्व्ह (बचावसाधनें) नसल्यामुळे आमची परिस्थिति विशेषच बिकट आहे. झारशिवाय इतर जे लोक जनतेवर जुलूम करतात त्यांना लोकदृष्टचा कोणतेंही समर्थन शिल्लक नाही. जनतेला सध्या निव्वळ जुलूम, ठकबाजी व संधिसाधूपणा (opportunism) यांच्या जोरावर कह्यांत ठेवलें आहे. पण जनतेचे जें चांगले प्रतिनिधी आहेत त्यांना आमचेबद्दल तिरस्कार व जहाल प्रतिनिधींच्या मनांत आमचेबद्दल त्वेष हीं प्रतिक्षणीं वाढत आहेत. .....जुलमाखाली दडपले जाणारांच्या मनांतील त्वेष व तिरस्कार वाढत आहे व जुलूम करणारांचें शारीरिक व नैतिक बल कमी होत आहे. ज्या भ्रमावर सर्व डोलारा उभा आहे तो भ्रमही विरघळत आहे व या भयंकर परिस्थितींत श्रीमंतांना सान्त्वन करून घेण्याचें एकही साधन उपलब्ध नाही. .....अशा परिस्थितींत सांपडलेल्या व स्वत:चा जीवनक्रम बदलण्याची इच्छा नसणाऱ्या श्रीमंतांना आपण जिवंत आहोंत तोंपर्यंत तरी सध्याची परिस्थिति टिकली म्हणजे झालें—मग काय व्हावयाचें असेल तें होईना का—अशी आशा करीत राहण्याचा एकच मार्ग मोकळा आहे.

आमच्या आंधळ्या श्रीमंतांची झुंड हेंच करीत आहे. पण धोका वाढत असून ती कराल प्रलयवेला जवळजवळ येत आहे."

कोणत्याही प्रमाणसिद्ध अशा भविष्यकथनाची तारीख इतकी जवळपास जुळावी असें फार क्वचित् होतें. हे शब्द १८८६ सालीं लिहिले गेले. त्या वेळीं टॉल्स्टाय म्हणतो : 'आपण जिवंत आहों तोंपर्यन्त सध्याची परिस्थिति टिकावी अशी आशा बाळगणें एवढेंच आता श्रीमंतांना उरलें आहे.' एका पिढीचा काळ तीस वर्षांचा असतो ही रूढ समजूत जमेस धरल्यास १८८६ नंतर १९१६ साल येतें. रशियांतील दोन क्रांत्या प्रत्यक्षत: १९१७ सालीं झाल्या. लोकशाहीचो (डेमोक्रॅटिक) [Lvov] क्रांति या सालच्या सुरवातीस होऊन याच सालच्या अखेरीस बोल्शेविक डिक्टेटरशाही प्रस्थापित झाली. जिचें आगमन त्याला पूर्वीच दिसलें होतें व जिचें त्याने भविष्य वर्तविलें त्या राज्यक्रांतीच्या आधी सात वर्षें (१९१० मध्यें) टॉल्स्टाय मरण पावला. असें असूनही रशियाचा विशेष अभ्यास केलेले प. वा. रॉबर्ट विल्टन सारखे लेखक म्हणतात की रशिअन राज्य-क्रांतीच्या उगमाकडे अंगुलिनिर्देश करणारें अगर तीवर प्रकाश पाडणारें असें रशिअन वाङमयांत कांहीही सापडत नाही. या मूर्खपणाच्या विधानाची प्रतिक्रिया म्हणूनच की काय अलीकडे एका विद्वानाने असा अभिप्राय प्रकट केला आहे की टॉल्स्टाय हे बोल्शेव्हिजमचे आध्यात्मिक जनक होते !

राज्यक्रांतीची छाया ओळखणें, तिच्याबद्दल लोकांना इशारा देणें, जुलुमाचा निषेध करणें आणि लोकांनी त्या कटु भविष्याला तोंड देण्यास सज्ज व्हावें यासाठी त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करणें इतकाच काय तो टॉल्स्टायचा रशियन राज्यक्रांतीशीं संबंध म्हणतां येईल. बोल्शेव्हिक लोक आणि तत्कालीन सामाजिक किंवा राजकारणी प्रवृत्तींवर टॉल्स्टाय-च्या लिखाणाचा झालेला परिणाम या दोन्ही गोष्टींबद्दल पुरेशी आणि इतर कोणासही नसेल इतकी माहिती असणारे मि. व्ही. ए. माक्लाकॉव्ह म्हणतात, "टॉल्स्टायची शिकवण आणि बोल्शेव्हिक लोक यांच्यांत साम्य असल्याबद्दल बोलणाराला टॉल्स्टायची शिकवण काय हेंच समजलेलें नाही असें म्हणणें प्राप्त आहे." आपल्यापैकी अनियंत्रितसत्तावादी, राजसत्तावादी, पार्लमेंटाचे पाठीराखे, मूलगामी सुधारणावादी, लोक-

शाहीवाले, कान्स्टिटचूशनल डेमोक्रॅट्स, किंवा इतर कोणत्याही मताचे अनुयायी—ज्यांना म्हणून सार्वजनिक अगर खासगी व्यवहारांत हिंसेचें तत्त्व मान्य आहे असे आम्ही सर्व लोक—बोल्शेविक् लोकांना टॉल्स्टायपेक्षा अधिक जवळचे आहोंत. जुलूम व हिंसेचा प्रयोग आम्हां सर्वांना मान्य आहे; फक्त कोणत्या ध्येयाच्या पूर्तीकरितां तो करावयाचा याबद्दलच काय तो मतभेद आहे. उलट टॉल्स्टायने बोल्शेव्हिकांशीं संबंध असणारीं मार्क्सचीं तत्त्वें, हुकूमशाही, वर्गयुद्ध इत्यादि सर्वांचा निषेध केला इतकेंच नव्हे तर इष्ट आणि चांगल्या ध्येयाच्या पूर्तीकरितां सुद्धा हिंसा किंवा जुलूम करण्याच्या तो पूर्णपणें विरुद्ध होता.

संपत्ति आणि दारिद्र्य यांतील विषमता हा जीवनांतील जो अत्यंत मूलगामी प्रश्न त्यावर टॉल्स्टायने आपल्या प्रभावशाली विचारशक्तीचा प्रकाश पाडून अत्यंत स्पष्ट अनुमानें काढिलीं, यांतच "तर मग आम्ही काय करावें?" या पुस्तकाचें स्वारस्य आहे. त्याचीं अनुमानें सर्वच योग्य असून त्याने हा प्रश्न निखालस सोडविला असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा आणि टॉल्स्टायचा कटाक्ष सुबोधतेवर फार होता. त्याने कशाही चुका केल्या असोत, त्याचें लिखाण मनापासूनचें आणि तर्कशुद्ध आहे. त्याने आपले सिद्धांत प्रत्यक्ष आपल्या आयुष्यक्रमाला लागू करून दाखविले; त्यांपासून निष्पन्न काय झालें हें सांगण्याचें स्थळ त्याचें चरित्र होय. तथापि त्याचे सिद्धान्त सामाजिक प्रश्नांबद्दल जिव्हाळा असणाऱ्या सर्वांनी विचार करावा अशा योग्यतेचे खास आहेत. लोकांनी त्याचीं मतें उत्सुकतेने जाणून घेऊन त्यांतील खऱ्याचा उपयोग करून जो व्यर्थ भाग आहे त्यावर टीका करावयास हवी होती, अशी कल्पना होणें साहजिक आहे. पण तसें झालें नाही. ज्या वर्गांना त्याने वाट चालत असलेल्या अनर्थाबद्दल इशारा दिला त्या लोकांनी टॉल्स्टायवर मनःपूर्वकतेच्या अभावाचा आरोप करून त्याचें ऐकण्याचें कारण नाही असें ठरविलें. (त्याने वर्तविलेला) कडेलोटाचा प्रसंग आला. टॉल्स्टायचें जीवन व त्याचा मृत्यु यांचाही वृत्तांत लोकांपुढे वर्णिला गेला असून आता टॉल्स्टायच्या सचोटीबद्दल किंवा त्याच्या भविष्याच्या यथार्थतेबद्दल शंका घेण्यास वाव उरला नाही. आता प्रश्न इतकाच

आहे की, आमच्या पश्चिमेकडील जगाला त्याचें म्हणणें कितपत लागू पडतें.* वास्तविक त्याच्या म्हणण्याकडे तावडतोब लक्ष द्यावयास हवें, पण आमच्यांतही टाळाटाळी करण्याची सवय फार आहे. कांही म्हणतात की टॉल्स्टायचें म्हणणें आज लागू पडत नाही. किंवहुना टॉल्स्टायनेच बोल्शेविजम आणला असेंही म्हणावयास कांही मागे पुढे पाहत नाहीत. हें म्हणणें नोहानेच प्रलय घडवून आणला असें म्हणण्यासारखें आहे.+

कांहींनी फाजील व बिनजरूरीच्या वस्तूंवर खर्च करावा व कांहींना आवश्यक जिनसाही मिळूं नयेत या परिस्थितीचे दुष्परिणाम आज आमच्यांतही अस्तित्वांत आहेत. आणि आम्ही जर टॉल्स्टायच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करूं, त्याने सांगितलेल्यापैकी खरें असेल तें समजून घेऊन जें अयथार्थ असेल त्याचा इन्कार करण्याचें टाळूं तर 'जाको प्रभु दारुण दुःख देईं, ताकी मति पहिलेही हर लेईं' या प्रसिद्ध संतोक्तींत वर्णिल्याप्रमाणें आमची गत झाली आहे, असें म्हणावें लागेल.

आजच्या संस्थांवर टॉल्स्टायने जो हल्ला चढविला त्याचा विचार न करणें, आणि या हल्ल्याकडे लक्ष न देणें व त्याचें खंडनही न करणें यांत जो धोका आहे त्याविषयीं उदासीन राहणें, ही लोकांची प्रवृत्ति टॉल्स्टायच्या अर्थशास्त्रविषयक लिखाणाबद्दलच आहे असें नाही. 'Confession' आणि 'What I believe' हे दोन टॉल्स्टायचे प्रबंध जेव्हा या पुस्तकमाले (World's Classics) मध्यें (इंग्रजी स्वरूपांत) प्रसिद्ध झाले तेव्हा त्याच्या प्रती प्रमुख धर्मपीठां (churches) मधील उपदेशकांना व शिक्षकांना धाडण्यांत आल्या व त्यांना असें सुचविण्यांत आलें की ज्या अर्थी टॉल्स्टायने चर्च आणि सरकार यांच्या आमूलाग्र घटनेवर हल्ला केला आहे आणि ज्या अर्थी टॉल्स्टायचें वजन सर्वत्र पसरलेलें आहे त्या अर्थी परंपरागत समाजसंस्थांच्या तर्फे एखाद्या अधिकारी माणसाने त्याच्या विचार-

---

* लेखकाच्या दृष्टीने रशिया हा देश पूर्वेकडचा आणि जर्मनी, इंग्लंड अमेरिका, इ० देश, हें पश्चिमेकडील जग होय.

+ बायबलांत जलप्रलयाची एक गोष्ट आहे. त्या प्रलयांत सर्वच वाहून जाणार होतें पण नोहाने आपल्या होडीच्या साहाय्याने शक्य तितक्यांचे जीव वांचविले अशी कथा आहे.

सरणींतील दोष दाखविणें योग्य होईल. या विनंतीचा निकाल आश्चर्य-कारक असाच लागला. प्रिन्सिपल गार्व्हीं नांवाच्या गृहस्थांनी आपल्या एका पुस्तकांत या विषयाची मुद्देसूद चर्चा केली; पण त्या पुस्तकाचा प्रसार फारसा झाला नाही. याखेरीज बाकी जीं उत्तरें दिलीं गेलीं त्यांचे दोन प्रकार आहेत. येशू ख्रिस्ताने जें दैवी सत्य उपदेशिलें त्याचें खंडन अशक्य आहे असें म्हणणाऱ्यांचा अल्पसंख्याक वर्ग. पण बहुसंख्याक लोकांचें म्हणणें असें की बुद्धि शाबूत असलेला कोणताही इंग्रज जीं तत्त्वें एक क्षणभर व्यवहार्य म्हणून मानावयास तयार होणार नाही त्यांना उत्तर देत बसण्यांत अर्थ नाही.

हा सर्व प्रकार पाहून कॅनान फरार या धर्मशिक्षकाच्या एका मासिकांतील लेखाचें स्मरण झालें. त्या लेखांत त्याने टॉल्स्टायची योग्यता व त्याचा प्रामाणिकपणा यांची वाखाणणी केली पण वाईटाशीं अप्रतिकार वृत्तीने वागण्याची टॉल्स्टायची शिकवण चूक आहे असें प्रतिपादून व स्थलाभावास्तव सविस्तर विवेचन करता येत नाही असें म्हणून तो मोकळा झाला. टॉल्स्टायला जेव्हा पुनः संधि मिळाली तेंव्हा त्याने या म्हणण्यास अनुलक्षून असे उद्गार काढले : "येशू ख्रिस्ताच्या शिकवणीला कां मानूं नये याचें कारण समजून घेण्याकरितां जग आज १८ शतकें वाट पाहत आहे. कॅनान फरार हे म्हणतात की मला हें कारण माहीत आहे. पण दुर्दैव असें की त्यांना हें कारण सांगण्यास फुरसत नाही ! कोण ही दुर्घटना !"

टॉल्स्टायचीं जीं स्पष्ट अनुमाने आहेत तीं योग्य असोत की अयोग्य असोत, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करणें दूरदर्शीपणाचें नव्हे.

समाजांतील ज्या भयंकर परिस्थितीने टॉलस्टायच्या मनाला धक्का बसला तिचें त्याने वर्णन केलें आणि असें ध्वनित केलें की आपणापैकी प्रत्येकाच्या खात्याला जमेची आणि खर्चाची अशा दोन्ही बाजू असणें शक्य आहें. आपण जें उपभोगतों अगर जें लोकांकडून घेतों तें आपल्या नांवें आणि ज्या उपयुक्त गोष्टी, जी सेवा आपण करतों ती आपल्या जमेस समजली पाहिजे. कारण आपण जें उपभोगितों त्याने मानवजात त्या प्रमाणांत दरिद्री होते व आपण जें निर्माण करतों त्याने तितक्या प्रमाणांत ती समृद्ध होते. ही विचारसरणी लोकमताने मान्य केली तर तें

अनेक सत्ताधाऱ्यांना पदच्युत करून श्रमजीव्यांना महत्त्वास चढवील. आणि असें झालें तर तें समाजाच्या हिताचेंच होईल, कारण लोकमतांत तशी अमोघ शक्ति आहे आणि टॉल्स्टायची विचारसरणी चांगलीच भक्कम आहे. लोकांनी तारीफ करावी अगर आपण प्रसिद्धि मिळवावी म्हणून पुष्कळ खर्च करण्यांत येतो. परंतु डयूक ऑफ वेलिंग्टनच्या लोखंडी बिछान्याचा उल्लेख करतांच लोकांच्या भावना उचंबळतात, यावरून हेंही सिद्ध होतें की लोकमताला योग्य वळण लावलें तर लोकांची प्रशंसाबुद्धि नेहमीच्या विरुद्ध दिशेला सुलभतेने वळवितां येते.

ज्या वेळीं टॉलस्टायने हा ग्रंथ लिहिला त्या वेळीं सुदैवाने त्याने स्वतःचें अप्रतिकाराचें तत्त्व आणि राजसत्तेचा अव्हेर करण्याचें तत्त्व यांची पूर्णतया तयारी केलेली नव्हती. कांही ठिकाणीं बीजरूपाने त्यांचा उल्लेख आहे हा भाग निराळा. (या पुस्तकांत) त्याने वैयक्तिक प्रयत्नावर आणि व्यक्तिशः सुधारणेवरच विशेष भर दिलः आहे. परंतु ज्या महत्त्वाच्या तत्त्वाबाबत पाश्चात्य जगांतील बहुसंख्य लोकांचा त्याच्याशीं प्रामाणिक मतभेद आहे त्या तत्त्वाचा स्वीकार करून आपण त्याची साथ करावी अशी पाळी तो आपणावर या ग्रंथांत आणीत नाही. त्याच्या तात्त्विक ग्रंथांपैकी ज्या ग्रंथांतून—उदाहरणार्थ, प्रस्तुत ग्रंथ आणि Confession, What is art हे प्रबंध—त्याने स्वतःचें अप्रतिकाराचें तत्त्व आग्रहपूर्वक प्रतिपादलेलें नाही ते ग्रंथच फार परिणामकारक आहेत. इतर पुस्तकें कितीही मनोरंजक आणि मनाला वश करणारीं असलीं तरी आपणांपैकी बहुतेकांना हेत्वाभासपूर्ण वाटणाऱ्या अशा एका गृहीत सत्यावर तीं आधारलेलीं आहेत. प्रस्तुत पुस्तकांत टॉल्स्टायने एका जिव्हाळ्याच्या प्रश्नाचा अगदी नव्याने विचार केला असून तो मनःपूर्वक आणि जोमदार पद्धतीने मांडला आहे. त्याचें म्हणणें—विशेषतः आजच्या वर्गयुद्धाच्या काळांत—आम्हीं काळजीपूर्वक जोखलें पाहिजे.

" तर मग आम्ही काय करावें ? " या पुस्तकाचा अनेकांवर तात्काळ व फार मोठा परिणाम झाला आहे.* माझ्या स्वतःच्या अनु-

* महात्मा गांधींवर ज्या तीन पुस्तकांचा आत्यंतिक परिणाम झाला आहे त्यांपैकी हें एक पुस्तक आहे. भाषांतरकार.

भवावरून यासंबंधीं एकदोन मुद्दे स्पष्ट होतील. हें पुस्तक लिहिलें गेल्यानंतर लवकरच जेव्हा पहिल्यांदा मी तें वाचलें तेव्हा त्यांतील अर्थशास्त्रविषयक हेत्वाभासांना उत्तर द्यावें असें मला प्रथम वाटलें आणि या पुस्तकांत आमच्या (इंग्रज) अर्थशास्त्रज्ञांचा जो सररहा अधिक्षेप करण्यांत आला आहे त्यामुळें तर मला विशेषच राग आला; कारण निदान जॉन स्टुअर्ट मिलसारखा अर्थशास्त्रज्ञ समाजांतील अस्तित्वांत असणाऱ्या अनिष्ट गोष्टींचें समर्थन करण्याच्या हेतूने एखादें तत्व शोधून काढील हें माझ्या मनाला पटेना. तोंपर्यंत मी कांहीही लिहिलें नव्हतें आणि टॉल्स्टायसारख्या भीमावर तुटून पडण्यास मी निव्वळ एक काडी पहेलवान होतों. या विषयावर विचार करीत असतां माझी टॉल्स्टायशीं प्रत्यक्ष ओळख होण्याचा योग आला आणि आम्हीं पहिल्या संभाषणांतच अर्थशास्त्राकडे वळलों. त्या संभाषणानंतर मला असें वाटूं लागलें की टॉल्स्टायच्या अनुमानांची हजेरी घेण्यापूर्वी टॉल्स्टायचीं मतें व त्याचे लेख यांचें अधिक परिशीलन करणें जरूर आहे. जों जों मी जास्त वाचूं लागलों तों तों आमच्यांतील ऐकमत्याचे मुद्दे वाढूं लागले आणि आमचा मतभेद रोडावूं लागला. परिणाम असा झाला की पुनः कांही काळानंतर जेव्हा आमची ओळख उजळण्याचा प्रसंग आला तेव्हा मतभेदावर विशेष जोर द्यावासा मला वाटेना. उलट आपल्या ज्ञातिबांधवांना टॉल्स्टायचें म्हणणें समजावून सांगावें असेंच मला वाटूं लागलें. मला हें पटलें की आमच्या अर्थशास्त्राने ज्या गुंतागुंतीच्या व उद्योगप्रधान समाजरचनेची आम्हांला सवय आहे ती रचना जमेस धरली आहे; तर उलट टॉल्स्टायने या प्रश्नाकडे अगदी पुराण अशा कृषकावस्थेंतील समाजाच्या दृष्टीने पाहण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात् आमचे अनेक सिद्धान्त त्याने गृहीत धरलेल्या समाजस्थितीला लागू पडत नाहीत. त्याने माझ्या विचाराला जी कलाटणी दिली त्यामुळें चाळीस वर्षांचा होण्यापूर्वीच मी माझा भरभराटीच्या अवस्थेंत असलेला रशियांतील व्यापारधंदा सोडून दिला आणि टॉल्स्टायच्या वसाहतीची व्यवस्था करणें (ही लवकरच अव्यवहार्य ठरून गडगडली) डुखबार लोकांची वसाहत करण्यासाठी कानडास रवानगी करणें, टॉल्स्टायच्या पुस्तकांचें

भाषांतर करणें आणि शेवटीं टॉल्स्टायचा जीवनवृत्तांत लिहिणें या कामांमध्ये व्यापृत झालों. माझा स्वत:चा अनुभव आणि टॉल्स्टायने व त्याच्या अनुयायांनी त्याचें तत्त्वज्ञान प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्याचे केलेले प्रयत्न यांच्यामुळे मला त्यांच्या शिकवणीतील सारभूत भाग आणि प्रमादग्रस्त भाग यांचें ज्ञान होऊन ते परस्परांपासून पृथक् करितां आले. हीं सारभूत सत्यें घेतलीं तरी देखील त्यांचा माझ्या स्वत:च्या वागणुकीवरील प्रभाव उत्तरोत्तर अधिकाधिक शिथिल होत गेला ही गोष्ट खरी आहे. परंतु तो कांही त्याचा (टॉल्स्टायचा) दोष नव्हे.

कॉपीराइटचा (ग्रंथावरील मालकी हक्कांचा) प्रश्न टॉल्स्टायचें अप्रतिकाराचें तत्त्व व त्यामुळेच उद्भवलेली सर्व सरकारें व कायदे यांविषयींची त्याची नापसंती, यांशीं निगडित झालेला आहे; तथापि क्षणभर त्या प्रश्नाचा आपण स्वतंत्र रीतीने विचार केला तर माझ्या मनांतील उद्दिष्ट त्यावरून अधिक स्पष्ट होईल. टॉल्स्टायने स्वत:च्या ग्रंथांची वाटेल त्याने वाटेल तेव्हा व वाटेल तेथे प्रसिद्धि करावी अशी पूर्ण मुभा देऊन ठेविली होती. त्यापूर्वी लोकांना वाटे की लेखकाला मोबदला मिळवून देण्याच्या दृष्टीने कॉपीराइट अवश्य असला तरी तो सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अनिष्ट आहे व त्यामुळे पुस्तकांची किंमत वाढूं पाहते. पण खुद्द What then must we do ? या पुस्तकाच्या प्रकाशनाविषयींच्या माझ्या अनुभवावरून माझ्या लक्षांत आलें की कॉपीराईटच्या प्रश्नाला एक दुसरीही अतिशय महत्त्वाची बाजू आहे. "तर मग आम्ही काय करावें ?" या पुस्तकाला रशियांत अनेक वर्षे बंदी होती. यापैकी कांही भाग स्वित्झर्लंडमध्ये एका क्रांतिकारक लोकांकरितां काम करणाऱ्या रशियन छापखान्याने प्रसिद्ध केला. पण त्यांनी प्रथम स्वत:स आवडेल तो भाग छापला व नापसंत भाग गुलदस्तांत ठेवला. सबब अनेक वर्षें हें पुस्तक पूर्ण स्वरूपांत रशियन भाषेंत वाचकांना उपलब्धच झालें नाही. इंग्रजींत तीन भाषांतरें प्रसिद्ध झालीं पण एकांतही मूळ पुस्तकाचा जोम व तेज उतरलें नसून टॉल्स्टायने त्याची अखेरची जी रचना केली त्या रचनेचा अनुक्रम एकानेही पाळला नाही. अखेरीस १९०२ मध्यें (इतक्या उशिरासुद्धा) जेव्हा खाइस्तचर्च नांवाच्या शहरीं टॉल्स्टायच्या

कांही मित्रांनी या पुस्तकाची नवी आवृत्ति काढली तेव्हा तिच्यांतील मजकुराची रचनाही टॉल्स्टायला आवडली नाही. शेवटीं टॉल्स्टायला कोणता अनुक्रम मान्य आहे हें निवेदन करणारें एक पत्रक पुरवणी-दाखल काढावें लागलें. इंग्रजी भाषांतरें जीं झालीं त्यांत या अनुक्रमभंगा-शिवाय जे दोष होते ते प्रोफेसर गिल्बर्ट मरे यांच्या उद्गारांवरून स्पष्ट होतील. प्रो. मरे म्हणतात, "सामान्य इंग्रजी अमेरिकन भाषांतरासारख्या विकृत आणि मूलाननुसारी प्रतिकृतींच्या द्वारेंसुद्धा टॉल्स्टायने लोकांवर आपल्या मतांचा इतका जबरदस्त आणि अलौकिक प्रभाव कसा पाडला याचें मला नेहमी आश्चर्य वाटत आलें आहे." इंग्रजीमध्ये आपल्या कृतीचें यथातथ्य रूपांतर व्हावें अशी टॉल्स्टायला इच्छा होती व त्याला मी व माझ्या पत्नीने रूपांतरिलेले कांही भाग पसंत पडले, म्हणून ज्या पुस्तकांचें दोषपूर्ण भाषांतर झालें होतें त्यांचें आम्ही पुनः भाषांतर करावें अशी टॉल्स्टायने इच्छा प्रगट केली. आम्ही हें करण्यास राजी होतों व खरोखरी पुष्कळसें भाषांतर आम्हीं त्याच्याकरितां स्वयंस्फूर्तीने (मोबदला न घेतां) केलें. अर्थात् लेखक अगर भाषांतरकार यांपैकी कोणाकरितांही लोकांजवळून जबर किंमत उकळण्याचा त्यांत प्रश्नच नव्हता. पण खुद्द टॉल्स्टायला प्रसंत असलेलें भाषांतर प्रसिद्ध होण्याच्या मार्गांत कापीराइटचा अभाव हीच एक अनुल्लंघ्य अडचण होऊन बसली. जीं रूपांतरें अगोदर प्रसिद्ध झालीं होतीं तीं कितीही दोषपूर्ण असलीं तरी तीं बाजारांत प्रचलित होतीं आणि ज्या प्रकाशनाच्या बाबतींत अमर्याद स्पर्धा होण्याचा संभव होता असें प्रकाशन हाताशीं घेण्यास कोणीही प्रकाशक उत्सुक नव्हता. ज्या पुस्तकानें माझें मन वेधून घेतलें होतें आणि माझ्या जीवनावर परिणाम केला होता तें पुस्तक आम्ही पाव शतकापेक्षा अधिक काळपर्यंत लोकांना देऊं शकलों नाही. मि. हंफ्रे मिलफोर्ड यांनी मेहेरबानीनें आपल्या 'विश्वसाहित्य माले' (World's Classics Series) मध्ये टॉल्स्टायचीं भाषांतरें गोव-ण्याचें ठरविलें आणि बर्नाड शॉ प्रभृति शंभर सुप्रसिद्ध स्त्रीपुरुष व्यक्तींनी हीं भाषांतरेंच इतरांपेक्षा सरस आणि आश्रयार्ह आहेत अशी ग्वाही देऊन या घाडसाला उचलून धरिलें म्हणूनच घंद्याच्या दृष्टीने हीं भाषांतरें छापणें शक्य झालें. टॉल्स्टायला जे कायदे किंवा रूढि अपायकारक वाटत

ह्या क्वचित् उपकारकही होऊं शकतील. असें दर्शविणाऱ्या अनेक उदाहरणांपैकी हें एक होय. त्याचे हेतु कितीही उदात्त असोत त्याने प्रतिपादन केलेल्या तत्त्वांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन नंतरच त्यांवर शिक्कामोर्तब होणें इष्ट आहे.

कायदेशीर कॉपीराईटच्या अभावामुळे स्वत:च्या ग्रंथांचें यथातथ्य प्रसिद्धीकरण होण्याच्या बाबतींतील अडचणी स्वत: टॉल्स्टायलाच उमगूं लागल्या व म्हणून पंधरा वर्षांच्या परिश्रमांनंतर लिहिलेलें व त्याला स्वत:ला विशेष महत्वाचें वाटणारें What is Art? हें पुस्तक जेव्हा त्याने प्रसिद्ध केलें तेव्हा जनतेला उद्देशून एक विनंती करून त्याने या अडचणीचें परिमार्जन करण्याचा प्रयत्न केला. माझ्या भाषांतरांत टॉल्स्टायने जागोजागीं मदत केली आणि तें विशेषच आवडल्यामुळे त्याला एक प्रस्तावना लिहून त्यांत त्याने असें सांगितलें की ज्यांना ज्यांना कलेसंबंधीं माझे विचार समजावून घेण्याची इच्छा आहे, त्यांनी याच रूपांतरांत प्रकट झालेलें त्यांचें स्वरूप मान्य करावें. त्या काळांतील सर्वश्रेष्ठ साहित्यसेवकाने केलेल्या या विनंतीकडे लोकांचें लक्ष वेधलें असेल असें कोणालाही वाटेल. पण एका अमेरिकन विश्वविद्यालयांतील स्लेव्हॉनिक (भाषे) च्या प्रोफेसराने तावडतोब त्या ग्रंथाचें भाषांतर केलें आणि टॉल्स्टायच्या मुख्य प्रतिपादनाच्या विरुद्ध एक विधान त्यांत दडपून देऊन टॉल्स्टायच्या प्रस्तावनेला अर्धचंद्र दिला आणि इंग्लंड व अमेरिका या दोन्ही देशांत आपलें भाषांतर प्रसिद्ध करावयास तयार असणारा एक प्रकाशकही शोधून काढला. अशी स्थिति असूनही माझ्याखेरीज (मी तर या बाबतींत गुंतलेलाच होतों) एकाही टीकाकाराने अगर वाचकांपैकी कोणी या प्रकाराविरुद्ध ब्रही काढला नाही. एखाद्या अत्युत्कृष्ट लेखकाचे लेख सुद्धा त्याने स्वत: तपासलेल्या व पसंत केलेल्या रूपांतरित स्वरूपांतच वाचकांना मिळावे अशी त्याची इच्छा असल्यास अशा प्रसिद्धतम लेखकास सुद्धा कायदेशीर कॉपीराईटचें संरक्षण हवें ही गोष्ट सिद्ध करण्यास प्रोफेसर वीएनरचें What is Art? चें उपर्युल्लिखित भाषांतर नेहमी पुरें होईल. आणि जरी त्या लेखकाला आर्थिक मोबदल्याबद्दल यत्किंचित्ही कदर नसली तरी सुद्धा हें संरक्षण अवश्य आहे, हा यांतील मुद्दा लक्षांत ठेवण्यासारखा आहे.

पुनः ' What then must we do ?' (तर मग आम्ही काय करावें ?) या पुस्तकासंबंधीं बोलावचें म्हणजे प्रो. यांझूलनी सांगितलेला फिजी बेटाचा जो वृत्तांत या पुस्तकांत आला आहे (इंग्रजांच्या ताब्यांत फिजी बेटें कशीं आलीं इ०) तो अगदी बिनचूक आहे असें आमच्या इतिहासकारांना कदाचित् वाटणार नाही. पण ज्या अनिष्ट गोष्टी टॉल्स्टायला चव्हाट्यावर मांडावयाच्या होत्या त्यांचें एक सोईचें उदाहरण म्हणून त्या वृत्तांताचा टॉल्स्टायला उपयोग झाला. शिवाय प्रो. यांझूलचा वत्तांत खोटा आहे असेंही कोणी म्हटल्याचें अजून माझ्या ऐकिवांत नाही.

टॉल्स्टायने शास्त्र व कला यांसंबंधीं जें लिहिलें आहे त्यांतील मुख्य मुद्दा असा की श्रमजीवी माणूस जें शारीरिक खाद्य तयार करतो व जें खाण्यास योग्य आहे असें त्याचा प्रत्यक्ष फन्ना उडवूनच शास्त्रज्ञ व कलावंत दर्शवितात त्या शारीरिक अन्नाच्या मोबल्यांत शास्त्रज्ञ व कलावंत श्रमजीवी लोकांना मानबेल व पचेल असें बौद्धिक अन्न देत नाहीत. टॉल्स्टायने मात्र आपल्याकडून ' तेवीस कथा ' म्हणून एक गोष्टींचें पुस्तक लिहून त्याच्या द्वारा आपण शेतकऱ्यांकडून जें घेतों त्याबद्दल त्यांची भरपाई करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत ग्रंथांतील पैशासंबंधाच्या विवेचनावर टीका करणें शक्य आहे. पैशाने माणूस माणसाला गुलाम बनवितो व त्यांना हानिकारक कामें करावयास लावतो हें खरें आहे; पण पैशाचा संबंध नसेल तेथेही एकाने दुसऱ्यास पिळण्याचा हा प्रकार चालतोच. शाळेंतील उनाड घटिंगण, सदैव कुरकुरणारी पत्नी अथवा आई, कपटी धर्मशिक्षक, एखाद्या धार्मिक संप्रदायाचा अगर क्रांतिकारी चळवळीचा पुढारी हे पैशाचा संबंध न आणतांही इतरांवर जबरदस्ती करूं शकतात. खुद्द टॉल्स्टाय पंथाच्या चळवळींतील एका पुढाऱ्याने, पैशाच्या साहाय्याने व्यापारी जगांत करण्यांत येत असलेल्या कमालीच्या जुलुमालाही मागें टाकतील असे नैतिक जुलुमाचे प्रकार अमलांत आणलेले आहेत. परस्परांशीं ओळख नसणाऱ्या भिन्न व्यक्तींमध्ये सहकार्य उत्पन्न व्हावें म्हणून मार्ग शोधणें हें व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचें आहे, सबब "पैशाने हानि होते काय ?" असा खरा प्रश्न

नसून " पैशानें हितापेक्षा हानीच अधिक होते काय ?" हा खरा प्रश्न आहे. टॉल्स्टायने पहिल्या प्रश्नाच्या रोखाने विचार केला आहे. त्याचप्रमाणें ज्या संततिनियमनाचा टॉल्स्टायने अत्यंत तीव्र निषेध केला आहे त्यासंबंधीं विचार करतां, हें खरें आहे की निव्वळ स्वार्थी व वैषयिक उद्देशाने प्रेरित होऊन कांही स्त्रिया अवश्यस्वीकरणीय असें मातृपद टाळीत असतील. रशियाच्या विरळ लोकसंख्येंत या प्रश्नाचें स्वरूप आमच्या दाट वस्तीच्या देशापेक्षा निराळें आहे, हीही गोष्ट खरी आहे. पण ज्या आईला आपलीं मुलें शक्य तितकीं सुदृढ असावीं असें वाटतें आणि मुलांकडे पूर्ण लक्ष देतां यावें म्हणून जिला आपली प्रकृतीही सुदृढ राहावी असें वाटतें तिच्या दृष्टीने या प्रश्नाचा टॉल्स्टायने विचार केल्या-सारखें दिसत नाही. जे अनर्थ त्याने स्वत: पाहिले त्यांवरूनच त्यानें त्याच्या मतें योग्य असें नैतिक तत्त्व प्रतिपादन केलें; पण त्या प्रश्नाच्या दुसऱ्या बाजूचें महत्त्व त्याने नीटसें लक्षांत घेतलें नाही. ज्यांचे जवळ मालमत्ता आहे त्यांच्यावर समाजासंबंधीं मोठी नैतिक जवाबदारी आहे. यावद्दल टॉल्स्टायने जो आग्रह धरला आहे तो मात्र नि:संशयपणें योग्य आहे. संपत्तित्यागाचा त्याचा सल्ला कदाचित चूक असेल, कारण संपत्ति-त्याग करावयाचा ठरविल्यास तिची वाटणी कशी करावी हा एक स्वतंत्र प्रश्न उद्भवतो असा अनुभव टॉल्स्टायला स्वत:लाच आला. ज्यांचे जवळ सध्या संपत्ति आहे, त्यांना मात्र ती अपायकारक असून ज्यांना ती दिली जाईल त्यांना मात्र ती पूर्ण हितकारक होईल असें होणें कसें शक्य आहे ? पण दरिद्र्यांच्या हाल अपेष्टांकडे श्रीमंताचें दुर्लक्ष आणि संपत्तीबरोबर श्रीमंतांवर येणाऱ्या नैतिक जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव हीं सामान्यत: इतक्या भयंकर प्रमाणांत रूढ आहेत की बायबलांतील डाइव्ज आणि लॅझॅरस यांची गोष्ट आजही मनुष्यसमाजाला सोळा आणे लागू पडते.

पुनः ' What then must we do ?' (तर मग आम्ही काय करावें ?) या पुस्तकासंबंधीं बोलायचें म्हणजे प्रो. यांझूलनी सांगितलेला फिजी बेटाचा जो वृत्तांत या पुस्तकांत आला आहे (इंग्रजांच्या ताब्यांत फिजी बेटें कशीं आलीं इ०) तो अगदी बिनचूक आहे असें आमच्या इतिहासकारांना कदाचित् वाटणार नाही. पण ज्या अनिष्ट गोष्टी टॉल्स्टायला चव्हाटयावर मांडावयाच्या होत्या त्यांचें एक सोईचे उदाहरण म्हणून त्या वृत्तांताचा टॉल्स्टायला उपयोग झाला. शिवाय प्रो. यांझूलचा वत्तांत खोटा आहे असेंही कोणी म्हटल्याचें अजून माझ्या ऐकिवांत नाही.

टॉल्स्टायने शास्त्र व कला यांसंबंधीं जें लिहिलें आहे त्यांतील मुख्य मुद्दा असा की श्रमजीवी माणूस जें शारीरिक खाद्य तयार करतो व जें खाण्यास योग्य आहे असें त्याचा प्रत्यक्ष फन्ना उडवूनच शास्त्रज्ञ व कलावंत दर्शवितात त्या शारीरिक अन्नाच्या मोबल्यांत शास्त्रज्ञ व कलावंत श्रमजीवी लोकांना मानवेल व पचेल असें बौद्धिक अन्न देत नाहीत. टॉल्स्टायने मात्र आपल्याकडून ' तेवीस कथा ' म्हणून एक गोष्टींचें पुस्तक लिहून त्याच्या द्वारा आपण शेतकऱ्यांकडून जें घेतों त्याबद्दल त्यांची भरपाई करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तुत ग्रंथांतील पैशासंबंधाच्या विवेचनावर टीका करणें शक्य आहे. पैशाने माणूस माणसाला गुलाम वनवितो व त्यांना हानिकारक कामें करावयास लावतो हें खरें आहे; पण पैशाचा संबंध नसेल तेथेही एकाने दुसऱ्यास पिळण्याचा हा प्रकार चालतोच. शाळेंतील उनाड घटिंगण, सदैव कुरकुरणारी पत्नी अथवा आई, कपटी धर्मशिक्षक, एखाद्या धार्मिक संप्रदायाचा अगर क्रांतिकारी चळवळीचा पुढारी हे पैशाचा संबंध न आणतांही इतरांवर जबरदस्ती करूं शकतात. खुद्द टॉल्स्टाय पंथाच्या चळवळींतील एका पुढाऱ्याने, पैशाच्या साहाय्याने व्यापारी जगांत करण्यांत येत असलेल्या कमालीच्या जुलुमालाही मागें टाकतील असे नैतिक जुलुमाचे प्रकार अमलांत आणलेले आहेत. परस्परांशीं ओळख नसणाऱ्या भिन्न व्यक्तींमध्ये सहकार्य उत्पन्न व्हावें म्हणून मार्ग शोधणें हें व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचें आहे, सबब "पैशाने हानि होते काय ?" असा खरा प्रश्न

नसून " पैशानें हितापेक्षा हानीच अधिक होते काय ?" हा खरा प्रश्न आहे. टॉल्स्टायने पहिल्या प्रश्नाच्या रोखाने विचार केला आहे. त्याचप्रमाणें ज्या संततिनियमनाचा टॉल्स्टायने अत्यंत तीव्र निषेध केला आहे त्यासंबंधीं विचार करतां, हें खरें आहे की निव्वळ स्वार्थी व वैषयिक उद्देशाने प्रेरित होऊन कांही स्त्रिया अवश्यस्वीकरणीय असें मातृपद टाळीत असतील. रशियाच्या विरळ लोकसंख्येंत या प्रश्नाचें स्वरूप आमच्या दाट वस्तीच्या देशापेक्षा निराळें आहे, हीही गोष्ट खरी आहे. पण ज्या आईला आपलीं मुलें शक्य तितकीं सुदृढ असावीं असें वाटतें आणि मुलांकडे पूर्ण लक्ष देतां यावें म्हणून जिला आपली प्रकृतीही सुदृढ राहावी असें वाटतें तिच्या दृष्टीने या प्रश्नाचा टॉल्स्टायने विचार केल्या-सारखें दिसत नाही. जे अनर्थ त्याने स्वत: पाहिले त्यांवरूनच त्यानें त्याच्या मतें योग्य असें नैतिक तत्त्व प्रतिपादन केलें; पण त्या प्रश्नाच्या दुसऱ्या बाजूचें महत्त्व त्याने नीटसें लक्षांत घेतलें नाही. ज्यांचे जवळ मालमत्ता आहे त्यांच्यावर समाजासंबंधीं मोठी नैतिक जबाबदारी आहे. यावद्दल टॉल्स्टायने जो आग्रह धरला आहे तो मात्र नि:संशयपणें योग्य आहे. संपत्तित्यागाचा त्याचा सल्ला कदाचित चूक असेल, कारण संपत्ति-त्याग करावयाचा ठरविल्यास तिची वाटणी कशी करावी हा एक स्वतंत्र प्रश्न उद्भवतो असा अनुभव टॉल्स्टायला स्वत:लाच आला. ज्यांचे जवळ सध्या संपत्ति आहे, त्यांना मात्र ती अपायकारक असून ज्यांना ती दिली जाईल त्यांना मात्र ती पूर्ण हितकारक होईल असें होणें कसें शक्य आहे ? पण दरिद्र्यांच्या हाल अपेष्टांकडे श्रीमंताचें दुर्लक्ष आणि संपत्तीबरोबर श्रीमंतांवर येणाऱ्या नैतिक जबाबदारीच्या जाणिवेचा अभाव हीं सामान्यत: इतक्या भयंकर प्रमाणांत रूढ आहेत की बायबलांतील डाइव्ज आणि लॅझॅरस यांचो गोष्ट आजही मनुष्यसमाजाला सोळा आणे लागू पडते.

Parable of Dives and Lazarus

डाइव्ज (श्रीमंत मनुष्य) आणि लाझारस यांची दृष्टान्तकथा

प्रस्तुत पुस्तकांत येशू खिस्ताने शिष्यांना सांगितलेल्या 'श्रीमंत मनुष्य आणि लाझारस' या दृष्टान्तकथेचा एके ठिकाणीं (पृ. १४९) उल्लेख आलेला आहे. एमर मॉड यांच्या प्रस्तावनेंतही प्रारंभीं आणि शेवटीं याच कथेचा उल्लेख केलेला आहे. ही कथा बायबलमधील नव्या करारांत ल्यूक १६.१९-३१ मध्ये आलेली असून त्यापैकी मुद्द्याच्या भागाचें भाषांतर वाचकांच्या सोयीसाठी पुढे दिलें आहे.

'डाइव्ज' (Dives) हा शब्द लॅटिन बायबलांत आहे. त्याचाच अर्थ इंग्रजी बायबलांत 'श्रीमंत मनुष्य' असा केलेला आहे. तें व्यक्तिनाम असावें, अशीही कांहींचा समजूत आहे.

सेंट ल्यूक, प्रकरण १६

१९ एक श्रीमंत मनुष्य होता, तो बादशाही थाटाचे व रेशमी कपडे वापरीत असे आणि खाण्यापिण्याची चंगळ उडवीत असे :

२० आणि लाझारस नांवाचा एक भिकारी अंगभर क्षतें पडलेलीं आहेत. अशा स्थितींत त्याच्या घराच्या दरवाजाशीं येऊन पडला होता,

२१ आणि त्या श्रीमंत मनुष्याच्या मेजवानींतून उरलेल्या अन्नाचे तुकडे खाण्यास मिळावे अशी तो इच्छा करीत होता : आणखी शिवाय कुत्रे येऊन त्याच्या अंगावरील व्रण चाटीत होते.

२२ पुढे असें झालें की तो भिकारी मरण पावला, आणि त्याला देवदूतांनी एब्राहामच्या अगदी निकट नेऊन ठेवलें : तो श्रीमंत मनुष्य देखील मरण पावला व त्यास पुरण्यांत आलें;

२३ आणि यमपुरीमध्ये यातना भोगीत असतां त्याने आपली दृष्टि वर केली, आणि त्याला दूर अंतरावर एब्राहाम, आणि त्याने छातीशीं कवटाळलेला लाझारस, दिसला.

२४ आणि तो रडत रडत म्हणाला 'एब्राहाम पिताजी ! मजवर दया करा, आणि लाझारसला पाठवून द्या; त्याने आपलें बोट पाण्यांत बुडविलें तर त्या पाण्याने माझ्या जिभेला थंडोसा येईल; कारण मी या अग्नीच्या ज्वाळेमध्ये यातना भोगतों आहें.'

२५ परंतु एब्राहाम म्हणाला, 'पुत्रा, ही गोष्ट लक्षांत ठेव की तुला आपल्या आयुष्यामध्ये तुझ्या वाटचाच्या चांगल्या गोष्टी मिळाल्या आहेत; आणि तसेंच लाझारसच्या वाटचास वाईट गोष्टीच आल्या आहेत : परंतु आता त्याला सुख देण्यांत येत असून तुला यातना देण्यांत येत आहेत.'

तर मग आम्ही काय करावें ?

(What Then Must We Do ?)

लिओ टॉल्स्टाय



प्रकरण पहिलें

मी माझें आयुष्य खेडेगावांतून घालविलें असल्यामुळें जेव्हा १८८१ त मॉस्कोला आलों तेव्हा शहरांतील दारिद्र्य पाहून मी चकित झालों खेडेगावांतील गरिबी कशी असते हें मला माहीत होतें पण शहरांतील दारिद्र्य मला नवें व कल्पनातीत वाटलें. मॉस्कोंत कोणत्याही रस्त्याने जा भिकारी भेटल्यावाचून राहावयाचा नाही. हे भिकारी खेडवळ भिकाऱ्यापेक्षा कांही निराळे असतात, कारण हे झोळी घेऊन देवाच्या नांवावर भीक मागत नाहीत; यांच्याजवळ झोळी नसते व हे याचनाही करीत नाहीत. तुमची यांची रस्त्यांत गाठ पडली तर हे तुमच्याशीं नजर भिडविण्याचा प्रयत्न करतील व तुमचा जसा कल दिसेल त्याप्रमाणें तुमच्याशीं याचना करितील किंवा करणार नाहीत. अशा एका सभ्य भिकाऱ्याला मी ओळखतों. पावलागणिक मान खाली वाकवीत हळूहळू चालण्याची या वृद्ध मनुष्याची ढब आहे. तुमची गाठ पडतांच हा एका पायावर वांकल्यासारखा उभा राहून नमस्कार करीत असल्यासारखा दिसेल. जर तुम्ही थांबलांत तर हा आपली टोपी काढून पुनः नमस्कार करील व भिक्षा मागेल पण तुम्ही न थांबलांत तर जणूं काय त्याचें चालणेंच तसें आहे असा आव आणून दुसऱ्या पायावरही वांकून तो चालूं

लागेल. मॉस्कोमधील सुशिक्षित भिकाऱ्याचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे. प्रथम मला हे लोक उघडपणें कां भिक्षा मागत नाहीत हें उमजेना. पुढे हें कारण मला कळलें पण त्यांच्या भिक्षावृत्तीचें गौडबंगाल मात्र मला उलगडलें नाही.

एकदा अफनासेव्ह गल्लीतून जातांना एक पोलीस एका शेतकऱ्यास —याच्या आंगभर चिंध्या असून याला जलोदराची बाधा होती—एका बिनटपाच्या गाडींत बसवीत असतांना मी पाहिलें. मी विचारलें, " हें असें कां करितां ? " पोलिसाने उत्तर दिलें, " भीक मागितल्याबद्दल. " " भिक्षा मागण्यास मनाई आहे काय ? " मी विचारलें. " मनाई असावी असें दिसतें " असें पोलिसाने उत्तर दिलें.

जलोदर झालेल्या त्या माणसाला गाडींतून नेण्यांत आलें. मी दुसऱ्या गाडींत बसून त्यांचे मागोमाग गेलों. भिक्षा मागण्यास खरोखरच मनाई होती काय व त्यांचें भीक मागणें बंद करण्यास कोणते मार्ग योजीत, हें समजून घेण्याची मला इच्छा होती. एकाने दुसऱ्यापासून एखादी जिन्नस मागण्याची मनाई असावी हेंच मला पटेना आणि भीक मागण्याची बंदी असेल यावर विश्वास बसेना; कारण, मॉस्कोंत तर भिकाऱ्यांचा सुळसुळाट होता. ज्या पोलीस चौकीवर त्या भिकाऱ्यास नेलें होतें तेथे मी गेलों. तेथे एक पिस्तूल-तलवार-बंद असा मनुष्य एका टेबला-शेजारीं बसला होता. "त्या शेतकऱ्याला कां पकडलें ?" असा मी त्याला प्रश्न केला. त्याने मजकडे रागाने पाहिलें व उत्तर दिलें "तुम्हांला त्याची पंचाईत कशाला ? " पण यापेक्षा अधिक खुलासा करण्याची त्याची त्यालाच गरज वाटली म्हणून त्याने पुढे म्हटलें, "अशा माणसांना पकडण्याचा वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हुकूम आहे म्हणून आम्हाला त्याप्रमाणें वागणें भागच आहे. " नंतर मी निघून गेलों. ज्या पोलिसाने भिकाऱ्याला धरून आणलें होतें तो प्रवेशदालनांतील एका खिडकींत एका नोंदवही-कडे खिन्नतेने पहात बसला होता. त्याला मी म्हटलें " खरोखरच देवाच्या नांवावर भीक मागण्याची मनाई आहे काय ? " पोलीस खडबडून जागा झाला. त्याने कपाळाला आठ्या घातल्या असें जरी

नाही, तरी अर्धवट गुंगीतच त्याने उत्तर दिलें, "अधिकाऱ्यांचा तसा हुकूम आहे सबब असें करणें जरूर आहे." इतकें म्हणून तो पुनः नोंदवहीकडे पाहूं लागला. मी प्रवेशद्वारांत उभ्या असलेल्या गाडीकडे निघालों.

गाडीवाल्याने विचारलें, "काय झालें ? त्याला पकडलें की काय ?" त्यालासुद्धा एकंदर प्रकाराविषयीं जिज्ञासा वाटूं लागली होती.

"होय" असें मी उत्तर दिलें. गाडीवाल्याने नापसंतीदर्शक मान हालविली.

मी गाडीवाल्यास विचारलें, "कायरे ! या तुमच्या मास्को शहरांत देवाच्या नांवावर भीक मागण्याची बंदी आहे याचा अर्थ काय ?"

"कोणास माहीत ?" गाडीवान उत्तरला.

"हें असें कां ?" मी विचारलें. "दीनदुबळे हे देवाचेच ना ? तरी या माणसाला हे लोक पोलीस ठाण्यावर नेतात ?"

"अलीकडे असाच कायदा आहे. भिक्षा मागण्याची मनाई करण्यांत आली आहे." गाडीवानाने उत्तर दिलें.

पोलिसचे लोक भिकाऱ्यांना प्रथम चौकीवर व नंतर युसुपॉव्ह श्रमगृहांत कसे नेत हें मी यानंतर बरेच वेळां पाहिलेलें आहे. एकदा म्यासनित्स्को रस्त्यावर अशा तीस भिकाऱ्यांचा तांडा मला दिसला. या तांड्याच्या पुढे व मागे पोलिस चाललेले होते. मी विचारलें, "याचा अर्थ काय ?" "भीक मागण्याच्या अपराधाबद्दल !" असें मला उत्तर मिळालें.

यानंतर असें कळलें की मास्कोमधील भिकाऱ्यांना भीक मागण्याची कायद्याने बंदी करण्यांत आली होती. (पण असे कैक भिकारी रस्त्याने आढळतात. प्रार्थनेच्या वेळीं देवळासमोर यांच्या रांगांच्या रांगा लागून असतात इतकेंच नव्हे तर प्रत्येक अंत्यविधिप्रसंगींही हे नियमितपणें हजर असतातच.)

पण यांपैकी कांहीना पकडण्यांत येई व इतरांना कांहीही करीत नसत याचा अर्थ मात्र मला कधींच कळला नाही. एक तर त्यांच्यांत कांही कायदेशीर व इतर बेकायदा भिकारी असावेत किंवा त्यांची संख्या तरी इतकी मोठी असावी की या सर्वांना पकडणेंच मुळीं शक्य नसावें. किंवा

कांहींना पकडतात न पकडतात तोंच त्यांच्या जागीं दुसरे उद्भवत असावे.

मॉस्कोमध्यें नानाप्रकारचे भिकारी आहेत. कांही भिकारी कोणत्या ना कोणत्या तरी कारणामुळें मॉस्कोस आलेले असून निराधार असत.

या दुसऱ्या प्रकारच्या भिकाऱ्यांत शेतकऱ्याचा पोषाख केलेले अनेक भोळे शेतकरी व शेतकरी बाया असत. हे मला अनेकवार आढळत. कांही लोक येथे आल्यावर आजारी पडून नंतर बरे झाल्यामुळें दवाखान्यांतून बाहेर घालवून दिलेले असे असत. अशांना मास्कोंत उपजीविका करतां येत नसे व मास्कोंतून निघतांही येत नसे. कांहींना दारूचें व्यसन असे. (त्या जलोदरवाल्या शेतकऱ्यालाही तें निःसंशय होतेंच). कांही आजारी नसत पण एखाद्या आगीमुळें त्यांच्या सर्वस्वाची होळी झालेली असे व कांही वृद्ध असत. भिकाऱ्यांत लेकुरवाळ्या बायकाही असत. पण कांही अगदी निकोप प्रकृतीचे व काम करण्यालायक असेही भिकारी होतेच. या निकोप प्रकृतीच्या शेतकऱ्यांना पाहून मला गंमत वाटे. कारण, मास्कोंत आल्यापासून व्यायाम घेण्याकरितां मी दररोज स्पॅरो टेकडीकडे दोन शेतकऱ्यांबरोबर जात असे. पण हे दोघेहि आरेकसाचें काम करीत. रस्त्यांत भिक्षा मागणाऱ्या (निकोप प्रकृतीच्या) शेतकऱ्यांत व यांच्यांत कांहीच फरक नव्हता. त्यांपैकी एकाचें नांव पीटर. हा पूर्वी सैन्यांत शिपाई असून कलूजा खेडयाचा रहिवासी होता. दुसऱ्याचें नांव सेमीन असून तो व्लाडिमीरचा शेतकरी होता. त्यांचे हातपाय व त्यांच्या अंगावरचे कपडे यांशिवाय त्यांच्याजवळ कांहीही नव्हतें. दिवसभर काबाडकष्ट करून त्यांना मजूरीबद्दल ४० ते ५० कोपेक (सुमारे ९-१० आणे) मिळत पण त्यांतूनही ते थोडीशी शिल्लक टाकीत, कारण पीटरला एक मेंढीच्या कातडीचा कोट घ्यावयाचा असून सेमीनला स्वत:च्या गावीं जावयाचें होतें. म्हणून त्यांच्यासारखे शेतकरी मला रस्त्याने भेटत तेव्हा त्यांच्याकडे माझें लक्ष जाई.

यांना कामाची, तर त्यांना भिकेची आवड कां ?

अशा धडधाकट भिकाऱ्यांची भेट झाल्यास मी त्यांना त्यांच्या वाईट परिस्थितीचें कारण विचारीत असें. एकदा मला एक धडधाकट

भिकारी भेटला. त्याची दाढी पांढरी होऊं लागली होती. त्याने मजपाशीं भीक मागितली. तो म्हणाला, मी कलूगाहून कामाच्या शोधार्थ आलों आहें. प्रथम त्याला जुने इमारतीचें लाकूड सर्पणाकरितां म्हणून फोड-ण्याचें काम मिळालें. तो व त्याचा सोबती मिळून त्यांनी एका ठिकाणचें लाकूड फोडलेंही. नंतर त्याने दुसरें काम शोधलें पण तें त्याला मिळालें नाही. त्याचा सोबती निघून गेला होता व सबंध पंधरवडा तो कामा-शिवाय होता. या दरम्यान त्याची सर्व पुंजी संपून गेल्यामुळें त्याचे जवळ कुऱ्हाड किंवा करवत विकत घेण्याकरितांही कांही उरलें नव्हतें. मी त्याला करवतीकरतां पैसे दिले, व अमुक ठिकाणीं काम मिळेल म्हणून सांगितलें. (पीटर व सीमेन यांच्याशीं एखादा माणूस कामावर घेण्याबाबत व त्याला सोबती मिळविण्याबावत मी पूर्वीच बोलणें करून व्यवस्था केली होती).

"मग, खात्रीने ये बरें ! तुला तेथे भरपूर काम मिळेल." असें मी त्याला आश्वासन दिलें.

"अर्थात् ! मी निःसंशय येईन. भीक मागण्याची कोणाला हौस का असते ?" असें म्हणून त्याने येण्याबद्दल शपथपूर्वक अभिवचन दिलें. मला वाटलें की तो खरें बोलत असून त्याचा खात्रीने काम करण्याचा इरादा असावा.

दुसरे दिवशीं मी पीटर व सेमीनकडे गेलों व त्यांना अमुक एक इसम आला का म्हणून विचारलें. तो आलेला नव्हता. त्यानेच नव्हे तर अशा प्रकारें कित्येकांनी मला फसविलें. मला असेंही सांगणारे कैक भेटले की आम्हांला फक्त घरीं पोचण्यापुरते भाड्याचे पैसे हवेत. पण अशांपैकी पैसे दिलेल्या कांही जणांना पुनः आठवड्यानंतर रस्त्याने मी पाहिलें. यांपैकी पुष्कळांना मी ओळखलें व तेही मला ओळखत पण क्वचित् कांहींना माझी ओळख न राहिल्यामुळें ते मला पुनः तोच बनावट वृत्तांत सांगत. कांही मला पाहतांच दुसरीकडे वळत. तेव्हा मला वाटलें की या भिकाऱ्यांतही पुरेसे ठक आहेत. पण मला या लफंग्यां-बद्दलही वाईट वाटे; कारण, ते अर्धनग्न, दरिद्री, जर्जर व रोगग्रस्त असत. यांपैकी थंडीने गारठून मेलेल्यांची अगर फांस लावून आत्महत्या केलेल्यांची हकीकत वेळोंवेळीं वर्तमानपत्रांतून आपण वाचतोंच.

प्रकरण दुसरें

मॉस्कोवासीयांजवळ जेव्हा मी लोकांच्या या निराधार स्थितीसंबंधींचें वर्णन केलें तेव्हा ते मला म्हणाले," अहो हें तर कांहीच नव्हे. जरा खित्राव्ह मार्केटमध्यें जा व तेथील स्वस्त व हलक्या राहत्या खाणावळी पहा, तेथे तुम्हांला खरीं रत्नें सांपडतील.

एका गमत्याने तर असेंही म्हटलें की तेथे असे थोडेथोडके लोकच नव्हे तर त्यांचें सवंध सैन्य तुम्हांला आढळेल. त्याचें म्हणणें खरें होतें (असें मला आढळलें). त्याने 'सैन्या' ऐवजी 'सेना' म्हटलें असतें तर तें जास्त वस्तुस्थितिदर्शक ठरलें असतें. कारण त्यांची संख्या सुमारें ५०००० असावी. शहरचे लोक-जेव्हा या दारिद्र्याचा उल्लेख करीत तेव्हा त्यांना गुदगुल्या होत; जणूं काय त्यांना ती माहिती असल्याबद्दल अभिमान वाटे. मी लंडनमध्यें असतांना तेथील लोकही "पहा काय ही यांची दशा" असा आढचतापूर्ण शेरा मारून तेथील दरिद्र्यांचा उल्लेख करीत. या ज्या असहाय स्थितीचें मजसमोर वर्णन करण्यांत येई ती प्रत्यक्ष पाहण्याची मला इच्छा झाली, पण ज्या ज्या वेळीं खित्राव्ह मार्केटला जाण्याचें मी ठरवीं त्या त्या वेळीं मला कानकोंडें व लाजल्यासारखें वाटे. एकदा वाटे की ज्यांना मदत करतां येणें अशक्य आहे अशा विपद्ग्रस्तांना पाहण्यांत तरी काय अर्थ ? पण लगेच असेंही वाटे की शहरांत राहून चैनीच्या गोष्टी पाहतों तर मग विपत्तीही का पाहूं नये ? सरते शेवटीं १८८१च्या डिसेंबरांत एका कडाक्याची थंडी पडलेल्या दिवशीं मी मॉस्कोमधील दारिद्र्याच्या अड्ड्यावर–खित्राव्ह मार्केटला–गेलों. तो कामकाजाचा दिवस होता. मी पोचलों त्या वेळीं सुमारें चार वाजले होते. सोल्यांका रस्त्यावर विचित्र व अंगाच्या मापाचे नसलेले कपडे घातलेले पुष्कळ लोक मला आढळले. त्याहीपेक्षा त्यांचीं पायतणें फारच विचित्र होतीं. सर्वांचा वर्ण विचित्र व रोगट असा होता. विशेषेंकरून सर्वांच्याच चेहऱ्यावर सभोवतालच्या परिस्थितीबद्दल पूर्ण बेफि-

किरपणा दिसत होता. स्वत:च्या विचित्र पोषाकांत कसा दिसत असेन याची क्षिती न बाळगतां हरएक जण ऐसपैस वावरत होता. हे सर्वजण एकाच दिशेनें चालले होते. मला रस्ता माहीत नव्हता तरी रस्त्याची चवकशी न करतां मी त्यांचे मागोमाग जाऊं लागलों व शेवटीं खित्राव्ह मार्केटमध्यें पोचलों. तेथे या माणसांच्या तोडीच्या व स्वत:च्या विचित्र पेहेरावाबद्दल बेदरकार अशा स्त्रियाही मोकळेपणीं वावरतांना दिसल्या. त्यांत तरुणी तशाच वृद्धाही होत्या. प्रत्येक कांही जिन्नस विक्रीकरितां पुढे मांडून बसली होती. इकडे तिकडे फिरणें व शिवीगाळ यावर त्यांचा सपाटा चालू होता. तेथे एकंदर थोडी मंडळी दिसली. बाजार संपल्यासारखा असल्यामुळें मंडळी बाजारांतून व बाजूने अशी पण एकाच दिशेने एका टेकडीच्या रोखाने जाऊं लागली. मीही त्यांचे मागोमाग निघालों. मी जसा पुढे जाऊं लागलों तशी त्या लोकांची गर्दी वाढूं लागली. बाजार टाकून पुढे जातांच मी दोन स्त्रियांच्या नजीक (बरोबरीस) आलों. त्यांपैकी एक तरुण व दुसरी पोक्त होती. दोघींच्या आंगावर लकतरींच असून त्यांच्यांत कसल्या तरी गप्पा सुरू होत्या.

प्रत्येक शब्दागणिक त्या एक दोन अनवश्यक अभद्र शब्द वापरीत. त्यांपैकी कोणीही दारू प्यालेलें नव्हतें. त्या आपल्या संभाषणांत गढून गेल्या होत्या. त्यांची भाषा मला जरी किळसवाणी वाटली तरी रस्त्याने चाललेल्या इतरांना त्याचें कांही विशेष वाटलें नाही. यावरून हें स्पष्ट आहे की ती त्यांची नित्याची भाषा असावी. या रस्त्याच्या डाव्या बाजूस स्वस्त राहतीं भोजनालयें होतीं. कांही लोक त्यांच्याकडे वळले व बाकीचे पुढे चालले. शेवटीं टेकडीच्या माथ्यावर कोपऱ्याशीं आम्ही एका मोठ्या घरापाशीं पोचलों. मी ज्या घोळक्याबरोबर चाललों होतों त्यापैकी बहुतेक लोक तेथे थांबले. फुटपाथवर व बर्फाच्छादित रस्त्यावर याच प्रकारचे लोक उभे व बसले होते. प्रवेशद्वाराच्या उजवीकडे स्त्रिया व डावीकडे पुरुष होते. मी या रांगांतून पुढे सरसावलों व शेंकडो स्त्री-पुरुषांना मागे टाकून शेवटीं रांगेच्या तोंडाशीं पोचलों. ज्या घरासमोर ही मंडळी बसली होती त्याचें नांव 'ल्यापिन मोफत निशावसतिगृह' असें होतें. या गृहांत वसति करणारांचा हा घोळका असून सर्वजण प्रवेश

मिळण्याची वाट पाहत होते. या घराचे दरवाजे सायंकाळीं पांच वाजतां उघडत व लोकांना प्रवेश मिळे.

पुरुषांची रांग संपली तेथे मी उभा राहिलों. माझ्या अगदी नजीकच्या लोकांनी आपापल्या दृष्टिक्षेपाने माझें लक्ष वेधलें. त्यांचीं लकतरीं चित्रविचित्र रंगाचीं असलीं तरी त्यांच्या मजकडे टक लावून पाहणाऱ्या चेहऱ्यांवर मात्र एकच भाव होता. ते जणूं काय असा प्रश्न करीत होते, "कायहो ! अगदी निराळ्या जगांत राहणारे तुम्ही, तुमचें येथे काय काम ?" "तुम्ही कोण ?" "स्वतः धृतकुल्या मधुकुल्या उडवून आमच्या दारिद्र्याने स्वतःची करमणूक करून आमच्या दुःखावर डागण्या देणाऱ्यापैकी तुम्ही आहांत की आमची दया वाटणाऱ्या असंभाव्य अल्पसंख्याक महानुभावांपैकी कोणी आहांत ?" प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हाच प्रश्न स्पष्टपणें दिसत होता. ते मजकडे पाहत व नजर फिरवीत. मला त्यांपैकी कोणाशीं तरी बोलावेंसें वाटे पण बराच वेळ बोलण्याचें धैर्य होईना. पण भाषा जरी सुरू झाली नव्हती तरी दृष्टिक्षेपाने मात्र आम्ही परस्परांजवळ खेचले गेलोंच. आमच्या राहणींत फरक असला तरी दोन तीन वेळ नजरानजर झाल्यावर आमच्यांत साम्यही आहे असें वाटून एकमेकांची भीति वाटणें बंद झालें. माझ्या अगदी जवळ एक शेतकरी होता. त्याचा चेहरा सुजला असून त्याची दाढी किरमिजी होती. त्याचा कोट व कपडे फाटले असून पायांत कसला तरी चप्पल होता. थंडीचें मान -८° रूमर (१४° फारनहीट) इतकें असून सर्वत्र बर्फ पडलें होतें. या गृहस्थाशीं दोन तीन वेळां नजरानजर झाल्यावर त्याचेवद्दल मला इतका आपलेपणा वाटूं लागला की त्याशीं बोलण्याची लाज वाटण्याऐवजी न बोलण्याचीच लाज वाटावयास पाहिजे असें मला वाटूं लागलें. मी त्याचें मूळ गांव कोणतें, असा प्रश्न केला. त्याने ताबडतोब उत्तर दिलें. तो बोलत असतां इतर लोक जवळ येऊन उभे राहिले. तो स्मॉलेन्स्कहून कांही काम मिळाल्यास पाहावें व धान्य विकत घेण्यापुरते आणि शेतसारा देण्यापुरते पैसे मिळवावे या हेतूने मॉस्कोस आला होता, असें त्याने सांगितलें. "येथे कांही काम नाही. सर्वत्र सोजिरांचा सुळसुळाट आहे. म्हणून मी इकडे तिकडे

भटकत आहें व देवाशपथ गेले दोन दिवस माझे पोटांत कांहीही नाही." बोलतांना तो चाचरत होता तरी त्याने चेहरा शक्य तितका हसरा करण्याचा प्रयत्न केला. जवळच एक म्हातारा सोजीर गरम पेय विकीत होता. त्याला मी बोलाविलें. त्याने एक पेला भरला. शेतकऱ्यानें तो हातीं घेतला व उष्णता वाया जाऊं नये म्हणून प्रथम पेल्याने त्यानें स्वत:चे हात शेकले. पितां पितां तो मला स्वत:ची हकीकत सांगूं लागला. (त्या सर्वांची हकीकत एकाच ठशाची होती.) प्रथम त्याला कांही काम मिळालें पण तें लवकरच संपलें. नंतर त्या वसतिगृहांत त्याचा पासपोर्ट व पैसे चोरीस गेले. तेव्हा त्याला मॉस्को सोडतां येईना. तो म्हणाला, " दिवसां मी गरम पेयाच्या दुकानीं शेकतों व जे कांही तुकडे मला मिळतात त्यांवर उपजीविका करितों. पण कधी कधी मला हाकलूनही देतात " त्यापिन हौसमध्यें त्याला रात्रीं फुकट राहावयास मिळे. पासपोर्ट नसल्याच्या सबबीवर पोलीसकडून झडती होण्याचीच काय ती तो वाट पहात होता. कारण मग पोलिसने अटक करून त्याला पायींच त्याचे गांवीं पोंचविलें असतें. गुरुवारीं ही पोलिस झडती कदाचित् येईल अशी बातमी असल्याचें त्याने सांगितलें. (तुरुंगवास किंवा झडती हीं दोन्ही त्याला स्वर्गतुल्य वाटत.)

अशा रीतीने तो म्हातारा माणूस स्वत:ची हकीकत सांगत असतां त्या घोळक्यापैकी दोघे तिघे पुढे येऊन त्याची हकीकत खरी असल्याबद्दल त्यांनी ग्वाही दिली. त्यांनीही आपण अशाच परिस्थितींत असल्याचें सांगितलें. एक लांब नाकाचा, रोडकासा, निस्तेज तरुण इसम त्या घोळक्यांतून गर्दी मोडत मजकडे आला. त्याच्या अंगांत खांद्यावर फाटलेला फक्त एक सदरा व डोक्यावर एक बिनगोंडचाची टोपी होती. थंडीने तो एक सारखा अतिशय कुडकुडत होता तरी त्याने शेतकऱ्याच्या बोलण्यावर तिरस्कारपूर्वक स्मित करण्याचा प्रयत्न केला (कारण असें करणें माझ्या विचारसरणीशीं अधिक जुळेल असें त्याला वाटलें असावें) व मजकडे रोखून पाहिलें. त्यालाही मी गरम पेय दिलें व त्यानेही पेला हातांत घेऊन आपले हात शेकले. पण त्याने बोलण्यास सुरुवात करतांच एक चोंचदार नाकाचा,

गलेलठ्ठ व टोपी आणि जाकीट नसलेला कृष्णवर्ण माणूस त्याला कोपरखळी देऊन पुढे आला व त्यानेही मला गरम पेय मागितलें. त्याच्या मागून एक उंच, टोंकदार दाढी असलेला, दारूने धुंद असा म्हातारा इसम पुढे सरसावला. त्याचे अंगांत कंबरेभोवतीं दोरीने बांधलेला एक ओव्हरकोट व पायांत चटईचा जोडा होता. त्याच्या मागून एक ठेंगू व फाटक्या विजारींतून गुडघे दिसत असलेला इसम पुढे आला. थंडीमुळें याचे गुडघे एकमेकांवर आपटत असून त्याचें तोंड सुजलेलें व डोळे पाण्याने डबडबलेले असे होते. थंडीने याला इतकें पछाडलें होतें की पेला धरवतां न आल्यामुळें त्यांतील पेय त्याच्या अंगावर सांडलें. इतर लोक त्याला शिव्या हासडूं लागले पण हा मात्र ओशाळवाणें स्मित करून कांकडत उभा राहिला. त्यानंतर अंगांत एक लवतरी व पायाला चिंध्या गुंडाळलेला असा एक अष्टावक्र इसम पुढे आला; त्याच्या मागून एक अधिकाऱ्यासारखा दिसणारा, नंतर एक भिक्षुकवजा व नंतर एक विचित्र बिननाक्या असे लोक एकामागून एक पुढे आले. हे सर्व क्षुधाग्रस्त, थंडीने कांकडलेले दीनवृत्ति असून यांनी गरमपेयाकरितां तें संपेस्तव मजभोवतीं लोचटपणाने गर्दी केली. एकाने मला पैसे मागितले व मीही त्याला ते दिले. त्यानंतर इतर लोक पैसे मागूं लागले व लवकरच मी एका घोळक्याच्या तावडींत सापडलों. लगेच गोंगाट व धक्काबुक्की सुरू झाली. शेजारच्या घरांतील शिपायाने घरासमोरील गर्दी मोडण्याबद्दल ओरडून सांगितलें व लोकांनी लगेच मुकाटयाने गर्दी मोडली.त्या गर्दीतच कांही लोक स्थिरस्थावर करण्यास पुढे सरसावले व त्यांनी ताबडतोब माझें संरक्षण करण्याचा प्रयत्न केला. मी गर्दीत सांपडूं नये अशी त्यांची इच्छा दिसली. पण सुरुवातीला पायरस्ताभर पसरलेला जमाव गोंधळामुळे सर्व मजभोवतीं गोळा झला होता. सर्व मजकडे पाहून भीक मागत होते व प्रत्येक नवा भिकारी मला अधिकाधिक दीन, हीन व पतित दिसला. मजजवळ असलेले सर्व पैसे (सुमारे तीस रुपये) मी देऊन टाकले. त्या घोळक्याच्या मागून मी त्या निशावसतिगृहांत प्रवेश केला. ही एक भव्य इमारत होती. हिच्यांत चार विभाग होते. अगदी वरच्या मजल्यावर पुरुषांची व्यवस्था होती व खालच्या मजल्यांतून स्त्रिया राहत होत्या. प्रथम मी स्त्रिया राहत तेथे

...ग्रंथालय...

*

गेलों. रशियांतील आगगाडयांतून तिसऱ्या वर्गांत जशीं बाकें असतात. तशीं तेथे बांकें होतीं. बाकांच्या एक खाली व एक वर अशा ओळी होत्या. वृद्धा व तरुणी आपल्या विचित्र व तोटक्या कपडयांनिशीं तेथे शिरल्यांना मला दिसल्या. कांही वरील तर कांही खालच्या बाकांवर बसल्या. कांही पोक्त बाया त्या घराच्या मालकाला दुवा देण्याकरितां प्रार्थना करूं लागल्या. कांही हसत होत्या तर कांही अचकट विचकट भाषा करीत होत्या. मी वर गेलों तेथे पुरुष आपआपल्या जागांवर बसत होते. तेथे मी पूर्वी पैसे दिलेल्या इसमांपैकी एक इसम मला आढळला. त्याला पाहतांच मला फारच लाजल्यासारखें वाटलें व मी तावडतोब दुसरीकडे वळलों. मला कांही तरी अपराध केल्यासारखें वाटूं लागलें व मी तडक तेथून निघून आपल्या घरचा रस्ता सुधारला. घरी पोचल्यावर रुजामेदार जिन्यावरून मी माझ्या मखमली तक्तपोशीदार दिवाणखान्यांत गेलों व कपडे उतरून पक्वानांवर ताव मारण्यास सुरुवात केली. दोन वाढपी वाढण्याच्या पोषाखांत माझी सरबराई करण्यास सज्ज होते.

तीस वर्षांपूर्वी एकदा पारिसमध्यें तीस हजार प्रेक्षकांसमोर एकाचा शिरश्च्छेद होतांना मी पाहिला होता. त्या माणसाचा घोर अपराध होता हें मला माहीत होतें. अशा प्रकारें शिरश्च्छेद करण्याचें समर्थन करणारे सर्व मुद्दे मी ऐकलेले होते. शिरश्च्छेद मुद्दाम व विचारपूर्वक करण्यांत येई, हेंही मला माहीत होतें. पण ज्या क्षणीं त्या माणसाचें शिर धडावेगळें होऊन पेटींत पडलें त्याक्षणीं मी एक दीर्घ उसासा टाकला व निव्वळ मनाने किंवा हृदयांतच नव्हे तर रोमरोमीं माझी खात्री पटली की शिरश्च्छेद-समर्थनार्थ मांडण्यांत येणारे सर्व मुद्दे मूर्खपणाचे व फोल आहेत. खुनाचें अत्यंत अमानुष्य कृत्य वाटेल तितक्या लोकांनी मिळून केलें अगर त्याला वाटेल तें नवें नांव दिलें तरी खून तो खूनच. हा गुन्हा माझ्या डोळ्यांदेखत घडला इतकेंच नव्हे तर कांहीही विरोध न करतां मी तेथे उभा राहिल्याने त्या गुन्ह्यास माझी संमती मिळाली, नव्हे मी त्यांत भागीदारही झालों. आता अगदी वरीलप्रमाणेंच हजारो लोकांची उपासमार व थंडींत होणारे हाल याचें दृश्य पाहून मनाने किंवा हृदयांतच नव्हे तर रोमरोमीं मला पटलें की पलीकडे मास्कोंत असे हजारो शीत-

क्षुधाग्रस्त लोक असणें व दुसरीकडे मी व इतर हजारों लोकांनी पोट फुटे-तों मिष्टान्न खाणें अगर घोड्यावर झुली टाकणें किंवा दिवाणखान्यांतून गालिचे वापरणें या सर्वांच्या अपरिहार्यतेबद्दल जगांतील शहाणे कांहीही म्हणोत, पण हा गुन्हा असून हा एकदाच नव्हे तर सतत करण्यांत येत आहे आणि मी माझ्या चैनवाजीमुळें तिकडे दुर्लक्ष करतों इतकेंच नव्हे तर त्यांत भागही घेतों. वरील दोन परिस्थितींत एकच फरक होता. शिरश्छे-दाच्या ठिकाणीं फार तर जे मारेकरी शिरश्छेदस्थलीं एकत्र झाले होते त्यांना त्यांची चूक दाखवून त्यांना मी ओरडून शिरश्छेदापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करूं शकलों असतों. पण असें करतांना माझ्या विनंतीचा मारेकऱ्यांवर कांहीही परिणाम होणें शक्य नाही अशी मला जाणीव असती. सध्याच्या परिस्थितींत मात्र मला थोडेसें गरम पेय अगर कांहीसे पैसे, इतकेंच नव्हे तर माझा ओव्हरकोट किंबहुना माझें सर्वस्वही, मला देऊन टाकता आलें असतें. पण हें मी केलें नाही आणि म्हणून मला असें वाटलें—व वाटतें, आणि जोंवर कोणा एकास पोटभर मिळत नसतां मजजवळ जास्त शिधा राहील अथवा एखाद्याला एकही कोट नसतां मजजवळ दोन कोट राहतील तोंवर मला असेंच वाटणार, की एका वारंवार व अखंडपणें घडणाऱ्या गुन्ह्यांत माझें अंग आहे.

प्रकरण तिसरें

ल्यानंतर हौस मधून परत आलों त्याच रात्रीं सदर प्रकाराबद्दल मला काय वाटलें तें मी माझ्या एका मित्राला सांगितलें. तो शहरचाच राहणारा असल्यामुळें त्याने कांहीशा समाधानपूर्णतेने म्हटलें, "अहो ! शहरांत हें असें असायचेंच, तुम्ही खेड्यांतले म्हणून तुम्हांला या प्रकाराचें नावीन्य वाटलें. पूर्वीही हें असेंच होतें व पुढेही असेंच राहणार; सुधारणेचें हें एक अपरिहार्य अंग आहे. लंडनमध्यें तर याहूनही भयंकर स्थिति आहे. म्हणून म्हणतों यांत कांहीही वावगें नाही व याचा कोणीही विषाद मानूं नये." मीं माझ्या मित्राला उत्तर देऊं लागलों पण बोलतांना माझा उत्साह व चिडखोरपणा इतका वाढला की माझी पत्नी शेजारच्या खोलींतून धावत येऊन "काय झालें ?" म्हणून विचारूं लागली. मला वाटतें बोलतां बोलतां माझ्या डोळ्यांतून अश्रु येऊन कंठ दाटला होता व माझ्या मित्राच्या दिशेने आवेशाने हस्तक्षेप करून "अशा रीतीने आयुष्य कंठणें अशक्य आहे," असें मी त्रिवार म्हटलें होतें. माझ्या फाजील उत्साहाबद्दल त्या सर्वांनी मला लाजविलें व चिडल्याशिवाय तुम्हांला कोणत्याही विषयावर शांतपणें बोलतां येत नाही असेंही म्हटलें. लोक वाटेल त्या हीन स्थितींत असले तरी त्यांच्याकरितां तुमच्या जवळच्या माणसांचें जीवन कष्टी करणें समर्थनीय ठरूं शकत नाही. असेंही त्यांनी मला समजावून सांगितलें.

हें त्यांचें म्हणणें मला योग्य वाटलें व मी गप्प बसलों. पण अंतर्यामीं मात्र मला वाटत होतें की माझें म्हणणें सुद्धा बरोबरच आहे. म्हणून माझ्या मनाला स्वस्थता वाटेना.

यापूर्वीही शहरांतील राहणी मला विचित्र व नवी वाटे; पण आता मात्र मला ती इतकी किळसवाणी वाटूं लागली की पूर्वी ज्या चैनीच्या वस्तूंचा मी उपभोग घेईं त्यांनी आता मला मानसिक वेदना होऊं लागल्या व मी माझ्या मनाला कितीही समजाविण्याचा यत्न केला तरी माझा अगर इतर कोणाचाही दिवाणखाना अगर एखादें मेजवानीकरितां

तयार केलेलें सुशोभित मेज, किंवा उमदे घोडें जोडलेली व हाकलण्यास गलेलठ्ठ कोचमन असलेली वग्गी इत्यादि गोष्टी किंवा दुकानें, थिएटरें, लोकांचा जमाव इ० पाहिलें तर मला चीड आल्याशिवाय राहूं नये असें होऊं लागलें. कारण यांना पाहतांच माझ्या मनश्चक्षूपुढे तावडतोव यांचे बरोबरीने ल्यापिनहौसमधील क्षुधित, थंडीने त्रस्त, दीन व हीन लोक चटकन उभे राहत. या दोघांचा संबंध आहे इतकेंच नव्हे तर दुसरें दृश्य पहिल्याचा परिणाम आहे ही कल्पना मला सोडीना. अगदी पहिल्या घटकेपासून अपराधित्वाच्या ज्या जाणिवेने मला टोचण्यास सुरुवात केली ती तर तशीच राहिली पण लवकरच या जाणिवेला मागे सारणारी एक नवी भावना माझ्या मनांत उद्भवली.

ल्यापिनहौससंबंधीं माझ्या मनावर जो परिणाम झाला त्याच्या बाबतींत मी माझ्या निकट मित्रांशीं व ओळखीच्यांशीं बोललों तेव्हा त्या सर्वांनी अगदी पहिल्या गृहस्थाप्रमाणें (ज्याचे आंगावर मी ओरडलों होतों) उत्तरें दिलीं. मात्र यांनी माझ्या दयालुत्वाची आणि मृदुत्वाची प्रशंसाही केली आणि ल्यापिनहौसमधील दृश्याचा तुमच्यावर इतका परिणाम होण्याचें कारण तुमचा स्वत:चा चांगुलपणा होय असेंही त्यांनी मला सांगितलें. माझा सहजच यावर विश्वास बसला आणि, पुरेसा विचार केला नसल्यामुळें मला लाज वाटण्याऐवजीं स्वत:च्या दयालुत्वाबद्दल समाधान वाटूं लागलें, इतकेंच नव्हे तर त्याचें प्रदर्शन करावें असेंही वाटूं लागलें.

मी स्वत:शीं ह्मणालों " खरोखरच माझ्या चैनबाजीकडे कांही दोष नसून कदाचित जीवनक्रमाच्या अपरिहार्य परिस्थितीकडेच तो असावा. माझ्या जीवनक्रमांत फरक केल्याने मी पाहिलेली परिस्थिति सुधारणार नाही. असा फरक केल्याने माझा आयुष्यक्रम मात्र मला स्वत:स व माझ्या जवळच्यांस त्रासदायक होऊन बसेल आणि दरिद्र्यांची दुर्दशा मात्र पूर्ववत्च राहील.

म्हणून प्रथम मला वाटलें त्याप्रमाणें स्वत:चा आयुष्यक्रम बदलणें हा खरा इलाज नसून अभाग्यांच्या ज्या परिस्थितीविषयीं माझे मनांत सहानुभूति निर्माण झाली होती ती परिस्थिति सुधारण्याचा यत्न करणें

हा खरा इलाज होय असें मला वाटलें. वास्तविक पाहतां मी एक चांगला दयाळू अंतःकरणाचा मनुष्य असून मला माझ्या शेजाऱ्यांची परिस्थिति सुधारावीशी वाटते, असाव याचा मथितार्थ होय. म्हणून मी माझ्या चांगुलपणाचें प्रदर्शन होईल अशा एका परोपकारी योजनेचा विचार करूं लागलों. एक गोष्ट मात्र नमूद केली पाहिजे, ती ही की हा विचार करीत असतां अंतर्यामीं मला असेंच वाटे की हें बरोबर नव्हे. पण पुष्कळ प्रसंगीं ज्याप्रमाणें सदसद्विवेकबुद्धीची ऊर्मि विवेचकपणा व कल्पना यांच्या दडपणाखाली चिरडली जाते तोच प्रकार माझ्या बाबतींत झाला. त्याच वेळीं खानेसुमारीची पूर्व तयारी सुरू होती. स्वतःचा चांगुलपणा दाखविण्याकरितां परोपकाराची जी योजना मी मनांत आखली होती तिला ही नामी संधि आहे असें मला वाटलें. मॉस्कोमध्यें अनेक परोपकारी संस्था असल्याचें मला माहीत होतें. पण मी योजलेल्या कार्यक्रमापुढे त्यांच्या कार्याची दिशा मला चुकीची व माझ्या उद्दिष्टाच्या मानानें कुचकामाची वाटूं लागली. म्हणून शहरांतील श्रीमंतांच्या मनांत तेथील गरिबांविषयीं सहानुभूति निर्माण करणें, पैसे गोळा करणें, व या कामांत मदत करण्याची इच्छा असणारांची यादी करणें, शिरगणती करणारांबरोबर गरिबांच्या वस्तींतून फिरून खानेसुमारीच्या कामाशिवाय त्या निराधारांच्या अडचणी, गरजा इत्यादींची चवकशी करून, ज्यांना पैसें किंवा काम हवें त्यांना पैसे किंवा काम देणें अगर त्यांना त्यांच्या खेडेगांवीं जाण्यास मदत करणें, त्यांच्या मुलांस शाळेंत पाठविण्यास मदत करणें आणि म्हाताऱ्यांची सदावर्तांतून व्यवस्था करणें, असा कार्यक्रम मी आखला. यापुढे मला असेंही वाटलें की या कामांत भाग घेणाऱ्यांपैकी कांहींची एक संस्था काढतां येऊन निरनिराळ्या सभासदांकडे मॉस्कोच्या निर-निराळ्या भागांची जवाबदारी सोपवितां येईल व अशा योगें मॉस्को-तील दारिद्र्याची वाढ खुंटवून एकंदर दारिद्र्याला मुळांतच आळा घालतां येईल. माझ्या कल्पनासृष्टींत तर मी लगेच दरिद्री तर सोडाच पण एकही गरजवंत मनुष्य दृष्टीस पडणार नाही अशा मॉस्कोचें चित्र रेखाटलें. हें सर्व मला करतां येईल आणि नंतर आम्हा श्रीमं-तांना स्वस्थपणें व सुखाने आपापल्या दिवाणखान्यांतून पंचपक्वान्नांवर

ताव मारतां येईल व बग्ग्यांत बसून थिएटरला किंवा समारंभांना जातांना ल्यापिन हौस सारखें दृश्य आढळून मनाला टोंचणी लागणार नाही, असेंही माझ्या मनाला वाटलें.

अशा प्रकारें योजना ठरवून मी तिच्यासंबंधीं एक लेख लिहिला. पण तो वर्तमानपत्रांत प्रसिद्धीस पाठविण्यापूर्वी ज्या माझ्या ओळखीच्या लोकांतून या कामास मदत होईल असें मला वाटलें त्यांच्या मी भेटी घेऊं लागलों. त्या दिवशीं ज्यांना मी भेटलों (मी फक्त श्रीमंतांनाच भेटलों) त्यांच्याशीं साधारणपणें लेखांत लिहिलेल्या ठरीव गोष्टी बोललों. खाने-सुमारीचा फायदा घेऊन मॉस्कोंतील दरिद्री लोकांची माहिती गोळा करावी व त्या द्ररिद्र्यांना काम अथवा द्रव्यसाहाय्य द्यावें व मॉस्कोंतून दारिद्र्याची हकालपट्टी होईल असें कांही तरी करावें, असें मी सुचविलें. मग सर्व श्रीमंतांना स्वस्थ चित्ताने आपणांस सराव असलेली चैन करतां येईल. सर्वांनी माझें म्हणणें शांतपणाने व गंभीरपणाने ऐकून घेतलें पण त्या सर्वांच्या मनांत निरपवादतः एकच कल्पना आली. त्या सर्वांना योजना कशाविषयीं आहे हें कळतांच कसेसें व लाजल्यासारखें वाटूं लागलें. माझ्या मूर्खपणाच्या बोलण्याची (पण त्यांना स्पष्टपणें हें मूर्खपणाचें आहे असें म्हणतां येईना) जणूं काय त्यांना लाज वाटली असावी. माझें हें मूर्खपणाचें बोलणें त्यांना एखाद्या अवांतर कारणामुळें पत्करणें भाग पडत असल्यासारखें दिसलें.

" होय तर....., अर्थात् ! ... खरोखरच कल्पना फार नामी आहे," असें ते म्हणाले. " खरोखरच कोणालाही त्यांच्याबद्दल सहानुभूतीच वाटेल." " तुमची कल्पना खरोखरच उत्कृष्ट आहे. माझ्याही मनांत हीच कल्पना आली होती...पण आपले लोकच इतके बेफिकीर आहेत की या योजनेला फारसा पाठिंबा मिळण्याची आशा करूं नये. माझ्याबद्दल म्हणाल तर मी स्वतः तुम्हांला मदत करावयास तयार आहें. "

सर्वांच्या म्हणण्याचा सारांश कांहीसा वरीलप्रमाणें होता. त्यांना माझें म्हणणें पटलें, किंवा त्यांनाही मजप्रमाणें स्फूर्ति झाली म्हणून नव्हे तर माझ्याशीं मतभेद प्रकट करण्यांत ज्या इतर अडचणी होत्या त्यांमुळें

त्यांनी माझ्या म्हणण्याला (वरपांगी) मान्यता दर्शविली असें मला वाटलें. माझ्या अशा वाटण्याला पुष्टि सुद्धा मिळाली. कारण पैशाच्या बाबतींत मदत करूं म्हणणारांपैकी कोणीही स्वत: मदतीचा आकडा सांगितला नाही. शेवटीं मलाच म्हणावें लागलें की, "कायहो, तुमच्याकडून ३००-२००-१०० अगर २५ रूबल येतील असें समजावयाचें ना ?" पण नगदी पैसे कोणीही मला दिलेच नाहीत. हें नमूद करण्याचें कारण इतकेंच की साधारणत: जी गोष्ट स्वत:स हवी असते तिजकरितां द्यावयाचे पैसे प्रत्येक-जण ताबडतोब देत असतो. उदाहरणार्थ, सारा बर्नहार्टचें काम पाहावयास जाऊं इच्छिणारे लोक ताबडतोब पैसे मोजून जाण्याचें नक्की करतात. पण ज्यांनी या ठिकाणीं पैसे द्यावयाचें कबूल केलें व ज्यांनी एकंदर कार्यास सहानुभूति दाखविली त्यांपैकी एकानेही रोख पैसे दिले नाहीत. मी ज्या रकमांचा वर उल्लेख केला त्यांना मूकसंमति काय ती मिळाली. त्या दिवशीं शेवटीं मी ज्या घरीं गेलों तेथे बरीच मंडळी जमली होती. तेथील घरमालकीण बरेच दिवसांपासून परोपकाराच्या कार्यांत भाग घेत असे. घरासमोर कैक बग्ग्या उभ्या असून दिवाणखान्यांत उंची पोषाख घातलेले कैक पट्टेवाले बसले होते. आंत दिव्यांच्या उजेडांत दोन टेबलां-भोवतीं उंची पोषाख व मौल्यवान दागिने घातलेल्या विवाहित व अ-विवाहित स्त्रिया लहान बाहुल्यांना पोषाख चढवीत होत्या. त्यांच्या जवळ कैक तरुणही उभे होते. गरिबांकरितां एक लॉटरी काढली होती; तेथे विकण्याकरितां त्या बाहुल्या तयार करण्यांत येत होत्या.

या दिवाणखान्यांतील दृश्य व तेथे एकत्र झालेली मंडळी पाहून मला अस्वस्थता वाटली. तेथे जमलेल्यांच्या संपत्तीची बेरीज लक्षावधी रूबल झाली असती किंवा त्यांचे पोषाख, कलाबतू, उंची भांडीं, दागिने, गाड्याघोडों, पट्टेवाले व त्यांचे पोषाख यांवरील निव्वळ व्याजा-च्या शतांशानेही त्यांचें अंगीकृत कार्य मौल्यवान नव्हतें. याची गोष्ट कशाला, पण या एकाच बैठकीचा म्हणजे त्यांचे हातमोजे, शुभ्र मल-मल, गाडीघोडे, मेणबत्त्या, चहा, साखर, बिस्किटें एवढ्याच खर्चाचा विचार केला तर तो तेथे तयार करण्यांत येणाऱ्या बाहुल्यांच्या किंमती-हून निस्संशय शतपटीने अधिक असेल. हा देखावा पाहून माझी खात्री

झाली की, माझी योजना तेथे कोणालाच आवडणार नाही. पण मी माझी योजना सांगण्याच्या निश्चयानेच आलों होतों; म्हणून, सांगणें अवघड वाटलें तरी, मला जें सांगावयाचें होतें तें (माझ्या लेखाबरहुकूम) मी सांगितलेंच.

तेथे जमलेल्यांपैकी एक सभ्य स्त्री म्हणाली, "मला बाई त्या गरीब लोकांत जाण्याचा मुळी धीरच होत नाही. मी पाहिजे तर पैसे देतें." केव्हा व किती पैसे देणार याचा मात्र तिने उल्लेख केला नाही. दुसऱ्या एका सभ्य स्त्रीने व तरुणाने गरिबांच्या वस्तींत फिरण्याचें आश्वासन दिलें, पण त्यांचा मी उपयोग केला नाही. त्या मंडळीपैकी ज्या प्रमुख माणसाला मी माझी योजना सांगितली तो म्हणाला, "द्रव्याभावीं फारसें कांही करतां येणार नाही. पैसा न मिळण्याचें कारण असें की मॉस्कोमधील श्रीमंत लोक सर्वांच्या माहितीचे असून त्यांच्याकडून जें मिळणें शक्य होतें तें मिळून चुकलें आहे. सर्व परोपकारी माणसांना त्यांच्या दातृत्वाबद्दल सरकारांतून पदव्या, पदकें व इतर मान मिळून चुकला असल्यामुळें द्रव्यसाहाय्य मिळण्यास सरकारांतून नवीन पदकें-पदव्या मिळवून देण्याची व्यवस्था करावी लागेल. पण हा जो एकच परिणामकारक उपाय आहे तो अत्यंत दुस्साध्य आहे."

घरीं परत आल्यावर निजतांना माझी अशी तर भावना झालीच की आपली योजना अयशस्वी होणार; पण आपण आजचा दिवस कांही तरी घाणेरडें व लज्जास्पद काम करण्यांत घालविला असेंही मला वाटलें. मात्र मी प्रयत्न सोडला नाही; कारण एक तर प्रयत्नास सुरवात होऊन गेली होती व लाजेकाजेस्तव का होईना पण मला तो चालविणें भाग होतें. शिवाय असा प्रयत्न करीत आहें, या जाणिवेच्या भरंवशावर माझा नित्याचा आयुष्यक्रम मी चालू ठेवूं शकलों. पण माझी योजना अयशस्वी झाली असती तर माझा जीवनक्रम बदलून नवा जीवनक्रम अंगीकारणें मला भाग पडलें असतें व या नव्या क्रमाला तर मी घाबरें; म्हणून, प्रयत्न अयशस्वी होईल असें अंतस्थ मला वाटलें तरी, तें न जुमानतां मी आपला प्रयत्न चालूच ठेवला.

माझा लेख मी छापावयास दिला होता त्याचें मुद्रित मी ग्रामसभेंत वाचलें. वाचत असतां मला इतकी शरम वाटली की मी अडखळूं लागलों व

माझ्या डोळ्यांत अश्रूही आले. हजर असलेल्या सर्वांनाही अस्वस्थता वाटूं लागली हें माझ्या लक्षांत आलें. शेवटीं ज्यांनी खानेसुमारीचें काम पत्करलें होतें त्या लोकांनी दरिद्री लोक व इतर समाज यांमध्यें दळणवळण घडवून आणण्याचें मध्यस्थाचें काम पुढे चालू ठेवावें ही माझी सूचना कोणास मान्य आहे काय,असें मी शेवटीं विचारलें.त्याबरोबर सर्व लोक अस्वस्थपणें स्तब्ध राहिले. नंतर दोघांनी भाषणें केलीं. त्यांनी माझ्या योजनेंतील अप्रयोजकपणा दुरुस्त करण्याचा आव आणला. माझ्या विचारसरणीबद्दल सर्वांनी सहानुभूति प्रकट केली. तत्वत: माझ्याशीं ऐकमत्य असूनही माझ्या योजनेंतील अव्यवहारीपणा दाखविण्यांत आला. या भाषणानंतर सर्वांना बरें वाटल्यासारखें दिसलें. पण नंतर मी माझा मुद्दा पुढे दामटण्याच्या इराद्याने पुन: व्यक्तिश: विचारलें की " तुम्हीं शिरगणती चालू असतां गोरगरिबांच्या अडचणींची चवकशी करून दरिद्र्यांच्या वतीन श्रीमंतांजवळ वकीली करावयास व पुढेही हें मध्यस्थाचें काम चालू ठेवण्यास तयार आहांत काय?" हें विचारतांच सर्वजण पुन: अस्वस्थ झाले. त्यांच्या चेहऱ्यावर पुढील भाव स्पष्टपणें व्यक्त झाला—"हें पहा तुमच्याबद्दल वाटणाऱ्या आदरामुळें आम्ही तुमचा मूर्खपणा एकदा सहन केला, पण तुम्ही पुन: तीच 'री' ओढीत आहांत " चेहऱ्यावर हा भाव असला तरी शब्दांनी मात्र त्यांनी रुकारच दिला. त्यांपैकी दोघेतर कट केल्याप्रमाणें वेगळ्याने स्वत:शींच पुटपुटले "नीतिदृष्ट्या हें आमचें कर्तव्यच आहे."

जे विद्यार्थी खानेसुमारीच्या कामांत होते त्यांना मी सुचविलें की खानेसुमारीबरोबरच जीवदयेचा विचारही आपण स्वत:समोर ठेवला पाहिजे. हें म्हणतांक्षणीं त्यांचेवरही वरीलप्रमाणेंच परिणाम झाला. एखादा पोक्त माणूस मूर्खपणाचें बोलूं लागला म्हणजे त्याच्याशीं नजरानजर करण्यांत वाटावी तशी लाज त्यांना मजकडे पाहण्यांत वाटूं लागली. ज्या वर्तमानपत्राच्या संपादकाला मी माझा लेख प्रसिद्धीकरितां दिला त्याच्यावरही असाच परिणाम झाला. इतकेंच नव्हे तर माझी पत्नी, माझा मुलगा व इतर अनेकांवर अगदी हाच परिणाम झाला. सर्वांना—कोण जाणे कां तें—अस्वस्थता वाटे.पण माझ्या कल्पनेला मान्यता दिल्याशिवाय गत्यंतरही

नसे. सबब सर्वजण कल्पनेला मान्यता तर देत पण तिच्या यशाबद्दल ताबडतोब शंकाही दर्शवीत आणि सर्वजण समाजाच्या व इतर सर्वांच्या (अर्थात स्वतः खेरीज करून) अनास्थेबद्दल कडक टीका करीत. हें सर्व बरोबर नसून यांतून कांहीही निष्पन्न होणार नाही असें मला अंतस्थ वाटे; पण माझा लेख छापून गेला होता व मी खानेसुमारीचें कामही पत्करिलें होतें. प्रथम मी काम सुरू केलें पण आता कामाने मला फरफटण्यास सुरुवात केली होती.

प्रकरण चवथें

म्हाइ्याच विनंतीवरून मला खामोव्हनिकी मोहोल्ल्यांतील *खानेसुमारीचें काम देण्यांत आलें. या भागांतच कमाल दारिद्र्याचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध असें 'झानोव्ह हौस'ऊर्फ 'झानोव्ह फॉर्ट्रेस'आहे. प्रथम हें घर झानोव्ह नांवाच्या व्यापाऱ्याचें होतें पण आता त्यावर सिमोन्स आडनांवाच्या कुटुंबाची मालकी आहे. आत्यंतिक दरिद्र्यांचें वसतिगृह अशी या घराची कीर्ति मी पूर्वीच ऐकली असल्यामुळें मुद्दामच मी हा मोहोल्ला मागून घेतला होता.

म्युनिसिपालिटीकडून सूचना मिळाल्यावर खानेसुमारी सुरू होण्यापूर्वी मी एकदा हा मोहोल्ला पाहावयास गेलों. त्यांनी दिलेल्या नकाशाच्या साहाय्याने मला झानोव्ह हौस ताबडतोब सापडलें.

मी शेजारच्या निकोल्स्की गल्लींत शिरलों. इच्या शेवटीं डावीकडे गल्लीच्या बाजूस दरवाजा नसणारें एक भयाण घर दिसलें. त्याच्या एकंदर स्वरूपावरून हेंच झानोव्ह हौस असावें असा मी तर्क केला.

मुख्य निकोल्स्की रस्त्याच्या उतारावरून येतांना मला १० ते १४ वर्षें वयाचीं जाकिटें किंवा पातळ कपड्याचा कोट घातलेलीं कांही मुलें उतारावरून किंवा एकचाकी पायगाडीवर त्या घराशेजारच्या बर्फाच्छादित फर्शीवरून घसरतांना दिसलीं. त्या मुलांचे कपडे फाटले होते आणि त्यांच्यांत शहरांतील मुलांत बहुधा असणारी चलाखी व उद्धटपणा दिसत होता. मी थांबून त्यांजकडे पाहिलें. समोरून कोंपऱ्याला वळसा घालून एक फिकट सुरकुतलेल्या गालांची फाटके कपडे घातलेली म्हातारी येत होती. ती स्मॉलेन्स्क बाजाराकडे जात असून चालतांना एखाद्या छातींत फुटलेल्या घोड्याप्रमाणें पावलागणिक उसासा टाकी. माझेजवळ येतांच ती थांबली व घोरल्यासारखा श्वासोच्छ्वास करूं लागली.

इतरत्र जर ही बाई मला भेटती तर तिने मजजवळ भीक मागितली असती पण या ठिकाणीं मात्र तिने बोलण्यास सुरुवात केली. त्या बर्फा-

---

* या ठिकाणीं खामोव्हनिकी मोहल्ल्याची नक्की जागा दाखविणारीं स्थलवर्णनात्मक विशेषणें गाळलीं आहेत.

नसे. सबब सर्वजण कल्पनेला मान्यता तर देत पण तिच्या यशाबद्दल ताबडतोब शंकाही दर्शवीत आणि सर्वजण समाजाच्या व इतर सर्वांच्या (अर्थात स्वतः खेरीज करून) अनास्थेबद्दल कडक टीका करीत. हें सर्व बरोबर नसून यांतून कांहीही निष्पन्न होणार नाही असें मला अंतस्थ वाटे; पण माझा लेख छापून गेला होता व मी खानेसुमारीचें कामही पत्करिलें होतें. प्रथम मी काम सुरू केलें पण आता कामाने मला फरफटण्यास सुरुवात केली होती.

प्रकरण चवथें

म्हाइ्याच विनंतीवरून मला खामोव्हनिकी मोहोल्ल्यांतील *खानेसुमारीचें काम देण्यांत आलें. या भागांतच कमाल दारिद्र्याचें ठिकाण म्हणून प्रसिद्ध असें 'झानोव्ह हौस'ऊर्फ 'झानोव्ह फॉर्ट्रेस'आहे. प्रथम हें घर झानोव्ह नांवाच्या व्यापाऱ्याचें होतें पण आता त्यावर सिर्मान्स आडनांवाच्या कुटुंबाची मालकी आहे. आत्यंतिक दरिद्र्यांचें वसतिगृह अशी या घराची कीर्ति मी पूर्वीच ऐकली असल्यामुळें मुद्दामच मी हा मोहोल्ला मागून घेतला होता.

म्युनिसिपालिटीकडून सूचना मिळाल्यावर खानेसुमारी सुरू होण्यापूर्वी मी एकदा हा मोहोल्ला पाहावयास गेलों. त्यांनी दिलेल्या नकाशाच्या साहाय्याने मला झानोव्ह हौस ताबडतोब सापडलें.

मी शेजारच्या निकोल्स्की गल्लींत शिरलों. इच्या शेवटीं डावीकडे गल्लीच्या बाजूस दरवाजा नसणारें एक भयाण घर दिसलें. त्याच्या एकंदर स्वरूपावरून हेंच झानोव्ह हौस असावें असा मी तर्क केला.

मुख्य निकोल्स्की रस्त्याच्या उतारावरून येतांना मला १० ते १४ वर्षें वयाचीं जाकिटें किंवा पातळ कपड्याचा कोट घातलेलीं कांही मुलें उतारावरून किंवा एकचाकी पायगाडीवर त्या घराशेजारच्या बर्फाच्छादित फर्शीवरून घसरतांना दिसलीं. त्या मुलांचे कपडे फाटले होते आणि त्यांच्यांत शहरांतील मुलांत बहुधा असणारी चलाखी व उद्धटपणा दिसत होता. मी थांबून त्यांजकडे पाहिलें. समोरून कोंपऱ्याला वळसा घालून एक फिकट सुरकुतलेल्या गालांची फाटके कपडे घातलेली म्हातारी येत होती. ती स्मॉलेन्स्क बाजाराकडे जात असून चालतांना एखाद्या छातींत फुटलेल्या घोड्याप्रमाणें पावलागणिक उसासा टाकी. माझेजवळ येतांच ती थांबली व घोरल्यासारखा श्वासोच्छ्वास करूं लागली.

इतरत्र जर ही बाई मला भेटती तर तिने मजजवळ भीक मागितली असती पण या ठिकाणीं मात्र तिने बोलण्यास सुरुवात केली. त्या बर्फा-

---

* या ठिकाणीं खामोव्हनिकी मोहल्ल्याची नक्की जागा दाखविणारीं स्थलवर्णनात्मक विशेषणें गाळलीं आहेत.

वर खेळणाऱ्या मुलांकडे बोट दाखवून ती म्हणत्ये, " पहा तर, ह्र खोडकर मुलें आहेत ही ! ही तरी काय आपल्या बापासारखींच होणार त्या पोरांपैकी एका ओव्हरकोट व बिनगोंड्याची टोपी घातलेल्या पोरा ने तिचें बोलणें ऐकलें. तो थांबला व ओरडून म्हणाला, " कशाल आमच्याकडे बोटें दाखवून शंख करतेस ? तूं स्वतःच तर मुळी झानें हौसमधील एक कुत्री आहेस." मी त्याला विचारलें, " काय तूं येथे रा तोस ? " तो म्हणाला, " होय आणि ही सुद्धा येथेच राहते." "ति नुकताच एक जोडा चोरला आहे," असें तो ओरडला व पाय पुढे फे पलीकडे घसरला.* म्हातारीने खोकत खोकत शिव्यांची लाखोली सु केली. इतक्यांत सबंध अंगभर चिंध्या असलेला, सर्व केस पिकलेला म्हातारा दोन्ही हात फिरवीत (त्याच्या एका हातांत रोट्या व बिस्कि यांची माळ होती) रस्त्याच्या उताराकडील बाजूने येतांना दिसला. त्या वृद्ध गृहस्थाच्या हावभावावरून त्याने नुकतीच व्होडका (दारूचा एक रशियन प्रकार) घेतली असावीसें दिसलें. त्याने म्हातारीचें चिडखोरपणाचें बोलणें ऐकलें असावें; कारण त्याने लगेच तिची कड घेतली व पोरांना उद्देशून " थांबा गुलामांनो ! तुमची खोड मोडतों " असें म्हणून त्याने त्यांच्याकडे धावून गेल्यासारखें केलें. इतक्यांत तो मजजवळ पोचला व फुट-पाथवर येऊन उभा राहिला. अरबाट नांवाच्या मुख्य रस्त्यावर याला कोणी पाहिलें असतें तर त्याचें वय, अशक्तपणा व गरिबी यामुळें कोणाचेंही त्याचेकडे चटकन लक्ष वेधलें असतें. या ठिकाणीं मात्र तो जणूं काय कामावरून परत आलेल्या एखाद्या मजुराप्रमाणें आनंदी दिसला.

मी त्या म्हाताऱ्याच्या मागोमाग गेलों. तो कोपऱ्यापासून डावीकडे वळला व झानोव्ह हौसच्या पुढे जाऊन एका उपहारगृहांत शिरून दिसेनासा झाला.

या प्राटाकनी गल्लीच्या बाजूला दोन दिंडीदरवाजे व अनेक लहान दरवाजे आहेत. तेथे कांही उपहारगृहें, कांही दारूचे गुत्ते व कांही

---

* बर्फावरून घसरून जातांना विशिष्ट पद्धतीने पाय पुढे फेकतात हें निदान सिनेमांतून सर्वांनी पाहिलें असेल.

किराणा व इतर मालाचीं दुकानें होतीं. हेंच तें झानोव्ह हाउस. येथे सर्वत्र भुरकटपणा व घाण होती. तें घर, राहण्याची जागा, अंगण व खुद्द तेथील लोक हीं सर्वच घाणेरडीं होतीं. तेथे मला जे भेटले ते सर्व लक्तरीं घातलेले अर्धनग्न असे होते. कांही चालत होते व कांही एका दरवाज्यापासून दुसरीकडे धावत होते. दोघांचें एका फाटक्या कपड्यावद्दल देवघेवीचें बोलणें चालू होतें. मी एकदा वाहेरून तें घर सबंध पाहिलें व एक वळसा घेऊन परत आलों आणि दिडी दरवाज्या-समोर उभा राहिलों. आंत जाऊन काय चाललें आहे हें पाहण्याची मला इच्छा झाली पण धीर होईना. तुम्हांला काय हवें, असें कोणी विचार-ल्यास काय उत्तर द्यावें हा मला प्रश्न पडला. शेवटीं नाही होय म्हणतां म्हणतां मी फाटकाच्या आंत शिरलों. आंत शिरतांच भयंकर घाण आली. अंगणांत सर्वत्र अतिशय घाण पसरली होती. मी अंगणाच्या एका कोप-ऱ्यापाशीं वळण घेत असतां वर कोणीतरी प्रथम गॅलरींत धावल्याचा व नंतर जिन्यावरून दडदड उतरत असल्याचा आवाज झाला. (अंगणाच्या चौफेर इमारत असून चारी बाजूने गॅलरी होती.) सर्वांत पुढे एक रोडकी, विट-लेल्या गुलाबी रंगाचा पोषाख घातलेली, बाह्या वर सारलेली आणि मोज्या-शिवायच बूट चढवलेली अशी एक स्त्री धावत आली. तिचेमागून एक दाट केसाचा,. लाल सदरा व जवळ जवळ लेहेंग्यासारखी दिसेल इतकी पोकळ विजार घालून वहाणा घातलेला, एक माणूस धावत होता. या माणसाने त्या बाईला जिन्याच्या पायथ्याशीं पकडलें व हसत तो तिला म्हणाला, " जा पाहूं. " या त्याच्या लगट करण्यानें त्या बाईला स्वत:बद्दल धन्यता वाटूं लागली. ती म्हणाली, "ऐका! काय म्हणतो हा मेला काणा." पण इतक्यांत तिने मला पाहिलें व " काय पाहिजे " असा तिने मला दरडावून प्रश्न केला. मला वास्तविक कोणालाच भेटावयाचें नसल्याने मी गोंधळलों व ताबडतोब काढता पाय घेतला. या सर्व प्रकारांत लक्षांत घेण्यासारखें कांहीच नव्हतें पण रस्त्यावर जें दृश्य मी पाहिलें (शिव्या देणारी म्हातारी व आनंदी म्हातारा, घसरड्या गाडीवर खेळणारी मुलें) त्यानंतर मला वरील दृश्य दिसल्यामुळें मी पत्करलेल्या कामाला एक अगदी निराळी बाजू असल्याचें माझ्या लक्षांत आलें. श्रीमंतांच्या

बर खेळणाऱ्या मुलांकडे बोट दाखवून ती म्हणत्ये, " पहा तर, काय खोडकर मुलें आहेत ही ! ही तरी काय आपल्या बापासारखींच होणार ! " त्या पोरांपैकी एका ओव्हरकोट व बिनगोंड्याची टोपी घातलेल्या पोऱ्याने तिचें बोलणें ऐकलें. तो थांबला व ओरडून म्हणाला, " कशाला ग आमच्याकडे बोटें दाखवून शंख करतेस ? तूं स्वतःच तर मुळी झानोव्ह हौसमधील एक कुत्री आहेस." मी त्याला विचारलें, " काय तूं येथे राहातोस ? " तो म्हणाला, " होय आणि ही सुद्धा येथेच राहते." "तिने नुकताच एक जोडा चोरला आहे," असें तो ओरडला व पाय पुढे फेकून पलीकडे घसरला.* म्हातारीने खोकत खोकत शिव्यांची लाखोली सुरू केली. इतक्यांत सबंध अंगभर चिंध्या असलेला, सर्व केस पिकलेला एक म्हातारा दोन्ही हात फिरवीत (त्याच्या एका हातांत रोटया व बिस्किटें यांची माळ होती) रस्त्याच्या उताराकडील बाजूने येतांना दिसला. त्या वृद्ध गृहस्थाच्या हावभावावरून त्याने नुकतीच व्होडका (दारूचा एक रशियन प्रकार) घेतली असावीसें दिसलें. त्याने म्हातारीचें चिडखोरपणाचें बोलणें ऐकलें असावें; कारण त्याने लगेच तिची कड घेतली व पोरांना उद्देशून " थांबा गुलामांनो ! तुमची खोड मोडतों " असें म्हणून त्याने त्यांच्याकडे धावून गेल्यासारखें केलें. इतक्यांत तो मजजवळ पोचला व फुटपाथवर येऊन उभा राहिला. अरबाट नांवाच्या मुख्य रस्त्यावर याला कोणी पाहिलें असतें तर त्याचें वय, अशक्तपणा व गरिबी यामुळें कोणाचेंही त्याचेकडे चटकन लक्ष वेधलें असतें. या ठिकाणीं मात्र तो जणूं काय कामावरून परत आलेल्या एखाद्या मजुराप्रमाणें आनंदी दिसला.

मी त्या म्हाताऱ्याच्या मागोमाग गेलों. तो कोपऱ्यापासून डावीकडे वळला व झानोव्ह हौसच्या पुढे जाऊन एका उपहारगृहांत शिरून दिसेनासा झाला.

या प्राटाकनी गल्लीच्या बाजूला दोन दिंडीदरवाजे व अनेक लहान दरवाजे आहेत. तेथे कांही उपहारगृहें, कांही दारूचे गुत्ते व कांही

---

* बर्फावरून घसरून जातांना विशिष्ट पद्धतीने पाय पुढे फेकतात हें निदान सिनेमांतून सर्वांनी पाहिलें असेल.

किराणा व इतर मालाचीं दुकानें होतीं. हेंच तें झानोव्ह हाउस. येथे सर्वत्र भुरकटपणा व घाण होती. तें घर, राहण्याची जागा, अंगण व खुद्द तेथील लोक हीं सर्वच घाणेरडीं होतीं. तेथे मला जे भेटले ते सर्व लक्तरीं घातलेले अर्धनग्न असे होते. कांही चालत होते व कांही एका दरवाज्यापासून दुसरीकडे धावत होते. दोघांचें एका फाटक्या कपड्याबद्दल देवघेवीचें बोलणें चालू होतें. मी एकदा वाहेरून तें घर सवंध पाहिलें व एक वळसा घेऊन परत आलो आणि दिडी दरवाज्या-समोर उभा राहिलों. आंत जाऊन काय चाललें आहे हें पाहण्याची मला इच्छा झाली पण धीर होईना. तुम्हांला काय हवें, असें कोणी विचार-ल्यास काय उत्तर द्यावें हा मला प्रश्न पडला. शेवटीं नाही होय म्हणतां म्हणतां मी फाटकाच्या आंत शिरलों. आंत शिरतांच भयंकर घाण आली. अंगणांत सर्वत्र अतिशय घाण पसरली होती. मी अंगणाच्या एका कोप-ऱ्यापाशीं वळण घेत असतां वर कोणीतरी प्रथम गॅलरींत धावल्याचा व नंतर जिन्यावरून दडदड उतरत असल्याचा आवाज झाला. (अंगणाच्या चौफेर इमारत असून चारी बाजूने गॅलरी होती.) सर्वांत पुढे एक रोडकी, विट-लेल्या गुलाबी रंगाचा पोषाख घातलेली, बाह्या वर सारलेली आणि मोज्या-शिवायच बूट चढवलेली अशी एक स्त्री धावत आली. तिचेमागून एक दाट केसाचा, लाल सदरा व जवळ जवळ लेहेंग्यासारखी दिसेल इतकी पोकळ विजार घालून वहाणा घातलेला, एक माणूस धावत होता. या माणसाने त्या बाईला जिन्याच्या पायथ्याशीं पकडलें व हसत तो तिला म्हणाला, " जा पाहूं. " या त्याच्या लगट करण्यानें त्या बाईला स्वत:बद्दल धन्यता वाटूं लागली. ती म्हणाली, "ऐका! काय म्हणतो हा मेला काणा." पण इतक्यांत तिने मला पाहिलें व " काय पाहिजे " असा तिने मला दरडावून प्रश्न केला. मला वास्तविक कोणालाच भेटावयाचें नसल्याने मी गोंधळलों व ताबडतोब काढता पाय घेतला. या सर्व प्रकारांत लक्षांत घेण्यासारखें कांहीच नव्हतें पण रस्त्यावर जें दृश्य मी पाहिलें (शिव्या देणारी म्हातारी व आनंदी म्हातारा, घसरड्या गाडीवर खेळणारी मुलें) त्यानंतर मला वरील दृश्य दिसल्यामुळें मी पत्करलेल्या कामाला एक अगदी निराळी बाजू असल्याचें माझ्या लक्षांत आलें. श्रीमंतांच्या

साह्याने या लोकांना मदत करण्याच्या इराद्याने मी निघालों होतों पण मला प्रथमच हें कळलें की ज्या अभाग्यांना मी मदत करावयास निघालों होतों त्यांना भूक व थंडी यासंबंधीं विवंचना व निवाऱ्याच्या जागेसाठी उमेदवारी करणें इत्यादि कामें केल्यावर इतरही भानगडींत लक्ष घालण्यास फुरसत होती. त्यांना चोवीस तासांत कांही फुरसत मिळे व (या फुरसतींत) त्यांचा एक स्वतंत्र कार्यक्रम असे, या गोष्टीचा मी विचारच केला नव्हता. त्यांच्यांत सुद्धा क्रोध, निरुत्साह, धैर्य, विषाद व हर्ष या वृत्ति निःसंशय असाव्या हेंही मला पटलें. मी अंगीकारिलेल्या कामांत एखाद्याने जशीं हजार मेंढरें चारून निवाऱ्याच्या जागीं पोचवावीं त्याप्रमाणें या लोकांना जेवण व आसरा एवढींच काय तीं मिळवून दिलीं म्हणजे भागण्यासारखें नसून या कार्यांत त्यांचें कल्याण करण्याच्या जबाबदारी-चाही अंतर्भाव होतो, ही गोष्ट या प्रसंगावरून माझ्या प्रथमच लक्षांत यावी हें कबूल करतांना जरा चमत्कारिक वाटतें. त्यांच्यापैकी हरएक माणूस असून प्रत्येकाला कांही पूर्वेतिहास आहे व प्रत्येकांत मोह, प्रमाद विचार, आशंका इत्यादि आहेत; अर्थात् हरएक जण माझ्यासारखाच एक माणूस आहे हें जेव्हा मी लक्षांत घेतलें तेव्हा मला माझ्या कार्याचा अवघडपणा पटून माझ्या हतबलत्वाची मला जाणीव झाली. पण कामाला एकदाची सुरवात होऊन चुकली असल्यामुळे मी तें तसेंच पुढे चालू ठेवलें.

प्रकरण पांचवें

खानेसुमारीच्या ठरलेल्या दिवशीं खानेसुमारीचें काम पत्करलेल्या विद्यार्थ्यांनी सकाळींच काम सुरू केलें पण लोककल्याण करावयास सरसावलेला मी मात्र त्यांच्या मदतीस दुपारपावेतों गेलों नाही. कारण मी मुळीं उठावयाचाच दहा वाजतां. त्यानंतर कॉफी पिऊन जठराग्नीला चलन देण्याकरितां धूम्रपान करण्याची मला सवय असे. मी 'ज्ञानोव्ह हाउस'च्या फाटकापाशीं दुपारीं बारा वाजतां पोचलों. खानेसुमारीच्या कामगारांनी आपली विचारपूस करणाऱ्या कोणालाही ज्या पानगृहांत सोडण्यास सांगितलें होतें तें मला एका पोलिसने दाखविलें मी पानगृहांत शिरलों. तेथे काळोख असून दमटपणा व कचरा यांचें साम्राज्य माजलें होतें. पुढच्याच बाजूस मदिरासेवनाची जागा होती. डावीकडे एका खोलींत घाणेरडे कपडे पसरलेलीं टेबलें होतीं व उजवीकडे एक भव्य खांब्रांची मोठी खोली असून तिच्यांत खिडक्याशेजारीं व भितीलगत अशींच टेबलें होतीं. कांही टेबलांशीं फाटके कपडे घातलेले मजुरांसारखे व थोडा बरा पोषाख केलेले दुकानदारांसारखे लोक व कांही ठिकाणीं स्त्रिया चहा घेत बसल्या होत्या. पानगृह घाणेरडें असलें तरी धंदा मात्र जोरांत चालला होता हें सहज कोणाच्याही लक्षांत आलें असतें. पैसे वसूल करणारा अगदी निढावलेल्या धंदेवाईकाप्रमाणें दिसत असून हॉटेलचीं पोरें तरतरीत होतीं. मी आंत शिरतांच एका पोऱ्याने माझा ओव्हरकोट काढण्यास हात लावला व तो मला काय पाहिजे तें आणण्यास सज्ज असा उभा राहिला. तडफ व काळजीपूर्वकपणा यांचा तेथील लोकांना सराव असल्यासारखा दिसला. खानेसुमारीवाले कोठें आहेत, असें मी विचारतांच जर्मन पद्धतीचा पोषाख केलेला व टेबलामागे कांही व्यवस्था करण्यांत गुंतलेला एक ठेंगू मनुष्य—हा कालुगा प्रांताचा रहिवाशी असून त्या हॉटेलचा मालक होता. त्याचें नांव ईव्हान फीडोटिच होतें. त्याने अर्धे 'ज्ञानोव्ह हाउस' भाडेपट्ट्याने घेतलें असून तो इतर पोटभाडेकरी ठेवी—"वान्या" म्हणून ओरडला. लगेच एक अठरा वर्षांचा

रोडका, अणकुचीदार नाकाचा, पिंगट वर्णाचा पोऱ्या धांवत आला. त्याला फीडोटीश म्हणाला, "यांना खानेसुमारीवाल्यांकडे ने. ते विहिरीवरील मोठ्या घरांत आहेत, चल नीघ." पोऱ्याने ताबडतोब हातांतला टुवाल ठेऊन आपल्या पांढऱ्या सदऱ्यावर* बाहेर जाण्याचा कोट चढविला व तो माझ्यापुढे चालूं लागला.

आम्ही एका मागच्या दाराने बाहेर पडलों. जातांना स्वयंपाक-घरालगतच्या निसरड्या बोळांत आम्हाला एक बाई भेटली. ती एक वाईट वास येणारा मांसाचा शिजलेला पदार्थ फडक्यांत गुंडाळून नेत होती. या बोळांतून आम्ही एका अंगणांत उतरलों. याच्या सर्व बाजूंनी पहिला मजला विटांचा व इतर सर्व बांधणी लाकडाची असलेली इमारत होती. येथे अत्यंत घाण येत होती. या घाणीचा उगम तेथील शौचकूपा-जवळ होता व मी तेथून जेव्हा जेव्हा गेलों तेव्हा तेव्हा शौचकूपाभोवती नेहमी मला लोकांची गर्दी आढळली. तेथील माणसें खुद्द शौचकूपाचा उपयोग करीत नसून त्या ठिकाणाभोवतीं कोठेही शौचविधी उरकण्यास हरकत नाही अशी त्या लोकांना संवय पडली होती. अंगणांतून जातांना शौचकूपाकडे दुर्लक्ष होणें अशक्य होतें. त्याच्या घाणीच्या टप्प्यांत जातांच अगदी गुदमरल्यासारखें वाटे.

माझा वाटाड्या पोऱ्या आपल्या पांढऱ्या विजारीची काळजी घेत घेत त्या बर्फ पडलेल्या घाण जागेजवळून पुढे एका घरांत मला घेऊन गेला. अंगणांत व वर गॅलऱ्यांतून वावरणारे लोक थबकून मजकडे पाहूं लागले यावरून स्वच्छ कपडे घातलेला माणूस म्हणजे त्या मंडळीला मोठे आश्चर्य वाटे हें उघड होत होतें.

वाटाड्या पोराने एका बाईला विचारलें, "खानेसुमारीवाले कोठे गेले हें तूं पाहिलें आहेस काय ?" असें विचारतांच तिघाचौघांनी एक-दम उत्तर दिलें. कोणी म्हणाले, " ते विहिरीजवळच्या घरांत आहेत." कांही म्हणाले, " ते विहिरीजवळील घरांत होते, पण नुकतेच निकिटा-इव्हानोविचकडे ते गेले आहेत." शौचकूपाजवळ उभा असलेला एक

---

* या जातीच्या रशिअन हॉटेलांतून पोरें पांढरा पोषाख करतात.

म्हातारा आपले कपडे-त्याच्या अंगांत फक्त एक सदरा होता-सावरीत होता. तो म्हणाला की ते नं० ३० च्या घरांत आहेत. वाटाड्याने हीच माहिती अधिक विश्वसनीय आहे असें ठरविलें व त्याने मला तळमजल्याच्या छपरींतून नं० ३०च्या घराकडे नेलें. येथेही अंधार होता पण येथील घाण अंगणांतील घाणीपेक्षा निराळी होती. आम्ही खालच्या मजल्यांत उतरलों व एका अंधारमय बोळांतून चालूं लागलों. बोळांतून जातांना एक दरवाजा अचानक उघडला व त्यांतून फक्त सदरा घातलेला व दारू पिऊन झिंगलेला एक माणूस बाहेर पडला. तो शेतकऱ्यासारखा दिसत नव्हता. अस्तऱ्या वर सारलेली व साबणाने हात भरलेली एक धोबीण त्याच्या पाठीस लागून किंचाळून त्याला हांकलत होती. वाटाड्याने—त्र्यान्याने—त्याला बाजूला करून म्हटलें, "असा तमाशा करणें—आणि त्यांत तूं अधिकारी आहेस—तुला शोभत नाही."

आम्ही नं० ३०च्या दरवाज्याजवळ आलों. वान्याने दरवाजा ओढतांच चककन् आवाज झाला व त्याबरोबरच आंतून साबण, कुचके खाद्यपदार्थ व तंबाखू यांची घाण घप्पदिशीं नाकांत शिरली. आम्ही आंत शिरलों. तेथे संपूर्ण अंधार होता. खिडक्या दुसऱ्या बाजूला होत्या. पण त्या खोलींत साध्या तक्त्याच्या भिंती असलेल्या व सोईप्रमाणें दरवाजे ठेवलेल्या कबूतरखानावजा अनेक लहान खोल्या डाव्या उजव्या बाजूंस होत्या. या विभागणाऱ्या पातळ तक्त्यांना सफेती केली होती. डावीकडील एका अंधाऱ्या खोलींत एक बाई कपडे धूत होती. उजवीकडील एक दरवाजा उघडून एक बाई डोकावून पाहत होती. दुसऱ्या एका खोलींतून एक केसाळ म्हातारा चटईचा जोडा घालून एका खाटलेंवजा तक्त्यावर बसला होता. त्याने गुढग्यांवर हात ठेवले असून तो पाय डुलवीत पायांतील जोडयाकडे खिन्नपणें पाहत बसला होता.

बोळाच्या शेवटीं एका खोलींत खानेसुमारीवाले होते. सबंध नं० ३० च्या मुख्य भाडेकरिणीची ही खोली होती. तिने नं० ३० ईव्हान फिडोटीश पासून भाड्याने घेऊन पोटभाडेकरूंना व रात्रौ वसतीस येणारांना त्याचे भाग भाड्याने दिले होते. त्या लहानशा खोलींत एका टिनाच्या तिमेनजीक एक खानेसुमारी घेणारा विद्यार्थी आपले कागदपत्र एखाद्या

न्यायाधिशाच्या ऐटीने घेऊन बसला असून तो एका सदरा व जाकीट घातलेल्या शेतकऱ्याला प्रश्न विचारीत होता. हा शेतकरी मालकिणीचा दोस्त असून तो तिच्या वतीने प्रश्नांचीं उत्तरें देत होता. त्या ठिकाणीं याशिवाय मुख्य भाडेकरीण व दुसरे दोन चौकस भाडेकरीही जमले होते. मी शिरलों तेव्हा खोलींत बरीच गर्दी होती. मी कसाबसा टेबलाशीं पोचलों. विद्यार्थ्यांचे व माझे नमस्कार चमत्कार होऊन विद्यार्थ्याने आपलें काम चालू ठेवलें. परंतु मी तेथील रहिवाश्यांची माझ्या दृष्टीने पाहणी करून माझ्या कामाचे प्रश्न विचारण्यास सुरवात केली.

मला असें आढळलें की या सबंध नं० ३० मध्यें मी जिच्यावर उपकार करावे अशी एकही व्यक्ति नव्हती. घरमालकीण दारिद्र्याने गांजलेली असली किंवा तिची राहण्याची जागा लहान व घाणेरडी असली तरी त्यांतल्या त्यांत शहरांतील इतर दरिद्र्यांपेक्षा ती बरीच सुखांत होती व खेड्यांतील जे दरिद्री माझ्या माहितीचे होते त्यांच्या मानाने तर ती चैनींतच होती. तिच्याजवळ चांगला परांचा बिछाना, शानदार रजई, चहाचें तांब्याचें भांडें, गरम कोट व एक चिनीमातीच्या भांड्यांनी भरलेलें कपाट इ० जिन्नस होते. तिचा मित्रही बराच आरामांत होता. कारण त्याच्याजवळ तर साखळीचें घड्याळ होतें. भाडेकरी मात्र फार गरीब दिसले. पण कोणालाही मदतीची निकड असल्याचें दिसलें नाही. कपडे धुणाऱ्या ज्या बाईला नवऱ्याने सोडल्यामुळे तिजवरच मुलांचा भार पडला होता तीं घोबीण, त्याचप्रमाणें उपजीविकेचें साधन नसल्यामुळें अनाथ झालेली एक वृद्ध विधवा व ज्या चटईचा जोडा घातलेल्या शेतकऱ्याने मी दिवसभर अन्न खाल्लें नाही असें म्हटलें होतें तो शेतकरी, या तिघांनी मला मदत मागितली. पण विशेष चौकशीअंतीं असें कळलें की यांनाही मदत पाहिजे होतं। असें नसून मदत करण्यापूर्वी त्यांची बित्तंबातमी काढणें अवश्य होतें. नवऱ्याने टाकून दिलेल्या त्या कपडे धुणाऱ्या बाईला जेव्हा मी म्हटलें की तिच्या मुलांची एका अनाथालयांत सोय लावून देतों तेव्हा ती जरा घोटाळली. तिने यावर थोडा विचार केला, तिने माझे आभार मानले, पण तिला मुलांची अशी व्यवस्था करून नको होती हें स्पष्ट होतें. तिला मी पैसे दिले असते तर हवे होते. तिची मोठी मुलगी तिला कपडे

धुण्यांत मदत करी व मधली मुलगी लहान मुलाला सांभाळी. म्हाताऱ्या विधवेने फार अट्टाहासाने स्वत:ला एका अन्नछत्रांत ठेवण्याबद्दल विनविलें. पण तिच्या राहत्या कोपऱ्याकडे मी लक्ष दिलें तेव्हा ती तितकीशी असहाय दिसली नाही. तिची एक पेटी असून तींत एक तोटीदार चहाचें भांडें व चॉकोलेटच्या रिकाम्या डब्यांतून चहा, साखर इ. जिन्नस होते. ती मोजे विणी व तिला एका परोपकारी व्यक्तीकडून मासिक मदतही मिळे. त्या शेतकऱ्यालाही खाण्यापेक्षा कांहीतरी पिण्यासच पैसे हवे होते व त्याला दिलेली सर्व मदत दारूच्या भट्टींत खलास होण्याचा अधिक संभव होता. याचा अर्थ असा की ज्या प्रकारच्या लोकांची त्या घरांत मला गर्दी सापडेल असें वाटलें–म्हणजे ज्यांना पैसे देऊन मी सुखी करूं शकेन–अशा-पैकी एकही माणूस तेथे आढळला नाही. त्यांची गरिबी मला मोठी संशयास्पद वाटली. ती म्हातारी, कपडे धुणारी लेंकुरवाळी बाई व म्हातारा यांना मी मदतीस योग्य म्हणून ठरविलें. पण याहीपेक्षा अधिक दुर्दैवी माणसें तेथे भेटतील असें वाटल्यामुळें त्यांना मदत केल्यावरच ह्यांना मदत करणें योग्य होईल असें मी ठरविलें. मदत करायची तरी त्यांत तारतम्य-भाव असावा असा मी निश्चय केला. प्रथम अत्यंत दुर्दैवी माणसें व त्यानंतर हे असा मी क्रम ठरविला पण बिऱ्हाडामागें बिऱ्हाड पाहिलें तों सर्वत्र एकच प्रकार. सर्व माणसें एकाच नमुन्याचीं असून हीं सर्व अशीं होतीं की कोणालाही मदत करण्यापूर्वी त्याच्या वृत्तांताची विशेष चौकशी करणें अवश्य होतें. ज्यांना निव्वळ पैसे देऊन सुखी करतां आलें असतें असे दुर्दैवी मला कोणीच आढळले नाहीत. सांगतांना मला लाज वाटते पण मला माझ्या कल्पनेप्रमाणें त्या ठिकाणीं एकही व्यक्ति न आढळ-ल्यामुळें मी खट्टू झालों. मला कांही और माणसें भेटतील असें प्रथम वाटलें पण सर्व बिऱ्हाडांतून फिरल्यानंतर माझी खात्री झाली की या घरांतील मंडळी कल्पनातीत नसून हे, मी ज्यांच्यांत राहतों त्या लोकांसारखेच होते. जसे आमच्यांत तसे यांच्यांतही भलेबुरे लोक होते. कांही कमी तर कांही जास्त सुखी होते. त्यांतले दु:खी आमच्यांतल्या दु:खी लोकांपेक्षा —अर्थात् ज्यांच्या दु:खाला जे स्वत: कारण असतात व ज्यांचें दु:ख, पैशाने नाहींसें होण्यासारखें नसतें त्यांच्यापेक्षा—निराळे वाटले नाहीत.

प्रकरण सहावें

खरा घरांतून राहणारांचा मॉस्को शहरांतील लोकांमध्यें शेवटचा दर्जा होता. असे लोक बहुतकरून एक लाखाच्यावर असावेत. यांत सर्व प्रकारचे लोक होते. येथे छोटेखानी मालक व कारागीर, चांभार, ब्रश बनविणारे, सुतार, जोडकाम करणारे, मोची, शिंपी, लोहार, इ० होते; त्याचप्रमाणें टांगेवाले, स्वत:च्या मालकीचा लहान व्यापार करणारे व्यापारी, दुकानदार बाया, धोबिणी, जुन्या कपडचांचे व्यापारी, लहान प्रमाणांत सावकारीचा धंदा करणारे, मजूर व हरकामे, त्याचप्रमाणें भिकारी व चारित्र्यहीन स्त्रिया, हीं सर्व तेथे समाविष्ट होतीं.

'ल्यापिनहाउस'च्या प्रवेशद्वाराजवळ मला भेटलेलेही कांही यांत होते. पण येथे कामगारांची संख्या त्यांच्या मानानें जास्त होती. शिवाय 'ल्यापिन हाउसच्या शेजारीं ते त्यांच्या कमाल वाईट दर्शेत, फार अडचणींत, स्वत:चें सर्वस्व खाऊन फस्त केलेले, नग्न व थंडीने ग्रस्त, हॉटेलांतून हांकून दिलेले व जणूं काय स्वर्गांतील अन्नवर्षावाप्रमाणें 'ल्यापिन हाउस'मध्यें आसरा मिळविण्यास उत्सुक व तेथून तुरुंगमार्गें पोलिसाच्या देखरेखीखाली स्वत:च्या खेडचास नेले जाण्यास राजी, असे होते; तर येथे मात्र ते इतर कामगारांत मिसळलेले असून त्यावेळीं कोणत्या मार्गाने का होईना पण त्यांच्याजवळ रात्रीचें भाडें देण्यापुरते तीन ते पांच पैसे होते किंबहुना क्वचित कांहींजवळ अन्न व दारूला पुरेसे रुबलही होते.

वाचकांना आश्चर्य वाटेल, पण मला 'ल्यापिन हाउस' शेजारीं जसें वाटलें तसें या ठिकाणीं वाटलें, नाही. उलट मी व विद्यार्थी प्रथम जेव्हा येथे आलों तेव्हा तर मला जवळ जवळ बरें वाटलें—जवळ जवळ म्हणजे कांही सत्याला सोडून आहे. या लोकांशीं बोलणें केल्यावर मला नक्की फार बरें वाटलें.

माझा प्रथम असा ग्रह झाला की या ठिकाणीं राहणारे बहुतेक सर्वच लोक कामसू व सुस्वभावी आहेत. त्यांपैकी बहुतेक कसल्या तरी कामांत गुंतले होते, धोबिणी कपडे धूत होत्या, सुतार बाकें तयार करीत होते व

चांभार आपलें काम करीत होते. त्या अरुंद घरांतून सर्वत्र गर्दी होती व एकंदर काम उल्हसित वृत्तीनें चालू होतें. तेथें कामकऱ्यांच्या घामाची घाण येत असून चांभाराजवळ चामड्याचा व सुताराशेजारीं भुश्याचा वास येत होता. मध्येंच गाण्याचा सूर ऐकूं येई किंवा मजबूत लोक कुशलतेने व जलद त्यांना सराव असलेलीं कामें करतांना दिसत. सर्वत्र आमचें उत्साहाने व चांगुलपणीं स्वागत करण्यांत आलें. श्रीमंतांच्या घरांतून जेव्हा आमचे खानेसुमारीवाले जात तेव्हा श्रीमंत जसा छाप पाडण्याचा प्रयत्न करून त्रोटकपणीं उत्तरें देत तसा प्रकार येथे नसून उलटपक्षीं येथे जवळ जवळ सर्वांनी आमच्या सर्व प्रश्नांना योग्य उत्तरें दिलीं व त्याचें त्यांना कांही वाटलें नाहीं.आमच्या प्रश्नांमुळें त्यांना बागडण्याची संधि मिळून खानेसुमारीबद्दलची माहिती कशी भरावी याची थट्टा उडविण्यांत व कोणत्या लठ्ठ माणसाला दोन माणसें म्हणून मोजावें व कोणत्या दोन सुदामदेवांमिळून एकच शिरगणती समजावी अशी चेष्टा करण्यांत त्यांना मौज वाटली,

पुष्कळसे जेवत होते अगर चहा घेत होते व आम्ही "मीठ भाकरी" अगर 'चहा साखर"* असें म्हणून नमस्कार करतांच ते म्हणत, "यावें महाराज" व आम्हांला जागा करून देण्याकरितां बाजूलाही सरत. या ठिकाणीं आम्हांला चार दिवसांचे पाहुणे भेटतील असा आमचा समज होता. त्याऐवजीं आम्हांला असें आढळून आलें की त्यांपैकी बरेच लोक वर्षानुवर्ष तेथेच राहात होते. एक सुतार आपल्या नोकरासह, त्याचप्रमाणे एक चांभार आपल्या मदतनिसासह त्या ठिकाणीं दहा वर्षें राहात होता. चांभाराची जागा घाणेरडी व गर्दीची होती तरी सर्व काम करणारे आनंदी वृत्तींत दिसले. त्यांपैकी एका कामकऱ्याला कदाचित तो दुःखी असून त्याला मालकाचें कर्ज असेल अशा रोखाने बोललों, तें त्याला उमगलें नाही व तो स्वतःच्या स्थितीबद्दल आणि मालकाबद्दल बरें बोलला.

एका बिऱ्हाडीं एक म्हातारा व त्याची बायको रहात होती. तीं रफरचंद विकीत. त्यांची खोली ऊबदार, स्वच्छ व मालाने भरलेली

---

* जेवत असलेल्या माणसाला नमस्कार करावयाचा तो वरील शब्द वापरून करावयाचा असा रशियांत प्रवात आहे.

होती. सफरचंदाच्या ठोक व्यापाऱ्यांकडून जें गोणपाट त्यांना मिळे तें जमिनीवर हांतरलें होतें. पेटचा, कपाटें, चहाचें भांडें व चिनीमातीचीं भांडींही तेथे दिसलीं. कोपऱ्यांत पुष्कळशा प्रतिमा असून त्यांच्यासमोर दिवे जळत होते. भितीवर गरम ओव्हरकोट झांकून टांगले होते. म्हातारीच्या तोंडावर सुरकुत्या असून ती मोठ्या उमद्या स्वभावाची, बोलकी, व बाह्यतः स्वतःच्या व्यवस्थित आयुष्यक्रमासंबंधीं संतुष्ट अशी दिसली.

त्या वसतिगृहाचा मालक ईव्हान फिडोटीच खाणावळींतून येऊन आमच्याबरोबर चालूं लागला. तो बऱ्याच बिऱ्हाडकरूंना त्यांच्या नांवाने* व आडनांवाने हाका मारीत थट्टा करीत चालला होता. तीं सर्व साधीं माणसें होतीं. (येथील नांवें वगळलीं आहेत.) त्यापैकी कोणीहि स्वतःस अभागी समजत नव्हता, इतकेंच नव्हे तर इतरांप्रमाणेंच आपणही आहोंत अशी त्यांची कल्पना होती.

आम्हांला येथे फक्त भयानक दृश्यें दिसतील अशी आमची कल्पना होती, पण त्याऐवजीं आम्हांला चांगलें दृश्यच दिसलें, व आमच्या मनांत एकंदरींत आदरभावच जागृत झाला. त्या मंडळीत इतकीं चांगलीं माणसें होतीं की क्वचित् लकतरीं लागलेली, आळशी व पतित अशीं थोडीं माणसें जीं त्यांत विखुरलेलीं दिसलीं त्यामुळे आमच्या मनावर झालेला इष्ट ग्रह नष्ट झाला नाही.

विद्यार्थ्यांच्या मनावर मात्र या सर्व प्रकाराचा मजवर झाला तसा विशेष परिणाम झाला नाही. ते त्यांच्या मतें कांही शास्त्रीय कामाकरितां म्हणून आले होते व इतर परिस्थितीची त्यांनी निव्वळ उडतउडतच पाहणी चालविली होती. मी उपकारी माणूस या नात्याने दुर्दैवी, पतित व नष्ट होण्याच्या पंथास लागलेले असे जे येथे आढळतील अशी माझी अपेक्षा होती त्यांना मदत करावयास गेलों होतों; पण माझ्या अपेक्षेनुसार (दुर्दैवी) माणसें भेटण्याऐवजीं येथे प्रामुख्याने शांत, समाधानी, आनंदी, चांगलीं व काम करणारीं अशींच माणसें मला भेटलीं.

---

* रशियांत नांवाने हांक मारण्याचा प्रघात असला तरी यावरून घरमालकाची भाडेकऱ्यांशीं असलेली सलगी स्पष्ट होते.

क्वचित् या बिऱ्हाडांतून माझ्या कल्पनेप्रमाणें मदतीची आत्यंतिक गरज असलेल्या अशा व्यक्ति जेव्हा भेटत तेव्हा वरील मुद्दा विशेष स्पष्टपणें माझ्या प्रत्ययास येई.

पण अशा प्रत्येक बाबतीत मला दिसून येई की जी गरज मी भागविणार व जी मदत मी करणार ती आधीच त्यांना मिळालेली असे. मी येण्यापूर्वीच ही मदत होऊन गेलेली असे. व ही कोण करीत असें तुम्हांला वाटतें ? तर ज्यांना मी बचावणार ते पतित लोकच ही मदत करीत व त्यांच्या मदतीचा प्रकार मला सुचला असता अशा मदतीच्या कोणत्याही प्रकारापेक्षा श्रेष्ठ होता.

तळघरांतील एका खोलींत एक म्हातारा विषमज्वराने आजारी होता. त्याला नात्याचें असें कोणी नव्हतें. एक विधवा त्याच्या खोलीच्या एका दुसऱ्या कोपऱ्यांत राही व त्याची शुश्रूषा करी. तिला एक लहान मुलगी असून तिचा त्या म्हाताऱ्याशीं शेजारपणाव्यतिरिक्त कांहीही संबंध नव्हता. ती त्याला चहा देई व त्याच्याकरितां स्वतःच्या पैशाने औषध आणी. दुसऱ्या एका खोलींत एका बाईला बाळंतरोग झाला होता. शहरची एक बाई तिच्या मुलाला झोका देत होती व तिने त्याच्याकरितां चिंधीच्या बोंडशीने चोखण्यासाठी लापशी तयार केली होती. ही बाई दोन दिवस गांवांत स्वतःच्या व्यापाराकरितांसुद्धा गेलेली नव्हती. दुसऱ्या एका अनाथ मुलीला स्वतःचीं तीन मुलें असणाऱ्या शिंप्याने आश्रय दिला होता. अशा प्रकारें उरतां उरले फक्त दुर्दैवी आळशी बेकार. उदाहरणार्थ, कारकून, खर्डेघाशी करणारे, नोकऱ्या गेलेले चपराशी, भिकारी, दारुडे, वेश्या व मुलें. याना ताबडतोब पैशाने मदत करणें शक्य नव्हतें. पण या सर्वांबद्दल पुरेशी माहिती मिळवूनच त्यांच्याबद्दल पुरेसा विचार करणें व त्यांच्यालायक जागा शोधणें अवश्य होतें. जे निव्वळ दरिद्री असून ज्यांना आपल्या फाजील संपत्तीचा कांही भाग देऊन सुखी करितां येईल असे लोक मला हवे होते. पण दुर्दैवाने (असे त्यावेळी मला वाटलें) मला असें कोणीच आढळलें नाही. जे अभागी मला दिसले त्यांच्याकरितां वेळ व बुद्धि हीं विशेष प्रमाणांत खर्च करण्याची गरज होती.

प्रकरण सातवें

ज्या अभाग्यांची मी नोंद केली त्यांचे स्वाभाविकपणें तीन प्रकार करतां येतील असें मला वाटलें. पहिला प्रकार : पूर्वीची चांगली परिस्थिति गमावून बसून पुनः ती आपणांस प्राप्त होईल अशी आशा करणारांचा. (यांत उच्च नीच अशा दोन्ही स्थितींतील लोक होते.) दुसरा प्रकार : बदचाल स्त्रियांचा. (यांची बरीच संख्या त्या घरांत होती.) व तिसरा मुलांचा. यांपैकी पूर्वीची स्वतःची चांगली स्थिति गमावून पुनः त्या परिस्थितींत जाऊं इच्छिणाऱ्यांचा जो पहिला वर्ग होता त्याकडे मी विशेष लक्ष दिलें. या प्रकारांत पुष्कळ लोक असून यांत मध्यमवर्गीय व नोकरपेशा लोकांचा बराच भरणा होता. या बिऱ्हाडांतून जेव्हा आम्ही जात असूं तेव्हा बहुतेक ठिकाणीं ईव्हान फिडोटीच आम्हांला म्हणे, "या ठिकाणीं बिऱ्हाडकरूंची यादी भरण्याचा तुमचेवर प्रसंग येणार नाही. त्यांच्यांतलाच अमुक एक गृहस्थ (जर तो आज दारूने झिंगला नसेल तर) तें सर्व करूं शकेल."

ईव्हान फिडोटीच त्याला बोलावी व हटकून हा मनुष्य पूर्व स्थितीपासून च्युत झालेला असे. फिडोटीचने हाक मारतांच कुठल्या तरी अंधाऱ्या कोपऱ्यांतून एक पूर्वीचा श्रीमंत अगर चांगल्या नोकरीवर असलेला बहुधा झिंगलेला व नक्की अर्धनग्न असा मनुष्य पुढे येई. जर दारू प्यालेला नसला तर जरा आढ्यतेने, कपाळास आंठ्या घालून व कांही भारदस्त शब्द वापरून तो दिलेलें काम मोठ्या खुषीने पतकरी. तो आपल्या घाणेरड्या काप्ऱ्या हातांत जेव्हा खानेसुमारीचा स्वच्छ छापील लाल कागद घेई तेव्हा तो आसपासच्या बिऱ्हाडकरूंकडे विजयी व तिरस्काराच्या मुद्रेने पाही. पूर्वी ज्यांनी याचा बरेच वेळां अपमान केला त्यांच्यावर स्वतःच्या श्रेष्ठ शिक्षणाने या प्रसंगीं जणूं काय तो विजय मिळवीत होता अशी त्याची मुद्रा दिसे. पूर्वी ज्या जगापैकी तो स्वतः एक होता त्या छापील लाल कागद वापरणाऱ्या जगाशीं पुनः एकदा संबंध आल्याबद्दल त्याला आनंद झालेला उघड दिसे. मी त्याची

चवकशी करतांच तो खुशीनेच नव्हे तर औत्सुक्याने देवाच्या प्रार्थनेप्रमाणें मनांत दृढमूल झालेली आपली हकीकत—उदाहरणार्थ, सांप्रत आपल्यावर काय आपत्ति आहे व पूर्वी आपली विशेषेंकरून कशी सुस्थिति होती व उच्च शिक्षणामुळें स्थितीवर आपला कसा हक्क होता इ०—तो सांगे.

'झानोव्ह ह्याउस'च्या निरनिराळ्या भागांत असे पुष्कळ लोक विखुरलेले आहेत. एक भाग पूर्णपणें यांनीच व्यापिला होता. यांत पुरुष व स्त्रियाही होत्या. आम्ही त्या भागाजवळ जातांच ईव्हान फिडोटीच म्हणाला, "आता हे पांढरपेशे लोक आले!" बिऱ्हाडें सर्व भरलीं होती. सर्वांमिळून सुमारें ४० माणसें होतीं. सबंध 'झानोव्ह हाउस'मध्यें यांच्यापेक्षा अधिक पतित व दुर्दैवी कोणीही नव्हतें. म्हातारे, सुरकुतलेले व तरुण, फटफटीत व डोळे, आंत ओढलेले असे होते. मी कांहींच्याशीं बोललों. सर्वांची हकीकत जवळ-जवळ सारखीच होती.फक्त कमीजास्तपणांत काय तो फरक होता. एकेकाळीं प्रत्येक जण स्वत: श्रीमंत होता, अगर त्याचा बाप, भाऊ अगर काका पूर्वी किंवा अजूनही श्रीमंत होता. अथवा त्याला अगर त्याच्या बापाला उत्तम नोकरी होती. यानंतर दुर्दैव ओढवलें. कोणी मत्सरी लोकांच्या कारवायांमुळे तर कोणी स्वत:च्या अदूरदर्शी चांगुलपणाने तर कोणी अपघाताने अडचणींत येऊन आता त्याचें सर्वस्व गमावलें होतें व शेवटीं तो या घाणेरड्या व त्याला अयोग्य अशा-उवांनी भरलेले फाटके कपडें, दारुड्या व व्यभिचारी लोकांचा शेजार, भाकरी व बैलांचें यकृत यांचें भोजन व भिकेकरितां पसरलेला हात—अशा परिस्थितींत येऊन खितपत पडला होता. या सर्वांचे विचार व तंद्री सारखी त्यांच्या पूर्वीच्या स्थितीकडे लागून असे. त्यांची आजची परिस्थिति त्यांना अनैसर्गिक, चीड आणणारी व अलक्षणीय वाटे. वर्तमानाचा विचार कोणीच करीत नव्हतें. सर्वांना भूतकाळची स्मृति होती व सर्व भविष्यावर नजर ठेऊन बसले होते. त्यांच्या मतें हा भविष्य काल केव्हांही उगवणें शक्य होतें. कारण त्यांना फार थोंडचाची उणीव होती. पण हें "थोडें" त्यांच्या आटोक्याबाहेर असल्यामुळें त्यांचें आयुष्य व्यर्थ चाललें होतें. एकाला अशा परिस्थितींत येऊन एक वर्ष झालें होतें, दुसरा तीन पांच वर्षें रखडत होता तर तिसरा तीस वर्षें खितपत होता. एक म्हणे, " मजबद्दल सहानुभूति

वाटणाऱ्या एका प्रसिद्ध गृहस्थाच्या भेटीस जाण्यापुरता मला चांगला पोषाख असला की पुरे !" दुसऱ्या एकाला चांगला पोषाख व कर्जफेड करून ओरेल गांवाला 'गोचलें की पुरे होतें. तिसऱ्याला त्याच्या कांही गहाण पडलेल्या जिनसा सोडवून ज्या एका मुकद्दम्यांत तो हमखास जिंकणार होता असा खटला पुढे चालविण्यापुरते पैसे मिळतांच सर्व सुरळीत व्हावयाचें होतें. सर्वांचें म्हणणें एक. त्यांना कांही तरी बाहेरची मदत मिळतांच त्यांच्या मतें त्यांची जी स्वाभाविकपणें सुखाची परिस्थिति असावयास हवी होती त्या परिस्थितींत ते जाऊं शकत होते.

मी कोणी तरी उपकारकर्ता आहें हा भ्रम माझ्यांत नसता व मी जर थोडें काळजीपूर्वक सर्वांच्या—तरुण व म्हातारे, सामान्यतः अशक्त व भोगलोलुप पण सुस्वभावी अशा या लोकांच्या—चेहऱ्यांचें निरीक्षण केलें असतें तर माझ्या ताबडतोब लक्षांत येतें की निव्वळ बाह्यतः मदत करून यांचें दुर्दैव नष्ट करणें अशक्य होतें; व त्यांचा जीवनक्रमावद्दलचा दृष्टिकोण बदलल्याशिवाय त्यांना कोणत्याही परिस्थितींत सुख झालें नसतें. तसेंच हे दुर्दैवी लोक कोणत्याही प्रकारें विचित्र नसून अशाच प्रकारचे लोक आमच्याभोवती असतात, किंवहुना आम्ही स्वतः तसेच आहोंत, असेंही माझ्या लक्षांत आलें असतें. या दुर्दैव्यांशीं भाषण करतांना मला मोठें जड जाई, असें मला आठवतें, पण त्याचे कारण काय हें मला आता उलगडलें. या लोकांत मला स्वतःचेंच प्रतिबिंब दिसे. मी जर स्वतःच्या अगर आमच्या सभोवतालच्या लोकांच्या जीवनक्रमाचा विचार केला असता तर मला उमजावयास हवें होतें की या लोकांत व आमच्यांत तिळमात्र फरक नव्हता.

माझ्या भोवतालचे लोक 'झानोव्ह हाउस'च्या ऐवजीं हवेल्यांतून किंवा उत्तमोत्तम रस्त्यांवरील स्वतःच्या घरांतून राहतात, किंवा बैलांचें लिव्हर अथवा मासळीशीं भाकरी खाण्याऐवजीं सुग्रास भोजन करतात, एवढ्याने 'झानोव्ह हाउस'वाल्यांसारखेच तेही दुर्दैवी असण्याचें टळत नाही त्यांनाही त्यांची परिस्थिति आवडत नसते, त्यांची पूर्वकालची स्मृति जागृत असते व त्यांनाही परिस्थिति सुधारावयास हवी असते. 'झानोव्ह हाउस'वाल्यांना स्वतःच्या परिस्थितींत जशा प्रकारची सुधारणा हवी असते तशाच प्रकारची सुधारणा यांनाही व्हावीशी वाटते. ही सुधारणा म्हणजे स्वतला

कमी काम करावें लागून दुसऱ्याला अधिक राबवतां यावें, ही होय. दोघांत फरक फक्त कमीअधिकपणाचा होता. तेव्हाच मी विचार केला असता तर मला हें उमजलें असतें, पण तो मी केला नाही. मी फक्त त्यांना प्रश्न विचारले व त्यांच्या विशिष्ट परिस्थितीची तपशीलवार माहिती करून घेतल्यानंतर "पुढे केव्हातरी मदत करूं या" अशा कल्पनेने माहिती टिपून घेतली. या लोकांचा दृष्टिकोणच बदलून त्यांना मदत करतां येणें शक्य आहे हें मला तेव्हा कळलें नाही. व दुसऱ्याचा दृष्टिकोण बदलणें असेल तर स्वत:चा दृष्टिकोण श्रेष्ठ ठेऊन त्यावरहुकूम वागणूकही ठेविली पाहिजे. पण जो दृष्टिकोण बदलल्याशिवाय या लोकांचें दुर्दैव संपणें अशक्य होतें त्याच दृष्टिकोणाबरहुकूम माझा जीवनक्रम चालू होता.

उपमाच द्यावयाची तर असें म्हणतां येईल की त्यांना पौष्टिक अन्न मिळत नव्हतें म्हणून ते दु:खी होते असें नसून त्यांची पचनक्रियाच बिघडली होती. त्यांना पौष्टिक अन्न नको असून क्षुधा वाढविण्यास कांही हवें होतें. त्यांना मदत हवी होती ती अन्नाची नसून त्यांना अग्निमांद्यावर औषध हवें होतें, हें माझ्या लक्षांत आलें नाही. येथे मला हें नमूद केलें पाहिजे की मी ज्यांचीं नांवें नोंदलीं त्यांपैकी कांहींना, त्यांच्यामतें जें केलें अगर दिलें म्हणजे ते स्वावलंबी बनणार होते तें त्यांना देण्यांत आलें तरी एकालाही मजकडून खरी मदत झाली नाही. यांपैकी तिघांची मला नक्की ओळख आहे. या तिघांना पुन: पुन: त्यांचे पायांवर उभें केल्यावरही तीन वर्षांपूर्वी त्यांची जी स्थिति होती तिच्यांतच ते आज लोळत आहेत.

प्रकरण आठवें

ज्यांना पुढे केव्हा तरी मदत करण्याची माझी बुद्धी होती अशा अभाग्यांपैकी दुसरा वर्ग दुराचारी स्त्रियांचा. 'झानोव्ह हाउस'मध्यें यांच्यांतील सर्व प्रकारच्या स्त्रिया पुष्कळशा असून त्यांत तरुणींपासून ज्यांची मानवाकृति जवळ जवळ ओळखेनाशी झाली होती अशा भयावह जख्ख म्हाताऱ्यांपावेतों सर्वांचा समावेश होत होता. या स्त्रियांकडे प्रथम माझें लक्ष नव्हतें. पण खालील प्रसंगामुळें मी यांना मदत करूं शकेन असा मला भरंवसा वाटूं लागला.

हा प्रसंग आम्ही फिरतीवर असतांना घडला. आम्ही (खाने-सुमारीचें) काम करण्याची एक शिस्त ठरविली होती.

प्रत्येक नव्या बिऱ्हाडीं जातांक्षणीं आम्ही प्रथम मालकाची चवकशी करीत असूं. मग आमच्यापैकी एक वसून लिहिण्याकरितां जागा स्वच्छ करी, दुसरा बिऱ्हाडांतील काना कोपऱ्यांत जाऊन हरएकाची वेगवेगळी चौकशी करी व परत येऊन लिहिणाऱ्यास माहिती सांगे.

एका तळमजल्यावरील बिऱ्हाडीं एक विद्यार्थी मालकाची चवकशी करण्याकरितां गेला व मी तेथील लोकांना प्रश्न विचारूं लागलों. बिऱ्हाडाची रचना पुढीलप्रमाणें होती. चौदा फूट लांबीरुंदीच्या एका खोलींत मध्यभागीं विटांची चूल होती. या चुलीपासून स्वस्तिकाप्रमाणें चार भिंती घालून त्या मोठ्या खोलीचे चार बिऱ्हाडांकरितां चार भाग करण्यांत आले होते. यांपैकी पहिल्यांत—येथूनच इतर बिऱ्हाडांचे लोक येजा करीत—चार बिछानेवजा लाकडी चौरंग होते व तेथे एक म्हातारा व एक बाई बसली होती. येथून सरळ पुढे एक मोठी लांबट निजावयाची खोली असून तींत त्या बिऱ्हाडाचा मालक राहत असे. हा एक फटफटीत चेहऱ्याचा, जाड कापडाचा चांगला दिसणारा कोट घातलेला गृहस्थ होता. पहिल्या शय्याविभागाच्या डाव्याकडील शय्याविभागांत एक (बहुधा झिंगलेला) गुंगींत असलेला माणूस व पुढे सैल व मागे तंग असणारें एक गुलाबी पोलकें घातलेली स्त्री होती. चवथा शय्याविभाग एका भिंतीच्या मागें असून त्याला जाण्याचा मार्ग घरमालकाच्या भागांतून होता.

विद्यार्थी मालकाच्या खोलींत गेला व मी पुढच्या पहिल्या खोलींत म्हातारा व दुसरी स्त्री यांना प्रश्न विचारीत उभा राहिलों. हा मनुष्य छापखान्याचें काम करणारा पण हल्ली बेकार होता. ती बाई एका स्वयंपाक्याची बायको होती. तिसऱ्या शय्यागृहांत जाऊन मी गुलाबी पेहेरावांतल्या बाईला तेथे निजलेल्या माणसाबद्दल विचारलें. ती म्हणाली हें गिऱ्हाईक आहे. स्वत:बद्दल ती म्हणाली, मी एक मास्कोंतील शेतकरीण आहें. "तुझा धंदा काय?" असें मी विचारतांच उत्तर न देतां ती फक्त हंसली. तिला माझा प्रश्न समजला नसावा असें वाटून मी पुनः विचारलें, "तूं उपजीविका कशी करत्येस ? " ती म्हणाली, "मी खानावळींत बसून असत्यें." मला अर्थ कळला नाही म्हणून मी पुनः विचारलें, " बाई तूं पोट कसें भरतेस ?" ती पुनः उत्तर देण्याऐवजी हसली. ज्या चवथ्या शय्यागृहांत आम्ही अझून प्रवेश केला नव्हता तेथूनही बायकांच्या हसण्याचा आवाज आला. मालक आपल्या खोलीतून आमच्याजवळ आला. त्याने आमचीं प्रश्नोत्तरें ऐकल्याचें स्पष्ट दिसलें. त्याने तिच्याकडे रागाने पाहिलें व तो मजकडे वळून म्हणाला, "ती वेश्या आहे." अधिकाऱ्यांच्या वापरांतला हा शब्द व त्याचा उच्चार माहीत असल्याबद्दल त्याला अभिमान वाटत असावा.* वरील उत्तर देतांना त्याने आत्मसंतुष्टतापूर्ण किंचित् स्मित केलें व तो त्या स्त्रीकडे वळला. तिच्याशीं बोलण्यास सुरवात करतांच त्याचा चेहरा पार बदलला. जसें एखाद्या कुत्र्यावर कोणी ओरडावें त्याप्रमाणें विचित्र व तिरस्कारपूर्वक रीतीने ओरडून तिच्याकडे न बघतांच तो म्हणाला,—

" 'मी खाणावळींत वसून असतें' असें मूर्खपणाचें उत्तर काय म्हणून देतेस ? जर येथे बसतेस तर स्पष्टपणें मी वेश्या आहे असें सांग." पुनः त्या शब्दाचा उच्चार करीत तो म्हणाला, " स्वत:ला काय संबोधावें हेंच मुळी तिला माहीत नाही."

त्याच्या दरडावण्याची मला चीड आली. मी म्हटलें, "आपण तिला लाजविण्यांत अर्थ नाही. आपण सर्वांनी जर शुद्धाचरण ठेवलें तर अशा बाया असणारच नाहीत."

---

* रशियांत Prostituto हा शब्द सामान्य लोकांस अपरिचित असून याचा बरोबर उच्चार व उपयोग फक्त सुशीक्षितांनाच अवगत असतो.

"खरें म्हणाल तर असेंच आहे" घर मालकाने चंद्रवळ आणून हसून म्हटलें.

मी म्हटलें, "मग आपण त्यांच्यावर रागावण्याऐवजी त्यांची कीव केली पाहिजे. त्यांचा यांत दोष आहे काय?"

मी काय बोललों हें मला नक्की आठत नाही,पण तो ज्यांना वेश्या म्हणून संबोधी अशा स्त्रिया असलेल्या घराच्या त्या तरुण मालकाच्या बोलण्याच्या पद्धतीचा मला मनस्वी तिटकारा आला आणि त्या स्त्रीविषयीं मला वाईट वाटलें; व हे दोन्ही विकार मी व्यक्त केले. पण माझें बोलणें संपतें न संपतें तोंच ज्या खोलींतून स्त्रिया हसण्याचा आवाज आला होता तेथून पलंग करकरल्याचा आवाज आला व थेटपर्यंत नसलेल्या विभाजक भिंतीमागून विस्कटलेले कुरळे केंस, पिचके डोळे व तकाकीदार लांब चेहरा असणाऱ्या एका स्त्रीने डोकें वर काढिलें. तिच्या मागोमाग आणखी दोन स्त्रिया डोकावून पाहूं लागल्या. अर्थातच आपापल्या बिछान्यांवर उभ्या असून त्या सर्व आपापल्या माना पुढे वाकवून स्तब्धपणें लक्षपूर्वक आमच्याकडे पाहत होत्या. घटकाभर कशीशीच वाटणारी स्तब्धता पसरली. जो विद्यार्थी पूर्वी हसत होता त्याची मुद्रा गंभीर झाली. घरमालकाने लाजेने मान खाली घातली व त्या स्त्रिया श्वास बंद करून मजकडे टक लावून पाहत राहिल्या. त्या सर्वांपेक्षा मला अधिक लाजल्यासारखें वाटलें. माझ्या सहज बोलण्याचा इतका परिणाम होईल असें मला वाटलें नाही. * मी एक सहज सहानुभूतीचा शब्द बोललों. पणते सर्व जणूं याच एका शब्दाची वाट पाहात होते, व त्या निर्जीवांत चैतन्य उत्पन्न होण्यास या एका शब्दाचीच जणूं काय उणीव असावी अशासारखा माझ्या बोलण्याचा परिणाम झाला. आता पुढे काय होतें हें पाहत सर्वांनी मजकडे उत्कंठेने दृष्टि लाविली होती. त्या निर्जीवांत सजीवता येण्यासारखें मी काय बोलतों याची ते वाट पाहूं लागले.* पण मी सुरू केलेलें कार्य पुढे चालू ठेवण्यास मजजवळ शब्द किंवा कृति उरली नाही असें मला वाटलें. मी खोटें बोलल्याची मला अंतर्यामीं जाणीव झाली. मी त्यांच्यासारखाच

---

* येथे संदर्भांदाखल बायबलांतील एका कथेचा उल्लेख आहे पण तो वगळला आहे. कारण तो नसल्याने मुळीच अर्थहानि होत नाही.

असून मला बोलण्यासारखें कांहीही नव्हतें असें मला वाटलें. मी सर्वांचीं नांवें व त्यांचे उद्योग यांची नोंद करूं लागलों. या प्रसंगामुळें मी आणखी एक चूक केली ती अशी. या दुर्दैव्यांनाही मदत करतां येईल असें मला वाटलें. हें फार सोपें आहे असाही मी स्वत:चा भ्रम करून घेतला. मी स्वत:शीं म्हणालों, "या बायांची नोंद तर करूं या. नंतर आम्ही ("आम्ही" कोण याचा विचार करण्यासही मी थांबलों नाही.) यांना मदत करूं." मी अशा भ्रमांत होतों की, आम्ही (जे आम्ही पिढ्यानपिढ्या या स्त्रियांना कुमार्गावर नेत आलों व नेत आहोंत तेच) एखाद्या सुमुहूर्तीं एकदम सर्व सुधारणा करण्याचा निश्चय करूं. पण जी दुराचारी बाई आई आजारी असलेल्या मुलाला झोका देत होती तिचे शब्द जर मी लक्षांत ठेवले असते तर ही माझी कल्पना किती खुळी होती हें सहज दिसून आलें असतें.

त्या मुलाला झोके देणाऱ्या बाईला पाहून आम्हांला वाटलें की मूल तिचेंच असावें. "तूं कोण?" या प्रश्नाचें उत्तर तिनें, "मी कामशांता आहें" असें दिलें. तिने "वेश्या" असा शब्दप्रयोग केला नाही. हा कठोर शब्द फक्त घरमालकानेच वापरला. तिला मूल आहे या कल्पनेने तिला तिच्या परिस्थितींतून काढावें असें मला वाटलें व म्हणून मी विचारलें,

"हें मूल तुझें काय ?"

"नाही, तें या बाईचें आहे."

"मग तूं याला झोके कां देतेस ?"

"त्या बाईने म्हटलें म्हणून. ती मरूं घातली आहे."

माझी कल्पना चूक ठरली तरी मी तिच्याशीं पूर्वीच्या रोखानेच बोलणें चालू ठेवलें. ती कोण व या परिस्थितींत कशी आली हें मी तिला विचारूं लागलों. तिने स्वत:ची हकीकत खुशीने व सरळपणें सांगितली. ती मॉस्कोची रहिवाशी असून एका कारखान्यांतील कामगाराची मुलगी होती. ती पोरकी झाल्यानंतर तिचें पालनपोषण तिच्या आत्याने (ही आता मरण पावली होती) केलें होतें. आत्याकडे राहत असतांनाच ती खाणा-वळींतून येऊं जाऊं लागली. "तुला आपला जीवनक्रम बदलण्याची इच्छा आहे काय ?" असा प्रश्न मी तिला केला, पण या प्रश्नाचें तिला कांहीच

वाटलें नाही. अशक्य गोष्ट जर कोणी दुसऱ्यास सुचविली तर अशा सूचनेचें त्या दुसऱ्याला काय म्हणून कांही वाटावें ? ती हसली व म्हणाली, "माझें पिवळें तिकिट* पाहून मला कोण जवळ उभें करील ?" मी म्हटलें, ' पण समज तुला कोठें तरी स्वयंपाकाचें काम देवविलें तर ?"

तिचे केस लांब सडक अमून तिची देहयष्टि मजबूत होती. याशिवाय तिचा चेहरा वाटोळा व भोळसर होता. अशा तऱ्हेच्या बाया स्वयंपाकिणी असलेल्या दिसून येतात, म्हणून मला वरील कल्पना सुचली. पण तिला माझें बोलणें आवडलें नसावें हें उघड होतें. ती म्हणाली, "स्वयंपाकीण ? पण मला तर रोटचा भाजतां येत नाहीत. " असें म्हणून ती हसली. येत नाही असें ती म्हणाली पण तिच्या चेहऱ्यावरून रोटचा भाजणें तिला आवडत नसावें व स्वयंपाकिणीचें काम तिला तिरस्करणीय वाटत असावें असें दिसलें. एका शेजारणीच्या मुलाकरितां ज्या बाईने बायबलांतील विधवेप्रमाणें सर्व प्रकारें स्वार्थत्याग केला, त्या बाईला तिच्या इतर शेजाऱ्यांप्रमाणें काम करणें कमीपणाचें व अपमानास्पद वाटत होतें. काम न करतां चरितार्थ चालविण्याची तिला सवय लागली होती व असें करणें तिच्या शेजाऱ्यांत स्वाभाविक मानण्यांत येत असे. तिचें खरें दुर्दैव यांत (या कल्पनेंत) होतें. यामुळेंच ती वेश्या झाली व राहिली. यामुळेंच प्रथम ती खाणावळीतून जाऊं लागली. आमच्यांतील कोणता पुरुष अगर स्त्री तिचा हा खोटा दृष्टिकोण बदलूं शकेल ? आमच्यांत तरी आलस्यमय जीवनापेक्षा श्रमपूर्ण जीवन श्रेष्ठ आहे असें मानणारे व तद्वत् वागणारे लोक कोठे आहेत ? काम करणारालाच मान देण्याचें तत्त्व कोणास मान्य आहे ? हें जर माझ्या लक्षांत येतें तर हा आळशीपणाचा रोग आमच्यापैकी कोणालाही बरा करतां येणार नाही हें मला कळलें असतें.

भितीवरून मजकडे पाहणाऱ्या आश्चर्यमुग्ध चेहऱ्यांचा एकच अर्थ होता. त्यांना मी दर्शविलेल्या सहानुभूतीबद्दल फक्त आश्चर्यच वाटलें पण तीं ज्या अनीतीच्या गर्तेत होती त्यांतून त्यांची मुक्तता होईल असें त्यांना खचित वाटलें नसावें, हें माझ्या लक्षांत यावयास पाहिजे होतें

* रशियांत वेश्यांना पिवळ्या रंगाचे प्रवासी परवाने पोलिसांकडून मिळत.

त्यांचें जीवन अनीतीचें आहे ही गोष्टच त्यांना मुळी पटत नव्हती. त्यांचा तिरस्कार केला जातो हें त्यांना कळे, पण त्याचें कारण त्यांना उमजेना. लहानपणापासून त्यांचें आयुष्य त्यांच्या सारख्याच समाजाला गरज असलेल्या व नेहमी अस्तित्वांत असलेल्या स्त्रियांमध्यें गेलें होतें, इतकेंच नव्हे तर यांची गरज इतकी समाजमान्य होती की वेश्यागृहें व्यवस्थित राहावीं याबद्दल खबरदारी घेणारे अधिकारी सरकारकडून नेमलेले असत.* पुरुषांवर आपला ताबा चालतो व आपण त्यांना इतर स्त्रियांपेक्षा अधिक कह्यांत ठेवूं शकतों हेंही त्यांना माहीत होतें. जरी समाज त्यांचा तिरस्कार करी, तरी समाजांतील स्त्रीपुरुष व सरकार यांना त्यांचें अस्तित्व मान्य असल्याची त्यांना जाणीव होती; व म्हणून पश्चात्ताप करावयाचा तो कां अगर सुधारणा करावयाची ती कोणती, हें त्यांना उमजेना. आमच्या फिरतींत एका विद्यार्थ्याने स्वत:च्या तेरा वर्षांच्या मुलीचा विक्रय करणारी एक बाई असल्याचें सांगितलें. त्या मुलीला सोडवावें म्हणून मी मुद्दाम त्या विन्हाडीं गेलों. आईलेकी अत्यंत दरिद्रावस्थेंत होत्या. आई सुमारें ४० वर्षांची ठेंगणी, काळसर व अत्यंत किळसवाणी वेश्या होती. मुलगी तिच्याप्रमाणेंच किळसवाणी होती. मी कोणी तरी शत्रू आहें अशा समजाने सांभाळून व अविश्वासपूर्णतेने त्या म्हातारीने त्यांच्या जीवनक्रमासंबंधींच्या मी पर्यायाने विचारलेल्या सर्व प्रश्नांचीं तुटक उत्तरें दिलीं. मुलीने आईकडे पाहिल्याशिवाय मला एकही उत्तर दिलें नाही, यावरून आईवर तिचा पूर्ण विश्वास असावा. त्यांना पाहून दया वाटण्याऐवजी मला तिरस्कार वाटला, तरी मुलीला वांचवणें योग्य आहे असें मला वाटलें. म्हणून ज्या स्त्रियांना अशा दुर्दैवी स्त्रियांबद्दल सहानुभूति वाटते अशांना ही हकीकत सांगून येथे धाडावें असें मी मनाशीं ठरविलें. पण मी जर त्या आईच्या मागील अनेक वर्षांच्या जीवनाचा विचार केला असता व तिनें आपल्या मुलीला कसा जन्म दिला, तिला कसें वाढवलें, निस्संशय कोणाचीही

---

* रशियांत कुंटणखान्यांची तपासणी करून वेश्यांना परवाने देण्याची व त्यांची वैद्यकीय तपासणी करण्याची जी सरकारी प्रथा होती ती या ठिकाणीं अभिप्रेत आहे.

तिला या बाबतींत कशी मदत झाली नसावी व स्वतः तिने किती स्वार्थ-त्याग केला असावा इत्यादींचा आणि स्वतःच्या जीवनक्रमासंबंधींची तिची योजना काय असावी याचा जर मी विचार केला असता तर तिच्या दृष्टीने तिच्या बागणुकींत कोठेही अनीतिमत्ता नव्हती असें मला कळाव-यास हवें होतें. तिने आपल्या मुलीकरितां तिच्या मतें जें उत्तम तें स्वतःला शक्य त्या प्रमाणांत सर्व काही केलें होतें व करीत होती. मुलीला आईपासून जबरदस्तीने दूर करणें शक्य होतें पण मुलीच्या देहाचा विक्रय करणें गैर आहे हें तिच्या आईला पटविणें अशक्य होतें. अविवाहित राहून मुलाबाळांची अगर कामाची कटकट मागे लावून न घेतां फक्त कामशांत्यर्थ जीवन घालविण्याचा सर्वांस सम्मत असलेला जो रूढ मार्ग त्यापासून कैक दिवसांपूर्वी त्या मुलीच्या आईला परावृत्त केलें असतें तरच आज ही मुलगी वांचली असती. हा विचार जर मी केला असता तर मला कळलें असतें की ज्या सभ्य स्त्रियांनी येथे येऊन या बायांना उद्धरावें अशी माझी कल्पना होती त्या स्त्रिया स्वतःच बिनकामाचें, चैनीचें व अपत्यें न होऊं देतां निव्वळ कामशांत्यर्थ जीवन घालविणाऱ्या व स्वतःच्या मुलींनाही बुद्धिपुरस्सर तसेंच शिक्षण देणाऱ्या होत्या. एक आई मुलीला खाणावळींत घाडी तर दुसरी नाचरंगाला धाडी, पण जीवनासंबंधींचा दृष्टिकोण मात्र दोघींचाही एकच होता. तो हा की स्त्रियांचें मुख्य कर्तव्य पुरु-षांची कामवासना तृप्त करणें व त्याच्या मोबदल्यांत जेवणखाण, कपडेलत्ते व संरक्षण यांची अपेक्षा करणें हा होय. असें असतां आमच्या सभ्य स्त्रिया या बाईला अगर तिच्या मुलीला तिच्या जीवनक्रमापासून कसें परावृत्त करूं शकल्या असत्या बरें ?

प्रकरण नववें

मुलांच्या बाबतींत माझी भूमिका अधिकच विचित्र ठरली. माझ्या उपकारकर्त्याच्या भूमिकेंत माझा त्यांच्याशींही संबंध आला. त्या पापाच्या खाईंतून या निरपराध्यांना वाचवावें असें मला वाटलें. त्यांचें पुढे कांही तरी करूं अशा इराद्याने मी त्यांचीं नांवें टिपून घेतलीं.

त्यांपैकी एका सेरीझा नांवाच्या १२ वर्षांच्या पोराकडे माझें विशेषत: लक्ष वेधलें. हा एक चलाख, तरतरीत पोरगा असून एका बूटवाल्याकडे राही. पण त्याचा मालक तुरुंगांत गेल्यापासून तो पोरका झाला होता. मला त्याच्याबद्दल फार वाईट वाटलें. व त्याला कांहीतरी मदत करावी अशी इच्छा झाली.

त्याला मी जी मदत केली तिचा काय निकाल झाला हें सांगतों. त्यावरून माझी उपकारकर्ता या नात्याची भूमिका कशी फोल होती हें वाचकांना समजेल. त्या मुलाला नेऊन मी आपल्या स्वयंपाकघरांत ठेवून घेतला. पापाच्या खाईंतून काढलेल्या, उवांनी भरलेल्या या पोराला आमच्या मुलांत कसें ठेवणार बरें ? माझ्या स्वत:ऐवजीं माझ्या नोकरांची मी गैरसोय केली व आम्ही (म्हणजे माझ्या स्वयंपाक्याने) त्याला जेवण व जुने टाकून दिलेले कपडे दिले, एवढ्यावरून मी स्वत:ला मोठा चांगला व दयाळू मानिलें. तो मुलगा सुमारें एक आठवडाभर राहिला. त्या आठवड्यांत मी फक्त येतांजातां दोनदा त्याच्याशीं थोडें बोललों व एकदा फिरावयास जातांना एका ओळखीच्या बूटवाल्याकडे त्याची उमेदवार म्हणून शिफारस केली. सूटेव्हने (हा मजजवळ राहणारा एक शेतकरी होता)* त्या पोराला खेड्यावर त्याच्याकडे राहून मजुरी करण्याबद्दल सुचविलें. पोराने हें नाकारलें व दुसऱ्या आठवड्यांत तो नाहीसा झाला. मी झानोव्ह हाउसमध्यें जाऊन त्याची चवकशी केली. तो तेथेच गेला होता. पण मी पोचलों तेव्हा तेथे तो हजर नव्हता. त्या दिवशीं व त्याचे

* याची हकीकत ऐमर मॉडच्या टॉलस्टॉयच्या जीवनवृत्तांतांत आली आहे.

आदले दिवशीं तो झूलॉजिकल गार्डनला (जनावरांचा अजबखाना) गेला होता. तेथे जंगली सोंगें घेणाऱ्या लोकांचा कांही खेळ चाले व त्यांत हत्ती फिरविण्यांत येई. त्यांच्या मिरवणुकींत सामिल होण्याबद्दल त्याची दिवसास तीस कोपेक मजुरी ठरली होती. मी पुनः दुसरे दिवशी गेलों पण तो इतका कृतघ्न निघाला की त्याने मला उघडपणें टाळलें. मी जर त्या मुलाच्या व स्वतःच्या जीवनक्रमाचा विचार केला असता तर त्या मुलाला काम न करतां चरितार्थ चालवितां येण्याची शक्यता कळल्यामुळें व आळसाची सवय जडल्यामुळें तो बिघडला होता, हें मला कळून आलें असतें. या बिघडलेल्याला सुधारण्याकरितां व त्याचें भलें करण्याकरितां मी आपल्या घरीं नेलें होतें; तेथे त्याला काय दिसलें ? त्या ठिकाणी त्याला माझीं त्याच्यापेक्षा मोठीं, लहान व त्याच्या बरोबरीचीं मुलें दिसलीं. हीं स्वतः तर काम करत नव्हतींच पण दुसऱ्यांना मात्र भाराभर काम पुरवीत. जिन्नसा मळविणें, गोंधळ माजवणें, उंची व स्वादिष्ट मिष्टान्न खाणें, भांडीं फोडणें, सांडलंवड करणें व कुत्र्याचे आंगावर त्याला आवडणारा पदार्थ भिरकाविणें या त्यांच्या लीला होत. मी त्याला गर्तेतून काढून "चांगल्या" जागीं आणलें हें जर खरें तर या चांगल्या ठिकाणीं रूढ असणारा जीवनाचा दृष्टिकोण त्यानेही कां उचलूं नये बरें ? व म्हणून त्याने चांगल्या जागीं राहायचें याचा अर्थ काम न करतां घृतकुल्या मधुकुल्या उडवीत आनंदाने राहायचें असा केला. आता हें खरें की माझीं मुलें लाटिन व ग्रीक व्याकरणांतील विभक्त्यांची कठीण कसरत करीत होतीं हें त्याला माहीत नव्हतें किंवा त्यांच्या शिक्षणाचाही उद्देश त्याला कळत नव्हता. पण जर त्याला खरोखरच माझ्या मुलांच्या शिक्षणाचा उद्देश कळला असता तर माझ्या मुलांच्या प्रत्यक्ष उदाहरणाचा त्याच्यावर अधिक दृढ परिणाम झाला असता हें कोणाच्याही लक्षांत यावयास पाहिजे. मग तर त्याला खास कळून चुकतें की माझ्या मुलांना असें शिक्षण मिळत आहे की त्यांनी आज कोणतेंही काम न करतां पुढेही त्यांना पदवीच्या भरंवशावर कमींत कमी काम करून अधिकांत अधिक मौज करतां यावी. हें त्याला कळलें म्हणूनच त्याने शेतकऱ्यावरोबर जाऊन गुरें राखण्याचें व बटाटे व हलकी बीर यांच्यावर गुजराण करण्याचें टाळलें व झूलॉजिकल गार्डनमध्यें जंगल्याचा पोषाख

करून सुमारें आठ आणे रोजावर हत्तीला मिरविण्याचें काम पत्करलें.

एकीकडे माझ्या स्वत:च्या मुलांना पूर्ण आळस व चैन यांचें शिक्षण देत असतां ज्ञानोव्ह हाउसमध्यें–ज्याला मी गर्ता म्हणें–खितपतणाऱ्यांना व त्यांच्या मुलांना सुधारण्याची मी आशा बाळगणें किती विसंगत होतें हें मला कळावयास हवें होतें. ज्ञानोव्ह हौसमध्यें निदान ७५टक्के माणसें तरी स्वत:चें व इतरांचें काम करणारीं होतीं. पण मला यापैकी कांहीच उमजलें नाही.

ज्ञानोव्ह हौसमध्यें अत्यंत हीन स्थितींत असणारीं पुष्कळ मुलें होतीं. वेश्यांची मुलें, पोरकी व भिकाऱ्यांच्या बरोबर रस्त्याने फिरणारीं. सर्वांची स्थिति करुणास्पद होती, पण सेरीझाचा जो मला अनुभव आला त्यावरून माझी विशिष्ट राहणी कायम असतां त्यांना मी मदत करणें अशक्य होतें हें मला कळून आलें. सेरिझा आमच्याकडे होता तेव्हा आमची व विशेषेंकरून मुलांची राहणी त्याच्यापासून लपविण्याची मला अंत:स्थ इच्छा होई. मला वाटे की आम्ही व आमचीं मुलें याच्या प्रत्यक्ष उदाहरणाने त्याला उद्यमशील बनविण्याच्या माझ्या सर्व प्रयत्नांवर पाणी पडेल. एखाद्या मुलाला एखाद्या वेश्येपासून अगर भिकाऱ्यापासून आणणें सोपें आहे, पैसा असल्यास त्याला स्वच्छ करून चांगले कपडे देऊन खाऊं घालणें, किंबहुना निरनिराळीं शास्त्रें शिकविणेंही सोपें आहे. पण जे आम्हीच स्वत:ची भाकरी स्वत: कमावीत नाही त्यांनी त्याला मात्र "तूं आपली रोटी कमाव" असें शिकविणें कठीण आहे, इतकेंच नव्हे तर अशक्य आहे. कारण आमच्या उदाहरणाने, किंबहुना त्याच्या परिस्थितींत जो आम्ही –आम्हांला क्षुल्लक वाटणाऱ्या खर्चाने–फरक घडवितों त्यानेच आम्ही त्याला मुळीं उलट शिक्षण देत असतों. एखादें कुत्र्याचें पिल्लूं असेल तर त्याची निगा राखणें,त्याला खाऊं घालणें,ने आण करण्यास शिकविणें हीं केलीं कीं आनंद वाटतो. पण माणसाला मात्र खाऊं घालून, निगा राखून अथवा ग्रीक भाषा शिकवून भागत नाही. आयुष्य कसें घालवावें, दुसऱ्याजवळून कमी घेऊन अधिक कसें द्यावें हें त्याला शिकविण्याची गरज आहे. पण आम्हीं त्याला आपल्या घरीं आणलें काय, अथवा एका मुद्दाम याच उद्देशाने स्थापलेल्या अनाथवसतिगृहांत ठेवलें काय, आमच्याकडून त्याला उलटच शिकवण मिळत असते.

प्रकरण दहावें

ल्याप्पिन हाउसशेजारीं जसा तेथील लोकांविषयीं मजमध्यें कारुण्य-भाव उत्पन्न झाला अगर स्वत:वद्दल जो तिटकारा वाटला तसा आता मला वाटेना. मला माझें उद्दिष्ट कार्य (अर्थात जे येथे मिळतील त्यांना मदत करणें) तडीस न्यावयाचें होतें. पण आश्चर्याची गोष्ट की भलें करणें–ज्याला पैशाचो गरज असेल त्याला पैसा देणें–चांगलें व त्यामुळें लोकां-बद्दल मला प्रेम वाटूं लागेल असें जें मला वाटलें होतें त्याऐवजीं अनुभव मात्र अगदी उलट आला. माझ्या मनांत त्यांच्यावद्दल तिरस्कार व धिक्कारभाव उत्पन्न झाला. आमच्या फेरीच्या पहिल्या दिवशीं सायंकाळीं ल्याप्पिनहाउस सारखाच एक प्रसंग घडला. पण मजवर पूर्वीसारखा ल्याप्पिनहाउसप्रमाणें परिणाम न होतां अगदी भिन्न परिणाम झाला.

एका बिऱ्हाडांत एक खरी दुर्दैवी व जिला मदतीची निकड होती अशी एक व्यक्ति आढळली. तेथून या प्रसंगास आरंभ झाला. ही दोन दिवसांपासून खावयास न मिळालेली एक स्त्री होती. प्रसंग पुढील प्रमाणें.

एका मोठ्या व जवळजवळ रिकाम्या निशावसतिगृहांत मी एका म्हातारीला, आसपास, ज्यांना कांहीच खावयास मिळालेलें नाही, असे कोणी गरीव लोक आहेत काय असा प्रश्न केला. म्हातारीने विचार केल्यासारखें केलें व दोघांचीं नांवें सांगितलीं. पण पुन: कांही आठवल्यासारखें करून म्हणाली, "होय! मला वाटतें. ती येथेच पडली असावी." हें म्हणत असतां ती एका विछान्याकडे पहात होती. "होय ! या बाईला कांहीच खायला मिळालें नाही असें दिसतें." मी म्हणालों, "खरें काय? कोण बरें ही ?" "ही एक वेश्या असून आता सर्वांना नकोशी झाली आहे, म्हणून तिलाही कांही मिळत नाही. आतापावेतों घरमालकिणीनें इच्या-वर दया केली पण तीही आता इला हाकलून देणार असें वाटत आहे." असें म्हणून म्हातारीने हाक मारली, "अगाप्या, ए अगाप्या."

आम्ही जवळ गेलों व बिछान्यावरील आकृति उठून बसली. ही एक वृद्धा असून इचे केस पिंजारलेले होते. ती केवळ हाडांचा सापळा असली तरी तिच्या डोळ्यांत मात्र एक प्रकारचें तेज होतें. आमच्याकडे तिने टक लावून पाहिलें व फाटक्या कपड्यांतूत दिसणारें वक्षःस्थल झाकण्याकरितां मागच्या बाजूस पडलेलें जाकिट आपल्या रोडक्या हातांत घेतलें व घाबरून म्हणाली, "काय ? काय ?" मी तिला "कसें काय?" म्हणून विचारलें. हा प्रश्न तिला बराच,वेळ समजेना. नंतर ती म्हणाली, "मला स्वतःलाच माहीत नाही. मला बाहेर हाकून देणार आहेत. मी तिला पुढें विचारलें, (हें लिहितांना मला लाज वाटते) "तुला कांहीच खावयास मिळालें नाही हें खरें काय ?" तिने पूर्वी इतक्याच घाईने पण मजकडे न पाहतां उत्तर दिलें, "मी काल जेवलें नाही व आजही मला खावयास मिळालेंलें नाही."

या बाईला पाहून मला दया आली पण ल्यापिन हाउसप्रमाणें मात्र नव्हे. तेथे लोकांबद्दल दया वाटतांना मला माझी लाजही वाटे पण येथे मात्र मला हवे तसे क्षुधाग्रस्त मिळाले याबद्दल बरें वाटलें.

मी तिला एक रूबल दिला व इतरांनी मी तो देतांना पाहिलें याबद्दल मला आनंद वाटला असें आठवतें. पहिल्या म्हातारीनेही हें पाहून मजपाशीं कांही तरी मागितलें. देण्यांत मला इतका आनंद वाटला कीं, तिला गरज आहे किंवा नाही याचा यत्किंचित् विचार न करतां मी त्या म्हातारीलाही दिलें. म्हातारी मला दारापावेतों पोंचविण्यास आली, व वाटेंत उभें असणारांनी तिने माझे आभार मानल्याचें ऐकिलें. मी दरिद्र्यांची चौकशी केल्यामुळें त्यांच्यांत आशा उद्भवली असें दिसतें. व ते आमच्याभोवतीं घोटाळूं लागले. वाटेंतही लोक मजजवळ भीक मागूं लागले. या लोकांत कांही दारूने झिंगलेले लोक होते त्यांना पाहून मला अस्वस्थता वाटूं लागली. पण म्हातारीला दिल्यानंतर यांना नाही म्हणणें अशक्य होतें म्हणून यांनाही मी कांही पैसे दिले. मी जसे पैसे वाटूं लागलों तशी मज-भोंवती गर्दी वाढूं लागली. सर्व बिऱ्हाडांतून खळबळ माजली. जिने गॅल-ऱ्यांतून लोक मजकडे पाहूं लागले. मी आंगणांत येतांच एक मुलगा

जिन्यावरून दुडदुड धावत गर्दीतून पुढे येऊं लागला. तो मला न पाहतां "त्याने आगाफ्याला एक रूबल दिला" असें घाईने ओरडला. जिन्यावरून येतांच तो माझ्या मागोमाग असलेल्या लोकांबरोबर चालूं लागला. मी रस्त्यावर गेलों तरी पुष्कळसे लोक मजवरोबर होते ते पैसे मागतच होते. मजजवळचा असलेला थोडा खुर्दा मी देऊन टाकला व एका लहानशा दुकानांत गेलों आणि दुकान मालकाला दहा रूबलचा खुर्दा मागितला. तेथें ल्यापिन हाउसप्रमाणेंच प्रकार घडला. एकंदरींत खूपच गोंधळ माजला. म्हाताऱ्या बाया, कंगाल दशेला पोचलेले पांढरपेशे, शेतकरी, मुलें, सर्वांनी त्या दुकानीं गर्दी करून हात पुढे पसरले. मी त्यांना पैसे दिले व कांहींना त्यांच्या आयुष्यक्रमासंबंधीं विचारून नांवें टिपून घेतलीं. दुकानचा मालक आपला लोकरीचा ओव्हरकोट घालून निश्चल बसला होता व तो आळीपाळीने गर्दीकडे व आमच्याकडे पाही. त्याला इतरांप्रमाणेंच चालला हा मूर्खपणा आहे असें वाटत होतें पण तसें म्हणण्याचें त्याला धैर्य होईना.

ल्यापिन हाउसमध्यें लोकांची दैना व अधःपात पाहून मी घाबरलों होतों व माझ्या अपराधित्वाची जाणीव झाल्यामुळें लोकांची दैन्यावस्था सुधारण्याची मला शक्यता वाटली व तशी इच्छाही झाली. पण आता या अगदी तशाच प्रसंगाचा मजवर अगदी निराळा परिणाम झाला. एकतर मला माझ्याभोंवती जमलेल्या बऱ्याच लोकांबद्दल राग आला व दुसरें तो दुकानदार व तेथील भय्ये यांना काय वाटत असेल याबद्दल मी बेचैन झालों.

त्या दिवशीं घरीं परत आल्यावर मी अस्वस्थ होतों. मला वाटलें की मी करतों तें मूर्खपणाचें व अनैतिक आहे. पण एखाद्या प्रश्नासंबंधीं मनाचा घोटाळा उडाला म्हणजे आपण त्या विषयीं जणूं काय निदान आपल्याला तरी या कामाच्या यशाबद्दल शंका नाही असें अवसान आणून बोलतों तसेंच मी या प्रसंगीं केलें.

ज्यांचीं मी नांवें टिपून घेतलीं व माझ्या कल्पनेप्रमाणें ज्यांची सर्वांत अधिक दैना होती व ज्यांना मदत करणें सर्वांत सोपें होतें अशांना भेटण्याकरितां मी दुसरे दिवशीं एकटाच गेलों. पण पूर्वी म्हटल्याप्रमाणें खरी मदत मात्र माझी कोणालाच झाली नाही. त्यांना मदत कर-

ण्याचें काम माझ्या कल्पनेपेक्षा पुष्कळच कठीण ठरलें. माझें दौर्बल्य म्हणा अगर वास्तविक अशक्यतेमुळें म्हणा पण त्यांना मदत करण्याऐवजीं मी त्यांना गोंधळांतच पाडलें. खानेसुमारीसंबंधीं शेवटची पाहणी होण्यापूर्वीं मी अनेकवेळां झानोव्ह हाउसला गेलों व प्रत्येक वेळीं हाच प्रकार घडला. माझ्याभोवतीं याचकांची कल्पनातीत गर्दी गोळा होई व त्यांच्या संख्येमुळेंच कांही करतां येणें शक्य नाही असें मला वाटे, म्हणून त्यांची संख्या एवढी मोठी आहे याचीच मला चीड आली. याशिवाय त्यांचा व्यक्तिशः विचार करतां मला त्यांच्याबद्दल प्रेम वाटलें नाही. त्यांपैकी प्रत्येकजण पूर्णपणें अगर थोडें फार खोटें बोलून मी एक पैसे उपटावयाची पिशवी आहे अशा दृष्टीने मजकडे पाहतो असें मला वाटलें. कैक बाबतींत मला असा प्रत्यय आला की मजकडून उपटलेल्या या पैशाने त्यांचें फायद्याऐवजीं नुकसानच होई. मी जसजसा जास्त वेळां झानोव्ह हाउसला जाऊं लागलों, त्यांच्याबद्दल मला ज्याप्रमाणांत अधिक माहिती मिळूं लागली त्याप्रमाणांत त्यांच्याकरितां कांहीही करतां येणें शक्य नाही हें अधिकाधिक स्पष्ट होऊं लागलें. पण खानेसुमारीच्या शेवटच्या मध्यरात्रीपावेतों माझें हें काम सुरूच होतें.

शेवटच्या फिरतीची आठवण येतांच मला विशेष लाज वाटते. पूर्वीं मी एकटा जाईं पण आता आम्ही वीसजण एकत्र गेलों होतों. जे लोक या शेवटच्या फिरतींत येणार होते ते मजकडे सात वाजतां गोळा झाले. त्यांपैकी बहुतेक कोणाशींही माझी ओळख नव्हती. विद्यार्थी, एक अधिकारी व माझ्या ओळखीच्या दोन व्यक्तींनी "C'est tre's interessant !" असें म्हणत स्वतःचाही समावेश आमच्या तुकडीत करून घेण्याबद्दल विनंती केली.

माझ्या ओळखीच्या व्यक्तींनी शिकारी जाकिटें, उंच बूट इ० शिकारीस जातांनाचा पोषाख केला असून निशावसतिगृहास जाण्यास हाच पोषाख योग्य आहे असें त्यांचें मत असावें. त्यांनी आपल्याबरोबर विचित्र बह्त्या व चमत्कारिक पेन्सिली घेतल्या. शिकार अथवा द्वंद्वयुद्ध किंवा लढाईवर जातांना जशी मनाची स्थिति असते तद्वत् त्यांच्या मनाची

(Copy 4250)

क्षुब्ध स्थिति होती. त्यांच्या लीलांमुळें आमचा मूर्खपणा व विसंगतपणा अधिक स्पष्ट होत असला तरी वस्तुतः आम्हीं सर्वच विसंगत होतों. निघण्यापूर्वी एखाद्या लढाईप्रमाणें आम्ही कशी सुरुवात करायची, आपल्या कशा तुकड्या पाडावयाच्या यावद्दल विचारविनिमय केला. हा विचारविनिमय कौन्सिलांत, असेंब्लींत अगर कमिट्यांवर चालतो तशा स्वरूपाचा होता. म्हणजे प्रत्येकजण त्याला कांही विशेष बोलण्यासारखें होतें किंवा त्यास कांही शिकावयाचें होतें म्हणून नव्हे तर इतरांच्या मानानें आपण मागें राहूं नये एवढ्याकरितांच कांहीना कांही बोलला. पण या सर्वांच्या भाषणांत ज्या दातृत्वासंबंधीं मी अनेकवेळां त्यांच्याजवळ उल्लेख केला होता त्या दातृत्वासंबंधी मात्र कोणी बोललें नाही. मला लाज वाटत होती तरी पुनः दयेचा, अर्थात् आपल्या फिरतींत जे मिळतील त्या सर्व दरिद्र्यांची एक यादी करण्याच्या आवश्यकतेचा उल्लेख करावा असें मला वाटलें. दानाची चर्चा करण्याची मला नेहमीच लाज वाटे, पण आमच्या या उल्हसित तयारी–उपकरणांच्या घाईंत तर मला या गोष्टीचा उल्लेख करणेंसुद्धा जड झालें. सर्वांनी माझें भाषण निव्वळ नाइलाजाने व नाखुषीने ऐकून घेतलें हें उघड होतें. वरपांगीं प्रत्येकाने मान डोलविली तरी हें मूर्खपणाचें असून यांतून कांही निष्पन्न होणार नाही अशी त्यांची खात्री असल्यासारखें दिसलें. त्यांनी इतर गोष्टी बोलण्यास सुरुवात केली. अशा प्रकारें आमची जाण्याची वेळ होईपावेतों गप्पा चालून आम्ही नंतर निघालों.

आम्ही त्या अंधारमय खाणावळीशेजारीं येऊन नोकरांना उठवलें व आमचे कागद चाळूं लागलों. आमच्या येण्याची बातमी लागतांच लोक बाहेर निसटूं लागले होते असें आम्हांला सांगण्यांत आलें, म्हणून आम्ही घरमालकाला दरवाजे बंद करून घेण्यास सांगितलें. आम्ही स्वतः आंगणांत जाऊन जे बाहेर पडूं पाहत होते त्यांना "तुमचे परवाने कोणीही पाहणीकरितां मागणार नाहीत" असें आश्वासन देऊं लागलों.* त्या गोंधळ-

---

*परवाना (Passport) नसणें अगर खोटा असणें हा राशियांत भयंकर गुन्हा समजण्यांत येई.

लेल्या निशावसतिगृहवासी लोकांना पाहून मजवर जो विचित्र व असुखावह परिणाम झाला तो मला आठवतो. चिंध्या पांघरलेले (नेसलेले) अर्धनग्न, आंगणांतल्या काळोखांतील एकुलत्या दिव्याच्या उजेडामुळें उंच वाटणारे, घाबरगुंडी उडालेले असे ते लोक आंगणांतील घाणेरड्या शौचकूपाजवळ*गोळा झाले होते. आमचें आश्वासन त्यांनी ऐकिलें पण त्यांचा विश्वास बसेना. पाठलाग होणाऱ्या सावजाप्रमाणें फक्त पळून जातां यावें एवढ्याकरितां ते वाटेल तें करण्यास तयार होते हें स्पष्ट दिसत होतें. पोलिस अधिकारी, चवकशी मॅजिस्ट्रेट, अथवा न्यायाधीश अशा ज्या निरनिराळ्या " सभ्य " लोकांनी त्यांना शहर–खेडीं–रस्ते-खाणावळी–अन्नछत्रें–इ०सर्व ठिकाणीं भंडावून सोडल्याचें त्यांच्या लक्षांत होतें तेच सभ्य लोक आता फाटकें वंद करून त्यांची निव्वळ मोजणी करावयास आले होते, यावर त्यांचा विश्वास कसा बसावा ? कुत्रे आपल्याला धरावयास आले नसून फक्त आपली मोजणी करावयास आले आहेत यावर सशांचा विश्वास वसणें जितकें अशक्य तितकेंच या लोकांचा आमच्यावर विश्वास बसणें अशक्य होतें. पण दारें बंद करण्यांत आल्यामुळे सर्व आपापल्या बिऱ्हाडांतून गेले व आम्ही आपल्या तुकड्या पाडून कामास लागलों. मजबरोबर दोघे सद्गृहस्थ व दोघे विद्यार्थी होते. पांढरी विजार व ओव्हरकोट घालून वाऱ्या कंदील घेऊन आमच्या पुढे चालूं लागला व आम्ही मागून जाऊं लागलों.

आम्ही माझ्या माहितीच्या व कांही ओळख असलेल्या बिऱ्हाडांतून गेलों. पण बरेच लोक नवे असून येथे ल्यापिन हाउसपेक्षाही भयंकर असें दृश्य दिसलें. सर्व बिऱ्हाडें खचून भरलीं होतीं. खाटा सर्व गुंतल्या असून कांही खाटांवर तर दोघें दोघें होतीं. तेथील गर्दी व स्त्री-पुरुषांची भेसळ अत्यंत भयानक वाटली. दारूमुळें अजीबात बेशुद्ध झाल्या नव्हत्या अशा सर्व स्त्रिया पुरुषांनजीक निजल्या होत्या. अरुंद बाकांवरून अनोळखी पुरुषांशेजारीं अनेक स्त्रिया आपल्या मुलांना घेऊन निजल्या होत्या. या लोकांचें दैन्य, घाणेरडेपणा, चिंध्याळपणा व भयग्रस्तता यांचें दृश्य

* या जागेचा मागें उल्लेख आला आहे.

क्षुब्ध स्थिति होती. त्यांच्या लीलांमुळें आमचा मूर्खपणा व विसंगतपणा अधिक स्पष्ट होत असला तरी वस्तुतः आम्हीं सर्वच विसंगत होतों. निघण्यापूर्वीं एखाद्या लढाईप्रमाणें आम्ही कशी सुरुवात करायची, आपल्या कशा तुकड्या पाडावयाच्या यावद्दल विचारविनिमय केला. हा विचारविनिमय कौन्सिलांत, असेंब्लींत अगर कमिटयांवर चालतो तशा स्वरूपाचा होता. म्हणजे प्रत्येकजण त्याला कांही विशेष बोलण्यासारखें होतें किंवा त्यास कांही शिकावयाचें होतें म्हणून नव्हे तर इतरांच्या मानानें आपण मागें राहूं नये एवढ्याकरितांच कांहीना कांही बोलला. पण या सर्वांच्या भाषणांत ज्या दातृत्वासंबंधीं मी अनेकवेळां त्यांच्याजवळ उल्लेख केला होता त्या दातृत्वासंबंधीं मात्र कोणी बोललें नाही. मला लाज वाटत होती तरी पुनः दयेचा, अर्थात् आपल्या फिरतींत जे मिळतील त्या सर्व दरिद्र्यांची एक यादी करण्याच्या आवश्यकतेचा उल्लेख करावा असें मला वाटलें. दानाची चर्चा करण्याची मला नेहमीच लाज वाटे, पण आमच्या या उल्हसित तयारी–उपकरणांच्या घाईंत तर मला या गोष्टीचा उल्लेख करणेंसुद्धा जड झालें. सर्वांनी माझें भाषण निव्वळ नाइलाजाने व नाखुषीने ऐकून घेतलें हें उघड होतें. वरपांगीं प्रत्येकाने मान डोलविली तरी हें मूर्खपणाचें असून यांतून कांही निष्पन्न होणार नाही अशी त्यांची खात्री असल्यासारखें दिसलें. त्यांनी इतर गोष्टी बोलण्यास सुरुवात केली. अशा प्रकारें आमची जाण्याची वेळ होईपावेतों गप्पा चालून आम्ही नंतर निघालों.

आम्ही त्या अंधारमय खाणावळीशेजारीं येऊन नोकरांना उठवलें व आमचे कागद चाळूं लागलों. आमच्या येण्याची बातमी लागतांच लोक बाहेर निसटूं लागले होते असें आम्हांला सांगण्यांत आलें, म्हणून आम्ही घरमालकाला दरवाजे बंद करून घेण्यास सांगितलें. आम्ही स्वतः आंगणांत जाऊन जे बाहेर पडूं पाहत होते त्यांना "तुमचे परवाने कोणीही पाहणीकरितां मागणार नाहीत" असें आश्वासन देऊं लागलों.* त्या गोंधळ-

*परवाना (Passport) नसणें अगर खोटा असणे हा राशियांत भयंकर गुन्हा समजण्यांत येई.

लेल्या निशावसतिगृहवासी लोकांना पाहून मजवर जो विचित्र व असुखावह परिणाम झाला तो मला आठवतो. चिंध्या पांघरलेले (नेसलेले) अर्धनग्न, आंगणांतल्या काळोखांतील एकुलत्या दिव्याच्या उजेडामुळें उंच वाटणारे, घाबरगुंडी उडालेले असे ते लोक आंगणांतील घाणेरड्या शौचकूपाजवळ*गोळा झाले होते. आमचें आश्वासन त्यांनी ऐकिलें पण त्यांचा विश्वास बसेना. पाठलाग होणाऱ्या सावजाप्रमाणें फक्त पळून जातां यावें एवढ्याकरितां ते वाटेल तें करण्यास तयार होते हें स्पष्ट दिसत होतें. पोलिस अधिकारी, चवकशी मॅजिस्ट्रेट, अथवा न्यायाधीश अशा ज्या निरनिराळ्या " सभ्य " लोकांनी त्यांना शहर–खेडीं–रस्ते-खाणावळी–अन्नछत्रें–इ०सर्व ठिकाणीं भंडावून सोडल्याचें त्यांच्या लक्षांत होतें तेच सभ्य लोक आता फाटकें वंद करून त्यांची निव्वळ मोजणी करावयास आले होते, यावर त्यांचा विश्वास कसा बसावा ? कुत्रे आपल्याला धरावयास आले नसून फक्त आपली मोजणी करावयास आले आहेत यावर सशांचा विश्वास बसणें जितकें अशक्य तितकेंच या लोकांचा आमच्यावर विश्वास बसणें अशक्य होतें. पण दारें बंद करण्यांत आल्यामुळे सर्व आपापल्या बिऱ्हाडांतून गेले व आम्ही आपल्या तुकड्या पाडून कामास लागलों. मजबरोबर दोघे सद्गृहस्थ व दोघे विद्यार्थी होते. पांढरी विजार व ओव्हरकोट घालून वाऱ्या कंदील घेऊन आमच्या पुढे चालूं लागला व आम्ही मागून जाऊं लागलों.

आम्ही माझ्या माहितीच्या व कांही ओळख असलेल्या बिऱ्हाडांतून गेलों. पण बरेच लोक नवे असून येथे ल्यापिन हाउसपेक्षाही भयंकर असें दृश्य दिसलें. सर्व बिऱ्हाडें खचून भरलीं होतीं. खाटा सर्व गुंतल्या असून कांही खाटांवर तर दोघें दोघें होतीं. तेथील गर्दी व स्त्री-पुरुषांची भेसळ अत्यंत भयानक वाटली. दारूमुळें अजीबात बेशुद्ध झाल्या नव्हत्या अशा सर्व स्त्रिया पुरुषांनजीक निजल्या होत्या. अरुंद बाकांवरून अनोळखी पुरुषांशेजारीं अनेक स्त्रिया आपल्या मुलांना घेऊन निजल्या होत्या. या लोकांचें दैन्य, घाणेरडेपणा, चिंध्याळपणा व भयग्रस्तता यांचें दृश्य

* या जागेचा मागें उल्लेख आला आहे.

भयंकर होतें आणि यांची अफाट संख्या तर या सर्वांपेक्षा अधिक भयानक वाटें. एकामागून एक सारखीं असंख्य बिऱ्हाडेंच बिऱ्हाडें ! सर्वत्र एकच दर्प तेंच गुदमरून टाकणारें वातावरण, तीच गर्दी, स्त्रीपुरुषांची तशीच भेसळ, दारूने बेफाम झालेले एकजात स्त्रीपुरुष, सर्वत्र तेंच भय, तीच गोगलगायवृत्ति व अपराधपूर्ण चेहरे असा एकाच स्वरूपाचा सर्वत्र देखावा होता. या खेपेस पुनः मला ल्यापिन हाउसप्रमाणेंच लाज-ल्यासारखें वाटलें व मी पत्करलेलें काम भयानक व मूर्खपणाचें, सबब अशक्य आहे हें मला उमजलें. यांतून कांहीही निष्पन्न होणार नाही हें जाणून मी कोणाचेंही नांव टिपलें नाही अगर कोणाला प्रश्न विचारला नाही.

मला फारच मनस्ताप झाला. एखाद्याच्या आंगावर भयंकर कोड आढळल्यानंतर जसें वाटतें तशी माझी ल्यापिन हाउसनजीक स्थिति होती. अशा (कोडानें ग्रस्त) माणसाबद्दल कोणासही वाईट वाटेल व या-पूर्वीच आपण त्यास मदत केली नाही म्हणून क्वचित् सदसद्विवेक बुद्धीनें टोचल्याचाही भास होईल. पण आता माझी परिस्थिति डॉक्टरासारखी झाली होती. डॉक्टराने आपल्या औषधांसह रोग्याजवळ यावें, जखमेची पट्टी सोडवून जखम चाळवावी, त्रास द्यावा व शेवटीं ही चाळवाचाळव विनाकारण केली व स्वतःचा औषधोपचार उपयोगीं पडणार नाहीं असें म्हणून चालतें व्हावें अशासारखी माझी आताची वागणूक झाली.

प्रकरण अकरावें

या शेवटच्या माझ्या अनुभवाने माझ्या आत्मवंचनेला अखेरचा धक्का बसला. माझी खात्री झाली की मी पत्करलेलें काम मूर्खपणाचेंच नव्हे तर भीषण स्वरूपाचें होतें. पण असें असलें तरी माझा सर्व कार्यक्रम सर्वस्वीं उधळून टाकणें योग्य होणार नाही असें मला वाटलें. मला काम चालविणें भाग असल्यासारखें होतें. कारण एकीकडे मी लेख लिहून बसलों होतों व माझ्या वारंवार भेटींमुळें व वचनांमुळें त्या दरिद्र्यांना मी आशा उत्पन्न करून ठेवली होती; आणि दुसरीकडे माझ्या लेखान व संवादाने बऱ्याच उदार लोकांत दातृत्वबुद्धि जागृत होऊन त्यांनी माझ्याशीं सहकार्य करून द्रव्यसाहाय्य देण्याचेंही अभिवचन दिलें होतें. म्हणून दोन्ही वर्गांच्या माणसांकडून मी विनंतीची वाट पाहात होतों आणि जें उत्तम दिसेल तें करावें असा माझा विचार होता.

गरजूंच्या पक्षाचा पुढीलप्रमाणें निकाल लागला. मजकडे शंभरावर अर्ज व पत्रें आलीं. हीं सर्व श्रीमंत–गरीबांकडून (हा शब्दप्रयोग वापरणें शक्य असल्यास) आलीं होतीं. कांहींना मी भेटलों व कांहींना उत्तर दिलें नाही. कोणत्याही बाबतींत मला कांहीही करतां आलें नाही. अर्ज करणारे सर्व एके काळीं सुस्थितीत (ज्या स्थितींत लोकांना कमी देऊन लोकांकडून जास्त उकळतां येतें अशी जी स्थिति त्यांना सध्यां पारखी झाली होती पण पुनः जी त्यांना हवीशी वाटे त्या स्थितीत) होते. एकाला धंदा सावरून धरण्याकरतां व मुलांच्या शिक्षणपूर्तीकरतां २०० रूबल हवे होते. दुसऱ्याला फोटोची साधनसामुग्री हवी होती. तिसऱ्याला त्याचें कर्ज फेडून त्याचे गहाण पडलेले चांगले कपडे सोडवून हवे होते. चवथ्याला एक पिआनो मिळाला की तो स्वतः पिआनोचें शास्त्र उत्तम शिकून लोकांना पिआनो शिकवून आपल्या कुटुंबाचें उदरंभरण करण्यास समर्थ झाला असता. बहुतेकांनी किती पाहिजे तो आंकडा न लिहितां भोघम मदत मागितली होती. पण त्यांचे अर्ज काळजीपूर्वक वाचून पाहतां असें दिसलें की मिळेल ती मदत त्यांना हवीच होती व त्यांचें

समाधान करणें अशक्य होतें. कदाचित त्यांच्याशीं कसें वागावें हें मला कळलें नसेल. परंतु एकंदरीने निष्कर्ष हा की, यद्यपि काही जणांना मी मदत करण्याचा प्रयत्न केला तथापि प्रत्यक्ष मदत कोणालाच केली नाही.

आता दान करूं इच्छिणाऱ्यांच्या सहकार्याबद्दल जर पुसाल तर मला अकल्पित व विचित्र असाच अनुभव आला. ज्यांनी मला वचन दिलें किंबहुना नक्की आकडेही सांगितले अशांपैकी एकानेही गरीबांस देण्याकरतां एकसुद्धा रुबल दिला नाही. मला दिलेल्या वचनांची बेरीज ३००० रुबल्स होती पण यांपैकी कोणासही यासंबंधींच्या भाषणाची आठवण राहिली नाही व कोणीही कपर्दिक दिली नाही. विद्यार्थ्यांनीच फक्त त्यांना खानेसुमारीच्या दिवशीं कामाचा मोबदला म्हणून मिळालेले सुमारें १२ रुबल काय ते दिले. अशा प्रकारें माझ्या योजनेंत श्रीमंतांकडून मला मिळणारे जे हजारों रुबल्स मी लाखो गोरगरीबांची दारिद्र्य व व्यसन यांतून सुटका करण्याकडे खर्च करणार होतों त्यांपैकी प्रत्यक्षांत मी इतस्ततः वाटलेले कांही रुबल, माझ्याजवळ शिल्लक म्हणून विद्यार्थ्यांनी दिलेले १२ रूबल व नगरसभेने मला व्यवस्थापक या नात्यानें दिलेले २५ रूबल एवढेच काय ते दिसूं शकले. या शिलकेचें काय करावें हें खरोखरच मला कळेना.

सर्व कांही संपुष्टांत आलें होतें. मॉस्कोहून आपल्या खेडेगांत्रीं परत जाण्यापूर्वी उत्सवाच्या एका रविवारीं सकाळीं मी मजजवळची ३७ रुबल्सची शिल्लक वांटून देण्याच्या इराद्याने झानोव्ह हाउसला गेलों. माझी ज्यांची ओळख होती अशांची भेट घेण्यास सुरुवात केली व मला एकच आजारी मनुष्य भेटला. त्याला, मला वाटतें, मी पांच रुबल दिले. भीक पुष्कळच मागूं लागले पण देण्यास पात्र कोणीही दिसला नाही. परंतु पूर्वी मी त्यांना जितका ओळखत असें त्यापेक्षा आता त्यांची कांही जास्त माहिती मला झाली नव्हती. सबब उरलेले ३२ रुबल कसे वाटावे याबद्दल सल्ला विचारण्यास मी ईव्हान फिडोटीचला बोलाविलें. उत्सवाचा तो पहिला दिवस होता. प्रत्येकाने स्वतःजवळील उत्कृष्ट पेहेराव चढवला होता. सर्वांनी यथेच्छ खाल्लें असून कैक दारूने झिंगले होते. आंगणांत एका कोपऱ्यांत एक फाटका कोट व चप्पल घालून म्हातारपणींही

काम करणारा अस्थिपंजरवत् मोडवाला आपल्या टोपलींतील ऐवज वेगळा करीत होता. उत्कृष्ट आवाजींत एक गाणें गुणगुणत लोखंड, चामडे, इ० जिन्नसांचे तो वेगळाले ढीग करीत होता. मी त्याच्याशीं गप्पा करूं लागलों. त्याचें वय सत्तर वर्षांचें होतें व तो याच मोडीच्या धंद्यावर आपला आजतागायत चरितार्थ चालवीत होता. त्याची कोणतीही तक्रार नसून उलट आपणांस खाण्यापिण्यास किंवहुना झिंगण्यासही पुरेंसें आहे असें तो म्हणाला. खरे गरजू कोणी आहेत काय असें मी त्याला विचारलें. तो किंचित् घोटाळला व स्पष्टपणें म्हणाला की, दारुडे व आळशी यांखेरीज कोणीही अडचणींत नाही. पण माझा उद्देश ऐकून त्याने मजजवळ दारू पिण्यास पांच कोपेक मागितले व ते मिळतांच लगेच तो गुत्त्याकडे पळाला. बाकीचे पैसे वाटून टाकण्यास देण्याकरितां मी ईव्हान फिडोटीचकडे गेलों. खाणावळ चिकार भरली होती. रंगीत पोषाखांतील झिंगलेल्या मुली दारोदार फिरत होत्या. पण टेबलेंच मुळी रिकामीं नव्हतीं. पुष्कळजण दारू प्यालेले होते. एका खोलीत कोणीतरी एक वाद्य वाजवीत असून दोन व्यक्ति नाचत होत्या. मजबद्दलच्या आदरभावामुळें ईव्हान फिडोटीचने नाच बंद करविला व एका रिकाम्या टेबलाशीं आम्ही दोघे बसलों. मी फिडोटीचला म्हटलें, "तुला सर्वांचो ओळख आहे व मला कांही पैसे वाटावयाचे आहेत तर अत्यंत गरजू कोण आहेत हें मला दाखवशील का ?" ईव्हान फिडोटीच (हा एका वर्षानंतर मरण पावला) कामांत होता तरी चांगुलपणाने त्याने मला मदत करण्याकरितां स्वत:चें काम बाजूला ठेवलें. त्याने विचार केला व तोही घोटाळ्यांत पडला. एका क्षणांत नोकराने आमचा संवाद ऐकला होता तोही आमच्यांत येऊन मिळाला.

ते बिऱ्हाडकरूंचीं नांवें घेऊं लागले. त्यांपैकी कांही माझ्या माहितीचे होते पण त्यांचें एकमत होईना. नोकराने "परामोनोव्हना" म्हणून नांव सुचविलें. "होय कधीकधी ती उपाशी असते ... पण ती दारूही पिते." "त्याचें काय ? .... कसेंही असलें तरी ..." "आणि स्पिरिडॉन इव्हानोव्हिच" पुन: नोकराने सुचविलें, "त्याला मुलें आहेत."

पण ईव्हान फिडोटीच स्पिरिडॉन इव्हानोव्हिचबद्दल साशंक होता. "अकुलिना ? होय, पण तिला तर त्या माणसाकडून मदत मिळते. वरें त्या आंघळ्याबद्दल कसें ?" याच्याबद्दल मीच आक्षेप घेतला. मी त्याला नुक्तेंच पाहिलें होतें. हा एक ८० वर्षांचा आंघळा म्हातारा असून याला कोणीच जवळचें नव्हतें. कोणाला वाटेल की यापेक्षा कठीण परिस्थिती शक्य नाही. पण नुक्ताच मी त्याला पाहिला होता. तो दारूने झिंगलेला असून आपल्या बिछान्यावर पडलेला व शेजारीं निजलेल्या साधारण तरुण अशा आपल्या प्रियतमेला घोगऱ्या आवाजांत अद्वातद्वा शिव्या देतांना त्याला मी ऐकलें होतें. नंतर त्याने एक हात तुटलेल्या व आपल्या आई. जवळ राहणाऱ्या एका पोराचें नांव घेतलें. ईव्हान फिडोटीचची सदसद्विवेक बुद्धि जागृत असल्यामुळें तो गोंधळांत पडला होता. त्याची खात्री होती कीं उत्सवप्रसंगीं कोणाला कांहीही दिलें तरी तें त्याच्या खाणावळींतच परत येणार.* पण मला ३२ रुबल देऊन टाकावयाचे होते म्हणून मी आग्रह धरला आणि शेवटीं भलेबुरे कसे तरी ते वाटून टाकण्यांत आले. ज्यांना मिळाले त्यांचे पोषाख वरे होते व ते खाणावळींतच असल्यामुळें त्यांचा आम्हांला दूरवर शोधही करावा लागला नाही. तो एक हाताचा मुलगा लांब बूट, लाल शर्ट व जाकीट घालून आला होता.

अशा प्रकारें माझ्या दातृत्वाच्या योजनेचा शेवट झाला व इतरांवर चिडून मी आपल्या खेड्यावर गेलों. वास्तविक मीच मूर्खपणाची व वाईट चळवळ केली होती. पण स्वत:च्या मूर्खपणाबद्दल लोकांवर चिडणें हा मनुष्यस्वभाव आहे. माझ्या दातृत्वापासून कांहीच निष्पन्न न होतां तें अजीबात थांबलें पण माझी विचारमालिका मात्र थांबण्याऐवजीं पूर्वीपेक्षा दुप्पट जोराने चालू राहिली.

---

* दारूची किंमत या नात्यानें

प्रकरण बारावें

यज्ञ सर्वाचा अर्थ काय ?

मी खेड्यांतून राहिलों होतों व मला खेड्यांतील दारिद्र्याची कल्पना होती. गर्ववजा विनय म्हणून नव्हे तर माझी एकंदर विचारसरणी सुलभपणें समजण्यास आवश्यक सत्य म्हणून हें सांगितलें पाहिजे कीं मी खेड्यांतून दरिद्र्यांच्या करितां फारच थोडी कामगिरी केली, पण त्या खेडवळांच्या मागण्याच मुळीं इतक्या अल्प असत कीं जी थोडी मदत मी करीं तिचा त्यांना उपयोग होई व मजभोवतीं समाधान व प्रेम यांचें वातावरण निर्माण होत असे, आणि या समाधानाच्या वातावरणांत माझ्या चुकीच्या राहणीबद्दल मला जी टोचणी वाटे ती थोडीशी कमी होण्यास मदत होई. आम्ही जेव्हा शहरांत आलों तेव्हा अशाच प्रकारें येथेही राहतां येईल अशी मला उमेद होती. शहरांतील दारिद्र्यांत सत्यांश कमी पण खेड्यांतील दारिद्र्यापेक्षा तें जास्त अपेक्षेबाज व क्रूर होतें. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की तें एकाच जागीं इतक्या मोठ्या प्रमाणांत केंद्रीभूत झालें होतें कीं त्याने मजवर भयंकर परिणाम झाला. त्यापिन हाउसमधलें दृश्य पाहतांच मला माझ्या राहणीचा भेसूरपणा पटला. ती भावना प्रामाणिक व जोमदार होती. पण अशी जरी माझी भावना झाली तरी त्या भावनेप्रमाणें वागल्यास मला माझ्या राहणींत जें क्रांतिपूर्ण परिवर्तन करावें लागलें असतें त्याला मी प्रथम घाबरलों व माघार घेतली. "चैनींत कांही वाईट नाही, चैनीच्या गोष्टी ईश्वरी देणगी आहे व चैन न टाकतांही गरीबांना मदत करतां येते." असा जो सर्वत्र ध्वनि ऐकूं येतो व जगाच्या सुरुवातीपासून सर्व जें सांगत आले त्यावर माझा विश्वास बसला व त्याप्रमाणें वागावेंसें वाटलें; आणि श्रीमंतांची मदत मिळावी या हेतूने माझा लेख लिहिला. सर्व श्रीमंतांनी तत्त्वतः माझ्या मताशीं त्यांचें मत जुळलेंच पाहिजे असें सांगितलें पण प्रत्यक्षांत त्यांची इच्छा नाही म्हणून म्हणा, अगर सामर्थ्य नाही म्हणून म्हणा, पण कोणीही गरिबांकरितां

कांहीही दिलें नाही. मी गरिबांच्या भेटी घेऊं लागलों व मला कल्पनातीत प्रकार दिसला.

एकीकडे मला त्या कबूतरखानावजा घरांतून असे लोक दिसले कीं त्यांना मदत करण्यावाबत विचार करण्याचीही गरज नव्हती. कारण ते कामाची सवय असणारे कष्टाळू लोक असून माझ्या मानाने पाहतां त्यांचा आयुष्यक्रम त्यांच्या जास्त कह्यांत होता. दुसरेपक्षीं जे दुर्दैवी होते ते मजप्रमाणेंच म्हणून त्यांना मदत करणें अशक्य होतें. या दुर्दैव्यांपैकीं बहुतेकांच्या दुर्दैवाचें कारण हेंच होतें की स्वत:च्या श्रमाने चटणीभाकरी कमावण्याचो त्यांच्यातली धमक, इच्छा व सवय हीं सर्व नष्ट झालीं होतीं. अर्थात् ते माझ्यासारखे होते आणि हेंच त्यांचें खरें दुर्दैव होय.

आजारी, विवस्त्र अथवा क्षुधाग्रस्त–म्हणजे ज्याला तावडतोब मदत करतां येणें शक्य आहे–असे दुर्दैवी क्षुधाग्रस्त अगाफ्याखेरीज मला कोणीही आढळले नाहीत व माझी तावडतोव खात्री झाली की मदतीस पात्र अशा योग्य व्यक्तींशीं माझी गांठ पडणें शक्य नाही. कारण की त्यांच्या व माझ्या जीवनक्रमांत सामान्य अशी एकही गोष्ट नव्हती. कारण यांपैकीं वहुतेक स्वत:च्या गरजवंतांच्या गरजा ते ज्यांच्यांत राहतात त्या मंडळी-कडूनच भागविल्या जातात, आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट होती ती ही की निव्वळ पैशाने त्यांचा घाणेरडा जीवनक्रम बदलणें अशक्य होतें. मला हें सर्व पटलें पण एकदा सुरू केलेलें काम बंद करण्याची खोटी लाज वाटून व स्वत:च्या परोपकाराबद्दल गैरसमज करून घेऊन मी कांही काळ तें तसेंच चालूं ठेवलें. पण शेवटीं तें आपोआपच बंद झालें. सरते-शेवटी ईव्हान फिडोटीचच्या मदतीने माझ्या मतें माझ्या मालकीचे नसलेले ३७ रुवल कसे वाटावे लागले हें मागील प्रकरणीं आलेंच आहे.

अर्थात् मला माझा कार्यक्रम चालू राखून परोपकाराचें ढोंग कायम राखतां आलें असतें. आश्वासन दिलेल्यांचा पिच्छा पुरवून मला पैसा गोळा करतां आला असता, किंबहुना अधिक पैसाही मी मिळवूं शकलों असतों. हा पैसा वाटून माझ्या परोपकारी कामगिरीबद्दल समाधान मानून घेणेंही शक्य होतें. पण मला असें दिसलें की एकीकडे आमच्या

श्रीमंत लोकांची आपल्या संपत्तींतून गरिबांकरितां कांही तोडून देण्याची इच्छा नाही व त्यांना शक्तीही नाही (कारण आम्हांला आमच्याच भरमसाट गरजा आहेत) आणि दुसरीकडे मी झानोव्ह हाउसमध्यें जसा इतस्ततः पैसा उधळला तसा न उधळतां लोकांचें खरें कल्याण करावयाचें ठरविल्यास तसे सत्पात्र लोक उपलब्ध नव्हते. म्हणून मी तो नादच सोडला व निराश होऊन आपल्या खेड्याचा रस्ता सुधारला.

तेथे माझ्या अनुभवाबद्दल एक लेख लिहून मला यश कां मिळालें नाही याचा खुलासा करावा असें वाटलें. खानेसुमारीसंबंधीं माझ्या लेखावरील टीकेला उत्तर देऊन व समाजाच्या हृदयहीनतेबद्दल कान उघडून शहरांतील दारिद्र्य कसें उत्पन्न होतें, त्यावर इलाज काय व माझ्या मतें प्रत्यक्ष योजना कोणती इ० सांगावें–असेंही वाटलें.

लेखाला सुरुवात केली व तो बराच उपयुक्त होईल असें मला वाटलें.

पण कसाही प्रयत्न केला–व त्यावेळीं मी चिडलों असल्यामुळें मजकूरही भरपूर होता– तरी तो प्रश्न मला स्पष्टपणें समजण्या बाबतच्या सर्व अडचणी दूर झाल्या नसल्यामुळें व मजमध्येंच असलेलें सर्व अनर्थाचें साधें मूलभूत कारण मला न पटल्यामुळें मला लेख साधेना व *आजपावेतों – मला तो लिहितां आला नाही.

नैतिक वातावरणांत कधीकधी प्रथमदर्शनीं क्षुल्लक वाटणाऱ्या आश्चर्यंकारक गोष्टी घडत असतात.

एखाद्याला जर मी भूगर्भशास्त्र, ज्योतिषशास्त्र, इतिहास, पदार्थविज्ञानशास्त्र अथवा गणित या विषयांतील त्याला माहीत नसलेली गोष्ट सांगितली तर ती तो मुकाटयाने ऐकून घेतो. "त्यांत काय नवीन आहे? सर्वांना हें माहीत आहे; मलाही पुष्कळ दिवसांपासून माहीत आहे," असें तो कधीही प्रत्युत्तर देत नाही. पण एखाद्याला अत्यंत उत्तम शब्दांत अत्युत्कृष्ट असें नैतिक तत्त्व सांगा– तें त्यापूर्वी इतक्या खुमारीने कधीही सांगितलें गेलें नसलें तरी–प्रत्येक सामान्य मनुष्य–व विशेषेंकरून नीती-

---

*१८८५–८६ चा हिंवाळा

अनीतीचा कधी विचार न केलेला व ज्यांवर नीतितत्त्वांचा उलट परिणाम होतो असा माणूससुद्धा—"अहो हें कोणास ठाऊक नाही? हें तर फार जुन्या काळापासून लोकांच्या माहितीचें आहे व लोक सांगत आले आहेत." असें म्हटल्याखेरीज राहणार नाही. खरोखरच त्याला वाटत असतें की तें तत्त्व जुनें अमून त्या स्वरूपांत केव्हाच लोकांसमोर मांडलें गेलें आहे. ज्यांना नीतितत्त्वें कांही किमतीचीं वाटतात त्यांनाच त्याची किंमत असते व महत्त्व कळतें. एखाद्या तत्त्वाची साधें स्पष्टीकरण करण्यास किती सायास पडले किंवा अंधुक कल्पनांच्या व अस्फुट इच्छांच्या जाळ्यांतून सिद्धान्तिक विधान-ज्या विधानाप्रमाणें वागणें भाग पडावें असें-तयार करण्यास काय सायास पडतात हेंही अशांनाच कळूं शकतें.

नीतितत्त्वें पोकळ व निःसत्व असून त्यांत नवें अगर लक्ष देण्यासारखें कांहीच असूं शकत नाही. अशा विचारसरणीची आम्हांला सवय झाली आहे. वस्तुस्थिति मात्र अशी आहे की माणसाच्या सर्व निरनिराळ्या चळवळींचा —उदा० राजनैतिक, शास्त्रीय, ललितकलात्मक अगर व्यापारी म्हणजे ज्यांचा नीतिमत्तेशीं कांहीही संबंध नाही असें आपणांस वाटतें अशांचा —एकच उद्देश आहे व तो म्हणजे दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणांत नीतितत्त्वांचा शोध करणें, तीं सुलभ भाषेंत सांगणें व त्यांचा प्रसार करणें हा होय.

एकदा मी मॉस्कोंत रस्त्याने चाललों असतां एका दुकानांतून एक माणूस बाहेर आला. समोरील फरसबंदीकडे टक लाऊन पाहून त्याने एक दगड निवडला व त्यावर बसून मोठ्या जोराने व उत्साहाने तो दगड घासूं लागला, असें मला त्या वेळीं वाटलें. फरसबंदीला हा काय बरें करीत आहे असें मी स्वतःशींच विचारलें. त्याच्याजवळ येतांच काय प्रकार होता हें मला कळलें. हा एक कसायाच्या दुकानांतला पोऱ्या असून सुरीला धार लावीत होता. दगड शोधतांना त्याला दगडाविषयीं मुळींच कल्पना नव्हती व धार लावतांना तर त्याचा त्याला जवळपास विसरच पडला होता. त्याला मांस कापतां यावें म्हणून सुरीला धार लावायची होती. (प्रथम) मला वाटलें कीं त्याला फरसबंदीलाच कांही

करावयाचें होतें. अगदी याप्रमाणेंच आपणास वाटतें की मनुष्यप्राणी व्यापार, लढाया, तह, शास्त्रें व कला यांत गुंतला आहे. पण खरें पाहतां मनुष्य प्राण्याला एकाच गोष्टीचें महत्त्व आहे व हीच तो नेहमी करीत असतो. मनुष्य ज्या नीतितत्त्वांनुसार चालतो त्यांचीं फोड करण्यांत मानव प्राणी सारखा गुंतला आहे. नीतितत्त्वें अस्तित्वांत आहेत. मानवप्राणी फक्त त्यांची फोड करून घेत असतो व ज्याला नीतितत्त्वांनुसार चालावयाचें नाही त्याला ही फोड महत्त्वशून्य व निरर्थक वाटते. पण ही फोड हें मनुष्याचें प्रमुखच नव्हे तर एकमात्र असें कार्य आहे. बोथट व तीक्ष्ण सुऱ्यांतला फरक जसा ताबडतोब लक्षांत येणें कठीण तशी ही फोडही ताबडतोब उमजणें कठीण. ज्याला सुरीनें कापावयाचेंच नाही त्याला (मात्र) दोन्ही सुऱ्या सारख्या. पण स्वत:चें सर्व आयुष्य सुरीच्या बोथट अथवा तीक्ष्णपणावर अवलंबून आहे हें ज्याला पटलें त्याला प्रत्येक धार देण्याची क्रिया महत्त्वाची आहे. हें धार देण्याचें काम अखंड चालविलें पाहिजे हेही तो जाणतो. कारण प्रसंगीं जिने कापतां येईल तीच खरी सुरी हें त्याला पटलेलें असतें.

लेख लिहिण्यास सुरुवात करतांना माझी अशी स्थिति झाली. ल्याषिनहाउस व खानेसुमारी या दोन प्रसंगांमुळे माझ्या मनांत उद्भवलेल्या सर्व प्रश्नांचा मला अर्थ कळला असें मला वाटलें. पण प्रत्यक्ष लिहावयास बसलों तेव्हा माझी सुरी बोथट ठरली व तिला धार लाविली पाहिजे असें लक्षांत आलें. आज तीन वर्षांनंतर माझ्या सुरीला पुरेशी धार लागली असून आता मला जें कापायचें तें कापतां येईल असें वाटूं लागलें आहे. नवें असें मी फारच कमी शिकलों. माझे विचार जुनेच आहेत पण पूर्वी ते मंद होते व लवकर छिन्नविच्छिन्न होत; शिवाय त्यांची एकतानता होत नसे. त्यांत कांही कस नव्हता व आज जसें त्यांच्यापासून एक सार्धें व स्पष्ट अनुमान निघूं शकतें तसें पूर्वी तें निघेना.

प्रकरण तेरावें

ज्या वेळीं मी दुर्दैव्यांना मदत करण्याच्या फोल प्रयत्नामागें लागलों होतों तेव्हा माझी स्थिति, स्वत:च चिखलांत रुतलेल्या एकाने दुसऱ्याला चिखलांतून बाहेर काढणारासारखी मला वाटत होती असें मला आठवतें. प्रत्येक नव्या प्रयत्नाने मी उभा असलेल्या जमिनीचा पोकळपणा अधिकच प्रत्ययास येई. मला वाटे कीं मी दलदलींत आहें. पण तशी जाणीव असली तरी मी कशावर उभा आहें हें बारकाईने तपासण्याची मला बुद्धी झाली नाही. मी सतत कसल्या तरी वाह्य उपचाराने माझ्या भोवतालची अनिष्ट परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न करीत होतों.

मला तेव्हा वाटलें कीं माझा आयुष्यक्रम वाईट असून तो तसा चालू ठेवणें इष्ट नाही. पण या वस्तुस्थितीवरून मी सुधारलें पाहिजे व चांगलें राहिलें पाहिजे हें साधें व स्पष्ट अनुमान न काढतां मला चांगलें राहायचें तर इतरांचा जीवनक्रम सुधारला पाहिजे हें विचित्र अनुमान काढून बसलों, व त्या नादास लागलों. मी शहरांत राहीं व शहरांतील इतरांचा आयुष्यक्रम सुधारावा अशी माझी इच्छा होती. पण लवकरच हें मला शक्य नाही अशी माझी खात्री पटली व मी शहरांतील राहणी व दारिद्र्य यांसंबंधीं विचार करूं लागलों.

"ही राहणी व हें दारिद्र्य म्हणजे काय ? गावांत राहून गावांतल्याच गरिबांना मला कां मदत करतां येऊं नये" ? असें मी स्वत:ला विचारलें, व मी स्वत:शींच उत्तर दिलें; "एक तर ते एकाच जागीं पुष्कळ असल्यामुळें मला कांही करतां येणें शक्य नाही व दुसरें ते खेडेगावांतील गरिबांपेक्षा अगदीच निराळे आहेत." हे येथे इतके जास्त कां व खेड्यांतील दरिद्री व यांच्यांत फरक कोणता ? या दोन्ही प्रश्नांचें उत्तर एकच. येथे जास्त दरिद्री असण्याचें कारण हें की खेड्यांतून ज्यांना कांही मिळत नाही ते सर्व गावांतील श्रीमंतांभोवतीं गोळा होतात व आश्चर्य हें की खेड्यांतून हे लोक शहरांत पोट भरेल या आशेने आलेले असतात. (जरी या दरिद्र्यांपैकी कोणी शहरांतच जन्मलेले असले तरी त्यांचा बाप,

आजे कोणीतरी प्रथम शहरांत पोट भरण्याकरितां म्हणूनच आलेले असत.)

हे लोक 'पोट भरावयाच्या आशेने येतात' असें जें म्हटलें त्याविषयीं अधिक विचार करून पाहतां तें म्हणणें थट्टेवजा वाटतें. जंगल, कुरण, धान्य, ढोरें इ. जगांतील अखिल संपत्ति असलेल्या प्रदेशांतून जेथे झाडें, गवत किंबहुना शेतीलायक जमीनही नाही अशा निव्वळ गोटे-धुरळ्याचें साम्राज्य असलेल्या शहरांत हे लोक पोट भरायला येतात याचा अर्थ काय ? आपल्याला याचा अर्थ कळतो अशा ऐटीने दाते व याचक दोघेही 'पोट भरण्यास' हे जे शब्द वापरतात त्यांचा अर्थ काय ?

मला आठवतें की मॉस्कोंतील ज्या हजारों बऱ्या वाईट परिस्थितींतल्या लोकांना "तुम्ही येथे कां आलांत ?" हा प्रश्न मी विचारला, त्या सर्वांनी निरपवादतः एकच उत्तर दिलें. ते म्हणाले, "मॉस्कोंत कांहीच पेरत पिकत नसलें तरी पैसा मात्र येथे मुबलक आहे व खेड्यांतून जो पैसा धान्य, झोपडी, घोडे, इ० आवश्यक जिन्नसा विकत घेण्यास हवा असतो तो येथे मिळूं शकतो." पण खरें म्हणाल तर खेडें हेंच सर्व संपत्तीचें उगमस्थान आहे व तेथेच खरी संपत्ति, उदाहरणार्थ, धान्य, लाकूड, घोडीं इ० उपलब्ध होऊं शकतें. खेड्यांत उपलब्ध असणाऱ्या जिनसा मिळविण्याकरितां शहरांत जा कशाला ? व खेडेवासीयांना जें खेड्यांत हवें तें—कणीक, ओट, घोडीं, गुरें—शहरांत न्या कशाला ?

शहरांतील शेतकरी वर्गाशीं मी याबद्दल अनेकवार चर्चा केली व या संवादांतून व माझ्या पाहणीवरून मी निष्कर्ष काढला की खेड्यांतील लोकांनी शहरांत गर्दी करणें हें अंशतः अपरिहार्य आहे, कारण ते इतर रीतीने पोट भरूं शकत नाहीत; व अंशतः स्वेच्छाप्रेरित आहे, कारण गावांतील भलविणाऱ्या गोष्टींकडे खेड्यांतील लोक आकर्षिले जातात. अनेक जबाबदाऱ्यांच्या पार पाडण्याकरितां शेतकऱ्याला स्वतःलाच ज्याची गरज आहे असें धान्य व अशीं गुरें विकणें भाग पडतें ही गोष्ट खरी आहे. म्हणून त्याला आवडो अथवा नावडो, पण पुनः धान्य घेण्यास त्याला शहराकडे धाव घ्यावी लागते. पण याबरोबर हेंही खरें की शहरांतून पैसा सुलभ आहे म्हणून व तेथे चैनबाजी करावयास मिळते म्हणून खेडवळ शहराकडे ओढला जातो. पोट भरण्यासाठी शहरांत जावयाचें ही निव्वळ

सबब; बिनकष्टाचें काम करून चांगलें अन्न, उत्तम पोषाख, त्रिकाळ चहा किंवहुना दारू व वेश्यागमन यांची चंगळ उडवावी यासाठी तो शहरांत जातो. खेडवळांनी गावांत गर्दी करण्याच्या या दोन्ही प्रकारांचें कारण एकच. पैदास करणारांच्या हातून पैदास न करणारांच्या हातीं संपत्ति जाणें व ती शहरांत केंद्रीभूत होणें हें तें कारण. खरें पाहतां पावसाळ्यांत सर्व संपत्ति खेड्यांतच केंद्रीभूत असते. पण ताबडतोब कर, सैन्यभरती, जमीनसारा, त्याचप्रमाणें व्होड्का, लग्नकार्यें, फेरीवाले, व्यापारी, उत्सव इ० मन वहकविणाऱ्या गोष्टी पुढें येतात आणि खेडयांतील मेंढ्या, वासरें, गाई, घोडीं, डुकरें, कोंबड्या, अंडीं, लोणी, ताग, लोकर, राय, ओट, गहू, वाटाणा, तागाचें बी, जवस, इ० संपत्ति दुसऱ्यांच्या हातीं लागून गांवांत येते व गावांतून शहरांत जाते. खेड्यांतील शेतकरी इतरांच्या मागण्या व तऱ्हतऱ्हेचीं आमिषें यांत स्वतःचें सर्वस्व देऊन बसल्यामुळें गरजवंत होतो व संपत्ति जेथे गेली तेथे तिच्यामागें जाऊन खेड्यांत भासणाऱ्या जीविताच्या प्राथमिक गरजा ज्याच्यायोगें मिळतील तो पैसा थोडासा मिळविण्याचा प्रयत्न करतो व कांहीसा शहराच्या नादीं लागून शहरांतील चैनबाजींत गुंततो.

रशियांत सर्वत्र, व मला वाटतें रशियांतच नव्हे तर जगांत सर्वत्र, हाच प्रकार चालू आहे. खेड्यांतील संपत्ति व्यापारी, जमीनदार, सरकारी कामगार, कारखानदार इत्यादिकांच्या हातीं जाते व ज्याला ती मिळते त्याला तिचा उपभोग घ्यावासा वाटतो. हा उपभोग शहरांतूनच शक्य आहे. खेड्यांतून परस्परांमधील अंतरामुळें श्रीमंताच्या सर्व गरजा भागविणें कठीण होतें. खेड्यांतून कारखाने, दुकानें, बँका, मोठीं हॉटेलें, थिएटरें व नानातऱ्हेच्या सामाजिक करमणुकी नसतात. शिवाय श्रीमंतांचें जें खरें व मुख्य सुख, अर्थात् आत्मप्रौढि व दुसऱ्यांना चकित करून त्यांवर ताण करण्याची इच्छा, इला खेड्यांतून वाव नसतो. कारण तेथे पुरेसे लोक नसतात. खेड्यांतून फॅशनचे मर्मज्ञच नसतात तेथे चकित कोणाला करणार? तुमच्या घरांत पाहिजे तसें सामान, चित्रें, पुतळे असेनात, खेडवळाला त्याचें कांही नसतें. कसलींही तेलें, अत्तरें वापरा अथवा वाटेल ती गाडी वापरा, त्याचीं

स्तुतिस्तोत्रें गाणारा अगर त्याचा हेवा करणारा तेथे कोणी नसतो. शिवाय ज्याच्यांतील सद्सद्विवेक बुद्धि नष्ट झाली नाही त्याला खेड्यांतील चैनबाजी असुखावह व धोक्याचीही वाटण्याचा संभव आहे. खेड्यांतील कांही मुलांना दूध मिळत नसतां आपण पयःस्नान करणें अथवा तें कुत्र्यांना पाजणें एखाद्याला कसेसेंच वाटेल. आसपास खत पसरलेल्या झोंपडींतून राहणारे व ज्यांच्याजवळ सर्पण सुद्धा नाही अशा लोकांमध्यें मोठ्या इमारतीतून राहणें श्रेयस्कर नव्हे. शिवाय खेड्यांतील लोकांनी (मनांत विकल्प आल्यामुळें) या गोष्टींचा नाश करण्याचें ठरविलें तर तेथे संरक्षण करणाराही कोणी नसतो.

यामुळें श्रीमंत लोक समानशीलांच्या शेजारीं शहरांतून एकत्र राहतात. शहरांतील चैनबाजीला पोलिसचें संरक्षणही असतें. या श्रीमंत वर्गाचा मुख्य गाभा सरकारी कामगार होत. यांच्या भोवतीं सर्व व्यापारी वगैरे जमतात व यांभोवतीं इतर श्रीमंत गोळा होतात. शहरांत श्रीमंताने इच्छा दर्शविण्याचा उशीर की हवा तो जिन्नस पुरविला जातो. याच ठिकाणीं चैनबाजींत ज्यांशीं चुरस करतां येईल, ज्यांना दिपवितां येईल व ज्यांच्यांवर ताण करतां येईल अशा व्यक्ति असतात, म्हणून श्रीमंतांना अशा ठिकाणीं राहणें विशेष सुखावह होतें. आणि मुख्य म्हटलें म्हणजे खेड्यांत वैभवाचें प्रदर्शन व चैनबाजी ही कशीशीच वाटते; त्या-ऐवजीं शहरांत भोवतालचे इतर चैन करीत असतां चैन न करण्यांतच कसेंसें वाटूं लागतें. खेड्यांत जें अयोग्य दिसेल व जें करतांना भीति वाटेल तेंच शहरांत अगदी योग्य वाटूं लागतें. श्रीमंत शहरांतून गोळा होतात व अधिकाऱ्यांच्या संरक्षणाखाली खेड्यांतून येणाऱ्या सर्व गोष्टींची संघपणाने मागणी करतात. अशा प्रकारें श्रीमंतांचा जेथे सतत सण चाल असतो व जेथे स्वतःपासून नेलेला माल श्रीमंत वापरीत असतात तेथे त्यांच्या चैनींतून उरलेले तुकडेताकडे मिळतील तर पाहावें या आशेने खेडवळ कांहीसा अनिच्छेने शहराकडे येतो व कांहीसा, शहरांतील श्रीमंतांची चैन व सुखाचें आयुष्य पाहून ज्या या प्रकाराला सर्वांची मान्यता आहे त्याला अनुसरून आपणही जमल्यास थोडें काम करून दुसऱ्यांच्या श्रमांचें फल अधिक प्रमाणांत उपभोगावें, असें वाटूं लागल्यामुळेंही तो तिकडे वळतो.

म्हणून शहरांत तो श्रीमंतांचा शोध करतो व त्यांच्या वाटेल त्या अटी पत्करूनही हरप्रयत्नाने स्वत: हव्या असणाऱ्या गोष्टी त्यांच्यापासून परत मिळविण्याचा तो प्रयत्न करतो. त्यांच्या सर्व लहरी पुऱ्या करण्यांत तो मदत करतो. तो किंवा ती त्यांची स्नानगृहांतून, हॉटेलांतून, गाडीवान अगर वेश्या म्हणून सेवा करतात आणि त्यांच्याकरितां गाड्या, खेळणीं, उत्तम पोषाख, हीं तयार करतात. श्रीमंतांच्या राहणीपासून तींही स्वत:च्या राहणीचे धडे घेत असतात व काम न करतां इतर अनेक तऱ्हांनी इतरांनी गडगंज मिळविलेल्या संपत्तींतून पेसे उकळण्याचा प्रयत्न करतात व अशा प्रकारें भ्रष्ट होऊन शेवटीं नाश पावतात. मदत करण्याची इच्छा असूनही ज्या दरिद्री लोकांना मी हातभार लावूं शकलों नाही ते शहरांतील दरिद्री अशा प्रकारें शहरांतील संपत्तीमुळेच भ्रष्ट झालेले होते.

हे खेडवळ जेव्हा शहरांत पैसा अगर उपजीविका मिळविण्यास येतात तेव्हा त्याना लोक सहज रीत्या शेंकडो रूबल कमावतांना व मूर्खपणाने हजारो रूबल उधळतांना दिसतात व त्यांना मात्र कोपेक कोपेक करतांना कल्पनातीत श्रम करावे लागतात. याचा जर विचार केला तर हें दृश्य पाहिल्यावरही त्यांच्यापैकी थोडे तरी लोक काम करावयास शिल्लक उरतात व सर्वच लोक व्यापार, जनावरांची पैदास, भिक्षा, वेश्यावृति, ठकबाजी किंबहुना चोरी अशा सोप्या मार्गांचा अवलंब करीत नाहीत यांचेंच आश्चर्य वाटावयास हवें.

आम्ही जे सतत या चैनबाजीच्या धामधुमींत सारखा भाग घेत असतों त्यांना कदाचित सवयीमुळें एखाद्याने पांच मोठाल्या खोल्या अडविणें, वीस कुटुंबांना पुरेल इतकें सर्पण जाळून त्या खोल्यांत ऊब राखणें, अर्धा मैल जाण्यास सुद्धा दोन घोडे व दोन हुजरे वापरणें, जमिनीवर रुजामे पसरणें व—जाऊं द्या एकाद्या नाचाच्या पार्टीवर पांच दहा हजार रूबल खर्च करण्याचा मी उल्लेख करीत नाही— " ख्रिस्तमस ट्री " करितां २५ रूबल खर्चणें, हें सर्व स्वाभाविक वाटण्याचा संभव आहे. पण ज्याला आपल्या कुटुंबाच्या भाकरीकरितां दहा रूबल पाहिजेत अगर एखादा सात रुबलचा कर भरण्याकरितां ज्याची शेवटची मेंढी अधिकारी

घेऊन जात आहेत अगर ज्याला सक्त मेहनत करूनही पैसा मिळत नाही अशाला वरील गोष्टी स्वाभाविक वाटणें शक्य नाही. आमचा असा समज असतो की गरिबांना हें सर्व स्वाभाविकच वाटत असतें. कांही तर इतका साळसूदपणा दाखवितात की आमच्या चैनबाजीमुळें गोरगरिबांचें पोट भरत असल्यामुळें ते आम्हांला दुवा देतात असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल जाते. पण गरीब झाला म्हणजे त्याला अक्कल सोडून जाते असें नाही. जसा आम्ही विचार करतों तसा तेही करतात. एखाद्याने दहावीस हजार रूबल्स गमावले किंवा उघळले म्हणजे आम्ही म्हणतों, "काय मूर्ख आणि रद्दी माणूस आहे बोआ ! मी त्याच्या जागीं असतों तर पुष्कळ दिवसांपासून मला अवश्य असलेलें अमुक एक घर बांधूं शकलों असतों अथवा शेताची सुधारणा केली असती." पैशाची उधळपट्टी पाहून गरीबही अगदी अशाच तऱ्हेने विचार करतो व तो विशेषच अगत्यपूर्वक करतो; कारण त्याला जो पैसा हवा असतो तो एखादी लहर भागविण्याकरितां नसून त्याच्या निकडीच्या गरजा भागविण्याकरितां हवा असतो. गरिबांच्या हें लक्षांत येत नाही व ते शांतपणें सर्व पाहत असतात, असें मानण्यांत आपली मोठी चूक होते.

एखाद्याने सतत घृतकुल्या मधुकुल्या उडवाव्या व दुसऱ्याने सतत उपास करावे आणि रावावें हें योग्य आहे, असें त्यांनी कधीही कबूल केलें नाही व करणें शक्य नाही. प्रथम त्यांना या प्रकाराचें आश्चर्य वाटतें व राग येतो; नंतर त्यांना त्याचा सराव पडतो व ते हा प्रकार न्याय्य समजूं लागतात व या प्रकारांत कोणालाच कांही गैर दिसत नाही असें त्यांना कळून येतांच ते स्वत: काम टाळून या सतत चैनीच्या पर्वणींत शिरण्याचा प्रयत्न करतात. कांहींना यश मिळून ते अशा प्रकारचे बनतात. इतर हलके हलके याच मार्गावर आक्रमण करीत असतात व कांहींना अपयश आल्यामुळें व कामाची संवय मोडल्यामुळें ते शेवटीं वेश्यागृहें व अन्नछत्रें यांचा आश्रय करितात.

दोन वर्षांपूर्वी आम्ही खेड्यांतील एक पोऱ्या आमचेकडे नोकरीस ठेवला. त्याचें दुसऱ्याशीं पटेना म्हणून त्याला नोकरीवरून काढला. त्याला

एका व्यापाऱ्याकडे नोकरी मिळाली व आता तो शानदार बूट घालून जाकिटावर घड्याळाची साखळी आडवी लावून जात असतो. त्याचे जागीं आम्ही एक विवाहित शेतकरी ठेवला. त्याला दारूची सवय लागली व त्याने कांही पैशाचें नुकसान केलें. आम्ही तिसऱ्याला नोकरीस ठेवला. तो नशाबाज होता. त्याने सर्व कपडे गहाण टाकून दारू पिऊन टाकली. शेवटीं कैक दिवस तो अन्नछत्राच्या वाजूला भटकत असे. एक म्हातारा स्वयंपाकी दारूमुळें आजारी पडला. एक हुजऱ्या फार दारू पीत असे. तो खेडेगावीं गेल्यावर त्याने पांच वर्षें दारू सोडली. पण पुढे गेल्या वर्षीं मॉस्कोला तो बायकोशिवाय एकटा राहूं लागल्यापासून–ही बायको त्याला आवरीत असे–त्याला पुनः दारूचा नाद लागला व त्याने आपला सर्वनाश करून घेतला. एक खेड्यांतील पोऱ्या माझ्या भावाकडे नोकरीला आहे. त्याचा म्हातारा आंधळा आजा एकदा तो खेड्यावर जात असतां मजकडे येऊन म्हणाला, "महाराज! माझ्या नातवाला शरम वाटत कर देण्याकरितां निदान दहा रुपये तो मला धाडील असें करा, नाही तर मला माझी गाय विकावी लागेल." म्हातारा पुढे म्हणाला, "तो म्हणतो-नोकर माणसास नेहमी चांगला पोषाख करावयास हवा. त्याला बूट तर झाले. ते पुरे झाले; नाही तर पाहिजे तरी काय त्याला? त्याला आता घड्याळ पाहिजे की काय?" म्हाताऱ्याला घड्याळ विकत घेण्याइतकें खुळचटपणाचें दुसरें उदाहरण सुचलें नाही. म्हाताऱ्याला कैक दिवस तेलाशिवाय अन्न खावें लागलें व निव्वळ एक रूबल व वीस कोपेक न देतां आल्यामुळें त्याने तोडलेलें सर्पण गमावण्याचा त्याच्येवर प्रसंग होता, ही त्याची परिस्थिति लक्षांत घेतां घड्याळ विकत घेण्याची कल्पना खरोखरच मूर्खपणाची होती. म्हाताऱ्याने थट्टेवारी उल्लेख केला पण शेवटीं हेंच खरें ठरलें. तो पोऱ्या मजकडे एक चांगला ओव्हरकोट व आठ रूबलचा जोडा घालून आला. थोड्याच दिवसांपूर्वी त्याने माझ्या भावापासून दहा रूबल अंगावर घेऊन जोडा विकत घेतला होता; व माझी मुलें त्याला लहानपणापासून ओळखतात तीं असेंही म्हणत होतीं की त्याला घड्याळ घेणें अवश्य वाटत आहे. पोऱ्या चांगला सुस्वभावी आहे, पण घड्याळ घेत नाही तोंपावेतों त्याला लोक हसतील असा त्याचा

दृढ समज आहे; म्हणून घडयाळ पाहिजे. या वर्षीं आमच्या घरांतल्या एका अठरा वर्षांच्या मोलकरणीचें गाडीवानाशीं सूत जमलें. तिला आम्ही नोकरीवरून काढलें. मी आमच्या येथील म्हाताऱ्या दाईला यासंबंधीं बोललों. तिने मी जिला विसरून गेलों होतों अशा एका गरीब मुलीची आठवण दिली. आम्ही दहा वर्षांपूर्वी मॉस्कोंत असतांना तिचें सुद्धा असेंच एका चपराशाशीं सूत जमलें होतें. तिलाही अशीच काढून दिली होती. ती शेवटीं वेश्यागृहांत शिरली व वीस वर्षांची होण्यापूर्वीच उपदंशाच्या विकाराने मरण पावली. जे कारखाने आमच्या चैनीच्या वस्तु पुरवितात त्यांची गोष्ट तर सोडूनच द्या, परंतु ज्या लोकाना पुढे मदत करावी असें आम्ही इच्छितों त्याच लोकांत आम्ही आमच्या चैनबाजी-मुळें प्रत्यक्ष रोग कसा फैलावतों याचें सभोंवार दृष्टिक्षेप केल्यास फार भयंकर दृश्य दिसेल.

सारांश शहरांतील ज्या दैन्यावस्थेचें निराकरण करण्याच्या कामीं मी हातभार लावूं शकलों नाही त्या दैन्यावस्थेचा विचार करतां त्याचें पहिलें कारण असें दिसून आलें की खेडेकऱ्यांना जें पाहिजे तें गोळा करून मी गावांत नेतों, व दुसरें कारण असें की जे लोक कोणत्या ना कोणत्या तरी मार्गाने मजजवळून यांपैकी कांही परत मिळविण्याचा प्रयत्न करण्या-करितां शहरांत येत त्यांना मी याच खेड्यांमधून गोळा केलेल्या संपत्तीच्या जोरावर शहरामध्यें केलेल्या बेसुमार चैनबाजीनें बिघडवून टाकीत असतों.

प्रकरण चवदावें

अगदी उलट दिशेने विचार करतां हेंच अनुमान निघालें. शहरांतील दरिद्र्यांशीं त्या वेळीं माझा जो संबंध आला त्यावरून हें स्पष्ट झालें की, ते लोक माझ्याशींच खोटेपणाने वागत, हें मी त्यांना मदत करूं न शकण्याचें एक कारण होतें. ते मला माणूस या नात्याने ओळखत नसून 'सुटकेचें (निर्जीव) साधन' या दृष्टीने ते मजकडे पाहत. प्रथम मला वाटे की माझेंच कांही तरी चुकत असल्यामुळें त्यांच्याशीं मला समरस होतां येत नाही. पण त्यांच्यांत प्रांजळपणाच नसल्यामुळें त्यांना मदत करणें अशक्य झालें. एखादा आपली खरी हकीकत जर सांगत नसेल तर त्याला कशी मदत करणार ? प्रथम मी त्यांना दोष देईं (दुसऱ्यांना दोष देणें फार सोपें आहे) पण एका चुणुकदार व्यक्तीच्या—सूटेव्ह,* हा त्यावेळीं मजजवळच राहत होता—एका शब्दाने सर्व खुलासा झाला व मला अपयश आलें कां व माझ्या अंगीकृत कार्यांत माझें फसलें–चुकलें–कोठे, याचें कारण मला समजलें. त्या वेळीं सुद्धा मला सूटेव्हचें म्हणणें अर्थपूर्ण वाटलें पण त्याचें खरें व पूर्ण मर्म मात्र मला नंतर कळलें. मला हें मर्म उमजलें तेव्हा मी स्वत:च्या फसवणुकीच्या शिखरावर होतों. मी माझ्या बहिणीकडे बसलों होतों. सूटेव्हही तेथे होता. माझ्या बहिणीने माझें नवें काम कसें चाललें आहे अशी चौकशी केली व मी मोठ्या आवेशाने व उत्साहाने—जेव्हा आपण काय करीत आहों याची आपणांस नवकी कल्पना नसते तेव्हाच असा आवेश व उत्साह संभवतो—मी काय करीत होतों व त्यापासून काय निष्पन्न होण्याचा संभव आहे हें पाल्हाळिकपणाने समजावून सांगत होतों. पोरकीं मुलें व असहाय म्हातारे यांची आम्ही कशी व्यवस्था करणार, ज्यांना शहरांत राहणें शक्य नव्हतें अशा खेडवळांना त्यांच्या गावीं परत कसें धाडणार, वाईट वर्तनाचे असतील त्यांना कसें सुधारणार व हें सर्व साधल्यास सबंध मॉस्कोंत

*याचा पूर्वी उल्लेख येऊन गेला आहे. या शेतकऱ्याबद्दल टालस्टॉयला फार आदर वाटे.

एकही माणूस मदत मिळाल्याशिवाय कसा राहणार नाही याचें मी रस-भरित वर्णन करीत होतों. माझ्या वहिणीनेही आपली आस्था दर्शविली व आम्ही पुढे चर्चा करूं लागलों. हें बोलणें चालू असतां मी सूटेव्हकडे पाहिलें. तो धार्मिक व सदय अंतःकरणाचा माणूस होता व त्यामुळें तो माझ्या बोलण्याला मान डोलवील अशी माझी कल्पना होती म्हणून मी त्याला समजावें असें बोलत होतों. मी बहिणीलाच उद्देशून बोलत असलों तरी माझा रोख सूटेव्हकडे होता. रशियांतील शेतकरी बाहेर घालण्याचा कोट घरांत असतांनाही राहूं देतात त्याप्रमाणें त्याने आपला मेंढीच्या कातडीचा काळा कोट अंगावरच राहूं दिला होता. त्याचें लक्ष आमच्या बोलण्याकडे असण्याऐवजी तो आपल्याच विचारांत गुंग दिसला. त्याचे लहानगे डोळे त्याने मिटल्यासारखे केले होते. जणूं काय तो अंतर्मुख दृष्टि करून बसला असावा. शेवटीं माझें म्हणणें आटोप-ल्यावर मी त्याला त्याचें मत विचारलें.

"हें सर्व व्यर्थ आहे" असें त्याने उत्तर दिलें.

"कां?" मी प्रश्न केला.

"आपण सूरू करणार असलेली संस्था निरुपयोगी ठरेल; तिच्यां-तून कांही एक निष्पन्न होणार नाही." असें तो पुनः म्हणाला.

"पण कां नाही? हजारों किंवा निदान शेकडों कमनशिब्यांना मदत करणें कां व्यर्थ ठरावें? ख्रिस्ती धर्माच्या शिकवणीनुसार नग्न लोकांना वस्त्र देणें व क्षुधाग्रस्तांना अन्न देणें चूक आहे काय?" मी पुनः प्रश्न केला.

"बरें! बरें! मला हें समजतें. पण तुम्ही करीत आहां तें चूक आहे. ही काय मदत करण्याची तऱ्हा? तुम्ही फिरावयास जातां. रत्स्यांत एक माणूस तुम्हांला वीस कोपेक मागतो व तुम्ही ते देतां. अशा देण्याला धर्म असें कसें म्हणतां येईल? त्याला आध्यात्मिक दान द्या; त्याला शिकवा; पण हें करण्याऐवजीं तुम्ही (पैसे देऊन) त्याची पीडा टाळतां, असेंच नव्हे काय?"

" नाही. आमचा सध्या हा विषय नाही. लोकांच्या गरजेचा शोध करून शारीरिक झीज सोसूनही त्यांना पैसा पुरवणें व बेकारांना काम शोधून देणें हा आमचा (सध्या) उद्देश आहे. " असें मी म्हटलें.

"अशानें त्यांचें कांहीही होणार नाही. " असें तो म्हणाला.

" मग तुझ्या म्हणण्याचा अर्थ तरी काय ? त्यांना भुकेने आणि थंडीने मरूं द्यावें, असें का तुझें म्हणणें आहे ?

" कां त्यांना मरण्याचें काय कारण ? त्यांची संख्या एवढी मोठी आहे काय ? "

" त्यांची संख्या? " मी उद्गारलों. त्यांच्या संख्येची त्याला कल्पना नसल्यामुळेंच तो इतक्या बेफिकीरपणें बोलत असावा असें मला वाटलें. "एकटचा मॉस्कोंत भूक व थंडीने जर्जर झालेले २०००० वर लोक आहेत हें तुला माहीत आहे काय? आणि पीटर्सबर्ग (सध्याचें लेनिनग्राड) व इतर गांवांत.. .."

तो हसला आणि म्हणाला, " वीस हजार ? बरें रशियांत घरें किती असतील ? सुमारें दहालाख नसतील काय ? "

"असतील, त्यांचें काय ?" मी विचारलें.

" त्याचें काय ? त्यांतच तर मी म्हणतों यांतलें मर्म आहे. " असें तो म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर तेज दिसूं लागलें व डोळे चमकूं लागले. " मग त्यांची (दुर्दैव्यांची) आपण आपसांत वांटणी करून घेऊं. मी श्रीमंत नाही तरी मी दोघांची जबाबदारी एकदम घेतों. तुमचेकडे स्वयंपाक घरांत काम करणारा तो पोऱ्या आहे ना ? त्याला मी विचारलें पण तो मजकडे येण्यास तयार नाही. अहो, आहे याच्या दसपट जरी दुर्दैव्यांची संख्या असली तरी सर्वांना आम्हांला आश्रय देतां येईल. तुम्ही एक सांभाळा मी एक सांभाळतों. आम्ही एकत्र कामावर जाऊं. तो मला काम करतांना पाहील व कसें राहावें याचें त्याला शिक्षण मिळेल. आपण एकत्र जेऊं व त्याच्या कानावर कधी माझा तर कधी तुमचा शब्द पडेल. याला धर्म म्हणतां येईल. पण तुमची योजना अगदी निरर्थक आहे."

त्याच्या या साध्या बोलण्याचा मजवर फार परिणाम झाला. त्याच्या म्हणण्यांतील सत्य मला नाकारणें अशक्य होतें. पण त्याचें म्हणणें खरें असलें तरी मी सुरू केलेली योजनाही कदाचित उपयुक्त ठरेल असें त्या वेळीं मला वाटलें. पण जसजसा मी जास्त काम करूं लागलों, जसजसा गरीब लोकांशीं माझा अधिक संबंध येऊं लागला तसतशी त्याच्या बोलण्याची मला आठवण येऊन त्याचें महत्त्व अधिकाधिक पटूं लागलें. मी नेहमी लोकरीचा कोट घालून वाहनांत मिरवतों; ज्याला जोडासुद्धा नाही असा एखादा मनुष्य माझें दोनहजार रूबल किमतीचें घर पाहतो, किंवा निव्वळ लहर म्हणून खंत न वाटतां मी ५ रूबल देतों हें तो पाहतो; आणि त्याला हें माहीत असतें की मी याप्रमाणें रूबल देऊं शकतों याचें कारण माझ्या गरजेपेक्षाही पुष्कळ अधिक असे लोकांजवळून लुबाडलेले रूबल मजजवळ साठलेले आहेत. मला पाहतांच 'जें माझें असावयास पाहिजे तें लुबाडणारा' यापेक्षा मजबद्दल इतर कोणती भावना त्याच्या मनांत उद्भवणार? व त्याच्यापासून व इतरांपासून जें मी लुबाडलें त्यांपैकी शक्य तितकें परत मिळवावें यापेक्षा दुसरी त्याची इच्छा तरी काय असणार? मात्र इकडे पाहावें तर मी म्हणतों की मला त्याच्याशीं समरस व्हावयाचें असून त्याचेंच मन मोकळें नाही! पण माझ्या अंगावर उवा चढूं नयेत अगर संसर्गजन्य रोग जडूं नये म्हणून मी त्याच्या बिछान्यावर बसावयास भितों व माझ्या खोलींतही त्याला येऊं देण्याची मला धास्ती वाटते. भुकेने त्रस्त असा जर तो मजकडे आला तर त्याला, नशीब बलवत्तर असल्यास दिवाणखान्यांत, नाही तर संभवतः प्रवेशद्वारांतच वाट पाहावी लागते व असा प्रकार असतां त्याच्याशीं मला समरस होतां न आलें तर मी तो त्याचाच दोष समजतों व तो कुढचा मनावा आहे असें मानतों!

एखाद्या अत्यंत निष्ठुर माणसाला जाडीभरडी भाकरी खाणाऱ्या अर्धपोटी लोकांच्या मध्यभागीं बसून पंचपक्वान्नें जेवण्याचा प्रयत्न करूं द्या. आसपास क्षुधाग्रस्त लोक जीभ चाटीत [illegible] काणालाही असें जेवण करवणार नाही. याचाच अर्थ असा की क्षुधाग्रस्त लोक

अस्तित्वांत असतां जर चमचमीत जेवण करावयाचें असेल तर प्रथम ज्या ठिकाणीं या कंगालांची नजर पडणार नाही अशाच ठिकाणीं जेवलें पाहिजे व आम्ही हेंच करतों.

आमच्या आयुष्यक्रमाचा विचार करतां माझी खात्री झाली की आम्हांला दरिद्र्यांशीं समरस होतां येत नाही हा योगायोग नसून आम्हीच आमचा जीवनक्रम असा ठरविला आहे की ज्याच्या योगाने त्यांच्याशीं समरस होणें मुळी कठीणच व्हावें.

यापेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमच्या–म्हणजे श्रीमंतांच्या—जीवनक्रमाचा तिऱ्हाईतपणें विचार करतां असें दिसतें की आमचें सौख्य आम्हांला गरिबांपासून वेगळें करणाऱ्या गोष्टींपासूनच मिळतें किंवा निदानपक्षीं तें अशा गोष्टींशीं पक्केपणीं निगडित तरी आहेच श्रीमंतीच्या जीवनक्रमांतील प्रत्येक गोष्ट–जेवण, कपडे, घरें यांपासून तों तहत शिक्षणापावेतों सर्व–गरिबांपासून वेगळें राहण्याच्या कल्पनेवर रचलेली आहे आणि अशा प्रकारें आमच्यांत व गरिबांत एक अनुल्लंघ्य भित उभारण्याच्या खटपटींतच आम्हां श्रीमंतांची नऊ दशांश तरी संपत्ति खर्च होत आहे. श्रीमंत झाल्याबरोबर कोणीही प्रथम एका ताटांतून जेवण्याचें बंद करतो.* तो चिनी मातीचीं भांडीं वापरावयास लागून स्वतःला स्वयंपाकघर व नोकर चाकर यांपासून वेगळें करून घेतो.

आपलें सुग्रास अन्न पाहून वाढपिणीच्या तोंडाला पाणी सुटूं नये म्हणूनच तिला तो चांगलें जेवण देतो, व आपण एकट्याने भोजन करतो. पण एकट्याने जेवण करणें कंटाळवाणें होतें म्हणून तो जेवणाचे पदार्थ चमचमीत करण्याचा प्रयत्न करतो व थाटमाट व झकपक करण्याच्या भरीस पडतो आणि सरतेशेवटीं त्याचें जेवण व जेवणाची तऱ्हा ही त्याच्या अभिमानाचा विषय होऊन बसतात. हेंच पुढे इतरांपासून वेगळें होण्यास त्याला कारण होतें. एखाद्या श्रीमंताला एखाद्या गरिबाशी जेवतांना गप्पा बोलावण्याची कल्पना असह्य होते. स्त्रियांना जरा [illegible] झुकून मुजरा कसा कराव्या, वसावे कसें ख[illegible]

* रशियांतील शेतकरी कुटुंबांतून [illegible] चमच्याने जेवण्याचा प्रचार [illegible]

इत्यादि माहिती जेवायला येणाऱ्यास असावी लागते व ही फक्त श्रीमंतांनाच असते. कपड्यांचेंही तसेंच. एखाद्या श्रीमंताने जर निव्वळ थंडीपासून बचाव होण्याकरितां साधा पोषाख—उ० एक ओव्हरकोट, एक कातड्याचें जाकिट, टोपी, जोडा, शेतकऱ्याचा कोट, तुमान व सदरा—केला तर त्याला फारच थोडें लागेल व त्याच्या जवळ दोन कातडी जाकिटें असल्यास ज्याच्याजवळ एकही नाही अशाला दुसरें जाकिट देत नाही असें म्हणणें जड जाईल. पण हा श्रीमंत हरएक प्रसंगाकरितां ठराविक व निरनिराळे पोषाक करण्यापासूनच सुरुवात करतो व त्यांचे पोषाख गरिबाला निरुपयोगी असतात.* गरिबीच्या स्थितीशीं काडीचाही संबंध नाही अशा अगदी निराळ्या परिस्थितींतच त्याचे चित्रविचित्र पोषाख वापरतां येणें शक्य आहे. अशा प्रकारें आमचा पोषाखही आम्हांला गरिबांपासून फटकून राहण्यास मदतच करतो. फॅशनचें खूळ सुरू होतें व ही फॅशन आम्हांला गरिबांपासून वेगळी करते. हाच प्रकार अधिक स्पष्टपणें आमच्या घरांचा आहे. एकट्याला जर दहा खोल्या वापरावयाच्या असतील तर एका खोलींत ज्या दहांना राहण्याचा प्रसंग येतो त्यांच्या नजरेस हा प्रकार येतां कामा नये. जितका अधिक श्रीमंत तितकीच त्याची भेट दुरापास्त; कारण तितक्या प्रमाणांत त्याच्यांत व भेट घेणारांत अधिक हुजरे उभे असतात आणि तितक्याच प्रमाणांत त्या श्रीमंताच्या हुजामेदार खोलींत मखमली खुर्चीवर त्याला बसविलें जाण्याचा संभव कमी असतो. वाहनांची गोष्टही अशीच. एखादा शेतकरी जर आपल्या गाडींत जात असला तर त्याला एखाद्या वाटसरास गाडींत न बसवून घेणें कसेंसेंच वाटतें; कारण गाडींत जागाही असते व बसविणें त्याला सहज असतें. पण जितक्या प्रमाणांत गाडी उंची असेल तितकाच अशा वाटसराला गाडीच्या मालकाने गाडींत बसवून घेण्याचा संभव कमी. सर्वांत फर्माशी गाड्यांना तर " एकलकोंडी " सुद्धा म्हणतात. (कारण यांत एकच माणूस बसतो.)

स्वच्छता या शब्दाने आमच्या ज्या लीलांचा बोध होतो त्यांचाही हाच प्रकार. स्वच्छता ! स्वच्छतेबद्दल प्रौढी मिरविणाऱ्या व्यक्ति-विशेषें-

---

* येथील श्रीमंतांच्या पोषाखांतील नावनिशी गाळली आहे.

करून स्त्रिया-कोणाच्या परिचयाच्या नाहीत ? दुसऱ्यांच्या जिवावर जेव्हा स्वच्छता मिरवायची असते तेव्हा असे लोक जे बेर माजवतात ते कोणाला माहीत नाहीत ? व या स्वच्छतेची सुरुवातीस सवय करून घेतांना (नव्याने) श्रीमंत होणारांची कोण त्रेधा उडते हें कोणाला माहीत नाही? यामुळें ' गोरेपान हातांना दुसऱ्यांचे श्रम गोड वाटतात ' या म्हणीची यथार्थता सिद्ध होते.

दिवसास एक सदरा बदलणें ही आजची स्वच्छतेची कल्पना असेल तर उद्या दिवसास दोन सदरे लागतील. आज दररोज निव्वळ हात व मान घुणें पुरे होतें तर उद्या पायही धुवावेसे वाटूं लागतात, व नंतर सबंध अंग अधिकच घासून घासून धुवावेंसें वाटूं लागतें.* सध्या जर दोन दिवसांनी मेजवस्त्र बदलून चालत असेल तर उद्या प्रत्यहीं परीट घडीचें मेजवस्त्र असावेसें वाटतें, नंतर दिवसास दोन अवश्य वाटूं लागतात. आज हुजऱ्याचे हात स्वच्छ असले म्हणजे पुरतें, पण उद्या त्याला स्वच्छ हातमोजे असावेसे वाटूं लागतात, व त्याने आपणांस द्यावयाचें पत्र स्वच्छ तबकांत घालून स्वच्छ हातमोजे घातलेल्या हातांनी द्यावें असें वाटूं लागतें. जेव्हा दुसऱ्याचे जिवावर स्वच्छता मिरवावयाची असेल तेव्हा या स्वच्छतेला मर्यादा राहत नाही आणि या (दिखाऊ) स्वच्छतेचा उपयोग मात्र कोणालाही नसून फक्त दुसऱ्यांपासून स्वत:ला अलिप्त राखण्याचें मात्र ती साधन होऊन बसते व अशा रीतीने इतरांशीं विचारविनिमय सुद्धा अशक्य होऊन बसतो.

यावर ताण म्हणजे जेव्हा मी अधिकाधिक विचार करूं लागलों तेव्हा मला असेंही दिसलें की हीच परिस्थिति आमच्या शिक्षणाचीही आहे.

शब्दाने कोणीही फसणार नाही. लोक एखाद्या शब्दाचा जो अर्थ करतात तोच अर्थ भाषा त्या गोष्टीला देते. सामान्य माणसें ज्याला 'सुशि-

---

* रशियाच्या हवामानांत दररोजचें स्नान तितकेंसें अवश्य नसावें. आपल्या दृष्टीने विचार करतां हिंदुस्थानांत दररोज स्नान अवश्य आहे. पण स्वच्छतेचा फाजील डौल मिरवून दिवसास चार वेळां साबूने तोंड धुणारे फॅशनेबल लोक आमच्यांतही आहेत.

क्षण' समजतात त्यांत झकपक पोषाख, चुरचुरीत बोलणें, स्वच्छ हात व सामान्यतः शारीरिक व दिखाऊ स्वच्छता यांचा समावेश होतो. अशा माणसाबद्दल उल्लेख करतांना इतरांपासून कांहीतरी निराळा या अर्थी तो 'सुशिक्षित' (म्हणजे पांढरपेशा) आहे असें ते म्हणतात. उच्च समाजामध्यें 'सुशिक्षित' या शब्दापासून याच अर्थाचा बोध निघतो. फरक इतकाच की त्यांच्या 'सुशिक्षित' शब्दांत पियानो वाजवितां येणें, फ्रेंच भाषा व रशियन भाषा शुद्ध लिहितां येणें व विशेष स्वच्छत यांचाही समावेश होतो. याच्याहीपेक्षा उच्च समाजांत वरील सर्व गोष्टींशिवाय थोडेंसें इंग्रजी, एखाद्या उच्च शिक्षणसंस्थेची पदवी व विशेष प्रकारची स्वच्छता यांचाही समावेश होतो, पण 'सुशिक्षित' शब्दाच्या वर ज्या निरनिराळ्या तीन पायऱ्या वर्णिल्या त्यांचा मुळांत मथितार्थ मात्र एकच आहे. सर्व शिक्षणाचें धोरण एकाने दुसऱ्यापासून वेगळेपणीं कसें राहावें हें शिकविण्याचें आहे. स्वच्छतेचा वर जो उद्देश सांगितला तोच या शिक्षणाचा—अर्थात् गरिबांपासून तुम्हांला वेगळें करणें हा—होय. कारण असें केलें म्हणजे भुकेने ग्रस्त व थंडीने पछाडलेल्या लोकांना आम्ही कशी चैन करतों हें पाहतां येत नाही. पण अशाने आम्ही लपूं शकत नाही व आमच्या लीला त्या लोकांच्या नजरेस येतातच.

अशा प्रकारें माझी खात्री पटली की आम्हां श्रीमंतांना शहरांतील गरिबांना मदत करतां न येण्याचें खरें कारण हें आहे की आम्हांला त्यांच्याशीं समरस होतां येणें अशक्य आहे. याचें कारण हेंच होय की आम्ही स्वतःच आपल्या जीवनक्रमाने व पैशाचा ज्या रीतीने आम्ही उपयोग करतों त्यामुळें हें अशक्य होतें. माझी खात्री झाली की आम्ही श्रीमंत व (ते) गरीब यांच्यांत आमची स्वच्छता, शिक्षण व द्रव्य यांच्या साहाय्याने आम्ही एक भिंत निर्माण केली असून गरिबांना मदत करावीशी जर आम्हांला वाटत असेल तर प्रथम ही भिंत पाडून टाकिली पाहिजे. म्हणजे मग सूटेव्हच्या म्हणण्याप्रमाणें आम्हाला गरिबांची आमच्यामध्यें वाटणी करून घेतां येईल. शहरांतील दारिद्र्यासंबंधीं या नव्या दृष्टीने विचार करतां माझ्या मनाने पूर्वी शहरांतील दारिद्र्याची पाहणी करीत असतां जो निर्णय दिला तोच निर्णय सध्याही मिळाला. तो हा की या सर्वांचें मूळ कारण आमची संपत्ति होय.

प्रकरण पंधरावें

या प्रश्नांचा मी आणखी एका तिसऱ्याच–निव्वळ वैयक्तिक–दृष्टीनें विचार करूं लागलों. तो प्रकार असा:–मी गरीब लोकांत काम करीत असें त्यावेळीं एक आश्चर्यकारक गोष्ट माझ्या नजरेस आली व बरेच दिवस मला तिचा कार्यकारणसंबंध उमजेना. ती अशी. जेव्हा जेव्हा मी रस्त्यांत अगर घरीं एखाद्या दरिद्र्याला त्याच्याशीं एकही शब्द न बोलतां एखादें नाणें देई तेव्हा मला त्याच्या नजरेंत कृतज्ञता व समाधान दिसे व कदाचित हा भासही असेल. मलाही मनांत बरें वाटे. मी त्या दरिद्र्यानें अपेक्षेबरहुकूमच केलें असें माझ्या प्रत्ययास येई. पण जेव्हा मी थोडें थांबून व त्याच्याशीं बोलून अगर त्याच्या पूर्वीच्या अगर प्रस्तुतच्या जीवनाविषयीं चौकशी करून खोलांत शिरें तों मला स्पष्ट दिसे की तीन किंवहुना वीस कोपेक देऊनही भागणार नाही. मी खिसे चांचपडीं व काय व किती द्यावें हें उमजत नसे म्हणून नेहमीं अधिक देई तरी तो दरिद्री अधिकच नाखूष होऊन जात असे. जितकी मी अधिक चौकशी करीं तितकाच त्याला काय द्यावें यावद्दल मी अधिक बुचकळ्यांत पडें व या याचक दरिद्र्याला कितीही दिलें तरी तो अधिकच नाखूष होऊन निघून जाई. सामान्यत: मला असा अनुभव आला की बारीक चवकशीनंतर तीन किंवा अधिक रूबल दिले तरी त्याच्या चेहऱ्यावर तीच नाखुषी, किंवहुना रागसुद्धा दिसे व कधी कधी तर ज्याला दहा रूबल द्यावे तो कोरडे आभार सुद्धा न मानतां जणूं काय मीच त्याचा कांही अपराध केला असावा अशा ऐटीने निघून जाई. अशा सर्व प्रसंगीं मला कसेंसेंच वाटे व लाजल्यासारखें होऊन अपराधित्वाची जाणीव उत्पन्न होई. जेव्हा एखाद्या गरिबाशीं मी महिनेवारी सतत संबंध ठेऊन त्याच्याशीं विचारविनमय करीं तेव्हा तर शेवटीं आमच्या संबंधापासून मला मनस्ताप होई व तों माझा अधिक तिरस्कार करूं लागे; व मलाहि वाटे की त्याचें तसें करणेंच वरोबर आहे.

रस्त्याने चालत असतां भिकाऱ्याने रस्त्याच्या बाजूशीं उभें राहून इतरांप्रमाणें मजपाशीं कांही तरी मागावें व मी त्याला द्यावें या परिस्थितींत तो मजकडे एक फिरस्ता, चांगला दयाळू फिरस्ता, उघड्या पडलेल्या माणसाच्या सदऱ्याकरितां एका धाग्याची वर्गणी देणारा— एवढ्याच दृष्टीने पाहतो. त्याला सुताच्या एका धाग्यापेक्षा अधिकाची मजकडून अपेक्षा नसते व तितकें मिळतांच तो खूष होतो व दुवा देतो. पण जेव्हा थांबून मी त्याचा बांधव या नात्याने त्याच्याशीं बोलें व सामान्य वाटसरापेक्षा मी कांही अधिक आहें असें भासवीं व तो स्वत:ची हकीकत सांगतांना रडूं लागे–असें पुष्कळदां होई– तेव्हा तो मला एक सामान्य फिरस्ता न समजतां स्वत:ची अशी समजूत करून घेई–आणि माझीही इच्छा त्याची तशी समजूत व्हावी अशीच असे–की मी मोठा दयाळू पुरुष आहें. पण मी जर खरा "दयावान" असेन तर ही दया वीस कोपेक अगर दहा किंवहुना दहा हजार रुबलांवरही थांबणें शक्य नाही. परोपकारी बनायचें, परंतु अगदी अल्प प्रमाणांत, ही गोष्ट अशक्य आहे. समजा, मी त्याला पुरेसें देऊन त्याची ददात मिटविली व त्याला स्वतंत्रपणें राहतां यावें इतकी तरतूद करून दिली. पण समजा दुर्दैवाने अगर त्याच्याच दुर्गुणांमुळें अथवा दुश्चारित्र्यामुळें तो पुन: अडचणींत येऊन त्याला पुन: सर्व गोष्टींची उणीव पडली–पुन: तो उपाशीं मरूं लागला व उघडा नागडा राहूं लागला–व त्याने मला पुन: मदत मागितली तर पुन: मदत करण्याचें मी कसें नाकारणार ? जर माझ्या खटपटीचा उद्देश केवळ विशिष्ट वस्तूंची परिपूर्ति करणें, म्हणजे त्याला अमुक एक रूबल्स अथवा ओव्हरकोट देणें अशा तऱ्हेचाच असेल तर तितकें देऊन मला स्वस्थ राहतां येईल. पण हा माझा उद्देश नव्हता. मला तर त्या माणसाच्या 'पोशिंद्या' ची भूमिका वठवायची होती. अर्थात मला "आत्मवत् सर्वभूतेषु" या भावनेने वागावयाचें होतें. दयालुत्वाचा सर्वत्र अभिप्रेत असा अर्थ हाच आहे. म्हणून तुम्हीं त्याला वीस वेळां पुन: पुन: दिलेल्या पैशांचीही तो दारू पिऊन टाकीत असला व शेवटीं भुकेलेला व वस्त्रहीन होत असला तरी–जर तुम्ही स्वत:ला 'दयावान्' म्हणवतां तर–तुमच्याजवळ जों-

प्रकरण पंधरावें

या प्रश्नांचा मी आणखी एका तिसऱ्याच–निव्वळ वैयक्तिक–दृष्टीनें विचार करूं लागलों. तो प्रकार असा:–मी गरीब लोकांत काम करीत असें त्यावेळीं एक आश्चर्यकारक गोष्ट माझ्या नजरेस आली व बरेच दिवस मला तिचा कार्यकारणसंबंध उमजेना. ती अशी. जेव्हा जेव्हा मी रस्त्यांत अगर घरीं एखाद्या दरिद्र्याला त्याच्याशीं एकही शब्द न बोलतां एखादें नाणें देई तेव्हा मला त्याच्या नजरेंत कृतज्ञता व समाधान दिसे व कदाचित हा भासही असेल. मलाही मनांत बरें वाटे. मी त्या दरिद्र्याच्या अपेक्षेबरहुकूमच केलें असें माझ्या प्रत्ययास येई. पण जेव्हा मी थोडें थांबून व त्याच्याशीं बोलून अगर त्याच्या पूर्वींच्या अगर प्रस्तुतच्या जीवनाविषयीं चौकशी करून खोलांत शिरें तों मला स्पष्ट दिसे की तीन किंवहुना वीस कोपेक देऊनही भागणार नाही. मी खिसे चांचपडीं व काय व किती द्यावें हें उमजत नसे म्हणून नेहमीं अधिक देई तरी तो दरिद्री अधिकच नाखूष होऊन जात असे. जितकी मी अधिक चौकशी करीं तितकाच त्याला काय द्यावें यावद्दल मी अधिक बुचकळ्यांत पडें व या याचक दरिद्र्याला कितीही दिलें तरी तो अधिकच नाखूष होऊन निघून जाई. सामान्यतः मला असा अनुभव आला की बारीक चवकशीनंतर तीन किंवा अधिक रूबल दिले तरी त्याच्या चेहऱ्यावर तीच नाखुषी, किंवहुना रागसुद्धा दिसे व कधी कधी तर ज्याला दहा रूबल द्यावे तो कोरडे आभार सुद्धा न मानतां जणूं काय मीच त्याचा कांही अपराध केला असावा अशा ऐटीने निघून जाई. अशा सर्व प्रसंगीं मला कसेंसेंच वाटे व लाजल्यासारखें होऊन अपराधित्वाची जाणीव उत्पन्न होई. जेव्हा एखाद्या गरिबाशीं मी महिनेवारी सतत संबंध ठेऊन त्याच्याशीं विचारविनिमय करीं तेव्हा तर शेवटीं आमच्या संबंधापासून मला मनस्ताप होई व तो माझा अधिक तिरस्कार करूं लागे, व मलाहि वाटे की त्याचें तसें करणेंच बरोबर आहे.

रस्त्याने चालत असतां भिकाऱ्याने रस्त्याच्या बाजूशीं उभें राहून इतरांप्रमाणें मजपाशीं कांही तरी मागावें व मी त्याला द्यावें या परिस्थितींत तो मजकडे एक फिरस्ता, चांगला दयाळू फिरस्ता, उघड्या पडलेल्या माणसाच्या सदऱ्याकरितां एका धाग्याची वर्गणी देणारा— एवढ्याच दृष्टीने पाहतो. त्याला सुताच्या एका धाग्यापेक्षा अधिकाची मजकडून अपेक्षा नसते व तितकें मिळतांच तो खूष होतो व दुवा देतो. पण जेव्हा थांबून मी त्याचा बांधव या नात्याने त्याच्याशीं बोलें व सामान्य वाटसरापेक्षा मी कांही अधिक आहें असें भासवीं व तो स्वत:ची हकीकत सांगतांना रडूं लागे–असें पुष्कळदां होई– तेव्हा तो मला एक सामान्य फिरस्ता न समजतां स्वत:ची अशी समजूत करून घेई–आणि माझीही इच्छा त्याची तशी समजूत व्हावी अशीच असे–की मी मोठा दयाळू पुरुष आहें. पण मी जर खरा "दयावान" असेन तर ही दया वीस कोपेक अगर दहा किंवहुना दहा हजार रूबलांवरही थांबणें शक्य नाही. परोपकारी बनायचें, परंतु अगदी अल्प प्रमाणांत, ही गोष्ट अशक्य आहे. समजा, मी त्याला पुरेसें देऊन त्याची ददात मिटविली व त्याला स्वतंत्रपणें राहतां यावें इतकी तरतूद करून दिली. पण समजा दुर्दैवाने अगर त्याच्याच दुर्गुणांमुळें अथवा दुश्चारित्र्यामुळें तो पुन: अडचणींत येऊन त्याला पुन: सर्व गोष्टींची उणीव पडली–पुन: तो उपाशीं मरूं लागला व उघडा नागडा राहूं लागला–व त्याने मला पुन: मदत मागितली तर पुन: मदत करण्याचें मी कसें नाकारणार ? जर माझ्या खटपटीचा उद्देश केवळ विशिष्ट वस्तूंची परिपूर्ति करणें, म्हणजे त्याला अमुक एक रूबल्स अथवा ओव्हरकोट देणें अशा तऱ्हेचाच असेल तर तितकें देऊन मला स्वस्थ राहतां येईल. पण हा माझा उद्देश नव्हता. मला तर त्या माणसाच्या 'पोशिंद्या' ची भूमिका वठवायची होती. अर्थात मला "आत्मवत् सर्वभूतेषु" या भावनेने वागावयाचें होतें. दयालुत्वाचा सर्वत्र अभिप्रेत असा अर्थ हाच आहे. म्हणून तुम्हीं त्याला वीस वेळां पुन: पुन: दिलेल्या पैशांचीही तो दारू पिऊन टाकीत असला व शेवटीं भुकेलेला व वस्त्रहीन होत असला तरी–जर तुम्ही स्वत:ला 'दयावान्' म्हणवतां तर–तुमच्याजवळ जों-

पावेतों त्याच्यापेक्षा अधिक आहे तोंपावेतों तुम्ही त्याची गरज पुरवीत राहिलें पाहिजे; त्याशिवाय गत्यंतर नाही. जर तुम्ही माघार घेत असाल तर त्याचा हाच अर्थ की तुम्ही जें दिलें तें दयालुत्वामुळें नसून केवळ त्याने व इतर जगाने तुम्हांला दयावान् समजावें एवढ्याच करितां दिलेलें दान होय.

आणि अशा प्रकारें ज्यांना दान देण्याचें थांबवून मला दयालुत्वाचें ब्रीद सोडावें लागे अशा लोकांसमोर मला लाजल्यासारखें वाटे.

या लाजेचा प्रकार कोणता ? ही लाज मला ल्यापिन हाऊससमोर वाटली; व जेव्हा जेव्हा मी खेड्यांत गरिबांना कांहीं देईं अगर शहरांतील दरिद्र्यांच्या मोहल्ल्यांत वावरें त्यावेळींही अशाच प्रकारची लाज मला वाटे.

एका नव्या प्रसंगाने या लाजेची मला तीव्रतेने जाणीव झाली व गरिबांना दान देतांना मला वाटणाऱ्या या लाजेचा या प्रसंगाने खुलासाही झाला.

हा प्रसंग खेड्यांतला. मला एका यात्रेकरूला वीस कोपेक देण्याची इच्छा झाली व कोणाजवळून तरी ते उसने मागून आण असें मी माझ्या मुलाला सांगितलें. माझ्या मुलाने पैसे आणून यात्रेकरूला दिले व हे पैसे माझ्या स्वयंपाक्याकडून मिळाले असें तो म्हणाला. कांही दिवसांनी दुसरे यात्रेकरू आले व मला पुनः वीस कोपेक हवे होते. मजजवळ रूबल होता, व स्वयंपाक्याला मला पैसेही परत करावयाचे होते. तें आठवून मोड मिळेल या आशेने मी स्वयंपाकघरांत गेलों व म्हणालों, "मी तुला वीस कोपेक देणें आहे. हा रूबल घे..." माझें वाक्य संपण्यापूर्वीच त्याने आपल्या बायकोला घरांतून हाक मारून म्हटलें, "पाशा घे बरें तो !" मला काय हवें तें त्याच्या बायकोला समजलें असावें असें वाटून मी तिला रूबल दिला. स्वयंपाकी नुक्ताच एका आठवड्यापूर्वी माझ्या नोकरींत आला होता व जरी मी त्याच्या बायकोला पाहिलें होतें तरी तिच्याशीं मी बोललों नव्हतों. मी तिला बाकीचा खुर्दा मागणार पण त्यापूर्वीच आभारप्रदर्शनार्थ तिने माझ्या हाताचें चुंबन घेण्याची इच्छा दर्शविली.*यावरून स्पष्ट होतें की तिच्या मतें तो रूबल

* हाताचें चुंबन घेऊन आभार मानण्याचा रशियांत प्रघात आहे.

तिला मी देऊन टाकणार होतों. मी कांही तरी पुटपुटून स्वयंपाकघरांतून निघून गेलों. मला फारच लाज— इतकी मला पूर्वी कैक वर्षांत वाटली नव्हती— वाटली. माझ्या चेहऱ्यावरील विकार आटोपेनासे झाले व स्वयंपाकघरांतून बाहेर पडतांना मी लज्जापूर्ण विव्हळाही दिला. लाज अकल्पितपणें व माझा अपराध नसतां वाटली असा माझा समज होता. म्हणून मीं थरारलों व मला असेंही वाटलें की मी (म्हातारा) ज्या तऱ्हेनें राहात होतों त्या स्थितींत एवढी लाज वाटण्याचें कारण नव्हतें. माझ्या वर अतिशय परिणाम झाला. मी माझ्या कुटुंबाला व इतर ओळखीच्या मंडळीला हकीकत सांगितली व त्यांनीही, त्यांना असेंच वाटलें असतें, असें सांगितलें. मी पुनः पुःन स्वतःशीं विचार करीं की मला एवढी लाज का वाटली ? यापूर्वी मॉस्कोला असतां एक प्रसंग घडला होता, त्याने या प्रश्नाचें उत्तर दिलें.

मॉस्कोंतील त्या घटनेवर मी विचार केला व स्वयंपाक्याच्या बायकोसमोर मला लाज कां वाटली याचें कारण उलगडलें. त्याचप्रमाणें मॉस्कोंत दान देतांना जी लाज वाटे व दान नव्हे तर सौजन्य व शिष्टाचार म्हणून जो पै पैसा देण्याची माझी रीत आहे त्यापेक्षा अधिक प्रमाणांत एखाद्याला दान दिलें असतां आजही जी लाज मला वाटते तिचेंही कारण उलगडलें. एखाद्याने उजेड मागितल्यास व तुमच्याजवळ जर आगकाडी असेल तर तुम्ही ती पेटविली पाहिजे. जर एखादा तीन किंवा वीस कोपेक अगर कांही रूबलसही मागेल तर तुमच्याजवळ असल्यास तुम्ही ते द्यावयास हवे. हा परोपकार नसून ही केवळ शिष्टाचाराची बाब आहे.

प्रसंग असा. दोन वर्षांपूर्वी ज्यांच्याबरोबर मी लांकडें कापीत असें त्या दोन शेतकऱ्यांचा मागें उल्लेख आलेलाच आहे. एका शनिवारीं सायंकाळीं मी त्यांच्याबरोबर घरीं परत येत होतों. ते मालकाकडे पगार घेण्यास निघाले होते. रस्त्यांतील एका पुलानजीक आम्हांला एक म्हातारा भेटला. त्याने आमच्याजवळ भीक मागितली व मी त्याला वीस कोपेक दिले. देतांना मला वाटलें की माझ्या या औदार्याचा सेमेनवर–माझ्या बरोबरीच्या शेतकऱ्यावर–कांही परिणाम होईल. त्या वेळीं मी

सेमेनशीं अध्यात्मसंबंधीं चर्चा करीत होतों. सेमेन हा व्हलाडीमीरचा शेतकरी असून मॉस्कोंत तो बायको व दोन मुलें घेऊन राहत असे. तोही थांबला, त्याने आंगरख्याच्या आंतून पैशाची थैली काढली व ती चांचपून त्याने त्या म्हाताऱ्याला तीन कोपेकचें नाणें देऊन दोन कोपेक परत मागितले. म्हाताऱ्याजवळ दोन तीन-कोपेकचीं नाणीं व एकच सुटा कोपेक असलेला त्याने दाखविला. सेमेनने त्यांकडे पाहिलें व तो एक कोपेक उचलण्याचे बेतांत होता; पण त्याने विचार बदलला, टोपी उचलली व हातांनी क्रूसचिन्ह करून कांही परत न घेतां चालूं लागला. मला सेमेंनची स्थिति माहीत होती. त्याला स्वत:चें घर नव्हतें किंवा इस्टेटही नव्हती. हें तीन कोपेकचें नाणें देते वेळेपर्यंत त्याची मिळकत एकंदर सहा रूबल व पन्नास कोपेक इतकीच काय ती झालेली होती. हींच त्याची यच्चयावत संपत्ति. माझी शिल्लक सुमारें ६००,००० रूबल्स होती. मला जशीं बायकापोरें होतीं तशीं सेमेनलाही होतीं. तो मजपेक्षा लहान होता व त्याला मुलेंही थोडीं होतीं पण त्याचीं मुलें लहान असून माझीं दोन वडील मुलें काम करण्यालायक झालीं होतीं. एकंदरींत आमच्या शिल्लकींतील तफावत सोडली तर आम्ही दोघेही सारखेच होतों. कदाचित् माझीच परिस्थिति बरी होती. त्याने तीन कोपेक दिले व मी वीस दिले. त्याने काय दिलें व मी काय दिलें बरें ? त्याच्या दानाची बरोबरी करायची तर मी काय द्यावयास पाहिजे होतें ? त्याच्याजवळ सहाशें कोपेक होते. त्याने प्रथम एक कोपेक दिला व नंतर अधिक दोन दिले. मजजवळ सहा लाख रूबल होते. त्याने केलें तेंच मी करावयाचें तर मी ३००० रूबल प्रथम देऊन २००० रूबल परत मागावयास हवे होते व त्याच्या (भिकाऱ्या)जवळ परत देण्यास खुर्दा नाही असें दिसतांच ते दोन हजार रूबलही म्हाताऱ्यास अर्पण करून व क्रूसचिन्ह करून कारखान्यांत मजूर कसे राहतात अगर स्मॉलेन्स्क बाजारांत यकृताचा भाव काय आहे इत्यादि गप्पा मारत शांतपणें चालूं लागावयास पाहिजे होतें. मी त्यावेळींही विचार केला पण याचें खरें मर्म मात्र मला वऱ्याच उशीरां उमजलें. हें मर्म इतकें नवलपूर्ण आहे की तें गणिताच्या सिद्धान्ताप्रमाणें अगदी ठाम असलें तरी गळीं उतरण्यास जरा उशीरच लागतो. त्याच्यांत कांही तरी

चूक असावी असें वाटलें तरी तें बिनचूक आहे. आपण भ्रमांत राहतों व स्वत:ची फसवणूक करून घेतों इतकेंच काय तें.

हें अनुमान मला उमगून त्याचा अचूकपणा मला पटल्यावर स्वयंपाकीण बाईसमोर व इतर दरिद्र्यांना दान देतांना मला लाज कां वाटें व वाटते याचें उत्तर सापडलें.

मी जो गरिबांना पैसा देईं, अगर जो रूबल मी देणार असें त्या स्वयंपाकीण बाईला वाटलें, तो पैसा म्हणजे तरी काय ? बहुतांशीं माझ्या संपत्तीच्या मानाने ही रक्कम इतकी क्षुल्लक असते की तिचें अल्प प्रमाण त्या स्वयंपाकिणीला अगर सेमेनला समजेल अशा आकडयाने सांगणें शक्य होणार नाही. हा बहुधा माझ्या संपत्तीचा दशलक्षांश भाग असतो. हा इतका क्षुल्लक भाग असतो की तो दिल्याने मला मुळीच त्रास होण्याचा संभव नसतो. माझी लहर लागेल त्या वेळीं करमणूक म्हणून मी हें दान देतों व याच दृष्टीने स्वयंपाकीण बाई मजकडे पाहत होती. जर मी वाटेंतल्या भिकाऱ्याला वीस कोपेक अगर एखादा रूबल सुद्धा देतों तर तिला मी कां देऊं नये ? अशाप्रकारें पैसा देणें व गरिबांच्या घोळक्यांत भाकरीचे तुकडे फेकून त्यांना त्याच्याकरितां धडपड करावयास लावणें या तिच्या दृष्टीने सारख्याच गोष्टी होत्या. फाजील प्रमाणांत पैसा असणारांची ही एक मौजेची लीला आहे असें तिला वाटे. तिने केलेल्या घोटाळ्यामुळें (मी खुर्दा मागत असतां सबंध रूबल मी तिला देऊन टाकीत आहें असें मानण्याचा) गरीब लोक मजकडे कोणत्या दृष्टीने पाहत हें मला उमजून लाज वाटली. "फुकटचा पैसा आहे, देतो बिचारा !" असें त्यांना वाटत असावें.

माझा पैसा म्हणजे काय व तो कोठून आला ? त्याचा कांही भाग मला बडलोपार्जित जमिनीपासून मिळाला होता. हा पैसा मला देण्याकरितां शेतकऱ्याला त्याच्याजवळची शेवटची मेंढी अथवा गाय विकावी लागे. माझ्या संपत्तीचा दुसरा भाग मला माझ्या लिखाणापासून व पुस्तकांपासून मिळाला होता. जर माझीं पुस्तकें अपायकारक असलीं तर तीं विकत घेणाऱ्या लोकांच्या मार्गांत तो एक अनिष्ट मोह मी निर्माण

करीत असल्यामुळें अनीतिसंपादित असाच मानला पाहिजे. वरें माझीं पुस्तकें उपयोगी असलीं तर हा कलुषितपणा अधिकच समजला पाहिजे. मी म्हणतों " मला १७ रूबल द्या म्हणजे मी ही तुम्हांला देतों. * " आणि जसा शेतकरी स्वत:ची शेवटची मेंढी अगर गाय विकून मला पैसा देई, त्याचप्रमाणें एखादा गरीब विद्यार्थी, मास्तर अगर गरीब गृहस्थ आपल्या निकडीच्या गरजा बाजूला सारून मला ते पैसे देई. आणि अशा प्रकारें मजजवळ जमलेल्या मुबलक पैशाचा मी कसा खर्च करीत असें बरें? या पैशाला शहरांत आणून त्यापैकी कांही अंश जे खेडवळ शहरांत येऊन माझी सेवा करून माझी लहर सांभाळण्यास तयार असत किंवा माझी फरशी धूत अगर जोडे पुशीत किंवा मला लागणाऱ्या जिनसा तयार करणाऱ्या कारखान्यांतून काम करीत त्यांना मी देई. हा जो पैसा मी त्यांना देतों त्याचा शक्य तो मोबदला त्यांचेकडून पिळून काढतों. अर्थात त्यांना शक्य तितकें कमी देऊन शक्य तितकें अधिक घेण्याचा यत्न करतों. व अकस्मात, अर्थाअर्थीं कांही कारण नसतां, यापैकीच कांही पैसा त्या गरीब लोकांना मी दान देण्यास सुरवात करितों. तो देखील सर्वांना नव्हे तर फक्त माझी लहर लागेल त्यांनाच. तेव्हा "हा बोवा करमणुकीखातर जो स्वत:जवळचा फाजील पैसा वाटतो त्यांत माझीही पाळी येवो" असा विचार त्यांच्यापैकीं प्रत्येकाच्या मनांत जर येऊं लागला तर त्यांत नवल काय ?

त्या सर्वांची मजकडे बघण्याची ही अशा तऱ्हेची दृष्टी आहे व स्वयंपाकीण बाईने मजकडे याच दृष्टीने पाहिलें. माझी आत्मवंचना इतकी जबर होती की एकीकडे एका हाताने दरिद्री लोकांपासून दरमहा हजारों रूबल गोळा करून दुसरीकडे दुसऱ्या हाताने त्यापैकी फक्त माझी लहर लागेल अशा कांहींना त्यांतले थोडेसे पैसे वाटणें याला मी त्यांचें "भलें करणें" समजे. मला लाज वाटली यांत कांहीच आश्चर्य नाही.

तात्पर्य, भलें करावयाचें तर, भलें करण्यापूर्वी मला वाईटापासून अलिप्त होऊन, वाईट करावें लागणार नाही अशा परिस्थितींत राहिलें

* लावेर्ळं टॉलस्टॉयचा ग्रंथसंग्रह १७ रूबल अर्थात् सुमारें २२ रुपयांस मिळे.

पाहिजे. कारण माझा आयुष्यक्रम आमूलाग्र वाईट होता मी एक लाख रूबल देऊन टाकले तरी पांच लाख रूबल मजजवळ शिल्लक राहिल्यामुळें मी दुसऱ्याचें भलें करण्याच्या स्थितींत आलों आहें असें होणार नाही. मागें एका वेश्येने एका आजारी बाईची व तिच्या तान्ह्या मुलाची शुश्रूषा केल्याचा वृत्तांत आला आहे. निदान त्या वेश्येइतकें लोककल्याण जर मला साधणें असेल तर मला प्रथम माझ्या सर्वस्वावर पाणी सोडणें अवश्य होतें. पण तिचें करणें मला क्षुल्लक वाटलें होतें ! व भलें करावें अशी इच्छा करण्याचें धाष्टर्यही मी करीत होतों !

ल्यापिन हौसमधील क्षुधाग्रस्त व वस्त्रहीन लोकांना पाहून मला जें वाटलें की या सर्व प्रकाराचा दोष मजकडे येतो व माझी ज्या पद्धतीची राहणी होती तशी ती चालू ठेवणें अशक्य होय–त्रिवार अशक्य होय–तोच या बाबतींतील खराखुरा निष्कर्ष होय.

तर मग आम्ही काय करावें ? या प्रश्नाचें अजूनही कोणास उत्तर हवें असेल तर ईश्वरकृपेने मी तें सविस्तर देऊं शकेन.



प्रकरण सोळावें

मला या सर्वांचा उमज मोठ्या मुष्किलीने पडला, पण उमज पडल्या-बरोबर मात्र माझ्या आत्मवंचित पूर्वायुष्यक्रमाबद्दल भयही वाटलें. मी स्वतःच आकर्ण चिखलांत रुतलों होतों तरी मी दुसऱ्यांना चिखलांतून काढूं शकेन असें मला वाटतच होतें.

मला काय पाहिजे ? लोकांचें भलें करावें, कोणीही क्षुधित अगर विवस्त्र राहणार नाही अशी व्यवस्था करावी व सर्वांनी माणसास साजेल अशा रीतीने राहावें असें मला वाटतें.

हें मला पाहिजे होतें. पण दिसलें काय ? तर बळजबरीने व इतर तऱ्हेने कांही लोक (यांत मीहि एक होतों) कष्ट करणाऱ्या वर्गापासून त्यांच्या जीवितास अवश्य असणाऱ्या जिनसा हिरावून घेत आहेत व बिनकामे आळशी (यांपैकीच मीही एक आहें) या श्रमजीवी लोकांच्या श्रमाचीं फळें फाजील प्रमाणांत उपभोगीत आहेत.

या लुटीचा मला असा एक विशेष आढळला की एखादा मनुष्य (अगर त्याच्या पूर्वजाने अक्कल लढविली असेल तर त्याचा पूर्वज) जितकी अधिक धूर्ततेची व गुंतागुंतीची शक्कल लढवी व साधनें उपयोगांत आणी तितक्या अधिक प्रमाणांत त्याची लोकांच्या श्रमावर अधिक सत्ता चाले व तितकें त्याला कमी काम करावें लागे.

देशांतील जनतेची नंबरवारीच लावयाची तर ती खालील प्रमाणें लागेल अफाट भांडवलाचा एखादा मालक, कापड गिरण्यांचा मालक, खाणीचा मालक, मोठे कोटचाधीश जमीनदार* अशा प्रचंड धेंडाचा [illegible] प्रथम लागेल. त्यानंतर मध्यम प्रतीचे

---

* या सर्वांचें [illegible] मूळ इंग्रजी भाषांतरांत दिलीं आहेत. मराठी भाषांतरात्मक रिता [illegible] देणें बरें वाटलें.

मा. ज. का.

पेढीवाले, व्यापारी, सरकारी कामगार व जमीनदार—यांपैकी मी एक आहें—यांचा नंबर येतो. यानंतर यांच्या खालच्या वर्गांत लहान व्यापारी, खाणावळवाले, पठाणी पद्धतीचे जुजबी सावकार, पोलीस अधिकारी व शिपाई, मास्तर, गिरजाघरांत गाणारे, कारकून इ० चा समावेश होतो. यानंतर दरवान, हुजरे, गाडीवान, पाणके, टांगेवाले व फेरीवाले येतात व सर्वांचे शेवटीं गिरण्यांतून व शेतांतूत काम करणाऱ्यांचा नंबर लागतो. या श्रमजीवी लोकांच्या संख्येचें इतर सर्वांच्या संख्येशीं एकास दहा असें प्रमाण असतें. मला स्पष्ट दिसलें की या नऊदशांश श्रमजीवी लोकांवर कामाचा ताण पडतो—व निसर्गमान्य पद्धतीने राहिल्यास असा ताण पडणें अपरिहार्य आहे—पण निरनिराळ्या युक्त्यांच्या साहाय्यानें आम्ही यांच्यापासून यांच्या जीविताच्या गरजाही हिरावून घेत असल्यामुळें त्यांचें जीवित कठीण झालेलें आहे व दिवसेंदिवस तें अधिकाधिक कष्टमय होत आहे. आणि इकडे आमचें आळशांचें जीवन पहावें तों सर्व शोध व शास्त्रें त्याला सुखमय करण्यासाठी झटत असल्यामुळें तें आमचें जीवन प्रतिदिनीं अधिकाधिक सुबत्तेचें, आकर्षक व बिनधोक असें होत आहे.

आजकाल श्रमजीवी लोक, विशेषेंकरून म्हातारे, स्त्रिया व मुलें केवळ फाजील काम व तोटकें खाणें यामुळेंच कालवश होतांना मी पहात आहें. यांना अगदी आवश्यक अशा जिनसासुद्धा मिळतील अशी शाश्वती नसते व यांच्या जोडीला पाहावें तों काम न करणाऱ्या नशीबवान लोकांची—मात्र यांतलाच मी एक आहें—सर्वस्वीं आबादानी असून त्यांच्या या जीवनक्रमांत धोक्याचा भाग मुळीच उरलेला नाही म्हटलें तरी चालेल. ते अगदी स्वर्गांतल्या देवाप्रमाणें निर्धोक राहतात. आमचे जवळ जणूं काय मंत्रसिद्ध अशी पैशांची अक्षय्य पिशवी आहे. इच्या योगाने आम्हांला श्रम करण्याच्या निसर्गनियमापासून पूर्णपणें मुक्त होतां येतें, इतकेंच नव्हे तर विनाश्रमाने जीवनक्रमास जें अवश्य तें सर्व आम्हांस मिळतें व ही जादूची अक्षय्य पिशवी आपल्या मुला-बाळांना अगर इच्छा असेल त्याला आम्ही देऊं शकतों. श्रम करणाऱ्यांच्या

श्रमांचें फल वाढत्या प्रमाणांत आळशांच्या पदरांत पडतांना मला दिसत आहे. आमच्या समाजाचा 'पिरामिड' पुनः बांधण्याच्या इराद्यानें पायांतील दगड काढून जणूं काय वर नेण्यांत येत आहेत व ही क्रिया दिवसेंदिवस भूमितिश्रेढीने वाढत्या प्रमाणावर होत आहे. एखाद्या मुंग्यांच्या वारुळांत कांही मुंग्यांचीं डोकीं फिरून त्यांना सामान्य नियमाचा विसर पडावा व त्यांनी वारुळाच्या पायथ्याची माती वारुळाच्या शिखराशीं नेऊन त्याचा पाया अरुंद करावा व वरचा भाग रुंद करीत न्यावा आणि त्यामुळें इतर मुंग्यांनाही वारुळाच्या डोक्यावर जाण्यास भाग पाडावें अशासारखा जवळजवळ हा प्रकार मला वाटला. प्रत्येकाने स्वतःच्या श्रमाने जगावें ह्या ध्येयाऐवजी प्रत्येकानें जादूच्या थैल्या हस्तगत कराव्या हें आयुष्याचें ध्येय होऊन बसल्याचें मला दिसलें. श्रीमंतांनी--मीही त्यांत आहेंच--ही थैली कशी तरी साध्य केली असून तिच्या आधारावर चैन करण्याकरितां म्हणून आम्ही शहरांतून राहावयास जातों. या शहरांत पिकत कांहीच नाही; भक्षण मात्र सर्व गोष्टीचें होतें. श्रीमंतांच्या ह्या द्रव्य प्रसविणाऱ्या थैलीची भर करण्यासाठी ज्या स्वकष्टाने उपजीविका करणाऱ्याचें उच्चाटन करण्यांत येतें तोही श्रीमंताच्या मागोमाग शहरांत जातो व आपण स्वतः शक्कल लढवून एखादी कमी कामाची व ज्यास्त मोबदला देणारी जागा मिळवितो. व अशा रीतीने आधीच अधिक असलेला श्रमजीवी लोकांवरील बोजा आणखी वाढविण्यास कारणीभूत होतो. किंवा जर अशी स्थिति प्राप्त झाली नाही तर निशावसतिगृहांतील क्षुधित व विवस्त्र रहिवासी बनून विनाश पावतो. यांचीही संख्या फार त्वरेने वाढत आहे.

स्वकष्टाने उपजीविका करणाऱ्यांपासून त्यांच्या जीवनास आवश्यक असलेल्या गोष्टी नाना तऱ्हेच्या युक्त्याप्रयुक्त्यांनी हिरावून स्वतःकरितां द्रव्यप्रसू पिशवी मिळविणाऱ्या व त्या दुर्दैवी लोकांना मोहांत पाडणाऱ्या वर्गापैकींच मीही एक आहें. मला लोकांना मदत करावयाची आहे. म्हणून हें स्पष्ट आहे की सध्या गरिबांचें उच्चाटन करण्याची जी क्रिया मी चालविली आहे ती प्रथम बंद केली पाहिजे आणि त्यांना भलत्या भरीस पाडणेंही बंद केलें पाहिजे. असें जर मी न करीन तर एकीकडें

अनादिकालापासून रूढ असलेल्या निर्घृण व धूर्ततेच्या कलूप्त्यांनी मी स्वत:करितां मंत्रसिद्ध थैलीची मालकी, अर्थात स्वत: काम न करितां शेकडों हजारों माणसांस मजकरितां मी राबवूं शकेन अशी परिस्थिति, तयार करून दुसरीकडे मी अशी स्वत:ची कल्पना करून घेतों की मला त्या लोकांची दया येते व त्यांना मला मदत करण्याची इच्छाही आहे. मी एका माणसाच्या मानगुटीवर बसतों व त्याला गुदमरून टाकून माझा भार वाहून घेण्यास त्याला भाग पाडतों आणि त्याच्या मानगुटीवरून न उतरतां त्याची मला दया येते व (मानगुटीवरून उतरण्याची एकमात्र बाब वगळून) हरतऱ्हेने मी त्याचें भलें करावयास तयार आहें असा स्वत:चा व इतरांचा समज करून देतों.

वास्तविक काम सोपें आहे. जर मला गरिबांना मदत करावयाची आहे म्हणजे जर मला गरिबांना गरिबीपासून वाचवावयाचें आहे तर मी त्यांना गरीब करतां कामा नये. पण प्रत्यक्षत: एकीकडे पथभ्रष्ट गरिबांना माझ्या लहरीस लागेल तेव्हा व तसे एक, दहा अगर शंभर रूबलही मी वाटतों पण दुसरीकडे मात्र जे पथभ्रष्ट झालेले नाहीत अशा गरिबांपासून हजारों रूबल लुबाडून त्यांना गरीब व पथभ्रष्टही करतों.

हें सर्व स्पष्ट आहे. मात्र तें तसें आहे अशी माझी पूर्ण समजूत पटणें हें फारच कठीण गेलें. परंतु तशा प्रकारच्या निरीक्षणांत जेव्हा माझी चूक मला कळून आली व पटली तेव्हा जें तत्पूर्वी गुंतागुंतीचें, अस्पष्ट व बिनतोड स्वरूपाचें वाटत होतें तेंच सरळ व स्पष्ट झालें. सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे माझा स्वत:चा मार्ग तरी मला वरील स्पष्टीकरणानंतर पूर्वी-प्रमाणें कठीण, घोटाळ्याचा व त्रासदायक न वाटतां साधा, स्पष्ट व सुख-दायक वाटू लागला

लोकांस मदत करावयास निघालेला मी कोण ? मदत करण्याची इच्छा करणारा मी, रात्रौ टेबलाशीं चार मेणबत्त्यांच्या उजेडांत ब्रिज खेळत असल्यामुळें दुर्बल, चोचलेबाज झालेला व शेकडों लोकांच्या मदतीची गरज असलेला असा मी, दुपारीं उठून कोणत्या लोकांस मदत करावयास सरसावतों ? तर जे सकाळीं उठतात, लाकडी फळ्यांवर झोपतात, कदन्न खातात, नांगरणें, कापणी, कुऱ्हाडी सुधारणें, रंधा करणें, घोडयावर

जीन कसणें, शिवणें इ० कामें ज्यांना अवगत आहेत, जे शक्ति, सहनशीलता, कौशल्य व मनोनिग्रह या बाबतींत, जो मी त्यांच्या मदतीस सरसावलों त्यापेक्षा शेकडोपटीने श्रेष्ठ आहेत अशांना ! अशा लोकांशीं प्रथम जेव्हां माझा संबंध आला तेव्हा मला लाज वाटूं नये तर काय वाटावें ? त्यांतला अधिकांत अधिक दुबळा मनुष्य, ज्ञानोव्ह हौसमध्यें राहणारा एक दारुडा—ज्याला लोक उडाणटप्पू समजतात—मजपेक्षां शेकडोपटीने अधिक उद्योगी आहे. त्याची शिलक–म्हणजे तो लोकांना जें देतो व लोकांपासून जें घेतो त्यांतील अंतर—मी लोकांपासून किती घेतों व त्यांना काय देतों याचा विचार करतां–माझ्या सहस्त्रपट आहे.

आणि अशा लोकांस मी मदत करावयास जातों ! मी गरिबांना मदत करावयास जातों खरा, पण गरीब कोण ? त्यांच्यापैकी कोणीही माझ्याइतका गरीब नाही. मी एक दुर्बल, अजागलस्तनवत् परोपजीवी असून हजारों लोकांनी श्रम केले म्हणजेच निर्माण होऊं शकेल अशा कल्पनातीत परिस्थितींत जिवन्त राहूं शकणारा एक निरर्थक जीव आहें. जो मी झाडाचीं पानें कुरतडून खाणारा जंतू तोच मी झाडाची वाढ व्हावी, तें निरोगी राहावें आणि त्याला बरें करावें असेंही इच्छितों हें आश्चर्य नव्हे काय !

माझा आयुष्यक्रम असा. खावें, बोलावें व ऐकावें; खावें, लिहावें किंवा वाचावें, म्हणजे एका अर्थी पुनः बोलावें व ऐकावें; खावें व खेळावें; खावें व पुनः बोलावें आणि ऐकावें; व शेवटीं खावें व झोपावें. हा कार्यक्रम सतत चालू असून इतर कांहीही मला करतां येतही नाही आणि माझा हा खाण्याचा, बोलण्याचा व ऐकण्याचा कार्यक्रम चालावा एतदर्थ सकाळपासून संध्याकाळपावेतों चाकर, शेतकरी, स्वयंपाकी व स्वयंपाकीण, हजरे, गाडीवान, धोबी या सर्वांनी राबलें पाहिजे. (यांच्याशिवाय, कुऱ्हाडी, पिंप, ब्रश, चिनी मातीचीं भांडी, लांकडी सामान, पेले, पॉलिश, तेल, गवत, सर्पण, मांस इ०—म्हणजे वरील चाकरमाणसांस माझ्या सेवेप्रीत्यर्थ लागणारीं उपकरणीं व सामान—पुरविण्याच्या खटपटींत गुंतलेल्या लोकांची गोष्ट तर बाजूलाच राहो.) आणि हे सर्व बिचारे मला बोलतां, खातां व निजतां यावें एवढ्याकरितां सतत खपत असतात. असा मी स्वतः

इतका रद्दी माणूस असूनही मी इतरांना—जें खरोखर माझें पोर्शिदे होते त्यांनाच—मदत करूं शकेन असा माझा भ्रम होता.

मी कोणालाही मदत केली नाही अगर मला शरम वाटली यांत कांहीच आश्चर्य नाही. मदत करण्याची असंभाव्य कल्पना माझ्या मनांत येऊं शकली हेंच खरें आश्चर्य होय. जी बाई आजारी म्हाताऱ्याची शुश्रूषा करीत होती ती त्याला मदत करीत होती; ज्या शेतकरणीने आपल्या मेहनतीने उत्पन्न केलेल्या आपल्या रोटींतून याचकाला तुकडा दिला तिनें खरोखर गरिबाला मदत केली. सेमेनने आपल्या कमाईंतून तीन कोपेक देऊन भिकाऱ्याला खरी मदत केली. पण मी कोणाचीच सेवा करीत नाहीं, मी कोणाकरितां कष्टही करीत नाही व मी देत असलेला पैसाही माझ्या कमाईचा नव्हता.—

आणि शेवटीं मला असें वाटूं लागलें की या सर्व आपत्तीचें मूळ पैसा असून पैसा जवळ असणें हेंच अनीतिकारक व अनर्थावह आहे व मजजवळ पैसा आहे हेंच मजभोंवतीं असणाऱ्या (संकटग्रस्तांच्या) संकटाचें मुख्य कारण आहे. म्हणून मी स्वत:शींच प्रश्न केला, "हा पैसा म्हणजे काय ?"

प्रकरण सतरावें

पैसा ! पैसा म्हणजे काय ? पैसा हा श्रमाचा प्रतिनिधि होय. कांही सुशिक्षित तर मला अशाही मताचे भेटले की ज्याचे जवळ जो पैसा आहे तो त्याने केलेल्या श्रमाचें द्योतक होय असें ते समजत. एके काळीं कांहीशा अंधुक रीतीने मीही याच मताचा होतों हें कबूल केलें पाहिजे. पण पैसा म्हणजे काय हें जाणून घेण्याची मला गरज भासूं लागली. म्हणून याचें उत्तर मिळण्याकरितां मी (अर्थ) शास्त्राकडे वळलों.

शास्त्र म्हणतें, पैशांत अन्यायमूलक अथवा हानिकारक असें कांहीच नाही. पैसा हा सामाजिक जीवनाचें एक अवश्य साधन असून त्याचे चतुर्विध उपयोग आहेत:— (१) देवघेवीची सोय, (२) किंमत ठरविण्याचें साधन, (३) शिल्लक टाकण्याची सोय व (४) देणीं द्यावयासाठी उपयुक्तता. मजजवळ तीन रूबल शिल्लक असतील तर कोणत्याही सुधारलेल्या गावीं शीळ घालतांच वाटेल तीं घाणेरडीं कामें करावयास तयार असलेले शेकडों लोक मजभोवतीं गोळा होतील. ही उघड परिस्थिति पैशामुळें नसून आमचें गुंतागुंतीचें आर्थिक जीवन व रचना यांमुळें होते (असें शास्त्राचें मत आहे). कांही लोक दुसऱ्यावर सत्ता गाजवितात याचें खरें कारण पैसा नसून मजुराला त्याची पूर्ण मजुरी मिळत नाही हें होय (असा शास्त्राचा अभिप्राय आहे). त्याला मजुरी पूर्ण मिळत नाही याचें कारण भांडवल, भाडें व श्रम यांचे गुंतागुंतीचे संबंध व संपत्तीची उत्पत्ति, विनियोग व विभागणी यांची गुंतागुंत हें होय असें शास्त्राला वाटतें. स्पष्ट रशियन भाषेंत बोलायचें म्हणजे ज्यांच्याजवळ पैसा आहे ते बिन-पैसेवाल्यांची 'गठडी' *वळूं शकतात. पण हें मत शास्त्राला संमत नाही. शास्त्राच्या मतें प्रत्येक उत्पादनांत तीन घटक असतात. जमीन (भूमि), संचित श्रम (अर्थात भांडवल) व प्रत्यक्ष श्रम या त्रयीच्या

---

* 'दोर वळूं शकतात' असा रशिअन भाषाप्रयोग आहे.

एकमेकांवरील गुंतागुंतीच्या क्रियेप्रतिक्रियेमुळें व जमीन व भांडवल हीं मजुरांजवळ नसल्यामुळें कांही लोक इतर कांहींचे गुलाम होतात. जो पैशाचा प्रभाव थक्क करून सोडण्याजोगे अन्याय व क्रौर्य घडवून आणतो तो उत्पन्न तरी कसा होतो ? निव्वळ पैशाच्या साहाय्याने कांही लोक इतरांवर ताबा चालवितात हें कसें ? शास्त्र म्हणतें, उत्पत्तिसाधनांची होत असलेली विभागणी व त्यामुळें बनणारे भिन्न भिन्न गट यामुळें मजुरावर जुलूम होतो. हें उत्तर मला विचित्र वाटे. या उत्तरांत पैशाचें महत्त्व काय या मुख्य प्रश्नाला बगल तर दिली आहेच, पण उत्पत्तिसाधनांची जी विभागणी केली आहे (भूमि, भांडवल व श्रम) तीही वस्तुस्थितीशी जुळती नसूनें कृत्रिम वाटते. प्रत्येक उत्पादनांत भूमि, भांडवल व श्रम हींच असतात असें प्रथम गृहीत धरण्यांत येतें व या आधारावर पुढे असेंही मानतात की स्वाभाविकपणें वरील तीन साधनांच्या मालकांत संपत्तीची विभागणी होते. जमिनीचें भाडें जमीनदारास, भांडवलाचें भाडें अर्थात व्याज भांडवलवाल्यास व श्रमाचें मोल मजुरास. पण वस्तुस्थिति खरोखरच अशी आहे काय ? प्रत्येक उत्पादनांत या तीनच साधनांचा समावेश होतो हेंच मुळीं खरें आहे काय ?

मी हें लिहीत असतां शेजारींच गवत वाळविण्याची क्रिया चालू आहे. या क्रियेंत कोणत्या साधनांचा समावेश होतो बरें ? शास्त्र सांगतें; ज्या जमिनीवर गवत उगवतें ती जमीन, भांडवल उ० कोयते, फावडे; गाडचा इ० गवत गोळा करण्याचीं साधनें आणि श्रम. पण हें खरें नाही हें मी प्रत्यक्ष पाहतों. जमिनीशिवाय–अर्थात् जमीन, ऊन, पाणी व शेतांत दुसऱ्याला आक्रमण न करतां येईल अशी समाजव्यवस्था यांखेरीज–मजुरांचें ज्ञान, त्यांची बोलण्यासमजण्याची योग्यता इत्यादि ज्या अनेक घटकांकडे अर्थशास्त्र दुर्लक्ष करतें तेही यांत येतात.

सूर्यप्रकाश हा प्रत्येक उत्पादनाला जमिनीइतकाच किंबहुना अधिक आवश्यक आहे. शहरांत एखाद्याला भिंत अगर झाडांच्या साहाय्याने दुसऱ्याला प्रकाश मिळणार नाही अशी परिस्थिति निर्माण करतां येईल हें मला समजतें. मग या सूर्यप्रकाशाचा समावेश उत्पत्तिसाधनांत कां केला गेला नाही ? पाणी सुद्धा जमिनीइतकेंच

अवश्य आहे, व कांही लोकांनी दुसऱ्यांना स्वच्छ हवा व पाणी मिळूं न देण्याची शक्यताही कल्पितां येण्यासारखी आहे. सामाजिक सुरक्षितता व मजुरांना अन्नवस्त्र मिळणें हींही उत्पत्तिसाधनेंच आहेत व कांही अर्थशास्त्रज्ञ या गोष्टीला मान्यताही देतात. शिक्षण व वाक्शक्ति हींही याच प्रकारचीं होत. ज्यांचा उल्लेख केला जात नाही अशा या गर्भित उत्पत्तिसाधनांच्या नांवनिशींचा एक सबंध ग्रंथ मला लिहितां येईल. मग भूमि, भांडवल व श्रम या तीन साधनांना निवडून यांवरच अर्थशास्त्राचा सबंध डोलारा कां बरें उभारला गेला? जमिनीप्रमाणेंच सूर्यप्रकाश व पाणी यांना उत्पत्तिसाधन मानणें शक्य आहे. मजुराचें अन्न, वस्त्र, त्याचें ज्ञान व त्याचा प्रसार यांनाही (मजुरांच्या हत्यारांसारखेंच) स्वतंत्र उत्पत्तिसाधन मानतां येईल. सूर्यकिरण, पाणी, अन्न, ज्ञान इत्यादींनाही स्वतंत्र उत्पत्तिसाधनें मानतां येणें शक्य असून यांना वगळून निव्वळ भूमि, हत्यारें (भांडवल) आणि श्रम यांचीच निवड कां करण्यांत आली? याचें हें कारण असूं शकेल काय की आमच्या समाजांत सूर्यप्रकाश, हवा, अन्न किंवा बोलण्याऐकण्या बाबतच्या हक्कासंबंधीं क्वचितच भांडण होत असून भांडण काय तें फक्त जमीन व भांडवल यांच्या हक्काबद्दलच चाललें असतें? याशिवाय दुसरें कारण संभवत नाही, कारण उत्पत्तिसाधनांची आम्ही केलेली वर्गवारी मनःपूत असून प्रत्यक्ष वस्तुस्थितीशीं तिचा यांकिंचित्ही संबंध नाही. पण कदाचित ही विभागणी इतकी स्वाभाविक असावी की आर्थिक संबंध निर्माण झाले की याच तीन साधनांचा विचार प्रामुख्याने पुढे यावा. खरेंच हें असें आहे की काय तें पाहूं या. प्रथम माझ्याभोवतीं जे लाखो रशियन रहिवाशी आहेत त्यांचाच विचार मी करतों. हे रहिवाशी प्रथम एखाद्या जमिनीवर येऊन वसाहत करतात व कामास सुरुवात करतात. जो जमिनीची लागवड करीत नाही त्याला कांही हक्क असूं शकेल ही त्यांपैकी एकाच्याही डोक्यांत कल्पना नसते व 'जमीन' कोणताही निराळा हक्क आपल्या वतीनें सांगत नाही. उलटपक्षीं वसाहतवाले जमीन सर्वांच्या एकत्र मालकीची आहे असें मानतात व प्रत्येकाला वाटेल तेथे व झेपेल इतकें पेरण्या कापण्याचा हक्क आहे असें मानण्यांत येतें. त्यांना जी शेतीकरितां व

घरें बांधण्यास उपकरणीं, साधनें इत्यादि लागतात तींही ते मिळवितात व निव्वळ 'उपकरणांचा (भांडवलाचा)' च कांही हक्क असूं शकेल ही कल्पनाही कोणाच्या डोक्यांत शिरत नाही. इतकेंच नव्हे तर घटकाभर उसनवारीने कामाकरितां नेलेल्या हत्यारांबद्दल (भांडवलाबद्दल) अगर धान्याबद्दल कांही मोबदला (व्याज) घेणें हें ते गर्हणीय समजतात. सारांश वसाहतवाले फुकट उपलब्ध असलेल्या जमिनीवर स्वत:च्या अगर बिनव्याजीं मिळालेल्या उपकरणांच्या साहाय्याने स्वत:करितां अगर सगळयांकरितां काम करतात व अशा वसाहतींत जमिनीचें भाडें, मांडवलावरचें व्याज अगर मजूरी या शास्त्रमान्य विभागांचा कोठेही ठिकाणा नसतो. अशा समाजांचें वर्णन काल्पनिक नसून जें प्रत्येक देशांत घडलें व जें आजही रशियन वसाहतवाल्यांत व इतरत्र घडत आहे त्याचेंच हें वर्णन आहे. माणसाच्या नैसर्गिक सवयी व परिपाठ यांवर इतर कशाचीही छाप पडण्यापूर्वी पावेतों असाच प्रकार असतो. जें प्रत्येकाला स्वाभाविक व बुद्धिग्राह्य वाटेल अशाचेंच हें वर्णन आहे. लोक जमिनीवर वस्ती करतात व आपापल्या स्वाभाविक कलाप्रमाणें कामें करतात व आपणांस आवश्यक असलेलीं साधनें निर्माण करून प्रत्येक जण स्वत:चें काम करीत असतो. त्यांना एकत्र काम करणें सोईचें वाटलें तर तसें करतात. पण ते एकेकटचाने शेती करोत की समुदायाने करोत, त्यांच्या बाबतींत उत्पत्तीचे घटक विभक्त झालेले नसतात. फक्त श्रम व श्रमयोग्य परिस्थिति इतकें असलें की पुरे. सर्वांना उष्णता देणारा सूर्यप्रकाश, प्रत्येक श्वसन करतो ती हवा, ते पितात तें पाणी, ते काम करतात ती जमीन, त्यांचे कपडे, त्यांना पोटास लागणारें अन्न, सब्बल, फावडा, नांगर, एंजिन इत्यादि ज्या गोष्टींचा ते सामुदायिक रीत्या काम करतांना उपयोग करतात त्या गोष्टी कोणाच्याच मालकीच्या नसून जो उपयोग करील त्याच्या त्या असतात आणि ही त्यांची वागणूक माणुसकीला धरून व बुद्धिग्राह्य आहे हें उघड आहे. अशा प्रकारें मनुष्यसमाजाच्या सुरुवातीस त्यांचे आर्थिक संबंध कसे होते याचा जेव्हा मी विचार केला तेव्हा उत्पत्तीच्या घटकांची आजची विभागणी नैसर्गिक नाही असें मला दिसलें. उलट ही अनैसर्गिक व अबुद्धिग्राह्यच वाटते. पण कदाचित

जें समाजाच्या सुरुवातीस शक्य होतें तें लोकसंख्येची व सुधारणेची वाढ होऊं लागली तसतसें अशक्य होऊन आजची विभागणी अपरिहार्य होऊन बसली असावी. कारण युरोपियन समाजांत आजची विभागणी दृढमूल झालेली आहे ही गोष्ट नाकबूल करणें शक्य नाही. असें यावर कोणी म्हटल्यास तें कितपण खरें आहे हें आपण पाहूं. आम्हांला असें सांगण्यांत येतें की यूरोपियन समाजांत ही विभागणी पूर्ण झाली असून कांही लोक जमिनीचे तर कांही भांडवलाचे मालक झाले असून इतरांना जमीन व भांडवल या दोघांनाही नागविण्यांत आलें आहे. कामकऱ्यांजवळ यांपैकी कांहीही नाही. आमच्यांत ही परिस्थिति इतकी मुरली आहे की तिचें वैचित्र्य आम्हांला भासेनासें झालें आहे. पण आम्ही थोडा विचार केला तर वरील विधानांचा विचित्रपणा, त्यांतील चूक, इतकेंच नव्हे तर त्यांतील मूर्खपणा तावडतोब आमच्या लक्षांत येईल. त्या विधानाच्या स्वरूपांतच मुळी विसंगतपणा आहे. 'कामकरी' या कल्पनेंतच त्माला काम करावयास लागणारी जमीन व उपकरणीं या कल्पनांचा समावेश होतो. त्याला राहावयास जमीन व कामास हत्यारें उपलब्ध नसतील तर तो कामकरीच नव्हे. जमीन व हत्यारें यांच्या अभावी कामकरीही असणें शक्य नाही. जमीन किंवा कोयता, गाडी, घोडा यांशिवाय जसा शेतकरी शक्य नाही तसाच एखादा चांभार घर, सूर्यप्रकाश, पाणी, हवा व त्याला लागणारीं हत्यारें यांशिवाय कल्पितां येणार नाही. शेतकऱ्याजवळ जर जमीन, घोडा अगर कोयता नसेल अगर चांभाराला घर, पाणी अगर सुई नसेल तर याचा अर्थ इतकाच की त्याला कोणीतरी त्याच्या जमिनीवरून हाकलून त्याचा कोयता, गाडी, घोडा किंवा सुई हीं लुबाडलीं आहेत. पण यावरून हें सिद्ध होत नाही की नांगराशिवाय शेतकरी अगर हत्यारांशिवाय चांभार असूं शकतो. कोणीतरी पाण्यापासून दूर हाकलून देऊन जाळें हिसकावून घेतलें असल्याशिवाय जमिनीवर (माशा मारीत) बसलेला कोळी कल्पितां येणें जसें कठीण आहे तद्वत् कोणीतरी लुबाडलें असल्याशिवाय बिनजमिनीचा शेतकरी अगर हत्यारांशिवाय चांभार कल्पितां येणें कठीण आहे.

एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणें कांहीना भाग पडलें असेल, त्यांचीं हत्यारें कोणीतरी हिसकावन घेतलीं असतील आणि

इतरांजवळचीं हत्यारें घेऊन स्वत:स जरूर नाही अशा वस्तूंची पैदास करण्यास त्यांना झटावें लागत असेल. पण याचा हा अर्थ नव्हे की ही उत्पादनाची नैसर्गिक परिस्थिति आहे. याचा अर्थ इतकाच की कांही ठिकाणीं निसर्गसिद्ध रचनेचें उच्चाटण झालें आहे. दुसऱ्यांपासून जें लुबाडलें त्या सर्वाला जर उत्पत्तिसाधनांपैकी एक समजावयाचें तर गुलामांच्या शरीरावरील हक्क यालाही उत्पत्तिसाधन कां मानूं नये ? सूर्यप्रकाश, हवा, पाणी यांच्यावरील हक्कांनाही असेंच कां मानूं नये ? एखादा भिंत बांधून शेजाऱ्याचा सूर्यप्रकाश अडवून धरील; एखादा नदीचें पाणी डबक्यांत सोडून तें घाण करील किंवा एखादा गुलामाला आपली मालमत्ता समजेल. पण वरील तीन्ही प्रकार जुलूम जबरदस्तीनें अंमलांत आणले असले तरी यांना उत्पत्तिसाधनें मानणें चुकीचें होईल. सूर्यप्रकाश, हवा किंवा पाणी अडविण्याचा काल्पनिक हक्क अगर गुलामांवरील सत्ता यांना उत्पत्तिसाधनें मानणें जितकें चुकीचें आहे तितकेंच जमिनीवरील काल्पनिक हक्क अगर हत्यारांची मालकी यांनाही उत्पत्तिसाधनें मानणें चुकीचें आहे. गुलामांवर सत्ता सांगणारे किंवा सूर्यप्रकाशावर, हवेवर किंवा पाण्यावर आपलीच मालकी सांगणारे असूं शकतील किंवा कामकऱ्याला ठिकठिकाणांहून पळण्यास भाग पाडून त्याने उत्पन्न केलेलें पीक तयार झाल्याबरोबर तें लुबाडून नेणारे असूं शकतील किंबहुना त्यांचीं हत्यारेंही लुबाडून त्यांना एखाद्या गिरणीमालकाप्रमाणें दुसऱ्याकरितां मजुरी करण्यास भाग पाडणारे लोकही असूं शकतील. त्याचप्रमाणें जमिनीवर व हत्यारांवरही हक्क सांगणारे असतील. पण असें असलें तरी, ज्याप्रमाणें लोक पुरातन काळापासून गुराढोरांप्रमाणें माणसांवर मालकी सांगत असले तरी जसा एक मनुष्य दुसऱ्याचा गुलाम असणें शक्य नाही, तद्वत् जमीन व हत्यारें यांशिवाय कामकरीही असणें शक्य नाही. एखाद्याने दुसऱ्या व्यक्तीवर स्वत:चा मालकी हक्क जरी सांगितला तरी मालकापेक्षा स्वत:चेंच हित बघण्याचा गुलामाचा स्वयंभू हक्क जसा नष्ट होत नाही तद्वत् आजकाल दुसऱ्यांच्या जमिनीवर व हत्यारांवर हक्क सांगणारे लोक जरी हयात असले तरी प्रत्येकाचा जमिनीवरील हक्क व स्वत:च्या उपभोगाकरितां अवश्य

असणाऱ्या जिनसा मिळविण्यास अवश्य असणारीं वैयक्तिक व सामुदायिक साधनें यांवरील त्यांचा स्वयंभू हक्क नाहीसा होत नाही. सध्याची परिस्थिति लक्षांत घेतां (अर्थ) शास्त्र फार तर असें म्हणूं शकेल की कांही लोक कामकऱ्यांच्या जमिनी व त्यांचीं हत्यारें यांवर आपला हक्क सांगूं लागल्यामुळें कांही लोकांच्या (सर्वांच्या नव्हे) बाबतींत उत्पादनाची जी नैसर्गिक परिस्थिति असावयास पाहिजे तिचा उच्छेद होऊन कामकऱ्यांना स्वतःची जमीन व हत्यारें यांना मुकावें लागलें आहे, म्हणून त्यांना दुसऱ्यांचीं हत्यारें वापरणें भाग पडत आहे. पण उत्पादनाच्या निसर्गसिद्ध परिस्थितीचा आकस्मिक उच्छेद हाच उत्पादनाचा नियम समजावा असें मात्र शास्त्र म्हणूं शकणार नाही. एखाद्या प्राणिशास्त्र-वेत्त्याने पंख कापलेले कांही पक्षी लहान पिंजऱ्यांतून पाहून लहान पिंजरे व पाण्याचीं लहान भांडीं एवढेंच पक्ष्यांच्या जीवनाला अवश्य असून कापलेले पंख, पिंजरा व पाणी यांत पक्ष्यांचें जीवन आलें असें म्हणणें व अर्थशास्त्राने " उत्पादनाला भूमि, भांडवल व श्रम हे घटक मूलभूत आहेत " असें प्रतिपादन करणें हीं दोन्ही सारखींच होत. पंख छाटलेले वाटेल तितके पक्षी जाड कागदी पिंजऱ्यांतून पाहिले तरी जाड कागदाचे पिंजरे हीच पक्ष्यांची निसर्गसिद्ध परिस्थिति आहे असें प्राणिशास्त्र-वेत्त्याने म्हणतां कामा नये, तद्वत् वाटेल तितक्या माणसांना त्यांच्या जमिनीपासून दूर करून त्यांचीं उपकरणें हिसकण्यांत आलीं असलीं तरी उत्पादनाची निसर्गसिद्ध परिस्थिति मूळचीच, अर्थात ज्याने त्याने स्वतःच्या जमिनीवर स्वतःच्या हत्यारांनी हवें तें उत्पन्न करावें अशी, राहणार. ज्याप्रमाणें पूर्वी लोकांनी मालक व गुलाम असे विभाग करण्याचा प्रयत्न केला तरी हे खरे विभाग होऊं शकत नाहीत त्याचप्रमाणें अलीकडचे अर्थशास्त्रज्ञ जरी भूमि, भांडवल व श्रम असे विभाग करण्याची कोशीस करीत आहेत तरी हे खरे विभाग बनूं शकत नाहीत. पण अर्थशास्त्रज्ञ मात्र कांही लोकांनी इतरांच्या हक्कांवर जें आक्रमण चालू ठेविलें आहे त्याला स्वाभाविक विभाग असें संबोधतात. मानवी समाजाच्या निसर्गसिद्ध स्वभाव-गुणांस अनुसरून आपलीं मूलतत्त्वें न ठरवितां शास्त्रज्ञांनी एका विशिष्ट परिस्थितीवरून आपलीं तत्त्वें प्रस्थापित केलीं व या तत्त्वांचें समर्थन

५२३८

करण्याकरितां त्यांनी जमीन व उपकरणीं यांचा प्रत्यक्ष उपयोग करणाऱ्यांव्यतिरिक्त इतर लोकांचे हक्क मान्य केले. अर्थात् जो हक्क कधीच अस्तित्वांत नव्हता व असूं शकत नाही तो यांनी मान्य केला. या हक्काची व्याख्याच मुळीं विसंगत आहे. कारण जमिनीवरील हक्क म्हणजे जिचा मी उपयोग करीत नाही अशा जमिनीवर मी उपयोगाचा हक्क सांगतों व हत्यारांवरील हक्क म्हणजे ज्या हत्यारांनी मी कधी काम करीत नाही अशा हत्यारांनी होणाऱ्या कामावर हक्क सांगतों. शास्त्र म्हणतें की कामकऱ्याला आज ज्या अनैसर्गिक परिस्थितींत काम करावें लागत आहे ती उत्पादनाची नैसर्गिक परिस्थिति होय. गुलामगिरीही नैसर्गिक आहे असें पूर्वीचे लोक याप्रमाणेंच प्रतिप्रादन करीत. अस्तित्वांत असलेल्या परिस्थितीचें समर्थन करण्याच्या भरीस पडल्यामुळें व या परिस्थितीलाच शास्त्राचा पाया मानल्यामुळें हें शास्त्र 'जें दिसतें' त्याचा कांही तरी खुलासा देत बसलें असून उपस्थित प्रश्नांचीं सरळ व स्पष्ट दिसणारीं उत्तरें देण्याचें टाळून ज्यांपासून कांही बोध होत नाही अशीं निरर्थक उत्तरें देत बसलें आहे.

अर्थशास्त्रापुढे पुढील प्रश्न आहेत : ज्यांच्याजवळ जमीन व भांडवल आहे ते जमीन व भांडवल नसणाऱ्या लोकांना गुलाम बनवूं शकतात हें कसें? याचें सामान्य बुद्धीला पटणारें उत्तर हें आहे की ज्या पैशांत लोकांना गुलाम बनविण्याची शक्ति आहे त्या पैशाचा हा प्रताप होय. पण (अर्थ)शास्त्राला हें मान्य नाही. तें म्हणतें याचें कारण पैसा नाही, तर कांहींच्या जवळ जमीन व भांडवल नसून कांहींजवळ तीं आहेत हें होय. आम्ही पुनः विचारतों, "जमीन व भांडवलवाले इतरांना गुलाम करतात हें कसें?" पुनः आम्हांला उत्तर मिळतें, "कारण त्यांच्याजवळ जमीन व भांडवल आहे." पण वास्तविक हें उत्तर नसून हाच तर मुळीं आमचा प्रश्न आहे. जमीन व उपकरणीं यांनी नागवलें जाणें यालाच तर गुलामगिरी असें नांव दिलें जातें. आम्ही विचारतों, "यानें झोप कां येते?" आम्हांला उत्तर मिळतें, "यांत झोप येण्याचा गुण आहे म्हणून" यांतलाच हा प्रकार होय. पण अशी मुस्कटदाबी केली तरी जीविताचा प्रश्न वारंवार उद्भवण्याचें थांबत नाही. शास्त्रालाही हें दिसतें

व तें उत्तर देण्याचा प्रयत्नही करतें पण जोंपावेतों अर्थशास्त्र स्वत: मान्य केलेल्या गृहीत विधानांच्या दुश्चक्रांतून सुटका करून घेत नाही तोंपावेतों याचें उत्तर मिळणें कठीण आहे. हें करावयास शास्त्राने प्रथम मान्य केलेले उत्पादनाचे तीन घटक सोडून द्यावे लागतील व जें दिसतें तें गृहीत न धरतां हें असें कां दिसतें याचींच, प्रथम नजीकचीं व नंतर दूरवरचीं कारणें शोधावीं लागतील. शास्त्राने पुढील गोष्टींचा विचार करावयास हवा. कांही लोकांजवळ जमीन व उपकरणीं असून इतर कांहींच्या जवळ तीं नाहीत हें कसें ? किंवा जे जमिनीवर काम करतात अथवा हत्यारें उपकरणीं यांचा उपयोग करतात त्यांपासून त्यांची जमीन व हत्यारें विभक्त कशीं झालीं ? या प्रश्नाचा विचार करूं लागतांच नव्या गोष्टी नजरेस येऊं लागून " मजुरांच्या दारिद्र्याचें कारण त्यांची गरिबी होय " अशा दुष्ट विचाराच्या भोवऱ्यांत गिरक्या खाणाऱ्या खोट्या शास्त्राने गृहीत धरलेलीं सर्व विधानें पालथीं पडतात. सरळ विचाराच्या माणसांना स्पष्ट दिसत आहे की कांही लोक कांहींना गुलाम बनवूं शकतात याचें खऱ्यांतलें खरें कारण पैसाच असावा. पण शास्त्राला हें मान्य नाही व पैसा हा देवघेवीचें साधन आहे असा अट्टाहास शास्त्र करीत आहे. पैशाचा गुलामगिरीशीं कांहीही संबंध नाही असें तें म्हणतें. यांत कितपत तथ्य आहे तें आपण पाहूं.

प्रकरण अठरावें

पैसा कोठून येतो ? कोणत्या परिस्थितींत राष्ट्रांपाशीं पैसा साठतो व ज्या राष्ट्रांतून पैसा नव्हता त्यांची परिस्थिति कशी होती ? पूर्वी जसे सीथिअन किंवा ट्रेव्हलिअन* राहत त्याप्रमाणें आफ्रिकेंत अगर आस्त्रेलियांत एक जात राहते. ही गुरें वाढवितें व फळें वगैरे उत्पन्न करून उपजीविका करते. इतिहासाच्या सुरुवातीला आपण यांचा वृत्तांत वाचतों व नंतर जेत्यांच्या आक्रमणांचा इतिहास सुरू होतो. सर्व जेते एकच गोष्ट करितात. ती म्हणजे, ते या मूळ रहिवाशांपासून नेतां येईल तितकें सर्व धान्य, गुरें, कापड हीं नेतात, किंबहुना माणसें व स्त्रियांना सुद्धा धरून नेतात. हे जेते पुनः कांही वर्षांनी परत येतात पण पूर्वींच्याच लूटमारीचा अनिष्ट परिणाम भोगीत असलेल्या त्या जातीजवळ लुटण्यासारखें कांही नसतें म्हणून हे जेते जितांना लुबाडण्याच्या इतर परिणामकारक शकला काढतात. या शकला सोप्या व कोणालाही सुचतील अशा आहेत. यांतील पहिली तऱ्हा म्हणजे गुलामगिरी होय. पण या प्रकारांत त्या जातींतील सर्व माणसांना काम करावयास लावण्याची व त्यांना पोसण्याची दगदग करावी लागते. म्हणून स्वभावतः दुसरी शक्कल निघते. या शक्कलींत त्या जातीला जमीन पूर्ववत् वापरूं देतात पण मालकी मात्र जेते आपणांकडे घेतात आणि जितांना लुबाडण्याची क्रिया व्यवस्थित व्हावी म्हणून जमिनीचे निरनिराळे तुकडे करून हे तुकडे जेते आपल्या अनुयायांना वाटून देतात. पण या पद्धतींतही थोडीफार कटकट आहेच. कारण या अनुयायांना जितांच्या उत्पादनावर देखरेख करावी लागते. म्हणूनच तिसरी शक्कल–ही देखील फार पुरातन आहे–निघते. ठराविक मुदतीनंतर जितांकडून खंडणी मागणें ही ती शक्कल होय. जेत्यांचा उद्देश जितांना शक्य तितकें अधिक लुबाडण्याचा

---

* या स्लाव्ह जातीचा रशियाच्या पूर्व इतिहासांत उल्लेख आहे.

असतो. याकरितां अर्थातच त्या जातींत ज्या जिन्नसा सर्वांत अधिक मौल्यवान समजल्या जातात व ज्या नेणें अगर साठवणें सोपें असतें अशा जिन्नसाच–उ० सोनें, चामडी इ०– घेतल्या पाहिजेत. म्हणून प्रत्येक कुटुंबाने अगर जातीने अमुक चामडीं अगर सोनें द्यावें असा जेता हुकूम सोडतो. व अशा प्रकारें स्वत:स अत्यंत सोईच्या अशा पद्धतीने जितांना लुबाडीत असतो. जवळचीं कातडीं व सोनें सर्वच लुबाडलें गेल्यामुळे पुन: सोने व चामडीं देतां यावीं म्हणून त्या जातींतील लोकांना आपापसांत किंवा (सरतेशेवटीं) जेत्यांना आपलें इतर सर्वस्व अर्थात् मालमत्ता व श्रम विकावे लागतात. हाच प्रकार पूर्वकालीं व मध्ययुगांत चालू होता व आजही चालू आहे. अगदी प्रथम एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर स्वारी करणें हा प्रकार रूढ होता व ज्या वेळीं समान हक्काच्या कल्पनेंचा कोठेही मागमूस नव्हता त्या वेळीं मुख्यत्वेंकरून वैयक्तिक गुलामगिरीच रूढ होती. मध्ययुगांत जमीनदारी पद्धति अमलांत आल्यामुळें गुलामगिरीचे पाश व्यक्तीवरून उठून जमिनीवर जाऊन बसले. व अमेरिकेचा शोध लागल्यानंतर व्यापाराची भरभराट होऊन सोनें पुष्कळ प्रमाणांत उपलब्ध झाल्यामुळें पैसा हें–सरकारच्या वाढत्या शक्तीबरोबर–वाढत्या प्रमाणांत गुलाम बनविण्याचें साधन होऊन बसलें आहे. आणि आज पैशाच्या पायावरच मनुष्याच्या आर्थिक हितसंबंधाची संपूर्ण इमारत उभारली गेली आहे. एका लेखसंग्रहांत प्रो० यांझुल यांचा फिजी बेटांच्या अलीकडील इतिहासाबद्दल एक लेख प्रसिद्ध आहे. आमच्या काळीं पैसा हें गुलाम बनविण्याचें कसें साधन होऊन बसलें आहे हें सिद्ध करण्यास फिजी बेटांत जें नुकतेंच घडलें व ज्याबद्दल कागदोपत्री पुरावा उपलब्ध आहे त्यापेक्षा जास्त परिणामकारक उदाहरण कल्पनाशक्तीचें साहाय्य घेऊनसुद्धा मला रंगवितां येणें अशक्य आहे.

फिजी लोक दक्षिण पासिफिक महासागरांत फिजी बेटांत राहतात. या सर्व बेटांचें एकंदर क्षेत्रफळ ४०, ००० चौ० मै० आहे असें प्रो०यांझूल म्हणतात. यापैकीं अर्ध्या जागेंतच सुमारें १॥ लाख फिजी लोक व १५०० गोरे लोक राहत आहेत. तेथील मूळ रहिवाशांनी रानटी स्थितीला केव्हांच रामराम ठोकला असून ते शेती व गुरांची जोपासना उत्कृष्ट करतात. या

वरून त्यांची हुषारी, कार्यक्षमता व सुधारणाप्रियता हीं दिसून येतात. ते भरभराटींत होते, पण १८५९ मध्यें त्यांच्या राज्यावर संकट आलें. फिजी लोक व त्यांचा राजा थाकोंबा यांना पैशाची गरज पडली. फिजी लोकांनी अमेरिकेच्या नागरिकांवर अत्याचार केले असा जो बभ्रा करण्यांत आला त्याबद्दल फिजी लोकांनी अमेरिकेला पंचेचाळीस हजार डॉलर खंडणी द्यावयाची होती.

ही खंडणी वसूल करण्याकरितां अमेरिकेने एक आरमार धाडलें. या आरमाराने अकस्मात् कांही उत्कृष्ट बेटें ओलीस म्हणून आपल्या ताब्यांत घेतलीं व अमुक एका तारखेच्या आंत खंडणी वसूल न झाली तर तुमच्या वसतिस्थानांवर तोफांचा भडिमार करून त्यांचा नाश करूं अशीही त्यांना धमकी दिली. फिजी बेटांत धर्मोपदेशक धाडून वसाहत करणारांत अमेरिकन हे पहिले होत. या नाही तर त्या सबबीवर त्यांनी उत्कृष्ट जमीन लुबाडून तेथे कापूस व कॉफी पेरण्यास सुरुवात केली, व जे करारनामे फिजी लोकांना समजणें अशक्य होतें असे करारनामे स्वतः अथवा गुलामांचा व्यापार करणारे ठेकेदार यांच्या मध्यस्थीने त्या लोकांकडून लिहवून घेऊन फिजी मजुरांचे तांडेच्या तांडे त्यांनी आपल्या कामास लावले. अशा मळेवाल्यांत व मूळ रहिवाशांत साहजिकच भांडणें होऊं लागलीं, व अशाच एका भांडणाचें कारण पुढे करून अमेरिकेने वर उल्लेखिलेली नुकसान भरपाई मागितली होती. फिजी लोकांची परिस्थिति चांगली होती तरी मध्ययुगाप्रमाणें ते जिन्नसांचीच देवघेव करीत. ते पैसा वापरीत नव्हते. त्यांचें सरकारही धान्याच्या स्वरूपांत कर वसूल करी. अशा परिस्थितीत एकाएकीं, पंचेचाळीस हजार डॉलर न दिल्यास आम्ही अनर्थापात करूं, अशी धमकी मिळालेल्या फिजी लोकांनी व राजा थाकोंबा याने काय करावें बरें ? फिजी लोकांना तर हा आकडाच मुळीं समजेना. त्यांनी एवढी रकम कधीच पाहिली नव्हती. थाकोंबाने इतर सरदारांचा विचार घेऊन इंग्लंडच्या राणीकडे धाव घेण्याचें ठरविलें. प्रथम त्याने आपल्या बेटांना राणीचें संरक्षण मिळावें अशी विनंती केली व नंतर तर आमचीं बेटें आपल्या राज्यास जोडून घ्या अशी सरळ विनंती

केली. पण इंग्रजांनी या अर्जाचा जपूनच विचार केला, कारण या अर्धरानटी लोकांना संकटमुक्त करण्याची त्यांना विशेष घाई नव्हती. सबब सरळ उत्तर न देतां, फिजी बेटांची तपासणी करण्याकरितां व अमेरिकेचें कर्ज देण्यासाठी पैसे खर्च करणें व फिजी बेटें आपल्या ताब्यांत घेणें आपणास किफायतशीर होईल की नाही हें पाहण्याकरितां १८६० मध्यें त्यांनी फिजी बेटांना एक तुकडी पाठविली.

दरम्यान अमेरिकेने पैशाकरितां तगादा चालू ठेवलाच होता. त्यांनी कांही उत्कृष्ट ठिकाणें कबजांत घेतलीं, फिजी लोकांची सुस्थिति लक्षांत घेऊन खंडणीची रकम एकाएकीं पंचेचाळीसवरून नव्वद हजार डॉलरवर नेली व ताबडतोब जर ही रकम न मिळाली तर खंडणी आणखी वाढवूं असाही धाक त्यांना घातला. अशा प्रकारें चहूंबाजूंनी भंडावल्यामुळें व युरोपियन लोक कर्ज देण्याचे व्यवहार कसे करतात याची माहिती नसल्यामुळें थाकोंबा राजाने कांही गोऱ्या वसाहतवाल्यांच्या सल्ल्यावरून मेलबोर्न (आस्त्रेलियाचें मुख्य शहर) येथील कांही व्यापाऱ्यांकडून वाटेल त्या अटी पत्करून कर्ज मिळविण्याची खटपट चालविली. कारण, एखाद्या खासगी व्यक्तीला सबंध राज्य देऊनही थाकोंबा या कटकटींतून निसटण्यास राजी होता. थाकोंबाच्या या विनंतीवरून मेलबोर्नला एक कंपनी स्थापन झाली. इचें नांव " पालिनेशिअन कंपनी ". या कंपनीने स्वतःस अत्यंत फायदेशीर अशा अटींवर फिजी लोकांच्या राजाशीं करारमदार केले. या कराराप्रमाणें या कंपनीने अमेरिकेचें कर्ज ठराविक तारखेपर्यंत द्यायचें ठरवून त्याच्या मोबदल्यांत प्रथम एक लाख एकर व नंतर पुनः दोन लाख एकर इतकी उत्तम जमीन कंपनीने स्वतः निवडून घेतली. या जमिनीवर व पुढे निर्माण होणाऱ्या (कंपनीच्या) कारखान्यांवर व व्यवहारांवर कोणत्याही प्रकारचा कर लादण्यांत येऊं नये अशी अट होती. शिवाय कंपनीने कैक वर्षांकरितां पेढ्या चालविण्याचा हक्क स्वतःकडे राखून घेऊन मनमुराद रोखे काढण्याचाही हक्क राखून ठेवला होता. हा करार १८६८ मध्यें पूर्ण व पक्का झाल्यावर फिजी लोकांना थाकोंबाच्या सत्तेवरोबर एका दुसऱ्या सत्तेची जाणीव होऊं लागली. ही म्हणजे सर्व बेटांतून मालकीची जमीन असलेल्या व थेट सरकारांत

जबरदस्त वजन असलेल्या या व्यापारी कंपनीची होय. यापूर्वी याकोंबा बाहेरून येणाऱ्या मालावर थोडीशी जकात बसवून लोकांकडून थोडा करभार घेई व राज्यकारभार करी. पण या कराराअन्वयें शक्तिमान् पालिनेशिअन कंपनी अस्तित्वांत येतांच सर्व मनु पालटला. उत्कृष्ट जमिनीचा बराच भाग कंपनीकडे गेल्यामुळें करभार कमी झाला; शिवाय कंपनीला जकात दिल्याशिवाय माल धाडतां अगर मागवितां येई म्हणून इकडच्याही दिशेनें उत्पन्न कमी झालें. तेथील मूळ रहिवाशी (म्हणजे एकंदर लोकवस्तीपैकी शें. ९९ लोक) गरीब असून थोडेंसें कापड व भांडीं यांखेरीज कोणताही विलायती माल वापरीत नसत. अर्थात् जकातीच्या उत्पन्नाचा फारच थोडा अंश त्यांजपासून मिळत असे. आणि जे श्रीमंत युरोपीय रहिवासी होते त्यांची तर आता करापासून मुक्तता झाली होती. अशा प्रकारें थाकोंबाचें उत्पन्न अगदी धुळीस मिळालें. तेव्हा तें वाढविण्यासाठी त्याला हातपाय हालविणें अवश्य झालें. त्याने गोऱ्या सल्लागारांचा सल्ला घेतला व फिजी बेटांत प्रथम प्रत्यक्ष कर लादण्याची सूचना पुढे येऊन करवसूली सोपी जावी म्हणून हा कर पैशाच्या रूपाने वसूल करावा असें ठरलें. दर माणशीं एक पौंड व स्त्रीला चार शिलिंग हें कराचें प्रमाण ठरलें.

पूर्वी म्हटल्याप्रमाणें अजूनही फिजी बेटांत शेती कसणें व जिन्नसांची प्रत्यक्ष देवघेव करणें यांचाच प्रघात आहे. मूळ रहिवाशांपैकी फारच थोड्यांजवळ पैसा आहे. शेतांत उत्पन्न होणारीं विविध पिकें व गुरें हीच त्यांची संपत्ति होय. पण या नव्या कराने सर्व रहिवाशांवर ठराविक तारखेस ठराविक रकम देण्याची जबाबदारी येऊन पडली. कुटुंबवत्सल माणसांना हा बोजा जबरच होता. यापूर्वी कोणीही रहिवासी मजूरीखेरीज व्यक्तिशः सरकारला कांही देत नसे; सरकारकडे जो कर जावयाचा तो सबंध खेड्यातर्फे सामुदायिक शेतांच्या उत्पन्नांतून जाई व याच शेतांवर त्याचीही बहुतेक गुजराण होत असे. पण आता पैसा मिळविण्याचा त्याला एकच मार्ग उरला. तो म्हणजे ज्यांच्याजवळ पैसा होता त्या गोऱ्या व्यापाऱ्यांकडे अथवा मळेवाल्यांकडे धाव घेणें, हा होय. पहिल्याकडे (गोऱ्या व्यापाऱ्याकडे) गेल्यास त्याला स्वतःचा माल वाटेल त्या (कमी) किमतींत विकावा लागे, कारण विशिष्ट

तारखेस त्याला कर भरणें भाग होतें; अथवा पुढच्या पिकांच्या तारणावर त्याला कर्ज काढावें लागे व या परिस्थितींत व्यापारी अर्थातच अमानुषपणें त्याला पिळून काढी. दुसऱ्याकडे (मळेवाल्याकडें) गेल्यास त्याला मजूर तरी व्हावें लागे. पण पुष्कळ लोक मजुरी करावयास तयार असल्यामुळें फिजी बेटांत मजुरीचा दर (सरकारी अहवालाप्रमाणें) फार कमी म्हणजे दर माणशीं आठवड्यास एक शिलिंग किंवा वर्षास सुमारें दोन पौंड बारा शिलिंग इतका होता. म्हणून कुटुंबाची गोष्ट तर बाजूलाच राहो, पण निव्वळ स्वत:वरील जिझिया कर देण्याकरितां त्याला आपलें घरदार, जमीन, बायकामाणसें हीं सर्व सोडून दूरवर—कधी कधी दुसऱ्या बेटांतसुद्धा–जावें लागे व नवा बसविलेला कर देतां यावा एवढ्याच करितां एखाद्या मळेदाराला सहा महिन्यांच्या नोकरीचा करार लिहून द्यावा लागे; कुटुंबांतील इतर माणसांचा कर देण्यास त्याला निराळी खटपट करावी लागत असे. या परिस्थितीच्या परिणामाची सहज कल्पना करतां येईल. आपल्या दीड लाख लोकांकडून थाकींबा फक्त सहा हजार पौंड गोळा करूं शकला. तेव्हा कराची जारीने मागणी सुरू झाली व कडक उपायही सुरू झाले. जे स्थानिक अधिकारी पूर्वी प्रामाणिक असत त्यांनी गोऱ्या लोकांशीं संगनमत केलें. तेव्हां गोऱ्यांनीच सत्ता वहिवाटावयास सुरवात केली. कर न दिल्याबद्दल खटले भरण्यांत येऊं लागले. कोर्ट खर्च लादण्यांत येऊं लागला व वर कैदही होऊं लागली. जो पहिला गोरा माणूस एखाद्या फिजीचा कर व कोर्टखर्च देई त्याचा मळाच तुरुंग बने व त्या फिजीला मळ्यावर कैदीवजा राहावें लागे. अशा प्रकारें गोऱ्या लोकांना वाटेल तितके मजूर स्वस्तांत मिळूं लागले. पहिल्या प्रथम अशा प्रकारें अधिकांत अधिक सहा महिने सक्तीची मजुरी फिजींना करावी लागे. पण पुढे भाडोत्री न्यायाधीश अठरा महिन्यांची सुद्धा शिक्षा देऊं लागले व शिक्षा संपल्यावर पुन: लादूं लागले. अशा प्रकारें फारच थोड्या काळांत फिजी बेटांतील आर्थिक जीवनाचा नूर पूर्णपणें बदलला. भरभराटलेले टापूच्या टापू अर्धउध्वस्त होऊन लोक दरिद्री झाले. म्हातारे व दुर्बल यांखेरीज सर्व पुरुष कर देण्याकरितां अथवा सजा भोगण्याकरितां

आपापल्या घरादारांपासून दूर जाऊन गोऱ्या मळेवाल्यांचीं कामें करूं लागले. फिजी बायका शेतीचीं कामें क्वचितच करतात, म्हणून पुरुषांच्या गैरहजिरीमुळें शेतीकडे दुर्लक्ष होऊं लागलें, किंबहुना जमिनी सर्वस्वीं पडीत झाल्या. थोड्याच वर्षांत सुमारें अर्धे फिजी लोक गोऱ्यांचे गुलाम होऊन बसले. स्वत:ची परिस्थिति सुधारण्याकरितां फिजी लोकांनी पुन: इंग्लंडकडे धाव घेतली. वजनदार व मोठमोठ्या लोकांच्या सह्यांनिशीं "आम्हांला ब्रिटिश प्रजाजन करा" अशा अर्थाचा एक अर्ज ब्रिटिश वकिलाच्या हवालीं करण्यांत आला. हा वेळ पावेतों फिजी बेटांची पाहणी करण्याकरितां आलेल्या ब्रिटिश टोळीच्या कृपेने फिजी बेटांचा काना कोंपरा धुंडाळला गेला असून त्यांना फिजी बेटांची किंमत कळून चुकली होती. म्हणून १८७४मध्यें ही बोलाचाली पूर्णपणें यशस्वी झाली व अमेरिकन मळेवाल्यांचीं तोंडें आंबट करून ब्रिटिशांनी राजरोसपणें फिजी बेटें नवी वसाहत या नात्याने आपल्या ताब्यांत घेतलीं.

थाकोंबा मरण पावला व त्याच्या वारसांस लहानसें पेन्शन देण्यांत आलें. बेटांचा राज्यकारभार सर हर्क्युलीस रॉबिन्सन (लॉर्ड रासमीड), न्यू साऊथ वेल्सचे गव्हर्नर, यांजकडे सोपविण्यांत आला. ब्रिटिश साम्राज्याला जोडल्यानंतर एक वर्ष पावेतों फिजी बेटांना स्वतंत्र सरकार नव्हतें; पण नंतर सर हर्क्युलीस यांनी एक कारभारी नेमला. बेटांचा ताबा घेतल्यानंतर फिजी लोकांच्या सर्व आकांक्षा पूर्ण करण्याचें कठीण काम इंग्रज सरकारच्या अंगावर पडलें. अगदी सुरुवातीस जिझिया कर बंद होईल अशी इकडे फिजी लोकांची अपेक्षा होती. बरें गोऱ्या लोकांविषयीं म्हणावें तर एकीकडे त्यांपैकी जे अमेरिकन होते ते ब्रिटिश राज्यकारभाराबद्दल साशंक होते व दुसरीकडे जे स्वत: ब्रिटिश होते त्यांना फाजील सवलतींची अपेक्षा होती. या इंग्रज वसाहत्यांना वाटे की फिजी लोकांवर आपली हुकुमत चालावी व आपण बळकाविलेल्या जमिनीची आपणास मालकी मिळावी. इंग्रज सरकारने मात्र या परिस्थितीला उत्तम तोंड दिलें. ज्या जिझियामुळें फिजी लोकांना मूठभर गोऱ्या लोकांच्या फायद्याकरितां गुलाम व्हावें लागे तो कर इंग्रजांनी प्रथम बंद केला. हें योग्यच होतें, कारण या करापासून मुक्तता व्हावी म्हणूनच फिजी लोकांनी ब्रिटिशांचा ताबा

पत्करला होता. पण प्रत्येक वसाहतीचा खर्च तिच्या उत्पन्नांतूनच भागला पाहिजे हा जो ब्रिटिशसरकारचा वसाहतींबद्दलचा सिद्धांत होता त्यामुळें सर हर्क्युलीस साहेबांना पेच पडला, कारण जिझिया कर थांबवित्यावरोबर फिजी बेटांचें उत्पन्न एकूण (अर्थात् जकातींचें) ६००० पौंडांवर आलें व खर्च कमींत कमी ७०००० पौंड होता. पैशाचा जिझिया कर बंद केला म्हणून सर हर्क्युलीस साहेबांनी सक्तीच्या मजुरीच्या रूपानें नवा कर सुरू केला. पण याने त्यांना व त्यांच्या मदतनिसांना खर्चास लागणारे वर्षाचे सत्तर हजार पौंड उगवेनात. सर ए. एम्. गॉर्डन (लॉर्ड स्टॅनमोर) यांची नेमणूक होईपावेतों अशीच रड चालू होती. सर गॉर्डन यांनी मात्र बेटांतल्या बेटांत भरपूर पैसा लोकांच्या हातीं खेळूं लागेपावेतों पैसा मागावयाचा नाही असें ठरवून पिकेंच गोळा करावीं व तीं विकण्याचें काम स्वतः करून पैसा उभारावा अशी योजना केली.

फिजी लोकांच्या दुर्दैवाच्या या कहाणीवरून पैसा ही काय चीज आहे व त्याचें महत्त्व काय हें स्पष्ट होतें. या वृत्तांतांत सर्व कांही येऊन गेलें आहे. गुलामगिरीचा पहिला पाया—तोफा, धमक्या, खून, जमीन ताब्यांत घेणें, आणि इतर सर्व हत्यारांस बाजूला सारणारें सर्वांत मुख्य हत्यार–पैसा —या सर्वांचेंच दिग्दर्शन या हकीकतींत झालें आहे. इतर राष्ट्रांच्या आर्थिक जीवनाच्या शतकांवारी इतिहासांतून जें पाहावयास मिळतें तें, पैशाच्या साहाय्याने जुलूम करण्याचे सर्व प्रकार सध्या परिणत झालेले असल्यामुळें, या ठिकाणीं निव्वळ दहा वर्षांच्या अवधींत केंद्रीभूत झालेंलें दिसतें. ज्या बेटांतील लोकांना गुलाम करावयाचें त्या बेटावर आरमार घाडून अमेरिकेने या नाटकाच्या पहिल्या प्रवेशास सुरुवात केली. ढोंग पैसे मागण्याचें, पण नाटकाची खरी सुरुवात यच्चयावत् रहिवाशांवर–बायका, मुलें, म्हातारे, दुबळे, सर्वांवर–तोफा रोखण्यांत येऊन झाली. हेंच नाटक सध्या आफ्रिका, मध्य आशिया व चीन या देशांत चालू आहे. "पैसा द्या, नाही तर जीव घेतों" हीच धमकी राष्ट्रांच्या इतिहासांत वारंवार उजळली गेली आहे. प्रथम ४५००० डॉलर, नंतर ९०००० डॉलर, नाही तर बिजन. पण ९०००० नव्हते; तरी अमेरिकांनी ते घेतले. येथून नाटकाचा दुसरा अंक सुरू झाला. तडका फडकी होणारी कत्तल थांबली,

परंतु नजरेस न येणारी पण अधिक काळ हाल करणारी पद्धत सुरू झाली. आणि शेवटीं कत्तलीच्या ऐवजी आर्थिक गुलामगिरी पत्करण्याची खटपट लोक व त्यांचा राजा यांनी स्वत:च सुरू केली. कर्ज काढण्यांत आलें व नंतर पैशाने प्रस्थापित होणारे दास्याचे निरनिराळे प्रकार पद्धतशीर रीतीने निर्माण करण्यांत आले.

याप्रमाणें एखाद्या शिस्तबाज सैन्याप्रमाणें पांचच वर्षांत या प्रणालीने आपला कार्यभाग आटोपला. लोकांच्या जमिनी अथवा मालमत्ता गेली. पण एवढ्यावरच तें न थांबतां फिजी लोक बिचारे स्वत:ही गुलाम होऊन बसले.

येथे तिसऱ्या अंकास सुरुवात होते. परिस्थिति फारच बिघडली व लोकांना कुणकुण लागली की मालक बदलून दुसऱ्याची गुलामगिरी पत्करणें शक्य होतें. (पैशाने जी गुलामगिरीची शृंखला एकदाची त्यांच्या पायांत अडकविली ती तोडण्याची कल्पना अशक्यच होती.) रहिवाशांनी दुसऱ्या मालकाला आमंत्रण दिलें व आमचे कष्ट कमी करा अशी त्यांना विनंती केली. इंग्रज आले व त्यांच्या देशांत जे बरेच ऐतखाऊ त्या देशास जड होऊन बसले होते त्यांची येथे सोय लागण्याची शक्यता पटल्यामुळें त्यांनी या बेटांना आपल्या राज्यास जोडून घेतलें. पण जुनाट पद्धतीनुसार त्यांना गुलाम बनवितां अगर आपल्या अनुयायांना जमिनीचे तुकडे बहाल न करतां –कारण हे मार्ग जुने व टाकाऊ ठरून बराच काळ लोटला होता–फक्त खंडणी वसूल करण्यानेच त्यांचा कार्यभाग होण्याजोगा होता. मात्र खंडणी इतकी जबर असण्याची गरज होती की एकीकडे गुलामगिरीचें जोखड कायमचें फिजी लोकांच्या मानेवर बसावें व दुसरीकडे ऐतखाऊंचें सैन्य पोसतां यावें.

फिजी लोकांनी सत्तर हजार पौंड द्यावे याच अटीवर इंग्रजांनी फिजी लोकांची अमेरिकनांच्या गुलामगिरींतून सुटका करण्याचें कबूल केलें होतें. आणि एवढी गोष्टच फिजी लोकांना गुलाम बनविण्यास अगदी पुरे होती. पण असें दिसून आलें की फिजी लोक ज्या परिस्थितींत होते तींत सत्तर हजार पौंड मिळणें अशक्य होतें. मागणी फारच जबर होती, म्हणून इंग्रजांनी आपली मागणी तात्पुरती बदलली व सुरुवातीला मागणीचा कांही भाग धान्य इ० च्या स्वरूपांतही घेण्यास ते तयार झाले. कारण कांही

दिवसांनी पैसा खेळूं लागला म्हणजे पूर्ण वसूली करतां येणें शक्य होतें. इंग्लंडची वागणूक पूर्वीच्या कंपनीसारखी–म्हणजे जशी पूर्वी जंगली लोकांची जितांना शक्य तितकें लुबाडून निघून जाण्याची पद्धत असे तशी– नव्हती. इंग्लंडची पद्धती दूरदर्शीपणाने गुलाम बनवण्याची होती. सोन्याचें अंडें देणाऱ्या कोंबडीला कापण्याचा मूर्खपणा न करतां कोंबडी मौल्यवान अंडीं देते याकरितां ते कोंबडीला चांगलें खाऊं घालण्यासही तयार होते. प्रथम स्वेंच्छेने लगाम सैल सोडून पुढे तो आखडावयाचा व ज्या पैशाच्या गुलामगिरींत आज युरोपखंड आहे व ज्या गुलामगिरींतून सुटका नाही, अशा कायम गुलामगिरींत फिजी लोकांना लोटायचें या धोरणाने काम चालूं होतें.

पैसा हें देवघेवीचें साळसूद साधन आहे; पण एखाद्या देशाच्या किनाऱ्याशीं तेथील देशवासीयांवर तोफा रोखून ठेविलेल्या असतांना मात्र नव्हे. तोफा रोखून जेव्हा पैसा उकळला जातो, तेव्हा मात्र हटकून जें फिजी बेटांत घडलें व जें सर्वत्र भूतकाळांत घडलें व आजही घडत आहे, तेंच घडतें. जुन्या काळीं रशियांतील राजे व जुने रहिवाशी ड्यूव्हलियन यांच्या दरम्यान हेंच घडलें व हेंच सर्व सरकारें व त्यांचे प्रजाजन यांमध्यें घडलें व घडत आहे. ज्यांना दुसऱ्यावर जुलूम करण्याची शक्ति आहे ते जुलूम करतां यावा म्हणून इतक्या भक्कम रकमेची मागणी करतात की मागणी केलेल्यांना या जुलमी लोकांचें गुलाम होणेंच भाग पडावें. शिवाय गुलामगिरी शक्य तितक्या लवकर अमलांत यावी म्हणून फिजी लोक व इंग्रज यांच्या दरम्यान घडलें तेंच नेहमीं घडतें. म्हणून मागणी जी केली जाते ती कमी असण्याचा बिलकुल संभव नसून उलट ती स्वत:च्या (सरकारी) खर्चाला आवश्यक असणाऱ्या पैशाच्या मानाने ऐसपैस असण्याचीच भीति असते. जर नीतीची कांही चाड असेल तर (सरकारकडून) गरजेची मर्यादा ओलांडिली जाणार नाही; पण नीतीची चाड असली तरी स्वत:ची गरज भागेल इतक्या मर्यादेपावेतों मात्र मागणी करण्याचें कोणीही थांबणार नाही. पण कोणतेंही सरकार झालें तरी या मर्यादा ओलांडतेंच; कारण एक तर सरकारला नीतीची चाड नसते आणि लढाया व सरकारपक्षपाती लोकांचे पगार यांमुळें सरकारें स्वत:च अतिशय तंगींत असतात. सतत नाक बुडेतों सरकारें कर्जांत असतात म्हणून

त्यांची इच्छा असली तरी—१८व्या शतकांतील एका रशियन मुत्सद्यानें म्हटल्याप्रमाणें—"शेतकऱ्याची सतत हजामत चालू ठेवा; त्याला केसाळूं देतां कामा नये" या इशाऱ्याबरहुकूम वागल्याखेरीज त्यांना गत्यंतर नसतें. सर्व सरकारें (इंग्लंड किंवा अमेरिकेंत कधी कधी आकस्मिक कारणामुळें सरकारी कर्ज कमी होतें हा अपवाद वगळल्यास) कर्जबाजारी असून कर्जाची रकम प्रतिवर्षी भयंकर प्रमाणांत वाढत आहे. त्याचप्रमाणें खर्चाचें प्रमाणही वाढीवर आहे. कारण इतर आक्रमणशील सत्तांशीं झगडावें लागतें व स्वत:च्या आक्रमणाला मदत करणाऱ्यांना पैसा चारावा लागतो. यामुळें जमिनीवरील करही याच प्रमाणांत वाढतो. मजुरीचे दर न वाढण्याचें कारण "भाड्याचा नियम" हें नसून सरकारला कर व जमिनीचें भाडें देण्याकरितां लोकांना जुलमाने पिळून काढण्यांत येतें, व त्यामुळे लोकांजवळून त्यांची सर्व शिल्लक लुबाडली जाऊन त्यांना आपले श्रम विकणें भाग पडतें, हें होय. हे श्रम लुबाडणें हाच तर सर्व करांचा उद्देश असतो. अशा प्रकारें जर कामकऱ्यांना गुलाम बनविणें असेल तर त्यांना स्वत:च्या पोषणाकरितां आवश्यक असणाऱ्या गोष्टींना मुकावें न लागतां ते जितकें देऊं शकतील त्यापेक्षा जास्त मागणी केली पाहिजे. मजुरी जर वाढविली तर अशा प्रकारें ते गुलाम बनण्याची शक्यताच नष्ट होते. म्हणून अर्थातच जोंपावेतों जुलूम-जबरदस्तीचें साम्राज्य आहे तों पावेतों मजुरी वाढणें शक्य नाही. एका प्रकारच्या माणसांच्या गटाची दुसऱ्या गटावर ही जी क्रिया घडत आहे, तिला अर्थशास्त्रज्ञ "दुर्भेद्य नियम" म्हणून संबोधतात, व ज्याच्या साहाय्याने ही क्रिया घडते त्या साधनाला—पैशाला—ते "देवघेवीचें साधन" असें नांव देतात.

देवघेवीचें साधन हें साळसूद नांव ज्याला दिलेलें आहे तो पैसा जर नेहमीच्या व्यवहाराला आवश्यक म्हणावा तर जेथे सक्तीने करवसूली होत नसे त्या ठिकाणीं तो कां नव्हता ? आणि फिजी, किरगिझ, आफ्रिकन अगर फोएनिशियन लोकांत, किंवा सामान्यत: कर न देणाऱ्या सर्व लोकांमध्यें, प्रत्यक्ष जिनसांचीच देवघेव कां चालत असे व कधी कधी किमतीचें प्रासंगिक द्योतक म्हणून मेंढ्या, लोंकर, कातडीं, अगर शंख यांचा कां उपयोग करण्यांत येत असे ? विशिष्ट

विशिष्ट स्वरूपाचाच पैसा लोकांमध्यें रूढ केव्हा होतो, तर सर्वांकडून जबरदस्तीने तोच मागितला जातो तेव्हा. अशी स्थिती आली म्हणजेच जुलमापासून आपली सुटका करून घेण्यासाठी प्रत्येकाला पैशाची जरूरी भासते आणि या पैशाला कायम टिकाऊ अशी किंमतही चढते. अशा प्रकारें त्याला किंमत चढते ती तो देवघेवीला अत्यंत सोईचा म्हणून नव्हे तर सरकार त्याची मागणी करतें म्हणून. जर सोन्याची मागणी करण्यांत येत असेल तर सोन्याला किंमत चढेल; जर बोटांचीं पेरहाडें (knuckles) हवीं असतील तर त्या हाडांनाही किंमत चढेल. असें नाही म्हणावें तर हें चलन गिर्माण करण्याचा हक्क नेहमी सरकाराकडेच कां होता व आहे? लोकांनी–समजा फिजी लोकांनी–देवघेवीची कांही पद्धत ठरविली. तुम्ही–जे शक्तिमान असून बळजबरी करूं शकतां–स्वस्थ बसा व त्यांची पद्धतीच चालूं द्या. पण प्रत्यक्ष पाहावें तों तुम्ही पैसा (नाणें) पाडतां व दुसऱ्याने तो तयार करूं नये असा कायदाही करतां किंवा निव्वळ कागद छापून त्यावर राजांची मुद्रा व कोणाची तरी सही छापून, इतरांनी त्याची नक्कल केल्यास, त्याला जबर शिक्षा ठेवून हाच पैसा आपल्या नोकरांना देतां आणि जमिनीचा कर लोकांनी याच पैशांत अगर कागदांत आणि तोही कामकऱ्याला स्वत:ची सर्व मेहेनत विकणें भाग पडेल इतक्या प्रमाणांत द्यावा असें ठरवितां; आणि हें सर्व करून पुन: "पैसा देवघेवीचें साधन म्हणून अवश्य आहे" अशीही ग्वाही देतां! (तुमचें म्हणणें की) सर्व माणसें स्वतंत्र आहेत, कोणी कोणावर जुलूम करीत नाही, कोणी कोणास गुलाम बनवीत नाही, फक्त समाजांत पैसा व (भाड्याचा) एक दुर्भेद्य नियम–ज्याच्यामुळें जमिनीचें भाडें वाढतें व मजुरी कमाल कमी होते–अस्तित्वांत आहे. अर्धे किंबहुना अर्ध्याहून अधिक रशियन शेतकरी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर आणि जमिनीचा सारा यांच्या दडपणामुळें जमीनदारांचे व कारखानदारांचे गुलाम होऊन बसले आहेत याचा अर्थ त्यांना जें जुलूम-जबरदस्तीने सरकारांत व सरकारी नोकरांना व जमीनदारांना द्यावें लागतें त्यामुळें ते गुलाम बनले असा नसून, निव्वळ देवघेवीचें साधन असलेला पैसा व "दुर्भेद्य नियम" यांच्या अस्तित्वामुळें ते गुलाम बनले, असा समजावयाचा काय?

गुलामगिरी जेव्हा नष्ट झाली नव्हती तेव्हा मी माझ्या गुलामाला पाहिजे तें काम सांगू शकत असें; जर त्याने तें करण्याचें नाकारलें तर त्याला मी पोलीसांत देईं व तो कामास कबूल होईपर्यंत पोलीस त्याला चाबकाने झोडपीत. पण मी त्याच्याकडून फाजील काम घेऊन त्याला जमीन किंवा अन्न देण्याचें नाकारलें असतें तर मला अधिकाऱ्यांस जाबही द्यावा लागला असता. आता लोक स्वतंत्र आहेत तथापि मी व्हांका, सिडो-रका अथवा पेट्रष्का यांना हवें तें काम करावयास भाग पाडूं शकतों. ते जर नाकारतील तर मी त्यांना पैसा देत नाहीं; यामुळें ते कर भरूं शकणार नाहीत व शेवटीं त्यांनी नमतें घेईपर्यंत त्यांची पाठ फोडण्यांत येईल. याशिवाय आता तर मी, ज्याला जमीन नाही अगर खायला अन्न नाही असा जर्मन, फ्रेंच, चिनी अगर हिंदू यालाही, तो माझ्या इच्छेला मान वाकवील तेव्हाच त्याला जमीन खंडाने घेण्यास अथवा खावयाला रोटी घेण्यास पैसा द्यावयाचा असें ठरवून राबवून घेऊं शकतों. इतकेंच नव्हे तर त्यांना मी त्यांच्या शक्तीबाहेर काम करावयास लावून शेवटीं त्यांचा प्राण घेतला तरीही मला कोणी विचारणार नाही. आणि इतकेंही करून मी जर अर्थशास्त्राबरील पुस्तकें वाचलीं असतील तर माझा असा ठाम समज होऊं शकेल की सर्व माणसें स्वतंत्र आहेत व पैशामुळें कांही गुलामगिरी अस्तिवांत येत नाही. शेतकऱ्यांना हें केव्हाच पटलें आहे की बडग्यापेक्षा रुपयांचा मार फार झोंबतो. अर्थ-शास्त्राला मात्र हें पटत नाही. पैशाने गुलामगिरी उद्भवत नाही हें म्हणणें, अर्धशतकापूर्वी (आता सुमारें १०० वर्षांपूर्वी) गुलामांच्या रूढीनें गुलामगिरी निर्माण होत नव्हती असें म्हणण्याइतकेंच हास्यास्पद आहे. अर्थशास्त्रज्ञ म्हणतात की पैशाने एक दुसऱ्याचा गुलाम बनत असला तरी पैसा स्वतः मात्र देवघेवीचें साळसूद साधन आहे. अर्धशतकापूर्वी "गुलामां-चा कायदा" हें सुद्धा श्रमांच्या देवघेवीचें एक साळसूद साधन होतें, असें कां म्हणूं नये ? कांही माणसें काबाडकष्ट करीत व इतर त्यांच्या अन्नपाण्याची व उन्नतीची व्यवस्था करीत असें गुलामगिरीचें समर्थन का करूं नये ? पण मला वाटतें असें समर्थन तेव्हा होतही असे.

प्रकरण एकोणिसावें

न्यायशास्त्रें जशीं जुलमाचें समर्थन करण्याच्या मार्गें लागलीं आहेत त्यांच्याप्रमाणेंच जर हें नामधारी अर्थशास्त्र जुलमाचें समर्थन करण्याचें थांबवील तर आज ज्या प्रकारची संपत्तीची विचित्र विभागणी अस्तित्वांत आहे—अर्थात् जिच्यामुळें कांही व्यक्तींपासून जमीन व भांडवल लुबाडून घेतलीं जातात आणि कांही व्यक्ति इतरांना गुलाम बनवितात—तिचें एकमात्र खरें कारण पैसा होय व पैशाच्या साहाय्यानेच एक गट दुसऱ्या गटाचे श्रम घशांत टाकतो व त्याला गुलाम बनवितो हें अर्थशास्त्राच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाही.

मी पुनः म्हणतों : एक व्यक्ति आपल्या पैशाच्या जोरावर सर्व धान्य विकत घेऊन दुसऱ्याची उपासमार करते व या दुसऱ्याच्या "भाकरीच्या गरजेचा" फायदा घेऊन त्याला गुलाम बनविते. ही क्रिया आमचे डोळ्यांदेखत भरमसाट प्रमाणावर चालू आहे. यामुळें पैसा व गुलामगिरी यांचा अन्योन्य संबंध काय आहे याचा विचार करण्याची गरज स्पष्ट वाटावी; पण अर्थशास्त्र मात्र आत्मविश्वासपूर्णतेने सांगत आहे की पैसा व गुलामगिरी याचा अर्थांअर्थीं कांही संबंध नाही.

शास्त्र म्हणतें : पैसा हा इतर जिनसांप्रमाणेंच एक जिन्नस असून याची किंमतही इतर जिनसांप्रमाणेंच उत्पत्तीच्या खर्चावरून ठरते. फरक इतकाच की किमतीचें माप म्हणून, शिल्लक ठेवण्याकरितां व देवघेवीचें साधन म्हणून, या विशिष्ट जिनसाची निवड केली आहे. एक बूट तयार करतो, दुसरा धान्य पिकवतो व तिसरा मेंढ्या पाळतो. या सर्वांना आपल्या श्रमाने उत्पन्न केलेल्या मालाची देवघेव करितां यावी म्हणून पैसा—पैसा श्रमाचा प्रतिनिधि असतो—उपयोगांत येत असून याच्या योगाने चामड्याचे तळवे देऊन चांभाराला मांस व दहा पौंड कणीक दोन्ही मोबदल्यांत घेतां येणें शक्य असतें.

या नामधारी शास्त्राच्या पंडितांना स्वतःशीं अशी काल्पनिक परिस्थिति कल्पनेने रंगविण्यांत फार गोडी वाटते. पण ही परिस्थिति जगांत

त्यक्ष अस्तित्वांत कधीच नव्हती. तत्वज्ञानी लोक पूर्वकालीं दोष-रहित व पूर्णत्वास गेलेल्या समाजाचें जें काल्पनिक चित्र रंगवीत असत तशासारखी काल्पनिक ही परिस्थिति आहे. परंतु अशी स्थिति कधीच अस्तित्वांत नव्हती. जेथें जेथे पैशाचें अस्तित्व दिसतें अशा सर्व मानवी समाजांत अशक्त व शस्त्रहीन लोकांवर सशक्त व शस्त्रधारी लोकांनी जुलूमच केला आहे. आणि जेथे जेथे जुलूम झाला तेथे किंमतीचें माप म्हणून समजल्या जाणाऱ्या पैशाचें—मग तो गुरें, कातडीं, लोंकर किंवा धातु कोणत्याही स्वरूपांत असो—किंमतीचें माप या नात्याचें महत्व लयास गेलें व पैसा फक्त जुलमाचें साधनच होऊन बसला. पैशामध्यें जे साळसूद गुण आहेत असें शास्त्रज्ञ सांगतात ते खरोखर त्यांत आहेत. पण कोठे ? ज्या समाजांत माणूस माणसावर जुलूम करीत नाही तेथे. परंतु अशा समाजांत पैसा म्हणून पैशाची गरजच लागणार नाही. कारण ज्या समाजांतून जुलूम नव्हता तेथे पैशासारखें किंमतीचें सर्रास असें माप असण्याचें कारण नाही. आम्हांला माहीत असलेल्या समाजांत पैशाला देवघेवीचें साधन म्हणून जें महत्त्व आलें आहे तें पैसा जुलुमाचें साधन आहे म्हणूनच होय; व पैशाचें खरें महत्त्व देवघेवींचें साधन म्हणून नसून तो जुलुमाचें साधन आहे म्हणूनच आहे. जेथे जुलूम आहे तेथे पैसा हें विनिमयसामान्य राहणें अशक्य आहे. कारण किंमतीचें तें माप राहूं शकत नाही. एखादा माणूस जेंव्हा दुसऱ्याचें श्रमफल लुबाडतो तेव्हा हें कोष्टक उलथून पडतें. एखाद्या बाजारांत जर घोडे व गाई विकण्यास आल्या व त्यांपैकी कांही स्वश्रमानें वाढविलेल्या व कांही इतरांपासून जुलमाने लुबाडलेल्या असतील तर घोडे व गाई यांची जोपासना करून वाढविण्याची खरी किंमत लाभणार नाही. इतर सर्व जिन्नसांच्या किंमतीमध्येंही यामुळें बदल होईल, व किंमत ठरविण्याचें काम पैशाकडून होणार नाही. गाय, घोडा किंवा घर जुलमाने लुबाडणें शक्य असेल तर खुद्द पैसाही लुबाडतां येऊन या पैशाने हवें तें विकत घेतां येईल. पण अशा प्रकारें जुलमाने पैसा लुबाडून जिनसा विकत घेऊं लागतांच "देवघेवीचें साधन" हें पैशाचें महत्त्व धुळीस मिळतें. जुलमी मनुष्य जेव्हा लुटलेल्या पैशाने जिनसा

विक्रत घेतो तेव्हा तो " देवघेव " करीत नसून इच्छेस येईल तें सरळ लुबाडीत असतो.

पण घटकाभर असेंही धरून चाललें की सुरुवातीला समाज आदर्शभूत असून सरकारी जुलमाचा मागमूसही नव्हता व चांदीसोनें हीं फक्त मोलाचें प्रमाण म्हणून वापरीत. तरी ज्या क्षणीं जुलमाला सुरुवात होते त्याक्षणीं "पैसा" म्हणून पैशाचें महत्त्व नष्ट होतें. अशा समाजांत जुलूम करणारा "जेता" म्हणून प्रथम प्रवेश करतो. हा जेता–कल्पना करूं–तेथील लोकांच्या गाई, घोडे, कपडे, घरें इ० सर्व काबीज करतो. पण हें त्याला पुढे त्रासदायक होतें म्हणून शेवटीं लोकांना जें मौल्यवान वाटतें व ज्याच्या मोबदल्यांत हवें तें मिळूं शकतें असा जिन्नस—पैसा—तो लुबाडूं लागतो. त्या क्षणीं त्या समाजांत किंमतीचें माप या नात्यानें पैशाचें महत्त्व संपुष्टांत येतें, कारण त्यानंतर जिनसांच्या किंमती सर्वस्वीं जेत्याच्या लहरीवर अवलंबून असतात. जुलूम करणाऱ्याला जो जिन्नस सर्वांत प्रिय असतो व ज्याबद्दल तो सर्वाधिक किंमत द्यावयास तयार असतो तो जिन्नस सर्वांत अधिक मौल्यवान ठरतो, व त्याची अत्यंत नावडती वस्तु मातीमोल ठरते. अशा प्रकारें जेथे जुलूम होतो तेथें पैशाला निव्वळ जुलमाचें साधन या नात्यानेच महत्त्व चढतें व जितांमध्येंही त्याला जें "देवघेवीचें साधन" म्हणून महत्त्व उरतें तेंही जेत्याची सोय व लहर यांना पचेल इतक्याच प्रमाणांत.

अशा समाजाची आपण कल्पना करूं या. गुलाम आपल्या मालकास कापड, कोंबड्या, मेंढ्या व स्वत:ची मेहेनत अर्पण करतात. या जिनसांबद्दल मालक पैशाची मागणी करितो व निरनिराळ्या जिनसांची किंमत स्व:तच ठरवून देतो. कापड, धान्य, गुरें किंवा मेहेनत हीं ज्याला देतां येत नसतील त्याने पैसा द्यावा. अशा समाजांत सर्वस्वीं या मालकाच्या लहरीवर सर्व जिनसांच्या किंमती अवलंबून राहतील. या जिनसा तो वापरतो म्हणून यांपैकी ज्या त्याला जशा कमी अधिक प्रमाणांत लागतात तशी त्यांची तो कमी अधिक किंमत ठरवितो. अर्थात् त्याची गरज अथवा लहर यांमुळेंच या जिनसा देणाऱ्या लोकांमध्यें त्यांच्या किंमती ठरणार. जर त्याला धान्य जास्त हवें असेल व कापड, गुरें अगर मजूर कमी हवे

असतील तर धान्य न देणाऱ्याला कापड, गुरें अथवा अंगमेहेनत न देणाऱ्यापेक्षा अधिक पैसे द्यावे लागणार हें उघड आहे. म्हणून ज्यांच्याजवळ धान्य नाही ते आपल्या जवळचें कापड, गुरें व मेहेनत विकूं लागतील; कारण त्यांना धान्य विकत घेऊन मालकास द्यावयाचें असतें. मालकाने पैसाच घ्यावयाचें ठरविलें तरी जिनसांच्या किमती त्या बनविण्यास लागणाऱ्या मजुरीवरून न ठरतां मालकास किती पैसा हवा व त्याला कोणत्या जिन्नसा आवडतात यावरूनच ठरणार. इतकें मात्र होईल की गुलामांमध्यें आपापसांतील देवघेवीपुरता जिन्नसांच्या किंमतीवर परिणाम होणार नाही;—मात्र त्यांचा परस्परांशीं व मालकाशीं असेल त्याव्यतिरिक्त इतर कोणाशीं संबंध नसेल व मालक आपली सर्व खरेदी गावाबाहेर करीत असेल तर. याच परिस्थितींत काय त्या जिनसांच्या सापेक्ष किंमती कायम राहतील व पैसा "देवघेवीचें साधन" होईल. पण या लोकांचा शेजाऱ्यांशीं आर्थिक संबंध असला तर शेजाऱ्यांच्या मानाने यांच्या मालाच्या किमती मालकाची पैशाची मागणी कमी अधिक असेल त्याप्रमाणें कमी अधिक होतील. (त्यांच्यापासून जितकी पैशाची मागणी केली जाते त्यापेक्षा त्यांच्या शेजाऱ्यांपासून जर कमी मागणी केली जात असेल तर त्यांचा माल शेजाऱ्यांच्या मालापेक्षा स्वस्त विकला जाईल व जास्त मागणी केली असेल तर शेजाऱ्यांचा माल स्वस्त मिळेल.) आणि दुसरें असें की मालक जर स्वतःच्या आश्रितांकडून जर माल विकत न घेईल तरच त्याने गोळा केलेल्या पैशामुळे मालाच्या किंमतींत फेरबदल होणार नाही. पण याने स्वतःच्या गुलामांपासूनच जर माल घेण्याचें ठरविलें तर हा कोणती वस्तु विकत घेतो यावर मालाच्या किंमती अवलंबून राहतील. समजा एका मालकाने व्यापारावर जबर कर बसविला व दुसऱ्याने कमी कर बसविला तर या पहिल्या ठिकाणीं जिनसा स्वस्त राहतील हें स्पष्ट आहे, व कोणत्या ठिकाणीं किती कर द्यावा लागतो यांवर मालाचे भाव अवलंबून राहतील. जुलमामुळें मालाच्या किंमतीवर जे परिणाम होतात त्यांपैकी हा एक होय. दुसरा परिणाम जिनसांच्या सापेक्ष किंमती ठरविण्यांत होतो. समजा एका मालकाला घोडे आवडतात व घोड्यांना तो भक्कम किंमत देतो, आणि

दुसऱ्याला टुवालांचा नाद असून तो त्यांबद्दल चांगली किंमत देतो. या दोन्ही मालकांच्या हद्दींत .अनुक्रमें घोडे व टुवाल यांना भक्कम भाव राहील, व गाई व धान्य यांच्या मानाने त्यांचे भाव फाजील राहतील. कांही दिवसांनी जर टुवालांचा शौकी मरण पावला व त्याचा वारस जर कोंबड्यांचा शौकी निघाला तर आटोपलें. टुवालांना कोणीही विचारणार नाही व कोंबड्या लोकांच्या डोक्यावर बसतील. याचाच अर्थ असा की जेथे जुलूम आहे तेथे पैशाचें "देवघेवीचें साधन" या नात्याने महत्त्व जुलूम करणाऱ्याच्या लहरीसरसें पार लयास जाऊन पैसा फक्त लोकांना राबविण्याचें सोयीचें साधन होऊन बसतो. जुलूमबाजाला पैसा देवघेवीचें साधन म्हणून नको व किंमती ठरविण्यासही नको, कारण या तो स्वतःच ठरवितो. परंतु पैसा साठवितां येतो व पैशामुळें लोकांची कमाल संख्या गुलाम बनवितां येते म्हणून स्वत:ला सोईवार जुलूम करतां यावा एवढ्याकरितांच त्याला पैसा हवा असतो. वाटेल तेव्हा हवे तितके घोडे, गाई व मेंढ्या उपलब्ध असाव्या म्हणून सर्व जनावरें जप्त करून ठेवणें गैरसोईचें असतें, कारण त्यांना पोसावें लागेल. तीच रड धान्याची. कारण धान्यही नासण्याचा संभव असतो. तीच गत मजुरांची व बिगारीची, कारण कधीं हजार मजूर लागतील तर कधी एकही लागणार नाही. ज्यांच्या जवळ पैसा नाही त्यांच्याजवळ पैशाची मागणी केल्याने या सर्व अडचणी एकदम दूर होतात व वाटेल तेव्हा हवें तें मिळूं शकतें व एवढ्याकरितां जुलूमबाजाला पैसा हवा असतो. शिवाय पैशाने अमुक एकाच ठिकाणच्या नव्हे तर ज्याला म्हणून पैसा हवा असेल अशा वाटेल त्या ठिकाणच्या माणसाला गुलाम बनवितां येतें, म्हणूनही त्याला पैसा हवा असतो. जर पैसा नसेल तर प्रत्येक मालकाला आपल्या आश्रितांनाच राबवितां येईल. पण दोन मालक जेव्हा आपल्या आश्रितांकडून पैसा घ्यावयाचें ठरवितात व आश्रितांजवळ पैसा नसतो तेव्हा दोन्ही मालक दोन्ही ठिकाणच्या गुलामांना लुबाडूं शकतात.

या कारणामुळेंच जुलूम करणाराला स्वत:ची मागणी पैशांत करणें सोईचें जातें व याकरितांच त्याला पैसा हवा असतो. आणि ज्यावर जुलूम होतो, त्याचें विचाराल तर त्याला देवघेवीला पैसा नको असतो; कारण

पैशाशिवाय तो देवघेव करूं शकतो; सर्व राजसत्ताहीन राष्ट्रें असेंच करीत असत. किमती ठरविण्यास त्याला पैसा नको असतो, कारण दुसराच या किमती ठरवितो; शिल्लकीकरितां त्याला पैशाची गरज नाही, कारण शिल्लक बिचाऱ्याजवळ कधी पडतच नाही; व पगाराकरितांही त्याला पैसा नकोसा असतो, कारण त्याला घेण्यापेक्षा देणेंच अधिक असतें; याला तनखा मिळालाच तर तो त्याला मालकाच्या कोठींतून जिन्नसांतच मिळतो. आणि नाण्यांत जरी मिळाला तरी तो सर्वच्या सर्व आपल्या प्राथमिक गरजांच्या वस्तु दुकानांतून घेण्यांत खर्च झाल्यामुळें तो पगार त्याला असून नसून सारखाच होतो. " ए ! तूं इतका पैसा दे, नाही तर तुला जमीन अगर धान्य मिळणार नाही, किंवा तुझी गाय अथवा घर आम्ही घेऊं, नाहीतर तुला वेठीला लावूं अथवा तुरुंगांत तुला टाकूं." अशी जेव्हा त्याला धमकी देण्यांत येते तेव्हाच त्याला पैशाची गरज पडते आणि या परिस्थितींतून सुटण्यास स्वतःचा माल अगर नोकरी न्याय्य देवघेवीने ठरणाऱ्या किमतींत नव्हे तर पैसा मागणारी शक्ती ठरवील त्या किमतीला देणें हा एकच मार्ग त्याला खुला असतो.

करांचा किमतीवर परिणाम व्हावा ही जी परिस्थिती जमीनदाऱ्यांतून लहान प्रमाणावर व राज्यांतून मोठ्या प्रमाणावर सर्वत्र अस्तित्वांत आहे त्या परिस्थितींत किमतींमध्यें बदल होण्याचीं कारणें सूर्यप्रकाशाइतकीं स्पष्ट दिसत असतां पैसा हें देवघेवीचें साधन व किमतीचें माप आहे असें सांगत सुटणें हें–अगदी सौम्य टीका करतों म्हटलें तरी–अत्यंत आश्चर्यकारक आहे असेंच म्हणावें लागेल.

घुसऱ्याला टुवालांचा नाद असून तो त्यांबद्दल चांगली किंमत देतो. या दोन्ही मालकांच्या हद्दींत अनुक्रमें घोडे व टुवाल यांना भक्कम भाव राहील, व गाई व धान्य यांच्या मानाने त्यांचे भाव फाजील राहतील. कांही दिवसांनी जर टुवालांचा शौकी मरण पावला व त्याचा वारस जर कोंबड्यांचा शौकी निघाला तर आटोपलें. टुवालांना कोणीही विचारणार नाही व कोंबड्या लोकांच्या डोक्यावर बसतील. याचाच अर्थ असा की जेथे जुलूम आहे तेथे पैशाचें "देवघेवीचें साधन" या नात्याने महत्त्व जुलूम करणाऱ्याच्या लहरीसरसें पार लयास जाऊन पैसा फक्त लोकांना राबविण्याचें सोयीचें साधन होऊन बसतो. जुलूमबाजाला पैसा देवघेवीचें साधन म्हणून नको व किंमती ठरविण्यासही नको. कारण या तो स्वतःच ठरवितो. परंतु पैसा साठवितां येतो व पैशामुळें लोकांची कमाल संख्या गुलाम बनवितां येते म्हणून स्वतःला सोईवार जुलूम करतां यावा एवढ्याकरितांच त्याला पैसा हवा असतो. वाटेल तेव्हा हवे तितके घोडे, गाई व मेंढ्या उपलब्ध असाव्या म्हणून सर्व जनावरें जप्त करून ठेवणें गैरसोईचें असतें, कारण त्यांना पोसावें लागेल. तीच रड धान्याची. कारण धान्यही नासण्याचा संभव असतो. तीच गत मजुरांची व बिगारीची, कारण कधीं हजार मजूर लागतील तर कधी एकही लागणार नाही. ज्यांच्या जवळ पैसा नाही त्यांच्याजवळ पैशाची मागणी केल्याने या सर्व अडचणी एकदम दूर होतात व वाटेल तेव्हा हवें तें मिळूं शकतें व एवढ्याकरितां जुलूमबाजाला पैसा हवा असतो. शिवाय पैशाने अमुक एकाच ठिकाणच्या नव्हे तर ज्याला म्हणून पैसा हवा असेल अशा वाटेल त्या ठिकाणच्या माणसाला गुलाम बनवितां येतें, म्हणूनही त्याला पैसा हवा असतो. जर पैसा नसेल तर प्रत्येक मालकाला आपल्या आश्रितांनाच राबवितां येईल. पण दोन मालक जेव्हा आपल्या आश्रितांकडून पैसा घ्यावयाचें ठरवितात व आश्रितांजवळ पैसा नसतो तेव्हा दोन्ही मालक दोन्ही ठिकाणच्या गुलामांना लुबाडूं शकतात.

या कारणामुळेंच जुलूम करणाराला स्वतःची मागणी पैशांत करणें सोईचें जातें व याकरितांच त्याला पैसा हवा असतो. आणि ज्यावर जुलूम होतो, त्याचें विचाराल तर त्याला देवघेवीला पैसा नको असतो; कारण

पैशाशिवाय तो देवघेव करूं शकतो; सर्व राजसत्ताहीन राष्ट्रें असेंच करीत असत. किमत्ती ठरविण्यास त्याला पैसा नको असतो, कारण दुसराच या किंमती ठरवितो; शिल्लकीकरितां त्याला पैशाची गरज नाही, कारण शिल्लक बिचाऱ्याजवळ कधी पडतच नाही; व पगाराकरितांही त्याला पैसा नकोसा असतो, कारण त्याला घेण्यापेक्षा देणेंच अधिक असतें; याला तनखा मिळालाच तर तो त्याला मालकाच्या कोठींतून जिन्नसांतच मिळतो. आणि नाण्यांत जरी मिळाला तरी तो सर्वच्या सर्व आपल्या प्राथमिक गरजांच्या वस्तु दुकानांतून घेण्यांत खर्च झाल्यामुळें तो पगार त्याला असून नसून सारखाच होतो. " ए ! तूं इतका पैसा दे, नाही तर तुला जमीन अगर धान्य मिळणार नाही, किंवा तुझी गाय अथवा घर आम्ही घेऊं, नाहीतर तुला वेठीला लावूं अथवा तुरुंगांत तुला टाकूं." अशी जेव्हा त्याला धमकी देण्यांत येते तेव्हाच त्याला पैशाची गरज पडते आणि या परिस्थितींतून सुटण्यास स्वतःचा माल अगर नोकरी न्याय्य देवघेवीने ठरणाऱ्या किंमतींत नव्हे तर पैसा मागणारी शक्ती ठरवील त्या किमतीला देणें हा एकच मार्ग त्याला खुला असतो.

करांचा किंमतीवर परिणाम व्हावा ही जी परिस्थिती जमीनदाऱ्यांतून लहान प्रमाणावर व राज्यांतून मोठ्या प्रमाणावर सर्वत्र अस्तित्वांत आहे त्या परिस्थितींत किंमतींमध्यें बदल होण्याचीं कारणें सूर्यप्रकाशाइतकीं स्पष्ट दिसत असतां पैसा हें देवघेवीचें साधन व किंमतीचें माप आहे असें सांगत सुटणें हें-अगदी सौम्य टीका करतों म्हटलें तरी-अत्यंत आश्चर्यकारक आहे असेंच म्हणावें लागेल.

प्रकरण विसावें

[illegible]का मनुष्याला दुसऱ्याचा प्राण घेण्याचें सामर्थ्य असणें व या धाकाच्या आधारावर स्वतःच्या इच्छेस येईल तें करण्यास दुसऱ्याला भाग पाडण्याचें सामर्थ्य असणें ही परिस्थिति सर्व प्रकारच्या गुलामगिरीचें मूल कारण होय.

इतकेंच नव्हे तर असेंही निश्चयात्मक म्हणावयास हरकत नाही की गुलामगिरी जर अस्तित्वांत असेल म्हणजे जर एखाद्याला स्वतःच्या इच्छेविरुद्ध स्वतःला नावडणारीं कामें निव्वळ दुसऱ्याच्या इच्छेस्तव करावीं लागत असतील तर त्या सर्वांचें मूळ हिंसा, अर्थात् "प्राण घेण्याचा धाक," हेंच होय. जर एखादा माणूस आपली सर्व शक्ती दुसऱ्यास अर्पण करीत असेल, त्याला पुरेसें खावयास नसेल, स्वतःच्या लहान मुलांना जर तो काबाडकष्टास जुंपत असेल व स्वतःला ज्यांची जरूरी नाही अशा गोष्टींसाठी सतत उरस्फोड करीत असेल—व हेंच आज आमच्या डोळ्यांदेखत आम्ही सर्वत्र पाहतों (यासच आम्ही सुधारलेलें समजतों, कारण आम्ही यांत राहतों)—तर यावरून डोळे मिटून अनुमान काढावें की हें सर्व तो बिचारा मरणाच्या धाकामुळें करीत असावा. म्हणून असें म्हणणें भाग आहे की या आमच्या सुशिक्षित जगांत ज्या अर्थी बरेच लोक त्यांना अनवश्यक व न आवडणारीं कामें त्रासदायक परिस्थितींत करीत असलेलीं दिसतात त्या अर्थी बहुतांश माणसें प्राणघाताच्या धाकामुळे गुलामगिरींत डांबलीं जात आहेत. ही गुलामगिरी कशी असते व प्राण घेण्याच्या धाकाचें स्वरूप कसें असतें तें आता पाहूं.

अगदी सुरुवातीस गुलाम बनविण्याची पद्धति व प्राण घेण्याचा धाक हीं अगदी स्पष्ट असत. तरवार उपसायची व गुलाम बनवायचें अशा अडाणी स्वरूपाची ती होती. शस्त्रधारी निःशस्त्रास म्हणे, "पहा रे बोआ ! तुझ्या या दोस्ताला जसा मी मारला तसा तुलाही मी मारूं शकतों; पण तें मला कर्तव्य नाही, कारण मी तुला ठार करण्याऐवजीं तूं

माझीं कामें करणें हेंच तुझ्या आणि माझ्या अधिक फायद्याचें आहे. म्हणून मी सांगेन तें करीत जा नाही तर मी तुझा प्राण घेईन." यामुळें नि:शस्त्र शस्त्रधाऱ्याला शरण जातो व तो म्हणेल तें करतो. नि:शस्त्राने काम करावें व सशस्त्राने धाकाची तरवार लटकावून बसावें असें वैयक्तिक गुलामगिरीचें पहिलें स्वरूप होतें, व मागसलेल्या जातींतून अजूनही हेंच कायम आहे. जसजसें जीवन गुंतागुंतीचें होत जातें व जीवनक्रम जसा अधिक क्लृप्तिबाज बनतो तशी हळू हळू जुलूमबाजाला ही पद्धति त्रासदायक वाटूं लागते. बलहीनांच्या शरीरकष्टांची लूट करतां यावी म्हणून त्यांना जेवण व कपडे देऊन त्यांना कार्यक्षम राखणें अवश्य असतें यामुळें गुलामांची संख्या आपोआप मर्यादित होते. शिवाय या पद्धतींत जुलूमबाजाला गुलामांच्या डोक्यावर मृत्यूच्या धाकाची तरवार सतत धरून बसावें लागतें. यासाठी गुलाम बनविण्याची दुसरी पद्धति काढण्यांत येते.

बायबलमध्यें पांच हजार वर्षांपूर्वी जोसेफने ही अधिक सोईची व व्यापक युक्ति शोधून काढल्याचा उल्लेख आहे. नाठाळ घोडे किंवा हिंस्र श्वापदें यांना वठणीस आणण्याकरितां याच युक्तीचा आम्ही आजही उपयोग करतों. " पोटाची आग " हीच ती युक्ति होय.

बायबलांतील पहिल्या "विश्वोत्पत्ति" अध्यायांत या शोधाचें असें वर्णन आहे.

" प्रकरण ४१, श्लो. ४८: आणि त्याने मिसर देशाचें सुबत्तेच्या सात वर्षांचें पीक गोळा करून शहरांत नेलें व प्रत्येक शहराच्या आसपासच्या शेतांतील सर्व पीक शहरांतच नेण्यांत आलें.

"४९. आणि जोसेफने समुद्राच्या वाळूप्रमाणें धान्याचा इतका मोठा ढीग गोळा केला की त्याने मापायचें टाकलें; कारण अगणित धान्य गोळा झालें.

"५३. आणि मिसरमधील सुबत्तेचीं सात वर्षें संपुष्टांत आलीं.

"५४. आणि जोसेफच्या अंदाजाप्रमाणें दुष्काळाच्या सात वर्षांना सुरुवात होऊन सर्वत्र दुष्काळ पडला. पण मिसरदेशामध्यें सर्वत्र भाकरी मिळत असे.

"५५. पण जेव्हा सर्व लोक उपवाशीं मरूं लागले तेव्हा ते फॅराओजवळ

येऊन भाकरीकरितां ओरडूं लागले. फॅराओने त्यांना जोसेफकडे जाण्यास सांगून जोसेफ सांगेल तें करा असें म्हटलें.

"५६. सर्वत्र जगांत कडक दुष्काळ पडला व जोसेफ कोठारें उघडून लोकांना धान्य विकूं लागला. मिसरमध्येही कडक दुष्काळ पडला होता.

"५७. सर्व देशांतील लोक मिसरमध्यें जोसेफकडून धान्य विकत घेण्यास येऊं लागले, कारण सर्वत्र जगांत दुष्काळ होता."

जोसेफने तरवारीच्या धाकाने गुलाम बनविण्याच्या प्राथमिक पद्धतीचा उपयोग करून पुढे दुष्काळ पडणार या अपेक्षेने सुबत्तेच्या काळांतच तरवारीच्या जोरावर सर्व धान्य गोळा करून ठेवलें. चांगल्यामागून वाईट वर्षें येणार हें सांगायला फाराओच्या स्वप्न साक्षात्काराची गरज नव्हती. अर्थात् पुढे जेव्हा दुष्काळ आला तेव्हा भुकेच्या माराच्या उपायाने जोसेफने मिसरमधीलच नव्हे तर शेजारच्या देशांतील लोकांनाही जास्त परिणामकारक व सोईवार पद्धतीने फाराओचें गुलाम बनविलें. लोक जेव्हा उपाशीं मरूं लागले तेव्हा याच उपासमारीच्या उपायाचा उपयोग करून लोक स्वतःचे कायमचे गुलाम राहतील अशी जोसेफने योजना केली. याचें वर्णन ४७ व्या प्रकरणांत असें आलें आहे:—

"१३. आणि सर्व देशांत कोठेही भाकरी नव्हती; कारण दुष्काळ कडक होता; म्हणून मिसर व कानान देश दुष्काळाने गर्भगळीत झाले.

"१४. आणि जोसेफने धान्य देऊन मिसर व कानानमधील सर्व पैसा गोळा केला व हा फाराओच्या तिजोरींत आणला.

"१५. आणि अशा प्रकारें मिसर व कानान मधील सर्व पैसा गोळा झाला तेव्हा लोक पुनः जोसेफकडे येऊन भाकरी मागूं लागले. ते म्हणाले, 'तुमच्या नजरेसमोर आम्हांस मरण्याची पाळी कां यावी ? आमचा पैसा संपला.'

"१६. जोसेफ म्हणाला, 'मग तुमचीं गुरें द्या. पैसा नसेल तर गुरांच्या मोबदल्यांत मी तुम्हांला धान्य देईन.'

"१७. आणि त्यांनी आपलीं गुरें जोसेफकडे आणलीं व जोसेफनें त्यांना घोडे, मेंढ्या, कळप व गाढव यांऐवजी भाकरी दिली व गुरांच्या मोबदल्यांत एक वर्षभर जोसेफने त्याना पोसलें.

" १८. आणि तें वर्ष संपलें तेव्हा ते पुनः आले व म्हणाले की आमचा पैसा व गुरें हीं कशीं संपून गेलीं हें आम्ही आपल्यापासून लपवणार नाही. आता आपल्यापुढे आमचें शरीर व हातपाय यांशिवाय कांहीही उरलें नाही.

" १९. आमच्या जमिनी व आम्ही आपल्या डोळ्यांदेखत कां मरावें ? भाकरी देऊन आमची जमीन व आम्हांला विकत घ्या म्हणजे आम्ही व आमची जमीन फाराओचे सेवक होऊं. आणि आम्हांला बीं द्या म्हणजे आम्ही मरणार नाही व जमीनही उध्वस्त होणार नाही.

" २०. म्हणून जोसेफनें मिसरची सर्व जमीन फॅराओच्या नांवाने विकत घेतली. कडक्र दुष्काळामुळें मिसरमधील सर्व लोकांनी आपली जमीन विकली व फाराओ जमिनीचा मालक झाला.

" २१. लोकांबद्दल म्हणाल तर त्यांना त्याने ईजिप्तच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत असलेल्या सर्व शहरांमध्यें धाडून दिलें.

" २२. फक्त धर्मगुरूंची जमीन त्याने विकत घेतली नाही, कारण फॅराओ त्यांना कांही अंश देई त्यांत त्यांचा निर्वाह चाले; म्हणून त्यांनी जमीन विकली नाही.

" २३. मग जोसेफ लोकांना म्हणाला, ' पहा मी तुमचें शरीर व जमीन आज फॅराओच्या नांवाने विकत घेतलीं आहेत. हें घ्या बीं आणि पेरा. '

" २४. आणि यापुढे प्रत्येक हंगामावर फॅराओला एक पंचमांश द्यावा लागेल. बाकीच्या चार पंचमांश भागावर तुमचें स्वामित्व राहील; तो तुम्हाला खायला व तुमचा परिवार व पोरेंबाळें यांच्या उपयोगाकरितां व बियाण्याकरितां तुमचा राहील.

" २५. व ते म्हणाले, ' तुम्हीं आमचा जीव वांचविला. आम्ही फॅराओचे नोकर होतों. आपली आमचेवर कृपा असो. '

" २६. व जोसेफनें ईजिप्तच्या सर्व जमिनीबद्दल कायदा केला की फॅराओला एक पंचमांश पीक मिळावें. फक्त धर्मगुरूंची जमीन फॅराओच्या मालकीची झाली नाही. "

पूर्वी लोकांना काम करावयास लावायचें तर फॅराओला जबरदस्ती करावी लागे. पण आता सर्व संपत्ति व जमीन फॅराओची झाल्यामुळें फक्त या संपत्तीचें रक्षण केल्याने भागतें. भुकेचा मार लोकांस काम करण्यास भाग पाडण्यास समर्थ होता.

जमीन फॅराओची व तो गोळा करी तो गल्ल्याचा अंशही त्याचाच; सबब तरवारीच्या धाकाने प्रत्येकाला कामास लावण्याची गरजच उरली नाही. कोठाराचें रक्षण केलें म्हणजे तरवारी ऐवजी भुकेमुळें लोकांना गुलाम व्हावें लागे.

दुष्काळाच्या काळांत सर्वांची उपासमार करणें शक्य होतें व विपुलता असेल तेव्हा दुर्दैवाने ज्यांना पीक झालें नाही त्यांची उपासमार करणें शक्य होतें.

या दुसऱ्या पद्धतींत तलवारीने दुसऱ्याचा प्राण घेण्याचा धाक घालून काम करावयास लावण्याऐवजी जुलूमबाज सर्व संपत्ती गोळा करतो व तिचें तरवारीने रक्षण करतो आणि अशक्तांना अन्नाकरितां मजुरी करण्यास भाग पडातो.

भुकेल्यांना जोसेफ म्हणतो, "मजजवळ धान्य असल्यामुळे मी तुमची उपसमार करून तुम्हांला ठार करूं शकतों पण तुम्हांला या अटीवर मी जीवदान देतों की मी जें धान्य तुम्हांला देईन त्याऐवजी मी सांगेन तें तुम्ही करावें."

पहिल्या पद्धतींत सत्ताधारी माणसाने लोकांमध्यें लढवय्ये घोडेस्वार सतत फिरवून लोकांना मरणाचा धाक घालून लोकांना आपली आज्ञा पाळावयास भाग पाडणें अवश्य असे. असें करतांना फक्त लढाऊ लोकांशीं भागीदारी केली म्हणजे झालें. पण दुसऱ्या पद्धतींत निव्वळ लढवय्यांनी भागत नाही. धान्य व जमीन यांचें गुलामांपासून रक्षण करण्याकरितां दुसऱ्या प्रकारचे मदतनीस—लहानमोठे जोसेफ, व्यवस्थापक व धान्य वाटणारे अधिकारी—हवे असतात. याही लोकांशीं आता भागीदारी केली पाहिजे व अशा जोसेफला पोषाख, सोन्याची आंगठी, नोकर, धान्य व त्याच्या नातलगांना चांदीचीं नाणीं हीं दिलीं पाहिजेत. या नव्या पद्धतींत (जुलूमबाजाखेरीज) हे (त्याचे) व्यवस्पथाक व त्यांचे नातलगच

नव्हे, तर ज्यांचेजवळ म्हणून धान्य असेल ते सर्व या जबरदस्तीच्या लुटींत भागीदार बनतात. ज्याप्रमाणें पूर्वी तलवार असणारा हरएक इसम जुलुमांत भागीदार असे त्याप्रमाणें या भुकेच्या मारावर आधारलेल्या दुसऱ्या पद्धतींत ज्यांचेजवळ धान्य असेल ते सर्व या जुलुमबाजींत भागीदार बनतात.

पहिल्या पद्धतीच्या मानाने दुसऱ्या पद्धतीचा एक फायदा असा की पहिलींत प्रत्यक्ष जुलुमाने लोकांकडून काम घ्यावें लागतें पण दुसरींत माणसें आपखुशीने येऊन स्वत:ला विकतात. पुनः या पद्धतींतून फारच थोड्यांची सुटका होते. जुलुमबाजाच्या दृष्टीने या दुसऱ्या पद्धतींत एकच दोष आहे तो हा की त्याला भागीदार पुष्कळ होऊन बसतात. ज्यांवर जुलूम होतो त्यांच्या दृष्टीनेंही या पद्धतींत फायदा असा की त्यांना पाशवी जुलमाला बळी न पडतां स्वत:च्या तंत्राने राहतां येतें व कधीं काळीं गुलामाच्या पंक्तींतून निघून मालकांच्या पंक्तींत आपण जाऊन बसूं अशी आशाही असते. नुकसान असें असतें की थोडाफार तरी जुलूम त्यांना सततचा सोसावाच लागतो. पहिली व दुसरी पद्धति यांचा जुलूमबाज जोडगोळीसारखाही उपयोग करतो व अवश्य त्याप्रमाणें एकीचें प्रमाण कमी करून दुसरीचें वाढवितो. पण ही पद्धतही जबरदस्त मनुष्यास पाहिजे त्या प्रमाणांत शक्य तितक्या अधिक लोकांकडून शक्य तितकें अधिक लुबाडण्यास व कमालसंख्येस गुलाम बनविण्यास समर्थ करीत नाही आणि जीवनक्रमाच्या वाढत्या गुंतागुंतीशीं ही टक्कर देऊं शकत नाही. म्हणून आणखी एक नवीन पद्धति निघते. ही तिसरी नवी तऱ्हा खंडणीची. ही पद्धती दुसरीप्रमाणेंच आहे. पण: यांत भुकेबरोबर इतरही गरजेच्या जिनसा लुबाडण्यांत येतात. या पद्धतीअन्वयें जुलूमबाज स्वत:जवळ असणाऱ्या नाण्यांसारखीं नाणीं इतकीं भरमसाट मागतो की ही मागणी पुरी करण्याकरितां जोसेफने मागितलेला धान्याचा पंचमांश विकून भागत नाही तर इतरही अत्यावश्यक जिन्नसांना उ० मास, कातडीं, लोंकर, कपडे, सर्पण, किंबहुना इमारती, यांनाही मुकावें लागतें. अशा प्रकारें निव्वळ भूकच नव्हे तर तहान, थंडी इ. अनेक प्रकारचे हाल व उणीवा निर्माण करून त्यांच्या योगाने लोकांना

गुलाम राखण्यांत येतें. अशा प्रकारें गुलामगिरीची द्रव्यजन्य तिसरी पद्धती अमलांत येते. या पद्धतींत जुलूमबाज अशक्ताला म्हणतो, " मी तुमच्यापैकी हरएकाचें काय पाहिजे तें करूं शकतों. हवें तर मी एक बंदूक आणून तुमच्यापैकी प्रत्येकाला ठार करूं शकतों; किंवा ज्या जमिनीवर तुमचें पोषण होतें ती जमीन काबीज करूनही तुमचा प्राण घेऊं शकतों; किंवा तुम्ही जो पैसा मला द्यावयाचा त्याने तुमचें सर्व धान्य घेऊन तें दुसऱ्यास विकून तुमची वाटेल त्या क्षणीं उपासमार करूं शकतों; अगर तुमच्या जवळून गुरें, घरें, कपडे व वाटेल तें लुबाडूं शकतों; पण हें मला गैरसोईचें असल्यामुळें मी तुम्हांला आपलीं कामें ठरविण्याची आणि उत्पादन करण्याची पूर्ण मुभा देतों. फक्त तुम्ही मला अमुक इतकीं नाणीं देत चला. या कराचा आकार मी हवा तर दर माणशीं किंवा जमिनीवर किंवा तुम्हीं जें खातांपितां त्यावर किंवा कपड्यावर किंवा इमारतीवर, वाटेल तसा बसवीन. मला नाणीं आणून द्या व तुम्हांला वाटेल तशी आपली व्यवस्था करा. पण लक्षांत ठेवा, मी विधवा, अनाथ, आजारी, म्हातारे यांचें अगर आगीने ज्यांचें नुकसान झालें अशा लोकांचें रक्षण करण्याच्या भानगडींत न पडतां फक्त नाण्यांचें चलन नियमित व सुसूत्र राहील अशी काळजी घेईन व जो माझ्या मागणीप्रमाणें नियमितपणें पैसे आणून देईल तो माझ्या दृष्टीने न्यायपूर्ण ठरेल व त्याचेंच मी रक्षण करीन. हा पैसा त्याने कसा मिळवावा याशीं मला कांही कर्तव्य नाही." आणि जुलूमबाज स्वत:च्या मागण्या पूर्ण झाल्याबद्दलच्या पावत्या म्हणून हीं नाणीं निर्माण करून फैलावतो.

दुसऱ्या पद्धतींत फाराओ धान्याचा पंचमांश घेऊन कोठारें भरी आणि त्यांच्या जोरावर, दुष्काळामध्यें सर्वच लोकांवर आणि इतर वेळीं ज्यांच्यावर आपत्ति येईल त्यांजवर आपल्या मदतनिसांसह स्वत:ला सत्ता गाजवितां येईल अशी परिस्थिति निर्माण करीत असे. याशिवाय तरवारीच्या प्रत्यक्ष जोरावर तो कांहींना गुलाम बनवीत असे तें निराळेंच.

तिसरी पद्धत अशी: फाराओ हा धान्याच्या पंचमांशाची जितकी किंमत होईल त्यापेक्षाही जास्त पैशाची मागणी करितो आणि अशा रीतीने कामकऱ्यांवर केवळ दुष्काळाच्या किंवा प्रासंगिक आपत्तीच्या वेळींच नव्हे, तर सदासर्वकाळ सत्ता गाजविण्याचें साधन, आपल्या मदतनिसांच्या साह्याने पैदा करितो. दुसऱ्या पद्धतींत लोकांजवळ अडीअडचणीच्या

वेळीं उपयोगीं पडेल असें कांही धान्य असे व त्यामुळे गुलामगिरीपासून क्वचित् बचाव होई; पण तिसऱ्या पद्धतींत मागणी जबर असल्यामुळे त्यांच्या जवळचें सर्वच लुबाडलें जातें; अर्थात् संकटसमयीं भरवसा टाकतां येईल असें जवळ कांहीच उरत नसल्यामुळे थोडासा घोटाळा होतांक्षणीं ज्यांच्या-जवळ पैसा आहे त्यांचे गुलाम होणें त्यांना भाग पडतें. पहिल्या पद्धतींत सत्ताधीशाजवळ निव्वळ लढवय्ये असून त्यांच्याशीं भागीदारी केली म्हणजे पुरे होई; दुसऱ्या पद्धतींत जमिनीचें व धान्याचें रक्षण करणाऱ्या (लढाऊ) लोकांशिवाय धान्य गोळा करणारे व वांटणारे कारकून लागतात; आणि तिसऱ्या पद्धतींत त्याला सर्व जमिनीची मालकी स्वत:कडे ठेऊन घेणें अशक्य असल्यामुळे भूमि व द्रव्य यांचें रक्षण करणाऱ्या सैनिकांशिवाय जमीनदार, कर गोळा करणारे, जमाबंदी करणारे, इन्स्पेक्टर, जकात अधिकारी, इ. इ. कैक लोक लागतात. तिसऱ्या पद्धतीची व्यवस्था दुसरीच्या मानाने भलतीच गुंतागुंतीची आहे; दुसऱ्या पद्धतींत धान्य गोळा करण्याचें काम मक्त्याने देणें शक्य असे (प्राचीन काळीं सर्वत्र व सध्या तुर्कस्थानांत असेंच करण्यांत येतें); पण आता करवसूलीच्या वेळेस कोणी व्यक्ति, अगर व्यक्तींच्या करास पात्र असलेल्या क्रिया, कर देण्याचें टाळूं शकणार नाहीत याबद्दल खबरदारी घेण्याकरितां गुंतागुंतीची संघटना निर्माण करावी लागते. म्हणून या तिसऱ्या पद्धतींत जलूमबाजाला दुसऱ्या पद्धतींतल्यापेक्षा पुष्कळच अधिक वाटेकरी असतात व या पद्धतीच्या रचनेमुळे त्याच अथवा इतर देशांतले पैसेवाले लोक स्वभावत:च यांत वाटेकरी होतात. इतर पद्धतींच्या मानाने या पद्धतींत जलूमबाजाला खालील फायदे आहेत.:—

पहिला फायदा हा कीं, याचे साहाय्याने जास्त काम जास्त सोईवार पद्धतीने उकळणें शक्य असतें; कारण पैशामध्यें द्यावयाचा कर हा स्क्रूप्रमाणें असतो व सोन्याचें अंडें देणाऱ्या कोंबडीचा प्राण न घेतां हा स्क्रू कमाल मर्यादेपावेतों घट्ट करतां येतो. अशा रीतीने, जोसेफला जशी दुष्काळाची वाट पाहावी लागली तशी वाट न पाहावी लागतां मनास येईल तेव्हा दुष्काळ निर्माण करतां येतो.

पुनः पूर्वी ज्या जमिनी नसणाऱ्या लोकांना भाकरीपुरती नोकरी बजावून निसटतां येई त्यांना सुद्धा यामुळें जुलमाच्या चक्रांत गोवतां येतें, कारण भाकरीकरितां कराव्या लागणाऱ्या मजुरीशिवाय आता त्यांना कर देण्याकरितांही मजुरी करावी लागते. या पद्धतींत त्रास फक्त इतकाच की जुलूमबाजाला पुष्कळ लोकांशीं भागीदारी करावी लागते. आपल्या खास मदतनीसांशिवाय, या पद्धतीने निर्माण होणारे जमीनदार आणि दास्यपतित जनतेकडून मागितला जाणारा जो नाणेंरूपी पैसा तो ज्यांचेजवळ संचित असतो असे, त्या देशांतील अगर इतर देशांतील लोक, हे सर्व या भागीत येतात.

जुलूम होणाऱ्याच्या दृष्टीने या पद्धतींत फायदा इतकाच की त्यास थोडें अधिक स्वातंत्र्य मिळतें. त्याने वाटेल तेथे रहावें, वाटेल तें करावें, शेती करावी अगर न करावी, कामाचा अहवाल कर द्यावयाचा त्याला न सांगितला तरी चालेल, आणि कर देण्यापुरते पेसे असतील तर तितक्या पुरतें त्याने स्वतःला स्वतंत्रही मानावें. किंबहुना त्याचेजवळ अधिक पैसा येण्याचा संभव असेल तर तो नुसता स्वतंत्रच नव्हे तर, थोड्या वेळापुरता कां होईना, स्वतःच जुलूमबाजांच्या वर्गांतही शिरूं शकेल. तोटा मात्र असा की या तिसऱ्या पद्धतींत ज्यांवर जुलूम होतो त्यांची परिस्थिती अतिशयच कठीण होते; त्यांच्या जवळून ते उत्पन्न करतात त्याचा बहुतांश भाग लुबाडला जातो, कारण या तिसऱ्या पद्धतींत ऐतखाऊंची संख्या फार वाढल्याकारणाने त्यांना पोसावयाचा बोजा सहन करणाऱ्यांची संख्या तितक्या मानाने कमी होते. ही तिसरी पद्धतीही बरीच जुनी असून पहिल्या दोघींचें पूर्ण उच्चाटण न करतां त्यांची जोडीदार म्हणून अस्तित्वांत येते. या तीन पद्धतींपैकी कोणतीही पद्धत कधीही सर्वस्वीं नामशेष झालेली नाही. या तीन पद्धति म्हणजे श्रमजीवी लोकांच्या डोक्यावर लादलेला ठोकळा त्रेपीत नेणारे जणूं कांही निरनिराळे स्क्रूच होत. यांतील मुख्य व मूलभूत स्क्रू म्हणजे एका गटानें प्राण घेण्याची धमकी देऊन दुसऱ्या गटास गुलाम बनविणें हा होय. हा प्रथम पिळल्याशिवाय इतर स्क्रू परिणामकारक ठरणार नाहीत. यानंतर पिळला जाणारा स्क्रू म्हणजे मरणाचा धाक

घालून धान्य इ० लुटणें व गुलाम बनविणें हा होय व तिसरा स्क्रू म्हणजे जें नाणें त्याचे जवळ नाही तें मागून व तें न दिल्यास मरणाचा धाक कायम ठेऊन गुलाम बनविणें हा होय. हे तीन्ही स्क्रू उपयोगांत आणतात व कोणताही एक स्क्रू घट्ट पिळला गेला म्हणजेच इतरांना ढिले करण्यांत येतें. लोकांना पूर्णपणें गुलाम बनविण्यास या तीन्ही स्क्रूंची—गुलाम बनविण्याच्या तीन्ही पद्धतींची—गरज आहे, आणि आमच्या समाजांत या तीन्ही पद्धती सतत उपयोगांत आणल्या जातात; अर्थात् तीन्ही स्क्रू आवळण्याचें काम सुरू असतें.

माणसाने माणसास गुलाम बनविण्याची प्रवृत्ति जोंपावेतों अस्तित्वांत आहे तोंपावेतों शारीरिक जबरदस्तीची व तरवारीने मृत्यूचा धाक घालण्याची पहिली पद्धत बंद होणें शक्य नाही. कारण हिच्याच आधारावर गुलाम बनविण्याची क्रिया ही मूलतः अवलंबून आहे. आम्ही भोळसटपणाने असा समज करून घेतों की आमच्या सुधारलेल्या जगांत गुलामगिरी नष्ट झाली असून गुलामगिरीचे शेवटचे अवशेष अखेर अमेरिकेंत व रशियांत नष्ट करण्यांत आले. आता आमच्यांत गुलामगिरी नसून ती फक्त रानटी लोकांतच उरली आहे असें आम्ही समजतों. फक्त एक लहानशी गोष्ट मात्र आम्ही विसरतों. प्रत्येक सरकारामागें जीं लाखों सैनिकांचीं पथकें उभीं आहेत, ज्यांशिवाय कोणतेंही सरकार आपलें अस्तित्व कायम ठेऊं शकणार नाही व ज्यांच्या अभावीं सरकारच्या आर्थिक डोलाऱ्याच्या ठिकऱ्या उडतील त्या सैन्यांकडे मात्र आमचें लक्ष जात नाही. या लाखो लोकांना राज्यकर्त्यांचे वैयक्तिक दास म्हणूं नये तर काय म्हणावें ? ठार करण्याच्या धमकीच्या जोरावरच—पुष्कळ वेळां तर ही धमकी प्रत्यक्ष अंमलांतही आणतात—मालकाच्या इच्छेप्रमाणें वागण्यास यांना भाग पाडण्यांत येत नाही काय ? फरक इतकाच की यांच्या गुलामगिरीला शिस्त म्हणतात. आणि पूर्वीचे गुलाम आजन्म गुलाम असत त्याऐवजीं हे लोक नोकरीच्या 'ठराविक मुदती' पुरते गुलाम असतात. वैयक्तिक गुलामगिरी आमच्यांतून नष्ट झाली नाही, इतकेंच नव्हे तर सध्या तर ती सक्तीच्या सार्वत्रिक लष्करी शिक्षणाच्या रूपाने अधिक जोरांत चालू आहे. आणि ती कधी नष्ट होणेंही शक्य नाही, कारण जोंपर्यंत एका माणसाने

दुसऱ्यास ताबेदार करण्याची प्रवृत्ति अस्तित्वांत आहे तोंपर्यंत करांच्या द्वारें निर्माण केलेली व प्रादेशिक गुलामगिरी तरवारीच्या जोरावर जगविण्याकरितां वैयक्तिक गुलाम करण्याची क्रिया चालूच राहणार. मायभूचें रक्षण करण्यास व तिचा गौरव वाढविण्यास (असें म्हणतात) कदाचित् ही वैयक्तिक गुलामगिरी (सैन्यांतील) अवश्यही असेल; पण हें फार संशयित आहे. कारण युद्धांत पराजय झाला म्हणजे सैन्य देशाला गुलाम बनविण्यास व देशाची अब्रू घालविण्यासच कारणीभूत होतें. करावर आधारलेली आणि प्रादेशिक गुलामगिरी टिकविण्यास हें सैन्य उपयोगी पडतें हें मात्र अगदी उघड आहे. आयरिश अगर रशियन शेतकरी जमीनदारांपासून जमीन घेण्याचा प्रयत्न करतील तर त्यांच्या आंगावर ताबडतोब सैन्य सोडण्यांत येईल, व जमिनी परत घेण्यांत येतील. दारूच्या भट्ट्या सुरू करून अबकारी कर देऊं नका की सैनिक येऊन तुमची भट्टी बंद झालीच समजा. कर देण्याचें नाकारा म्हणजेही ताबडतोब लष्करी सत्तेचा इंगा समजल्याशिवाय राहणार नाही.

दुसरा स्क्रू म्हणजे सर्व जमीन व परिणामीं सर्व अन्न लोकांपासून जिच्यांत लुबाडलें जातें ती दास करण्याची पद्धत होय. जेथे जेथे गुलाम बनविण्यांत येतात तेथे सर्वत्र ही पद्धति होती व तिचें स्वरूप कितीही पालटलें तरी कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत ती सर्वत्र असतेच. कधी कधी तुर्कस्थानाप्रमाणें सर्व जमीन राजाच्या मालकीची असून उत्पन्नाच्या दशांशाएवढा करभार घेण्यांत येतो. कधी कधी जमिनीचा कांही अंश राजाच्या मालकीचा असून तिजवर खंड घेतला जातो; कांही ठिकाणीं इंग्लंडप्रमाणें मोजक्या जमीनदारांकडे जमीन असते व श्रमाच्या स्वरूपांत करवसूली करतात; किंवा कोठे रशिया, फ्रान्स, अगर जर्मनी प्रमाणें लहान मोठा जमिनीचा अंश जमीनदारांकडे असतो. पण गुलामगिरी असणाऱ्या सर्व ठिकाणीं गुलामगिरीच्या मदतीने जमीन लुबाडण्याची क्रिया चालू असते. इतर स्क्रू जसे पिळले अगर ढिले केले जातील त्या मानाने हा स्क्रू ढिला किंवा घट्ट करण्यांत येतो. उदाहरणार्थ रशियांत जेव्हा बहुतांश श्रमजीवी लोक वैयक्तिक गुलामगिरीच्या जोखडाखाली होते तेव्हा जमिनीची गुलामगिरी अनाठाई होती. पण जमिनीच्या गुलामगिरीचा व

कराचा स्क्रू जेव्हा पिळण्यांत आला तेव्हा वैयक्तिक गुलामगिरी शिथिल करण्यांत आली. लोकांचे संघात्मक विभाग करण्यांत आले व आपला संघ बदलणें लोकांना कठीण करून सोडलें; जमीन खासगी जमीनदारांना वाटण्यांत आली; व हें पुरें झाल्यानंतर लोकांना (वैयक्तिक गुलामगिरींतून) मक्त करण्यांत आलें. इंग्लंडमध्ये जमिनीची गुलामगिरीच विशेषेंकरून रूढ आहे. तेथे जमिनीला "राष्ट्रीय मालकीची" बनविण्याची क्रिया म्हणजे प्रादेशिक दास्याचा पेच ढिला करण्यासाठी करांचा स्क्रू जास्त पिळवटणें हें होय.

खंडणी किंवा कर लादणें ही गुलाम बनविण्याची तिसरी पद्धतीही पूर्वी अंमलांत होती व आजही आहे. पण निरनिराळ्या राज्यांमधून एकाच धर्तीचीं नाणीं सुरू झाल्यामुळे आणि सरकारचो शक्ति फार वाढल्यामुळे आजच्या काळीं या पद्धतीला विशेषच जोर आला आहे. ही पद्धती आजच्या काळीं इतकी परिणतावस्थेला नेली आहे की इच्यामुळे पूर्वीच्या जमिनीच्या गुलामगिरीला रजासुद्धा मिळण्याचा संभव आहे. युरोपमध्यें हा स्क्रू फार पिळल्यामुळें दुसरा जमिनीवरील दास्याचा स्क्रू ढिला होत असल्याचें स्पष्ट दिसत आहे. आमच्याच आठवणींत रशियांत गुलामगिरीच्या पद्धतींत दोन वेळां फरक झाल्याचें आमच्या लक्षांत आहे. जेव्हा गुलामांना मुक्त करण्यांत येऊन जमीनदारांच्या ताब्यांत सर्व जमीन दिली तेव्हा त्यांना अशी भीति वाटली की गुलामांवरची आपली सत्ता नष्ट होणार. पण अनुभवांतीं त्यांना दिसून आलें की वैयक्तिक गुलामगिरीचा पायबंद सोडतांना जमिनीच्या मालकीची लगाम हाताशीं धरली म्हणजे पुरे. शेतकऱ्याला खावयाला अन्न नव्हतें व मालकाजवळ जमीन व धान्याचा साठा होता. यास्तव शेतकरी पूर्वीसारखा गुलामच राहिला. यानंतरचा दुसरा फरक म्हणजे सरकारने जेव्हा कराच्या मागणीचा स्क्रू फार पिळला तेव्हा मजुरांना स्वत:ला इस्टेटदारांना व कारखानदारांना विकावें लागलें. या नव्या फरकाने तर लोकांना पक्केंच गुलाम बनविलें. इतकें की निव्वळ सरकारी देणें व जमिनीचा कर देण्याकरितां रशियांतील नऊदशांश लोक जमिनीचे मालक व कारखानदार यांच्याकरितां कष्ट करणारे बनले. ही गोष्ट इतकी उघड आहे की जर सरकार एक वर्षाकरितां सर्व प्रत्यक्ष अगर

अप्रत्यक्ष कर व जमिनीचा सारा वसूल करण्याचें तहकूब करील तर जमीनदारांचीं शेतें व कारखाने यांतील काम अजीबात थंडावलेलें दृष्टीस पडेल. निव्वळ करांमुळे करवसूलीचे वेळीं नऊदशांश रशियनांना स्वत:ला विकावें लागतें.

गुलामगिरीच्या तीन्ही तऱ्हा सतत अस्तित्वांत होत्या व आहेत; पण निरनिराळ्या नव्या नव्या कारणांस्तव त्यांचें समर्थन करण्यांत येत असल्यामुळे लोकांना त्यांजकडे लक्ष द्यावें असें वाटत नाही. आणि सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही की सध्याच्या काळीं सर्वच गोष्टी ज्या या (गुलामगिरीच्या) पद्धतीवर अवलंबून आहेत त्या सर्वाधारभूत स्कूकडे कोणीच लक्ष देत नाही.

पुराण काळीं समाजाच्या आर्थिक स्थितीचा डोलारा जेव्हा सर्व वैयक्तिक गुलामगिरीवर अवलंबून होता तेव्हा त्या काळच्या अत्यंत बुद्धिमान लोकांच्याही ती गोष्ट लक्षांत आली नाही. झेनोफोन, प्लेटो, अरिस्टॉटल, व रोमन विद्वान यांना गुलामगिरी हा लढायांचा निसर्ग-सिद्ध परिणाम वाटे व गुलामगिरीशिवाय मानवजात राहूं शकेल ही कल्पनाही त्यांस होत नसे. मध्ययुगांत व अगदी आलीकडेपावेतों ज्या काळीं जमीनदारी व तज्जन्य गुलामगिरी अस्तित्वांत होती त्या काळच्या लोकांनाही आर्थिक जीवनाच्या पायाशीं असलेल्या गुलामगिरीचें मर्म कळलें नाही. आणि आजही त्याचप्रमाणें सरकारी कर, जमिनीचा सारा, इत्यादि करांबद्दलचे पैसे सरकार व त्यांचे हस्तक आणि सैन्य हीं गोळा करतात व या करांतूनच सरकारी मदतनीस व सैन्य यांचें पोषण होतें, ही परिस्थितीच आजच्या गुलामगिरीच्या मुळाशीं आहे. पण "कर" हेंच बहुजनसमाजाच्या आजच्या गुलामगिरीचें कारण आहे ही गोष्ट कोणाच्याही लक्षांत तर येत नाहीच पण हें (कारण) समजून घेण्याचीही कोणी इच्छा करीत नाही.

प्रकरण एकविसावें

पूर्वापार सतत गुलामगिरींत राहत आलेल्या लोकांना गुलामगिरीची जाणीव नसणें, अगर गुलामगिरीलाच त्यांनी स्वाभाविक परिस्थिति मानणें, किंवा गुलामगिरीच्या पद्धतींत थोडा बदल झाल्यास परिस्थिति सुधारली असें समजणें, यांत कांही आश्चर्य नाही. त्याचप्रमाणें गुलामांचे मालक गुलामांच्या मानेवरचा एक स्क्रू जास्त पिळून दुसरा ढिला करीत असतां गुलामांना मोकळें करण्यांत येत आहे असें मानतात, यांतही कांही आश्चर्य नाही. दोघांनाही गुलामगिरीची सवय झालेली असते. गुलामांना स्वातंत्र्याची कल्पनाच नसल्यामुळे त्यांना फक्त फेरबदल अगर थोडी सूट इतकेंच हवें असतें; आणि मालकांना आपले अन्याय लपविण्याची इच्छा असल्यामुळे जुन्याऐवजी ज्या नव्या पद्धती ते लोकावर लादूं पाहतात त्या नव्या पद्धतींचे ते गोडवेच गात असतात. पण ही गोष्ट मात्र खरोखर आश्चर्य करण्याजोगी आहे की, स्वत:ला उदारमतवादी समजणाऱ्या (अर्थ) शास्त्राने लोकांच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं विचार करीत असतां अगदी मूलभूत अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करावें. कोणालाही वाटेल की भिन्न घटनांतील अन्योन्य संबंध किंवा अनेक घटनांच्या बुडाशीं असलेलें सामान्य कारण काय असावें याचा विचार करणें हें शास्त्राचें कर्तव्य होय. पण अर्थशास्त्र नेमकें याच्या उलट वागतें. घटनांतील अन्योन्य संबंध व त्याचा खरा अर्थ सफाईनें लपवून अत्यंत सरळ व जिव्हाळ्याच्या प्रश्नाचें उत्तर देण्याचेंही तें टाळतें. एखाद्या अडेल तट्टाप्रमाणे जेथे कांहीच ओढावें लागत नाही अशा उतारावर मात्र तें झपझप चालतें पण चढण लागून खरें ओढण्याचें काम पडतांक्षणीं जणूं काय दुसरीकडेच काम आहे असें सोंग करून सरळ ओढण्याचें सोडून आडवाट चोखाळूं लागतें. एखादा महत्वाचा प्रश्न शास्त्रासमोर आला की शास्त्र लगेंच अभिप्रेत मुद्द्यावरून लक्ष उडविण्याच्या हेतूने विषयास अप्रस्तुत असें शब्दावडंबर सुरू करितें.

तुम्ही विचारतां, "कां हो ! कांही लोकांना दुसऱ्याने मनांत आणल्याशिवाय खाण्यास अगर काम करण्यास मिळूं नये या अस्वाभाविक, विचित्र, अबुद्धिग्राह्य किंवहुना हानिकारक घटनेचें कारण काय"? आणि शास्त्र गंभीरतेचा आव आणून उत्तर देतें, "कारण कांही लोकांचा इतरांच्या श्रमावर व खाद्य द्रव्यांवर ताबा चालतो—उत्पत्ति-शास्त्राचा हा मुळीं नियमच आहे !"

तुम्ही विचारतां, "कायहो, ज्या मालकी हक्काच्या आधारावर कांही लोक दुसऱ्याची जमीन, अन्न व हत्यारें बळकावून बसतात तो मालकी हक्क म्हणजे काय ?" शास्त्र पुनः गंभीरपणें उत्तर देतें, "व्यक्ती-च्या श्रमफलाचें रक्षण केलें म्हणजे हा हक्क निर्माण होतो. म्हणजे, एका गटाच्या श्रमांचें फल सुरक्षित ठेवणें हें दुसऱ्या लोकांच्या श्रमांचा कबजा घेतल्यानेच साध्य होतें."

तुम्ही विचारतां, "कां हो ! हा पैसा म्हणजे काय ? सरकारकडून टांकसाळींत छाप मारून जो पाडण्यांत येतो, कामकऱ्यांकडून ज्याची फार फाजील प्रमाणांत जबरदस्तीने मागणी करण्यांत येते व राष्ट्रीय कर्ज काढून कामगारांच्या भावी पिढ्यांवर ज्याचा बोजा लादण्यांत येतो तो पैसा म्हणजे काय ?" तुम्ही पुढे प्रश्न करतां, "हा जो पैसा कर म्हणून लोकांकडून कमाल मर्यादेपावेतो वसूल करण्यांत येतो त्यामुळे देणारे व घेणारे यांमधील परस्पर आर्थिक संबंधावर कांही परिणाम घडत नाही काय ?" आणि शास्त्र पुनः आढचतेने म्हणतें, "साखर किंवा चिटा-प्रमाणें पैसा हाही जिन्नस आहे; यांत व इतर जिन्नसांत फरक इतकाच की, पैसा देवघेवीचें एक सुलभ साधन आहे. कराचा लोकांच्या आर्थिक जीवनावर कांही परिणाम होत नाही. उत्पत्ति, देवघेव आणि विभागणी याचे नियम निराळे व कर निराळे. या दोन्ही अगदी परस्पर भिन्न गोष्टी होत."

तुम्ही विचारतां, "सरकार आपल्या खुशीस येईल तेव्हा किमती कमी अधिक करूं शकतें व ज्यांच्याजवळ जमीन नाही अशांना करांचा बोजा वाढवून गुलाम बनवूं शकतें, याचा आर्थिक स्थितीवर परिणाम होतो की नाही ?" शास्त्र पुनः गंभीरपणें म्हणतें, "छेः उत्पत्ति

विभागणी व देवघेव यांचें शास्त्र निराळें व कर आणि राज्यकारभार यांचें शास्त्र (जमाबंदी) निराळें."

सरतेशेवटीं तुम्ही असेंही विचारतां की, "सरकारने सर्वांना स्वत:चे गुलाम बनविलें आहे, इच्छेस येईल तेव्हा सरकार कोणाचाही नाश करूं शकतें, कोणाचेंही श्रमफल लुबाडूं शकते, इतकेंच नव्हे तर आपापलीं कामें टाकून सैन्यांत जबरदस्तीने दाखल होण्यासही भाग पाडूं शकतें— या सर्वाचा आर्थिक जीवनावर कांही परिणाम होत नाही काय ?" या प्रश्नाकडे शास्त्र मुळीं ढुंकूनही पाहत नाही. हा शासनशास्त्राचा अगदी वेगळा विषय आहे असें शास्त्र सांगतें. गुलामांच्या आर्थिक जीवनाची चवकशी करण्यास एखाद्याने निघावें आणि जो मालक आपल्या एकमेव लहरीनुसार त्यांना वाटेल तें काम करण्यास भाग पाडतो, इतस्ततः भटकवितो, त्यांना जेवावयास देतो अगर उपासमार करतो, आणि त्यांना जगूं देतो किंवा ठार करतो, त्याच्या लहरीचा त्यांच्या आर्थिक जीवनावर काय परिणाम होतो, याचा मात्र त्याने विचार करूं नये, हें जितकें समंजसपणाचें आहे तितकेंच आर्थिक जीवनाची चिकित्सा करणाऱ्या अर्थशास्त्राने लोकांचें प्रत्येक कार्य व यच्चयावत् चळवळ जुलूमबाजाच्या ज्या इच्छेवर अवलंबून आहे ती जुलुमी इच्छा ही निसर्गसिद्ध परिस्थिति आहे, असें मानणें, हेंही समंजसपणाचें आहे.

कदाचित् मूढपणामुळें शास्त्र असें करीत असेल म्हणावें तर थोडया बारकाईने शास्त्राच्या सिद्धान्तांचें निरीक्षण केल्यास असें स्पष्ट दिसून येतें की हा मूढपणाचा परिणाम नसून याच्या मुळाशीं आत्यंतिक धूर्तपणा आहे.

या शास्त्राचा एक विशिष्ट उद्देश असून तो तें साध्य करतें. खुळचट समज व खोटया कल्पना समाजांत कायम राखून सत्य व खरें हित यांपासून समाजाला परावृत्त करणें हा या शास्त्राचा उद्देश आहे. कोणत्याहि धार्मिक कल्पनेने नुकसान झालें नाही इतकें नुकसान जिच्यामुळें झालें अशी एक भयंकर खुळी समजूत पूर्वी होती व अजूनही अस्तित्वांत आहे. ही कल्पना हें नामधारी शास्त्र आपलें शक्तिसर्वस्व

खर्चून कायम राखीत आहे. धार्मिक समजुतीप्रमाणेंच ही कल्पना आहे; ती अशी—" माणसाचें माणसाप्रत जें कर्तव्य असतें त्याशिवाय आणि त्यापेक्षा अधिक महत्त्वाचें एका काल्पनिक व्यक्तीसंबंधीही माणसाला कर्तव्य असतें. धर्मांत ही व्यक्ति ईश्वर असते, परंतु राज्यशास्त्रांत 'राष्ट्र' ही ती व्यक्ति असते. धर्मांत या ईश्वराप्रीत्यर्थ यज्ञ करण्याची कल्पना असून कधी कधी यज्ञांत माणसेंही वळी लागतात व जरूर तर माणसांना यज्ञासाठी बळजबरीने सुद्धा धरून आणलें जातें. राजकीय क्षेत्रांतील वेडगळ समजुतीचें स्वरूप असें की, माणसाला इतर माणसासंबंधाने प्राप्त असलेल्या कर्तव्यांशिवाय राष्ट्र या काल्पनिक व्यक्तीसंबंधाने अधिक महत्त्वाचीं कर्तव्यें करावयाचीं असतात, या व्यक्तीप्रीत्यर्थ बळी देण्याची आवश्यकता असून पुष्कळदा हे वळी माणसांचेही लागतात, हीं माणसें वाटेल त्या उपायांनी, जरूर तर बळजबरीनेही, धरून आणलीं पाहिजेत." पूर्वीची धार्मिक खुळी कल्पना आचार्य व धर्मगुरु उचलून धरीत; आता शास्त्र हें काम करतें. माणसांना आता पूर्वीपेक्षांही कठीण गुलामगिरींत डांबण्यांत आलें आहे; पण शास्त्र मात्र अशी ग्वाही देत आहे की हें सर्व अवश्य असून यांतून सुटका नाही.

लोकांच्या कल्याणार्थ राज्य असलेंच पाहिजे व त्याने आपला कारभार चालविलाच पाहिजे. लोकांवर अंमल करणें व त्यांचें परचक्रापासून रक्षण करणें यांकरितां राज्याला पैसा व सैनिक लागतात. राज्याला लोकांनीच पैसा पुरविला पाहिजे व अशा प्रकारें माणसांचे संबंध प्रजाजन या नात्याने व राज्याचें अस्तित्व जमेस धरूनच विचारांत घेतले पाहिजेत. (असें शास्त्राचें म्हणणें आहे.)

एखादा भोळा शेतकरी म्हणतो, मला शेतीवर आपल्या बापास मदत करावयाची आहे, मला लग्नही करावयाचें आहे; पण हे लोक मला धरून काझानला सहा वर्षांकरितां सैनिक बनवून पाठवीत आहेत. मला सैन्याची नोकरी सोडून शेती व कुटुंबाचें पोषण करायचें आहे पण माझ्या सभोवतालच्या अमुक एका जमिनीबद्दल अमुक खंड दिल्याशिवाय हे मला नांगरणी करूं देत नाहीत. पण पैसे तर मजजवळ नाहीत. बरें ही मागणी करणारांना स्वतः शेती करतां येत नाही व ते इतका पैसा

मागतात की माझी सर्व मिळकत मला त्यांना द्यावी लागते. इतकें करून मुलांबाळांकरितां मी जी थोडी शिल्लक टाकतों ती कराच्या रूपाने लुबाडिली जाते; मी कमावण्याचाच उशीर की कोणी तरी मला लुबाडलेंच. माझा सर्व आर्थिक कार्यक्रम, माझी एकूण एक हालचाल राज्याकडून होणाऱ्या मागणीवर अवलंबून आहे व माझी किंवा माझ्या इतर बांधवांची परिस्थिति जर सुधारणें असेल तर प्रथम आमची सरकारी मागणींतून सुटका झाली पाहिजे.

पण शास्त्र म्हणतें, " हा तुमचा समज अज्ञानजन्य आहे. उत्पत्ति, देवघेव व विभागणी यांच्या नियमांचा थोडा अभ्यास करा आणि अर्थ-शास्त्र आणि राज्यशास्त्र यांचा गोंधळ करूं नका. तुम्ही जिचें वर्णन करतां ती परिस्थिति म्हणजे तुमच्या स्वातंत्र्यावर गदा नसून तुम्हांला इतर सर्वांबरोबर स्वत:चें स्वातंत्र्य व स्वहित यांकरितां अवश्य करावा लागणारा असा तो स्वार्थत्याग होय." तो गरीब म्हणतो, " पण महाराज ! पहा यांनी माझा एक मुलगा नेला व इतर मुलगे वयांत येतांच त्यांनाही हे नेणार. त्यांनी माझ्या मुलाला जबरीने तोफांच्या माऱ्यांतून कोणच्या तरी दूर देशांत नेलें. आम्ही त्या देशाचें नांवही ऐकलें नाही व नेलें कां तेंही आम्हांला कळलें नाही. आणखी असें पहा ! आम्हांला जी जमीन नांगरूं देत नाहीत किंवा जिच्या अभावामुळें आम्ही उपाशीं मरत आहोंत तिच्या मालकाला आम्ही अजून पाहिला नाही किंवा त्याचा आम्हांला उपयोग कोणता हेंही आम्हांला अजून उमजलें नाही. आम्ही जो कर न दिल्यामुळें माझ्या मुलाकडून गाय नेण्यांत आली तो कर गाय नेणाऱ्या शिपायाला व ज्यांना मी ओळखत नाही व ज्यांच्या उपयुक्ततेवर माझा विश्वास नाही अशा अनेक अधिकाऱ्यांना व अंमल-दारांना मिळणार. या सर्व जुलुमापुढे मला स्वातंत्र्य कसें लाभणार व या अरिष्टामुळें भलें तें काय होणार ? "

एखाद्याला गुलाम करून त्याला नावडत्या गोष्टी करण्यास भाग पाडणें शक्य आहे. पण प्रत्यक्ष जुलूम होत असतां तो मोकळा आहे किंवा प्रत्यक्ष जो त्याला त्रास होतो तो त्याच्याच हिताकरितां होय असा त्याचा समज करून देणें अशक्य आहे. ही गोष्ट अशक्य वाटते, प[ण]

खर्चून कायम राखीत आहे. धार्मिक समजुतींप्रमाणेंच हीही कल्पना आहे; ती अशी—" माणसाचें माणसाप्रत जें कर्तव्य असतें त्याशिवाय आणि त्यापेक्षा अधिक महत्त्वाचें एका काल्पनिक व्यक्तीसंबंधींही माणसाला कर्तव्य असतें. धर्मांत ही व्यक्ति ईश्वर असते, परंतु राज्यशास्त्रांत 'राष्ट्र' ही ती व्यक्ति असते. धर्मांत या ईश्वराप्रीत्यर्थ यज्ञ करण्याची कल्पना असून कधी कधी यज्ञांत माणसेंही बळी लागतात व जरूर तर माणसांना यज्ञासाठी बळजबरीने सुद्धा धरून आणलें जातें. राजकीय क्षेत्रांतील वेडगळ समजुतीचें स्वरूप असें की, माणसाला इतर माणसासंबंधाने प्राप्त असलेल्या कर्तव्यांशिवाय राष्ट्र या काल्पनिक व्यक्तीसंबंधाने अधिक महत्त्वाचीं कर्तव्यें करावयाचीं असतात; या व्यक्तीप्रीत्यर्थ बळी देण्याची आवश्यकता असून पुष्कळदा हे बळी माणसांचेही लागतात; हीं माणसें वाटेल त्या उपायांनी, जरूर तर बळजबरीनेही, धरून आणलीं पाहिजेत." पूर्वीची धार्मिक खुळी कल्पना आचार्य व धर्मगुरु उचलून धरीत; आता शास्त्र हें काम करतें. माणसांना आता पूर्वीपेक्षांही कठोण गुलामगिरींत डांबण्यांत आलें आहे; पण शास्त्र मात्र अशी ग्वाही देत आहे की हें सर्व अवश्य असून यांतून सुटका नाही.

लोकांच्या कल्याणार्थ राज्य असलेंच पाहिजे व त्याने आपला कारभार चालविलाच पाहिजे. लोकांवर अंमल करणें व त्यांचें परचक्रापासून रक्षण करणें यांकरितां राज्याला पैसा व सैनिक लागतात. राज्याला लोकांनीच पैसा पुरविला पाहिजे व अशा प्रकारें माणसांचे संबंध प्रजाजन या नात्याने व राज्याचें अस्तित्व जमेस धरूनच विचारांत घेतले पाहिजेत. (असें शास्त्राचें म्हणणें आहे.)

एखादा भोळा शेतकरी म्हणतो, मला शेतीवर आपल्या बापास मदत करावयाची आहे, मला लग्नही करावयाचें आहे; पण हे लोक मला धरून काझानला सहा वर्षांकरितां सैनिक बनवून पाठवीत आहेत. मला सैन्याची नोकरी सोडून शेती व कुटुंबाचें पोषण करायचें आहे पण माझ्या सभोवतालच्या अमुक एका जमिनीबद्दल अमुक खंड दिल्याशिवाय हे मला नांगरणी करूं देत नाहीत. पण पैसे तर सजजवळ नाहीत. बरें ही मागणी करणारांना स्वतः शेती करतां येत नाही व ते इतका पैसा

मागतात की माझी सर्व मिळकत मला त्यांना द्यावी लागते. इतकें करून मुलांबाळांकरितां मी जी थोडी शिल्लक टाकतों ती कराच्या रूपाने लुबाडिली जाते; मी कमावण्याचाच उशीर की कोणी तरी मला लुबाडलेंच. माझा सर्व आर्थिक कार्यक्रम, माझी एकूण एक हालचाल राज्याकडून होणाऱ्या मागणीवर अवलंबून आहे व माझी किंवा माझ्या इतर बांधवांची परिस्थिति जर सुधारणें असेल तर प्रथम आमची सरकारी मागणींतून सुटका झाली पाहिजे.

पण शास्त्र म्हणतें, " हा तुमचा समज अज्ञानजन्य आहे. उत्पत्ति, देवघेव व विभागणी यांच्या नियमांचा थोडा अभ्यास करा आणि अर्थ-शास्त्र आणि राज्यशास्त्र यांचा गोंधळ करूं नका. तुम्ही जिचें वर्णन करतां ती परिस्थिति म्हणजे तुमच्या स्वातंत्र्यावर गदा नसून तुम्हांला इतर सर्वांबरोबर स्वतःचें स्वातंत्र्य व स्वहित यांकरितां अवश्य करावा लागणारा असा तो स्वार्थत्याग होय." तो गरीब म्हणतो, " पण महाराज ! पहा यांनी माझा एक मुलगा नेला व इतर मुलगे वयांत येतांच त्यांनाही हे नेणार. त्यांनी माझ्या मुलाला जबरीने तोफांच्या माऱ्यांतून कोणच्या तरी दूर देशांत नेलें. आम्ही त्या देशाचें नांवही ऐकलें नाही व नेलें कां तेंही आम्हांला कळलें नाही. आणखी असें पहा ! आम्हांला जी जमीन नांगरूं देत नाहीत किंवा जिच्या अभावामुळें आम्ही उपाशीं मरत आहोंत तिच्या मालकाला आम्ही अजून पाहिला नाही किंवा त्याचा आम्हांला उपयोग कोणता हेंही आम्हांला अजून उमजलें नाही. आम्ही जो कर न दिल्यामुळें माझ्या मुलाकडून गाय नेण्यांत आली तो कर गाय नेणाऱ्या शिपायाला व ज्यांना मी ओळखत नाही व ज्यांच्या उपयुक्ततेवर माझा विश्वास नाही अशा अनेक अधिकाऱ्यांना व अंमल-दारांना मिळणार. या सर्व जुलुमापुढे मला स्वातंत्र्य कसें लाभणार व या अरिष्टामुळें भलें तें काय होणार ? "

एखाद्याला गुलाम करून त्याला नावडत्या गोष्टी करण्यास भाग पाडणें शक्य आहे. पण प्रत्यक्ष जुलूम होत असतां तो मोकळा आहे किंवा प्रत्यक्ष जो त्याला त्रास होतो तो त्याच्याच हिताकरितां होय असा त्याचा समज करून देणें अशक्य आहे. ही गोष्ट अशक्य वाटते, पण

आमच्या काळांत अर्थशास्त्राच्या साहाय्यानें हीच गोष्ट साध्य करण्यांत आली आहे.

सरकार—अर्थात् जुलुम करणारे मशस्त्र लोक—आपण ज्यांवर जुलूम करतों त्यांजपासून काय घ्यायचें हें ठरवीत असतें. इंग्रजांनी जसें फिजी बेटांत केलें तद्वत् सरकारें गुलामांपासून किती श्रम उकळायचे व हे श्रम लुबाडण्याकरिता आपल्याला किती मदतनीस पाहिजेत हेंही ठरवून या मदतनिसांची सैनिक, जमिनीचे मालक व करवसुलीचे कामगार या नात्यांनी योजना करतात. गुलाम आपली मजुरी बहाल करतात व हें करतांना त्या विचाऱ्यांचा असा विश्वास असतो की मालकाची इच्छा म्हणून त्यांना आपली मिळकत द्यावी लागत नसून आपल्याच स्वातंत्र्याकरितां व कल्याणाकरितां राष्ट्ररूपी देवतेपुढे हा आपल्या रक्ताचा बळी देणें अवश्य आहे व हा बळी देत असतांही आपण स्वतंत्रच आहोंत. पूर्वीपासून धर्माधिकारी व धर्म हें सांगत आले व आतां तर शास्त्र व शहाणे लोक हेंच सांगत आहेत. म्हणून त्यांचा यावर विश्वास असतो. पण आम्ही आमचा अंधविश्वास एक क्षण जर बाजूला ठेवला तर स्वत:ला धर्मगुरु व शास्त्रज्ञ म्हणवणारे लोक जीं विधानें करतात त्यांचें वैयर्थ्य आम्हांला स्पष्टपणें कळून येईल. जुलूम करणारे लोक राष्ट्रहितार्थ जुलूम अवश्य आहे व लोकांच्या स्वातंत्र्याकरितां आणि हिताकरितां राष्ट्रसंस्था अवश्य आहे असें सांगतात. याचा अर्थ असा होतो की जुलूम ज्यांवर होतो त्यांच्याच स्वातंत्र्याकरितां जुलूमबाज लोक जुलूम करीत असतात व त्यांच्या हितार्थच त्यांचें नुकसान करितात. लोकांना विचारशक्ति दिली असून त्यांनी स्वत:चें हित ओळखून तें साधावें हाच तिचा उद्देश आहे. पण ज्या व्यवहारांचें हितकारित्व लोकांच्या लक्षांत येत नाही व जे करण्यास लोकांना बळजबरीने भाग पाडिलें जातें असे व्यवहार स्वत:स हितकारक आहेत असें त्यांना वाटणें शक्य नाही. कारण विचारवंत मनुष्य बुद्धीला स्पष्टपणें जें हिताचें वाटेल तेंच हितकारक म्हणून कबूल करील. जर विकारवशतेमुळें किंवा मूर्खपणामुळें कोणी स्वत:चें नुकसान करीत असेल तर त्याने असें करूं नये म्हणून स्वत:च्या खऱ्या हिताच्या गोष्टी करण्या-

विषयीं त्याचें मन वळविणें इतकेंच फार तर इतर जागरूक मनुष्यांस करतां येईल. सैनिक बनण्यांत आणि सर्व जमीन गमावून बसण्यांत किंवा कर देण्याकरितां सर्व मजुरी गमावून बसण्यांत अधिक हित आहे असाही लोकांचा समज करून देणें शक्य आहे. पण लोक यासच आपलें कल्याण समजून हें सर्व जोंवर स्वयंस्फूर्तीनें करूं लागले नाहीत तोंवर सामान्यतः सर्व लोकांचें यांतच हित आहे अमें म्हणतां येणार नाही. कोणत्याही गोष्टींतील चांगुलपणाचें एक प्रमख गमक हें आहे की लोकांनी स्वयंस्फूर्तीने ती विशिष्ट गोष्ट केली पाहिजे व मनुष्य अशा अनेक गोष्टी स्वतःच्या आयुष्यांत करीत असतो.

दहा माणसांनी लांकडी पिपें बनविण्याचीं हत्यारें गोळा करून कामास सुरुवात केली तर त्यांचें करणें त्या सर्वांच्या हिताचें ठरेल. पण त्यांनी जर एखाद्या अकराव्याने स्वतःला येऊन मिळण्याबद्दल त्यावर जुलूम केला तर या दहांनी असें सांगण्यांत अर्थ नाही की जें त्यांच्या स्वतःच्या भल्याचें आहे त्यांतच या अकराव्याचेंहि हित आहे.

किंवा समजा, कांही मंडळींनी आपल्या एका मित्राला मेजवानी देण्याकरितां एका असामीकडून दहा रूबल बळजबरीने घेतले, तर त्यांस असें म्हणतां येणार नाही की ही मेजवानी त्या असामीच्या बऱ्याकरितांच आहे. त्याचप्रमाणें जर कांही शेतकऱ्यांनी एक लहानसा तलाव खणणें त्याला लागणाऱ्या श्रमाच्या मानाने अधिक हिताचें आहे असें ठरविलें, तर तें त्या सर्वांच्या हिताचें ठरेल; पण एखाद्या शेतकऱ्याची कापणी मागे रेंगाळल्यामुळें त्याला तलावापेक्षा कापणी जास्त महत्त्वाची वाटत असल्यास तलाव खणत बसणें त्याच्या दृष्टीने हिताचें आहे असें म्हणतां येणार नाही. हीच स्थिति रस्ते, देवळें, अजबखाने व इतर सामाजिक व राजकीय बाबींसंबंधाने समजावयाची. या सर्व गोष्टी पिंप बनविणाऱ्या, मित्राला मेजवानी देणाऱ्या किंवा तलाव खणावयास लागणाऱ्या लोकांप्रमाणें जे आपखुशीनें करावयास तयार असतील त्यांच्या त्या हिताच्या आहेत असें मानण्यास हरकत नाही. पण जीं कामें लोकांना बळजबरीने करावयास भाग पाडलें जातें तीं कामें त्या जबरीमुळें सर्वसाधारण हिताचीं ठरूं शकत नाहीत.

हें सर्व इतकें सरळ व स्पष्ट आहे की अनेक दिवस लोक फसत आले नसते तर या संबंधाने कसलाही खुलासा करण्याची गरज न पडती. समजा, आपण एका खेड्यांत राहतों व त्या खेड्यांतील ज्या एका दलदलींत आपण नेहमी फसतों त्या दलदलीवर आपणांस एक पूल बांधावयाचा आहे. समजा, सर्वांनी घरटीं अमुक एक पैसा अगर इतकें लाकूड देण्याचें किंवा अमुक दिवस काम करण्याचें कबूल केलें आहे. पूल बनविण्याच्या खर्चापेक्षा आम्हांला पुलाचा जास्त उपयोग आहे असें सर्वांनाच पटलें आहे म्हणून आम्हीं हें कबूल केलें. पण, कल्पना करा, आमच्यापैकी कांहींना पैसे खर्च करण्यापेक्षा पूल नसलेला बरा असें वाटतें.

या लोकांवर जर पूल बांधण्याचे कामांत भाग घेण्यासाठी सक्ती करण्यांत आली तर त्यामुळें तो पूल त्यांस हितावह ठरेल काय ? अर्थात् नाही. कारण स्वयंस्फूर्तीने पूल बांधण्याचे कामीं भाग घेणें ज्यांना त्रासदायक वाटलें त्यांना जुलुमानंतर तें अधिकच त्रासदायक वाटेल. पण घटकाभर आपण असेंहि समजूं कीं प्रथम सर्वांनी एकमताने पूल बांधण्याचें मान्य केलें व प्रत्येक घरामागे अमुक वर्गणी अगर मजुरी द्यायचें ठरलें; मात्र पुढे कांहींची परिस्थिति बदलली व खर्च पत्करण्यापेक्षां पूल नसला तरी पतकरला असें त्यांना वाटूं लागलें; किंवा त्यांची बुद्धीच पालटली, अगर असें कशाला, इतरांचा पूल बांधून झाल्यावर फुकटच आपण पूल वापरूं असा त्यांनी विचार केला असेंही पाहिजे तर समजूं—तर या फुटून राहूं पाहाणाऱ्या लोकांवर जुलूम करून त्यांना स्वार्थत्याग करावयास भाग पाडलें असतां तो स्वार्थत्याग त्यांच्या हिताचा ठरेल काय ? अर्थात् नाही. कारण बदललेल्या परिस्थितीमुळें जर त्यांना पूल नसण्यापेक्षा वर्गणी देणें अधिक कठीण वाटून वर्गणी देण्याचें त्यांजकडून पूर्ण झालें नसेल तर जबरदस्तीच्या वर्गणीने त्यांची स्थिति अधिकच वाईट होईल. व समजा त्यांनी दुसऱ्यांच्या श्रमांचा फुकट फायदा घेण्याच्या हेतूने वर्गणी नाकारली असेल तर त्यांवर जुलूम करणें हें शिक्षेप्रमाणें होईल, आणि ही शिक्षा केवळ त्यांच्या मनांतील उद्देशाकरितां—तो उद्देश देखील सिद्ध न झालेला व अद्याप कृतींत न उतरलेला, अशा उद्देशाकरितां—केल्याप्रमाणें होईल. एवंच कोणत्याही परिस्थितींत इच्छेविरुद्ध कामास जुंपण्याने त्यांना फायदा होणार नाही.

जी दलदल सर्वांना ओलांडावी लागते तीवर पूल बांधण्यासारख्या सर्वांना समजणाऱ्या व स्पष्टपणें उपयुक्त असणाऱ्या गोष्टींची जर ही तऱ्हा तर सैन्यांतील नोकरी अथवा कर यांबाबत करावा लागणारा अगम्य, निष्फल व नक्की हानिकारक असा स्वार्थत्याग करावयास लक्षावधि लोकांना भाग पाडणें किती अन्यायाचें व मूर्खपणाचें असेल बरें? पण अर्थशास्त्राला मात्र जें सर्वांना हानिकारक दिसतें तेंच सर्वांच्या हिताचें वाटतें. यावरून असें वाटतें की (जणूं काय) सर्वांचें हित कशांत आहे हें फक्त कांही मूठभर लोकांनाच कळतें आणि इतर सर्वांना जरी हें 'सर्वांचें हित' अनिष्टकारक वाटत असलें तरी हे मूठभर लोक हें अनिष्ट करावयास इतरांना भाग पाडूं शकतात व हें अनिष्ट म्हणजे सर्वांचें हित असेंही कल्पूं शकतात.

ही खुळी कल्पनाच सत्य व हित यांच्या मार्गांतील मानवजातीला नडणारी खरी धोंड आहे. ही खुळी कल्पना व दिशाभूल कायम राखणें हेंच सामान्यत: राज्यविषयक शास्त्राचें ध्येय आहे व अर्थशास्त्राचा तर हा प्रधान उद्देश आहे. ज्या जुलमांत व गुलामगिरींत लोक आहेत ती लोकांपासून लपविणें हा या शास्त्राचा उद्देश आहे व या उद्देशाच्या सिद्धयर्थ ज्या जुलूमजबरीने लोकांना गुलाम ठेवण्यांत येतें तो जुलूमच आवश्यक असें मुद्दामच गृहीत धरून तें शास्त्र त्यांच्या दैन्याच्या खऱ्या कारणावरून लोकांचें लक्ष उडवितें व फसवणूक करतें.

गुलामगिरी फार दिवसांपूर्वी नष्ट झाली असें म्हणतात. रोम, अमेरिका, रशिया येथें ती नष्ट करण्यांत आली. पण नष्ट झाला तो एक शब्द; गुलामगिरी मात्र नष्ट झालेली नाही.

स्वत:च्या गरजा भागविण्यास अवश्य असणारें काम स्वत: करावयाचें टाकून तें जबरदस्तीने दुसऱ्यांच्या वोकांडीं बसविणें यांचेंच नांव गुलामगिरी. जेथे जेथे एखादा मनुष्य काम करीत नसून इतर लोक त्याचे करितां—प्रेमाने नव्हे तर तो काम करावयास भाग पाडूं शकतो म्हणून—कामें करितात, तेथे गुलामगिरी आहे. आणि, यूरोपांतील सर्व देशांत आहेत त्याप्रमाणें, जेथे हजारों लोकांना जुलुमाने राबविणारे व असें राबविण्याचा स्वत:स हक्क आहे असें मानणारे कांही लोक आहेत—आणि राबणारे

मुकाट्याने राबून, राबणें हें आपलें कर्तव्यही समजतात— तेथे फार भयंकर आणि व्यापक प्रमाणांत गुलामगिरी आहे.

गुलामगिरी अजून आहे. पण तिचें मर्म काय? हें मर्म जुनेंच असून या मर्माशिवाय ती असूं शकत नाही. सशक्त व सशस्त्र लोकांची अशक्त व अशस्त्रांवर जबरदस्ती हें तें मर्म होय.

पूर्वी वर्णन केलेल्या गुलामगिरींतील वैयक्तिक जुलुमाच्या तीन्ही पद्धती—सैन्यांतील नोकरी,सैन्याच्या द्वारा जलुमाने वसूल करण्यांत येणारा खंड, अगर लोकसंख्येवर सैन्याच्याच मदतीने लादण्यांत येणारे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कर–पूर्वीप्रपाणें आजही हयात आहेत. या प्रत्येक पद्धतीचें नवें नवें समर्थन होऊन खरा अर्थ आमचेपासून लपविण्यांत येत असल्यामुळें त्या आमचे लक्षांत येत नाहीत.

सशस्त्रांकडून अशस्त्रांवर होणाऱ्या जुलुमाचें असें समर्थन करण्यांत येतें की देशाच्या काल्पनिक शत्रूंपासून रक्षण करण्यास तो अवश्य आहे. पण याचा खरा उद्देश मात्र पूर्वीचाच म्हणजे जितांना आपलें अंकित ठेवणें हा असतो. जी जमीन लोक नांगरतात ती त्यांजपासून लुबाडण्याचें असें समर्थन करण्यांत येतें की ज्यांनी सर्वांच्या समाईक हिताला मदत केली अशांना जमीन बक्षीस म्हणून देण्यांत येते व तिचे पिढीजाद हक्क बहाल करण्यांत येतात. पण वास्तविक हा पूर्वीचाच जमिनी लुबाडून सैन्याने (व अधिकाऱ्यांनी) लोकांना गुलाम बनविण्याचा प्रकार आहे.

आणि शेवटची सर्वांत जबर व आधुनिक तऱ्हा—म्हणजे पैशाच्या कराची पद्धति– इचें समर्थन सर्वांत आश्चर्यकारक आहे. सर्वसाधारण जनतेच्या स्वातंत्र्याकरितां व सुखाकरितांच लोकांना सर्वस्वीं लुबाडण्यांत येतें हा या समर्थनाचा सारांश आहे. पण वस्तुतः ही जुनी गुलामगिरीच होय. फरक इतकाच की ही अवैयक्तिक असते.

जुलुमाला जेथे कायद्याची मान्यता आहे तेथे गुलामगिरी अस्तित्वांत असतेच. जबरदस्तीचा मामला कोणत्याही स्वरूपांत प्रकट होवो—राजे किंवा त्यांचे आश्रित दरबारी लोक स्वाऱ्या करून वायकामुलांच्ये प्राण घेवोत आणि खेडीं पाडीं जाळोत, किंवा गुलामांचे मालक श्रम अगर पैसे

हिरावून घेवोत आणि ते न दिल्यास हत्यारबंद सैनिकांस निमंत्रण करोत; किंवा कांही लोक जनतेवर खंडणी बसवून खेड्यांतून हत्यारबंद सैन्य फिरवोत किंवा अंतर्व्यवस्थेचे मंत्री प्रांतिक गव्हर्नरांच्या व पोलिसांच्या मदतीने पैसे वसूल करोत व तो न मिळाल्यास सैन्य धाडून ते गोळा करोत –जोंपावेतों बागनेटींच्या जोरावर जुलूम करण्यांत येत आहे तोंपावेतों संपत्तीची विभागणी लोकांत निसर्गनियमानुसार होणें अशक्य असून फक्त जुलूमबाजाकडेच पैशाचा ओघ वाहणार हें उघड आहे.

वर नमूद केलेला निष्कर्ष अगदी खरा असल्याबद्दलचा पुरावा हेन्री जॉर्ज यांनी सुचविलेल्या जमिनीचें राष्ट्रीकरण करण्याच्या सूचनेवरून आपणास मिळतो.* जार्ज साहेब म्हणतात की सर्व जमीन राष्ट्राच्या मालकीची समजावी व इतर सर्व प्रत्यक्षाप्रत्यक्ष कर बंद करून फक्त जमिनीवरच प्रमाणशीर कर ठेवावे. अर्थात जो जमीन वापरील त्याने त्या जमिनीचें भाडें द्यावें.

पण परिणाम काय ? राष्ट्रांतील अंतर्गत शेतकामासंबंधींचें दास्य नाहीसें होईल, म्हणजे जमीन राष्ट्राच्या मालकीची होईल. इंग्लंडमधील जमीन इंग्लंडची व अमेरिकेंतील जमीन अमेरिकेची होईल आणि प्रत्येक माणसाने द्यावयाची गुलामपट्टी जितकी जमीन त्याने वापरली त्या जमिनीच्या प्रमाणावरून ठरेल.

कांही शेतकऱ्यांची स्थिति कदाचित् सुधारेल पण जोंवर जबरदस्तीने कांही तरी भाडें वसूल होणार तोंवर गुलामगिरी राहणारच. पिकें बुडाल्यामुळें किंवा इतर कांही आकस्मिक कारणामुळें जो शेतकरी जबरीनें मागण्यांत येणारा जमिनीचा कर देऊं शकणार नाही त्याला आपलें सर्वस्व जाऊं नये व जमीन कायम राहावी म्हणून (जमिनीचा कर देण्याकरितां) ज्याच्याजवळ पैसा असेल त्याची गुलामगिरी पत्करावीच लागणार.

---

* हेन्री जार्ज यांच्या सूचनेबरोबरच आपणांस इंग्लंडमध्यें 'जमिनीचें राष्ट्रीकरण' करण्याच्या योजनेसंबंधीं ऐकूं येतें म्हणून टॉलस्टॉयचें म्हणणें आपणांस विचित्र वाटण्याचा संभव आहे. पण टॉलस्टॉयला अभिप्रेत असणारा अर्थ स्पष्ट असल्यामुळें मुळाबरहुकुम भाषांतर केलें आहे.

जर एखाद्या बादलींतून पाणी वाहात असेल तर तिला कोठें तरी छिद्र असलेंच पाहिजे. केवळ बुडाकडेच दृष्टि दिल्यास कदाचित् अनेक छिद्रांतून पाणी गळत असल्याचा भास होईल पण आम्ही हीं काल्पनिक छिद्रें बाहेरून कशींही बंद करण्याचा प्रयत्न केला तरी पाणी वाहणारच. आम्हांला पाणी वाहणें बंद करावयाचें असेल तर जेथून पाणी नक्की वाहतें ती जागा शोधून काढून आंतले बाजूनेच बंद करावयास हवी. संपत्तीची जी विषम विभागणी होत आहे ती थांबवण्यासही लोकांपासून पैसा ज्या छिद्रांच्या द्वारें गळून जात आहे तीं छिद्रें बंद करण्यास आम्हांला असेंच करावें लागेल. लोक म्हणतात, 'कामगारांच्या संस्था स्थापन करा आणि जमीन व भांडवल ही सामाजिक मालकीची करा." पण हें सर्व काल्पनिक छिद्रें बाहेरून बंद करण्यासारखें आहे. कामगारांची संपत्ति खुशालचेंडू वर्गाच्या पदरांत वाहून जाण्याचें बंद करणें असेल तर कोणत्या छिद्रांतून पाणी वाहतें हें आंतले बाजूने पहावयास हवें. शस्त्रधाऱ्यांची निःशस्त्रांवरील जबरदस्ती हें तें अंतस्थ छिद्र होय. सैन्याच्या मदतीने जुलूम करून लोकांना त्यांच्या कामावरून व जमिनीवरून दूर केलें जातें, लोकांचें श्रमफल त्यांच्यापासून हिरावून घेण्यांत येतें, हें खरें छिद्र होय. जोंपावेतो वाटेल त्या दुसऱ्या निःशस्त्र व्यक्तीस ठार करण्याचा हक्क स्वतःकडें घेणारा असा एक तरी शस्त्रधारी मनुष्य अस्तित्वांत आहे, तोंपावेतो संपत्तीची विषम विभागणी–अर्थात गुलामगिरी–राहणारच.*

---

* येथे इंग्रज भाषांतरकाराची एक टीप आहे. पण ती इंग्रजी पुस्तकाच्या परिशिष्टांतील ज्या भागासंबंधी आहे तो भागच मराठी भाषांतरांत वगळल्यामुळें (कारण तो जुना भाग टॉलस्टॉयनें पुनः लिहिला व हा नवा भाग सदर्हू भाषांतरांत आला आहे) त्या टिपेचें भाषांतर अर्थातच वगळलें आहे. **मा. ज. का.**

प्रकरण बाविसावें

"होय. तत्त्वदृष्टया हें बरोबर आहे, पण व्यवहारांत त्याचें काय ?" असें वारंवार म्हटलेलें मी ऐकतों तेव्हा मला आश्चर्य वाटतें. जणूं काय तत्त्वें हीं आचरण करण्याकरितां नसून तीं फक्त गप्पा मारण्यास उपयोगी असे सुंदर शब्दगुच्छ आहेत व आपली अखिल वागणूक त्यांस अनुसरून असण्याची गरज नाही खरोखरच जगांत मूर्खपणाचीं तत्त्वें अतोनात प्रतिपादन करण्यांत आलीं असावीं, नाही तर असा विलक्षण समज लोकांत रूढ होता ना. एखाद्या विषयावर मनुष्य जो विचार करतो तें तत्त्व होय व तो जें आचरतो तो व्यवहार होय. मग विचारांतीं मनुष्याला वाटतें एक व तो करतो दुसरेंच अशी स्थिति असणें कसें शक्य आहे ? भाकरी तयार करण्यास प्रथम कणीक मळून नंतर भाजावी असें जर तत्त्व असेल तर एखाद्या वेड्याशिवाय कोणीही हें तत्त्व जाणून उलट क्रिया करणार नाही. पण आमच्यांत मात्र असें म्हणण्याची प्रथा आहे की "तत्त्वदृष्ट्या हें बरोबर आहे, पण व्यवहारांत त्याचें काय ?"

मी ज्या विषयाचा सध्या विचार करीत आहें त्या बाबतींत तर माझी कल्पनाच खरी ठरली; ती ही की आचरण नेहमी तत्त्वानुगामी असून तें,—तत्त्वाचें समर्थन करतें असें पाहिजे तर मी म्हणत नाही, परंतु तें--तत्त्वापेक्षा निराळें असूंच शकत नाही. आणि आपण एखाद्या गोष्टीविषयीं विचार करून ती जर समजून घेतली असेल तर ती गोष्ट आपल्याला जशी समजली आहे तशीच आपण करितों, इतर रीतीने करूं शकणार नाही. मला गरिबांना मदत करण्याची इच्छा झाली, कारण मज-जवळ पैसा होता व मुळांत पैसा न्याय्य असून तो श्रमाचा प्रतिनिधि आहे अशीही माझी खुळी समजूत होती. पण मी जेव्हा पैसा देऊं लागलों तेव्हा मला कळलें की मी ज्या गरिबांवरील हुंड्या वसूल केल्या होत्या त्याच मी देत होतों. जें जमीनदार करीत तेंच मीही करीत होतों, अर्थात एका गुलामा-ला दुसऱ्या गुलामाचें काम करण्यास मी लावीत होतों. मला कळलें की पैसा

कोणतीही जिन्नस विकत घेण्यास वापरला काय अगर लोकांना फुकट वाटला काय, गरिबांकडून परत वसूल करावयास हुंडी देणें हाच त्याचा अर्थ होय. अशा रीतीने गरिबांनाच लुबाडून गरिबांना मदत करण्याच्या माझ्या कल्पनेंतील खुळचटपणा मला स्पष्टपणें पटला. पैसा चांगला तर नव्हेच पण गरिबांचें श्रमाचें स्वातंत्र्य हिरावून घेणारें तें एक अरिष्ट आहे अशी माझी खात्री झाली. मी स्वत:च कामकरी नसल्यामुळें आणि मला स्वत:च्या श्रमाचा उपयोग करण्याचें भाग्य न लाभल्यामुळें हें दुस-याच्या पदरांत मला टाकतां आलें नाही.

कोणाला वाटेल, 'पैसा काय आहे ?' या प्रश्नासंबंधींवर जें तात्त्विक विवेचन केलें तें करण्यांत विशेषसा अर्थ नाही. पण या प्रश्नाचा मी तत्त्वत: विचार केला नसून माझ्या स्वत:च्या जीवनक्रमाचें व मन:स्तापाचें रहस्य उकलावें म्हणून याचा मी विचार केला व त्यामधून मला 'आमचें कर्तव्य काय ?' या प्रश्नाचें जत्तर मिळालें.

श्रीमंती व पैसा याचा अर्थ कळतांक्षणीं माझेंच नव्हे तर सर्वांचें कर्तव्य काय हें मला स्पष्ट दिसूं लागलें व म्हणूनच लोक नक्की काय करणार याचाही अंदाज लागला. वस्तुत: बुद्धदेवाने जें फार पूर्वी मानव-जातीला शिकविल्याचें मला निव्वळ माहीत होतें तें आता मला उमजलें इतकाच त्याचा अर्थ. हीच शिकवण ईसाया, लाओत्झे व साक्रेटिस यांनी दिली असून आम्हांला तर अलीकडे स्पष्टतर व असंदिग्धपणें येशू ख्रिस्त व त्यापूर्वीचा बाप्तिस्त जॉन याने ही शिकवण दिली आहे. "आता आम्ही काय करावें ?" या प्रश्नाचें सरळ, स्पष्ट व थोडक्यांत जॉन बाप्तिस्तनें असें उत्तर दिलें, "ज्याच्याजवळ दोन अंगरखे आहेत त्याने मुळीच अंगरखा नसलेल्याला एक द्यावा. त्याचप्रमाणें ज्याचे जवळ अन्न आहे त्यानेही असेंच करावें" —ल्यूक ३, १०, ११. हीच गोष्ट येशू ख्रिस्तानेही अनेक वेळां व विशेषच स्पष्टपणें सांगितली आहे. तो म्हणाला, "धनही-नांना धन्यवाद असो, आणि जे तुम्ही धनवान आहांत त्यांचें नष्टचर्य ओढवो !" तसेंच आणखी, "ईश्वर व पैसा यांची एकसमयावच्छेदेंकरून तुम्ही सेवा करणें शक्य नाही." ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना पैसा, किंबहुना दोन कोट सुद्धा, न घेण्याबद्दल आदेश दिला होता. श्रीमंत तरुणाला त्याने

सांगितलें, "श्रीमंतीमुळें तुला ईश्वराच्या राज्यांत प्रवेश मिळणार नाही. एखादा उंट सुईच्या नाकांतून कदाचित् जाईल पण श्रीमंताला देवाच्या राज्यांत प्रवेश मिळणें शक्य नाही." त्याने सांगितलें, "जो घरदार, मुलें, जमीन या सर्वांचा त्याग करून माझ्या मागे येणार नाही तो माझा शिष्यच नव्हे." त्याने एका श्रीमंताची अशी गोष्ट सांगितली की, हा श्रीमंत, आमच्या आजकालच्या श्रीमंतांप्रमाणें कोणतेंही दुष्कृत्य न करितां, केवळ 'खाना पीना और मजा करना' या तत्त्वानुसार वागला, तथापि यामुळेच त्याच्या आत्म्याची अधोगति झाली; आणि अकिंचन लाझारसचीही अशी कथा सांगितली की इतर कांहीही भलें न करितां निव्वळ निष्कांचनत्वामुळें त्याच्या आत्म्याचा बचाव झाला.

हें सर्व मला माहीत होतें; पण जगांतील खोट्या शिकवणीमुळें तें फार अंधुक होऊन सध्याच्या अर्थानुसार तें एक 'सिद्धान्तिक तत्त्व' म्हणजें खरोखर कोरडें आणि पोकळ शद्धावडंवर होऊन बसलें होतें. पण या खोट्या शिकवणीचा मजवर झालेला परिणाम मी झुगारून देतांच या तत्त्वज्ञानाचें प्रत्यक्ष आचरणाशीं तादात्म्य झालें व माझें आणि इतरांचें जीवन निर्विवादपणें या तत्त्वाबरहुकूमच कसें असलें पाहिजे हें स्पष्ट दिसूं लागलें.

मला कळलें की माणसाने स्वत:च्या हिताबरोबरच इतरांचें हितही अवश्यमेव साधलें पाहिजे. आम्ही कधी कधी अत्याचाराचें समर्थन करतांना 'जीवो जीवस्य जीवनम्' या तत्त्वज्ञानाला पोषक अशीं हिंस्र श्वापदांचीं उदाहरणें घेतों, पण आम्हांला धडा घ्यावयाचा तर तो सुशील मधमाशां-सारख्या समाजप्रिय प्राण्यांचा घेतला पाहिजे. म्हणून विचारशक्ति व उपजत स्वजनप्रेम हे मानव गुण जरी घटकाभर बाजूला ठेविले तरी माणसानें इतरांची सेवा करणें व सर्वांच्या सामान्य हिताकरितां झटणें हेंच माणसाचें स्वाभाविक कर्तव्य ठरतें अशी माझी खात्री झाली. मला स्पष्ट कळून आलें की, मानवी जीवनाचा हाच मूलभूत नियम आहे व माणसाला स्वत:चें श्रेय:साधन करून सुखी होण्याचा दुसरा मार्ग नाही. पण मला हेंही दिसलें की, या मूलभूत नियमाचा सतत भंग करण्यांत येत असून जशा मधमाशांत चोर मधमाशा असतात त्याप्रमाणें कांही लोक स्वत: काम टाळून दुसऱ्यांवर काम लादीत आहेत व स्वत:ची कार्यशक्ति

सार्वत्रिक हित साधण्याऐवजी फक्त स्वतःचे एकसारखे अधिकाधिक भडकत जाणारे मनोविकार तृप्त करण्यांत खर्च करून स्वतः चोर मधमाशांप्रमाणें नाश पावत आहेत. कांही लोक इतरांना गुलाम बनवितात,—याच परिस्थितींत माणसाच्या सर्व दुर्भाग्याचा उगम आहे हें मला उघड दिसून आलें. लष्करी शक्तीचा जुलूम, जमीन बळकावणें व पैसा उकळणें यामुळें आमच्या काळांतील गुलामगिरी निर्माण झाली आहे. नूतन दास्यवृत्तीच्या या तीन साधनांचा जेव्हा मला अर्थ कळला तेव्हा यांत भाग घेण्यापासून परावृत्त व्हावें असें मला वाटणें अपरिहार्य होतें.

जेव्हा माझ्या ताब्यांत कांही दास होते तेव्हा मला या बाबतींतील अन्याय समजूं लागतांच मी व माझ्यासारखें ज्या इतरांचें मन होतें त्या सर्वांनी या स्थितींतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. तो असा-परिस्थिति अनीतिमय वाटूं लागतांच तिजपासून मी पूर्णपणें निवृत्त होईपावेतो आपल्या दासांवरील हक्काचा शक्य तितका कमी उपयोग करावयाचा व जणूं काय मला हा हक्क नाहींच अशा रीतीने दासांना जीवित घालविण्याची मुभा द्यावयाची असें मी ठरविलें आणि बरोबरच सोबतच्या इतर मालकांच्या मनावर मी त्यांच्या या आगंतुक हक्कांचें अनीतिमत्त्व व निर्घृणता शक्य त्या उपायांनी पटवून देण्याचा प्रयत्न सुरू केला. सध्या जी गुलामगिरी चालू आहे तिच्या बाबतींत मला असें वागण्याखेरीज गत्यंतर नाही. अर्थात जोंवर मला माझी स्थावर मालमत्ता व पैसा यामुळें प्राप्त होणाऱ्या व लष्करी शक्तीच्या भरंवशावर रक्षण केल्या जाणाऱ्या हक्कांचा पूर्णपणें त्याग करतां येणें शक्य नाही, तोंपावेतों त्यांचा शक्य तितका कमी उपयोग करणें व इतरांच्या मनावर शक्य त्या प्रमाणांत या खोट्या हक्कांचें अनीतिमत्व व अमानुषता बिंबवणें हें माझें कर्तव्य ठरतें. दुसऱ्यांच्या श्रमांचा उपयोग करणारा गुलामांचा धनी गुलामगिरी प्रचलित ठेवण्यांत भाग घेत असतो. मग ती गुलामगिरी खुद्द गुलामांवरील मालकीच्या स्वरूपाची असली काय किंवा जमीन अगर पैसा यांच्या मालकीच्या स्वरूपांत असली काय.

म्हणून जर एखाद्याला खरोखर गुलामगिरी आवडत नसेल व तिच्यांत भाग घेऊं नये असें त्याला वाटत असेल तर दुसऱ्यांच्या श्रमाचा

उपयोग न करणें हें त्याचें पहिलें कर्तव्य ठरतें; म्हणजे त्याने जमिनीची मालकी, अथवा सरकारी नोकरी अगर पैसा यांचा स्वीकार करतां कामा नये.

अशा प्रकारें इतरांचे श्रम लुबाडण्याचा परंपरागत आयुष्यक्रम टाकून देण्याचा जो प्रयत्न करील त्याला प्रथम स्वत:च्या गरजा शक्य तितक्या कमी कराव्या लागून शिवाय पूर्वी जें त्याचें काम इतर लोक करीत तें आता त्याला स्वत: करावें लागेल हें उघड आहे.

हें अत्यंत सुलभ व अनिवार्य अनुमान माझ्या जीवनक्रमांतील सर्व बारीकसारीक गोष्टींना लागू पडून त्याने माझा जीवनक्रम पूर्णपणें बदलला, आणि पूर्वी मनुष्यजातीचें दैन्य आणि पतन पाहून मला ज्या मानसिक यातना होत त्या नष्ट होऊन ज्या तीन कारणांमुळे मला गरिबांना मदत करणें अशक्य झालें व जीं कारणें 'माझा प्रयत्न कां फसला' याचा विचार करीत असतां दत्त म्हणून पुढें उभीं राहिलीं तीं कारणेंही नष्ट झालीं.

लोकांनी शहरांतून गर्दी करणें व खेड्यांतील संपत्ति शहरांत आणून उघळणें हें या कारणांपैकी एक कारण होय, दुसऱ्याचे श्रम लुबाडावयाचे नाहीत म्हणजे जमीन, सरकारी नोकरी किंवा पैसा यांचा अभिलाष धरावयाचा नाही आणि आपल्या गरजा आपली कुवत व अक्कल यांच्याच भरंवशावर भागवायच्या अशी इच्छा मनांत आणण्याचाच उशीर की खेडें सोडून जाण्याची कल्पना कधी कोणाच्या डोक्यांतच शिरणार नाही, कारण खेड्यांतच स्वत:च्या गरजा स्वत: भागविणें अत्यंत सुलभ असतें आणि उलट शहरांतच पाहावें तों प्रत्येक जिन्नस दुसऱ्या कोणाच्या तरी श्रमाने तयार होत असल्यामुळें पैसा खर्चून विकत घ्यावा लागतो. त्याचप्रमाणें, गरजू माणसाला मदत करणें ही गोष्ट देखील खेड्यांत विशेष कठीण नाही आणि शहरांत मला जसें हतबुद्ध झाल्यासारखें वाटलें तसें वाटण्याचाही खेड्यांत प्रसंग येणार नाही कारण शहरांत मी स्वत:च्या श्रमाने नव्हे तर दुसऱ्या कोणाच्या तरी श्रमाने तिसऱ्या गरजू माणसाला मदत करण्याचा प्रयत्न करीत होतों.

कोणतीही जिन्नस विकत घेण्यास वापरला काय अगर लोकांना फुकट वाटला काय, गरिबांकडून परत वसूल करावयास हुंडी देणें हाच त्याचा अर्थ होय. अशा रीतीने गरिबांनाच लुबाडून गरिबांना मदत करण्याच्या माझ्या कल्पनेंतील खुळचटपणा मला स्पष्टपणें पटला. पैसा चांगला तर नव्हेच पण गरिबांचें श्रमाचें स्वातंत्र्य हिरावून घेणारें तें एक अरिष्ट आहे अशी माझी खात्री झाली. पी स्वतःच कामकरी नसल्यामुळें आणि मला स्वतःच्या श्रमाचा उपयोग करण्याचें भाग्य न लाभल्यामुळें हें दुस-याच्या पदरांत मला टाकतां आलें नाही.

कोणाला वाटेल, 'पैसा काय आहे?' या प्रश्नासंबंधींवर जें तात्त्विक विवेचन केलें तें करण्यांत विशेषसा अर्थ नाही. पण या प्रश्नाचा मी तत्त्वतः विचार केला नसून माझ्या स्वतःच्या जीवनक्रमाचें व मनःस्तापाचें रहस्य उकलावें म्हणून याचा मी विचार केला व त्यामधून मला 'आमचें कर्तव्य काय?' या प्रश्नाचें जत्तर मिळालें.

श्रीमंती व पैसा याचा अर्थ कळतांक्षणीं माझेंच नव्हे तर सर्वांचें कर्तव्य काय हें मला स्पष्ट दिसूं लागलें व म्हणूनच लोक नक्की काय करणार याचाही अंदाज लागला. वस्तुतः बुद्धदेवाने जें फार पूर्वी मानवजातीला शिकविल्याचें मला निव्वळ माहीत होतें तें आता मला उमजलें इतकाच त्याचा अर्थ. हीच शिकवण ईसाया, लाओत्झे व साक्रेटिस यांनी दिली असून आम्हांला तर अलीकडे स्पष्टतर व असंदिग्धपणें येशू ख्रिस्त व त्यापूर्वीचा बाप्तिस्त जॉन याने ही शिकवण दिली आहे. "आता आम्ही काय करावें?" या प्रश्नाचें सरळ, स्पष्ट व थोडक्यांत जॉन बाप्तिस्तनें असें उत्तर दिलें, "ज्याच्याजवळ दोन अंगरखे आहेत त्याने मुळीच अंगरखा नसलेल्याला एक द्यावा. त्याचप्रमाणें ज्याचे जवळ अन्न आहे त्यानेही असेंच करावें" —ल्यूक ३, १०, ११. हीच गोष्ट येशू ख्रिस्तानेही अनेक वेळां व विशेषच स्पष्टपणें सांगितली आहे. तो म्हणाला, "धनहीनांना धन्यवाद असो, आणि जे तुम्ही धनवान आहांत त्यांचें नष्टचर्य ओढवो!" तसेंच आणखी, "ईश्वर व पैसा यांची एकसमयावच्छेदेंकरून तुम्ही सेवा करणें शक्य नाही." ख्रिस्ताने आपल्या शिष्यांना पैसा, किंबहुना दोन कोट सुद्धा, न घेण्याबद्दल आदेश दिला होता. श्रीमंत तरुणाला त्याने

सांगितलें, "श्रीमंतीमुळें तुला ईश्वराच्या राज्यांत प्रवेश मिळणार नाही. एखादा उंट सुईच्या नाकांतून कदाचित् जाईल पण श्रीमंताला देवाच्या राज्यांत प्रवेश मिळणें शक्य नाही." त्याने सांगितलें, "जो घरदार, मुलें, जमीन या सर्वांचा त्याग करून माझ्या मागे येणार नाही तो माझा शिष्यच नव्हे." त्याने एका श्रीमंताची अशी गोष्ट सांगितली की, हा श्रीमंत, आमच्या आजकालच्या श्रीमंतांप्रमाणें कोणतेंही दुष्कृत्य न करितां, केवळ 'खाना पीना और मजा करना' या तत्त्वानुसार वागला, तथापि श्रीमुळेच त्याच्या आत्म्याची अधोगति झाली; आणि अकिंचन लाझारसचीही अशी कथा सांगितली की इतर कांहीही भलें न करितां निव्वळ निष्कांचनत्वामुळें त्याच्या आत्म्याचा बचाव झाला.

हें सर्व मला माहीत होतें; पण जगांतील खोट्या शिकवणीमुळें तें फार अंधुक होऊन सध्याच्या अर्थानुसार तें एक 'सिद्धान्तिक तत्त्व' म्हणजें खरोखर कोरडें आणि पोकळ शद्धावडंवर होऊन बसलें होतें. पण या खोट्या शिकवणीचा मजवर झालेला परिणाम मी झुगारून देतांच या तत्त्वज्ञानाचें प्रत्यक्ष आचरणाशीं तादात्म्य झालें व माझें आणि इतरांचें जीवन निर्विवादपणें या तत्त्वाबरहुकूमच कसें असलें पाहिजे हें स्पष्ट दिसूं लागलें.

मला कळलें की माणसाने स्वत:च्या हिताबरोबरच इतरांचें हितही अवश्यमेव साधलें पाहिजे. आम्ही कधी कधी अत्याचाराचें समर्थन करतांना 'जीवो जीवस्य जीवनम्' या तत्त्वज्ञानाला पोषक अशीं हिंस्र श्वापदांचीं उदाहरणें घेतों, पण आम्हांला धडा घ्यावयाचा तर तो सुशील मधमाशां-सारख्या समाजप्रिय प्राण्यांचा घेतला पाहिजे. म्हणून विचारशक्ति व उपजत स्वजनप्रेम हे मानव गुण जरी घटकाभर बाजूला ठेविले तरी माणसानें इतरांची सेवा करणें व सर्वांच्या सामान्य हिताकरितां झटणें हेंच माणसाचें स्वाभाविक कर्तव्य ठरतें अशी माझी खात्री झाली. मला स्पष्ट कळून आलें की, मानवी जीवनाचा हाच मूलभूत नियम आहे व माणसाला स्वत:चें श्रेय:साधन करून सुखी होण्याचा दुसरा मार्ग नाही. पण मला हेंही दिसलें की, या मूलभूत नियमाचा सतत भंग करण्यांत येत असून जशा मधमाशांत चोर मधमाशा असतात त्याप्रमाणें कांही लोक स्वत: काम टाळून दुसऱ्यांवर काम लादीत आहेत व स्वत:ची कार्यशक्ति

सार्वत्रिक हित साधण्याऐवजी फक्त स्वतःचे एकसारखे अधिकाधिक भडकत जाणारे मनोविकार तृप्त करण्यांत खर्च करून स्वतः चोर मघमाशांप्रमाणें नाश पावत आहेत. कांही लोक इतरांना गुलाम बनवितात,—याच परिस्थितींत माणसाच्या सर्व दुर्भाग्याचा उगम आहे हें मला उघड दिसून आलें. लष्करी शक्तीचा जुलूम, जमीन बळकावणें व पैसा उकळणें यामुळें आमच्या काळांतील गुलामगिरी निर्माण झाली आहे. नूतन दास्यवृत्तीच्या या तीन साधनांचा जेव्हा मला अर्थ कळला तेव्हा यांत भाग घेण्यापासून परावृत्त व्हावें असें मला वाटणें अपरिहार्य होतें.

जेव्हा माझ्या ताब्यांत कांही दास होते तेव्हा मला या बाबतींतील अन्याय समजूं लागतांच मी व माझ्यासारखें ज्या इतरांचें मन होतें त्या सर्वांनी या स्थितींतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. तो असा-परिस्थिति अनीतिमय वाटूं लागतांच तिजपासून मी पूर्णपणें निवृत्त होईपावेतो आपल्या दासांवरील हक्काचा शक्य तितका कमी उपयोग करावयाचा व जणूं काय मला हा हक्क नाहीच अशा रीतीने दासांना जीवित घालविण्याची मुभा द्यावयाची असें मी ठरविलें आणि बरोबरच सोबतच्या इतर मालकांच्या मनावर मी त्यांच्या या आगंतुक हक्कांचें अनीतिमत्त्व व निर्घृणता शक्य त्या उपायांनी पटवून देण्याचा प्रयत्न सुरू केला. सध्या जी गुलामगिरी चालू आहे तिच्या बाबतींत मला असें वागण्याखेरीज गत्यंतर नाही. अर्थात जोंवर मला माझी स्थावर मालमत्ता व पैसा यामुळें प्राप्त होणाऱ्या व लष्करी शक्तीच्या भरंवशावर रक्षण केल्या जाणाऱ्या हक्कांचा पूर्णपणें त्याग करतां येणें शक्य नाही, तोंपावेतों त्यांचा शक्य तितका कमी उपयोग करणें व इतरांच्या मनावर शक्य त्या प्रमाणांत या खोट्या हक्कांचें अनीतिमत्व व अमानुषता बिंबवणें हें माझें कर्तव्य ठरतें. दुसऱ्यांच्या श्रमांचा उपयोग करणारा गुलामांचा धनी गुलामगिरी प्रचलित ठेवण्यांत भाग घेत असतो. मग ती गुलामगिरी खुद्द गुलामांवरील मालकीच्या स्वरूपाची असली काय किंवा जमीन अगर पैसा यांच्या मालकीच्या स्वरूपांत असली काय.

म्हणून जर एखाद्याला खरोखर गुलामगिरी आवडत नसेल व तिच्यांत भाग घेऊं नये असें त्याला वाटत असेल तर दुसऱ्यांच्या श्रमाचा

उपयोग न करणें हें त्याचें पहिलें कर्तव्य ठरतें; म्हणजे त्याने जमिनीची मालकी, अथवा सरकारी नोकरी अगर पैसा यांचा स्वीकार करतां कामा नये.

अशा प्रकारें इतरांचे श्रम लुबाडण्याचा परंपरागत आयुष्यक्रम टाकून देण्याचा जो प्रयत्न करील त्याला प्रथम स्वत:च्या गरजा शक्य तितक्या कमी कराव्या लागून शिवाय पूर्वी जें त्याचें काम इतर लोक करीत तें आता त्याला स्वत: करावें लागेल हें उघड आहे.

हें अत्यंत सुलभ व अनिवार्य अनुमान माझ्या जीवनक्रमांतील सर्व बारीकसारीक गोष्टींना लागू पडून त्याने माझा जीवनक्रम पूर्णपणें बदलला, आणि पूर्वी मनुष्यजातीचें दैन्य आणि पतन पाहून मला ज्या मानसिक यातना होत त्या नष्ट होऊन ज्या तीन कारणांमुळे मला गरिबांना मदत करणें अशक्य झालें व जीं कारणें 'माझा प्रयत्न कां फसला' याचा विचार करीत असतां दत्त म्हणून पुढें उभीं राहिलीं तीं कारणेंही नष्ट झालीं.

लोकांनी शहरांतून गर्दी करणें व खेड्यांतील संपत्ति शहरांत आणून उघळणें हें या कारणांपैकी एक कारण होय. दुसऱ्याचे श्रम लुबाडावयाचे नाहीत म्हणजे जमीन, सरकारी नोकरी किंवा पैसा यांचा अभिलाष धरावयाचा नाही आणि आपल्या गरजा आपली कुवत व अक्कल यांच्याच भरंवशावर भागवायच्या अशी इच्छा मनांत आणण्याचाच उशीर की खेडें सोडून जाण्याची कल्पना कधी कोणाच्या डोक्यांतच शिरणार नाही, कारण खेड्यांतच स्वत:च्या गरजा स्वत: भागविणें अत्यंत सुलभ असते आणि उलट शहरांतच पाहावें तों प्रत्येक जिन्नस दुसऱ्या कोणाच्या तरी श्रमाने तयार होत असल्यामुळें पैसा खर्चून विकत घ्यावा लागतो. त्याचप्रमाणें, गरजू माणसाला मदत करणें ही गोष्ट देखील खेड्यांत विशेष कठीण नाही आणि शहरांत मला जसें हतबुद्ध झाल्यासारखें वाटलें तसें वाटण्याचाही खेड्यांत प्रसंग येणार नाही कारण शहरांत मी स्वत:च्या श्रमाने नव्हे तर दुसऱ्या कोणाच्या तरी श्रमाने तिसऱ्या गरजू माणसाला मदत करण्याचा प्रयत्न करीत होतों.

श्रीमंत व गरीब यांची फारखत हें दुसरें कारण होय. दुसऱ्याचे श्रम लुबाडावयाचे नाहीत (म्हणजे जमीन, सरकारी नोकरी किंवा पैसा यांचा अभिलाष धरावयाचा नाही) असें ठरवितांना प्रत्येकाला स्वत:च्या गरजा स्वत:च भागविणें प्राप्त होईल आणि श्रीमंत व गरीब यांमधील भिताड आपोआप जमीनदोस्त होईल; प्रत्येक जण इतरांशीं एकजीव होऊन इतरांच्या खांद्यास खांदा लावून उभा राहिल्यामुळें त्यांना मदत करणें त्याला शक्य होईल.

ज्याने मी मदत करणार त्या माझ्या अन्याय्य पैशासंबंधीं मला वाटणारी लाज हें तिसरें कारण होय. पुन:, लोकांचे श्रम लुबाडावयाचे नाहीत (अर्थात् जमीन, सरकारी नोकरी किंवा पैसा यांचा अभिलाष धरावयाचा नाही) असें ठरवितांच तो फाजील पैसा उरणारच नाही व तो असला म्हणजे पुरविण्यास अशक्य अशा ज्या मागण्या गरीब लोक करतात त्या यावयाच्या नाहीत आणि स्वत: कांही तरी अन्यायाचें कृत्य करतों अशी जाणीवही कोणालाच उरणार नाही.

प्रकरण तेविसावें

कांही माणसांनी इतर कांहो माणसांच्या दास्यांत खितपत असणें हेंच मानवांच्या दैन्याचें व अध:पाताचें कारण होय, असें मला दिसून आलें व त्यावरून मी असा साधा निष्कर्ष काढला की, इतरांना सहायभूत होण्याची माझी जर इच्छा असेल तर जीं दु:खें मी नाहीशीं करूं इच्छितों तीं दु:खें निर्माण करण्याचेंच मी मुळांत थांबविलें पाहिजे; याचाच अर्थ असा की मानवांना दास करण्याच्या कार्यांत भाग घेण्याचें मी सोडून दिलें पाहिजे. परंतु मानवांना दास करण्याच्या कार्यांत मी व्यापृत झालों याचें कारण म्हणजे, लहानपणापासून मला स्वतः काम करण्याऐवजीं लोकांचे श्रम राबवून घेण्याची संवय होती आणि ज्या समाजांत अशी गुलामगिरी रूढ होती, इतकेंच नव्हे तर नाना तऱ्हेच्या शब्दच्छलांनी व ढोंगांनी ज्यांत अशा गुलामगिरीचें समर्थन करण्यांत येत होतें, अशा समाजांत मी राहिलों होतों (व अझूनही राहतों,)--हेंच होय. मी असें अगदी साधें अनुमान काढलें की, लोकांच्या दुर्दशेला व अध:पाताला कारणीभूत व्हावयास नको असेल तर लोकांच्या श्रमांवर शक्य तितकें कमी अवलंबून राहून स्वतः अधिकाधिक कष्ट केले पाहिजेत. मोठा थोरला द्राविडी प्राणायाम करून मी जें हें अनिवार्य अनुमान काढलें तेंच 'एक आळशी तर दुसरा उपाशी' या चिनी लोकांच्या म्हणीमध्यें हजारों वर्षांपूर्वीपासून अंतर्भूत झालेलें आढळतें. मी ज्याच्यावर स्वारी केलेली आहे तो घोडा थकलेला असून मला जर त्याची कीव येत असेल तर माझें पहिलें कर्तव्य हें की मी त्या घोड्यावरून उतरून स्वत:च्या पायांनी चालूं लागलें पाहिजे.

आपल्या सदसद्विवेकबुद्धीचें समाधान करणारें असें जें हें उत्तर तें माझ्या डोळ्यांपुढे स्पष्ट उभें राहिलें व इतरांच्याही डोळ्यांपुढें राहतें, परंतु आपण आपली दृष्टि बाजूला वळवितों त्यामुळें तें दिसत नाही.

आमच्या सामाजिक रोगांवर औषध शोधण्याकरितां आम्ही सर्व दिशा धुंडाळतों--सरकारी, सरकारविरोधी, शास्त्रज्ञानात्मक, लोकोपकाटॉ.... १६

रक— अशा सर्व बाजूंचा अंधश्रद्धाळूपणाने अवलंब करून पाहतों, परंतु सर्वांच्या डोळ्यांना ढळढळीत दिसणाऱ्या गोष्टीकडे मात्र लक्ष देत नाही.

देहधर्म विसर्जन करण्याकरितां आम्ही भांडें वापरतों व दुसऱ्यांना तें घराबाहेर नेऊन टाकण्यास लावतों. हें काम करणाऱ्यांची आम्हांला कीव येते असा बाहाणा करून तें काम त्यांना शक्य तितकें सुसहनीय करण्याचा यत्न करितों; आणि त्यासाठी नाना तऱ्हेच्या युक्त्या आम्ही शोधून काढतों. परंतु आपल्याला जर घरांत विधि करावयाचे असतील तर आपलें भांडें आपण साफ करावें, अगर विधीकरितां बाहेर दूर जावें, ही सर्वांत साधी युक्ति आम्हांस सुचत नाही !

आपल्या भोवतालच्या विपन्न लोकांचे कष्ट पाहून ज्याच्या अंत:-करणास खरा पीळ पडतो त्याला एक अत्यंत स्पष्ट, सरळ व सोपा मार्ग खुला आहे. याच एका मार्गाचा अवलंब केल्याने आमच्या सभोवतालच्या लोकांचे कष्ट दूर होऊन आपण आपलें जीवन न्याय्य रीतीने घालवितों आहोंत असें आपणासही वाटूं लागेल. हा मार्ग म्हणजे 'जॉन दि बाप्टिस्ट'ने "तर मग आम्ही काय करावें ?" या प्रश्नाच्या उत्तरामध्यें जो दिग्दर्शित केला व ख्रिस्ताने दुजोरा देऊन जो पक्का केला तोच होय. तो हाच की, 'एका अंगरख्यापेक्षा अधिक वस्त्र स्वत:जवळ ठेवूं नये, आणि पैसा बाळगूं नये—म्हणजेच दुसऱ्यांच्या श्रमांचा उपयोग करूं नये—अर्थात जें जें शक्य असेल तें तें आपल्या स्वत:च्या हातांनी करावें.

हें कितीतरी सरळ व स्पष्ट आहे. पण केव्हा ? माणसाच्या गरजा स्पष्ट व साध्यासुध्या असतील व त्याच्या हाडींमासीं सुस्तपणा व आळस भरला नसेल तर. मी खेड्याचा रहिवासी आहें; मी घरांतील शेगडीच्या वरच्या उबदार भागावर खुशाल निजून राहतों व माझा एकादा ऋणको शेजारी असेल तर त्याला लाकडें आणून तीं कापून शेगडींत घालण्यास सांगतों. याचा स्पष्ट अर्थ असा की मी आळशी असून शेजाऱ्याला मी त्याच्या व्यवसायापासून परावृत्त करितों. याची मला लाज वाटेल, आणि सतत पडून राहण्याचाही कंटाळा येईल, आणि माझे स्नायु जर बळकट असतील व मला कामाचा सराव असेल तर मी जाऊन स्वत: लाकूड कापून आणीन.

परंतु सर्व प्रकारची गुलामगिरी प्रस्थापित करण्याची चट इतक्या दीर्घ काळापासून लागलेली आहे, या गुलामगिरीच्या आधाराने मनुष्याच्या

कृत्रिम गरजा इतक्या वाढल्या आहेत, या गरजांची सवय झालेले लोक इतके परस्परावलंबी बनलेले आहेत, पिढचानपिढचा चाललेल्या चोचले-बाजीमुळें माणसें इतकीं चवचाल बनलीं आहेत आणि आळस व ऐषआराम यांचीं समर्थनें इतक्या नानापरींनी करण्यांत येत आहेत, की या आळशां-च्या सोपानाच्या शिरोभागीं बसणारास त्याचें स्वत:चें पाप समजणें अत्यंत दूरापास्त होतें. दुसऱ्यास चूल पेटविण्यास मांगणाऱ्या शेतकऱ्याच्या तें चटकन लक्षांत येईल परंतु अशा चैनी सोकाजींच्या लक्षांत येणें फार कठीण.

हचा सोपानाच्या वरच्या पायऱ्यांवरील लोकांना आपण काय करा-वयास पाहिजे याचें आकलन होणेंच फार कठीण असतें. अनृतसोपानाच्या ते इतक्या उंच पायरीवर असतात की वस्तुत:–फार चांगल्या रीतीने नाही, तरी कमी अमानुषपणें राहण्याकरितां–कोणत्या प्रकारें आपला जीवनक्रम आखला पाहिजे हें पाहण्याकरितां खाली दृष्टि देतांक्षणींच त्यांना घेरी येते व म्हणूनच ही साधी व सरळ गोष्ट त्यांना विचित्र वाटूं लागते.

ज्याच्याजवळ दहा नोकर, पट्टेवाले, कोचमन, आचारी, चित्रें, पियानो इत्यादि गोष्टी आहेत त्याला, मोठी आदर्श वागणूक म्हणून नव्हे, तर आपण केवळ पशु नसून मनुष्य आहों एवढें दाखविण्यासाठी अवश्य अशीं कृत्यें—म्हणजे आपल्या स्वयंपाकास लागणारें सर्पण स्वत: फोडणें, निष्काळजीपणाने चिखल तुडविल्यामुळें चिखलाने भरलेले आपले जोडे आपण स्वत: स्वच्छ करणें, आपल्या अंग धुण्याकरितां लागणारें पाणी आपण स्वत: आणणें व अंग धुवून खराब झालेलें पाणी स्वत: बाहेर फेकणें—हीं कृत्यें स्वत: करणें हें त्याला केवळ विक्षिप्तपणाचें नव्हे तर मूर्खपणाचें वाटेल, हें उघड आहे.

परंतु स्वत:चीं साधीं व स्वाभाविक अंगमेहनतीचीं कामें स्वत: करावी या तत्त्वांतील खरेपणा न पटण्याचें कारण लोक सत्यमार्गापासून फार दूर आहेत हेंच केवळ नसून याशिवाय श्रीमंत लोक ज्या लोकांत वावरतात त्यांच्यांतील परस्परांचे गुंतागुंतीचे हितसंबंध व परिस्थितीचा अनेकांगीपणा हेंही दुसरें एक कारण आहे.

आज सकाळीं मी आमच्या घरांत जेथे शेगड्या पेटवतात त्या दालनांत गेलों. माझ्या मुलाच्या खोलीची शेगडी एक शेतकरी पेटवीत

होता. मी माझ्या मुलाच्या खोलींत गेलों तों तो निजलाच होता. अकरा वाजले होते. त्या दिवशीं सुटी होती. मग काय सबब तयारच–'आज कांही अभ्यास नाही.'

एक अठरा वर्षांचा गलेलठ्ठ मिसरूड फुटूं लागलेला मुलगा आदल्या रात्रीं फाजील खाल्ल्यामुळें सकाळीं अकरा वाजेतों झोपतो पण त्याच वयाचा शेतकऱ्याचा मुलगा केव्हाच सकाळीं उठून व बरींच कामें उरकून आता तो दहावी शेगडी पेटवीत आहे, तरी माझा मुलगा निजलेलाच. 'या गुटगुटीत आळशी पोराकरितां नोकर शेगडी न पेटवील तर बरें' असें मला वाटलें. पण लगेच माझ्या लक्षांत आलें की आमच्या चाळीस वर्षें वयाच्या स्वयंपाकिणीच्या खोलीला याच शेगडीने ऊब मिळते. ही बाई बिचारी काल मध्यरात्रीनंतर त्याच आळशी पोराचें जेवण तयार करीत होती, पण इतक्या उशिरां निजून सुद्धा ती सात वाजतां उठली. तिला वेळ नसल्यामुळें स्वत: शेगडी पेटविणें शक्य नव्हतें म्हणून शेतकरी ती शेगडी पेटवीत होता. त्या आळशी पोराचें त्यामुळें आयतेंच साधलें.

एकमेकांचे हितसंबंध याप्रमाणें गुंतले आहेत, हें खरें. पण अगदी थोडासा विचार केला तरी सुद्धा आळशी कोण व श्रम करणारा कोण हें सदसद्विवेकबुद्धि सांगेल. सदसद्विवेकबुद्धि तर हें सांगतेच पण हिशेबाच्या वह्या देखील अत्यंत स्पष्टपणें हेंच सांगतात. जितका जास्त पैसा माणूस खर्च करितो तितका तो इतरांना जास्त काम करावयास भाग पाडतो व जितका तो कमी खर्च करितो तितका तो स्वत: जास्त राबतो.

पण मग 'उद्योग धंदे', 'सार्वजनिक हिताचीं कृत्यें' आणि तो सर्वांहून भयंकर असा शब्द, 'सुधारणा' (म्हणजे शास्त्र व कला यांची उन्नति) यांचें काय ?

प्रकरण चोविसावें

गतवर्षी (१८८४) मार्चमध्यें एकदा संध्याकाळीं मी जरा उशिरां घरीं परत येत होतों. झुबोव्ह रस्त्यावरून खामोव्हनिकी गल्लीकडे वळतांच व्हर्जिन्स फील्ड वरील बर्फावर मला कांही काळे ठिपके दिसले. तेथे थोडी हालचालही दिसली.

त्या काळ्या ठिपक्यांकडे रोखून गल्लीच्या तोंडाशीं उभा असलेल्या एका पोलिसाने "व्हासिली, आणीत का नाही तिला?" असा जरा ओरडून सवाल केला नसता तर कदाचित् माझें तिकडे लक्षही गेलें नसतें.

"ती येत नाही" असा त्या काळ्या ठिपक्यांच्या बाजूने आवाज आला, व ते ठिपके पोलिस शिपायाकडे येऊं लागले.

मी थांबलों व पोलिसला विचारलें, "काय प्रकार आहे?" त्याने उत्तर दिलें, "झानोव्ह हाउसमधील बदफैली स्त्रियांना पकडून पोलिस स्टेशनवर नेलें; ही एक जरा मागे रेंगाळली; तुम्ही पाहतांच की ती जागची हालत सुद्धा नाही."

एक कातडीचा कोट घातलेला पोर्टर (रखवालदार) तिला पुढे करून ढकलीत आणीत होता. तो पोर्टर, तो पोलिस व मी यांच्या अंगांत हिवाळ्यांत घालावयाचे जास्तीचे कपडे होते परंतु त्या स्त्रीच्या अंगावर नेसूं वस्त्रेंच फक्त होती. उपासमारींत दिवस काढणाऱ्या लोकांप्रमाणें ती खुजी होती. तिचे पाय आखूड व एकंदर शरीरयष्टि फतकट व वेडी-वाकडी अशी होती.

पोलिस ओरडला, "ए मुरदाड! आम्हांला तुझ्याकरितां खोळंबावें लागत आहे. चालू लाग, नाही तर प्रसाद मिळेल." तो कंटाळून तिजवर चिडला होता, हें उघड होतें. ती कांही पावलें चालली व पुनः थबकली. तिला ढकलणारा शिपाई म्हातारा असून सुस्वभावी होता. मी त्याला ओळखें. तिचा हात धरून तो ओढूं लागला व रागाचा अविर्भाव करून म्हणाला,

"दम धर! मी तुला थांबायचें शिकवितों. चलतेस की नाही?"

तिचे पाय लटलटूं लागले व ती घोगऱ्या आवाजाने बोलू लागली. तिचा स्वर पोकळ व निर्जीव असा भासत होता.

"मला कां ढकलतोस ? मीच चलतें तेथे बापडी. "

" तूं गारठशील ना ! " तो पोर्टर म्हणाला.

" आमची जात गारठणारी नव्हे ! आमच्यांत सतत ऊब असते."

तिने हें चेष्टेने म्हटलें परंतु तें शिवीसारखें दिसलें. आमच्या घराच्या फाटकाजवळ असलेल्या दिव्याच्या खांबापाशीं ती पुनः थांबली व आवाराच्या कुंपणाला टेकली—जणूं कांही ती त्यावर पडतेच आहे—नंतर गारठलेल्या हातांनी ती आपल्या ओच्यांत चाचपूं लागली. ते पुनः तिच्या अंगावर ओरडले पण तिने कांही पुटपुटून आपलें चाचपणें चालूच ठेवलें. तिच्या एका हातांत एक वाकलेली सिगारेट व दुसऱ्या हातांत गंधकाच्या आगकाड्या होत्या. मी थबकलों, तिच्या अंगावरून पुढे जाण्याचो किंवा थांबून तो प्रकार पाहत राहण्याची मला सारखीच लाज वाटली. शेवटीं मनाचा हिय्या करून मी तिजजवळ गेलों. तिने आपला खांदा त्या लाकडी कुंपणाला टेकला होता. कुंपणावर आगकाड्या घासून त्या उजळण्याचो ती खटपट करीत होती, परंतु ती व्यर्थ गेल्यामुळें त्या आगकाड्या तिने फेकून दिल्या. मी तिच्या चेहऱ्याकडे पाहिलें. ती अगदी रोड होती, परंतु तिची तारुण्यावस्था सरली असावी, असें मला दिसलें ती तीस वर्षांची असावी अशी माझी कल्पना झाली. तिचा चेहरा मळकट व तिचे डोळे बारीक, तेजोहीन व ताठरलेले असे दिसले. तिचें नाक पसरट असून ओठ जाड व टोकास लोंबलेले असे होते. डोकीस बांधलेल्या फडक्यांतून तिचे आखूड व रुक्ष केसही बाहेर दिसत होते. तिच्या शरीराचा वरील भाग लांबट व चपटा असून हातपाय आखूड व जाड होते. तिने मजकडे पाहून किंचित् हसल्यासारखें केलें. 'तुमच्या मनांत काय घोळत आहे, तें मी ओळखलें,' असेंच दर्शविण्याची तिची जणूं काय इच्छा होती !

आपण तिच्याशीं कांही तरी बोललें पाहिजे, असें मला वाटलें. तुझी मला दया येते, असें तिला दर्शवावें अशी इच्छा मनांत उद्भूत झाली.

"तुझे आईबाप जिवंत आहेत काय ?" मी विचारलें.

ती घोगऱ्या स्वरांत हसली, नंतर एकदम थबकून भुवया वर चढवून तिने मजकडे पाहिलें.

"तुझे आईबाप जिवंत आहेत काय ?" पुनः तोच प्रश्न मी केला.

तिने किंचित् हास्य करून चेहरा असा केला की, 'वा ! तुम्ही तर मोठा विचित्र प्रश्न शोधून काढलात !' असेंच तिला म्हणावयाचें आहे, असें वाटलें.

"होय, मला आई आहे. पण तुम्हांला त्याचें काय ?" ती उदगारली.

मी विचारलें, "आणि तुझें वय काय ?"

"पंधरांच्यावर" हें नेहमीच्या परिचयाच्या प्रश्नाला जसें द्यावें त्याप्रमाणें तिने उत्तर दिलें.

"ए, चल ! नाहीतर आम्ही सर्वच तुझ्या बरोबर गारठून मरूं. मरत नाहीस एकदाची." पोलिस ओरडला. कुम्पणाचा आसरा सोडून ती कशीबशी लटपटत दूर झाली व झोकांड्या जात आहेत अशा स्थितींत खामोव्हनिकी रस्त्यावरून पोलिस नाक्याच्या दिशेने जाऊं लागली. इकडे मी फाटकांतून स्वत:च्या घरांत शिरलों व माझ्या मुली घरीं आल्या आहेत की नाहीत याची चौकशी केली. मला कळलें की त्या एका मेजवानीला गेल्या होत्या व तेथे पुष्कळ मजा करून परत आल्यावर त्या झोपीं गेल्या होत्या.

दुसरे दिवशीं सकाळीं पोलिस नाक्यावर जाऊन त्या दुर्दैवी बाईचें काय झालें याची चौकशी करावी असें मला वाटलें. या बेतानुसार मी घरांतून सकाळीं लवकर बाहेर पडतों तोंच एक सभ्य गृहस्थ—जे स्वता-च्याच दोषांमुळें स्वत:च्या सवयीची सुखाची परिस्थिति गमावून कधी बरी तर कधी वाईट अशा स्थितींत हेलकावे खात असतात अशा गृह-स्थांपैकी एक—मला भेटावयास आले. मी याला तीन वर्षांपासून ओळखीत असें. या अवधीमध्यें त्याने अनेकवार आपली सर्व मालमत्ता –अंगावरील कपड्यांसुद्धा–गहाण टाकली होती. अशीच एक आपत्ति नुकतीच त्याजवर आली असल्यामुळें तो रात्र झानोव्ह हाउसमध्यें काढी व दिवसां मजकडे येत असे. मी बाहेर जावयास निघालों होतों इतक्यांत तो मजकडे आला व मला जें कांही बोलावयाचें होतें तें ऐकून न घेतां आदले रात्रीं झानोव्ह हाउसमध्यें काय प्रकार झाला त्याचें वर्णन तो करूं लागला. आपला वृत्तांत जेम तेम निम्मा शिम्मा सांगून तो सर्व प्रकारच्या

स्थितीचे टक्के टोणपे खाल्लेला म्हातारा एकदम स्फुंदून स्फुंदून रडूं लागला व भितीकडे तोंड करून बसला. त्याने सांगितलेली हकीकत पुढे मी प्रत्यक्ष त्या जागीं जाऊन चौकशी करून पडताळून पाहिली, त्यावरून त्याने सांगितलेलें सर्व पूर्णपणें खरें होतें असेंच पुढे मला दिसून आलें. प्रत्यक्ष चौकशींत मला ज्या बारक्यासारक्या गोष्टी अधिक समजल्या त्यांचा त्याने सांगितलेल्या हकीकतींत समावेश करून ती सर्व हकीकत जुळवून मी येथे निवेदन करीत आहें—

ज्या धर्मशाळेंत, तळमजल्यावरील नं. ३२ मध्ये, पांच कोपेक देऊन रात्रीं निजण्यापुरतें एकत्र जमणाऱ्या इतर अनेक स्त्रीपुरुष पथिकांच्या घोळक्यांत हा माझा मित्र झोपत असे, त्याच ठिकाणीं सुमारें तीस वर्षांची, गोरी व नीटस दिसणारी, शांत व सुस्वभावी पण आजाऱ्यासारखी दिसणारी अशी एक परटीण राहत असे. या घराची व्यवस्थापक (मूळ भाडेकरीण) ही एका होडीवाल्याची रखेली होती. होडीवाला उन्हाळ्यांत होडी चालवी पण हिवाळ्यांत हीं दोघें या भाड्याच्या घरांत निजावयास बिछाने भाड्याने देऊन त्यावर पैसे मिळवीत. बिनउशीच्या बिछान्यास तीन व उशीच्या बिछान्यास पांच कोपेक असें भाडें असे. धोबीण गेले कांही महिने तेथे रहात असून तिचा कोणाला उपसर्ग नसे, पण अलीकडे तिच्या खोकण्यामुळें झोपमोड होई म्हणून ती इतर निजणारांस आवडेनाशी झाली होती. विशेषेंकरून तेथे एक अर्धवट मार्थे फिरलेली ऐंशी वर्षांची म्हातारी कायम भाडेकरी म्हणून असे, तिची हिच्यावर भारी गैरमर्जी होऊन आपली झोप मोडल्याबद्दल व एखाद्या मेंढीप्रमाणें सतत खाकरीत असण्याबद्दल ती म्हातारी तिला एकसारखी सतावून सोडीत असे. धोबीण हें मुकाटपाने ऐकून घेई; तिने भाडे दिलें नव्हतें म्हणून तिला एखाद्या गुन्हेगाराप्रमाणें कानकोंडें वाटे; अर्थात् गप बसणें तिला भागच होतें. ती कामावर जात असे, तेथे तिचे खाडे जास्त होऊं लागले, तिची शक्ति कमी होऊं लागली; अर्थात् खोलीच्या मालकिणीला भाडें देणें तिला जमेना.गेला आठवडाभर ती कामावर गेली नव्हती व स्वतःच्या खोकल्याने तिने सर्वांचें–विशेषतः त्या म्हाताऱ्या बाईचें–जीवन कष्टमय करून टाकलें होतें. चार दिवसांपूर्वी घरमालकिणीनें

तिला निघून जाण्याविषयीं सांगितलें होतें. तिच्याकडे साठ कोपेक भाडें आधीच थकलें होतें आणि तें वसूल होण्याची आता फारशी आशाही नव्हती. सर्व बिछानेही गुंतलेले होते; शिवाय इतर झोपणारे हिच्या खोकल्यावद्दल तक्रार करीत होते हें वेगळेंच.

मालकिणीने धोबिणीला जेव्हा, "माझें भाडें दे, नाही तर निघून जा" असें सांगितलें तेव्हा त्या म्हातारीला मोठा आनंद झाला. तिने तिला बाहेर अंगणांत ढकलून दिलें. धोबीण गेली, पण पुनः एका तासाने परत आली. तिला पुनः हाकून देण्याचें घरमालकिणीच्या जिवावर आलें. त्यामुळें दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीं तिला हाकून देण्याचा उद्योग तिने केला नाही. "मी जाऊं तरी कोठे ?" असा प्रश्न तिने टाकला. परंतु तिसऱ्या दिवशीं शहरांतील राहणी व कायदेकानू माहीत असणारा व मास्कोचाच राहणारा त्या मालकिणीचा प्रियकर पोलिसाची मदत घेण्यास गेला. एक तरवार व तांबडया दोरीला लटकावलेलें पिस्तूल घेतलेला एक पोलिस शिपाई आला व त्याने सौम्य शब्दांनीच त्या धोबिणीला बाहेर काढून रस्त्यावर आणलें.

निरभ्र पण कमाल थंडीचा मार्च महिन्यांतील तो एक दिवस होता. गटारांतून पाणी वाहत असून मजूर लोक रस्त्याच्या फर्शीवरील बर्फ फोडीत होते.* बर्फावरून ओढावयाच्या गाडया फोडलेल्या बर्फावरून जातांना उडत होत्या आणि साफ झालेल्या फरशीवरून जातांना किर्र असा आवाज करीत होत्या.† ती धोबीण चढावावरून उन्हाकडच्या बाजूने जाऊन चर्चजवळ थांबली व प्रवेशद्वारापाशीं उन्हांत बसली. परंतु लवकरच सूर्य त्या घराच्या मागच्या बाजूने अस्तास जाऊं लागला आणि

---

* रस्त्यांतून बर्फ पडणें व तो फोडावा लागणें हें राशिया व त्यासारख्या थंड देशांत नेहमींचें आहे. हें बर्फ फोडून झालेलें पाणी अर्थातच नाल्यांनी वाहतें.

† बर्फावरून ओढण्याकरितां ज्या गाड्या—sledges— असतात त्यांना चाकें नसून बर्फावरून सहज घसरतील अशा लोखंडी कांबीवर त्या बांधलेल्या असतात या लोखंडी कांबी खरडून साफ केलेल्या फरशीवरून ओढल्या गेल्या म्हणजे अर्थात् रलेट पाटीवर खिळा ओढावा तसा अंगावर शहारे आणणारा आवाज होतो.

जलाशयांवर बर्फ जमूं लागलें. त्याबरोबर तिला थंडी वाजूं लागली व भयही वाटूं लागलें. ती उठली व कशी तरी रखडत चालूं लागली.... कुणीकडे ?—घरीं. अर्थात् जी जागा अलीकडे तिचें घर बनून राहिली होती त्या जागेकडे ! थांवत थबकत त्या घरीं ती पोचली, त्यापूर्वीच काळोख पडूं लागला होता. ती फाटकापाशीं आली, तेथे आंतल्या बाजूस वळली तोंच तिचा पाय घसरला व एक किंकाळी फोडून ती खाली पडली.

तिच्या अंगावरून एक मनुष्य गेला, दुसरा गेला. 'झिंगून पडली असेल.' एक म्हणाला. आणखी एकजण तिजजवळून जात असतां तिच्या शरीरापाशीं अडखळला; तेव्हा त्याने अंगणाच्या रखवालदारास म्हटलें " कोणी दारू पिऊन झिंगलेली स्त्री तुझ्या फाटकांत पडली आहे. तिला ठेचकाळून मी तोंडघशी पडलों व माझा कपाळमोक्ष व्हावयाची वेळ आली. तिला येथून काढून देऊं शकत नाहीस काय ? "

तो दरवान त्यासंबंधीं कांही तरी योजना करण्यासाठी म्हणून गेला....परंतु.... त्या धोबिणीचा प्राण तत्पूर्वीच निघून गेला होता.

माझ्या मित्राने मला हकीकत सांगितली ती हीच. मी मला पोषक अशाच गोष्टींची—त्या पंधरा वर्षें वयाच्या वेश्येची व या धोबिणीची—निवड करीत आहें, असें वाचकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु तसा समज करून घेण्याचें कांही कारण नाही. या गोष्टी तंतोतत अशाच एकाच रात्रीं घडल्या—तारीख आठवत नाही, परंतु १८८४च्या मार्च महिन्यांत घडल्या—हें खास. असो.

ही हकीकत ऐकल्यावर मी पोलिस ठाण्याकडे जावयास निघालों. पुढे तसेंच झानोव्ह होसमध्यें जाऊन धोबिणीविषयीं अधिक माहिती काढण्याचा माझा इरादा होता. आकाश निरभ्र असून ऊन पडलें होतें. रात्रीं जे बर्फाचे स्फटिक तयार झाले होते त्यांतील खाचांमधून (उन्हामुळें) पुनः पाणी जमत चाललेलें दिसत होतें; खामोव्हनिकी चौकांत झगझगीत उन्हामुळे बर्फ वितळूं लागून पाणी वाहूं लागलें होतें. नदीकडून कसला तरी आवाज येत होता. सान्स सौची बगीच्यांतील झाडांमधून नदीपलीकडील आकाश दृग्गोचर होत होतें. हिवाळ्यांत दृष्टीस न पडणाऱ्या चिमण्या आनंदाने बागडत असलेल्या लोकांचें चित्त वेधीत होत्या.

माणसांनाही थोडी मौजमजा करण्याची इच्छा होत होती असें दिसत होतें; परंतु सर्वांच्या मनावर काळजीचें दडपण फार. प्रार्थनामंदिरांमधून घंटानाद ऐकूं येत होते; आणि या एकमेकांत मिसळणाऱ्या नादांच्या पार्श्वभूमीवर बराकींत चालू असलेल्या गोळीबाराच्या कसरतींतील गोळ्यांचा सूं सूं असा आवाज व गोळ्या निशाणावर आपटत त्याचा धाडकन होणारा आवाज ऐकूं येत होता.

मी पोलिसस्टेशनवर पोचलों. तेथे बरेच शस्त्रधारी लोक होते. त्यांनी मला आपल्या मुख्याकडे नेलें. त्याच्याजवळही एक तरवार व एक पिस्तूल होतें. त्याचे समोर एक जर्जर आणि विचारलेल्या प्रश्नांचीं नीट उत्तरें देण्यासही असमर्थ असा एक म्हातारा थरथरत उभा होता. त्याचेबद्दल तो (मुख्याधिकारी) कांही तरी हुकूम देत होता. म्हाताऱ्याचें प्रकरण संपतांच तो मजकडे वळला. मी कालच्या मुलीसंबंधीं विचारलें. प्रथम तो लक्ष लावून ऐकत होता. पण नंतर मला त्यासंबंधींचे कायदे अगर बेड्यांना पोलिस नाक्यावर कां नेंत याचीं कारणें माहीत नसल्याचें पाहून त्याने स्मित केलें. ती कोवळी पोर असल्याचें मला आश्चर्य वाटलें याबद्दल तर त्याला विशेषच नवल वाटलें.

तो उल्लासाने म्हणाला, "यांत तुम्हांला काय आश्चर्य वाटतें? अहो, यांच्यापैकी कांही तर बारा वर्षांच्या सुद्धा असतात. तेरा चौदा वर्षांच्या तर कैक आहेत."

मी कालच्या मुलीसंबंधीं चौकशी केली त्या बाबत "त्यांना (अशा धरलेल्या सर्व मुलींना) कमिटीकडे पाठविलें आहे." असें त्याने स्पष्टीकरण दिलें (असें मला वाटतें). त्यांनी रात्र कोठें काढिली असावी या माझ्या प्रश्नाला त्याने गुळमुळीतच उत्तर दिलें. मी ज्या विशिष्ट मुलीसंबंधीं चौकशी करीत होतों तिच्याबद्दल कांहीच आठवत नाही, कारण दररोज अशा कैक येत होत्या, असें त्याच्या म्हणण्यांत आलें.

(नंतर) झानोव्ह हौसकडे गेलों. खोली नं० ३२ मध्यें त्या मेलेल्या धोबिणीजवळ एक पाद्री अखेरचे मंत्रोच्चार करतांना दिसला. ज्या फळीवर पूर्वी ती निजत असे तिच्यावरच तिला ठेविलें असून शेजाऱ्यांनीच (ते सर्व

गरीब होते तरी) भटजीची दक्षिणा, प्रेतमंजूषा व आवरणवस्त्र यांना लागणारे सर्व पैसे गोळा केले होते व म्हातारीने प्रेताला पोषाख व वस्त्रें नेसवून तयार केलें होतें. पाद्री अंघुक प्रकाशांत मंत्र वाचीत होता. एक पायघोळ अंगरखा घातलेली बाई व एक 'जंटलमन'सारखा स्वच्छ इस्तरीचा पोषाख केलेला गृहस्थ यांनी दोन बाजूला दोन निमुळत्या मेणबत्त्या धरल्या होत्या. हा गृहस्थ त्या बोबिणीचा भाऊ. तेथील लोकांनी त्याचा सरते शेवटीं पत्ता काढला होता.

प्रेताजवळून पुढे मी घरमालकिणीकडे गेलों व सर्व प्रकरणाची चवकशी करूं लागलों. माझ्या प्रश्नांमुळें ती घाबरली. आपल्यावर कांही तरी किटाळ येतें की काय अशी तिला भीति वाटली हें उघड होतें. पण थोड्या वेळानंतर ती मोकळेपणाने बोलूं लागली आणि मग तिने मला सर्व हकीकत सांगितली. मी बाहेर जातां जातां प्रेताकडे पाहिलें. मृत व्यक्तींच्या आविर्भावांतही एक प्रकारचें सौंदर्य असतें. पण हें प्रेत पेटीत असतांना विशेषच सुंदर व करुणाजनक दिसलें. चेहेरा स्वच्छ व पांडुर वर्णाचा, डोळे ठसठशीत परंतु मिटलेले, गाल बसलेले, कपाळ रुंद व त्याच्यावर असलेले केंस नरम व पिंगट, थकलेली, सौम्य आणि खिन्न नव्हे परंतु विस्मित झालेली मुखचर्या--असें त्या कलेवराचें दृश्य होतें. आणि खरेंच आहे! जिवंत माणसें जर डोळे असून नसल्यासारखीं वागत असतील तर मेलेल्यांनी आश्चर्यचकित कां होऊं नये ?

ज्या दिवशीं मीं ही हकीकत लिहून काढली, त्याच दिवशीं मॉस्कोमध्यें एक मोठा नाच होणार होता.

त्या दिवशीं मी घरूव (रात्री) आठ वाजल्यानंतर निघालों माझ्या घराभोवतीं गिरण्या आहेत व मी घरून निघण्यापूर्वीच सुटीचे पोंगे होऊन गले होते. गिरण्यांतून सतत आठवडाभर काम केल्यानंतर कामगारांना एक दिवसाची सुटी त्या पोंग्यांनी जाहीर केली होती.

जातांना मला गिरणीकामगारांच्या थव्यामधूनच जावें लागलें. सर्वजण दारूच्या भट्ट्या अगर हॉटेलें यांच्या रोखाने चालले होते. पुष्कळ जण अगोदरच दारू पिऊन झिंगले होते व अनेकांच्या जोडीला बायकाही होत्या.

मी गिरण्यांच्या घोळक्यांत राहतों दररोज पहाटे पांच वाजतां एक पोंगा ऐकूं येतो, त्यानंतर दुसरा, त्यानंतर तिसरा .... दहावा,.... असेच आणखी अनेक दूर अंतरापर्यंत ऐकूं येतात. या पोंग्यांचा अर्थ असा की पुरुष, बायका व मुलें कामाला लागलीं. आठ वाजतां अर्ध्या तासाच्या सुटीचा पोंगा होतो. दुपारीं पुनः एक अर्धातास जेवणाच्या सुटीचा पोंगा होतो व सायंकाळीं आठ वाजतां दिवसांतील शेवटचा–सुटीचा–पोंगा होतो.

एक प्रकारचा चमत्कारिक योगायोग असा की माझ्या नजीकच्या तीन्ही गिरण्यांतून केवळ नाचाच्या प्रसंगीं उपयोगीं पडणारे असेच जिन्नस तयार होतात. अगदी नजीकच्या गिरणींत मोजे बनतात, दुसरींत रेशमी कापड तयार होतें व तिसरींत सुगंधी माल व पोमेड तयार होतें.

हे पोंगे ऐकून फक्त वेळेचीच कल्पना मनांत येणें शक्य आहे. "हा पहा पोंगा झाला. माझी फिरावयाची वेळ झाली." इतकेंच एखाद्यास पोंगा ऐकून वाटेल. परंतु खरी वस्तुस्थिति काय आहे याची जाणीव पोंग्यामुळे होणें हेंही अगदी शक्य आहे. सकाळीं पांचला जो पहिला पोंगा होतो त्याचा अर्थ असा की जे लोक तळमजल्यावरच्या ओलसर, कोंदट जागेंत गर्दी करून—कैक प्रसंगीं स्त्रीपुरुषांची भेसळ करूनही—निजलेले असतात ते अंधारांत उठून जेथे यंत्रें शंखध्वनि करीत असतात त्या इमारतीतील आपापल्या कामाच्या जागी जाण्यासाठी धावपळ करीत आहेत. हें काम कधी संपणार, अगर या घडपडीचा उपयोग काय, हें त्यांना स्वतःलाच माहीत नसतें. अशाप्रकारें कोंदट, गरम व घाणेरड्या खोल्यांतून—मध्यंतरीं सुटीचा थोडासा वेळ वगळल्यास—एक, दोन, तीन .... याप्रमाणें बारा किंवा अधिक तास ते रोज काम करीत असतात. रात्री ते निजतात व दिवसा उठून पुनः तेंच काम करितात. याप्रमाणें तोच तो कार्यक्रम ते अव्याहत चालू ठेवतात. या कामाचा त्यांच्या दृष्टीने कांहीच अर्थ नसतो, पण गरजवंताच्या नाइलाजाने ते तें करीत असतात.

क्वचित् येणारे सुटयाचे दिवस सोडून दिल्यास, याप्रमाणें आठवड्यामागून आठवडे जातात. मी ज्या दिवसाचा वर उल्लेख केला आहे त्या दिवशीं अशाच (दुसऱ्या दिवसाच्या) सुटीच्या अपेक्षेने लोक मोकळे

गरीब होते तरी) भटजीची दक्षिणा, प्रेतमंजूषा व आवरणवस्त्र यांना लागणारे सर्व पैसे गोळा केले होते व म्हातारीने प्रेताला पोषाख व वस्त्रें नेसवून तयार केलें होतें. पाद्री अंघुक प्रकाशांत मंत्र वाचीत होता. एक पायघोळ अंगरखा घातलेली बाई व एक 'जंटलमन'सारखा स्वच्छ इस्तरीचा पोषाख केलेला गृहस्थ यांनी दोन बाजूला दोन निमुळत्या मेणबत्त्या धरल्या होत्या. हा गृहस्थ त्या घोबिणीचा भाऊ. तेथील लोकांनी त्याचा सरते शेवटीं पत्ता काढला होता.

प्रेताजवळून पुढे मी घरमालकिणीकडे गेलों व सर्व प्रकरणाची चवकशी करूं लागलों. माझ्या प्रश्नांमुळें ती घाबरली. आपल्यावर कांही तरी किटाळ येतें की काय अशी तिला भीति वाटली हें उघड होतें. पण थोड्या वेळानंतर ती मोकळेपणाने बोलूं लागली आणि मग तिने मला सर्व हकीकत सांगितली. मी बाहेर जातां जातां प्रेताकडे पाहिलें. मृत व्यक्तींच्या आविर्भावांतही एक प्रकारचें सौंदर्य असतें. पण हें प्रेत पेटींत असतांना विशेषच सुंदर व करुणाजनक दिसलें. चेहेरा स्वच्छ व पांडुर वर्णाचा, डोळे ठसठशीत परंतु मिटलेले, गाल बसलेले, कपाळ रुंद व त्याच्यावर असलेले केंस नरम व पिंगट, थकलेली, सौम्य आणि खिन्न नव्हे परंतु विस्मित झालेली मुखचर्या--असें त्या कलेवराचें दृश्य होतें. आणि खरेंच आहे! जिवंत माणसें जर डोळे असून नसल्यासारखीं वागत असतील तर मेलेल्यांनी आश्चर्यचकित कां होऊं नये ?

ज्या दिवशीं मीं ही हकीकत लिहून काढली, त्याच दिवशीं मॉस्कोमध्यें एक मोठा नाच होणार होता.

त्या दिवशीं मी घरून (रात्रौ) आठ वाजल्यानंतर निघालों माझ्या घराभोवतीं गिरण्या आहेत व मी घरून निघण्यापूर्वीच सुटीचे पोंगे होऊन गले होते. गिरण्यांतून सतत आठवडाभर काम केल्यानंतर कामगारांना एक दिवसाची सुटी त्या पोंग्यांनी जाहीर केली होती.

जातांना मला गिरणीकामगारांच्या थव्यामधूनच जावें लागलें. सर्वजण दारूच्या भट्ट्या अगर हॉटेलें यांच्या रोखाने चालले होते. पुष्कळ जण अगोदरच दारू पिऊन झिंगले होते व अनेकांच्या जोडीला बायकाही होत्या.

मी गिरण्यांच्या घोळक्यांत राहतों दररोज पहाटे पांच वाजतां एक पोंगा ऐकूं येतो, त्यानंतर दुसरा, त्यानंतर तिसरा .... दहावा,.... असेच आणखी अनेक दूर अंतरापर्यंत ऐकूं येतात. या पोंग्यांचा अर्थ असा की पुरुष, बायका व मुलें कामाला लागलीं. आठ वाजतां अर्ध्या तासाच्या सुटीचा पोंगा होतो. दुपारीं पुनः एक अर्धातास जेवणाच्या सुटीचा पोंगा होतो व सायंकाळीं आठ वाजतां दिवसांतील शेवटचा–सुटीचा–पोंगा होतो.

एक प्रकारचा चमत्कारिक योगायोग असा की माझ्या नजीकच्या तीन्ही गिरण्यांतून केवळ नाचाच्या प्रसंगीं उपयोगीं पडणारे असेच जिन्नस तयार होतात. अगदी नजीकच्या गिरणींत मोजे बनतात, दुसरींत रेशमी कापड तयार होतें व तिसरींत सुगंधी माल व पोमेड तयार होतें.

हे पोंगे ऐकून फक्त वेळेचीच कल्पना मनांत येणें शक्य आहे. "हा पहा पोंगा झाला. माझी फिरावयाची वेळ झाली." इतकेंच एखाद्यास पोंगा ऐकून वाटेल. परंतु खरी वस्तुस्थिति काय आहे याची जाणीव पोंग्यामुळे होणें हेंही अगदी शक्य आहे. सकाळीं पांचला जो पहिला पोंगा होतो त्याचा अर्थ असा की जे लोक तळमजल्यावरच्या ओलसर, कोंदट जागेंत गर्दी करून—कैक प्रसंगीं स्त्रीपुरुषांची भेसळ करूनही—निजलेले असतात ते अंधारांत उठून जेथे यंत्रें शंखध्वनि करीत असतात त्या इमारतीतील आपापल्या कामाच्या जागी जाण्यासाठी धावपळ करीत आहेत. हें काम कधी संपणार, अगर या धडपडीचा उपयोग काय, हें त्यांना स्वतःलाच माहीत नसतें. अशाप्रकारें कोंदट, गरम व घाणेरड्या खोल्यांतून—मध्यंतरीं सुटीचा थोडासा वेळ वगळल्यास—एक, दोन, तीन .... याप्रमाणें बारा किंवा अधिक तास ते रोज काम करीत असतात. रात्रो ते निजतात व दिवसा उठून पुनः तेंच काम करितात. याप्रमाणें तोच तो कार्यक्रम ते अव्याहत चालू ठेवतात. या कामाचा त्यांच्या दृष्टीने कांहीच अर्थ नसतो, पण गरजवंताच्या नाइलाजाने ते तें करीत असतात.

क्वचित् येणारे सुटयाचे दिवस सोडून दिल्यास, याप्रमाणें आठवड्यामागून आठवडे जातात. मी ज्या दिवसाचा वर उल्लेख केला आहे त्या दिवशीं अशाच (दुसऱ्या दिवसाच्या) सुटीच्या अपेक्षेने लोक मोकळे

सुटले होते. अशा दिवशीं रस्ताभर त्यांचीच (गिरणीमजुरांची) गर्दी असते. खाणावळी, हॉटेलें व बदफैली स्त्रिया यांचा सर्वत्र सुळसुळाट असतो. सर्व लोक धुंदीमध्यें एकमेकांच्या हातांत हात घालून रस्त्याने रेंगाळत चाललेले असतात. मागे पोलिस ज्या तरुणीला ओढून नेत असल्याची हकीकत दिली आहे तिच्या सारख्याच मुलींना बरोबर घेऊन कांही लोक रखडत जात असतात. कांही भाडयाच्या 'स्लेजी'मधून (बर्फावरून घसरत जाणाऱ्या गाडयांमधून) तर कांही पायींच एका हॉटेलाहून दुसऱ्या हॉटेलांत जात असतात. आणाशपथा व असंबद्ध बरळणें चालूच असतें. सगळ्यांच्या झोकांडया जात असून त्यांची बडबड त्यांनाच कळत नसते. पूर्वी या मजुरांना जेव्हा मी असे झिंगलेले पाहीं तेव्हा मी त्यांना टाळीत असें व मी त्यांना दोष देईं. पण अलीकडे त्या दररोज वाजणाऱ्या पोंग्यांचा मला अर्थ कळूं लागल्यापासून हे लोक यापेक्षा अधिक कसे भडकत नाहींत याचेंच मला आश्चर्य वाटत आहे. मास्कोंत ज्यांचा सुळसुळाट आहे अशा घटिंगणांप्रमाणें हे सर्वच कसे बनत नाहींत अथवा सर्वच बाया मला स्वतःच्या फाटकाजवळ भेटलेल्या बाईप्रमाणें बाईट कशा निघत नाहींत असाच मला प्रश्न पडतो.

अशा प्रकारें सुमारें ११ वाजेपावेतों रस्त्यांमध्यें दंगा करीत हिंडणाऱ्या कामकऱ्यांच्या लीला मी पहात होतों. यानंतर त्यांची हालचाल थंडावूं लागली. थोडेसे झिंगलेले लोक आणि पोलिस ठाण्याकडे नेले जाणारे पुरुष व स्त्रिया इतकीच मंडळी तेथे उरली. थोडया वेळानंतर सर्वत्र घोडयांच्या गाडया दिसूं लागल्या. या सर्व एकाच दिशेने चालल्या होत्या.

सारथ्याच्या आसनावर चांगला पोषाख केलेले टोपीवर फितीचे तुरे लावलेले कोचमन व हुजरे बसले होते. गाडयांचे पुष्ट व शोभिवंत कापडाने आच्छादिलेले घोडे बर्फाच्छादित रस्त्यांवरून ताशीं चौदा मैल वेगाने चालले होते; गाडयांत गरम ओव्हरकोटांनी सर्वांग लपेटलेल्या व आपलीं फुलें, हार इत्यादि काळजीपूर्वक सावरणाऱ्या स्त्रिया बसल्या होत्या. घोडयांचे जीव व लगाम, त्यांच्या मागच्या बग्या, त्यांच्या रबरी बाया, गाडीवानांच्या पोषाखाचें गरम कापड, यांपासून तों गाडयांतील स्त्रियांचे मूल्यवान पोषाख–मोजे, जोडे, फुलें, मखमल, हातमोजे, अत्तरें इ० सर्व जिन्नस—जे [illegible]दारू पिऊन भाडयाच्या निद्रागृहांमध्यें लाकडी

विछान्यावर अस्ताव्यस्त पडलेले असतात किंवा ज्यांपैकी कांही छिनाल वस्तीमध्यें वेश्यांच्या आलिंगनांत गर्क झालेले असतात अगर पोलिस कोठडीत बदिस्त होऊन पडलेले असतात अशा लोकांनींच बनविल्या होत्या. यांच्या अंगावरून यांनी बनविलेला माल आंगावर घालून व यांनी बनविलेल्या गाडयातून नाचाला जाणारी मंडळी दौडत जात होती. पण ज्या नाचाला ही मंडळी गेली त्या नाचाचा व ज्यांच्या अंगावर त्यांचे गाडीवान खेकसून ओरडत होते त्या दारुडया मजुरांचा कांही. कार्यकारण संबध असूं शकेल हें त्यांपैकी एकाच्याही डोक्यांत कधीही शिरत नाही.

हे लोक अत्यंत शांतपणें इतकेंच नव्हे तर आपण करतों त्यांत कांहीच वाईट नसून उलट कांही भलेंच आहे अशा भ्रमाने नाचतमाशांनी आपलें मनरंजन करीत असतात.

मनरंजन अं ! रात्रो ११ ते सकाळचे सहा पावेतों, ज्या वेळीं अनेक लोक रिकाम्या पोटीं मोफत निद्रागृहांतून या कुशीचे त्या कुशीवर तळमळत असतात–व कांही त्या घोबिणीप्रमाणें मृत्युमुखीही पडतात–त्याच वेळी हें मनरजन चालत असतें !

आणि मनरंजन कसें ? यांत विवाहित स्त्रिया व कुमारिका आपले स्तन उघडे टाकून नितंबभागाला कृत्रिम फुगीरपणा आणून इतक्या असभ्य स्थितींत आपलें प्रदर्शन करीत असतात की जिची बुद्धि विकृत झालेली नाही अशा साध्या स्त्रीला अगर मुलीला पुरुषांसमोर अशा पोषाखांत येणें ही सुतराम अशक्य गोष्ट वाटेल. अशा अर्धनग्न स्थितींत आपला अनावृत स्तनभाग पुढे करून व खांद्यापावेतों हात उघडे टाकून तंग पोषाखांत आणि लख्ख उजेडांत, ज्यांचा मुख्य सद्गुण शालीनता हा सदोदित दिसून आलेला आहे त्या स्त्रिया व कुमारिका अनोळखी पुरुषांतून मोकळेपणीं वावरतात. या पुरुषांचा पोषाखही तितकाच अप्रशस्त व तंग असतो. अशा पुरुषांना उन्मादक संगीताने भारलेल्या वातावरणांत या स्त्रिया आलिंगन देतात व त्यांच्या बरोबर गिरक्या खातात. म्हाताऱ्या स्त्रियाही पुष्कळ प्रसंगीं तरुणीं इतकाच आपल्या शरीराचा भाग उघडा ठेवतात, सर्व कांही पाहतात, लज्जतदार खाणेंपिणें करतात; म्हाताऱ्या पुरुषांचा

खाक्याही असाच असतो. हें कर्म रात्रीं घडतें यांत कांहीच नवल नाही; कारण सामान्य जनता या वेळीं झोपीं गेली असल्यामुळें तिच्या दृष्टीआड हें सर्व होतें. पण हें लपवावें म्हणून ही वेळ निवडतात असें मात्र नव्हे. अशी चैनबाजी करणारांना यांत कांही लपविण्यासारखें आहे असें मुळीच वाटत नाही. हें सर्व फार चांगलें असून या करमणुकीच्या प्रकाराने –जिच्याकरितां हजारों श्रमजीवी लोकांचे जिकिरीचे कष्ट खर्ची पडतात– आपण कोणाचें नुकसान करीत तर नाहीच; उलट आपण (यामुळें) गरिबांना पोशीत असतों असें मात्र त्यांना वाटतें.

नाचतमाशांत मोठी गंमत असेल, पण ही येते कोठून ? आपल्यापैकी एखादा विवस्त्र अगर उपाशी असल्याचें आपणांस कळलें तर चैन करणें मोठें जड जातें व त्याला अन्न व वस्त्र मिळेपावेतों चैन करतां येत नाही; मग ज्या आपल्या चैनीच्या मुळेंच इतरांना हाल अपेष्टा भोगाव्या लागत असतील अशा चैनीची गोष्ट तर दूरच राहो. एखाद्या चिंबलेल्या कांबटीच्या फटींत कुत्र्याचें शेपूट अडकवून तें पिरगळणाऱ्या निर्दय मुलांचा तो खेळ आपणांस आवडत नाही व यांत त्यांना कशी मौज वाटते तेंही कळत नाही.

हें जर खरें तर आमच्या या चैनीच्या बाबतींत आम्हांला आंधळेपण येतें हें कसें ? आमच्या चैनीमुळें ज्या फाटक्या वेळूंत आम्ही आमच्यासाठी हाल अपेष्टा सहन करणाऱ्या लोकांचीं शेपटें पिरगाळीत असतों तो वेळू आम्हांला कसा दिसत नाही ? दीडशें रूबल (२१० रुपये) किमतीची वस्त्रें नेसून जाणाऱ्या स्त्रियांपैकी एकीचाही जन्म नाचाचे जागीं अगर मॅड. मॉयसेल मिनांकायकडे* झाला नव्हता. हरएकीला खेडेगांवांतील राहणीचा अनुभव असून शेतकरी वर्गही प्रत्येकीने पाहिलेला होता. स्वत:च्या घरची दाई व दासी या तिच्या माहितींतल्या होत्या. या दाईदासींचे गरीब बाप किंवा भाऊ यांना जन्मभर कांबाडकष्ट करून जेमतेम १५० रूबल जमवून स्वत:ची झोपडी बांधणें ही स्वत:च्या आयुष्यांतली उच्चतम महत्त्वाकांक्षा वाटते, हेंही ती जाणते. मग स्वत:च्या अर्धनग्न शरीरावर त्या गरीब

---

* मास्कोंतील एक प्रसिद्ध फॅशनेबल शिंपीण.

दासीच्या भावाच्या जन्मांतील एकमेव मधुर स्वप्न अशी जी झोपडी ती आपण नेसून आहोंत हें जाणूनही तिला कसें आनंदी होतां येतें ? समजा हें तिच्या लक्षांत आलें नसेल. पण निदान ती वापरीत असलेल्या अनेक जिनसा—मखमल, रेशमी कापड, पक्वान्नें, फुलें, लेस व पोषाख—आपोआप उगवत नसून त्या कोणाच्या तरी श्रमांचें फल होत ही गोष्ट तरी निदान तिला माहीत असलीच पाहिजे, असें धरून चालणें गैर होणार नाही. या जिनसा कोण तयार करतें, कशा परिस्थितींत करतें व कां करतें या गोष्टीही तिला न उमजणें अशक्यप्राय आहे. ज्या शिंपिणीला आपण दटावतों त्या शिंपिणीने आपल्यावरच्या प्रेमामुळें कांही आपला झगा शिवून दिलेला नाही ही गोष्ट तिला कळत असलीच पाहिजे. यावरून तिला स्पष्ट समजूं शकतें की कसल्या तरी नाइलाजाने त्या बाईने तें काम केलें असलें पाहिजे आणि या झग्याप्रमाणेंच जरतार, कलाबतू व मखमल या गोष्टी जबरदस्तीच्या दडपणाखालीच तयार झाल्या असल्या पाहिजेत. कदाचित् त्यांची दृष्टि इतकी घांदरट बनली असेल की त्यांना हेंही दिसत नसेल. पण कमींत कमी पांच सहा सुस्वभावी, वयस्क आणि शरीराने अधू अशा नोकरांची व दासींची झोपमोड होऊन आपल्यामुळें त्यांना त्रास झाला हें तरी निदान तिला उमजलें असलेंच पाहिजे, कारण त्यांचे थकलेले उदासवाणे चेहरे ती प्रत्यक्ष पाहते. त्या रात्रीं बाहेर २८° रूमर* इतका जबर गारठा पडला असून अशा कडक थंडींत म्हातारा गाडीवान गाडीवरच आपल्या जागीं बाहेर उघड्यांत बसला होता हें तिला माहीत नसणें शक्य नाही. परंतु मी हें जाणतों की या सर्व गोष्टी खरोखर त्यांच्या लक्षांत येत नाहीत. आणि नाचरंग इ० प्रकारांनी मनावर घातलेल्या मोहिनीमुळे जर त्या विवाहित तरुणी व कुमारिका यांच्या ही गोष्ट ध्यानांत येत नसेल तर त्यांना दोष देण्यांत काय अर्थ आहे ? त्यांच्या

---

* म्हणजे –३१ फारनहीट. फारनहीटच्या ३२ अंशावर पारा आला म्हणजे पाणी गोठूं लागतें. त्यापेक्षा आणखी ६३ अंश कमी इतकी थंडी. या थंडीची अपणांस कल्पना येणें कठीण आहे. जगज्जेत्या नेपोलियनच्या सैन्याला याच थंडीने त्राहि भगवन् केलें होतें

टॉ.....१८

वडील माणसांना जें योग्य वाटतें तेंच त्या बिचाऱ्या करीत असतात. या वडील माणसांच्या निर्घृण वागणुकीचा मात्र कोणी अर्थ लावूं शकेल काय ?

हे बुद्रुक नेहेमी एकच खुलासा देतात. "मी कांही कोणावर जबरदस्ती करीत नाही. मी जिनसा विकत घेतों व मोलाने माणसें—मोलकरणी, गाडीवान इ० कामास लावतों. विकत घेणें व नोकरीस ठेवणें यांत काय गैर आहे ? मी जुलूम कोणावरच करीत नाही. फक्त पगारी नोकर ठेवतो यांत कोठे चुकते ?"

थोडचा दिवसांपूर्वी मी एका ओळखीच्या माणसाकडे गेलों होतों. पहिल्या खोलीतून जातांच टेबलाशीं दोन स्त्रिया पाहून मला आश्चर्य वाटलें; कारण त्या गृहस्थाचें लग्न झालें नव्हतें. त्या बायांपैकी एक रोड, फिकट, म्हातारपणाची छटा आलेली सुमारें ३० वर्षांची बाई असून तिच्या अंगावर उत्तरीय होतें ती टेबलाखाली हातांनी कांही तरी काम झटपट करीत असतांना दिसली. काम करतांना ती अंगाला झटके देत होती. बाजूला बसलेली मुलगी तसेंच कांही काम करीत अंगाला झटके देत होती. दोघीच्या हालचाली कांही तरी अंगांत आल्याप्रमाणें चालू होत्या.* मी जवळ जाऊन त्या काय करीत होत्या तें पाहिलें. त्यांनी मजकडे वळून वर पाहिलें आणि आपलें काम एकसारख्या तंद्रीने चालू ठेवलें. त्यांच्या पुढे कांही तंबाखू व रिकाम्या कागदी पुंगळ्या होत्या. त्या सिगारेटी करीत होत्या. वयस्क बाई तंबाखू घेऊन दोन्ही हातांमध्यें दाबी, नंतर ती यंत्रामध्यें घाली, नंतर कागदाची सुरळी घेऊन त्याच्यामध्यें तो तंबाखू घालून त्या मुलीकडे ती फेंकी; मुलगी त्यावर कागदाचा एक तुकडा गुंडाळी, तोंड बंद करण्याकरितां एक गुडदी खुपसून देई व ती तयार झालेली सिगारेट बाजूस टाकून दुसरी घेई. हा सर्व प्रकार इतक्या त्वरेने व मनाच्या जबरदस्त ओढीने चालला होता की ज्याने तो पाहिलेला नाही त्याच्या पुढे वर्णन करून त्याची कल्पना आणून देणें केवळ अशक्य आहे. त्यांच्या चपलतेबद्दल मी आश्चर्य व्यक्त केलें.

---

* मूळ इंग्रजींतील कल्पनेचें या ठिकाणीं शक्य तितकें तंतोतंत दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला आहे. मा. ज. का.

"चौदा वर्षें मी सतत हेंच करीत आहें." ती बाई म्हणाली.

"मोठें त्रासदायक काम असलें पाहिजे." मी म्हणालों. "होय. याने छातीचा विकार जडतो व श्वास घेणेंही जड होतें." तिनें उत्तर दिलें.

वास्तविक हें तिने (मुद्दाम) सांगण्याची गरज नव्हती. तिच्याकडे व मुलीकडे पाहणाऱ्या कोणाच्याही तावडतोब हें लक्षांत आलें असतें. मुलीला हें काम करावयास लागून दोन वर्षें झालीं होतीं, पण तो काम करीत असतांना तिच्याकडे कोणी पाहिल्यास त्याला हें स्पष्ट दिसून आलें असतें की हिची प्रकृति मूळची सुदृढ असून ती आता ढासळावयास लागली आहे. ज्या गृहस्थाकडे मी गेलों होतों त्याने (हा दयाळू व उदार होता) हजार सिगारेटींस अडीच रूबल या हिशेबाने त्यांना सिगरेटी बनविण्याच्या कामावर ठेवलें होतें. त्याचे जवळ पैसा होता व तो त्या बायांना त्यांच्या कामाचा मोबदला देत होता, यांत काय बरें वावगें झालें ? हा गृहस्थ स्वतः दिवस मध्यान्हीवर आला म्हणजे निजून उठतो, संध्याकाळचे सहापासून रात्रीं दोनपावेतों पत्ते खेळतो, किंवा पिआनो वाजवितो– ऐकतो, आणि सुग्रास व चमचमीत अन्न खातो. त्याचीं सर्व कामें करावयास नोकरचाकर आहेत. त्याने तंबाखू ओढणें ही चैनीची एक नवीच ट्रम काढली. तो सिगारेटी केव्हापासून ओढूं लागला हें माझ्या लक्षांत आहे.

आता पहा ! एकीकडे एक बाई व मुलगी यंत्राप्रमाणें कमालीची मेहनत करून व सतत तंबाखूने दूषित झालेली हवा आंत घ्यावी लागल्यामुळें आपली प्रकृति बिघडून घेऊन जेमतेम उदरनिर्वाह करूं शकतात. आणि (दुसरीकडें) त्याच्याजवळ मोफतचा मुबलक पैसा असून स्वतः सिगारेटी बनवून घेण्यापेक्षा त्याला ब्रिजसारखा पत्त्यांचा खेळ खेळत बसणें अधिक बरें वाटतें. तो या बायांना त्यांनी सतत सिगारेटी तयार कराव्या, अर्थात् नेहेमी हाल अपेष्टांत आयुष्य कंठावें, याच अटीवर पैसा देत असतो

मला स्वच्छता आवडते म्हणून एका धोबिणीला मी बदललेले सदरे दिवसांतून दोन वेळां धुण्याच्या अटीवर पैसा देतों. या कामाने तिचा शक्तिपात झाला व शेवटीं ती मेली.

'यांत काय वाईट आहे? समजा मी विकत घेण्याचें अगर नोकर ठेवण्याचें थांबविलें तरी इतर लोक हें करणारच. मी विकत न घेतल्या तरी

मखमल, कपडा, मिठाई इत्यादि जिनसा विकत घेण्याचें इतर लोक थांबविणार नाहीत अगर सिगारेटी बनविण्याकरितां आणि कपडे धुण्याकरितां नोकर ठेवण्यास बिलकुल अनमान करणार नाहीत. जर सर्वत्र अशीच व्यवस्था बिनबोभाटपणें चालू असेल तर मग मीच एकटयाने पक्वान्नें, मखमल, सिगारेट, स्वच्छ शर्ट या वस्तूंवर कां पाणी सोडावें ?' मी नेहेमी लोकांच्या तोंडीं ही विचारसरणी ऐकतों. कशाचा तरी विध्वंस करावयास निघालेल्या बेफाम जनसमुदायाकडून जी विचारसरणी पुढे केली जाते त्यासारखीच ही वरील विचारसरणी होय. एखाद्या कुत्र्याने दुसऱ्या कुत्र्याला चीत केल्यावर बाकीचे कुत्रे विचार न करतां चीत झालेल्या कुत्र्यावर ज्या प्रकारच्या मनोवृत्तीने तुटून पडतात ती मनोवृत्ति अशा तऱ्हेचीच होय. 'एकदाचें हें चक्र चालू झालें असून त्यापासून काय इजा व्हावयाची ती झालीच आहे; मग मीही त्यामध्यें भाग का घेऊं नये? समजा मी घाणेरडे सदरे घालूं लागलों व सिगारेटीही स्वतः बनवूं लागलों तर त्यापासून काय चांगलें होणार आहे ? त्याच्या योगाने एखाद्याची तरी स्थिति सुधारण्याचा संभव आहे काय ?' स्वतःचें समर्थन करूं इच्छिणारे जे लोक असतात ते अशा तऱ्हेचा प्रश्न करितात. सत्यापासून आम्ही कल्पनातीत दूर नसतों तर या प्रश्नाचें उत्तर देतांना लाज वाटली असती. पण आम्ही (असत्यांत) इतके गुरफुटलों आहोंत की हा प्रश्न आम्हांला अगदी साहजिक वाटतो, म्हणून उत्तर देण्याची मला जरी शरम वाटत असली तरी या प्रश्नाचें मला उत्तर दिल्याखेरीज गति नाही.

मी रोज सदरा बदलण्याऐवजीं आठवड्यास सदरा बदलूं लागलों, अथवा स्वतः सिगारेटी बनवूं लागलों किंवा मुदली सिगारेट पिणेंच सोडलें तर काय होईल ?

फरक हा होईल की कोणती तरी घोबीण अगर सिगारेटी बनविणारी इला कमी मेहनत पडेल व अशाने वांचणारा पैसा मी तिला अगर कामाने त्रस्त झालेल्या निराळ्याच दुसऱ्या घोबिणीला अगर मजुराला देऊन त्याचे श्रम कमी करूं शकेन. त्याला विश्रांति मिळून चहाही पितां येईल. पण (स्वतः काय करतों हें जाणून घेण्याची इच्छा नसणाऱ्या) श्रीमंतांचा यावरही एक उलट सवाल असतोच.

'समजा मी घाणेरडे कपडे घालूं लागलों व सिगारेटी पिणेंही बंद केलें आणि वांचणारा पैसा गरिबांना दिला तरी हे गरीब लुबाडले जाणारच व माझी 'दर्यामे खसखस' त्यांना मदत करूं शकणार नाही.'

यांचें उत्तर देतांना तर विशेषच लाज वाटते. पण उत्तर दिलेंच पाहिजे. हा प्रश्न प्रत्यहीं विचारण्यांत येतो पण यांचें उत्तर फार सोपें आहे.

मी जंगली लोकांत जातों. तेथे ते मला मांसाचीं भजीं खाऊं घालतात. दुसरे दिवशीं मला कळतें की भजीं त्यांनी एका कैद्याला ठार करून त्याच्या मांसाचीं केलीं होतीं. अशा स्थितींत तीं भजीं कितीही चांगलीं असलीं अगर त्या जंगली माणसांत अशी मानवी मांसाचीं भजीं खाणें कितीही रूढ असलें किंवा माझ्या एकटयाच्याच भजीं न खाण्याने भक्ष्य पदार्थ म्हणून राखून ठेवलेल्या कैद्यांना कांहीही फायदा होण्यासारखा नसला, तरी, माणसाचें मांस खाणें योग्य नाही असें मला जर वाटत असेल तर मी तीं भजीं पुनः खाणार नाही व खाणें शक्य नाही. भुकेने मरत असलों तर माणसाचें मांसही कदाचित् मी खाईन पण अशा मांसाच्या मेजवान्या मी दुसऱ्यास देणार नाही अथवा मी स्वतः अशा मेजवान्यांमध्ये भाग घेणार नाही. अशा मेजवान्यांचे प्रसंगीं मी होतों याचा अभिमानही बाळगणार नाही.

मखमल, कपडा, मिठाई इत्यादि जिनसा विकत घेण्याचें इतर लोक थांबविणार नाहीत अगर सिगारेटी बनविण्याकरितां आणि कपडे धुण्याकरितां नोकर ठेवण्यास बिलकुल अनमान करणार नाहीत. जर सर्वत्र अशीच व्यवस्था बिनबोभाटपणें चालू असेल तर मग मीच एकटयाने पववाऱ्नें, मखमल, सिगारेट, स्वच्छ शर्ट या वस्तूंवर कां पाणी सोडावें ?' मी नेहेमी लोकांच्या तोंडीं ही विचारसरणी ऐकतों. कशाचा तरी विध्वंस करावयास निघालेल्या बेफाम जनसमुदायाकडून जी विचारसरणी पुढे केली जाते त्यासारखीच ही वरील विचारसरणी होय. एखाद्या कुत्र्याने दुसऱ्या कुत्र्याला चीत केल्यावर बाकीचे कुत्रे विचार न करतां चीत झालेल्या कुत्र्यावर ज्या प्रकारच्या मनोवृत्तीने तुटून पडतात ती मनोवृत्ति अशा तऱ्हेचीच होय. 'एकदाचें हें चक्र चालू झालें असून त्यापासून काय इजा व्हावयाची ती झालीच आहे; मग मीही त्यामध्यें भाग का घेऊं नये? समजा मी घाणेरडे सदरे घालूं लागलों व सिगारेटीही स्वत: बनवूं लागलों तर त्यापासून काय चांगलें होणार आहे ? त्याच्या योगाने एखाद्याची तरी स्थिति सुधारण्याचा संभव आहे काय ?' स्वत:चें समर्थन करूं इच्छिणारे जे लोक असतात ते अशा तऱ्हेचा प्रश्न करितात. सत्यापासून आम्ही कल्पनातीत दूर नसतों तर या प्रश्नाचें उत्तर देतांना लाज वाटली असती. पण आम्ही (असत्यांत) इतके गुरफुटलों आहोंत की हा प्रश्न आम्हांला अगदी साहजिक वाटतो, म्हणून उत्तर देण्याची मला जरी शरम वाटत असली तरी या प्रश्नाचें मला उत्तर दिल्याखेरीज गति नाही.

मी रोज सदरा बदलण्याऐवजीं आठवड्यास सदरा बदलूं लागलों, अथवा स्वत: सिगारेटी बनवूं लागलों किंवा मुदली सिगारेट पिणेंच सोडलें तर काय होईल ?

फरक हा होईल की कोणती तरी धोबीण अगर सिगारेटी बनविणारी इला कमी मेहनत पडेल व अशाने वांचणारा पैसा मी तिला अगर कामाने त्रस्त झालेल्या निराळ्याच दुसऱ्या धोबिणीला अगर मजुराला देऊन त्याचे श्रम कमी करूं शकेन. त्याला विश्रांति मिळून चहाही पितां येईल. पण (स्वत: काय करतों हें जाणून घेण्याची इच्छा नसणाऱ्या) श्रीमंतांचा यावरही एक उलट सवाल असतोच.

'समजा मी घाणेरडे कपडे घालूं लागलों व सिगारेटी पिणेंही बंद केलें आणि वांचणारा पैसा गरिबांना दिला तरी हे गरीब लुबाडले जाणारच व माझी 'दर्यामे खसखस' त्यांना मदत करूं शकणार नाही.'

याचें उत्तर देतांना तर विशेषच लाज वाटते. पण उत्तर दिलेंच पाहिजे. हा प्रश्न प्रत्यहीं विचारण्यांत येतो पण याचें उत्तर फार सोपें आहे.

मी जंगली लोकांत जातों. तेथे ते मला मांसाचीं भजीं खाऊं घालतात. दुसरे दिवशीं मला कळतें की भजीं त्यांनी एका कैद्याला ठार करून त्याच्या मांसाचीं केलीं होतीं. अशा स्थितींत तीं भजीं कितीही चांगलीं असलीं अगर त्या जंगली माणसांत अशी मानवी मांसाचीं भजीं खाणें कितीही रूढ असलें किंवा माझ्या एकट्याच्याच भजीं न खाण्याने भक्ष्य पदार्थ म्हणून राखून ठेवलेल्या कैद्यांना कांहीही फायदा होण्यासारखा नसला, तरी, माणसाचें मांस खाणें योग्य नाही असें मला जर वाटत असेल तर मी तीं भजीं पुनः खाणार नाही व खाणें शक्य नाही. भुकेने मरत असलों तर माणसाचें मांसही कदाचित् मी खाईन पण अशा मांसाच्या मेजवान्या मी दुसऱ्यास देणार नाही अथवा मी स्वतः अशा मेजवान्यांमध्ये भाग घेणार नाही. अशा मेजवान्यांचे प्रसंगीं मी होतों याचा अभिमानही बाळगणार नाही.

प्रकरण पंचविसावें

"ठीक आहे, पण आम्ही काय करावें ? आम्ही या परिस्थितीचे निर्माते नव्हत !" पण आम्ही जर नाही तर ही परिस्थिति निर्माण तरी कोणी केली ? आम्ही उत्तर देतों, "आम्ही हें केलें नसून हें आपोआपच असें झालें." लहान मुलें जेव्हा एखादा जिन्नस फोडतात तेव्हा, 'आम्ही फोडलें नाही, तें आपोआपच फुटलें,' असेंच ज्याप्रमाणें उत्तर देतात, तसाच हा प्रकार आहे. आम्ही असा युक्तिवाद करतों की शहरें एकदा प्रस्थापित झालीं म्हणजे वास्तविक आम्ही शहरांत राहून गोरगरिबांना मजुरीचें साधन उपलब्ध करून देतों.

पण हें खरें नाही. हें पटण्यास आम्ही खेड्यांतून कसे राहतों व तेथे लोकांना कशी मजुरी मिळवून देतों याचा विचार केला म्हणजे पुरे आहे.

हिवाळा संपून ईस्टरचे दिवस येतात तरी शहरांतून श्रीमंतांचा बेफाम चैनीचा कार्यक्रम चालूच असतो. मोठे रस्ते, बगीचे, पार्कस्, नदी-कांठ, इत्यादि ठिकाणीं गाणेंबजावणें, नाटकें, घोड्यावरून फेरफटके, पार्टी सहल करणें, रोषणाई, दारूकाम इत्यादि प्रकार चालू असतातच. पण खेड्यांतून याहीपेक्षा अधिक चांगल्या गोष्टी असतात. तेथील हवा अधिक स्वच्छ असून वृक्ष, कुरण व फुलें विशेष टवटवीत असतात. जेथे निसर्ग असा फुलावर येतो तेथे आपण गेलेंच पाहिजे. मग काय ! जे श्रीमंत असून दुसऱ्यांच्या श्रमावर जगतात ते ही नवी वनश्री व स्वच्छ हवा यांचा उपभोग घेण्यास खेड्यांतून जातात. अशा प्रकारें श्रीमंत लोक जाडीभरडी भाकरी व कांदा खाऊन दिवसाचे अठरा तास सतत काबाड-कष्ट करणाऱ्या, रात्रीं पुरेशी झोपही न मिळणाऱ्या व चिंध्या नेसणाऱ्या लोकांत जाऊन राहतात. या ठिकाणीं श्रीमंतांना कोण फुसलावून नेतो बरें ? येथे गिरण्या कारखाने नाहीत; तसेंच ज्यांना काम देऊन आम्ही पोसतों असें म्हणतां येईल असे बेकार लोक शहरांतून जसे पुष्कळ असतात तसेही येथे नाहीत. उन्हाळ्यांत लोकांना आपलें काम उरकत

नसल्यामुळे येथे कोणी आळशी अथवा बेकाम तर नसतोच पण पुरेसे कामगार नसल्यामुळे पुष्कळ वेळां पिकें नासतात व अनेक वृद्ध माणसें व मुलें फाजील काबाडकष्ट केल्यामुळें मृत्युमुखीं पडतात. अशा ठिकाणीं हे श्रीमंत कसा काळ घालवितात बरें ?

कां ! – हा पहा त्यांचा कार्यक्रम. जर घर पुरातन—ज्या काळीं जमिनीवरील गुलामगिरी चालू होती त्या काळांतील—असेल, तर प्रथम त्यांत सुधारणा करून तें शृंगारण्यांत येतें; पूर्वीचें घर मुळीच नसेल तर नवें बांधण्यांत येतें. हें नवें घर चांगलें दोनतीन मजली असून यांत सुमारें १४ फूट उंचीच्या १२ ते २० खोल्या असतात.

सुशोभित फरशी, खिडक्यांना मोठीं तावदानें, उंची गालिचे, मौल्यवान लाकडी सामान, दोनशें ते सहाशें रूबल किमतीचें (भोजनगृहांतील) आरशाचें कपाट, फडताळीं, इत्यादि वस्तूंनी घर सुशोभित करण्यांत येतें. घरानजीकच्या वाटांवरून अभ्रकमिश्रित लाल माती टाकतात व जमीन सपाट करून तिजवर पुष्पवाटिका व क्रोके खेळण्याची जागा तयार करण्यांत येते. परावर्तक हंड्या, लहान रोपांची जोपासना करण्याकरितां खास गृहें, उष्णगृहें, आढ्याखाली नक्षीदार पट्ट्या लावलेले उंच तबेले, इत्यादि सर्वांची व्यवस्था (घराभोवती) करण्यांत येते. सबंध घरभर तेलांतून तयार केलेला रंग देण्यांत येतो—म्हाताऱ्या शेतकऱ्यांना व त्यांच्या मुलांना मात्र हें तेल भाजींत टाकण्यापुरतेंही मिळत नाही. घरमालक स्वत: पुरेसा ऐपतदार असेल तर तो स्वत: अशा घरांत राहतो नाहीतर तो तें भाड्याने देतो. पण आमच्या वर्गांतला कितीही उदार अथवा गरीब माणूस तेथे राहिला तरी त्याला घर बांधण्यास म्हणा किंवा साफ ठेवण्यास म्हणा डझनावारी माणसें खेड्यांतून आणावीं लागतात आणि खेड्यांत तर अशी स्थिति असते की आपल्या स्वत:च्या निर्वाहाला पुरेल इतकें धान्य पिकवण्यासाठी करावे लागणारे श्रमच तेथील लोकांना बोईजड झालेले असतात.

निदान या ठिकाणीं तरी असें खास म्हणतां येणार नाही की, 'पहा! कारखाने आहेत, म्हणून, मी जरी यांना राबविलें नाहीं, तरी कोणीतरी दुसरा राबवीलच.' या ठिकाणीं असेंही म्हणतां येणार नाही की, 'बेकार

मनुष्यांना काम पुरवून मी त्यांना अन्नाला लावतों आहें.' या ठिकाणीं आम्ही आम्हांला हव्या असणाऱ्या जिनसा तयार करविण्याची व्यवस्था करवितों. धडधडीत लोकांच्या गरजूपणाचा फायदा घेऊन त्यांना, आम्हांला, सर्वांना अवश्य अशा उद्योगापासून–शेतीपासून–आम्ही लोकांना पराङ्मुख करून राबवितों आणि त्यांपैकी कांहींना भलत्या मार्गास लावतों, तर इतर कांहींचा सर्वनाश करतों.

समजा की सुखवस्तु स्थितींतलें अगर सरकारी अधिकारी वर्गांतलें एक सुशिक्षित आणि मानवंत कुटुंब खेड्यांत राहत आहे.

या कुटुंबांतील मंडळी व त्यांच्या ओळखीचे पईपाव्हणे जून महिन्यांत तेथे जमतात; कारण तोंपावेतों अभ्यास, परीक्षा वगैरेचा त्यांच्या मागे व्याप असतो. अर्थात् हे लोक कापणीच्या हंगामाच्या तोंडाशीं येतात आणि सप्टेंबरपर्यंत म्हणजे धान्य गोळा करून हिवाळ्याची पेरणी सुरू होईपावेतो तेथे राहतात. अशा प्रकारें या कुटुंबांतील मंडळी—आणि या वर्गांतील सर्व लोकांची हीच तऱ्हा असते—शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या कामांचा जो हंगाम त्या हंगामाच्या सुरवातीस येतात व तो हंगाम अगदी खलास होईपर्यंत नाही, तरी–कारण सप्टेंबरमध्यें नवी पेरणी करणें, बटाटे गोळा करणें वगैरे कामें चालूच असतात–कामाचा भर ओसरेपर्यंत खेड्यांत मुक्काम करून राहतात.

हे लोक जोंवर खेडेगावीं असतात तोंवर त्यांचे सभोवार व आजूबाजूला शेतकऱ्यांचीं उन्हाळ्यांतील कामें एकसारखीं चालू असतात. या कामाचा खडतरपणा व ताण किती असतो याची कल्पना, आपण त्याच्याविषयीं कितीही ऐकलें, वाचलें अगर पाहिलें, तरी कदापि येणार नाही. प्रत्यक्ष त्या कामाचा अनुभव घ्यावा तेव्हाच ती येईल.

आणि या श्रीमंत कुटुंबांतील सर्व माणसें–सुमारें दहा लोक–अगदी थेट शहराप्रमाणेंच येथेही राहतात, किंबहुना शक्य तर अधिकच बेछूटपणाने ते आपला येथील काळ घालवितात. कारण येथे ते जाणून बुजून (आळसाच्या दगदगींतून) 'विश्रांती'करितां येतात; अर्थात् त्यांना बाह्य देखाव्याकरिता कांही काम करण्याची किंवा आळशीपणाबद्दल सबब सांगण्याची देखील जरूर नसते.

पेट्रॉव्ह * उपास चालू असतांनाच (या कडक उपासांत शेतकरी क्वास–एक प्रकारची दारू–राय धान्याची भाकरी व कांदा इतकेंच खातो +)कापणी सुरू होते. खेड्यांतून राहणारे श्रीमंत हें काम पाहतात. अंशतः यांच्याच हुकूमान्वयें हें काम चालतें. अंशतः त्या कामाचें ते कौतुकही करतात. इतकेंच नव्हे तर वाळूं लागलेल्या गवताचा सुवास, बायांच्या गाण्यांचे सूर, कोयत्यांचा खणखणाट ऐकून व कापणी करणाऱ्या लोकांच्या रांगा आणि गवत गोळा करणाऱ्या बायकांचे घोळके पाहून त्यांना आनंदही होत असतो.

घराजवळ चालणारें हें काम ते पाहतात. आणि दिवसभर कांहीही न केलेल्या या आळशी तरुणांना व मुलांना फक्त तीन फर्लांगांच्या अंतरावर सायंकाळीं आंघोळीला जावयाचें तर तें गाडींतून न्यावें लागतें.

गवत वाळविण्याची क्रिया जगांतील अत्यंत महत्त्वाच्या कामांपैकी एक आहे. दरवर्षीं कामकऱ्यांची अगर वेळेची तूट पडून गवत कापून होण्यापूर्वीच पावसाने गवत भिजण्याचा (व शेवटीं कुजण्याचा) संभव असतो, आणि काम अधिक अथवा कमी नेटाने चालण्यावर लोकांच्या पदरांत बीस टक्के गवत अधिक पडायचें की शेतांतच कुजून जावयाचें हें अवलंबून असतें. जर जास्त गवत झालें तर म्हाताऱ्यांना अधिक मांस व मुलांना अधिक दूध मिळणार. ही सर्व साधारण गोष्ट झाली. पण विशेषतः कापणी करणारांच्या दृष्टीने विचार करतां गवताच्या एकेका पेंडीने त्यांच्या स्वतःच्या व मुलाबाळांच्या हिवाळ्यांतील दूधभाकरीचा प्रश्न सुटत असतो.प्रत्येक स्त्रीला आणि पुरुषाला ही गोष्ट माहीत असते. किंबहुना मुलांना सुद्धा या गोष्टीचें महत्त्व माहीत असून प्रत्येकाने आपलेपरी कामाची शिकस्त करण्याची किती गरज असते हें तीं ओळखून असतात. शेतांत (काम करीत) असलेल्या आपल्या बापाकरितां क्वास

---

* सेंट पीटर व सेंट पॉल यांच्या नांवाने करावयाचा उपास. ईस्टरनंतर ९व्या आठवड्यापासून ता. २९ जून (old Style) पावेतो हा उपास असतो.

+ याचें आपणांस आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. खाण्यापिण्याबाबत विशिष्ट नियमांचें कडक पालन असा उपासाचा अर्थ करावयास हवा. आपणसुद्धां कायदेशिर "फराळी" पदार्थ "उपासा"चे दिवशीं खातोंच. मा. ज. का.

(दारू)च्या सुरया—त्या सुरया जड असल्यामुळे त्यांची एकसारखी हातबदल करीत—हीं लहान मुलें नेत असतात. बापाने रागावूं नये म्हणून त्याच्या जेवणाच्या वेळेवर शेतांत पोचण्याकरितां हीं पोरें आपल्या खेडयापासून मैल दीड मैल शक्य तितक्या जलद अनवाणी धावत पळत जातात. गवत वाळविण्याच्या वेळेपासून कापणी होईतों घटकाभरसुद्धा कामांत खंड पडणार नाही व विसावा मिळणार नाही हें सर्वांना माहीत असतें.

नुसतें गवत वाळवून तयार करण्याचेंच काम असतें असें नव्हे. गवत कापणीशिवाय प्रत्येकाला कांहीना कांही कामें असतातच. जमिनीची नांगरणी वखरणी असतेच. बायकांना तागाचे कपडे शुभ्र करणें, स्वयंपाक करणें, धुणें इत्यादि कामें असतात. गिरणींतून दळण दळून आणणें, शहराला जाणें, गांवसभेचें काम पाहणें, सरकार दरबार करणें, खेडयांतील पोलीस कामदारांच्या भेटी घेणें, ओझ्याच्या गाडयांची नेआण करणें आणि रात्री घोडयांना दाणा घालणें इत्यादि कामें पुरुषांच्या मागे असतात. अशा रीतीने सर्व लोक—म्हातारे, तरुण, रोगी, निरोगी, सर्व—आपापल्यापरी कामाची शिकस्त करीत असतात. शेतकऱ्यांना इतकें काम पडतें की दिवसअखेर काम आटोपलें की त्यांना जागचें उठणें जड जातें. स्त्रिया देखील याचप्रमाणें कष्ट करतात; तशांत त्या पुष्कळ वेळां गर्भवती अगर नवप्रसूतही असतात.

काम जोरांत व सतत चालू असतें. सर्व जण पुरेपूर शक्ति खर्चून कामें करतात आणि या कामाच्या हंगामांत शेतकरी आपली रोजची अल्पस्वल्प कमाईच नव्हे तर कांही मागे शिलक टाकलेलें असेल तर तेंही खाऊन टाकतात. आधींच कृश असलेला शेतकरी कापणीच्या हंगामाच्या शेवटी तर अधिकच कृश बनतो.

ही पहा कापणीच्या कामांत गुंतलेली तिघांची एक तुकडी. यांपैकी एक म्हातारा, दुसरा त्याचा एक पुतण्या (हा नुकतेंच लग्न केलेला तरणा बांड आहे) व तिसरा त्यांचा एक चांभार जातीचा सुदृढ नोकर आहे. हिवाळयामध्यें या सर्वांचें काय होणार हें सर्वस्वी या गवतकापणीच्या निकालावर अवलंबून आहे; त्यांना एक गाय पाळतां येईल की नाही व सरकारसारा देतां येईल की नाही हें यावरूनच ठरणार आहे.

त्यांनी दोन आठवडे एकसारखें नेंटाने काम केलें आहे. पावसाने मध्येंच अडथळा केला. उघाड पडून वाऱ्याने गवत वाळतांच त्यांनी काम संपविण्याचा निश्चय केला व काम लवकर संपावें म्हणून प्रत्येकाने आपल्या जोडीला दोन काम करणाऱ्या बाया आणण्याचें ठरविलें. म्हाताऱ्याने आपली पन्नास वर्षांची,अकरा मुलांना जन्म दिलेली,बहिरी व जबर कष्टांनी जर्जर झालेली परंतु अद्याप कामास काटक अशी पत्नी व आपली तेरा वर्षांची लहानगी पण घडघाकट व चपळ मुलगी अशा दोघींना आणलें; पुतण्याने आपली पुरुषाप्रमाणें उंच व मजबूत अशी बायको आणि तिची गर्भवती बहीण–एका सोजिराची पत्नी–यांना आणलें; आणि चांभाराबरोबर त्याची कामसू बायको व तिची ऐंशी वर्षांची व सामान्यत: भीक मागणारी जख्ख म्हातारी या आल्या. सर्वजण एका ओळीने कामास लागून सकाळपासून सायंकाळपावेतों जून महिन्याच्या कडक उन्हाळ्यांत घाम निथळत काम करताहेत. ऊष्मा कडक असून पावसाचा धाक वाटत आहे. अशा परिस्थितींत प्रत्येक तास अत्यंत मोलाचा आहे. पाणी अगर क्वास पेय आणण्यास लागणारा वेळ सुद्धा ते दवडूं इच्छीत नाहीत.

त्या म्हातारीचा एक लहानगा नातू पाणी आणून देतो. काम सोडून जावें लागूं नये असें मनापासून म्हातारीला वाटतें म्हणून चालण्याचीही शक्ति उरली नाही तरी हातांतलें दंताळें ती टाकीत नाही. त्या लहान मुलाला स्वत:पेक्षा अधिक जड असणारी घागर पेलत नसल्यामुळें या हातांतून त्या हातांत घागर बदलीत, जवळ जवळ पावलें टाकीत, अगदी वाकून गेलेला असा तो मुलगा अनवाणी चालत येतो. मुलगी सुद्धा स्वत:ला न झेपेल इतका मोठा गवताचा भारा खांद्यावर लादून घेते. चार पावलें जाऊन ती थांबते व ओझें सहन न झाल्यामुळें तें खाली टाकून देते. पन्नास वर्षांची म्हातारी एकसारखी दंताळ्याने गवत गोळा करते आणि पुढे खोवलेला रुमाल बाजूला सारून दम टाकीत व झोकांड्या देत गवताचा भारा ओढीत असते. ऐंशी वर्षांची म्हातारी फक्त गवत गोळा करते, पण तिला हें कामसुद्धा जडच जातें. झाडाच्या सालीचे केलेले जोडे फरफटीत ती कशी बशी चालते व तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर एखाद्या आजारी किंवा मरणोन्मुख माणसाची कळा मारते. म्हातारा या

म्हातारीला मुद्दाम गवताच्या गंजीशेजारींच काम करावयास सांगतो, कारण यांत तिजवर इतरांइतका कामाचा ताण पडत नाही. पण मृत्यूची कळा पसरलेल्या भयाण मुद्रेने, तीही, न थांबतां, इतर सर्व जण जितका वेळ काम करतात तितका वेळ काम करीत असते.

झाडांमागे सूर्य अस्तास जाऊं लागला आहे पण बरेच गवताचे ढीग अजून तसेच असून पुष्कळ काम पडलें आहे.

काम थांबवावें असें सर्वांना वाटतें, पण दुसरा कोणी प्रथम सुचवील तर बरें असें वाटल्यामुळें कोणीच बोलत नाही. शेवटीं चांभाराला वाटतें की आता आपल्यांत त्राण शिल्लक नाही म्हणून तो त्या म्हाताऱ्या गृहस्थाला ते ढीग उद्यापर्यंत तसेच राहूं देण्याची सूचना करतो. म्हातारा सूचना मान्य करतो आणि त्याबरोबर बाया आपले कपडे, घागरी, दंताळीं इत्यादि गोळा करावयास धावतात. म्हातारी उभ्या जागींच (मटकन) बसते व नंतर तेथेच आडवी होते.तिची एक टक लागली असून पूर्वीचीच मृत्युकळा तिच्या चेहऱ्यावर असते. पण इतर बायका चालूं लागल्यामुळें तीही कण्हत त्यांचे मागोमाग चालूं लागते.

सायंकाळ पडली आहे. शेतांतून गवत वाळणीचें काम करून थकून आलेले शेतकरी हत्यारांना धार लावीत असल्याचा आवाज येत आहे, वाकलेले कोयते ठोकून सरळ करण्याचा ध्वनि घुमत आहे, बाया मुलें नुकतींच आपलीं दंताळीं बाजूला ठेवून गुरें वळविण्याकरितां त्यांना हाका मारीत आहेत–आणि या भिन्न निनादांच्या जोडीला त्याच सायंकाळीं मालकाच्या घरांतून निराळा ध्वनि येत आहे. ट्रिन ट्रिन ट्रिन ! पिआनोच्या सायीने हंगेरींतील एक गाणें चालू आहे आणि मध्येच चेंडूला फळीने मारल्याचा आवाज येत आहे.* तबेल्यानजीक एक गरगरीत चार घोडे जुंपलेली भाड्याची उत्तम वग्गी उभी आहे.

(या प्रसंगासाठी) दहा मैलांकरितां दहा रूबल भाडें देऊन घ्यावयाचे आहे आहेत. गाडीला जुंपलेल्या घोडयांचे घुंगरू वाजत आहेत. त्यांच्या पुढे मुबलक गवत असून ते कांही गवत तुडवीतही आहेत. हेंच गवत शेतांत शेतकरी इतक्या प्रयासाने गोळा करीत होते. मालकाच्या

---

* दिवाणखान्यांत खेळतां येईल अशा एका खेळांतील. मा. ज. का

घरीं कांहीतरी गडबड दिसते. एक गुटगुटीत गुलाबी शर्ट घातलेला पोऱ्या (हा पोषाख याला चौकीदार म्हणून दिलेला असतो) गाडीवानाला कांही घोडे गाडयांना जुंपण्याचा हुकूम देत आहे. गाडीवानाच्या कामावर असणारे दोन शेतकरी आपल्या खोल्यांतून संथपणें पाव्हण्यांकरितां गाडया जुंपण्यास निंघत आहेत.

मालकाच्या घराशेजारीं आणखी एका ठिकाणाहून पिआनोचा ध्वनि येत होता. येथे मुलांना पिआनो शिकविणारी एक तरुणी राहत असून तिची एका गाण्याची तालीम चालू होती. दोन्ही पिआनोचे आवाज एकमेकांत मिसळत होते. घराजवळून दोन दाया जात असून त्यांपैकी एक म्हातारी व एक तरुण आहे. यांच्या तान्ह्यांत मुलें असून--शेतांत बापाकरितां पेय नेणारा मुलगा यांच्या वयाचाच होता--त्यांना या झोंपण्यास नेत होत्या. एक दाई इंग्रज असल्यामुळें तिला रशियन बोलतां येत नव्हतें. या दाइंत कांही विशेष होतें म्हणून नव्हे तर हिला रशियन भाषा येत नाही म्हणूनच मुद्दाम इंग्लंडहून बोलावण्यांत आलें होतें. थोडया पलीकडे एक शेतकरी व दोन शेतकरणी झाडांना पाणी देत होत्या. एक दुसरा शेतकरी छोटया साहेबांची बंदूक साफ करीत होता.

एकीकडे बाया टोपलींतून स्वच्छ धुतलेल्या कपडयांचा गठ्ठा घेऊन चालल्या होत्या.हे कपडे घरांतील माणसांचे,आणि इंग्रज व फ्रेंच शिकविणाऱ्या शिक्षकांचे होते. त्या घरांत एका पंक्तीलाच लागणारीं भांडीं धुतांना दोन बाया मेटाकुटीस येत व सर्वांना कॉफी, चहा, दारू, 'सेल्झर पाणी'* हीं देण्याकरितां दोन शेतकऱ्यांना गणवेषांत सारखी जिन्यावरून उतरचढ करावी लागे.वर जेवणाचे पदार्थ टेबलावर मांडलेले आहेत. मंडळीचें आतांच जेवण झालें आहे पण पुनः ते कदाचित् मध्यरात्री पावेतों किंवा कोंबडा आरवे पावेतों किंबहुना उजाडे पावेतोंही जेवत राहतील.

कांही लोक बिडी ओढत पत्ते खेळत आहेत.कांही निव्वळ बिडी ओढत बसले आहेत व गप्पा करीत आहेत. कांही इतस्ततः फिरत आहेत व खाद्य पेयांवर ताव मारीत आहेत. काय न करावें हें न सुचल्यामुळें कांही फिरा-

---

* जर्मनींतिल एका औषधी झऱ्याचें खनिज पाणी. मा. ज. का.

वयास जाण्याच्या तयारींत आहेत. या घोळक्यांत सुमारें पंधरा सुदृढ स्त्रीपुरुष असून यांची बरदास्त राखण्यास तीस सुदृढ स्त्रीपुरुष सतत खपत आहेत.

जेथे हा प्रकार चालू आहे त्या खेडचांत प्रत्येक क्षण व (काम करूं शकणारें) प्रत्येक पोर मोलाचें असतें. ओट (जव) गळून पडूं नयेत म्हणून जुलैमध्यें शेतकरी झोप कमी करून रात्रीची सुद्धा कापणी करतो; स्त्रिया सुद्धा दिवस उजाडण्यापूर्वीच पेंढचा बांधावयास लागणारे गवताचे बंद तयार करण्यास लागणारें गवत बडवून सरळ करीत असतात आणि म्हाताऱ्या बाया, बाळंतिणी व मुलें फाजील मेहनत झाल्यानंतर जास्त पाणी पिऊन आजारी पडतात. त्या जुलै महिन्यांतच श्रीमंतांचा हा कार्यक्रम चालू असतो. रशियांतील लोकसंख्येला निव्वळ जगण्याकरितां जें धान्य खंडोगणती लागतें तेंच कापणी केलेलें धान्य गंजीजवळ नेण्यास माणसें व घोडीं कमी पडतात. पण आमचे छानछोकी लोक मात्र त्यांच्या तऱ्हेनेच कालहरण करतील: थिएटर, वनभोजन, शिकार, दारू, जेवण, पिआनो, गाणें, नाच हीं खुळें अव्याहत चालू राहणारच.

हा प्रकार पूर्वापार असाच चालत आला आहे अशा प्रकारची सबब निदान खेडचांतून पुढे आणतां येणें शक्य नाही. यापैकी एकाही गोष्टीची पूर्वीपासून खेडचांत व्यवस्था नसते. अशा राहणीचा सरंजाम आम्हीच उभा करितों व आधीच कंबरमोड काम असणाऱ्या शेतकऱ्यापासून धान्य व काम घेतों. ती मेलेली घोबीण, ती पंचदशवर्षीय वेश्या किंवा हात आखडलेली सिगारेटी वळणारी बाई अथवा आमच्या भोवतीं दिसणारे पोटास पुरेसें न मिळतां काम करणारे म्हातारे, तरुण आणि कोवळीं पोरें या सर्वांचा आमच्याशीं जणूं कांहीच संबंध नाही असे आम्ही वागतों. आम्ही अशी चैन करतों की जणूं काय आमची चैन व त्यांचे हाल याचा अर्थाअर्थी कांहीच संबंध नाही. आम्हांला हें उमजत नाही की एकीकडे जर आमचा आळस, चैन व पतित जीवनक्रम नसेल तर दुसरीकडे इतकें डोईजड कामही पण राहणार नाही आणि कांही लोकांकडून इतकें प्राणघेऊ काम न घेतलें तर आमच्याप्रमाणें चैनींत जीवन घालविणें अशक्यप्राय होईल. या गोष्टीकडे लक्ष देण्याची आमची इच्छा नसते.

हे हाल आणि आमची चैनबाजी या अगदी निराळ्या गोष्टी असून आम्ही आमच्यापरी राहिलों तरी आम्ही साळसूद व पाण्यांतल्या कमल-

दलाप्रमाणें निर्लेप आहोंत अशी आमची कल्पना असते.

आम्ही रोमन लोकांचा वृत्तांत वाचतों, व इतर उपाशी मरत असतां स्वत: उंची पक्वान्नें व पेयें यांवर ताव मारणाऱ्या लुक्युली लोकांच्या हृदय-शून्यतेबद्दल आश्चर्य प्रकट करितों. सबंध खेडीं बगीच्याकरितां गुंतवून खासगी नाचरंग उडविणाऱ्या, जमीन कसणाऱ्यावर प्रत्यक्ष गुलामगिरी गाजविणाऱ्या, आमच्या पूर्वजांबद्दलही आम्हांला तिरस्कार वाटतो; आणि आमच्या श्रेष्ठ माणुसकीच्या (कल्पित) उच्चासनावरून आम्ही त्यांना हसतों.

इसाया प्रकरण ५ वें यांतील खालील मजकूर आम्ही वाचतों.

८. आपण एकटेंच असावें म्हणून जे घराला घर जोडतात व शेताला शेत जोडण्याच्या प्रयत्न करतात त्यांवर संकट येवो.

१० जे दारू पिण्याकरितां लवकर उठतात अगर दारूचा पूर्ण अंमल चढेपावेतों रात्रौ दारू पीत जागतात त्यांवर संकट येवो.

१२ आणि ज्यांच्या मेजवान्यांत तंतुवाद्यें, डफ, बांसऱ्या, दारू ही असतात; ज्यांचें ईश्वरी सृष्टीकडे किंवा ईश्वराच्या लीलेकडे दुर्लक्ष असतें;

१८ जे मोठेपणामुळें उच्चनीच भाव निर्माण करतात व पापें आचरतात त्यांवर संकट येवो.

२० जे वाईटास चांगलें व चांगल्यास वाईट म्हणतात अगर कडूला गोड म्हणतात त्यांवर संकट येवो.

२१ जे फक्त स्वत:च्या मतें शहाणे व दूरदर्शी आहेत त्यांवर संकट येवो.

२२ जे दारू पिण्याच्या बाबतींतच पक्के आहेत त्यांवर संकट येवो.

२३ किंवा जे दुष्टांना इनाम देतात व सुष्टांचे नाच पाहतात. अशा लोकांवर आकाश कोसळो.

हें वाचतांना आम्हांला वाटतें की हें वर्णन आम्हांला अनुलक्षून नाही.

शिवाय बायबलांत मॅथ्यू प्र० ३ श्लो० १० यांत म्हटलें आहे:—

"आणि आतांतर झाडाचे मुळाशींच कुऱ्हाड घातली आहे. म्हणून ज्याला चांगले फळ लागत नाही तें कापून आगींत टाकलें जात आहे."

आणि आमचा समज हा की आम्ही चांगलें फळ देणारीं झाडें असून हे शब्द कोणातरी दुसऱ्यासच उद्देशून लिहिले आहेत.

इसाया प्रकरण ६ यांत असें म्हटलें आहे:

१० यांचीं हृदयें लठ्ठ कर, कान जड कर व डोळे मिटून ठेव; नाही तर यांना दिसेल, ऐकूं येईल अगर समजेल व कदाचित् उपरति होऊन हे सुधारतील.

११ मग मी म्हटलें, "परमेश्वरा ! हें असें किती वेळ चालणार ?" मला उत्तर मिळालें, " जोंपावेतों शहरें, घरें हीं सर्व निर्मनुष्य होऊन सर्वत्र तिर्जनता येत नाही तों पावेतों ".

आम्ही हें सर्व वाचतों पण आम्हीं स्वत:चा पक्का समज करून घेतों की हें आम्हांस लागू नसून हें कोणा तरी दुसऱ्यास अनुलक्षून आहे. पण आम्हांला हें कळत नाही याचें कारणच हें की या सर्व गोष्टी आम्हांसच उद्देशून आहेत. आम्ही ऐकत नाही, पाहात नाही अथवा अंतर्यामीं समजून ही घेत नाही, की हें सर्व कसें घडून आलें ?

प्रकरण सव्विसावे

जो आपल्याला ख्रिस्तानुयायी अगर सुसंस्कृत किंवा कनवाळू समजतो अशा माणसाची गोष्ट तर सोडाच, पण निदान अंशतः तरी आपणांत तारतम्य व सदसद्विवेकबुद्धि आहे असें ज्याला वाटतें असा माणूस, ज्या जीवनक्रमांत, स्वतः श्रम न करतां, मनुष्यमात्राच्या मागे लागलेला जो जीवनार्थ कलह त्यांत भाग न घेतां, श्रमजीवी लोकांचें श्रमसत्व भक्षण करण्यांत येतें व ज्या जीवनक्रमाने चालविलेल्या शोषणामुळें त्यांच्यावरील बोजा वाढून तज्जन्य धडपडीमुळें मृत्युमुखीं पडणारांची संख्या वाढते, असा जीवनक्रम कसा पत्करूं शकेल ? तरी आमचें ख्रिस्ती (धर्मानुयायी) व सुशिक्षित समजलें जाणारें जग अशा लोकांनी भरलें आहे. आमचें जग अशा लोकांनी भरलें आहे, इतकेंच नव्हे तर या ख्रिस्तानुयायी व सुशिक्षित जगांतील लोकांचें ध्येयच मुळी अधिकांत अधिक संपत्ति मिळवणें हें बनलें आहे. जिच्यामुळें आराम व आळस हीं शक्य होतील अशी श्रीमंती त्यांना हवी. याचाच अर्थ असा की जीवनार्थ कलहांतून स्वतःची मुक्तता करून घेऊन आपले जे इतर बांधव स्वतःवरील जोखडाच्या भाराने आधीच मरत आहेत त्यांच्या श्रमाचा फायदा घेणें हें त्यांचें ध्येय होय. लोकांची ही भयंकर दिशाभूल होऊं तरी कशी शकली ?

जें स्पष्ट, उघड व निर्विवाद आहे तें त्यांनी पाहूं नये, ऐकूं नये अगर हृदयांत उमजूं नये अशी त्यांची दशा कशामुळे झाली ?

एका क्षणाचाच विचार केला तरी आम्ही जें प्रत्यक्ष आचरतों आणि ख्रिस्तानुयायी या नात्याने नव्हे, तर फक्त दयाळू व सुशिक्षित असे सद्गृहस्थ या नात्याने ज्याची आम्ही वतावणी करतों, त्यांतील जमीन अस्मानाचा व अंगाचा थरकांप करून सोडणारा विरोध आम्हांला स्पष्टपणें दिसेल.

ईश्वराच्या शहाणपणामुळें असो अगर चुकीमुळे असो, किंवा निसर्गनियमास अनुसरून असो, पण जगाची आम्हांला जेव्हापासून माहिती आहे तेव्हापासून माणूस नग्न, आंगावर लोंकर नसलेला, त्याला आश्रयास

योग्य अशीं निसर्गसिद्ध भुयारें–बिळें नसणारा, किंवा रॉबिन्सन क्रूसोप्रमाणें शेतांत ज्याला सहजसाध्य खाद्य उपलब्ध नाही असाच असलेला आपण पाहतों. शरीररक्षण, कपडे तयार करणें, कुंपण बांधणें, छप्पर उभें करणें व दिवसांतून दोन अगर तीन वेळां स्वत:ची व स्वत:च्या मुलां–म्हाताऱ्यांची भूक शमविण्याकरितां अन्न मिळविणें या सर्वांकरितां निसर्गाशीं एकसारखा झगडा केला पाहिजे, अशाच स्थितींत सर्व माणसें स्वभावत: असतात.

युरोप, चीन, अमेरिका किंवा रशिया कोठेही नजर फेका व वाटेल त्या काळच्या वाटेल तितक्या संख्येच्या मानवसमाजाच्या जीवनक्रमाकडे लक्ष द्या, अखिल मानवजातीचें परीक्षण करा किंवा तिची अंशात्मक परीक्षा करा, लोक टोळ्या करून भटकत त्या काळाचा विचार करा, किंवा ज्या आमच्या काळांत वाफेचीं एंजिनें, शिवण्याचीं यंत्रें, विजेचे दिवे आणि शेतकीचीं सुधारलेलीं आउतें उपलब्ध आहेत त्या काळाचा विचार करा, आम्हांला एकच गोष्ट दिसून येते. ती ही की, लोकांना सतत व नेटाने काम करूनसुद्धा स्वत:ला व स्वत:च्या मुलां–म्हाताऱ्यांना पुरेसें अन्नवस्त्र व निवाऱ्याची जागा हीं मिळत नाहीत व पूर्वीप्रमाणें आजही निर्वाहार्थ लागणाऱ्या साधनांची टंचाई व तत्प्राप्त्यर्थ करावे लागणारे अतिरिक्त श्रम यांमुळे बरेचसे लोक मृत्युमुखीं पडत आहेत. पृथ्वीच्या पाठीवर ज्या कोणत्या प्रदेशांत आम्ही राहत असूं तेथे आमच्याभोवतीं एक लाख, हजार, दहा अगर एक मैल त्रिज्येचें जरी वर्तुळ काढलें व यांपैकी कोणत्याही वर्तुळांत येणाऱ्या लोकांच्या जीवनक्रमाकडे लक्ष दिलें तर आम्हांला त्यांत उपासमार होणारीं लहान मुलें, म्हातारीं स्त्रीपुरुषें, बाळंतिणी, आजारी व अशक्त असे अनेक लोक दिसतील. यांना पुरेसें खावयास व (पुरेशी) विश्रांति न मिळाल्यामुळें अकालीं मृत्युमुखीं पडावें लागतें. ऐन तारुण्याच्या भरांत निव्वळ धोक्याचीं व हानिकारक कामें केल्यामुळे जीवाला मुकणारेही अनेक लोक आपल्याला आढळतील.

जगाच्या सुरुवातीपासून माणूस सर्वांना सामान्य अशी (निर्वाहाची) गरज भागविण्याची सतत धडपड करीत आहे. पण कमालीचे प्रयत्न करून आणि अनेक प्रकारचे हाल व त्रास सोसूनसुद्धां त्याला या परिस्थितीवर मात करतां आलेली नाही, हें आपण पाहतों. शिवाय आपणाला हेंही समजतें की,

आमच्यापैकी प्रत्येकजण, मग तो कोठेंही असो व कसाही राहो, प्रत्येक दिवसाला व प्रत्येक तासाला, त्याची इच्छा असो अगर नसो, मानव-जातीच्या श्रमांनी उत्पन्न झालेल्या सामग्रीचा अंश खलास करीत असतो. तो कोठेही, कशाही रीतीने राहत असला तरी त्याचें घर व त्याच्या डोकी-वरील छप्पर आपोआप तयार झालेलें नसतें. लांकडें आपोआप येऊन चुलींत लागत नाहींत. हीच गोष्ट पाण्याची. त्याचप्रमाणें भाजलेली भाकरी, जेवण, कपडे, जोडे इत्यादि जिन्नसाही आकाशांतून पडलेल्या नसतात. या सर्व जिन्नसा तयार केल्या गेल्या आहेत. या जिन्नसा तयार होण्यास मागे होऊन गेलेल्या लोकांचेच नव्हे, तर आजच्या लोकां-चेही श्रम कारणीभूत आहेत. असे श्रम करणाऱ्यांपैकी शेंकडो, हजारों लोक स्वत:ला व स्वत:च्या मुलांबाळांना अवश्य असणारें अन्नवस्त्र व निवाऱ्याची जागा मिळविण्याच्या अयशस्वी धडपडीपायीं खुरटून जाऊन मरत आहेत. हे सर्व दैन्याशीं झगडत असतात आणि त्यांना इतक्या इरेस पडून झगडावें लागतें की, क्षणोक्षणीं त्यांच्या डोळ्यांसमोर त्यांची नात्यांचीं माणसें, आईबाप व मुलें पटापट मरत असतात.

आंतमध्ये पाणी शिरलेल्या व अत्यंत अल्प अन्नसामग्री ज्यांत आहे अशा जहाजावरील माणसांप्रमाणेंच परमेश्वराने या जगांतील लोकांचीही स्थिति करून ठेवली आहे. म्हणजे, त्यांनी अन्नाची काटकसर केली पाहिजे व अनर्थ टाळण्यासाठी एकसारखे श्रमही केले पाहिजेत. या कामाला झालेला प्रत्येक खोळंबा—मग तो कोणीही केलेला असो—अगर दुसऱ्यां-च्या श्रमांचा सामान्य जनतेस अनावश्यक अशा कारणीं केलेला खर्च, हा आम्हांस व आमच्या बांधवांस हानिकारक असाच ठरणार.

मग आमच्यांतील सुशिक्षित लोकांपैकी बहुतेक लोक स्वत: परिश्रम न करतां जीवरक्षणास अवश्य अशा इतरांच्या श्रमांचें फल संथपणें उप-भोगतात व असें करणें स्वाभाविक व समंजसपणाचें समजतात हें कसें ?

स्वत:ला चोर अथवा विश्वासघातकी न समजतां आपलें निसर्गदत्त काम टाळून तें दुसऱ्यांच्या बोकांडीं बसवणाऱ्या माणसांच्या मनांत दोनच कल्पना असणें शक्य आहे. पहिली ही की, आम्ही काम टाळणारे, काम करणारांपेक्षा, कांही निराळ्याच प्रकारचे लोक असून समाजांत आम्हांला

विशिष्ट कामगिरी करावयाची आहे. उदाहरणार्थ, मधमाशांमध्ये राणी माशी ही निराळी असून कामकरी माशांहून तिचें कार्य निराळें असतें, तशाच तऱ्हेची ही कल्पना होय. किंवा दुसरी कल्पना अशी की, आम्ही कावाडकष्ट टाळणारे जें (काम) करतों, तें सर्व समाजाला इतकें अवश्य व उपयोगी असें असतें की, दुसऱ्यावरचा कामाचा बोजा वाढवून त्यांची आम्ही जी हानि करतों त्याबद्दलची भरपाई आम्ही करीत असलेल्या कामाच्या योगाने सहज होऊन जाते.

जुन्या काळीं सुद्धा, जे लोक दुसऱ्याचें श्रमफल लुबाडीत, तेही एकतर आम्ही कांही तरी श्रेष्ठ अवलादीचे (जातीचे) आहोंत; व दुसरें, ईश्वरानें आम्हांला इतरांच्या कल्याणाची काळजी करण्याकरितां, अर्थात् लोकांना शिकविण्याकरितां व त्यांवर राज्य करण्याकरितां पाठविलें आहे, असेंच म्हणत. आणि म्हणूनच ते लोकांचा असा समज करून देत व त्यांनाही क्वचित् असें वाटे की, आपण जें करितों तें लोकांच्या श्रमाची जी लूट आपण करितों त्या मानाने अधिक महत्त्वाचें व त्या लोकांस अधिक आवश्यक असें आहे. आणि जोंपावेतों जन्मजात श्रेष्ठता व ईश्वरी इच्छेची मानवी व्यवहारामध्ये प्रत्यक्ष ढवळाढवळ यांवर लोकांचा विश्वास होता तोंवर हें समर्थन लोकांना पुरेसें वाटे. पण पुढे ख्रिस्ती धर्माचा उदय झाला व सर्व माणसें सारखीं व एकच आहेत हें तत्त्व त्यांतून पुढे आलें. त्यामुळें वरील समर्थन त्याच स्वरूपांत पुढे आणणें अशक्य झालें. जन्मतःच लोक निरनिराळ्या गुणधर्मांचे असतात असें प्रतिपादणें यानंतर शक्य कोटींतील राहिलें नाही व ती जुनी विचारसरणी जरी अजून कोठे डोकावत असली तरी आज ती जवळजवळ नामशेष झाली आहे.

जन्मजात श्रेष्ठतेचें कारण आता लोपलें आहे तरी, शक्तिमानांनी, स्वतः काम चुकवून, दुबळ्यांच्या श्रमांवर जगावें ही क्रिया मात्र कायमच आहे. म्हणन या परिस्थितीच्या समर्थनार्थ नवीं नवीं कारणें एकसारखीं पुढे येत आहेत. कारण श्रमांपासून स्वतःची मुक्तता करून घेणें ज्यांना साधतें त्यांना, जन्मजात श्रेष्ठत्वाची कास न धरतां, आपण करतों तें योग्यच आहे असें भासवितां आलें पाहिजे. अशीं बरींच समर्थनें पुढे आलीं आहेत. आपण ज्याला एके काळीं शास्त्र समजत होतों त्याचा अजूनही अशीं

समर्थनें शोधून काढणें हाच उद्योग कायम आहे, हें नवलाचें वाटलें तरी अगदी खरें आहे. अशीं समर्थनें शोधून काढणें हाच पूर्वी धर्मशास्त्रांचा व शासनशास्त्रांचा उद्देश होता. आपण ज्यास तत्त्वज्ञान म्हणतों त्याचाही हाच उद्देश व (आजच्या समर्थनवादी शास्त्रज्ञांना अर्थात् विचित्र वाटेल, पण) आजच्या प्रायोगिक 'शास्त्रां'चाही हाच एकमेव उद्देश आहे.

आमचा धर्मपंथ हाच खरा ख्रिस्तानुयायी आहे, सबब आमचाच सर्व लोकांच्या आत्म्यावर व शरीरांवर खराखुरा पूर्ण ताबा आहे असें पटविण्याकरितां निरनिराळ्या पंथांचे जे कांही धार्मिक युक्तिवाद व लटपटी चालत असत त्या लटपटींचाही असें समर्थन करणें हाच खराखुरा उद्देश आहे.

शासनशास्त्रें, म्हणजे राजकीय किंवा फौजदारी, दिवाणी आणि आंतरराष्ट्रीय कायदे इत्यादि सर्वांचा हाच उद्देश आहे. सर्व तत्वज्ञानें—विशेषेंकरून ज्याचा बराच काळ पगडा राहिला तें हेगेलचें "जें आहे तें सर्व योग्य आहे आणि व्यक्तित्वपूर्तीकरितां राज्यसंस्था अवश्य आहे" असा सिद्धान्त प्रतिपादणारें तत्वज्ञान यांचाही तोच उद्देश आहे.

एका कनिष्ठ दर्जाच्या इंग्रज लेखकाच्या इतर लेखांचा सर्वांना विसर पडला आणि सर्वानुमतें ते अत्यंत टाकाऊ ठरले. पण याने लोकसंख्येसंबंधीं एक पुस्तक लिहून लोकसंख्येची वाढ खाद्यपेयांच्या सामग्रींत होणाऱ्या वाढीपेक्षा अधिक होण्याकडे प्रवृत्ति असते अशा अर्थाचा एक नामधारी नियम शोधून काढला, व या नियमाचें खूळ या लेखकाने आंकडेमोडीच्या गडबडगुंडयासह जगापुढे मांडलें. वास्तविक या पुस्तकांत बुद्धिमत्तेचा अभाव असल्यामुळे त्या लेखकाच्या नंतरच्या इतर लिखाणाची जी वासलात लागली, तीच गत या पुस्तकाचीही व्हावयास हवी होती. पण प्रत्यक्ष मात्र उलट झालें. या पुस्तकाचा लेखक एकदम अधिकारी 'शास्त्रीय' लेखक म्हणून प्रसिद्ध झाला व अर्वाचीनकपावेतों त्याचें हें स्थान कायम राहिलें. मालथस! मालथसचें तत्वज्ञान—लोकसंख्येची वाढ भूमितीश्रेढीनें होते व अन्नाची वाढ गणितश्रेढीने होते—लोकसंख्या आटोपशीर ठेवण्याचे नैसर्गिक व बुद्धिग्राह्य नियम—सर्व एकदम शास्त्रांत मोडूं लागले. त्यांची निर्विवाद सत्य म्हणून गणना होऊं लागली. पडताळा मात्र कोणीही पाहिला नाही. आणि इतर अनुमानें काढण्यासाठी आधारभूत गृहीत सत्यें म्हणून यांचा उपयोग

करण्यांत येऊं लागला. विद्वान् व सुशिक्षित लोक या बाबतींत अशाप्रकारें वागूं लागल्यामुळे सहस्त्रावधि आळशी लोकांना मालथसच्या नव्या शोधाबद्दल आदरपूर्ण विश्वास वाटूं लागला.

हें असें कां घडलें ? या शास्त्रीय अनुमानांचा अशिक्षित लोकांच्या उपजत भावनांशीं तर कोठेही मेळ बसतोसें दिसत नाही.

शास्त्र हें दुबळचा व चुका करणाऱ्या माणसांनी आपल्या विचारांना मोठेपणा देण्याकरितां शोधलेलें एखादें नांव नसून, चर्च संस्थेप्रमाणें तें स्वयंसिद्ध व अनादि आहे व त्याच्या हातून चूक होणें अशक्य आहे असा ज्यांचा समज असतो, त्यांचीच समजत वर वर्णन केल्याप्रमाणें होते.

मालथसच्या सिद्धान्तापासून जीं व्यावहारिक अनुमानें निघतात त्यांचा विचार करतांच मालथसचा सिद्धान्त अगदी मतलबी व विशिष्ट उद्देशाने प्रेरित असल्याचें कोणाच्याही लक्षांत येईल.

मालथसच्या सिद्धान्तापासून अगदी सरळ रीतीने पुढील अनुमानें निघालीं. श्रीमंत व शक्तिमान यांतील क्रौर्य, अहंभाव अथवा सौजन्याभाव यांच्यामुळे कामगारांची दैना होते असें नसून, यांची ही स्थिति एका दुर्भेद्य निसर्गनियमावर अवलंबून आहे, व याबद्दल जर कोणास जबाबदार धरायचेंच तर तें खुद्द त्या कामगारांनाच. कारण खाद्यपेयांचा तुटवडा असतां व आपणांस खावयास मिळणार नाही हें जाणूनही हे जन्मास कां येतात ? म्हणून श्रीमंत व शक्तिमान वर्गाचा कांहीच दोष नाही आणि त्यांनी आपला कार्यक्रम पूर्ववत् चालू ठेवण्यास हरकत नाही.

आणि हें अनुमान आयतखाऊ मंडळींच्या आपमतलबीपणाला इतकें सोईस्कर होतें की, पुराव्याचा अभाव, प्रमादग्रस्तता या दोषांकडे व त्याच्या प्रमाणें त्या तत्वाच्या अंधेरनगरी घडणीकडे सर्व विद्वानांनी पूर्णपणें दुर्लक्ष केलें, व सर्व सुशिक्षित, अर्थात् आळशी, लोकांनी या तत्वाचा रोख ओळखून तावडतोब त्याला मान डोलविछी आणि त्यावर सत्याचें शिक्कामोर्तब करून, अर्थात् त्याला शास्त्र ठरवून, अर्धशतकभर त्याचा उदोउदो केला.

काम्टेचें आधिभौतिक तत्वज्ञान व 'मानवजात हा एक सेंद्रिय जीव आहे' हें त्यापासून निघणारें अनुमान आणि जीवनधर्म ठरविणारें डार्विनचें 'जीव-

नार्थ कलहाचें तत्व,आणि मानवांच्या भिन्न जातींत उद्भवणाऱ्या भेदभावांचें त्यापासून निघणारें अनुमान, मानवप्राणिशास्त्र, जीवशास्त्र, किंवा समाज-शास्त्र (आजकाल लोकांना याचें वेड आहे) या सर्वांचा एकच उद्देश आहे. ज्या पद्धतीने लोक स्वत:चरचा कामाचा स्वभावप्राप्त बोजा झुगारून देऊन इतर लोकांचें श्रमफल उपभोगतात, त्या पद्धतीचें समर्थन हीं सर्व शास्त्रें करीत असल्यामुळे हीं लोकप्रिय झालीं आहेत.

अशीं सर्व तत्वज्ञानें रिवाजाप्रमाणें प्रथम भटजींच्या गुप्त 'पवित्र' बैठकींत शिजतात व नंतर दुर्बोध व अनिश्चित स्वरूपांत तीं लोकांपुढें मांडलीं जाऊन लोक त्यांचा अंगीकार करितात. जुन्या काळीं, ज्याप्रमाणें धर्म व राज्यसंस्था यांच्या जुलुमाचें समर्थन करणारें धर्मशास्त्र हें नेहमी भटजींचें राखीव ज्ञान असे व लोकांमध्ये फक्त 'राजा, धर्मगुरु व सरदार यांची सत्ता ईश्वरप्रणीत आहे' या तयार व सुटसुटीत सूत्राचा काय तो प्रसार होई व लोक त्याचा विश्वासाने अंगीकार करीत, तशाच रीतीनें पुढे तत्वज्ञान व शासनशास्त्र हीं शास्त्रीय विद्येचे जे उपाध्याय त्यांचें राखीव ज्ञान होऊन बसलें व लोकांमध्यें फक्त तयार अनुमानें काय तीं विश्वासाच्या जोरावर प्रचारांत येऊं लागलीं. या अनुमानांचा मथितार्थ हाच की, समाजाची जी आजची रचना आहे तशीच ती असावयास पाहिजे व ती याहून निराळी असूं शकत नाही.

आणि आजसुद्धा जीवनाच्या व जीवांच्या उत्क्रांतीच्या नियमांची चिकित्सा फक्त शास्त्रोपाध्यायांच्या मठांतून केली जात असून लोकांत मात्र "श्रमविभाग हें शास्त्रसिद्ध तत्त्व आहे; परिस्थिति अशीच राहणार; कांही लोकांनी काम करून उपाशीं मरावें व कांहींनी सतत दिवाळी चालवावी; कांहींचा सर्वनाश व्हावा तर इतरांनी घृतकुल्या मधुकुल्या उडवाव्या हा मानवी जीवनाचा एक निर्विवाद नियम असून त्याला आपण मान वांकविलीच पाहिजे." या अनुमानांना निव्वळ विश्वासाचे जोरावर मान्यता मिळते.

आमच्या सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांच्या आळसाचें व त्यांच्या निरनिराळ्या कृतींचें व कामाचें–रेल्वे कामगारांपासून तों लेखक, कलावंत यांच्या कामाचें–अगदी अलीकडचें शास्त्रीय समर्थन पुढीलप्रमाणें आहे.

करण्यांत येऊं लागला. विद्वान् व सुशिक्षित लोक या बाबतींत अशाप्रकारें वागूं लागल्यामुळे सहस्त्रावधि आळशी लोकांना मालथसच्या नव्या शोधाबद्दल आदरपूर्ण विश्वास वाटूं लागला.

हें असें कां घडलें ? या शास्त्रीय अनुमानांचा अशिक्षित लोकांच्या उपजत भावनांशीं तर कोठेही मेळ बसतोसें दिसत नाही.

शास्त्र हें दुबळचा व चुका करणाऱ्या माणसांनी आपल्या विचारांना मोठेपणा देण्याकरितां शोधलेलें एखादें नांव नसून, चर्च संस्थेप्रमाणें तें स्वयंसिद्ध व अनादि आहे व त्याच्या हातून चूक होणें अशक्य आहे असा ज्यांचा समज असतो, त्यांचीच समजत वर वर्णन केल्याप्रमाणें होते.

मालथसच्या सिद्धान्तापासून जीं व्यावहारिक अनुमानें निघतात त्यांचा विचार करतांच मालथसचा सिद्धान्त अगदी मतलबी व विशिष्ट उद्देशाने प्रेरित असल्याचें कोणाच्याही लक्षांत येईल.

मालथसच्या सिद्धान्तापासून अगदी सरळ रीतीने पुढील अनुमानें निघालीं. श्रीमंत व शक्तिमान यांतील क्रौर्य, अहंभाव अथवा सौजन्याभाव यांच्यामुळे कामगारांची दैना होते असें नसून, यांची ही स्थिति एका दुर्भेद्य निसर्गनियमावर अवलंबून आहे, व याबद्दल जर कोणास जबाबदार धरायचेंच तर तें खुद्द त्या कामगारांनाच. कारण खाद्यपेयांचा तुटवडा असतां व आपणांस खावयास मिळणार नाही हें जाणूनही हे जन्मास कां येतात ? म्हणून श्रीमंत व शक्तिमान वर्गाचा कांहीच दोष नाही आणि त्यांनी आपला कार्यक्रम पूर्ववत् चालू ठेवण्यास हरकत नाही.

आणि हें अनुमान आयतखाऊ मंडळींच्या आपमतलबीपणाला इतकें सोईस्कर होतें की, पुराव्याचा अभाव, प्रमादग्रस्तता या दोषांकडे व त्याच्या प्रमाणें त्या तत्वाच्या अंधेरनगरी घडणीकडे सर्व विद्वानांनी पूर्णपणें दुर्लक्ष केलें, व सर्व सुशिक्षित, अर्थात् आळशी, लोकांनी या तत्वाचा रोख ओळखून ताबडतोब त्याला मान डोलविली आणि त्यावर सत्याचें शिक्कामोर्तब करून, अर्थात् त्याला शास्त्र ठरवून, अर्धशतकभर त्याचा उदोउदो केला.

काम्टेचें आधिभौतिक तत्वज्ञान व 'मानवजात हा एक सेंद्रिय जीव आहे' हें त्यापासून निघणारें अनुमान आणि जीवनधर्म ठरविणारें डार्विनचें 'जीव-

नार्थ कलहाचें तत्व,आणि मानवांच्या भिन्न जातीत उद्भवणाऱ्या भेदभावांचें त्यापासून निघणारें अनुमान, मानवप्राणिशास्त्र, जीवशास्त्र, किंवा समाज-शास्त्र (आजकाल लोकांना याचें वेड आहे) या सर्वांचा एकच उद्देश आहे. ज्या पद्धतीने लोक स्वतःवरचा कामाचा स्वभावप्राप्त बोजा झुगारून देऊन इतर लोकांचें श्रमफल उपभोगतात, त्या पद्धतीचें समर्थन हीं सर्व शास्त्रें करीत असल्यामुळे हीं लोकप्रिय झालीं आहेत.

अशीं सर्व तत्वज्ञानें रिवाजाप्रमाणें प्रथम भटजींच्या गुप्त 'पवित्र' बैठकींत शिजतात व नंतर दुर्बोध व अनिश्चित स्वरूपांत तीं लोकांपुढें मांडलीं जाऊन लोक त्यांचा अंगीकार करितात. जुन्या काळीं, ज्याप्रमाणें धर्म व राज्यसंस्था यांच्या जुलुमाचें समर्थन करणारें धर्मशास्त्र हें नेहमी भटजींचें राखीव ज्ञान असे व लोकांमध्ये फक्त 'राजा, धर्मगुरु व सरदार यांची सत्ता ईश्वरप्रणीत आहे' या तयार व सुटसुटीत सूत्राचा काय तो प्रसार होई व लोक त्याचा विश्वासाने अंगीकार करीत, तशाच रीतीनें पुढे तत्वज्ञान व शासनशास्त्र हीं शास्त्रीय विद्येचे जे उपाध्याय त्यांचें राखीव ज्ञान होऊन बसलें व लोकांमध्यें फक्त तयार अनुमानें काय तीं विश्वासाच्या जोरावर प्रचारांत येऊं लागलीं. या अनुमानांचा मथितार्थ हाच की, समाजाची जी आजची रचना आहे तशीच ती असावयास पाहिजे व ती याहून निराळी असूं शकत नाही.

आणि आजसुद्धा जीवनाच्या व जीवांच्या उत्क्रांतीच्या नियमांची चिकित्सा फक्त शास्त्रोपाध्यायांच्या मठांतून केली जात असून लोकांत मात्र "श्रमविभाग हें शास्त्रसिद्ध तत्त्व आहे; परिस्थिति अशीच राहणार; कांही लोकांनी काम करून उपाशीं मरावें व कांहींनी सतत दिवाळी चालवावी; कांहींचा सर्वनाश व्हावा तर इतरांनी धृतकुल्या मधुकुल्या उडवाव्या हा मानवी जीवनाचा एक निर्विवाद नियम असून त्याला आपण मान वांकविलींच पाहिजे." या अनुमानांना निव्वळ विश्वासाचे जोरावर मान्यता मिळते.

आमच्या सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या लोकांच्या आळसाचें व त्यांच्या निरनिराळ्या कृतींचें व कामाचें–रेल्वे कामगारांपासून तों लेखक, कलावंत यांच्या कामाचें–अगदी अलीकडचें शास्त्रीय समर्थन पुढीलप्रमाणें आहे.

जीवनकलहांतील आमच्या हिश्शाचे श्रम आम्हीं करावे या निसर्ग-बंधनापासून आम्ही आपली मुक्तता करून घेतली असली तरी, आम्ही जागतिक प्रगतीला मदत करून तद्द्वारा समाजसेवा करीत आहोंत; व यामुळे आम्ही इतरांचे श्रम उपभोगून त्यांचें जें नुकसान करतों त्याची आमच्या कामाने भरपाई करीत असतों.

आजच्या लोकांना हें समर्थन, पूर्वीचे परोपजीवी लोक स्वत:चें जें समर्थन करीत त्यापेक्षा, निराळें आहे असें वाटतें. रोमन बादशहा व रोमन लोक जेव्हा "आम्ही नसूं तर जगाची संस्कृति नष्ट होईल" असें स्वत:चें समर्थन करीत तेव्हा त्यांनाही वाटे की, त्यांचें समर्थन अडाणी मिसरी किंवा पर्शिअन लोकांच्या आत्मसमर्थनापेक्षा निराळें होतें. आणि मध्य-युगीन लोकांनाही नव्हतें का वाटत की, त्यांचें समर्थन रोमन लोकांच्या आत्मसमर्थनापेक्षा श्रेष्ठ होतें म्हणून ?

पण हा सगळा भास आहे. आमच्या आजच्या समर्थनाची थोडी चाचणी केल्यावरोबर आमची खात्री पटेल की, आमच्या नव्या समर्थनांत खरोखर नवें असें कांहीच नाही.

तें समर्थन थोडें बुरख्यांत आहे, पण तें आहे मात्र पूर्वीचेंच. कारण त्याचा पाया तोच आहे. स्वत: काम न करतां दुसऱ्याच्या श्रमफलाचा अपहार करण्याचें समर्थन—मग तें फॅराओचें व त्याच्या पुरोहितांचें असो, रोमन लोकांचें असो, की मध्ययुगीन सरदार अगर धर्मगुरूंचें असो—दोनच मुद्द्यांवर अधिष्ठित आहे. (१) आम्ही विशिष्ट व श्रेष्ठ जातीचे लोक असून ईश्वराने आम्हांला सामान्य लोकांत ज्ञानाचा प्रसार करून त्यांवर राज्य करण्यासाठीं पाठविलें आहे, म्हणून आम्ही दुसऱ्यांचें श्रमफल घेतों; व (२) आम्ही सामान्य लोकांना कितपत रावबावें, हें ठरविण्यास ते स्वत: असमर्थ आहेत. कारण फारिसी लोक म्हणतात, "ज्या या सामान्य लोकांना कायदा समजत नाही त्यांचा धि:कार असो" (जॉन, प्र. ७ श्लोक. ४९) स्वत:चें हित कशांत आहे हें सामान्य लोकांना समजत नाही म्हणून, त्यां-च्यावर जे उपकार केले जातात त्यांची किंमत त्यांना समजूं शकत नाही.

आमचें आजचें समर्थन निराळें दिसत असलें तरी याच मूलत-त्वांवर तें अधिष्ठित आहे. तें असें : (१) आम्ही खास लोक असून आमचें

शिक्षण व सुधारणा यांमुळें जगाच्या प्रगतीला मदत करून आम्ही सामान्य लोकांवर उपकार करीत आहोंत व (२) सामान्य लोकांना त्यांचा फायदा कसा व किती होत आहे हें समजत नसल्यामुळें यांतील तरतमभाव समजण्यास ते असमर्थ आहेत.

आम्ही स्वत: काम चुकवितों, व दुसऱ्यांच्या श्रमाचा अपहार करून त्यांच्या वरचा बोजा वाढवितों आणि वर असा खुलासा देतो की त्यांच्या श्रमाच्या मोबदल्यांत आम्ही त्यांचें इतर दृष्टीने पुष्कळ भलें करतों पण ते अज्ञानी असल्यामुळें आमच्या उपकृतीचें मोजमापच करूं शकत नाहीत.

हें पूर्वीचेंच समर्थन नव्हे काय ? फरक हाच की पूर्वी या श्रमापहाराचा हक्क रोमन नागरिक, पुरोहित, सरदार-आमदार या सर्वांना होता तो आज स्वत:ला सुशिक्षित म्हणवणारी जी जात आहे तिच्या एकटीच्या मालकीचा होऊन बसला आहे. त्यांतील खोटेपणा (मात्र) तोच आहे; कारण ज्या खोटया परिस्थितीचें समर्थन करायचें ती परिस्थिति पूर्वीचीच कायम आहे. हा खोटेपणा असा. स्वत:स श्रमांपासून मुक्त करून घेणारे हे आपल्यामुळे जनतेचा काय फायदा होतो हें युक्तिवाद करून पटवून देण्याच्या पूर्वीच अपहारक वर्गामध्ये स्थान पटकावतात, तें स्थान कायम टिकवितात आणि मागाहून त्याच्यासाठी एखादें समर्थन शोधून काढतात. फाराओ, पुरोहित वर्ग किंवा आम्ही सुशिक्षित लोक हे सर्व अशाचपैकी होत.

कांही लोकांनी दुसऱ्यांवर सक्ती करण्याची जी परिस्थिति पूर्वीपासून अजूनपावेतों कायम आहे ती या सर्वांच्या मुळाशीं आहे

आमच्या समर्थनांत व अत्यंत जुन्या समर्थनांत इतकाच फरक आहे की आमचें समर्थन जास्त भ्रामक व पूर्वीच्या मानाने अधिकच पोकळ अशा आधारावर उभारलें आहे.

स्वत:च्या ईश्वरप्रणीततेवर स्वत:चा व लोकांचा विश्वास असला म्हणजे पूर्वीचे राजे व धर्मगुरु यांना लोकांनी त्यांचीं कामें कां करावीं याचा उलगडा सहज करतां येई. ते म्हणत, "आमची योजना खुद्द ईश्वरानें केली असून ईश्वराकडून आम्हांला जें ज्ञान मिळालें तें लोकांस देऊन त्यांवर राज्य करण्याकरतांच आमचा अवतार आहे".

पण आमच्या काळांत जें सुशिक्षित लोक एकीकडें मानव जातीच्या समानतेचें तत्त्व मान्य करूनही काम टाळतात ते व त्यांचीं मुलें (कारण या मुलांना शिक्षण सुद्धा पैशामुळें म्हणजे पर्यायाने सत्तेमुळेच मिळतें.) यांचीच लोकांवर सुसाध्य उपकार करण्याकरितां योजना कां झाली व जें हजारों किंवा लक्षावधि लोक स्वत:च्या उपासमारीने या थोडया लोकांचें शिक्षण शक्य करितात अशा लोकांपैकी कांहींची या जागीं कां योजना होऊं नये, याचा खुलासा त्या सुशिक्षितांना देतां येणें शक्य नाही.

यांचें समर्थन एकच. आम्ही आज ज्या (सत्ता गाजविण्याच्या) परिस्थितींत आहों त्या परिस्थितींत श्रम टाळून व लोकांचें श्रमफल उपभोगून आम्ही लोकांचें जें नुकसान करतों, त्याबद्दल लोकांना अगम्य असे अनेक उपकार आम्हीं त्यांचेवर करतों. व हे उपकार त्यांना समजत नसले तरी यांनी त्यांची पूर्ण नुकसानभरपाई होते.

प्रकरण सत्ताविसावें

जर्या तत्वानुसार कामचोर लोक काम टाळण्याबद्दल स्वतःचें समर्थन करतात तें तत्व नक्की व स्पष्टपणें असें आहे. स्वत:ला कामापासून मुक्त करून घेतलेले आम्ही बळजबरीने लोकांच्या श्रमाचा अपहार करूं शकतों व या परिस्थितीचा उपयोग आम्ही लोकांवर उपकार करण्यांत करतों. किंवा निराळ्या भाषेंत असें: 'कांहीं लोक इतरांच्या श्रमांची जबरदस्तीने लूट करून या इतरांचें जें उघड नुकसान करतात व त्यांच्यावरचा कामाचा बोजा वाढवितात त्याचेऐवजी ते लोकांचें जें भलें करतात तें लोकांना अस्पष्ट व अगम्य असतें.' हा सिद्धान्त खरोखरच विचित्र आहे. पण पूर्वीच्या लोकांप्रमाणें आजही जें लोकांच्या मानगुटीवर बसले आहेत त्यांचा या सिद्धान्तावर विश्वास आहे व याच्या आधाराबर ते आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीचा ससेमिराही टाळतात.

आमच्या समाजांत जें निरनिराळे लोक अशाप्रकारें कामापासून आंग बचावतात ते आपापल्यापरी या तत्वाचें कसें समर्थन करतात तें पाहूं.

मी लोकांची सरकारी अगर धर्मखात्यांतील अधिकारी अगर राजा किंवा प्रधान किंवा धर्मगुरु या नात्याने सेवा करतों; व्यापार अथवा उद्योगधंदा करून मी लोकांच्या उपयोगी पडतों; शास्त्रीय शोध अगर कलानिर्मिति यांच्या साहाय्याने मी लोकांच्या उपयोगीं पडतों. लोकांचे श्रम जसे आम्हांला तसेंच आमचें हें कामही लोकांना तितकेंच अवश्य आहे (असें आमचें म्हणणें असतें).

कामापासून निसटणारे आजकालचे सर्व लोक अशाप्रकारें स्वत:बद्दल खुलासा देतात. त्यांचें हें म्हणणें आपण कलमवारीनें तपासून पाहूं या.

एखाद्याचें काम दुसऱ्यास उपयोगी आहे की नाही याचीं दोन गमकें आहेत. यांपैकी बाह्य गमक असें की, ज्याला उपयोग होतो (असें म्हणण्यांत येतें) त्याला सदर्हू उपयुक्तता मान्य असणें; व दुसरें

पण आमच्या काळांत जें सुशिक्षित लोक एकीकडें मानव जातीच्या समानतेचें तत्त्व मान्य करूनही काम टाळतात ते व त्यांचीं मुलें (कारण या मुलांना शिक्षण सुद्धा पैशामुळें म्हणजे पर्यायानें सत्तेमुळेच मिळतें.) यांचीच लोकांवर सुसाध्य उपकार करण्याकरितां योजना कां झाली व जें हजारों किंवा लक्षावधि लोक स्वत:च्या उपासमारीने या थोडया लोकांचें शिक्षण शक्य करितात अशा लोकांपैकी कांहींची या जागीं कां योजना होऊं नयें, याचा खुलासा त्या सुक्षिशितांना देतां येणें शक्य नाही.

यांचें समर्थन एकच. आम्ही आज ज्या (सत्ता गाजविण्याच्या) परिस्थितींत आहों त्या परिस्थितींत श्रम टाळून व लोकांचें श्रमफल उपभोगून आम्ही लोकांचें जें नुकसान करतों, त्याबद्दल लोकांना अगम्य असे अनेक उपकार आम्हीं त्यांचेवर करतों. व हे उपकार त्यांना समजत नसले तरी यांनी त्यांची पूर्ण नुकसानभरपाई होते.

प्रकरण सत्ताविसावें

जर हा तत्वानुसार कामचोर लोक काम टाळण्याबद्दल स्वतःचें समर्थन करतात तें तत्व नक्की व स्पष्टपणें असें आहे. स्वत:ला कामापासून मुक्त करून घेतलेले आम्ही बळजबरीनें लोकांच्या श्रमाचा अपहार करूं शकतों व या परिस्थितीचा उपयोग आम्ही लोकांवर उपकार करण्यांत करतों. किंवा निराळ्या भाषेंत असें: 'कांहीं लोक इतरांच्या श्रमांची जबरदस्तीने लूट करून या इतरांचें जें उघड नुकसान करतात व त्यांच्यावरचा कामाचा बोजा वाढवितात त्याचेऐवजी ते लोकांचें जें भलें करतात तें लोकांना अस्पष्ट व अगम्य असतें.' हा सिद्धान्त खरोखरच विचित्र आहे. पण पूर्वीच्या लोकांप्रमाणें आजही जें लोकांच्या मानगुटीवर बसले आहेत त्यांचा या सिद्धान्तावर विश्वास आहे व याच्या आधारावर ते आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीचा ससेमिराही टाळतात.

आमच्या समाजांत जें निरनिराळे लोक अशाप्रकारें कामापासून आंग बचावतात ते आपापल्यापरी या तत्वाचें कसें समर्थन करतात तें पाहूं.

मी लोकांची सरकारी अगर धर्मखात्यांतील अधिकारी अगर राजा किंवा प्रधान किंवा धर्मगुरु या नात्याने सेवा करतों; व्यापार अथवा उद्योगधंदा करून मी लोकांच्या उपयोगी पडतों; शास्त्रीय शोध अगर कलानिर्मिति यांच्या साहाय्याने मी लोकांच्या उपयोगीं पडतों. लोकांचे श्रम जसे आम्हांला तसेंच आमचें हें कामही लोकांना तितकेंच अवश्य आहे (असें आमचें म्हणणें असतें).

कामापासून निसटणारे आजकालचे सर्व लोक अशाप्रकारें स्वत:बद्दल खुलासा देतात. त्यांचें हें म्हणणें आपण कलमवारीने तपासून पाहूं या.

एखाद्याचें काम दुसऱ्यास उपयोगी आहे की नाही याचीं दोन गमकें आहेत. यांपैकी बाह्य गमक असें की, ज्याला उपयोग होतो (असें म्हणण्यांत येतें) त्याला सदर्हू उपयुक्तता मान्य असणें; व दुसरें

अंतःस्थ गमक असें की भलें करणाराच्या कृतीच्या बुडाशीं भलें करण्याचीच खरी बुद्धि असावयास पाहिजे.

सरकारी अधिकारी (यांत मी सरकारनें प्रस्थापित केलेल्या धर्मखात्यांतील लोकही जमेस धरतों) हे शासितांवर उपकार करीत असतात (असें म्हणतात).

बादशहा, राजा, लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष, मुख्यमंत्री, न्यायाधीश, सेनापति, शिक्षणमंत्री, धर्मगुरु व त्यांचे दुय्यम हे सर्व जीवनार्थ कलहांतील स्वतःच्या हिश्शाचें काम टाळून व या कामाचा बोजा इतरांच्या बोकांडी बसवून, आम्ही जें लोकांकरितां करतों त्यामुळें या सर्वांची भरपाई होते अशा सबबीवर आपला परोपजीवी कार्यक्रम चालू ठेवतात.

याला आपण पहिलें गमक लावून पाहूं. ज्या कामगार लोकांवर अधिकारी लोकांचा प्रत्यक्षतः अंमल चालतो खुद्द त्या कामगार लोकांना हा राज्यकर्त्यांचा उपकार पटतो काय?

होय. बहुतांश लोकांना सरकारचा कारभार स्वतःसाठी आवश्यक आहे असें वाटतें. पुष्कळांना सरकारचें उपयुक्तत्वही पटतें. पण आपणांस माहीत असलेल्या ज्या अनेक स्वरूपांत लोकांना सरकारचा प्रत्यक्ष प्रत्यय येतो तीं स्वरूपें ज्यांच्या फायद्याकरिता म्हणून सर्व कांही करण्यांत येतें त्या लोकांचा फायदेशीर झाल्याचें ते लोक मुळींच कबूल करीत नाहीत. इतकेंच नव्हे, तर हें (सरकारी) काम विनाशक व भयावह आहे असेंही ते समजतात.

बऱ्याच लोकांना जी हानिकारक वाटत नाही अशी एकही सरकारी अगर सामाजिक हालचाल नाहीच मुळीं. कोणतीही संस्था (विचारांत) घ्या. पुष्कळांच्या मतें ती हानिकारक असते. प्रत्येक संस्थेलाही हानिकारक समजणारे लोक असतातच. कोर्टें, बँका, कौंटी कौंसिलें, डिस्ट्रिक्ट कौंसिलें, पोलिस, पाद्री, किंबहुना उच्चतम सरकारी अधिकाऱ्यापासून तों खेटच खेड्यांतील पटवारी-पोलिसपाटलापावेतों, किंवा धर्मगुरूपासून साध्या भटजीपावेतों सर्वांना कांही लोक आवश्यक तर कांही लोक त्रासदायक समजतात; आणि असें हें रशियांतच आहे असें नव्हे, तर सर्व जगांत—अगदी फ्रान्स अमेरिकेंतसुद्धा—हें असेंच आहे.

अमेरिकेंतील रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक पक्षांपैकी प्रत्येकास दुसऱ्याचा कार्यक्रम लोकांस अहितकारक असा वाटतो. डेमोक्रॅटिक पक्ष अधिकारारूढ

असेल, तर रिपब्लिकन पक्षाला त्या पक्षाचें सबंध कार्य हानिकारक वाटतें.

आणि सरकारचें कोणतेंही कृत्य सर्वांना सारखें फायद्याचें वाटत नाही. इतकेंच नव्हे, तर त्यांत असाही एक विशेष आहे की, सरकारी योजना जबरदस्तीने लोकांवर लादावी लागते. अर्थात या (सरकारी कारभारा) पासून होणारे लाभ मिळविण्यासाठी खून, फांशी, तुरुंग, जबरीची करवसूली इत्यादि सर्व गोष्टी कराव्याच लागतात.

याचा सारांश हा की, सरकारी कामकाज सर्वमान्य नसून कोहींना तें अनिष्ट तर वाटतेंच. पण त्याशिवाय सरकारी अंमलबजावणींत जुलुमाचाही प्रादुर्भाव होतो. म्हणून "ज्यांच्याकरितां आम्ही राजकारण करतों त्यांना तें स्वहिताचें वाटतें," या सबबीवर आमच्या राजकारणाचें समर्थन होणें अशक्य आहे.

आता आपण दुसरें गमक लावून पाहूं या. आपण राजापासून शिपायापर्यंत, अध्यक्षापासून कारकुनापर्यंत, किंवा धर्मगुरूपासून साध्या भटजीपावेतों सर्वांना पुढील प्रश्न विचारूं व सदसद्विवेकबुद्धीला स्मरून उत्तर देण्यास त्यांना विनंती करूं. ज्यावेळीं ते स्थानापन्न होतात तेव्हा ते ज्या फायद्याचें वर्णन करून सांगतात तो लोकांचा फायदा करून देण्याचा खरोखर त्यांचा उद्देश असतो की निराळाच कांही उद्देश असतो ? राजा, अध्यक्ष, प्रधान, गांवशिपाई, भटजी अगर शाळामास्तर बनतांना त्यांना लोकांचें कल्याण करण्याची खरी इच्छा असते की, स्वत:च्या फायद्याकडेच त्यांचें लक्ष असतें ?

आणि प्रामाणिक माणसें हेंच उत्तर देतील की, आमच्यापुढे आमचा स्वत:चाच फायदा मुख्यत्वेंकरून असतो.

याचा अर्थ असा की, कामाच्या वोजाखाली मरणाऱ्या लोकांच्या श्रमफलाची समाजांतील एक वर्ग लूट करीत असतो व त्याच्या बदलीं तो स्वत: जें काम करितो तें पुष्कळांच्या मतें उपयोगाचें तर नाहीच पण हानिकारक असतें; आणि हें उपयुक्त(?) काम लोक आपखुशीने स्वीकारीत नसून तें त्यांच्यावर जबरीने लादावें लागतें आणि जे लोक हें काम पत्करतात त्यांचा त्यांतील हेतु लोकांचें कल्याण करण्याचा नसून स्वत:चा स्वार्थ साधण्याचा असतो.

असें असतां सरकारी कामकाज लोकांच्या हिताचें असतें हा समज बळावतो याचें कारण काय ?

याचें कारण इतकेंच की जें लोक हा कारभार चालवितात त्यांची अशी पक्की खात्री झालेली असते की हा लोकांच्या कल्याणाचा आहे व अनादिकालापासून हा असाच चालत आला आहे. पण गुलामगिरी, वेश्याबाजी, लढाया अशासारख्या निव्वळ व्यर्थच नव्हे तर नक्की अपायकारक अशाही पुष्कळ संस्था पूर्वापार रूढ आहेत. कारखानदार, रेल्वेवाले, पेढीवाले, जमीनदार या व इतर सर्व उद्योगधंदे-वाल्यांचा असा समज असतो की स्वतःच्या परोपजीविपणाने लोकांचें ते जें निश्चित नुकसान करतात त्याची ते पूर्ण भरपाई करीत असतात.

त्यांची अशी भावना असण्याचीं कारणें कोणतीं ?

"तुमची कामगिरी कोणाला संमत आहे ?" या प्रश्नाला उत्तर देतांना सरकारी कामगार व धर्मखात्यांतील लोक ज्यांना सरकार व धर्मखातें असावें असें तत्वतः वाटतें अशा लक्षावधि कामगारांकडे बोट दाखवूं शकतात. पण पेढीवाले किंवा दारू, गालिचे, पुतळे, आरसे, किंवा तोफा यांचे कारखानदार कोणाकडे बोट दाखविणार ? तुम्ही लोकांवर जे उपकार करतां ते कोणास मान्य आहेत असें व्यापाऱ्यांस व जमीनदारांस विचारल्यास ते कोणाकडें अंगुलिनिर्देश करणार ? चीट, रेल्वेरूळ, दारू व अशाच इतर जिन्नसा उपयुक्त आहेत असें समजणारे कांही लोक जरी असले, तरी या गोष्टींना अपायकारक समजणारेही यांच्यापेक्षा किती तरी जास्त लोक दाखवितां येतील. मालाच्या किंमती वाढविणारे व्यापारी आणि जमीनदार यांच्या कार्याची तर कोणीच तरफदारी करणार नाही. शिवाय हीं सर्व कामें कामगाराला हानिकारक असून हीं बळजबरीशीं संलग्न असतात. ही व्यापारी जबरदस्ती सरकारी जबरदस्तीइतकी रोखठोख नसली तरी परिणामीं मात्र तितकीच भयंकर असते. कारण व्यापारउदिमांतही लोकांच्या गरजवंतपणाचा हरतऱ्हेने फायदा घेण्याचेंच धोरण असतें. लोकांच्या गरजूपणाचा त्यांना न आवडणारीं व अवघड कामें करण्यास भाग पाडण्याकडे उपयोग करणें, गरजवंतांकडून पडत्या भावांत माल घेऊन त्यांना अवश्य असणाऱ्या जिन्नसा भलत्या किंमतीला विकणें व उधार दिलेल्या पैशावर व्याज आकारणें अशा निरनिराळ्या रीतीने गरजवंतांचा फायदा घेण्यांत येतो. या खटाटोपाकडे कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी उद्योगधंदेवाले ज्यांची सेवा करतों असें

म्हणतात त्यांपैकी कोणालाही ती तत्वत: अगर विशिष्ट बाबतींतही पटत नाही असें दिसतें व बव्हंशीं तिला हानिकारकच समजण्यांत येतें.

दुसरें गमक लावून आपण असें विचारलें की, या व्यापार–उदीम-वाल्यांचा खरा उद्देश कोणता ? तर याचें उत्तर सरकारी कामगारांच्या बाबतींत मिळालें त्यापेक्षाही अधिक स्पष्टपणें (स्वार्थ असेंच) येतें.

एखादा सरकारी अधिकारी जर म्हणेल की, स्वार्थाबरोबरच लोक-सेवा हाही माझा उद्देश आहे तर त्यावर विश्वास ठेवावा लागेल, व अशासारखे कांही (सरकारी) लोक आपल्या परिचयाचेही असतात. पण उद्योगधंदेवाल्यांच्या अस्तित्वाचें कारणच इतकें स्पष्ट आहे की,लोकहिताचें ध्येय त्यांचे बाबतींत मुळीच संभवत नाही. स्वसंपत्तिरक्षण व संपत्तीची वाढ या उद्देशाखेरीज इतर कोणत्याही उद्देशाने जर तो धंदा करूं लागला तर त्याचे सोबती त्याला मूर्खांत काढतील.

याचा अर्थ असा की, उद्योगधंदेवाल्यांचीही खटपट कामगार लोक आपल्या हिताची अशी समजत नाहीत.

उद्योगधंद्यामध्ये कामगारावर नेहमी बळजबरी करण्यांत येते. व हिचा उद्देश लोकहित नसून शुद्ध स्वार्थ असतो. असें असूनही आश्चर्य हें की, उद्योगधंदेवाल्यांना मात्र आपलें काम लोकहितावह असल्याबद्दल इतका दृढ विश्वास असतो की, हें काल्पनिक हित साधण्याच्या मागे लागून ते स्वत:च्या हिंश्शाचे श्रम टाळतात व लोकांच्या श्रमफलावर जगून त्यांचें नुकसान मात्र हमखास करतात.

वैज्ञानिक व कलावंत हेही आपण लोकांची नुकसानभरपाई करतों अशा भ्रमांत राहून नि:शंक मनाने स्वत:वरचा कामाचा बोजा टाळून इतरांच्या परिश्रमाचा उपभोग घेत असतात.

यांची देखील अशी पक्की समजूत कशामुळे झाली ? सरकारी अधिकारी व व्यापारी–कारखानदार यांना आपण जो प्रश्न विचारला तोच प्रश्न वैज्ञानिक व कलावंत यांनाही आपण विचारूं या ! कामकरी लोकांना–निदान बव्हंश कामगारांना–वैज्ञानिकांची कामगिरी पटते काय?

याचें उत्तर फारच खेदजनक मिळेल.राज्यकर्ते व धर्मगुरु यांचें अस्तित्व निदान तत्वत: तरी बहुतेक सर्व लोकांना उपयुक्त वाटत असतें,व प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टीनेसुद्धा ज्यावर त्याचा प्रत्यक्ष परिणाम होतो त्या

कामगारांपैकी अर्ध्या अधिक लोकांना ती अंमलबजावणी मान्य होते. उद्योग-धंदेवाल्यांचें काम कांही मूठभर (जे त्यांवर उपजीविका करूं शकतात) लोकांना तरी फायदेशीर वाटतें. पण या वैज्ञानिकांचें काम तर कोणताही कामगार उपयुक्त म्हणून कबूल करीत नाही. या कार्याची उपयुक्तता जें यांत गुंतलेले असतात व ज्यांना स्वत:ला हें खातें चालावें असें वाटतें त्यांनाच काय ती पटते. ज्या कामकऱ्यांवर या वैज्ञानिकांना अन्नवस्त्र पुरविण्याची अखिल जबाबदारी पडते त्या कामकऱ्यांना यांच्या कामगिरीची उपयुक्तता मुळीच पटत नाही. कारण स्वत:ला उपयुक्त असलेल्या या शास्त्रांची त्रिचाऱ्या कामगारांना काडीमात्र कल्पना नसते. ही (शास्त्रज्ञांची) कामगिरी कामगारांना व्यर्थ, इतकेंच नव्हे तर माणसाला भ्रष्टविणारी, अशी वाटते.

विश्वविद्यालयें, पुस्तकालयें, लतागृहें, चित्रशाला, नाटकगृहें इत्यादि जीं कामें कामगारांच्या जिवावर उभारण्यांत येतात त्या सर्वांकडें कामगार याच दृष्टीने पाहतो. कामगाराला या खटपटी इतक्या नक्की हानिकारक वाटतात की, तो आपल्या मुलांस शाळेंतसुद्धा पाठवीत नाही. आणि आमची ही (शैक्षणिक) चळवळ लोकांवर लादण्याकरितां सक्तीच्या शिक्षणाचे जेथे तेथे कायदे करावे लागत आहेत. कामगार या चळवळीकडें कान टवकारून व विरोधदृष्टीनेच पाहतो व जोंपावेतों तो मजूर असेल तोंपावेतों त्याला असेंच वाटणार. पैसे गोळा करून व नंतर "शिक्षण" घेऊन तो स्वत: हळूहळू कामगारांतून निसटून लोकांच्या मानगुटीवर बसणारांत मोडूं लागला म्हणजें मात्र त्याची ही दृष्टि बदलेल. वैज्ञानिक व कलावंताच्या कामाला कोणी कामगार पुसत नाही व पुसणें शक्य नाही. पण असें असलें तरी कामगारांना मात्र शास्त्र व कला याकरितां झीज सोसावी लागतेच.

सरकारी अधिकारी एखाद्याला सरळ तुरुंगांत डांबतो अगर फांसावर लटकावतो. व्यापारी, कामगाराचे श्रम लुबाडून त्याला सर्वस्वीं नागवतो व उपासमार किंवा प्राणघेऊ काम यांपैकी कशाची तरी निवड करणें त्याला भाग पाडतो. पण शास्त्रज्ञ व कलावंत मात्र अशी सक्ती करतांना दिसत नाहीत. ते आपला माल पुढें करून इच्छेस येईल त्याने तो घ्यावा असें म्हणतात. पण हा त्याचा माल कामगारांस नको असूनही सरकारी

मदतीने शास्त्रज्ञ अगर कलावंत कामगारांपासून त्यांच्या कमाईचा बराच भाग विद्वत्परिषदा, विश्वविद्यालयें, हायस्कुलें, प्रायमरी शाळा, अजबखाने, पुस्तकालयें, गायनसमाज इत्यादींच्या स्थापन–संवर्धनार्थ व स्वत:च्या उदरंभरणार्थ लुबाडतोच.

जर शास्त्रज्ञ व कलावंत यांनाच त्यांचा उद्देश विचारला तर मोठीं आश्चर्यकारक उत्तरें देण्यांत येतात. सरकारी नोकर जर म्हणेल की, मी लोकसेवा करतों, तर त्यांत थोडेसें तथ्य असतें व लोकांनाही तसें वाटतें. उद्योगधंदेवाला म्हणेल की, सामान्य लोकांचें हित हा माझा उद्देश आहे तर, त्यांत सत्यांश कमी असण्याचा संभव असला तरी, तोही कदाचित मान्य करतां येईल.

पण शास्त्रज्ञांचें उत्तर मात्र कल्पनातीत घिटाईचें व अजीबात सिद्ध न झालेलें असें असतें.

आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ कांहीही प्रमाण न देतां, पूर्वीच्या धर्मगुरूंप्रमाणेंच, आजचे शास्त्रज्ञ व कलावंत म्हणतात की, त्यांचें काम इतर सर्व कामांपेक्षा अधिक महत्त्वाचें व आवश्यक असून त्यांच्या कामगिरीच्या अभावी अखिल मानवजातीचा नाश होईल. शास्त्रज्ञ–कलावंतांचें काम त्यांच्या स्वत:खेरीज इतर कोणासही उमजत अगर पटत नाही, आणि खरें शास्त्र व खरी कला यांनी उपयुक्ततेवर दृष्टि ठेवतां कामा नये, अशी तर खुद्द त्यांचीच शास्त्र–कला यांची व्याख्या आहे. पण असें असूनही आपल्या आवश्यकतेचा नगारा जोराने वाजविण्यास ते चुकत नाहीत. शास्त्रज्ञ व कलावंत आपले आवडतें काम करीत असतां, कोणास त्याचा किती उपयोग आहे याचा बिलकुल विचार करीत नाहीत; तरी त्यांची ही मात्र खात्री असतेच की, आपण जे करतों तें यच्चयावत् मनुष्यमात्रास उपयोगी व अवश्य आहे. याचा परिणाम असा की, बिचारा सरकारी नोकर नोकरी करीत असतां, आपण स्वार्थाने प्रेरित होऊन हें करितों हें कबूल करून, लोकांच्या शक्य तितक्या उपयोगीं पडण्याचा प्रयत्न करतो; व्यापारी आपला स्वार्थ कबूल करून आपल्या व्यवहाराला सार्वजनिक उपयुक्ततेचें बाह्यत: स्वरूप देण्याचा तरी यत्न करितो; पण शास्त्रज्ञ व कलावंत यांना तर या उपयुक्ततेच्या देखाव्याचीसुद्धा गरज वाटत नाही. ते उप-

युक्ततेचा उद्देशच मुळीं साफ भिरकावून देतात. त्यांच्या वामगिरीच्या केवळ उपयुक्ततेबद्दलच नव्हे तर पावित्र्याबद्दल त्यांना इतका (जबर) आत्मविश्वास असतो.

अशा प्रकारें हे तिसऱ्या प्रकारचे लोक स्वत:वरचे कष्ट टाळून ते दुसऱ्यावर लादतात व कामगारांना मुळीच समजणार नाही अशा गोष्टीं. मध्ये स्वत: गुंततात. कामगार लोक यांच्या कृतीला एक अपायकारक खूळ समजतो, पण हे मात्र, लोकांच्या उपयोगी पडण्याचा विचार बिलकुल मनांत न आणतां, केवळ स्वत:च्या खुशालीकरितांच आपलें काम करीत असतात. कांही कारणामुळे त्याचा असा ठाम ग्रह झालेला असतो की, त्यांचें काम कामगारांच्या जीवनास आवश्यक असतें.

कांही माणसांनी आपल्या हिश्शाचें काम टाळून तें कायमचें इतर लोकांवर लादल्यामुळें, हे दुसरे काम करतांना मृत्युमुखीं पडत आहेत. कांही लोक श्रमजीवींचें श्रमफल लुबाडून स्वत: जो उद्योग करतात त्याचा अर्थ (लुबाडलें जाणाऱ्या) कामगारांना समजत नाही, व तो त्यांच्या उपयोगाकरितां सुरू केलेलाही नसतो; तथापि निर्वाहाच्या कष्टांतून स्वत:ची सुटका करून घेऊन दुसऱ्यांच्या कष्टांवर जगण्याने आम्ही त्यांची जी नुकसानी करितों ती नुकसानी आपल्या उद्योगामुळे आम्ही भरून काढतों असें मात्र ते आग्रहपूर्वक प्रतिपादितात.

सरकारी नोकर, स्वत: निसर्गप्राप्त कष्ट चुकवून व लोकांचें श्रमफल लुबाडून लोकांचें जें नवकी नुकसान करतात, त्याची भरपाई करण्याकरितांच जणूं काय त्याला जुलुमजबरदस्तीची स्पष्टपणें व नि:संशय त्रासदायक अशी जोड देतात.

उद्योगधंदेवाले स्वत:च्या हिश्शाचे श्रम दुसऱ्यावर लादून जें स्पष्ट नुकसान करतात त्याची (त्यांच्या मतें) भरपाई करीत असतां वाढत्या प्रमाणांत लोकांजवळून शक्य तितकी संपत्ति लुबाडतात, अर्थात् शक्य तितकें लोकांचें श्रमफल हिरावून घेतात.

शास्त्रज्ञ व कलावंत, कामकरी लोकांचें जें नवकी नुकसान करतात, त्याची भरपाई म्हणून ते जो उद्योग करतात तो कामगारांना मुळी समजतच नाही, व त्यांचा उद्योग केवळ स्वत:च्या आवडीनुसार आरंभलेला असून

तो जातिवंत निपजण्यास उपयुक्तता हें त्यांचें ध्येय असतां कामा नयें असेंच त्यांचें म्हणणें असतें.

अशा रीतीने हे सर्व लोक स्वतःची खात्री करून घेतात की, लोकांचें श्रमफल लुबाडण्याचा त्यांचा जो हक्क तो दुर्भेद्य आहे.

ही गोष्ट तर उघड दिसते की, अशा प्रकारें कामचोरी करून लोकांचें श्रमफल लुबाडण्याचा यांपैकी कोणासही हक्क नाही; पण आश्चर्याची गोष्ट ही की, त्यांना आपल्या खरेपणाबद्दल आत्यंतिक खात्री वाटत असून त्यांच्या विशिष्ट जीवनक्रमाबद्दल त्यांना मुळीच खंत वाटत नाही.

या अनर्थावह भ्रमाच्या मुळाशीं, खोटें कां होईना, पण एखादें तत्व असलेंच पाहिजे.

प्रकरण अठ्ठाविसावें

आणि खरोखरच दुसऱ्यांच्या कष्टांवर जगणाऱ्या या आळशांच्या जीवनक्रमाच्या बुडाशी एखादी समजूतच नव्हे, तर संपूर्ण मीमांसा आहे. आणि एक का ? या जीवनक्रमामागे मीमांसांची त्रयी असून कालावधीने एकींतून दुसरी व दुसरींतून तिसरी असा या मीमांसात्रयीचा उगम झाला आहे व यांच्या मिलाफाने जें एक जंगी खूळ तयार झालें त्या खुळाने आळशांच्या सर्व अन्यायी जीवनक्रमावर पांघरूण पडतें.

आमच्या या जगांत जीवनार्थ करावयाच्या कष्टांना टाळा देण्याच्या प्रवृत्तीचें समर्थन करणारी सर्वांत जुनी मीमांसा ख्रिस्ती धर्माने प्रतिपादिलेली होय. या मीमांसेनुसार माणसांतले भेद मुळापासूनच व ईश्वरइच्छेनुसार निर्माण झाले आहेत. जसे सूर्य व चंद्र निराळे, किंवा तारे जसे परस्परांहून भिन्न होत, त्याप्रमाणें माणसांतही कांहींना इतर सर्वांवर राज्य करण्याकरितां नेमलें आहे. कांहींची सत्ता बऱ्याच जणांवर चालावी, कांहींची फारच थोड्यांवर चालावी अशी ईश्वरी योजना असून कांहींना फक्त हुकुम पाळण्याकरितांच ईश्वराने निर्माण केलें आहे.

या तत्त्वाचा बोजवारा केव्हाच उडाला आहे, तरी मानवी मनाच्या जडतेमुळे अजूनही थोड्या प्रमाणांत तें रूढ आहेच. परिणाम असा की, बऱ्याच लोकांना हें मान्य नसलें, किंबहुना तें माहीतही नसलें, तरी या तत्त्वाबरहुकूम ते आचरण मात्र करतात.

या समर्थनात्मक तत्त्वांपैकी दुसऱ्याला 'राजकीय तत्त्वज्ञानात्मक समर्थन' याशिवाय इतर एखादें नांव देतां येईल असें वाटत नाही. हें तत्त्वज्ञान हेगेलने पुढे माडलें. या तत्त्वज्ञानाप्रमाणें "जें आहे तें योग्य आहे, व समाजरचनेचा जो प्रकार आपणांस दिसतो त्याला मनुष्यप्राणि जबाबदार नसून, आत्म्याच्या व्यक्तीकरणास किंवा सामान्यतः मानवजातीच्या जीवनास अवश्य असा हा एकच प्रकार आहे व मानवी जीवनास सदर व्यवस्था अपरिहार्य आहे". याही तत्त्वावर आमच्या आजच्या समाजधुरीणांचा विश्वास नाही. पण हेंही निव्वळ अगतिमानत्वामुळे अजून जिवंत आहे.

तिसरें तत्त्व मात्र सध्या जोमांत असून, शास्त्रज्ञ व कलावंत सध्या जें समर्थन पुढे मांडीत आहेत, तें याच तत्त्वावर अधिष्ठित झालेलें आहे. हें तत्त्व निवळ 'ज्ञान' या अर्थी 'शास्त्रीय' नसून 'विशिष्ट विषयाचें विशिष्ट स्वरूपाचें ज्ञान' या अर्थी तें 'शास्त्रीय' आहे.

ज्या समर्थनामुळे आळशी लोकांच्या कर्तव्यपराङ्मुखतेवर पांघरूण घातलें जातें त्या समर्थनाच्या बुडाशी हा नवा शास्त्रीय सिद्धान्त आहे.

अगदी थोडया दिवसांपूर्वी, म्हणजे फ्रान्समध्ये राज्यक्रान्ति होईपावेतों, युरोपमधील एखाद्याला जर दुसऱ्याचें श्रमफल बळकावण्याचा हक्क प्राप्त व्हावा अशी इच्छा असेल तर त्याला धर्मखातें अगर सरकार किंवा सैन्य यांत कोठे तरी नोकरी असावी लागे. सरकारी नोकर लोकांवर राज्य करीत, धर्मखात्यांतील अधिकारी लोकांना तत्त्वज्ञान सांगत, व सैन्य लोकांचें संरक्षण करीत असे.

अशा प्रकारें पाद्री, राज्यकर्ते व सैनिक या तीन प्रकारच्या लोकांनाच आपणास लोकांना लुबाडण्याचा हक्क आहे असे वाटे, व ते लोकांकरितां काय करीत हें त्यांना सांगतां येई. इतर श्रीमंतांना तशा रीतीने स्वत:चें समर्थन करतां येत नसे म्हणून लोक त्यांचा तिरस्कार करीत व या जाणिवेमुळे त्यांनाही स्वत:च्या आळसाची व श्रीमंतीची लाज वाटे.

पण पुढे असा काळ आला की, वरील तीन वर्गांमधील कांही दोषांमुळेच या तीन्हीपैकी एकाही वर्गांत न मोडणारा हा श्रीमंत वर्ग वाढून बलिष्ठ झाला. या नव्या (श्रीमंत) लोकांनाही स्वसमर्थनाची गरज भासूं लागली व लगेच नवें समर्थन पुढे आलेंही.

एक शतकसुद्धा लोटलें नाही तोंच राजसेवक व धर्मपुरोहित यांचेपेक्षा वेगळ्या अशा वर्गाने (वैश्यांनी) लोकांचें श्रमफल लुबाडण्याचा हक्क तर मिळविलाच, पण पूर्वीप्रमाणें त्यांना स्वत:च्या श्रीमंतीची व आळसाची लाज वाटण्याचेंही बंद होऊन त्यांना आतां स्वत:चा जीवनक्रम अगदी वाजवी आहे असें वाटूं लागलें. आमच्या ह्या काळांत यांची संख्या भयंकर वाढली असून तींत प्रत्यहीं भरच पडत आहे. आणि आश्चर्य हें की, थोडयाच दिवसांपूर्वी ज्यांची कष्टांपासून अलिप्त राहण्याची वृत्ति समर्थनीय वाटत नव्हती, ते आता फक्त आपला एकटयाचा आयुष्यक्रम,

पूर्णपणें न्याय्य आहे असें समजत असून, इतर तीन वर्गांवर—धार्मिक, राजकीय व लष्करी सेवकांवर—ते सडेतोड टीकाही करितात; त्यांच्या मतें या तिघांनी श्रम टाळणें अन्यायाचें असून त्यांचा उद्योग हे अपायकारकही समजतात.

आणि याहूनही आश्चर्याची गोष्ट अशी की, पूर्वीचे सरकारी अगर धर्मखात्यांतील नोकर किंवा सैनिक ज्या तत्त्वांनुसार आत्मसमर्थन करीत त्या तत्त्वांना उ०त्यांच्या व्यवसायांचें ईश्वरप्रणीतत्त्व, व्यक्तित्वप्रदर्शन या नात्याने सरकारचें तात्त्विक महत्त्व, इत्यादींना स्वत:च झुगारून देऊन, शास्त्रज्ञ व कलावंतांच्या नेतृत्वाखाली जें नवें समर्थन पुढे आलें आहे, त्याची ते कांस धरूं लागले आहेत. एखादा सरकारी अधिकारी पूर्वापार संवयीमूळे जर म्हणूं लागला की, त्याला ईश्वराने नियुक्त केलें आहे, किंवा राज्यसंस्था ही व्यक्तित्वाची एक विकसित अवस्था आहे, तर असें समजावें की तो जुन्या काळांतच वावरत आहे व आपल्या म्हणण्यावर कोणी विश्वास ठेवणार नाही असेंच त्याला मनांतून वाटत आहे. आतां त्याला धार्मिक अगर तत्त्वज्ञानी समर्थन पुढे करून भागत नाही; तर त्याला नवें व शास्त्रीय तत्त्व पुढे करावें लागतें. राष्ट्रीकरणाचें तत्त्व किंवा जीवांच्या विकासाचें तत्त्व अशांसारखीं तत्त्वें पुढे आणून, मध्यकालीन माणसाला जशी धर्मगुरूंची, किंवा १८ व्या शतकाचे शेवटीं फ्रेड्रिक दि ग्रेट किंवा कॅथरीन दि ग्रेट यांच्यासारख्या व्यक्तींना जशी तत्त्वज्ञान्यांची हाजीहाजी करावी लागे, तशी याला आज वरचष्मा असणाऱ्या वर्गांची हांजीहांजी करावी लागते.

सध्याच्या काळीं जर एखादा श्रीमंत माणूस, जुन्या संवयीमुळें, आपण ईश्वरी इच्छेनुसार श्रीमंत आहोंत, अथवा राष्ट्रकल्याणाकरितां अमीरउमरावादि पिढीजाद श्रीमंत वर्गाची गरज आहे असें उद्‌गार काढूं लागला, तर तो जुनाट आहे (असा अर्थ होईल). त्याला स्वत:चें परिणामकारक समर्थन करावयाचें असेल, तर त्याने आता आपण उत्पादनाच्या क्रिया सुधारून, जिन्नसा स्वस्त करून, अथवा आंतरराष्ट्रीय दळणवळणाला मदत करून, संस्कृतीच्या वर्धनाला कसे कारणीभूत होत आहोंत हें सांगितलें पाहिजे. श्रीमंताने शास्त्राची भाषा वापरून, पूर्वी जसा धर्मगुरू. करितां स्वार्थत्याग करण्यांत येई, तसा या शास्त्रज्ञांकरितां स्वार्थत्याग करावयास पाहिजे. त्याने वर्तमानपत्रें, पुस्तकें प्रसिद्ध करावीं, किंवा चित्र-

शाळा, पुस्तकालयें, संगीतसंस्था स्थापण्या किंडरगार्टन अथवा विशिष्ट शिक्षणक्रमाच्या शाळांची योजना करादी.

हा सध्या वरचष्मा असलेला वर्ग म्हणजे एका विशिष्ट प्रवृत्तीचे शास्त्रज्ञ व कलावंत यांचा होय. पूर्वी जसें धर्मशास्त्राच्या अगर तत्त्वज्ञानाच्या आधारावर (कामचोरीचें) समर्थन अधिष्ठित असे, त्याप्रमाणे आजतें या शास्त्रज्ञांच्या समर्थनावर अधिष्ठित आहे. आज "शास्त्रज्ञ"च कामचुकारपणाचे परवाने देऊं शकतात.

आज फक्त शास्त्रज्ञांजवळच त्यांच्या कामचोरीचें भक्कम समर्थन आहे व या शास्त्रज्ञांत विशेषेंकरून प्रायोगिक आधिभौतिकवादी, विचक्षक, व उत्क्रांतिवादी शास्त्रज्ञ आणि अशाच प्रवृत्तीचे कलावंत यांचा समावेश होतो.

एखादा शास्त्रज्ञ अगर कलावंत जर जुन्या प्रवृत्तीनुसार आज भविष्य, साक्षात्कार, किंवा अवतार इत्यादिविषयीं बोलूं लागला, तर हा फारच मागसलेला असून याला आत्मसमर्थन करतां येत नाही असें समजावें. त्याला स्वतःचें समर्थन करावयाचें असेल तर त्याने आपल्या उद्योगाचा संबंध प्रायोगिक, आधिभौतिक अथवा विचक्षक शास्त्राशी जोडून त्या शास्त्राच्या पायावर आपला व्यवसाय आधारलेला आहे, असें प्रतिपादन केलें पाहिजे.

असें होईल तरच त्याने पत्करलेलें काम वाजवी ठरेल व त्याचें बूड कायम होऊन तो मानवजातीवर उपकार करीत असल्याबद्दल त्याला शंका राहणार नाही.

आजकाल ज्या लोकांनी श्रमांपासून स्वतःची सुटका करून घेतली आहे त्यांचें समर्थन प्रायोगिक, विचक्षक व आधिभौतिक शास्त्रावर अधिष्ठित आहे.

पूर्वीचा धार्मिक व तत्त्वज्ञानी समर्थनें आता टाकाऊ ठरलीं असून स्वतःचा उल्लेख तीं लाजत व भीतभीतच करतात, आणि तीं स्वतःचें शास्त्रीय समर्थनामध्ये रूपांतरही करण्याचा प्रयत्न करतात. पण 'शास्त्रीय' समर्थन मात्र या जुन्या समर्थनांच्या अवशेषांचा स्वतःच धुव्वा उडवतें व सर्वत्र यांना नामोहरम करून अजिक्यत्वाच्या तोऱ्याने स्वतःचें डोकें वर काढतें.

धार्मिक समर्थन

गुणकर्मविभागशः कांही लोकांकडे हुकमत तर कांही लोकांच्या कपाळीं सेवा येते, व कांहींना सुबत्ता तर कांहींच्या कपाळीं दैन्य येतें. म्हणून ज्यांचा ईश्वराच्या सृष्टिकर्तृत्वावर भरंवसा असेल त्यांनी,

ईश्वरी इच्छेनुसार सत्ता गाजदिण्यासाठी व श्रीमंतीचा उपभोग घेण्यासाठी ज्यांची योजना झालेली असते त्यांच्या स्थितीच्या वाजवीपणाबद्दल शंका घेणें अशक्य आहे.

राजकीय तत्त्वज्ञानावर आधारलेलें समर्थन :

राज्यसंस्था व तिच्याशी सलग्न असणाऱ्या सर्व लहान संस्था, आणि भिन्न भिन्न हक्क व संपत्ति असणाऱ्या लोकांच्या उच्च नीच श्रेणी, हीं सर्व मानव जातींतील सारभूत सत्त्वाच्या आविष्करणार्थ कालगतीनुसार प्राप्त झालेलीं स्वरूपें होत. म्हणून हक्क व मालमत्ता यांच्या बाबतींत समाजांत प्रत्येकाला जो अवस्था प्राप्त झालेली आहे, ती अखिल मानवजातीचें जीवन वाजवी रीतीने चालावें यासाठी, जशीच्या तशीच कायम राहणें अवश्य आहे.

शास्त्रीय समर्थन :

शास्त्रज्ञांचा सिद्धान्त असें म्हणतो की, बाकीचीं सर्व समर्थनें वेडगळ व अर्थशून्य आहेत. त्यांतील पहिलें धर्माचा वरचष्मा असलेल्या काळांतील व दुसरें तत्वज्ञानी काळांतील विचारांचा परिपाक होय. मानवी समाजाच्या जीवनाचे जे नियम त्यांचा अभ्यास करण्याची खरीखुरी पद्धत एकच – ती म्हणजे भौतिक, प्रायोगिक व चिकित्सक शास्त्राची होय. जीवशास्त्र आणि इतर सर्व भौतिक शास्त्रें, यांवर आधारलेलें जें समाजशास्त्र त्यापासूनच आपल्याला मानवी जीवनाचे नियम जाणून घेतां येतील. मानवी समाज हे सेंद्रिय जीवांसारखे बनलेले अगर बनण्याच्या क्रमामध्यें असलेले रचनाप्रकार असून सेंद्रिय जीवांच्या विकासाचे जे नियम ते सर्व त्यांना लागू आहेत. या नियमांपैकी एक प्रमुख नियम म्हटला म्हणजे सेंद्रिय जीवाच्या अवयवांमधील 'श्रमविभाग' हा होय. समाजांतील कांही लोक सत्ता गाजवीत असले व इतर सत्ता पाळीत असले, कांही लोक श्रीमंतींत लोळत असून कांही दारिद्र्यांत खितपत असले, तर हा सर्व प्रकार ईश्वरी इच्छेमुळे, अगर राज्यसंस्था हें एक मानवी आत्म्याचें आविष्करण असल्यामुळे होत नसून, सेंद्रिय जीवाप्रमाणेंच मानवी समाजांमध्येंही श्रमविभाग अस्तित्वांत आहे, व तो समाजाच्या जीवनाला आवश्यक आहे, या कारणामुळेच घडून येत आहे. हा श्रमविभाग म्हणजे असा की, समाजांतील कांही लोक शरीरकष्टाचें काम करितात व कांही मेंदूचें काम करितात.

या सिद्धान्तावर आत्ताच्या आजच्या रूढ समर्थनाचा सर्व पाया रचला गेला आहे.

प्रकरण एकोणतिसावें

येशू ख्रिस्ताची एक नवी शिकवण ख्रिस्ती धर्मग्रंथांत नमूद आहे. ही शिकवण मान्य करण्याऐवजी तिची ओढाताण करण्यांत येते आणि पहिला माणूस व पहिला देवदूत यांच्या पतनाची एक नवलकथा कल्पनेनें रचिली जाते. ही नवी कथा, हीच येशूख्रिस्ताची खरी शिकवण म्हणून स्वीकारिली जाते. (या कथेचा) हा शोध खुळचट व सर्वस्वी निराधार असला तरी, वाटेल तसें वागूनही, माणसाला येशू ख्रिस्ताच्या शिकवणीचें पालन केल्याचें समाधान मिळणें शक्य आहे, हें जें या (कथे)पासून निघणारें अनुमान, तें न्यायनीतीचा तिटकारा असलेल्या दुर्बळ मनाच्या जनसमूहाच्या इतकें पथ्यावर आहे की, या नव्या खुळाला ते एकदम सत्य म्हणून कवटाळतात. इतकेंच नव्हे तर दैवी, साक्षात्कृत सत्य म्हणून त्याची महती गातात. परंतु धर्मग्रंथांचा 'दैवी वाणी' म्हणून जो भाग मानिला आहे, त्यांत याचा मागमूसही नाही. तरीही सुमारें हजार वर्षें या नव्या शक्कलीवर विद्वान् धर्माभिमान्यांनी आपली बुद्धिमत्ता खर्चून निरनिराळे सिद्धान्त रचिले.

या धर्मशिक्षकांत निरनिराळे पंथ उत्पन्न होतात व ते एकमेकांस खोडून टाकण्याचा प्रयत्न करतात. पुढे त्यांना स्वतःलाच घोंटाळा उडाल्यासारखा वाटतो व ते काय म्हणतात हें त्यांनाच उमजत नाही. आपल्याला विशेष आवडणाऱ्या तत्त्वाला त्यांनी मान्यता द्यावी अशी समाजाची अपेक्षा असते, व त्याप्रमाणें धर्मगुरु ती देतातही; व ते ज्ञातेपणाचा आव आणून व स्वतःच्या म्हणण्यावर स्वतःचा पूर्ण भरंवसा आहे असें नाटक करून त्या तत्त्वांचा उपदेश चालू ठेवतात. पुढे कांही कालानंतर या धर्मशिक्षकांच्या अनुमानाची गरज उरत नाही व समाज यांच्या 'पवित्र' मठांत डोकावून पाहूं लागतो. असें करतांच समाजाला दिसून येतें की, तेथे दैवी ज्ञान इत्यादि कांही नसून सर्व निव्वळ टकबाजीचा प्रकार आहे. समाज चकित होतो व स्वःतच्या अंधळेपणाबद्दल त्याचें त्यालाच नवल वाटूं लागतें.

तत्त्वज्ञानाचीही अवस्था अशीच झाली. हें तत्त्वज्ञान म्हणजे कानफ्यूसिअस, साक्रेतीस अथवा एपिटेक्टस यांनी सांगितलेलें (खरें) शहाणपण

ईश्वरी इच्छेनुसार सत्ता गाजविण्यासाठी व श्रीमंतीचा उपभोग घेण्यासाठी ज्यांची योजना झालेली असते त्यांच्या स्थितीच्या वाजवीपणाबद्दल शंका घेणें अशक्य आहे.

राजकीय तत्त्वज्ञानावर आधारलेलें समर्थन :

राज्यसंस्था व तिच्याशी सलग्न असणाऱ्या सर्व लहान संस्था, आणि भिन्न भिन्न हक्क व संपत्ति असणाऱ्या लोकांच्या उच्च नीच श्रेणी, हीं सर्व मानव जातींतील सारभूत सत्त्वाच्या आविष्करणार्थ कालगतीनुसार प्राप्त झालेलीं स्वरूपें होत. म्हणून हक्क व मालमत्ता यांच्या बाबतींत समाजांत प्रत्येकाला जो अवस्था प्राप्त झालेली आहे, ती अखिल मानवजातीचें जीवन वाजवी रीतीने चालावें यासाठी, जशीच्या तशीच कायम राहणें अवश्य आहे.

शास्त्रीय समर्थन :

शास्त्रज्ञांचा सिद्धान्त असें म्हणतो की,बाकीचीं सर्व समर्थनें वेडगळ व अर्थशून्य आहेत. त्यांतील पहिलें धर्माचा वरचष्मा असलेल्या काळांतील व दुसरें तत्वज्ञानी काळांतील विचारांचा परिपाक होय. मानवी समाजाच्या जीवनाचे जे नियम त्यांचा अभ्यास करण्याची खरीखुरी पद्धत एकच – ती म्हणजे भौतिक, प्रायोगिक व विचिकित्सक शास्त्राची होय. जीवशास्त्र आणि इतर सर्व भौतिक शास्त्रें, यांवर आधारलेलें जें समाजशास्त्र त्यापासूनच आपल्याला मानवी जीवनाचे नियम जाणून घेतां येतील. मानवी समाज हे सेंद्रिय जीवांसारखे बनलेले अगर बनण्याच्या क्रमामध्यें असलेले रचनाप्रकार असून सेंद्रिय जीवांच्या विकासाचे जे नियम ते सर्व त्यांना लागू आहेत. या नियमांपैकी एक प्रमुख नियम म्हटला म्हणजे सेंद्रिय जीवाच्या अवयवांमधील 'श्रमविभाग' हा होय. समाजांतील कांही लोक सत्ता गाजवीत असले व इतर सत्ता पाळीत असले, कांही लोक श्रीमंतींत लोळत असून कांही दारिद्र्यांत खितपत असले, तर हा सर्व प्रकार ईश्वरी इच्छेमुळे, अगर राज्यसंस्था हें एक मानवी आत्म्याचें आविष्करण असल्यामुळे होत नसून, सेंद्रिय जीवाप्रमाणेंच मानवी समाजांमध्येंही श्रमविभाग अस्तित्वांत आहे, व तो समाजाच्या जीवनाला आवश्यक आहे, या कारणामुळेच घडून येत आहे. हा श्रमविभाग म्हणजे असा की, समाजांतील कांही लोक शरीरकष्टाचें काम करितात व कांही मेंदूचें काम करितात.

या सिद्धान्तावर आमच्या आजच्या रूढ समर्थनाचा सर्व पाया रचला गेला आहे.

प्रकरण एकोणतिसावें

येशू ख्रिस्ताची एक नवी शिकवण ख्रिस्ती धर्मग्रंथांत नमूद आहे. ही शिकवण मान्य करण्याऐवजी तिची ओढाताण करण्यांत येते आणि पहिला माणूस व पहिला देवदूत यांच्या पतनाची एक नवलकथा कल्पनेनें रचिली जाते. ही नवी कथा, हीच येशूख्रिस्ताची खरी शिकवण म्हणून स्वीकारिली जाते. (या कथेचा) हा शोध खुळचट व सर्वस्वी निराधार असला तरी, वाटेल तसें वागूनही, माणसाला येशू ख्रिस्ताच्या शिकवणीचें पालन केल्याचें समाधान मिळणें शक्य आहे, हें जें या (कथे)पासून निघणारें अनुमान, तें न्यायनीतीचा तिटकारा असलेल्या दुर्बळ मनाच्या जनसमूहाच्या इतकें पथ्यावर आहे की, या नव्या खुळाला ते एकदम सत्य म्हणून कवटाळतात. इतकेंच नव्हे तर दैवी, साक्षात्कृत सत्य म्हणून त्याची महती गातात. परंतु धर्मग्रंथांचा 'दैवी वाणी' म्हणून जो भाग मानिला आहे, त्यांत याचा मागमूसही नाही. तरीही सुमारें हजार वर्षें या नव्या शक्कलीवर विद्वान् धर्माभिमान्यांनी आपली बुद्धिमत्ता खर्चून निरनिराळे सिद्धान्त रचिले.

या धर्मशिक्षकांत निरनिराळे पंथ उत्पन्न होतात व ते एकमेकांस खोडून टाकण्याचा प्रयत्न करतात. पुढे त्यांना स्वतःलाच घोंटाळा उडाल्यासारखा वाटतो व ते काय म्हणतात हें त्यांनाच उमजत नाही. आपल्याला विशेष आवडणाऱ्या तत्त्वाला त्यांनी मान्यता द्यावी अशी समाजाची अपेक्षा असते, व त्याप्रमाणें धर्मगुरु ती देतातही; व ते ज्ञातेपणाचा आव आणून व स्वतःच्या म्हणण्यावर स्वतःचा पूर्ण भरंवसा आहे असें नाटक करून त्या तत्त्वांचा उपदेश चालू ठेवतात. पुढे कांही कालानंतर या धर्मशिक्षकांच्या अनुमानाची गरज उरत नाही व समाज यांच्या 'पवित्र' मठांत डोकावून पाहूं लागतो. असें करतांच समाजाला दिसून येतें की, तेथे दैवी ज्ञान इत्यादि कांही नसून सर्व निव्वळ टकबाजीचा प्रकार आहे. समाज चकित होतो व स्वःतच्या अंधळेपणाबद्दल त्याचें त्यालाच नवल वाटूं लागतें.

तत्त्वज्ञानाचीही अवस्था अशीच झाली. हें तत्त्वज्ञान म्हणजे कानफ्यूसिअस, साक्रेतीस अथवा एपिटेक्टस यांनी सांगितलेलें (खरें) शहाणपण

नव्हे तर इतर जें धंदेवाईक 'प्रोफेसरी' तत्त्वज्ञान आळशी श्रीमंतांच्या प्रवृत्तीची खुशामत करूं लागलें, तें होय.

थोडचा दिवसांपूर्वी सुशिक्षित समाजांत एक प्रकृतिवादी तत्त्वज्ञान रूढ होतें. याचे मतें, जें आहे तें योग्य असून जगांत बरें अगर वाईट असें कांही नाही. म्हणून माणसाने वाइटाशीं झगडण्याचें कारण नाही. प्रत्येकानें आपल्या आत्मप्रकृतीचा आविष्कार केला म्हणजे पुरे. मग तो कोणी सैनिक होऊन करो, किंवा दुसरा कोणी न्यायकोर्टांत नोकरी करून करो, अथवा तिसरा एखादा फिडल[illegible]त करो.

खरें शहाणपण[illegible]काय याचें निरूपण आतापावेतों अनेक प्रकारें केलें गेलें आहे. एकोणि[illegible]या शतकांतील लोकांस हीं भिन्न निरूपणें माहीत होतीं. रूसो, पास्कल, लेसिंग व स्पिनोझा यांचे विचार व याशिवाय जुन्या काळच्या सर्व शाहण्या लोकांचे विचार लोकांपुढे होते; पण यांपैकी एकाच्याही शहाणपणाचा लोकमतावर (हेगेलच्या शहाणपणाइतका) पगडा बसला नाही. बरें, हेगेलच्या तत्त्वज्ञानांत विशेष रेखीवपणा होता म्हणून तें इतकें लोकप्रिय झालें, असेंही म्हणण्यास तशी जागा नाही. कारण फिशे व शोपनहार यांचीं तत्त्वज्ञानेंही हेगेलइतकींच सोष्ठवपूर्ण होतीं. हेगेलचें तत्त्वज्ञान, किंचित्काल कां होईना, पण जगमान्य होण्याचें एकच कारण आहे. तें हें की, हेगेलच्या तत्त्वज्ञानापासून जें अनुमान निघे तें माणसांतील उपजत दोषांचें समर्थन करण्यास मदत करी. सर्व म्हणूं लागले, "जें आहे तें योग्य आहे; सर्व चांगलें असल्यामुळे कोणासही दोष देण्याची गरज नाही." अशा प्रकारें पूर्वीच्या धर्मशिक्षकांनी जशा पुनरुद्धाराच्या तत्त्वाच्या पायावर आपल्या इमारती बांधल्या त्याचप्रमाणें तत्त्वज्ञान्यांनी हेगेली शहाणपणाच्या पायावर आपली मनःकल्पित तत्त्वांची इमारत (बॅबेलचा टावर) उभारली व अजूनही कांही लोक या इमारतींत ठाणें देऊन बसले आहेत. पुढे कालांतराने या तत्त्वज्ञान्यांच्या जिभा बॅबेल टावरच्या* गवंड्यांप्रमाणें

---

* स्वर्गाला पोंचेल इतका उंच बांधावा या इराद्याने 'मानवाच्या वंशजांनी' "बॅबेल टावर" बांधण्यास सुरुवात केल्याचा ख्रिस्ती धर्मग्रंथांत उल्लेख आहे. [Gen. XI. 9] हा बांधण्यापूर्वी जगांत एकच भाषा होती; पण हा मिनार यशस्वी होऊन स्वर्गाला मानवाचे हात पोचूं नयेत, म्हणून ईश्वराने मिनाराच्या बांधकामावर असणारांत भिन्न भाषा उत्पन्न केल्या; त्यामुळे परस्परांची भाषा न समजल्यामुळे काम बंद झालें. मा. ज. का.

घोटाळा माजवूं लागल्या व स्वतः काय बोलतों हें त्यांनाच समजेनासें वाटूं लागलें. *स्वतःच्या घरांतील वाण झाडून साफ करण्याऐवजी, लोकांवरील* आपला वरचष्मा कायम ठेवण्याचा हे आटोकाट प्रयत्न करूं लागले. शेवटीं पूर्वीप्रमाणेच स्वतःला सोईस्कर वाटणाऱ्या तत्त्वांचें दृढीकरण कर- तत्त्वज्ञान्यांजवळ ली. लोकांना वाटे की, आपणांस ज्या अगर विसंग त्या तत्त्वज्ञानाच्या मिनारावरून सर्व ट दिसत अस पुढे नित्याप्रमाणें हेंही तत्त्वज्ञान जिरलें जागीं न ज्ञानाचा उदय झाला. जुनें टाकाऊ ठरलें. लोकांनी पु प्रमाणें तत्त्वज्ञान्यांच्या 'पवित्र' मठांत डोकावून पाहण्यास सुरुवात केली व त्या ठिकाणी दुर्बोध व मूर्खपणाच्या बडबडीखेरीज कधीही कांही नव्हतें व नाही, असा त्यांना प्रत्यय आला. हा प्रकार खुद्द माझ्या आठवणींत घडला आहे.

माझ्या आयुष्याच्या सुरुवातीस यच्चयावत् गोष्टी हेगेलच्या तत्त्वज्ञानावर अधिष्ठित होत्या. सर्व वातावरण या तत्त्वज्ञानाने दरवळलें होतें. नियतकालिकें, वृत्तपत्रें, कादंबऱ्या, निबंध, कला, इतिहास, प्रवचनें अथवा संभाषणें—या सर्वांमधून हेंच तत्त्वज्ञान दिसे. हेगेलचें तत्त्वज्ञान माहीत नसलेल्याला भाषण करण्याचा अधिकार नसे. ज्याला सत्य शोधायचें तो हेगेलचा अभ्यास करी. सर्वांचा पाया म्हणजे हेगेल. या परिस्थितीनंतर आज फक्त चाळीस वर्षें झालीं. पण आता त्याच्या तत्त्वज्ञानाचा कोठे मागमूस सुद्धा दिसत नाही ! जणूं काय हेगेल म्हणून कोणी व्यक्ति झालीच नाही, अशाप्रमाणें त्याचा उल्लेख सुद्धा ऐकूं येत नाही. आणि या प्रकारांतील सर्वांत लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही की, उपर्युक्त नकली ख्रिस्ती तत्त्वज्ञानाप्रमाणेंच हेगेलचें तत्त्वज्ञान जें पडलें तें कोणी खोडून काढलें म्हणून नव्हे, तर फक्त त्याची आता आमच्या विद्वान व सुशिक्षित लोकांना गरज उरली नाही, म्हणून !

आज जर आम्ही एखाद्या विद्वानावरोबर देवदूतांचें व आदमचें पतन, किंवा प्राणिमात्राचें अंतिम पापविमोचन यांवर बोलूं लागलों तर तो युक्तिवाद करण्याच्या किंवा आमचें म्हणणें खोडून काढण्याच्या भरीस न पडतां आश्चर्याने, "कोणता देवदूत ?" "आदमच कशाला ?," "पापविमोचन ही

नव्हे तर इतर जें धंदेवाईक 'प्रोफेसरी' तत्त्वज्ञान आळशी श्रीमंतांच्या प्रवृत्तीची खुशामत करूं लागलें, तें होय.

थोडचा दिवसांपूर्वी सुशिक्षित समाजांत एक प्रकृतिवादी तत्त्वज्ञान रूढ होतें. याचे मतें, जें आहे तें योग्य असून जगांत बरें अगर वाईट असें कांही नाही. म्हणून माणसाने वाइटाशीं झगडण्याचें कारण नाही. प्रत्येकाने आपल्या आत्मप्रकृतीचा आविष्कार केला म्हणजे पुरे. मग तो कोणी सैनिक होऊन करो, किंवा दुसरा कोणी न्यायकोर्टांत नोकरी करून करो, अथवा तिसरा एखादा फिडल वाजवून करो.

खरें शहाणपण म्हणजे काय याचें निरूपण आतापावेतों अनेक प्रकारें केलें गेलें आहे. एकोणिसाव्या शतकांतील लोकांस हीं भिन्न निरूपणें माहीत होतीं. रूसो, पास्कल, लेसिंग व स्पिनोझा यांचे विचार व याशिवाय जुन्या काळच्या सर्व शाहण्या लोकांचे विचार लोकांपुढे होते; पण यांपैकी एकाच्याही शहाणपणाचा लोकमतावर (हेगेलच्या शहाणपणाहतका) पगडा बसला नाही. बरें, हेगेलच्या तत्त्वज्ञानांत विशेष रेखीवपणा होता म्हणून तें इतकें लोकप्रिय झालें, असेंही म्हणण्यास तशी जागा नाही. कारण फिशे व शोपनहार यांचीं तत्त्वज्ञानेंही हेगेलइतकींच सौष्ठवपूर्ण होतीं. हेगेलचें तत्त्वज्ञान, किंचित्काल कां होईना, पण जगमान्य होण्याचें एकच कारण आहे. तें हें की, हेगेलच्या तत्त्वज्ञानापासून जें अनुमान निघे तें माणसांतील उपजत दोषांचें समर्थन करण्यास मदत करी. सर्व म्हणूं लागले, "जें आहे तें योग्य आहे; सर्व चांगलें असल्यामुळे कोणासही दोष देण्याची गरज नाही." अशा प्रकारें पूर्वीच्या धर्मशिक्षकांनी जशा पुनरुद्धाराच्या तत्त्वाच्या पायावर आपल्या इमारती बांधल्या त्याचप्रमाणें तत्त्वज्ञान्यांनी हेगेली शहाणपणाच्या पायावर आपली मनःकल्पित तत्त्वांची इमारत (बॅबेलचा टावर) उभारली व अजूनही कांही लोक या इमारतींत ठाणें देऊन बसले आहेत. पुढे कालांतराने या तत्त्वज्ञान्यांच्या जिभा बॅबेल टावरच्या* गवंड्यांप्रमाणें

---

* स्वर्गाला पोंचेल इतका उंच बांधावा या इराद्याने 'मानवाच्या वंशजांनी' "बॅबेल टावर" बांधण्यास सुरुवात केल्याचा ख्रिस्ती धर्मग्रंथांत उल्लेख आहे. [Gen. XI. 9] हा बांधण्यापूर्वी जगांत एकच भाषा होती; पण हा मिनार यशस्वी होऊन स्वर्गाला मानवाचे हात पोचूं नयेत, म्हणून ईश्वराने मिनाराच्या बांधकामावर असणारांत भिन्न भाषा उत्पन्न केल्या; त्यामुळे परस्परांची भाषा न समजल्यामुळे काम बंद झालें. मा. ज. का.

घोटाळा माजवूं लागल्या व स्वतः काय बोलतों हें त्यांनाच समजेनासें वाटूं लागलें. स्वतःच्या घरांतील घाण झाडून साफ करण्याऐवजी, लोकांवरील आपला वरचष्मा कायम ठेवण्याचा हे आटोकाट प्रयत्न करूं लागले. शेवटीं लोकांनी पूर्वीप्रमाणेच स्वतःला सोईस्कर वाटणाऱ्या तत्त्वांचें दृढीकरण करण्याबद्दल तत्त्वज्ञान्यांजवळ मागणी केली. लोकांना वाटे की, आपणांस ज्या गोष्टी दुर्बोध अगर विसंगत वाटतात त्या तत्त्वज्ञानाच्या मिनारावरून सर्व सरळ व स्पष्ट दिसत असाव्या. पण पुढे नित्याप्रमाणें हेंही तत्त्वज्ञान जिरलें व त्याचे जागीं नव्या तत्त्वज्ञानाचा उदय झाला. जुनें टाकाऊ ठरलें. लोकांनी पुनः पूर्वीप्रमाणें तत्त्वज्ञान्यांच्या 'पवित्र' मठांत डोकावून पाहण्यास सुरुवात केली व त्या ठिकाणी दुर्बोध व मूर्खपणाच्या बडबडीखेरीज कधीही कांही नव्हतें व नाही, असा त्यांना प्रत्यय आला. हा प्रकार खुद्द माझ्या आठवणींत घडला आहे.

माझ्या आयुष्याच्या सुरुवातीस यच्चयावत् गोष्टी हेगेलच्या तत्त्वज्ञानावर अधिष्ठित होत्या. सर्व वातावरण या तत्त्वज्ञानाने दरवळलें होतें. नियतकालिकें, वृत्तपत्रें, कादंबऱ्या, निबंध, कला, इतिहास, प्रवचनें अथवा संभाषणें—या सर्वांमधून हेंच तत्त्वज्ञान दिसे. हेगेलचें तत्त्वज्ञान माहीत नसलेल्याला भाषण करण्याचा अधिकार नसे. ज्याला सत्य शोधायचें तो हेगेलचा अभ्यास करी. सर्वांचा पाया म्हणजे हेगेल. या परिस्थितीनंतर आज फक्त चाळीस वर्षें झालीं. पण आता त्याच्या तत्त्वज्ञानाचा कोठे मागमूस सुद्धा दिसत नाही ! जणूं काय हेगेल म्हणून कोणी व्यक्ति झालीच नाही, अशाप्रमाणें त्याचा उल्लेख सुद्धा ऐकूं येत नाही. आणि या प्रकारांतील सर्वांत लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही की, उपर्युक्त नकली ख्रिस्ती तत्त्वज्ञानाप्रमाणेंच हेगेलचें तत्त्वज्ञान जें पडलें तें कोणी खोडून काढलें म्हणून नव्हे, तर फक्त त्याची आता आमच्या विद्वान व सुशिक्षित लोकांना गरज उरली नाही, म्हणून !

आज जर आम्ही एखाद्या विद्वानावरोबर देवदूताचें व आदमचें पतन, किंवा प्राणिमात्राचें अंतिम पापविमोचन यांवर बोलूं लागलों तर तो युक्तिवाद करण्याच्या किंवा आमचें म्हणणें खोडून काढण्याच्या भरीस न पडतां आश्चर्याने, "कोणता देवदूत ?" "आदमच कशाला ?," "पापविमोचन ही

काय भानगड आहे ?" "या सर्वांचा मला काय उपयोग ?" इत्यादि प्रश्न विचारील. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचेंही आज असेंच आहे. आजचा विद्वान त्याबद्दल वाद करण्याच्या भानगडींत न पडतां आश्चर्यचकित होऊन "कसलें आत्मतत्त्व ?", "हें कोठून आलें ?" "हें आत्मदिग्दर्शन कां करतें ?", "आणि मला याचा काय उपयोग ?" इत्यादि प्रश्न करील.

आजकालचे शास्त्रज्ञ म्हणतात, "होय ! हा सर्व प्रकार धर्मनिष्ठेच्या काळांत व तात्त्विक दिवाळखोरीच्या कालखंडांत माजलेल्या असंबद्ध बडबडीमुळे घडून आला खरा. आता आमच्याजवळ विचक्षक आधिभौतिक शास्त्रें असून यांची फरागत होणें शक्य नाही; कारण प्रत्यक्ष अनुभव व प्रयोग यांवरच यांची भिस्त आहे. पूर्वीच्या लोकांप्रमाणे आमचें ज्ञान डळमळीत नाही व मनुष्यमात्रासमोर येणाऱ्या सर्व प्रश्नांचीं समर्पक उत्तरें आमच्या मार्गानेच मिळणें शक्य आहे.

खुद्द अशीच चर्चेड पूर्वीचे धर्मज्ञ लोकही बाळगीत, आणि ते मूर्ख खास नव्हते. कारण त्यांच्यातही फेक अत्यंत बुद्धिमान लोक होऊन गेले, हें आम्हांला माहीत आहे. मला पक्कें स्मरतें की, बरेच दिवस हेगेलचे अनुयायी सुद्धा अशाच विश्वासाने स्वतःचें प्रतिपादन करीत व सुशिक्षित समजले जाणारे लोक या प्रतिपादनाला अशीच मान डोलावीत. आणि हे हेगेलपक्षीय—हेरझेन, स्टांकेव्हिच, बेलिन्स्किस इ० लोक—खात्रीने मूर्ख नव्हते. हें जर खरें, तर कांही खोटे सिद्धान्त शाहण्या लोकांनी आत्मविश्वासाने प्रतिपादावे व इतरेजनांनी त्यांना मान तुकवावी ही विलक्षण गोष्ट घडली कशी ? याचें कारण वर उल्लेखिलेलें सेंच : अर्थात् हे सिद्धान्त लोकांच्या आक्षेपार्ह आयुष्यक्रमाचें समर्थन करणारे होते, हेंच होय.

आणि आजही आधिभौतिक, विचक्षक व प्रायोगिक शास्त्रज्ञांचा आत्मविश्वास व इतरेजनांचें त्यांना मान तुकावणें, याच्या मुळाशीं हेंच कारण नाही काय ? प्रथम प्रथम उत्क्रांतिवादाने—'अंतिम पापविमोचन' हा जसा एके काळी एका नव्या तत्त्वाचा सामान्य लोकांस समजेल असा सारांश होता, तसाच हा 'उत्क्रांतिवाद'ही सध्याच्या नव्या तत्त्वाचा लोकांस समजेल असा सारांश होय—लोकांच्या अन्यायाचें समर्थन होऊं शकेल ही गोष्ट आपणास फार विलक्षण वाटते; म्हणून आपणांस असा

भास होतो की, त्या शास्त्रीय सिद्धान्ताचा प्रत्यक्ष काय घडतें याचें निरीक्षण व टिप्पण करणें, यापलीकडे निराळा उद्देश नाही.

पण हा भ्रम आहे. पूर्वी परमार्थतत्त्वांसंबंधींही असेंच वाटे. परमार्थविद्येचा संबंध फक्त धर्ममतांशीं येतो, त्यांचा मानवी जीवनाशीं (समर्थन या नात्याने) संबंध येत नाही असें वाटे. त्यानंतर तत्त्वज्ञानासंबंधींही अ[illegible] होता. अतीन्द्रिय विषयांसंबंधीं युक्तिवाद करण्यांत तत्त्वज्ञान पू[illegible] आहे, असा लोकांचा समज असे.

पण हा सर्व भ्रम होता. व्यापक प्रमाणांत हेगेलच्या तत्त्वज्ञानाची व विशिष्ट उदाहरण या नात्याने मालथसच्या विचारसरणीची हीच अवस्था होती.

हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा फक्त तर्कवादाशींच संबंध असून मानवी जीवनक्रमाशीं त्याचा कोठेही संबंध नाही असें वाटे. मालथसच्या सिद्धान्ताचाही फक्त आंकडेमोडीच्या घटनांशीं संबंध आहे असा समज असे. पण हा सर्व भ्रमच.

आजचें शास्त्र म्हणे वस्तुस्थितीचीच चांचणी करतें. पण वस्तुस्थिति कोणती ? अमुक विशिष्ट गोष्टीवरच या शास्त्रांचा काय म्हणून रोख असतो ? इतर गोष्टींकडे यांचें कां लक्ष जात नाही ?

आजच्या शास्त्रज्ञांना मोठ्या गंभीरपणाने आणि विश्वस्तपणानें असें म्हणण्याची संवय असते, 'आम्ही फक्त वस्तुस्थितीचें शोधन करितों.' जणूं काय या त्यांच्या म्हणण्याला कांही अर्थ आहे !

केवळ वस्तुस्थितीचें शोधन करणें कोणासही शक्य नाही. कारण अशा संशोधन करण्याजोग्या गोष्टी शब्दशः असंख्य आहेत. संशोधन करण्यापूर्वी या असंख्य गोष्टींपैकी कोणत्या विशिष्ट गोष्टी निवडायच्या यासंबंधी कांहीतरी नक्की विचारसरणी असावी लागेल. आणि अशी एक विचारसरणी खात्रीने आहे, इतकेंच नव्हे तर ती स्पष्टपणें मांडण्यांतही येते; मग आजचे बरेचसे शास्त्रज्ञ तिच्याकडे काणाडोळा करण्याचा प्रयत्न करोत, अर्थात् त्यांना ती जाणून घ्यावीशी वाटत नसो, किंवा त्यांना तिची खरोखरी माहितीच नसो, अगर अज्ञानाचें ते सोंग करीत असोत. हीच तऱ्हा त्या त्या कालच्या रूढ—धर्ममूल अथवा तत्त्वज्ञानी-विचारसरणीची होती.

काय भानगड आहे ?" "या सर्वांचा मला काय उपयोग ?" इत्यादि प्रश्न विचारील. हेगेलच्या तत्त्वज्ञानाचेंही आज असेंच आहे. आजचा विद्वान त्याबद्दल वाद करण्याच्या भानगडींत न पडतां आश्चर्यचकित होऊन " कसलें आत्मतत्त्व ? ", " हें कोठून आलें ? " " हें आत्मदिग्दर्शन कां करतें ?", "आणि मला याचा काय उपयोग ?" इत्यादि प्रश्न करील.

आजकालचे शास्त्रज्ञ म्हणतात, "होय ! हा सर्व प्रकार धर्मनिष्ठेच्या काळांत व तात्त्विक सिद्धान्तांच्या कालखंडांत माजलेल्या असंबद्ध बडबडीमुळे घडून आला खरा. आता आमच्याजवळ विचक्षक आधिभौतिक शास्त्रें असून यांनी फसगत होणें शक्य नाही; कारण प्रत्यक्ष अनुभव व प्रयोग यांवरच यांची भिस्त आहे. पूर्वीच्या लोकांप्रमाणे आमचें ज्ञान डळमळीत नाही व मनुष्यमात्रासमोर येणाऱ्या सर्व प्रश्नांचीं समर्पक उत्तरें आमच्या मार्गानेच मिळणें शक्य आहे.

पण अशीच घमेंड पूर्वीचे धर्मज्ञ लोकही बाळगीत, आणि ते मूर्ख खास नव्हते. कारण त्यांच्यांतही कैक अत्यंत बुद्धिमान लोक होऊन गेले, हें आम्हांला माहीत आहे. मला पक्कें स्मरतें की, बरेच दिवस हेगेलचे अनुयायी सुद्धा अशाच विश्वासाने स्वत:चें प्रतिपादन करीत व सुशिक्षित समजले जाणारे लोक या प्रतिपादनाला अशीच मान डोलावीत. आणि हे हेगेलपक्षीय– हेरझेन, इटांकेव्हिच, बेलिन्स्किस इ० लोक–खात्रीने मूर्ख नव्हते. हें जर खरें, तर कांही खोटे सिद्धान्त शाहण्या लोकांनी आत्मविश्वासाने प्रतिपादावे व इतरेजनांनी त्यांना मान तुकवावी ही विलक्षण गोष्ट घडली कशी ? याचें कारण वर उल्लेखिलेलें सेंच : अर्थात् हे सिद्धान्त लोकांच्या आक्षेपार्ह आयुष्यक्रमाचें समर्थन करणारे होते, हेंच होय.

आणि आजही आधिभौतिक, विचक्षक व प्रायोगिक शास्त्रज्ञांचा आत्मविश्वास व इतरेजनांचें त्यांना मान तुकावणें, याच्या मुळाशीं हेंच कारण नाही काय ? प्रथम प्रथम उत्क्रांतिवादाने—'अंतिम पापविमोचन' हा जसा एके काळी एका नव्या तत्त्वाचा सामान्य लोकांस समजेल असा सारांश होता, तसाच हा 'उत्क्रांतिवाद'ही सध्याच्या नव्या तत्त्वाचा लोकांस समजेल असा सारांश होय—लोकांच्या अन्यायाचें समर्थन होऊं शकेल ही गोष्ट आपणास फार विलक्षण वाटते; म्हणून आपणांस असा

भास होतो की, त्या शास्त्रीय सिद्धान्ताचा प्रत्यक्ष काय घडतें याचें निरीक्षण व टिप्पण करणें, यापलीकडे निराळा उद्देश नाही.

पण हा भ्रम आहे. पूर्वी परमार्थतत्त्वांसंबंधींही असेंच वाटे. परमार्थविद्येचा संबंध फक्त धर्ममतांशीं येतो, त्यांचा मानवी जीवनाशीं (समर्थन या नात्याने) संबंध येत नाही असें वाटे. त्यानंतर तत्त्वज्ञानासंबंधींही असाच समज होता. अतीन्द्रिय विषयांसंबंधीं युक्तिवाद करण्यांत तत्त्वज्ञान पूर्ण व्यापृत आहे, असा लोकांचा समज असे.

पण हा सर्व भ्रम होता. व्यापक प्रमाणांत हेगेलच्या तत्त्वज्ञानाची व विशिष्ट उदाहरण या नात्याने मालथसच्या विचारसरणीची हीच अवस्था होती.

हेगेलच्या तत्त्वज्ञानाचा फक्त तर्कवादाशींच संबंध असून मानवी जीवनक्रमाशीं त्याचा कोठेही संबंध नाही असें वाटे. मालथसच्या सिद्धान्ताचाही फक्त आंकडेमोडीच्या घटनांशीं संबंध आहे असा समज असे. पण हा सर्व भ्रमच.

आजचें शास्त्र म्हणे वस्तुस्थितीचीच चांचणी करतें. पण वस्तुस्थिति कोणती ? अमुक विशिष्ट गोष्टीवरच या शास्त्रांचा काय म्हणून रोख असतो ? इतर गोष्टींकडे यांचें कां लक्ष जात नाही ?

आजच्या शास्त्रज्ञांना मोठ्या गंभीरपणाने आणि विश्वस्तपणानें असें म्हणण्याची संवय असते, 'आम्ही फक्त वस्तुस्थितीचें शोधन करितों.' जणूं काय या त्यांच्या म्हणण्याला कांही अर्थ आहे !

केवळ वस्तुस्थितीचें शोधन करणें कोणासही शक्य नाही. कारण अशा संशोधन करण्याजोग्या गोष्टी शब्दशः असंख्य आहेत. संशोधन करण्यापूर्वी या असंख्य गोष्टींपैकी कोणत्या विशिष्ट गोष्टी निवडायच्या यासंबंधी कांहीतरी नक्की विचारसरणी असावी लागेल. आणि अशी एक विचारसरणी खात्रीने आहे, इतकेंच नव्हे तर ती स्पष्टपणें मांडण्यांतही येते; मग आजचे बरेचसे शास्त्रज्ञ तिच्याकडे काणाडोळा करण्याचा प्रयत्न करोत, अर्थात् त्यांना ती जाणून घ्यावीशी वाटत नसो, किंवा त्यांना तिची खरीखरी माहितीच नसो, अगर अज्ञानाचें ते सोंग करीत असोत. हीच तऱ्हा त्या त्या कालच्या रूढ—धर्ममूल अथवा तत्त्वज्ञानी-विचारसरणीची होती.

प्रत्येक विचारसरणी एका गृहीत प्रमेयावर आधारलेली असते व विद्वान समजले जाणारे लोक या प्रमेयांतील पक्ष–क्वचित् या पक्षांतील गृहीत विधानें न समजतांही–जमेस धरून पलीकडचीं अनुमानें बसवितात. पण मूलभूत असें प्रमेय (सिद्धान्त) मात्र निस्संशय असतेंच. सारांश, आजचें शास्त्र, एका विशिष्ट प्रमेयानुसार ज्यांची तपासणी करायची, अशा घटनांची निवड करतें. हें प्रमेय क्वचित् शास्त्रज्ञांना माहीत असतें, क्वचित् त्यांना तें जाणून घेण्याची इच्छा नसते व प्रसंगीं खरोखर माहीतही नसतें. पण कसेंही असलें तरी प्रमेय असतें, यांत तिळमात्र शंका नाही.

हें प्रमेय असें: "अखिल मानवजात हा एक अविनाशी सेंद्रिय जीव आहे. व्यक्तिशः मनुष्य हे त्याच्यांतील कण असून त्यांपैकी प्रत्येकाला अखिल संघाताच्या उपयोगीं पडेल असें नियत कार्य आहे."

कोणत्याही सेंद्रियरचनेमधील जीवकण ज्याप्रमाणें मुख्य जीवाच्या जीवनकलहास पोषक अशी श्रमविभागणी करून जीवाला जगवतात, एखादा गुण परिपुष्ट अगर दुसरा गुण कमी करतात, किंवा एखाद्या अवयवांत विलीन होतात, अथवा प्राण्यांचीं उदाहरणें द्यायचीं तर, ज्याप्रमाणें मुंग्या–मधमाशांत राणी फक्त अंडीं देते, किंवा आयतखाऊ नराला जसें फक्त प्रजोत्पादनाचें काम असतें आणि इतर मुंग्या–मधमाशा सर्व समाजास आवश्यक खाद्यपेयें गोळा करीत असतात, अगदी याचप्रमाणें मानवी समाजांत निरनिराळ्या अंशांची भिन्नता व विभक्तता निर्माण होते.

म्हणून मनुष्यसमाजाचा अभ्यास करण्यापूर्वीं जीवशास्त्राचा अभ्यास करणें अवश्य आहे. जीवांचें जीवन व वाढ यासंबंधी आपणास पुढील नियम आढळून येतात. (पहिला) प्रत्येक घटनेच्या मुख्य परिणामाबरोबर इतरही आनुषंगिक परिणाम घडून येतात. दुसरा नियम विभक्तीकरण न झालेल्यांचा दुबळेपणा, हा होय; तिसरा समता व विषमता यांसंबंधीचा असतो. इ.इ. हें दिसावयास कसें साळसूदपणाचें दिसतें. पण या नियमांपासून अनुमानें काढण्याचा उशीर की, या सर्वांचा रोख कोणीकडे आहे हें तावडतोब कळतें. या सर्वांचें धोरण, मानवी समाजाचें सेंद्रिय जीवाशीं साम्य स्थापित करण्याकडे आहे. एकदा हें जीवत्व मान्य झालें की, जीवाच्या अंशांप्रमाणें भिन्न कामें भिन्न माणसांना करावीं लागणें हें आपोआपच अपरिहार्य ठरतें, आणि

याच्यापुढे असेंही आपोआप सिद्ध होतें की, जर मनुष्यसमाजांत कोठें कांही क्रौर्य अगर अन्याय दृष्टोत्पत्तीस येत असेल, तर त्याला घाबरून जाण्याचें कारण नाही. या अपरिहार्य घटनांनी श्रमविभागाचा दुर्भेद्य नियम सिद्ध होतो, इतकाच याचा अर्थ समजावयाचा.

हेगेलच्या आत्मिक तत्त्वज्ञानानेही आपल्यापरी, हरएक अन्यायाचें व क्रौर्याचें समर्थनच केलें; पण तें (कोरडें) तत्वज्ञान होतें म्हणून तें संशयात्मक समजलें जातें. पण शास्त्रांत मात्र सर्व कांही शास्त्रीय आहे म्हणून याबद्दल मात्र कोणास शंका घेतांच येत नाही !

अशा अद्वितीय तत्त्वाला कोण बरें मानणार नाही ? मानवसमाज हा एखाद्या सेंद्रिय रचनेप्रमाणें, निरीक्षण करण्याची वस्तु आहे इतकें गृहीत धरण्याचा अवकाश की, प्रत्येकाला खंत न वाटतां मृत्युमुखीं पडणाऱ्या इतरांचें श्रमफल लुबाडण्याची मोकळीक होते व असेंही समाधान करून घेतां येतें की, मी नर्तक, वकील, वैद्य, तत्वज्ञ, अगर परलोकसंवादित्वाचा किंवा 'अणू'चा शोध लावणारा शास्त्रज्ञ या दिशेने जें काम करतों, तें मानवजातिरूपी जंतूच्या इन्द्रियव्यापारासारखें असल्यामुळे, मेंदूंतील जीवकण जसे शरीरांतील जीवकणांचें श्रमफल हक्काने उपभोगतात, तद्वत् मीही जें लोकांचें श्रमफल लुबाडतों तें अन्यायीपणाचें आहे की काय, किंवा इतरांचें श्रमफल मी उपभोगावें किंवा नाही, हा प्रश्नच मुळीं उद्भवत नाही. मला जें आवडतें तें मी करतों.

याप्रमाणें ज्याच्या साहाय्याने आम्हांला आमची सदसद्विवेकबुद्धि कायमची खिशांत कोंबतां येते, व ज्याच्या भरंवशावर आम्हांला निःशंक मनाने आमचा पाशवी जीवनक्रम चालू ठेवतां येऊन पुनः आम्हांला बळकट 'शास्त्रा'धार आहे असेंही वाटतें, असें व्यवहार्य तत्त्वज्ञान आम्ही कां बरें मान्य करणार नाहीं ? आज याच नवीन विचारसरणीच्या आधारावर मनुष्यांमधील क्रौर्याचें व आळसाचें समर्थन केलें जात आहे.

प्रकरण तिसावें

या तत्त्वाचा जन्म अलीकडचा म्हणजे सुमारें ५० वर्षांपूर्वीचा आहे. ए. कॉम्टे हा फ्रेंच पंडित याचा आद्य संस्थापक होय. याच सुमारास बिशाटचे शरीरशास्त्रविषयक सिद्धान्त नव्याने पुढे येऊं लागले होते. स्वभावतः धार्मिक व सुव्यवस्था लावण्याच्या प्रवृत्तीच्या कॉम्टेवर बिशाटच्या संशोधनाचा प्रभाव पडत चालला होता. अशा स्थितींत पुष्कळ दिवसांपर्वी मेनेनिअस ॲग्रिप्पा नांवाच्या गृहस्थाने निरनिराळे मानवी समाज, किंबहुना अखिल मानवजाति हा एक जीव समजण्यास हरकत नाही व मनुष्यें म्हणजे ह्या जीवाच्या, प्रत्येकास स्वतंत्र व विशिष्ट असें कार्य असलेल्या, अवयवांमधील चैतन्यकण होत, असें मानिल्यास चालेल, अशी जी कल्पना सुचविली होती तिने कॉम्टेचें लक्ष वेधलें. कॉम्टे इतका प्रसन्न झाला की, त्याने त्यावर एक नवा तात्त्विक सिद्धान्त रचण्यास सुरुवात केली व या सिद्धान्तांत तो इतका वाहवला की, एका क्षुल्लक साम्यावरून आपण आपल्या तत्त्वप्रतिपादनास सुरुवात केली आहे, हें तो विसरला. हें साम्य दंतकथा रचण्यास उपयोगी होतें; पण एखाद्या शास्त्राचा पाया बनण्यास मात्र तें अपात्र होतें, हें त्याच्या लक्षांत राहिलें नाही. त्याने स्वतःची जी समजूत करून घेतली, तिलाच स्वयंसिद्ध तत्त्व मानावयास सुरुवात केली. (असा प्रकार बहुधा नेहमीच होतो.) स्वतःचा सिद्धान्त प्रयोगाच्या पक्कचा पायावर रचला गेला आहे, असा त्याने (गैर)समज करून घेतला. त्याचा सिद्धान्त असा: ज्याअर्थी मानवसमाज हा एक जंतु आहे त्याअर्थी मानवसमाजाचें निरीक्षण करायचें अगर त्याचा विश्वाशीं काय संबंध आहे हें पहायचें, तर प्रथम या जंतूचे (मानवजातीचे) गुणधर्म पाहिले पाहिजेत. याकरितां माणसाने इतर कनिष्ठ प्रतीच्या जंतूंवर प्रयोग करून निरीक्षण करावें; म्हणजे मानवसमाजासंबंधीं नियम आपोआप अनुमानाने काढतां येतील.

याचा अर्थ असा की, कॉम्टेच्या मतें निरीक्षणावरून अनुमान काढण्याची पद्धति सर्वांत श्रेष्ठ होय. जें प्रयोगावर अधिष्ठित असेल तेंच खरें

शास्त्र. दुसरें असें की, मानवसमाजरूपी काल्पनिक जंतूचें अगर 'जंतु-सर्वोत्तिमा'चें शास्त्र हेंच (शास्त्राचें) साध्य व शास्त्राची परमावधि होय. या नव्या काल्पनिक शास्त्राचें नांव 'समाजशास्त्र'. या नव्या शास्त्रीय दृष्टिकोनाहून पाहतां पूर्वीचें सर्व ज्ञान खोटें वाटूं लागलें व मानवजातीच्या विज्ञानेतिहासाचे तीन किंवहुना वास्तविक दोनच कालखंड पडतात असें दिसूं लागलें.

(१) पारमार्थिक विचारांचें युग व तत्त्वज्ञानाचें युग हीं दोन्ही युगें, म्हणजे जगाच्या सुरवातीपासूनचा काम्टेपर्यंतचा काळ, पहिल्या कालखंडांत समाविष्ट होई.

(२) काम्टेपासून अलीकडचा, खरें शास्त्र, म्हणजे प्रत्यक्षाधिष्ठित ज्ञान, यांचा कालखंड, हा दुसरा होय.

हें सर्व दिसावयास मोठें छान होतें. पण यांत एक चूक राहिली. ती अशी की, हा सर्व डोलारा वाळूच्या भुसभुशीत पायावर उभारला होता. "मानवसमाज हा सेंद्रिय जंतु आहे." या मनःपूत विधानाच्या पोकळ पायावर ही सर्व इमारत रचण्यांत आलेली होती.

देवांची त्रिमूर्ति किंवा असेच इतर धार्मिक सिद्धान्त गृहीत धरणें हें ज्याप्रमाणें रास्त नाही, त्याप्रमाणें मानवसमाज हा, ज्याचें स्वतंत्र निरीक्षण करतां येत नाही असा, सेन्द्रिय जंतु आहे असें गृहीत धरण्याचाही आपणांस हक्क नाही.

प्रत्येक सेंद्रिय जीवाचे ठायीं चैतन्याचें किंवा संवेदनांचें एक केंद्र असतें. हें प्रमुख गमक मानवजातीच्या बाबतींत उपलब्ध नसतांही मानव-जातीला जंतु समजण्यांत आलें, ही या प्रमेयांतील चूक होय. आम्ही हत्तीला अगर सूक्ष्म जंतूंना सेंद्रिय जीव समजतों, याचें कारण आमच्यांत ज्याप्रमाणें संवेदनाग्रहणशक्ति एके ठिकाणीं केंद्रीभूत झालेली आहे तशी त्यांच्यांतही असते, असा आरोप परस्पर सादृश्यामुळें आम्हांस करतां येतो. पण मानवसमाज व मनुष्यजात यांत सेंद्रिय जीवाचें हें मुख्य लक्षण दिसून येत नाही. म्हणून सेन्द्रिय जंतू व मानवजात यांत इतर कितीही बाबतींत साम्य असलें, तरी हें मुख्य लक्षण नसतां मानवसमाजाला 'जंतू' मानणें चुकीचें आहे.

पण या तत्त्वज्ञानांतील हा हडेलहप्पीपणा किंवा प्रमाद यांस न जुमानतां सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या जगाने हें प्रात्यक्षिक तत्वज्ञान मोठ्या आदराने मान्य केलें. कारण (त्या) सुशिक्षित वर्गाच्या पथ्यावर असणाऱ्या हिंसाप्रधान सद्य:कालीन सामाजिक व्यवस्थेचें या तत्वज्ञानानें उत्कृष्ट समर्थन करतां येई. यांत आश्चर्याची गोष्ट अशी की, काम्टेच्या लिखाणाचे प्रात्यक्षिक तत्त्वज्ञान व प्रात्यक्षिक राजकारणशास्त्र असे जें दोन भाग आहेत, त्यांपैकी सुशिक्षित जगाने फक्त पहिल्या भागाचा स्वीकार केला. कारण प्रात्यक्षिक तत्वज्ञानासंबंधीं असलेल्या या भागाची त्यांना स्वसमर्थनार्थ आवश्यकता होती. पण मानवजातीला एक जीव ठरविल्याबरोबर मानवजातीसंबंधी विश्वबंधुत्वाच्या तत्त्वास अनुसरून जीं अनेक नैतिक कर्तव्यें गळ्यांत पडतात, त्यांचा उल्लेख असलेल्या दुसऱ्या भागाला मात्र महत्त्व देण्यांत आलें नाही. इतकेंच नव्हे, तर तो व्यर्थ किंबहुना अशास्त्रीय आहे असेंही ठरविण्यांत आलें.

कांटच्या तत्वज्ञानाच्या दोन भागांचा जो प्रकार झाला त्याचीच पुनः (काम्टेच्या बाबतींत) पुनरावृत्ति झाली. कांटची शुद्धबुद्धिमीमांसा विद्वत् समाजाने ग्राह्य मानिली; पण व्यावहारिक बुद्धिमीमांसेची चर्चा मात्र त्याज्य ठरविली. पण वस्तुतः या दुसऱ्या विवेचनांतच कांटच्या नैतिक शिकवणीचा सारांश आहे. काम्टेच्या शिकवणीपैकीही, जें प्रचलित अनिष्टाचें समर्थन करी तेवढेंच ग्राह्य मानण्यांत आलें. पण हें जें प्रात्यक्षिक तत्त्वज्ञान समाजाने मान्य केलें, तें स्वतः मनःपूत व अशुद्ध पायावर रचलें असल्यामुळें इतकें डळमळीत होतें की, (दुसरी मदत घेतल्याशिवाय) त्याचा तोल संभाळेना. आणि मग या नवमतवादी शास्त्रांतील अनेक खुळांपैकी एक खूळ असेंही निघालें की, जंतु एकापासून एक असे उत्क्रांत झाले आहेत. यांतही नावीन्य अगर खरेपणा यांचा लवलेश नाही. एकापासूनच एक नव्हे,तर अनेकांपासूनही एक जंतु तयार होतो असेंही सांगण्यांत येतें. याचा सरळ अर्थ असा की, भरपूर--उदाहरणार्थ दहा लक्ष वर्षें--कालावधींत कोणतरी एकाच पूर्वजापासून आजचा मासा आणि बदक निर्माण झालेले असावेत; इतकेंच नव्हे, तर अनेक जंतूंपासूनही आजचा एखादा प्राणी निर्माण झालेला असूं शकतो. उदाहरणार्थ, मत्स्यांच्या घोळक्यापासून एखादा

निराळाच प्राणी निर्माण झालेला असणें शक्य आहे. हें अनागोंदी व चुकीचें प्रमेय तर सुशिक्षित जगानें अधिकच औत्सुक्यानें कवटाळलें. हें प्रमेयही निराधार म्हणण्याचें कारण असें की, एकापासून निराळा प्राणी उद्भवतांना कोणी स्वतः पाहिला नाही; म्हणून प्राण्यांच्या मुळासंबंधीं जे गृहीत धरण्यांत येतें तो अंदाजच रहायचा, अर्थात् त्याची सिद्धता होणें कठीण आहे; आणि हे प्राणी आनुवंशिकत्वाच्या व फेरबदलाच्या विशिष्ट नियमानुसार अपरिमित कालावधीमध्यें तयार झाले आहेत, असा खुलासा देणें म्हणजे हें उत्तर नसून मूळ प्रश्नच निराळ्या भाषेंत मांडण्यासारखें होय; म्हणून वरील गृहीत कल्पना चुकीची आहे असें म्हणावयास पाहिजे.

यावें मोझेसने असें उत्तर दिलें आहे की, जे भिन्न प्राणी दिसतात ते अनंत शक्तिमान परमेश्वराच्या इच्छेने निर्माण झाले आहेत. पण उत्क्रांतिवाद म्हणतो की, प्राण्यांतली भिन्नता ही, आनुवंशिकता व परिस्थितींतील भिन्नता यांचा अनंत कालावधीत झालेला जो परिणाम, त्यामुळें निर्माण झालेली होय. उत्क्रांतिवादाचा थोडक्यांत सारांश हा की, अपरिमित कालावधींत तुम्हीं म्हणाल त्यापासून तुमच्या इच्छेस येईल तो प्राणी निर्माण होऊं शकेल.

(मूळ) प्रश्नाचें उत्तर पुढे येण्याऐवजी निरनिराळ्या शब्दांत तेंच विधान पुनः पुनः मांडण्यांत येतें. ईश्वराच्या इच्छेबद्दल यदृच्छेची योजना होते. ईश्वरी शक्तीच्या अनंतत्वाच्या कल्पनेऐवजी कालाचें अनंतत्व पुढें येतें. पण हें डार्विनचें उत्क्रांतितत्त्व—त्याच्या अनुयायांनीं तर याला अधिकच अनागोंदी व चुकीचें बनविलें आहे–पूर्वीच्या काम्टेच्या घोरणाचीच री ओढी व म्हणून तें आमच्या विद्वानांना आकाशवाणीप्रमाणें वाटूं लागून डार्विनचें हें तत्त्व सर्व शास्त्रांचा पाया होऊन बसलें. आणि इतिहास, भाषाशास्त्र व धर्म यांवर सुद्धा त्याची छाप पडली. इतकेंच नव्हे, तर खुद्द डार्विनचीच एके ठिकाणीं अशी कबुली आहे की, त्याला हें तत्त्व मालथसच्या लोकसंख्येच्या नियमावरून सुचलें, म्हणूनच त्याने जीवनार्थ कलह हा सर्व प्राण्यांच्या व मानवांच्या जीवनाचा मूलभूत नियम होय असें प्रतिपादन केलें. आळशी लोकांच्या घोळक्याला नेमकें हेंच पाहिजे होतें, हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे.

अशाप्रकारें ज्यांचा स्वतःचाच आधार घड नव्हता अशा दोन प्रमेयांनी एकमेकांना आधार देऊन घटकाभर स्थैर्याचें सोंग केलें. त्या दोन्ही प्रमेयांत समाजाच्या दृष्टीने बहुमोलाचा असा अर्थ होता, की जें आहे तें तसेंच असावयास पाहिजे व समाजांत जें कांही वाईट आहे त्याबद्दल कोणासही दोष देतां येणार नाही. ज्या विशिष्ट अर्थाने समाजाला या तत्त्वाची गरज होती त्याच अर्थाने समाजाने पूर्ण विश्वासाने व न भूतो न भविष्यति उत्साहाने सदर तत्त्वाचा अंगीकार केला, व या दोन अनागोंदी व चुकीच्या प्रमेयांना विश्वासाचीं कलमें ठरविण्यांत येऊन त्यांवर या नव्या शास्त्रीय उपपत्तीचा पाया रचला गेला.

अंतरंग व बहिरंगाच्या दृष्टीनेही विचार करतां हें नवें तत्त्व जुन्या ख्रिस्ती धर्माच्या सिद्धान्तप्रणालीसारखेंच आहे.

अंतरंगाच्या बाबतीत साम्य असें की, दोघांतही एका खऱ्या गोष्टीला अवास्तव व भ्रामक रूप देण्यांत आलें असून या अवास्तव अर्थालाच चर्चेचा विषय बनविलें आहे.

ख्रिस्ती धर्मांत ख्रिस्त झाला तो खरा, पण त्याला बळेंच ईश्वर बनविण्यांत आलें आणि इकडे आधिभौतिक तत्वज्ञानांत मानवजात खरी, पण तिला बळेंच जंतूचें भ्रामक स्वरूप देण्यांत आलें.

बहिरंगाचा विचार करतां या दोन्ही प्रकारांतील साम्य तर विशेषच लक्षांत येतें, कारण दोन्ही प्रमेयांत कांही लोकांनी मांडलेल्या कल्पनेला स्वयंसिद्ध मानण्यांत आलें आहे.

'ख्रिस्ती चर्च' सिद्धान्तांत धार्मिक लोकांना जो साक्षात्कार होतो त्याला पवित्र व दुर्भेद्य सत्य मानण्यांत आलें व आधिभौतिकवाद्यांनी शास्त्रज्ञ म्हणविणाऱ्यांच्या मतें जें शास्त्रीय आहे तें निःसंदिग्ध सत्य मानलें. ज्याप्रमाणें 'ख्रिस्ती चर्च'वाल्यांनी चर्चची स्थापना झाल्यापासूनच ईश्वराबद्दलची खरी माहिती आपणांस झाली असा भाव आणला–अ स्वतःपूर्वीच्या लोकांचा धार्मिकपणा ते जसा निव्वळ सोजन्याचा भाग म्हणून मान्य करीत–तद्वत् आधिभौतिक शास्त्रालाही खरी सुरुवात काम्टे पासून झाली असें मानण्यांत येऊन पूर्वीच्या अरिस्टॉटलसारख्या कांही लोकांचें शास्त्रीयत्व निव्वळ सोजन्यामुळे मान्य होऊं लागलें. शिवाय

चर्चवाल्यांप्रमाणें आधिभौतिक शास्त्रज्ञही त्यांच्या (शास्त्रा) बाहेरची विद्या ही अविद्या होय असेंच मानतात.

हें साम्य याही पलीकडे जातें. ज्याप्रमाणे ख्रिस्ताचें देवपण व त्रिमूर्तीची कल्पना या मूळ धार्मिक कल्पनाना मदत म्हणून पहिल्या माणसाच्या (आदमच्या) पतनाची व ख्रिस्तवधामुळे त्याचा उद्धार होण्याची कल्पना चर्चवाल्याचे बाबतींत पुढ येते, त्याप्रमाणे काम्टेच्या "मानव जात ही सेन्द्रिय जीव आहे" या कल्पनेच्या मदतीस जुनें उत्क्रांतितत्त्व नवा अवतार धारण करून धावून येतें, व या दोन्हींच्या साहाय्याने लोकप्रिय शास्त्रीय तत्त्व रचलें जातें.

दोन्ही. प्रमेयांत जुन्या तत्त्वांना उचलून धरण्याकरितां या नव्या पुस्त्यांची सारखीच गरज होती व या पुस्त्यांचा, मूळ तत्वाला जमेंस धरून विचार केला, तरच अर्थ लागतो. ख्रिस्ताच्या देवपणांत विश्वास असणाऱ्या एखाद्याने 'ईश्वराने पृथ्वीवर अवतार कां घेतला ?' अशी शंका घेतली तर 'पतितोद्धाराकरितां' असा खुलासा होऊं शकतो.

त्याचप्रमाणें मानवजातीच्या जंतुत्वांत विश्वास असणाऱ्या एखाद्याने (काम्टेच्या अनुयायाने) 'व्यक्ति समुच्चयाला जंतु का मानावें' अशी शंका काढिली तर त्याच्या शंकासमाधानाकरितां उत्क्रांतिवाद पाहिजेच.

प्रत्यक्ष परिस्थिति व आपण ज्यावर विश्वास टेवतों तें तत्त्व यांतील विसंगतता जुटती करून घेण्यास "पतितोद्धार" अशासारखा खुलासा अवश्य आहे.

'ईश्वर पतितोद्धारार्थ पृथ्वीवर अवतरला,' पण उद्धरला तर कोणीही नाही. आता ही विसंगतता जुळवायची कशी? यावर पतितोद्धाराचें कलम म्हणतें, 'ज्यांचा पतितोद्धारावर विश्वास आहे त्यांचा उद्धार झाला.' तुमचा विश्वास असेल तर तुमचाही उद्धार होईल.

याप्रमाणेच पहिलें अंधविश्वासमान्य तत्त्व व वस्तुस्थिति यांतील विसंगतता जुळविण्यास उत्क्रांतिवाद हवा. मानवजात जंतु खरी, पण जंतूंचा मुख्य गुणच हिच्यांत दिसत नाही. तेव्हा याची जुळणी कशी? उत्क्रांति तत्त्व म्हणतें, "मानवजात हा बनण्याच्या क्रियेमध्यें असलेला जंतू आहे; तुमचा यावर विश्वास असेल तरच मानवजातीचें जंतुत्व तुम्हांला पटेल."

त्रिमूर्ति अगर ख्रिस्ताचें देवपण यांवर विश्वास नसणाराला पतितोद्धाराचें महत्त्व व मर्म कळणें सुद्धा जसें कठीण, किंवा ख्रिस्त देवाचा अवतार होता हें मूळ कलम मान्य केल्यावरच जसा तो (पतितोद्धार) कळावा, त्याप्रमाणें आधिभौतिक वादांतील अंधविश्वासमूलक कलमें ज्यांना असंमत आहेत अशांना, प्राणिजातींच्या उगमाचें जें तत्त्व त्याचें महत्त्व काय हेंही कळणें कठीण आहे; व मानवजात जंतु आहे हें मूळ तत्त्व माहीत असेल तरच हें महत्त्व कळूं शकेल.

आणि, ज्याप्रमाणें दैवी शास्त्राच्या मूलभूत तत्त्वांवर ज्याचा विश्वास असेल त्यालाच त्या शास्त्रांतील पुढच्या खांचाखोंचा समजतात, त्याप्रमाणें ज्या समाजशास्त्राने आजच्या पुढारलेल्या शास्त्रज्ञांचें लक्ष वेधलें आहे, त्या समाजशास्त्राचीं कलमेंही त्याच्या मूळ विधानावर विश्वास असणारांनाच समजतात.

या दोन्ही प्रकारांत एक असेंही साम्य आहे की, जीं विधानें एकदा गृहीत धरल्यामुळे ज्यांची चांचणी होत नाही व जीं त्रिकालाबाधित मानिलीं जातात, त्यांपासून पुढे कल्पनातीत व आश्चर्यपूर्ण अशीं तत्त्वें पुढे येतात व धर्मशास्त्रज्ञांनी स्वतःस पवित्र व शास्त्रज्ञांनी स्वतःस शास्त्रीय–अर्थात् अिनचूक–म्हणून लोकांसमोर येण्याची पद्धति स्वीकारिल्यामुळे ते अत्यंत निराधार, असंभवनीय व बेछूट अशा अनुमानांवर येऊन थडकतात. विधानें मांडणारे मोठ्या गंभीरपणें विधानें करतात. शंका घेणारेही मोठ्या गंभीरपणाने शंका विचारतात, पण हे शंका विचारणारे खुद्द शास्त्राच्या मूल तत्त्वावर विश्वास असणारेच असतात.

या नव्या लोकांतील एक अतिरथी हर्बट स्पेन्सर आपल्या एका आरंभींच्या पुस्तकांत येणें प्रमाणें लिहितोः—

मानव समाज आणि सेन्द्रिय जंतु यांचें परस्परांशीं पुढील बाबतींत साम्य आहे.

(१) लहान लहान समुदायांपासून दोघांचीही सुरुवात होते. हळूहळू त्यांची वाढ होते व शेवटी त्यांपासून उत्क्रांत होणाऱ्या प्राण्याचा आकार क्वचित् मूळ जंतूच्या सहस्त्रपटीनेही मोठा असतो.

(२) त्यांचें मूळचें स्वरूप इतकें क्षुद्र असतें की, त्यांना जवळजवळ आकाररहित मानतां येईल; पण जसजशी वाढ होते तसें त्यांचें स्वरूप वाढत्या प्रमाणांत गुंतागुंतीचें होत जातें.

(३) त्यांच्या सुरुवातीच्या स्थितींत भिन्न भाग एकमेकांवर मुळींच अवलंबून नसले तरी पुढे हें परस्परावलंबित्व उद्‌भवतें व पुढें तर इतकें वाढतें की, शेवटीं विशिष्ट भागाचें जीवन इतरांच्या जीवनावर व श्रमावरच अवलंबून राहतें.

(४) समाजाचें जीवन व वाढ हीं त्यांतील घटकांच्या (जीवन-व वाढींच्या) मानाने कितीतरी अधिक महत्त्वाची व कालावधीपर्यंत चालणारी आहे. कारण व्यक्ति उद्‌भवतात, वाढतात, कामें करतात, उत्पादन करतात व नष्ट होतात. पण त्यांचा जो समाज तो पिढ्यान-पिढ्या अस्तित्वांत राहून रचनेंतील सुधारणा व गुणविकासामुळें वाढत असतो .यानंतर जंतु व समाज यांमधील फरक नमूद केले असून हे फरक कसे वरवरचे व दोघांमधील साम्यच कसें सर्वव्यापी आहे याचें दिग्दर्शन केलें आहे.

नव्या प्रेक्षकाला असा प्रश्न पडतो 'हें तुम्हीं म्हणतां तरी काय ? मनुष्यसमाज व जंतु यांना सारखें समजायचें तें कां!' 'त्यांच्यांत साम्य कोणतें ?' 'तुम्हीं म्हणतां की, वरील चार कारणामुळें तीं दोघें सारखीं होत; पण हें खरें नाही. कांहीं थोड्याशाच लक्षणांचा उल्लेख करूनच तुम्ही हें विधान करीत आहांत.'

"तुम्हीं या साम्याच्या सिद्धयर्थ चार कारणें देतां व नंतर फरक असणाऱ्या बाबींचा विचार करतां. हे फरक तुमच्या मतें भासपूर्ण आहेत. आणि यावरून तुम्हीं ठरवितां की, जंतु व मनुष्यसमाज समानधर्मीय होत. पण हा सर्व शब्दच्छल आहे. अशा रीतीने तर तुम्हीं हवें तें जंतु असल्याचें सिद्ध करूं शकाल."

उदाहरणार्थ मी मला अगदी प्रथम सुचलें तेंच विचारांत घेतों. शेतांत लावणी करून वाढविलेलें जंगलच घेतों.

(१) शेतांत बीं रुजून रोपें उगवूं लागलीं म्हणजें 'लहान समुदायांपासून' इत्यादि तुम्हीं जें म्हटलें त्याप्रमाणें प्रकार घडतो.

(२) नंतर कांहीं वेळाने 'त्यांचें मूळचें स्वरूप क्षुद्र असतें. पुढे तें गुंतागुंतीचें होतें' इत्यादि (तुमच्या दुसऱ्या कलमाप्रमाणें) प्रथम सरळ दांडा येतो व नंतर फांद्यांची गुंतागुंत होते.

(३) 'हें परस्परावलंबित्व इतकें वाढतें की, विशिष्ट भागाचें जीवन इतरांच्या जीवनावर व श्रमावर अवलंबून राहतें.' झाडांचे बाबतींत हेंच घडतें. बाजूच्या लहान रोंपटामुळे मुख्य झाडाला ऊब मिळते. (बाजूचीं लहान झाडें उपटल्यावर किंवा कापल्यास मुख्य झाड गारठतें) बाहेरील झाडामुळें मधल्या झाडांचें वाऱ्यापासून रक्षण होतें. बियांचीं झाडें जंगलाची अभिवृद्धि करतात, पालवीदार मोठीं झाडें छाया देतात, अशाप्रकारें एका झाडाचें जीवन दुसऱ्यावर अवलंबून असतें.

(४) 'निरनिराळे घटक (व्यक्ती) मरण पावले तरी संघ (समाज) जिवंत असतो. जंगलाबाबतही असेंच आहे, कारण म्हणच आहे, 'झाड मेल्याचें जंगलाला काय दुःख ?'

या तत्त्वाचे प्रणेते म्हणतात की, हात जर कापून काढला तर तोडलेला हात निर्जीव होतो. जंगलाचेंही असेंच आहे. जंगलांतील एखादें झाड जंगला (च्या साखळी) बाहेर नेऊन रोवा की, तेंही निर्जीव होईल.

या नव्या प्रमेयांत म्हणा, ख्रिस्ती चर्चच्या शिकवणींत म्हणा, की अंधविश्वासमूलक तत्त्वांवर उभारलेल्या कोणत्याही इतर प्रमेयांत म्हणा एक आणखी असें साम्य आहे की, तर्कशास्त्राविषयीं तीं बेगुमान असतात. जंगल व जंतू यांतील साम्य आपण वरप्रमाणें सिद्ध केल्यावर तरी या प्रमेयवाल्यांना स्वतःच्या प्रमेयांतील चूक पटावी असें आपणांस वाटेल; पण छट ! त्याचें नांव नको.

ते म्हणतील, 'होय, जंगलालाही जंतु म्हणतां येईल. जंगल हें सुद्धा एकमेकांवर शांतपणें अवलंबून असून तो एकमेकांचा नाश न करणाऱ्या (झाडां) चा समुच्चय आहे. त्यांतील भिन्न भाग एकमेकांवर बरेच अवलंबून असतात.अतएव मधमाशांप्रमाणें जंगलालाही जंतू मानण्यास हरकत नाही."

मग आपण म्हणूं, "कांहो ! मग त्या जंगलांतील पक्षी, कीटक व गुरें हीं ज्याअर्थीं एकमेकांस अविरोधी व परस्परावलंबी आहेत, त्या अर्थीं त्यांनाही मिळून एक सेन्द्रिय जंतु का मानूं नये? "

हेंही ते कबूल करतील. कोणत्याही एकमेकांशी अविरोधि व परस्परावलंबी समुच्चयाला जंतु मानण्यास त्यांच्या मतें प्रत्यवाय नाही. वाटेल त्या गोष्टींतील संबंध व परस्परावलंबित्व तुम्ही दाखवा की,

(पूर्वी म्हटल्याप्रमाणें) उत्क्रांतिवादाअन्वयें इच्छेस येईल त्यापासून मनास वाटेल तें निर्माण होतें असें मानण्याची तुम्हांस मुभा आहे.

ईश्वराच्या त्रिमूर्तित्वावर विश्वास ठेवणारांना त्यांचें मत चुकीचें आहे हें सिद्ध करून दाखविणें मोठें कठीण आहे पण त्यांना निदान हें सांगतां येईल की त्यांचें म्हणणें ज्ञान (अनुभव) जन्य नसून विश्वासमूलक आहे. आणि ते जर देव तीन आहेत असें म्हणत असतील तर देव साडेसत्रा आहेत असें म्हणण्याचा आम्हांलाही तितकाच हक्क आहे. याच रीतीचें पण अधिक जोरकस उत्तर आपण अधिभौतिक शास्त्रज्ञांना व उत्क्रांतिवाद्यांना देऊं शकतों. त्यांच्या (तर्क)पद्धतीप्रमाणें तुम्ही म्हणाल ते मी सिद्ध करून देऊं शकेन. आणि आश्चर्य हें की अधिभौतिक शास्त्र स्वत:च्या पद्धतीला शास्त्रीय अगर सत्यज्ञानजन्य मानतें, पण शास्त्रानेच 'शास्त्रीय पद्धति' म्हणजे 'तारतम्य' अशी व्याख्या केली आहे. आणि तारतम्यानेच जर विचार केला तर पावलोंपावलीं वरील (नामधारी) शास्त्राच्या चिंधड्या उडतात.

ज्याप्रमाणें पूर्वी संतपदावर असलेल्यांचें संतपण संपुष्टांत आल्यावर ते स्वत:ला (उदाहरणार्थ पोप किंवा धार्मिक हक्कांसंबंधीं उद्भवणाऱ्या प्रश्नांचा निकाल देणाऱ्या 'सायनॉड' मधील सभासद) 'पवित्र'च्या ऐवजीं 'अत्यंत पवित्र' म्हणवीत असत तद्वत् या शास्त्रांतही बुद्धिग्राह्य कांही नाही अशी शास्त्रज्ञांची खात्री पटतांच त्यांनी आपणांस 'बुद्धिग्राह्य' ऊर्फ 'शास्त्रीय' असें विशेषण लावण्यास सुरुवात केली.

प्रकरण एकतिसावें

श्रमविभाग हा सर्व विद्यमान प्राण्यांतील मुख्य नियम होय, सबब मानव समाजांतही तो असलाच पाहिजे. हें कदाचित् खरें असेल. पण आज रूढ असलेली श्रमविभागणी योग्य आहे की नाही हा प्रश्न पुनः उरतोच. कारण एखादी विशिष्ट श्रमविभागणी लोकांना जर असमंजसपणाची व अन्यायमूलक वाटत असेल तर कोणत्याही शास्त्राला ती असमंजस व अन्यायमूलक श्रमविभागणी कायम राहणें श्रेयस्कर आहे हें सिद्ध करितां येणार नाही.

'सत्ता' ही ईश्वरप्रणीत आहे असें धर्मतत्वाने सिद्ध केलें,पण कोणाची सत्ता ईश्वरप्रणीत मानायची हा प्रश्न पुनः उरलाच. कॅथरीनची* की पुगाशेव्हची ?† धर्मशास्त्राची हवी तशी कसरत करून सुद्धा या प्रश्नाचें उत्तर मिळूं शकत नाही.

"आध्यात्मिक" तत्वज्ञानाने राज्य हें व्यक्तीचें परिणत स्वरूपांतील प्रतिबिंब आहे असें सिद्ध केलें; पण पुनः प्रश्न उरलाच. या व्याख्येप्रमाणें कोणच्या राज्यास व्यक्तीचें परिणत रूप मानायचें ? नीरोच्या की चंगीझखानाच्या? कितीही शब्दावडंबर केलें तरी हा प्रश्न सुटणें शक्य नाही. हाच प्रकार शास्त्राचा.

मानवजातींच्या जीवनाच्या विकासाला श्रमविभाग ही एक आवश्यक गोष्ट आहे, पण मानवजातींतील कोणत्या गोष्टींना (समाजवृद्ध्यर्थ) आवश्यक श्रमविभाग समजायचा ? शास्त्राने 'टेपवर्म' जंतूंतील श्रमविभागाचा कितीही अभ्यास केला तरी 'टेपवर्म' जंतूच्या निरीक्षणाच्या भरंवशावर उघडपणें अग्राह्य व सदसद्विवेक बुद्धीस न पटणारा श्रमविभाग माणसाच्या गळीं उतरविणें अशक्य आहे.

ज्या जंतूंचें आम्ही परीक्षण करूं त्यांतील परिमाणूंमध्ये श्रमविभाग असल्याबद्दल कितीही बिनतोड प्रमाणें आम्हाला मिळालीं तरी ज्याची

---

* कॅथरीन (II) दि ग्रेट इने १७६१–१७९६ पावेतों राज्य केलें.

† १७७३–५मध्ये रशियांत चाललेल्या एका शेतकऱ्यांच्या बंडाचा पुगाशेव्ह हा पुढारी होता. याने वरींच शहरें काबीज करून धुमाकूळ घातला होता.

बुद्धि ठिकाणावर आहे अशा कोणालाही एखाद्यानें जन्मभर हातमागाशींच खटखट करावी हें पटणें शक्य नाही. असलें काम म्हणजे श्रमविभाग नव्हे; हा जुलूम आहे.

स्पेन्सर वगैरे म्हणतात की कोष्टयांचे थवेच्या थवे आहेत. याचा अर्थ असा की कापड विणणें हा एक आवश्यक श्रमविभाग आहे. पण हें त्यांचें म्हणणें व पूर्वीच्या धर्मनिष्ठांचा खुलासा हीं एकसारखींच होत.

'सत्ता' म्हणजे कांही का असेना, पण ती आहे तस्मात् ती 'ईश्वर-प्रणीत' आहे. विणकरी आहेत म्हणजेच 'विणणें' हा योग्य श्रमविभाग आहे –या म्हणण्यांतही तितकें तथ्य नाही. कारण जर सत्ता व कोष्टी हीं स्वयंभू उद्भवलीं असतीं तर असें म्हणणें यथार्थ ठरलें असतें. पण या-पैकी कोणीही स्वयंभू नसून आम्हींच यांना निर्माण केलें आहे हें आम्हीं जाणतों. म्हणून 'सत्ता' ईश्वरेच्छेने उद्भवली की आम्ही स्वेच्छेने निर्माण केली किंवा विणकरी निर्माण झाले ते एखाद्या समाजवर्धक अशा स्वयंभू नियमानुसार झाले किंवा इतर कारणांनी आम्हीं त्यांना निर्माण केलें हें समजून घेतलें पाहिजे.

माणसें शेती करून उपजीविका करतात व हेंच सर्वांनी करावयास हवें. एकजण भट्टी पेटवून आपला नांगर दुरुस्त करतो. त्याचा शेजारीही आपला नांगर दुरुस्त करून देण्याबद्दल पहिल्यास विनंती करतो, व मोबदल्यांत त्याचें एखादें काम करून देण्याचें किंवा पैसा देण्याचें कबूल करतो. नंतर इतर शेतकरीही असेंच करतात व श्रमविभागाला सुरुवात होते आणि शेवटीं लोहार निर्माण होतो. दुसरा एखादा स्वतःच्या मुलांना उत्तम शिकवितो म्हणून त्याचा शेजारी आपलीं मुलें शिक्षणाकरितां त्याच्या हवालीं करतो; आणि शिक्षक निर्माण होतो. पण तो लोहार व हा शिक्षक कोघेही लोकांच्या विनंतीमुळे त्या त्या विशिष्ट धंद्यांत येऊन पडतात व लोकांना जोंवर त्यांची गरज असेल तोंवरच ते तो विशिष्ट उद्योग करतील. पण समजा बरेच लोहार अगर शिक्षक पुढे आले, अथवा समजा लोकांना त्यांच्या कामाची गरज उरली नाही, तर तारतम्यानें तरी असें स्पष्ट दिसतें–व श्रमविभागावर इतर कारणांचा दबाव नसेल तर असेंच नेहमी होईल–की ते लोक हे धंदे सोडून पुनः शेती करूं लागतील.

जे लोक असे वागतात त्यांना बुद्धि व सदसद्विवेक आहे, म्हणून बुद्धि व सदसद्विवेक जागृत असणारे जे आम्ही ते हा श्रमविभाग योग्य आहे, असें म्हणतों.पण समजा स्वत:चीं कामें दुसऱ्याला करावयास भाग पाडणें लोहारांना शक्य झालें व लोकांना गरज नसलेले नालच ते तयार करूं लागले,किंवा एकही विद्यार्थी नसतां शिक्षक शिकविण्याचें काम करण्याचाच हट्ट धरून बसला तर कोणत्याही विवेक व बुद्धि असणाऱ्या माणसाला स्पष्ट दिसून येईल की, हा श्रमविभाग नसून दुसऱ्यांच्या श्रमाची ही सक्तीची लूट आहे. कारण अशानें श्रमविभागाचें जें एकच गमक त्याचें अतिक्रमण होईल. हें गमक असें. खऱ्या श्रमविभागांत लोक एखाद्या विशिष्ट कामाची स्वत: मागणी करतात व त्याबद्दल द्यावयाचा मोबदला खुषीने देतात. पण आज शास्त्र ज्याला श्रमविभाग म्हणतें तो श्रमविभाग असा स्वाभाविक नसून त्यांत शास्त्र या जुलुमाच्या रामरामाला 'श्रमविभाग' म्हणतें.

लोकांना कल्पनेंत सुद्धा नसतील अशा जिनसा (कांही) लोक तयार करतात आणि या कामाबद्दल इतरांनी आपणांस पोसावें अशी हे कामगार हक्काने अपेक्षा करतात आणि वर खुलासा देतात की, आम्ही करतों तें योग्य आहे; हा श्रमविभाग होय.

आमच्याच देशांत नव्हे तर सर्वत्र जगांत लोकांना ज्याचा त्रास आहे अशा सामाजिक अनिष्टांपैकीं सरकार व सरकारी अधिकाऱ्यांची भरमसाट संख्या हें प्रमुख होय. आणि आमच्या कालांतील आर्थिक विपत्तीचें कारण 'फाजील उत्पादन' (हा इंग्रजांचा वाक्प्रचार आहे) हें होय. अर्थात ज्या लोकांस नकोत अगर ज्यांचें काय करावें हें लोकांस समजत नाही अशा जिन्नसा तयार होणें. आमची श्रमविभागाची जी विचित्र कल्पना आहे तिच्यामुळे हा घोटाळा घडून आला आहे.

ज्या तऱ्हेचे जोडे लोकांनी वापरायचें केव्हाच बंद केलें असेच जोडे सतत तयार करून जर एखादा चांभार लोकांनी त्याला पोसावें अशी अपेक्षा करील तर तें आश्चर्यच म्हणायचें. पण जे अनेक लोक सरकार, धर्म (चर्च), शास्त्र, कला, इत्यादींमध्ये गुंतले असून जे प्रत्यक्ष उपयुक्त असें कांहीच निर्माण करीत नाहीत, किंवा ज्यांच्या मालाची कोणीही मागणी करीत नाही ते श्रमविभागाच्या तत्त्वाला पुढे करून, यांना लोकांनी

पोसून चांगले कपडलत्तें पुरवावे असें हवकाने म्हणतात याला काय म्हणावें ?

एखाद्या जादूगाराचे खेळ लोकांना हवेसे असतील तर त्याला भाकरी व पेय द्यावें; पण ज्यांच्या जादुगिरीची लोकांना गरज नाही असे जादूगार त्यांच्या खेळाबद्दलही लोकांनी त्यांना पोसावें असा हट्ट कसा धरूं शकतील याची कल्पना करवत नाही.

पण आज सरकार, धर्म (चर्च), शास्त्र व कला यांत गुंतलेल्यांचा अगदी असा प्रकार झाला आहे.

हें सर्व श्रमविभागाबद्दलच्या खोट्या समजुतीमुळे घडून आलें आहे. श्रमविभागाची ही (भ्रामक) व्याख्या सदसद्विवेकबुद्धिप्रेरित नसून शास्त्रज्ञांनी भयंकर जुटीनें ज्या शोधांची द्वाही पिटली तिचा हा परिणाम होय. श्रमविभाग नेहमीं होता व आहे; पण तो कसा असावा हें सद्बुद्धि व विवेक यांच्या साहाय्याने ठरेल तेव्हाच तो योग्य समजायचा. 'श्रमविभाग आहे म्हणून असूं द्या' अशाने श्रमविभाग योग्य ठरणार नाही. आणि मनुष्यमात्राची बुद्धि व विवेक यांनी या बाबतींत दिलेलें उत्तर मोठें साधें, असंदिग्ध व ऐकमत्यपूर्ण आहे.

एखाद्याच्या विशिष्ट कामाची जर लोकांना इतकी गरज असेल की, लोक त्याला ते विशिष्ट काम करण्याची विनंती करून त्याच्या कामाबद्दल आपखुशीने त्याचें पालनपोषण करावयास तयार असतील तर हा श्रमविभाग योग्य होय.

पण जर एखाद्याला लहानपणापासून वयाच्या तीस वर्षेपर्यंत लोकांच्या मानगुटीवर बसून जगतां येत असेल व याबद्दल जर तो असें म्हणत असेल की, माझें शिक्षण झाल्यावर मी तुमचेकरितां कांही तरी (लोकांना ज्याची गरज नाही असें) करीन व पुढेही जर हा अशीच वचनें देत राहून पूर्वीप्रमाणेंच (लोकांना गरज वसलेलें करीतच) आयुष्य घालवूं शकत असेल तर हा श्रमविभाग नव्हे; ही सशक्तांनी इतरांच्या श्रमांची चालविलेली लूट होय. ज्या चोरीला धर्मनिष्ठ लोक 'हरीच्छा' म्हणून संबोधीत अगर तत्वज्ञान्यांनी जिचा 'जीवनाचें अवश्य लक्षण' म्हणून खुलासा केला त्याच जुन्या चोरीला आजच्या शास्त्रज्ञांनी 'अपरिहार्य श्रमविभाग' असें नांव दिलें आहे.

आज प्रचलित असलेल्या शास्त्राचें सर्व वैशिष्ट्य यांत आहे.

अलीकडे तर शास्त्राने लोकांस आळसाचे परवाने देण्याचा मक्ता घेतला आहे. कारण समाजाच्या दृष्टीने परोपजीवी कामें व खरीं उपयुक्त कामें कोणतीं हें शास्त्रच आपल्या पवित्र शोधशाळांतून ठरवूं शकतें. जणूं काय समान्य माणसाला यांतील भेद ताबडतोब व वास्तविक स्वरूपांत कळण्यास त्याची बुद्धि व सदसद्विवेक हीं निरुपयोगीच होत !

आणि ज्याप्रमाणें पूर्वी धर्मप्रवृत्त लोक अगर सरकारें यांना समाजाला कोणत्या लोकांची अधिक गरज आहे याबद्दल मुळींच शंका-नसे त्याप्रमाणें आजची शास्त्राची कामगिरी समाजजीवनाला फार आवश्यक आहे याबद्दल शास्त्राला सुद्धा मुळीं शंका नाही असें दिसतें. नव्हे, हे शास्त्रज्ञ व कलावंत आमच्या समाजरूपी जीवाचे मेंदू होत ! ईश्वर त्यांचें भलें करो ! पूर्वीचे भट व शब्दच्छलक (शहाणे) यांप्रमाणें ते चैनींत राहून आळसांत वेळ घालवीत असले तरी आम्हांला घटकाभर चालेल मात्र त्यांनी लोकांना भ्रष्ट करूं नये म्हणजे झालें.

मनुष्य हा बुद्धिप्रधान प्राणी असल्यामुळें अगदी सुरुवातीपासून बरें व वाईट यांतील भेद तो ओळखीत आला असून आपल्यापूर्वी होऊन गेलेल्यांनी जे असे भेद करून ठेविले त्याचा तो उपयोग करीत आहे. वाईटाशीं झगडून खऱ्या मार्गावर राहण्याचा प्रयत्न करीत असतां हळूहळू कां होईना पण माणसाचें पाऊल पुढेच पडलें आहे. या त्याच्या सरळ मार्गांत वेळोवेळीं अनेक अडथळे उत्पन्न करण्यांत आले. या सर्व अडथळ्यांचा रोख एक : खऱ्याच्या भानगडींत न पडतां आपलें जुनेंच चालू ठेवा. प्रथम चर्चेचें थोतांड पुढे आलें, पण माणसाने अत्यंत खटपटीने व परिश्रमाने याला अंगाबाहेर टाकलें. पण याच्या कचाटींतून तो सुटतो न सुटतो तोंच राजकीय तत्वज्ञानी थोतांड त्याच्या बोकांडीं बसलें. हीही शृंखला माणसाने तोडिली, पण आतां वरील दोन्हींवर ताण असें हें शास्त्रीय थोतांड त्याला आडवें झालें आहे.

जुन्यासारखेंच हें नवें थोतांड आहे. कसल्या तरी वरपांगी कल्पनेने आमच्या व आमच्या पूर्वजांच्या बुद्धि-विवेकांचें उच्चाटन करणें हाच पूर्वीच्या थोतांडाप्रमाणे या थोतांडाचाही उद्देश आहे. धर्मनिष्ठतेच्या काळांत

दैवी स्फूर्तीच्या बुजगावण्याने हा उद्देश साध्य झाला. आजच्या शास्त्रीय काळांत 'निरीक्षणा'चें तत्त्व हा उद्देश साध्य करीत आहे.

बुद्धि व विवेक यांना फांटा देऊन माणसाला भलत्या मार्गावर नेणें व बुद्धि-विवेकावरचा त्याचा विश्वासच नष्ट करणें ही या शास्त्राची युक्ति आहे. या (आत्म)वंचनेला शास्त्रीय पांघरूण घालून व निव्वळ बाह्य गोष्टींच्या निरीक्षणावरून माणसाच्या जीवनक्रमाचे नियम आपणांस ठरवितां येतील अशी ग्वाही देऊन हें शास्त्र लोकांची नजरबंदी करतें. आणि यामुळें बौद्धिक अवःपात होतो तो कोणता म्हणाल तर बुद्धि व विवेक यांऐवजीं निरीक्षणानेच निश्चय करतां येणें शक्य आहे असें ठरल्यानंतर या आत्मवंचित लोकांना पूर्वीच्या लोकांनी बरें वाईटाच्या ज्या व्याख्या व भेद ठरविले ते समजणेंही अशक्य होतें. यांच्या मोहक परिभाषेंत बरें वाईट या तुलनात्मक कल्पना होत असें ठरतें. ते म्हणतात, "यांत कांही अर्थ नाही. बुद्धीच्या साहाय्याने सत्य कळणें शक्य नाही. कारण माणूस चूक करूं शकेल. पण हा दुसरा (शास्त्रीय) मार्ग यंत्रासारखा असल्यामुळे हा मार्ग बिनचूक आहे." ते आणखी म्हणतात, "जें आहे त्याचा अभ्यास करा." त्यांच्या मतें वस्तुस्थितीचा अभ्यास सुद्धा शास्त्रानुसार अर्थात् (त्यांच्या) दोन निराधार प्रमेयांनुसार झाला पाहिजे. ही प्रमेयें कोणतीं ? तर ज्यांना अभेद्य सत्य म्हणून पुढे करण्यांत आलें तीं आधिभौतिक वाद व उत्क्रांतितत्त्व हीं.

आणि शास्त्र पूर्वीच्या धर्मनिष्ठांइतक्याच फसव्या गंभीरतेने म्हणतें की, जीवनाचे सर्व मुख्य प्रश्न निसर्ग व जीव यांचें निरीक्षण करूनच ठरवितां येणें शक्य आहे.

या जबलपूर्ण नूतन प्रमेयाने (याचा नायनाट तर दूरच राहो पण या प्रमेयावर अजून टीकेची टांकीसुद्धां लागलेली नाही) भारलेल्या तरुणांच्या थिल्लर समूहाने शास्त्राच्या ग्वाहीनुसार 'निरीक्षण' हाच सत्यशोधाचा मार्ग असें ठरवून त्यांत उडी घेतली. कारण या एकाच मार्गाने जीवनक्रमाचे प्रश्न सुटणें शक्य आहे असें राजमान्य सिद्धान्त सांगतो.

पण हे शिष्यवर या मार्गाने जसजसे पुढे जातात तसें जीवनक्रमाचे प्रश्न समजणें यांना अधिकाधिक अशक्य होतें. इतकेंच नव्हे तर त्यांची हे

प्रश्न सोडविण्याची मूळ इच्छाच नष्ट होण्याचे मार्गास लागते. कारण स्वत: निरीक्षण करण्याऐवजीं पूर्वीच्या निरीक्षकांनी जें नमूद केलें (जंतू, परिमाणू पदार्थाची चतुर्थ स्थिति*) त्यावर हे विश्वसून राहतात. वरें व वाईट यांबद्दलची त्यांची जाणीव नष्ट होऊं लागून मानवी समाजाने केलेल्या वरे वाईटाच्या व्याख्या समजण्यासही ते असमर्थ बनतात. प्रत्यक्ष वस्तुस्थितीशीं संबंध नसलेलें शब्दावडंबर ते मान्य करूं लागतात व अंधकारपूर्ण अशा निरीक्षणसाम्राज्यांत ते वाढत्या प्रमाणांत संचार करूं लागतात. सरतेशेवटीं त्यांचें शास्त्र अगर धर्मग्रंथ यांच्या वाहेर असणाऱ्या मानवी विचारांचा विचार करण्यास किंवा स्वतंत्र बुद्धीने विचार करण्यास ते असमर्थ होतात आणि सर्वांत महत्वाची गोष्ट अशी की, ऐन तारुण्यांत हे तरुण स्वत:स श्रमजीवी आयुष्यक्रमाची संवय न लावतां स्वत:चा आलस्यमय आयुष्य-क्रमच योग्य आहे असें समजूं लागतात. अशा प्रकारें हे तरुण शेवटीं (परिश्रमाच्या दृष्टीने) प्रत्यक्षत: अजागलस्तनवत् परोपजीवी होऊन पूर्वीच्या धर्मनिष्ठ लोकांप्रमाणें स्वत:च्या मेंदूची खच्ची करून बुद्धिषंढ बनतात. पूर्वीच्या लोकांप्रमाणेंच, ते जितके मठ्ठ होत जातात तितक्या प्रमाणांत यांचा आत्मविश्वास वाढत जातो, म्हणून सरळ व स्पष्ट विचार करण्याच्या सोप्या मार्गाकडे ते वळण्याचा यत्किंचित्ही संभव वाढत्या प्रमाणांत नष्ट होतो.

---

* टॉलस्टायने हा ग्रंथ लिहिला तेव्हा सर वुल्यम क्रुक्सचा, Fourth state of matter हा नवलाईचा विषय होता.

प्रकरण बत्तिसावें

मनुष्यजातींत श्रमविभाग नेहमी होता व पुढेही बहुधा नेंहमी राहील. पण आपणापुढे श्रमविभाग आहे व पुढेही राहणार की काय हा प्रश्न नसून श्रमविभाग न्यायपूर्ण करण्यास आपण काय केलें पाहिजे हा आहे. आम्ही निरीक्षणाचें गमक मान्य केल्याने खरोखरी सर्वच गमकांचा अव्हेर केल्यासारखें होऊन आम्हांस सोईचा असा श्रमविभाग अस्तित्वांत असलेला दिसला की आम्ही त्याला योग्य समजून मान्य करण्याचा संभव असतो व शास्त्र आज हेंच करीत आहे.

श्रमविभाग ! कांही लोक बौद्धिक व आध्यात्मिक कामांत गुंतले असून कांही मेहनतीचीं कामें करताहेत. लोक हें विधान किती आत्मविश्वासाने करतात ! त्यांना स्वत:लाच यावर विश्वास ठेवावासा वाटतो व या श्रमविभागाने एकमेकांच्या श्रमांची अगदी बरोबर देवघेव होते असेंच लोकांना वाटतें. पण वस्तुत: हा श्रमविभाग म्हणजे फार जुन्या 'बळी तो कानपिळी' या तत्त्वाचेंच स्पष्ट रूप होय.

"तूं-नव्हे-तुम्हीं (कारण एकाचें पोषण करण्यास अनेकांना श्रम करावे लागतात) माझें पोषण करा, मला कपडे द्या व माझीं सर्व कामें करा. हें मी तुमच्यापासून हक्काने मागतों. कारण लहानपणापासून याची मला सवय आहे आणि तुमच्याकरितां मी मला शक्य असलेलें व माझ्या सवयीचें बौद्धिक काम करीन. मला तुम्ही शरीरास अवश्य असें अन्न द्या; मी तुम्हांला बौद्धिक अन्न पुरवीन." (दिसतें हें वाजवी आहे व ही देवघेव आपखुशीची असती तर ती वाजवी ठरलीही असती. जे लोक शारीरिक अन्न पुरवितात त्यांना स्वत:ला आध्यात्मिक अन्न मिळण्यापूर्वी जर इतरांना शारीरिक अन्न पुरविणें भाग न पडेल तर हें योग्यच ठरेल)

आध्यात्मिक खाद्य देणारा म्हणतो, " मी तुम्हांला आध्यात्मिक खाद्य पुरवावें म्हणुन तुम्हीं मला अन्न-दारू इ. पुरवा व माझी घाण उपसा." पण शरीरास अवश्य अन्न उत्पन्न करणारास हें सर्व बिनशर्त व स्वत:तर्फे कांहीही मागणी न सांगतां करावें लागतें. इतकेंच नव्हे तर त्याला

आध्यात्मिक अन्न मिळो अगर न मिळो त्याला मात्र हें द्यावेंच लागतें. हा सौदा जर आपखुषीचा असता तर दोघांच्याही अटी समतोल असत्या.

मनुष्याला खाद्यपेयांइतकीच 'आध्यात्मिक अन्ना'चीही गरज आहे हें आम्हाला मान्य आहे. शास्त्रज्ञ व कलावंत म्हणतो, "आम्ही समाजाला आध्यात्मिक खाद्य देऊं शकण्यापूर्वी समाजाने आम्हाला शारीरिक खाद्य पुरावावयास हवें." पण शारीरिक खाद्य पुरविणारा "मी शारीरिक खाद्य पुरवूं शकण्यापूर्वी मला बौद्धिक अन्न हवें व तें मिळाल्याशिवाय मी काम करूं शकणार नाही" असें कां म्हणत नाही ?

तुम्ही म्हणतां, " मला शेतकरी, लोहार, चांभार, सुतार, गवंडी, भंगी आणि इतर लोकांच्या कामाची शरज आहे. माझें काम (तुम्ही) केल्यानंतरच मी आध्यात्मिक खाद्य तयार करूं शकतों. " प्रत्येक श्रमजीवी मनुष्यानेही असेंच म्हणावें, "मी शारीरिक अन्न उत्पन्न करण्यापूर्वी मला तुमच्या आध्यात्मिक कामगिरीचें श्रमफल हवें. मला माझ्या कामांत हुरूप वाटण्याकरितां धर्मशिक्षण, सुसमाजव्यवस्था, शक्य तेथे माझ्या कामांत शास्त्रीय शोधांची मदत व मनरंजनार्थ कला हीं सर्व हवींत. मानवी जीविताचा अर्थ लावीत बसण्यास मला वेळ नाही. माझ्याकरितां हा अर्थ 'तयार' करून द्या. अन्याय अशक्य होईल असे समाजनिर्बन्ध माझेकरितां तयार करा. यंत्रशास्त्र, विज्ञान, रसायनशास्त्र इत्यादींत स्वतः गुंतून बसण्यास मला वेळ नाही. माझीं हत्यारें, माझी काम करण्याची पद्धति, माझें घर, चूल, दिवाबत्तीची व्यवस्था इत्यादि बाबतींत कशी सुधारणा करावी हें सांगणारीं भिन्न विषयांवरचीं पुस्तकें मला द्या. काव्य, कला, इत्यादींच्या व्यासंगाकरितां मला वेळ नाही. परंतु मानसिक उत्तेजनाची व रंजनाची मला जरूर आहे, त्याकरितां कलाकृति तयार करून मला द्या. तुम्ही म्हणतां 'इतर लोक आमचीं अंगमेहनतीचीं कामें न करतील तर आमचें अधिक महत्वाचें (आध्यात्मिक) काम आम्हाला करतां येणार नाही.' पण मी (कामगार) म्हणतों की, ' मला माझ्या बुद्धीस पटेल अशी धर्मशिकवण, माझ्या कामाची हमी देणारी शहाणी राज्यव्यवस्था, माझ्या कामास उपयोगी पडणारें शास्त्रीय ज्ञान व कामांत हुरूप वाटेल अशीं मनरंजनाचीं साधनें मिळाल्याशिवाय मी सुद्धा माझीं तुमच्याइतकींच महत्वाचीं, नांगरणी,

खताची नेआण, तुमची घाण निस्तरणें इत्यादि कामें करणें शक्य नाही. आतापावेतों जें आध्यात्मिक अन्न तुम्ही मला दिलें तें मला मानवत नाही. त्याचा कोणाला काय उपयोग होऊं शकेल हें सुद्धा मला कळत नाही. आणि जोंवर मला परवडेल असें आध्यात्मिक खाद्य मला मिळणार नाही तोंवर मी तुम्हांला खाद्यपेयें, कापड इ० पुरविणार नाही.' कामगार असें उत्तर देईल तर काय परिणाम होईल बरें !

तो जर असें म्हणाला तर त्याचें म्हणणें थट्टेवजा आहे असें म्हणतां येणार नाही, कारण त्याचें म्हणणें अत्यंत न्याय्य आहे.

वास्तविक कामगाराने असें म्हणण्यांत बुद्धिजीवी लोकांच्या मानाने सत्याचा अधिक अंश आहे आणि कामगाराला आगाऊ आध्यात्मिक अन्न का पुरवूं नये याचा खुलासाही बुद्धिप्रधान (कामें करणाऱ्या) माणसाल सांगतां येणार नाही. कामगाराने (आगाऊ) शारीरिक अन्न पुरविण्याच्या बाबतींत अशी अडचण असते की त्यालाच विचाऱ्याला पुरेसें अन्न नसतें.

अगदी साधी व वाजवी अशी ही मागणी जर आमच्यापुढे मांडण्यांत आली तर आम्ही मेंदूचीं कामें करणारे लोक इला काय उत्तर देणार ? त्याच्या धार्मिक गरजा भागविण्यास आम्ही त्याला फिलारेटचा धर्मग्रंथ, सोकोलाव्हच्या पवित्र कथा अगर सेंट आयझाक किंवा इतर मठांमार्फत प्रसिद्ध होणारीं पत्रकें देणार, अथवा त्याच्या सामाजिक न्यायबुद्धीचें समाधान होण्यास त्याला अपील कोर्टांचे निकाल अगर निरनिराळ्या कमिशन कमिटयांचे अहवाल देणार, की त्याची (शास्त्र) ज्ञानलालसा तृप्त होण्यास रविकिरणपृथक्करण, आकाशगंगेचें वर्णन, भूमितीचीं मूलतत्त्वें, परलोकसंवादित्व आणि मध्यस्थमीमांसा किंवा (शास्त्रीय) विद्यापीठांचे अहवाल हीं देणार काय ? त्याच्या कलात्मक गरजा आम्हीं कशा भागविणार ? पुष्कीन, डोस्टाव्हस्की, टूर्जिनेव्ह, टॉलस्टॉय यांचीं पुस्तकें देणार, की फ्रेंच अगर आमच्याच चित्रकारांचीं विवस्त्र स्त्रिया, गालिचे, निसर्ग अगर खेड्यांतील देखावे इत्यादींची चित्रें देणार, की वॅगनर अगर आमच्या संगीतज्ञांचीं गाणीं देणार ? त्याला यांपैकी कांहीही सोईचें नसतें अगर तसें होण्याचा संभवही नसतो. कारण इतरांच्या श्रमफलावर आमचा हक्क असून आमचेवर 'बौद्धिक पाकनिष्पत्ती' करण्यासंबंधीं कर्तव्यवजा कांहीही

जबाबदारी नाही, अशा भ्रमांत आम्ही असल्यामुळें आमच्या कार्याचा जो एकमेव उद्देश असावयास पाहिजे तोच आमच्या नजरेआड होतो. श्रमजीवी वर्गाला काय पाहिजे हें देखील आम्हांला माहीत नसतें. आम्हांला त्यांच्या जीवनक्रमाची, त्यांच्या दृष्टिकोनाची किंबहुना भाषेची सुद्धा विस्मृति पडली आहे. खुद्द कामगाराचाच आम्हांला इतका विसर पडला आहे की आम्ही जशी एखाद्या नव्या शोधाची अगर नुकत्याच सापडलेल्या अमेरिकेची पाहणी करावी तसा आम्ही 'मजूरा'चा अभ्यास करतों.

सारांश आम्ही स्वतःकरितां शारीरिक अन्नाची हक्काने मागणी करून बौद्धिक अन्न पुरविण्याची जबाबदारी घेतों. परंतु आमची श्रमविभागाची कल्पनाच इतकी विचित्र आहे की (तिला अनुसरून) आम्ही प्रथम खातों, इतकेंच नव्हे तर आमच्या पूर्वीच्या पिढ्यान पिढ्या कवडीची निष्पत्ति न करतां खातपीत आल्या आहेत. मोबदला म्हणून लोकांना देण्याकरितां आम्ही जें तयार करतों तें फक्त आमच्या दृष्टीने व आम्हांसच उपयुक्त असतें. पण ज्यांच्या श्रमाचा मोबदला म्हणून आम्ही तें देणार– आणि या ढोंगाच्या भरंवशावरच आम्ही त्यांच्या श्रमफलाचा आगाऊ उपभोग घेतों–त्यांच्या मात्र तें कामीं येत नाही, इतकेंच नव्हे तर त्यांना तें कांही तरी गौड बंगाल वाटून त्याचा ते तिरस्कार करितात.

आमच्या धुंदींत आम्ही पत्करलेली जबाबदारी इतकी साफ विसरून गेलों आहोंत की आमच्या कामाचा उद्देश काय हेंच मुळीं आमच्या लक्षांत नाही आणि मोबदला म्हणून आम्ही ज्यांचो खरोखर सेवा करावयास हवी त्यांनाच आम्ही आपल्या शास्त्रीय व कलाविषयक कामगिरींत निरीक्षणाचा विषय बनविलें आहे.

आम्ही त्यांचें जें निरीक्षण व वर्णन करतों तें आमच्या मनोरंजनाकरितां. त्यांचें वर्णन अगर त्यांचीं चित्रें रंगविण्याऐवजी आम्ही त्यांची सेवा करावयास हवी हें आम्ही साफ विसरून गेलों आहोंत.

आम्हांला आमच्या कर्तव्यांचा इतका विसर पडला आहे की आम्ही जें करूं म्हणून आश्वासन दिलें तें काम आमच्या ऐवजी दुसऱ्याच कोणीतरी केलें आहे, व आमची जागा भरून काढली आहे, ही गोष्ट आमच्या ध्यानीं मनीं देखील नाही. कारण आमचा इकडे वाद चाल असतां—कधी धर्ममार्तंड

'कुमारी मेरी'च्या पावित्र्यावद्दल भांडतात, तर कधी आमचा जंतूवद्दल तर कधी आध्यात्मिक विषयावर वाद होतो; क्वचित् आमच्यांत 'अणूं'-बद्दल तर क्वचित् ' सेंद्रिय जंतु स्वतंत्रपणें पुनः पुनः उद्भवतात ' या तत्त्वाबद्दल चर्चा होते, तर कधी प्राण्यांच्या मुळाशीं जो चैतन्यद्रव असतो त्याच्या रचनेबद्दल आम्ही वाद करतों—तिकडे लोकांना आध्यात्मिक अन्नाची गरज होतीच. याचा परिणाम असा झाला की, ज्यांना आमच्या 'शास्त्र कलां'नी वाळींत टाकलें होतें अशा इतर लोकांनी हें बौद्धिक अन्न केव्हाच पुरवावयास सुरुवात केली. गेल्या चाळीस वर्षांपासून इतरत्र युरोपांत व दहा वर्षांपासून खुद्द रशियांत लक्षावधि पुस्तकें, चित्रें, पद्यावल्या, इत्यादि विकलीं गेलीं आहेत. व नाटकें होत असून लोकांचें नाटकें पाहणें, गाणें इत्यादि सुरू आहे व त्यांना बौद्धिक अन्न मिळत आहे. पण ज्या आम्हो हें काम करण्याचें आश्वासन देऊन आमच्या आळसाचें समर्थन करीत आलों ते आम्ही मात्र निव्वळ तोंड वासून पाहात आहोंत.

आम्ही तज्ञ आहोंत ! आमचें विशिष्ट काम आहे ! आम्ही समाजाचे मेंदू ! ते आम्हांला पोसतात व आम्ही त्यांना शिकविण्याचा मक्ता घेतला आहे ! आम्ही त्यांना काय शिकविलें अगर शिकवित आहोंत ? ते बिचारे शेकडों वर्षें वाट पहात बसले. पण अजून आम्ही आमच्यांतल्यांनाच परस्पर शिकवीत बसलों आहोंत. त्यांना तर आम्ही केव्हांच विसरलों. आम्हांला त्यांचा इतका विसर पडला की निराळ्या लोकांनीच त्यांच्या बौद्धिक गरजा भागविण्यास सुरुवात केली. आम्हांला त्याची वार्ता सुद्धा नाही. आमचें श्रमविभागाचें सोंग असें पोकळ होतें. हें सर्व इतकें स्पष्ट आहे की 'आम्ही कामगार वर्गावर मोबदला म्हणून अमुक अमुक उपकार करतों' असें आम्ही म्हणतों तें सर्वस्वी निर्लज्जपणाचें ढोंग होय.

प्रकरण तेहतिसावें

एकेकाळीं आमच्या आध्यात्मिक जीवनावर धर्माचा (चर्चचा)पूर्ण पगडा होता. आम्ही जगाचें कल्याण करणारे असा लोकांना भरवसा देऊन धर्मचालक स्वत: जीवनकलहाचीं (शारीरिक) कामें करण्याचें टाळीत, पण असा कामचुकारपणा सुरू होतांच धर्म ध्येयभ्रष्ट झाला व लोक धर्मपराङ्मुख झाले. धर्मप्रवर्तकांचा जो नाश झाला तो त्यांच्या चुकांमुळे नव्हे, तर पूर्वकाळीं कान्स्टन्टाईनच्या आमदानींतच त्यांनी सरकारी मदतीने श्रम-जीवनाचा निसर्गसिद्ध नियम धाब्यावर बसविला म्हणून. ते आळसांत व चैनींत राहूं लागल्यामुळे धर्मांत प्रमाद शिरला. या सवलतीमुळे पुढे लोक-सेवाव्रत पत्करलेल्या धर्मचालकांनी लोकांची फिकीर करण्याचें सोडून दिलें व ते स्वत:च्या धर्मपीठाचीच अधिक काळजी वाहूं लागले, आणि धर्म-खात्यांतील नोकरांनी आळस व चैन यांत मनमुराद लोळण्यास सुरुवात केली.

यानंतर राज्यसंस्थेने लोकांच्या जीवनास वळण लावण्याची जबाबदारी पत्करिली. आम्ही लोकांकरितां न्याय, शांतता, सुरक्षितता, सुव्यवस्था राखूं व लोकांच्या भौतिक व आत्मिक गरजा भागवूं, असें राज्यसंस्थेने आश्वासन दिल्यामुळे जे लोक राज्यव्यवस्थेंत गुंतले त्यांनी सदर सबबीवर श्रमांतून आपलें आंग काढलें, आणि संधि सापडतांच पूर्वीच्या धर्मप्रवर्तकांप्रमाणें हे लोकांचें श्रमफल लुबाडूं लागले. पुढे यांनाही लोककल्याणाऐवजीं राज्यसंस्थेचें हितच जास्त महत्त्वाचें वाटूं लागलें, आणि रोम, फ्रान्स, इंग्लंड, रशिया आणि अमेरिका इत्यादि यच्चयावत् देशांत राजापासून रंकापावेतों सर्व सरकारी नोकर आळस व चैन यांत लोळूं लागले. यामुळे लोकांचा राज्यसंस्थेवरचा विश्वास उडाला आणि यापेक्षा वेबंदशाही पत्करली असें बऱ्याच जणांना वाटूं लागलें.

आम्हांला लोकांचें श्रमफल लुबाडण्याचा हक्कच आहे असें मानण्यास सुरुवात केल्यामुळे राज्यसंस्थेची लोकप्रियता नष्ट होऊन कांही लोक तर बुद्धिपुरस्सर अराजकतेचें ध्येय लोकांसमोर पुढे ठेवूं लागले आहेत. लोकांचें श्रमफल लुबाडण्याचा स्वत:स हक्क आहे असें समजण्यास सुरुवात केल्याबरोबर लोकांचा राज्यव्यवस्थेसंबंधींचा आदर नष्ट झाला.

हाच प्रकार राज्यव्यवस्थेचें समर्थन करण्याचा चंग बांधलेल्या शास्त्र-कलांनी सरकारी मदतीने सुरू केला आहे. यांनीही आळस व चैन यांवरील स्वत:च्या हक्कांबाबत करार करून घेतल्यामुळें धर्मप्रवर्तक व राज्यव्यवस्थापक यांप्रमाणें हे (शास्त्रज्ञ-कलावंत) ही ध्येयच्युत ठरले आहेत.

ही चूक शास्त्रज्ञांकडून घडली याचें सुद्धा कारण हेंच की, यांनी श्रमविभागतत्त्वासंबंधीं चुकीचा दृष्टिकोण मान्य करून स्वत:ला लोकांचें श्रमफल लुबाडण्याचा हक्क आहे असें गृहीत धरलें, म्हणून स्वत:चें लोक-कल्याणाचें ध्येय विसरून लोककल्याणाऐवजीं शास्त्र व कला यांची उन्नति हेंच आपलें ध्येय आहे असें हे समजूं लागले. यांनीही पूर्वीच्या लोकांप्रमाणें आळसाच्या व दुर्गुणाच्या गर्तेत उडी घेतली. फरक इतकाच की, पूर्वीच्या लोकांचा अध:पात विषयोपभोगाने डागळलेला होता तर आजच्या शास्त्रज्ञांचा अध:पात बौद्धिक आहे.

शास्त्र व कला यांमुळे मानवजातीचें कल्याण झालें आहे असें म्हणतात तें योग्य आहे.

धर्म व राज्यसंस्था यांनी सुद्धा बरेंच लोककल्याण केलें आहे; पण हें त्यांच्या नाइलाजाने झालें तितकेंच. सर्व प्राणिमात्रांस स्वभावसहज असा श्रमजीवनाचा नियम त्यांनी घाब्यावर बसवला व त्यांनी व त्यांच्या मदतनिसांनी अधिकाराचा दुरुपयोग केला म्हणून तें लोककल्याण साधलें असें मात्र नव्हे. त्याचप्रमाणें शास्त्र व कला यांमुळे जें थोडें लोककल्याण झालें असेल तें त्यांचा नाइलाज होऊन झालें तितकेंच. श्रमविभागाचें तत्त्व पुढे करून त्यांनी लोकांच्या मानगुटीवर बसण्यास सुरुवात केली म्हणून लोककल्याण झालें असें मात्र नव्हे. रोमची लोकसत्ता प्रभावशाली होती याचें कारण रोमन लोक विलासांत राहूं शकत होते हें नसून, त्यांच्यांत खरोखरच कांही थोर नागरिक होते हें होय. हेंच शास्त्र व कला यासंबंधीं समजायचें.

शास्त्र व कला यांनी जें पुष्कळसें मनुष्यमात्राला दिलें आहे तें, ज्या थोडया विद्वानांनी स्वत: आळस व चैन यांच्या मानगडींत न पडतां परिश्रम केले, त्यांच्या श्रमांचें फल आहे. शास्त्रज्ञांना व कलावंतांना पूर्वी क्वचित् व अलीकडे निरपवादपणें आळसांत व चैनींत राहतां येतें म्हणून नव्हे.

जे शिकलेले लोक व कलावंत श्रमविभागाच्या खोटया तत्त्वाचा आश्रय घेऊन दुसऱ्याचें श्रमफल लुबाडण्याचा स्वत:स हक्क आहे असें

म्हणतात, ते खरें शास्त्र व खरी कला यांची उन्नति करण्यास असमर्थ आहेत. कारण खोटचा बीजापासून खरें फल उद्भवूं शकत नाही.

आम्हांला लाडावलेले, गुटगुटीत, नेभळट असेच शास्त्रज्ञ व कलावंत पाहण्याची इतकी सवय झाली आहे की एखाद्या शास्त्रज्ञाने अगर कलावंताने नांगरणी करावी अथवा खताची गाडी हांकलावी ही कल्पनाच आम्हांला विचित्र वाटते. आम्हांला वाटतें की, हा गाडीवर बसतांक्षणीं याच्या बुद्धिमत्तेच्या ठिकऱ्या उडतील, आणि खताच्या घाणीमुळें त्याची सुंदर कल्पनाचित्रें मळकट होतील. पण हाच शास्त्रज्ञ अगर कलावंत जर दुसऱ्याला स्वत:साठी काम करावयास भाग पाडून स्वत:चा अर्ध्याहून अधिक वेळ चमचमीत जेवण, धूम्रपान, गपाष्टक किंवा निरर्थक वटवट व कादंबरी–वृत्तपत्रें इत्यादींचें वाचन अथवा नाटकें यांच्या पायीं खर्च करतांना दिसला तर त्याचें मात्र आम्हांला मुळीच नवल वाटूं नये, इतका आम्हांला या गोष्टींचा सराव पडला आहे. आमचा तत्वज्ञानी एखाद्या होटेलांत, नाटकांत अगर नाचपार्टींत आम्हांला दिसला तर त्याचें आम्हांस आश्चर्य वाटत नाही. किंवा जे कलावंत आमचें मनरंजन करतात ते आजन्म दारू पिऊन लोळतात अगर पत्ते खेळतात किंवा वारांगनांच्या संगतींत मग्न आहेत, किंवा याच्याही पलीकडचीं दुष्कृत्यें करीत आहेत, असें समजलें तर आम्हांला आश्चर्य वाटत नाही.

शास्त्र व कला हीं सुंदर आहेत. पण हीं सुंदर आहेत म्हणून त्यांची अध:पाताशीं सांगड घालून, म्हणजे श्रम करून स्वत:च्या व इतरांच्या जीवनक्रमास उपयोगी पडण्याचें टाळून, शास्त्र व कला यांची नासाडी केलीच पाहिजे असें कांही नाही.

शास्त्र व कला यांनी मनुष्यमात्राची उन्नति झाली आहे. होय. पण शास्त्रज्ञ व कलावंत यांनी श्रमविभागाचें कारण पुढे करून स्वत:च्या शिकवणीने किंबहुना आचरणानेही, लोकांवर बळजबरीचा प्रयोग करून आणि लोकांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन मानवजातींतील मूलभूत व सर्व सामान्य अशी श्रमजीवनाची जबाबदारी टाळावी, असें शिकविले त्यामुळें मात्र नव्हे.

प्रकरण चवतिसावें

थाफवर या मंडळींचें म्हणणें पडतें तें असें, "पण या श्रमविभागामुळेच शास्त्रज्ञांना व कलावंतांना स्वतःचें अन्न स्वतः उत्पन्न करण्याची गरज पडत नाही आणि या मोकळिकीमुळेच तर सध्याची असामान्य शास्त्रीय प्रगति घडून आली आहे.

ते म्हणतात, "जर सर्वांनाच नांगर धरावा लागला असता तर आज जें साध्य झालें आहे तें होतेंना; ज्यामुळें आज माणसाची निसर्गावर कल्पनातीत हुकूमत चालते तीं साधनें उपलब्ध झालीं नसतीं; ज्योतिषशास्त्रांतील शोध लागले नसते व त्यांमळे नौकानयनाला जो सुरक्षितपणा आला आहे तो आला नसता; त्याचप्रमाणें, जहाजें, आगगाड्या, भक्कम पूल, बोगदे, वाफेचीं एंजिनें, तारायंत्र, फोटोग्राफी, टेलिफोन, शिवणयंत्रें, ग्रामोफोन. वीज, दुर्बिणी, किरणयंत्र, क्लोरोफॉर्म, जंतुविनाशक द्रव्यें किंवा कार्बोलिक आसिड हींही उपलब्ध झालीं नसतीं.

आमचें युग ज्यांचा अभिमान बाळगतें त्या सर्व सुखसोईंची यादी देणें शक्य नाही. ही यादी व तिची 'अहोरूपमहोध्वनि'वजा स्तुति वाटेल त्या लोकप्रिय पुस्तकांत अथवा वृत्तपत्रांत आढळेल. यांची इतक्या वेळां उजळणी केलेली आढळेल आणि आम्हांला या प्रगतीचा इतका अभिमान वाटतो की, ज्यूलस् व्हर्नप्रमाणें ("८० दिवसांत जगाची चक्कर" या मनोरंजक पुस्तकाचा लेखक) आम्हांलाही, पूर्वी कधीही न झालेली शास्त्रीय प्रगति आमचे काळांत झाली आहे अशी खात्री वाटते.

आणि श्रमविभागानेच जर हें सर्व शक्य झालें तर श्रमविभागाचें तत्त्व आम्हीं का बरें मानूं नये ?

घटकाभर आपण असें गृहीत धरूं की, ही प्रगति आश्चर्यकारक व कल्पनातीत आहे. (सध्यांच्या) अद्‌भुत काळांत असणारे आपण फार भाग्यवान् आहोंत असें आपण समजूं या. पण या (भाग्या)चें मोजमाप, आम्हांला काय वाटतें यावरून न करतां, ज्या श्रमविभागाच्या समर्थनार्थ या करामतीचें वर्णन होतें, त्या श्रमविभागाच्या कसोटीवरच या गोष्टीची परीक्षा करूं या. लोकांच्या श्रमांचा मोबदला म्हणून आम्हीं हीं लोकांना

देणार, सबब 'शास्त्रीय लोकांची (मोबदल्यांतील) बौद्धिक मेहनत' या दृष्टीने यांचें मोजमाप झालें पाहिजे. हे सर्व शोध आश्चर्यकारक आहेत, पण कसल्या तरी दैवदुर्विलासामुळें यांनी श्रमजीव्यांची परिस्थिति सुधारण्याऐवजी अधिकच बिघडली आहे, असें शास्त्रज्ञच स्वतः कबूल करतात.

एकीकडे एखाद्या मजुराला पायीं चालावें लागण्याऐवजी आगगाडीचा उपयोग होत असेल, पण दुसरीकडे याच आगगाडीने त्याचें जंगल ही तोडून काढलें आहे, आणि त्याच्या डोळ्यांदेखत त्याचें धान्य पळवून त्याला जवळजवळ रेल्वेमालकांचा गुलाम बनवून सोडलें आहे.

जर वाफेचीं एंजिनें व यंत्रें—यांना शतशः धन्यवाद असो—यांच्या साहाय्याने मजूराला चिटाचें रद्दी कापड उपलब्ध करून दिलें असेल, तर त्याच्या घरगुती मोलमजुरीवर याच यंत्रांनी रूळ फिरविला आहे आणि त्याला कारखानदाराचा गुलाम करून सोडलें आहे.

ज्यांचा उपयोग करण्याची कामकऱ्याला बंदी नाही अशीं तारायंत्रें अस्तित्वांत असतील; पण त्याच्यापाशीं पैसा नसल्यामुळें त्याला त्यांचा उपयोग होत नाही. किंबहुना या तारायंत्रानेच त्याचा माल पाहतां पाहतां निराळ्याच जागचे भांडवलवाले हां हां म्हणतां, व या कामकऱ्याला त्याच्या मालाला असणाऱ्या मागणीची दाद लागण्यापूर्वीं, केव्हाच विकत घेऊन बसतात. तारायंत्राचा जयजयकार असो !

जरी टेलिफोन, दुर्विणी, कविता, कादंबऱ्या, नाटकें, प्रहसनें, वादन, थिएटरें, चित्रशाळा इ० कितीही असली तरी यांमुळें विचाऱ्या मजुराची स्थिति सुधारत नाही. कारण अशाच दैवदुर्विलासामुळे हीं त्याच्या आवांक्याबाहेर असतात. सारांश, या सर्व अद्भुत साधन—शोधांनी कामकऱ्याचें—घटकाभर समजा—नुकसान केलें नसलें तरी अजून त्याची स्थिति (यांच्यायोगें) कवडीभरही सुधारली मात्र नाही; आणि शास्त्रज्ञ हें कबूल करतात.

याचा अर्थ असा की, जर आपण स्वतःला वाटणाऱ्या आनंदाऐवजीं, ज्या विशिष्ट कारणाकरितां आपण श्रमविभागाचें समर्थन करतों त्याच्या दृष्टीनें, अर्थात् कामगारास या शोधांचा कितपत उपयोग होतो या दृष्टीनें, जर या गोष्टीकडे पाहिलें तर आम्हांला असें दिसून येईल की, आम्हीं जें समाधान मानतों तसें तें मानण्यास पुरेसें सबळ कारण नाही.

शेंतकऱ्याला आगगाडीनें जातां येतें, त्याच्या बायकोस छापील चीट विकत घेतां येतें किंवा टेंभ्याचे ऐवजीं त्याच्या घरांत कंदील आहे व त्याला आगकाडीने चिलीम पेटवितां येते, हें सर्व सोईचें आहे. पण रेल्वे अगर कारखान्यांनी त्याचें हितच केलें असें म्हणण्याचा मला काय हक्क आहे ?

जर शेतकरी गाडीनें जातो अथवा कंदील, चिटाचें कापड किंवा आगकाड्यांचा उपयोग करीत असेल, तर याची त्याला कोणी मनाई करूं शकत नाही म्हणून होय. पण आगगाड्या व कारखाने हे कामकऱ्याच्या हिताकरितां सुरू केले नाहीत हें आम्हां सर्वांना माहीत आहे. सबब कामकऱ्याला यांचा जो केवळ यदृच्छया आनुषंगिक उपयोग होतो त्या यादृच्छिक लाभाचा उल्लेख करून वरील गोष्टींची उपयुक्तता सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यांत काय हंशील आहे ?

आगगाड्या व कारखाने बांधणारांना कामगारांची आठवण असलीच, तर त्याला सपशेल कसें लुबाडायचें एवढ्याकरितांच होती हें आम्हां सर्वांना माहीत आहे; आणि हा त्यांचा इरादा रशियांत, इतरत्र युरोपांत व अमेरिकेंत पूर्णपणें तडीस गेला आहे.

सर्व हानिकारक गोष्टींत कांही बरें असतेंच. एखादी आग लागल्यास त्या आगीवर आपण शेंकूं अगर चिलीम पेटवूं शकतों, तर त्या विस्तवावर आपल्याला शेकतां येईल किंवा चिलीम पेटवितां येईल म्हणून, आग लागली तें बरें झालें असें कसें म्हणतां येईल?

निदान स्वतःची तरी आम्ही फसवणूक करून घेऊं नये. आगगाड्या, कारखानें अगर मातीचें तेल किंवा आगकाड्या यांचे कारखाने काढण्यांत आमचा (खरा) हेतु काय आहे हें आम्ही सर्व जाणतों.

रूळरस्ते बांधणारा एंजिनिअर, एकतर ती सरकार अगर सैन्य यांची सोय किंवहुना भांडवलवाल्यांचा फायदा व्हावा म्हणून, बांधत असतो. यंत्रसामुग्री तयार करणारा ती स्वतःच्या व कारखाना-मालकाच्या फायद्याकरितां करीत असतो. तो जें जें करतो, तें सर्व एकतर सरकार किंवा भांडवलवाले अथवा श्रीमंत यांच्या फायद्याकरितां करीत असतो. त्याचे सर्वांत शक्कलबाज शोध एकतर तोफा, टार्पेडो, एकांतवासी बंदिखानें, दारूमक्तेदाराच्या उपयोगाचीं यंत्रें, तारायंत्रें इत्यादिकांप्रमाणें लोकांना

प्रत्यक्ष हानिकारक असे असतात, किंवा विजेचे दिवे, टेलिफोन व इतर असंख्य सोइंप्रमाणें निव्वळ निरुपयोगीच नव्हे, तर सामान्य लोकांच्या आवांक्यावाहेर असे असतात किंवा पक्षीं लोकांना फुसलावून त्यांना आपली पैन् पैं (अर्थात् श्रमांची कमाल मर्यादा) उघळून टाकण्यास उद्युक्त करणारे असे असतात. उदाहरणार्थ, निरनिराळ्या प्रकारची दारू, अफू, तंबाखू आणि यापेक्षा थोडें कमी हानिकारक पण निरुपयोगी असें चिटाचें कापड इत्यादि चिल्लर छानछोकीच्या गोष्टी, या अशा तऱ्हेच्या होत.

आगगाडया,चिटाचें कापड, लोखंडी भांडीं, विळे इत्यादि वस्तु तयार करणाऱ्या कारागिरांचें काम अंशतः लोकोपयोगी असेल तर यावरून इतकेंच सिद्ध होतें की, जगांत सर्व गोष्टींची एकमेकांशीं गुंतागुंत असल्यामुळें, हानिकारक कृत्यांपासून सुद्धा, हानि होणाऱ्या लोकांचा चुकूनमाकून कांही फायदा होऊं शकतो.

सरकार व भांडवलवाले यांच्या सेवेऐवजीं शास्त्रज्ञ व कलावंत हे जर लोकसेवेचें ध्येय पुढे ठेवते तर त्यांचें काम लोकोपयोगी आहे असें त्यांना म्हणतां आलें असतें.

आणि हे जर लोकांच्या उपयोगी पडते तर आम्हीही हें कबूल केलें असतें; पण असे (लोकसेवोत्सुक) शास्त्रज्ञ व कलावंत मुळीं आढळतच नाहीत.

सर्व विद्वान चैतन्यद्रव, ताऱ्यांचें प्रकाशपृथक्करण अशांसारख्या जडया व पवित्र विषयांमागे लागले आहेत; पण कुऱ्हाड कोणती चांगली, अगर दांडा कशा प्रकारचा बसविला तर कुऱ्हाडीने अधिक चांगलें कापतां येईल, करवत कोणती उत्तम, कणीक चांगली कशी मळावी, कोणती कणीक वापरावी, विस्तव कसा पेटवावा, शेगडी कशी बांधावी, खाणेंपिणें चांगलें कोणतें, पालाभाजीपैकी चांगली कोणती व ती शिजवावी कशी, या गोष्टींचा मात्र शास्त्र कधीच विचार करीत नाही, आणि खरें पुसाल तर हें शास्त्राचें काम आहे.

शास्त्राच्या व्याख्येवरूनच शास्त्रें निरुपयोगी ठरतात; परंतु ही व्याख्येची सबब सांगणें केवळ उद्दामपणाचें व निर्लज्जपणाचें आहे.* शास्त्राचें

---

* "शास्त्रें उपयोगाकरितां नव्हत; शास्त्रें ज्ञानाकरितांच" या शास्त्रज्ञांच्या विधानावर टॉलस्टॉयचा कटाक्ष आहे. मा. ज. का.

खरें काम लोकांची सेवा करणें हें होय. आम्ही तारायंत्र, टेलिफोन व फोनोग्राफ शोधून काढला, पण सामान्य लोकांच्या प्रत्यक्ष जीवनक्रमांत त्यांच्या उपयोगी पडेल अशी कोणती प्रगति केली ? आम्ही वीस लाख जंतूंची यादी तयार केली, पण माणसाच्या उपयोगीं पडणारें व पूर्वी माणसाळलें नव्हतें असें एक तरी नवें जनावर ख्रिस्तकालापासून आम्ही माणसाळविलें आहे काय ? एल्क, स्टॅग या जातीचीं हरिणें किंवा पार्ट्रिज, क्वेल, ग्राऊज हे (कोंबडयाच्या वर्गांतील) पक्षी अजून वन्यच आहेत. आमच्या वनस्पतिशास्त्रज्ञांनी पेशी, पेशीमध्यें चैतन्यद्रव, चैतन्यद्रवामध्यें आणखी कांही, व त्या कांहींत आणखी कांही असें शोधलें आहे. या कामाला अंत नाही व त्याची परिसमाप्ति होणें नाही, म्हणून लोकांना कशाची गरज आहे हें पाहण्याचीही शास्त्रज्ञांस फुरसद होत नाही. परिणाम असा की, अगदी जुन्या इजिप्तच्या अगर यहुद्यांच्या काळापासून जे गहूं व जी डाळ लोक पेरीत आले त्यांत एकाही नव्या, खाण्यास योग्य अशा धान्याची भर पडली नाही. नाही म्हणायला, बटाटे उपलब्ध झाले, पण तीही या शास्त्रज्ञांची करामत नव्हे.

यांनी टॉर्पेडो (विनाशिका बोटी), दारू-मक्तेदाराच्या उपयोगाचीं यंत्रें, सुधारलेले शौचकूप इत्यादि साधनें शोधून काढिलीं. पण चरखा, हातमाग, नांगर, कोयता, मळणीचा बडगा, गवत गोळा करण्याचा फावडा, जूं, बादली हीं मात्र रूरिक* राजाच्या काळांत होतीं तशींच (जवळपास) आहेत. आणि जी कांही सुधारणा यांच्यांत झाली असेलच तीही या शास्त्रज्ञांनी केलेली नाही.

कलेच्या बाबतींतही हाच प्रकार दिसतो. आम्ही अनेक लेखकांना 'प्रतिभाशाली लेखकां'च्या वर्गांत बसविलें आहे. यांच्या लेखांची छाननी करून आम्ही त्यावर टीका, प्रतिटीका, प्रतिटीकेवर टीका असे टीकापर्वत रचले आहेत; चित्रशाळा निर्माण केल्या आहेत व चित्रकलेच्या भिन्न पद्धतींचा बारकाईनें अभ्यास केला आहे. आम्ही गायनवादनाचें शास्त्र इतकें परिणत केलें आहे की, एकट्यानें तें ऐकण्यांत मौज वाटत नाही. पण खेडवळांना उपयोगी अशा दंतकथा, गोष्टी, गाणीं इत्यादींत आम्ही कांही भर टाकली आहे काय? खेडवळांकरितां आम्ही कोणतीं चित्रें अगर गाणीं तयार केली बरें ? निकोल्स्की रस्त्यांत शेतकऱ्याकरितां पुस्तकें

* रशियांतील पहिला राजा (इ० स० ८३० ते ८७९).

व चित्रें तयार केलीं जातात व टूला येथे त्यांचेकरितां गाणीं तयार होतात; पण या दोघांतही आमच्या कर्तृत्वाचा मुळीच भाग नाही.

शास्त्र व कला यांच्या ज्या अंगोपांगांचा मूळ उद्देशच लोकांच्या उपयोगी पडणें हा असला पाहिजे त्यांना चुकीची दिशा मिळाल्याकारणाने तीं लोकांस उपयोगी ठरण्याऐवजीं उपद्रवी ठरतात हा आमच्या सर्व उद्योगांस चुकीची दिशा मिळाल्याचा परिणाम सर्वांत उघड व अत्यंत लक्षांत ठेवण्यासारखा असा आहे.

एंजिनिअर, डॉक्टर, शिक्षक, चित्रकार, लेखक यांच्या धंद्याच्या उघड उद्देशावरून यांनी लोकसेवा करावयास हवी अशीच कोणाचीही कल्पना होईल. पण प्रत्यक्ष काय घडतें ? सध्याच्या रूढ प्रवृत्तींमुळें यांपासून लोकांचें निवळ नुकसान होत आहे.

एंजिनिअर किंवा यंत्रशास्त्रज्ञ याला काम करावयाचें म्हणजे भांडवल पाहिजे. भांडवलाशिवाय हा व्यर्थ आहे. याचें ज्ञानच असें आहे की, याचा उपयोग व्हायचा तर भांडवल व मजुरांना पिळवटणें या दोन्ही गोष्टी मोठ्या प्रमाणांत अवश्य असतात. शिवाय याला स्वत:लाच वर्षाकांठीं पंधराशे ते दोन हजार रूबल खर्च करण्याची संवय झालेली असते, म्हणून याला खेड्यांत राहतां येत नाही, हें निराळेंच. कारण खेड्यांत याला इतका पगार कोण देणार ? यामुळे त्याच्या बाबतींत त्याचा धंदाच मुळीं खऱ्या लोकसेवेच्या आड येतो. त्याला विशेष गणितानें एखाद्या पुलाच्या कमानीची रुंदी काढतां येईल, मोटारची शक्ति इत्यादीचें गणित करतां येईल. पण शेतकऱ्यांच्या साध्या प्रश्नांपुढें मात्र हा हात टेकील. नांगर अथवा गाडी यांत कशी सुधारणा करावी, नाले ओलांड-ण्यास कोणती योजना करावी, या सर्व प्रश्नांसंबंधी आणि (सामान्यत:) शेतकऱ्यांच्या परिस्थितींत कशी सुधारणा करावी या बाबतींत मात्र, एखाद्या अगदी अडाणी शेतकऱ्याला देखील जें समजतें, तें सुद्धां याला समजत नाही. त्याला मोठा वर्कशाप द्या, त्याला हवे तितके मजूर द्या, त्याच्याकरितां परदेशांतून यंत्रसामुग्री मागवून द्या आणि मग पहा याची करामत. पण ज्या परिस्थितींत लक्षावधि लोकांना राबावें लागत आहे त्या लोकांचे श्रम कसे हलके होतील याबद्दल त्याला कांहीच समजत नाही

व त्याच्या संबंधी, घंटा व गरजा यांमुळें अशा प्रकरच्या कामास तो सर्वस्वीं नालायकही असतो.

डॉक्टरची गोष्ट तर याहूनही वाईट आहे. यांचें नामधारी शास्त्रच असें आहे की, जे स्वतः कांही न करतां दुसऱ्यांच्या श्रमांवर ताबा चालवूं शकतात अशा आळशांनाच हा (डॉक्टर) उपचार करूं शकतो. याला असंख्य महागरीं उपकरणें, हत्यारें, व औषधें लागतात. याला आरोग्याच्या दृष्टीने बांधलेल्या खोल्या, त्याच दृष्टीने शिजविलेलें अन्न, स्नानगृहें इत्यादि हवीं. म्हणजे हा शास्त्रशुद्ध कामें करणार! याच्या (भवकम) पगाराशिवाय इतर तका खर्च अवश्य असतो की, एका रोग्याला बरें करायचें म्हणजे (जे शेतकरी किंवा गरीब या डोलाऱ्याचा खर्च सोसतात त्यांपैकी) शेकडोंची उपासमार होते. याने आपलें शास्त्र शहरांतील नामांकित डॉक्टरांपासून घेतलेलें असतें, व हे डॉक्टर, जे यांच्या रुग्णालयांत जाऊन राहूं शकतील किंवा जे स्वतःच्या घरींच तात्पुरतें रुग्णालय तयार करूं शकतील, किंवा जे हवापालटीकरितां दक्षिणोत्तर कोठेंही जाऊं शकतील, किंवा अमुक एका झऱ्याच्या* गांवीं जाऊन राहूं शकतील, अशा रोग्यांनाच फक्त औषधें देतात.

डिस्ट्रिक्ट कौंसिलमधील (रशियांत आपलेकडील डि. कौं. प्रमाणेंच झेम्स्व्हो नांवाची संस्था आहे) डॉक्टरांची तर अशी तक्रार असते की, त्याला कामकऱ्याला औषध देणें शक्य नसतें. कारण ते फार गरीब असल्यामुळें त्यांना निरोगी वातावरणांत ठेवणें शक्य नसतें. तो असेंही म्हणतो की, या सर्व कामगार रोग्यांना पुरतील इतके दवाखाने किंवा डॉक्टर, मदतनीस लोक यांचाही पुरेसा पुरवठा नसतो. याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच की, लोकांच्या ज्या मुख्य संकटामुळें रोगराई उत्पन्न होते, पसरते व पसरल्यावरहीं ज्याच्यावर इलाज करण्याबाबत आपला नाइलाज होतो, तें मूळ संकट उपजीविकेच्या साधनांचा तुटवडा हें होय.

आणि इकडे पहावें तों श्रमविभागाच्या निशाणाखालीं आपल्या मदतनिसांनी गोळा होऊन गरिबांच्या मदतीस धांवून यावें म्हणून शास्त्रज्ञ आमंत्रण देत आहेत. मात्र प्रत्यक्ष पहावें तर असें दिसतें की, शास्

---

* औषधी पाण्याचे झरे, गरम पाण्याचे झरे इत्यादि विशिष्ट पाण्याचीं गांवें.

श्रीमंतांचेच–अर्थात् ज्यांना सर्व अनुकूल आहे अशांचेच–रोग बरे करण्याच्या मार्गे लागलें आहे. शास्त्राजवळ सर्व श्रीमंती उपाय आहेत आणि ज्यांच्याजवळ दातावर मारायला कवडी नाही अशा कंगालांना हेच उपाय करावयास शास्त्र सांगतें ! !

अर्थात् या उपायांना लागणारे पैसे नसतात; म्हणून हे पैसे शेतकऱ्याजवळून उकळल्याशिवाय गत्यंतर नसतें. पण या (असा पैसा उकळण्या)चा परिणाम असा होतो की, हे शेतकरी संसर्गजन्य रोग जडून आजारी पडतात व पसे नाहीत या सबबीवर त्यांच्या रोगावर उपचार होत नाही.

या डॉक्टरी विद्येचे समर्थक असें म्हणतात की, हें शास्त्र अजून पुरेसें परिणत झालें नाही.

हें उघडच आहे–आणि देव करो व तें पूर्णपणें परिणत न होवो– कारण जर हें पूर्ण परिणतावस्थेस पोंचलें तर जिल्ह्यामागें आजच्यासारखे दोन डॉक्टर, दोन परिचारिका व दोन मदतनिशिणी न राहतां असे वीस वीस लोक लोकांच्या मानगुटीवर बसतील व थोडयाच वेळांत उपचार करादयास कोणी शिल्लकच उरणार नाही. (त्या सुमारास दोनचे ऐवजी जिल्ह्यामागे वीस डॉक्टरांची तुकडी ठेवावी अशी रशियन झेम्स्त्वोपुढे सूचना होती.) ज्या शास्त्रीय मदतीचा शास्त्रज्ञ लोक उदो उदो करतात ती लोकांस करावयाची शास्त्रीय मदत निराळ्याच प्रकारची असावयास पाहिजें. मदतीचा हा खरा प्रकार मात्र अजून सुरू झाला नाही. हा प्रकार सुरू व्हायचा तर आमचे डॉक्टर, यंत्रशास्त्रज्ञ इत्यादि लोकांनी, श्रमविभागाचें तत्त्व पुढे करून, लोकांस लुबाडणें समर्थनीय समजणें प्रथम बंद केलें पाहिजे. स्वत:ला मोबदला म्हणून, हजारों तर जाऊंच द्या, पण शेकडों रूबलसुद्धा घेण्याचें बंद करून यांनी मजुरांच्या परिस्थितींत, मजुरांबरोबरच राहण्याचें सुरू करावें; आणि नंतर त्या लोकांच्या यांत्रिक, एंजिनिअरी, आरोग्यविषयक इ० बाबतींतील अडचणी दूर करण्याकडें त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग करावा. पण कामकऱ्याच्या जिवावर पोसल्या जाणाऱ्या शास्त्रज्ञांना आज कामकऱ्याच्या परिस्थितीचा पूर्ण विसर पडला आहे. त्याच्या परिस्थितीकडे शास्त्रज्ञ काणाडोळा तर करीत आहेच, पण स्वत:च्या नामधारी शास्त्राचा कामकऱ्याला कांही उपयोग नाही याबद्दल शास्त्रज्ञच त्याच्यावर उलट रागावतही आहे.

कामकऱ्यांच्या बाबतींत औषधोपचाराचें क्षेत्र एंजिनियरिंगप्रमाणें अजून तसेंच मोकळें पडलें आहे. आरोग्याच्या दृष्टीने कामाच्या तासांची विभागणी कशी करावी, खाणेंपिणें कसें असावें, कपडे केव्हा, कोणते व कसे घालावे, पादत्राण उत्तम कोणतें, थंडी-ओलाव्यापासून बचाव कसा करावा, मुलांना न्हाऊं घालण्याचा उत्तम प्रकार कोणता, त्यांच्या कपड्यांचे बंद कसे बांधावे, इत्यादि कामकऱ्यांच्या परिस्थितींतले प्रश्न अजून तसेच पडले आहेत. शिक्षकांच्या शिक्षणशास्त्रानुसार चाललेल्या उद्योगांचाही हाच प्रकार आहे. शास्त्रीय तत्त्वांस अनुसरून अध्यापनशास्त्रानेही अशीच योजना केली की, फक्त श्रीमंतांनाच शिकवितां यावें; शिक्षकसुद्धा एंजिनिअर व डॉक्टरांप्रमाणें पैशालाच कुर्निसात करतात आणि आमच्या रशियांत तर शिक्षक मुख्यत्वेंकरून सरकाराभिमुखच असतो.

आणि हें असें का असूं नये ? आदर्श शाळेंत (व जितकी ज्यास्त शास्त्रशुद्ध शाळा असेल तितकीच ती खर्चिकही असणार) खास बाकें, भूगोल व नकाशे, पुस्तकालयें आणि शिक्षक व विद्यार्थ्याकरितां विशिष्ट नियम इत्यादि व्यवस्थाच अशी असते की, तिच्यामुळें प्रत्येक खेड्यांतील शिक्षणाकरितां बसविलेल्या कराचे दर दुप्पट व्हावे. शास्त्राची मागणी ही अशा स्वरूपाची आहे.

गरिबांना स्वत:चीं मुलें कामाकरितां हवी असतात व जितका जास्त गरीब तितकीच त्याला स्वत:च्या मुलांची अधिक गरज असते. शास्त्रसमर्थक म्हणतात, "आजही शिक्षणशास्त्राने फायदा होत आहे; पण अजून त्याची प्रगति व्हावयाची आहे, ती झाली म्हणजे त्यानंतर परिस्थिति आणखी सुधारेल." पण शिक्षण जर (त्यांच्या कल्पनेप्रमाणें) सुधारलें व जिल्ह्या-मागे वीसांऐवजी शंभर–व त्याही सर्व शास्त्रशुद्ध–शाळा स्थापन झाल्या व लोकांच्या बोकांडीं जर त्यांचा खर्च बसला तर लोक जास्त भुकेकंगाल होतील व म्हणून त्यांना स्वत:च्या मुलाबाळांना कामाला जुंपण्याची विशेषच गरज भासूं लागेल.

यावर, "तर मग करावें तरी काय ?" असें लोक विचारतात.

इतरत्र युरोपांत जसें सक्तीचें शिक्षण सुरू झालें आहे त्याप्रमाणें येथेंही शाळा उघडून सरकार सक्तीचें शिक्षण सुरु करील, पण पैसा मात्र लोकांकडूनच घेण्यांत येईल. त्यामुळे लोकांना अधिक काम करावें लागून

त्यांच्या विश्रांतीला काट मिळेल, व सक्तीच्या शिक्षणाची योजना कुंठित होईल. यांतूनही खरी सुटका हीच आहे की, शिक्षकानेही एखाद्या कामगाराप्रमाणें कामगारांतच राहावें व लोक आपखुषीने जें देतील त्या वेतनावर ज्ञानदान करीत राहावें.

शास्त्रांत हा असा खोटेपणा असल्यामुळें शास्त्राकरवीं त्याचें खरें कर्तव्य जें लोकांच्या उपयोगी पडणें, तें पार पडण्याचा संभव दुरावतो. पण जो वस्तुगत्याच सर्व जनतेला सहज उपलब्ध होण्याजोगी असली पाहिजें त्या कलेच्या बाबतींत तर आमच्या बुद्धिवानांची फसवणुकीची प्रवृत्ति विशेषच स्पष्टपणें प्रत्ययास येते.

आपल्या ठराविक मूर्खपणाच्या सवबीचा आधार घेऊन शास्त्रज्ञांना कदाचित् म्हणतां तरी येईल की, शास्त्र हें शास्त्राकरितांच झटत असतें; आणि जेव्हा तें परिणत होईल तेव्हा तें लोकांच्या उपयोगी पडेल. पण कला जर खरी कला असेल तर ही सर्वांच्या, व विशेषेंकरून ज्यांच्याकरितां ती आहे त्यांच्या, उपयोगी पडलीच पाहिजे. पण आमच्या कलेकडे पाहिलें, म्हणजे आमच्या कलावंतांना लोकांना काय हवें हें जाणण्याची इच्छा नाही, लोकांच्या कसें उपयोगी पडावें हें माहीत नाही व त्यामुळें लोकांच्या उपयोगी पडण्याची त्यांच्या अंगीं मुळीच पात्रता नाही, असा जणूं काय कला शंख करीत आहे असें वाटतें.

एखाद्या चित्रकाराला काम करायचें म्हणजे त्याला एक खास दिवाणखाना (स्टुडिओ) हवा. एवढ्या मोठ्या दिवाणखान्यांत चाळीस सुतारांची किंवा चांभारांची एक कंपनीच्या कंपनी काम करूं शकेल, पण ते बिचारे जागा न मिळाल्याकारणाने थंडी वाऱ्यांत कांकडत असतात. पण इतक्यावरही हें भागत नाही. त्याला निसर्ग, प्रवास व पोषाख यांचीही गरज असते. लोकांजवळून उकळलेले लाखो रूबल 'अकॅडमी ऑफ आर्टस'ने कलेच्या अभिवृद्धयर्थ उचळलेले आहेत, पण हीं कलाभूषण चित्रें फक्त राजवाड्यांतूनच दृष्टीस पडतात. गोरगरिबांना तीं समजत नाहीत व त्याना तीं नकोही असतात.

गवयांचें गाणें व्हायचें तर त्याकरितां दोनशे लोकांचा झकपक पोषाख केलेला एक घोळका अवश्य असतो; आणि एखाद्या संगीत प्रयोगा-

साठी हजारों रूबलांचा चुराडा व्हावा लागतो. परंतु जर हे जलसे कधी काळीं गोरगरिबांना ऐकावयास मिळालेच तर त्यांना ते घोटाळ्याचे व कंटाळवाणेच वाटतात.

कोणाला वाटेल की, ग्रंथकारांना व लघुकथालेखकांना तरी स्टूडिओ, निसर्ग, वाद्यें, नट इ. साधनें किंवा विशिष्ट 'वातावरणां'ची गरज असूं नये; पण याही बाबतींत पाहावें तों लेखकालाही अभिजात वाङ्मय प्रसवावयाचें तर भपकेबाज घर, प्रवास, खास खोल्या, कला, नाटकें, तमाशे इ. सर्वांची गरज असते; आणि याचा परिणाम काय होतो म्हणाल तर ज्या लेखांची आम्ही इतकी चहा करतों ते कामकऱ्याच्या दृष्टीनें रद्दी ठरतात व त्याला त्यांची गरज नसते.

आता जर शास्त्रज्ञ व कलाभिज्ञ यांच्या मताप्रमाणें या कलावंतांची संख्या वाढली व यांच्याकरितां खेडोपाडी स्टुडिओ बांधण्याची गरज पडली तर एकंदरींत किती अनवस्था प्रसंग ओढवेल याची कल्पनाच केलेली बरी.

मला वाटतें की, कामकरी लोक असल्या एकाही ऐतखाऊ (कलावंताला) पोसण्याऐवजी ताबडतोब एकही चित्र न पाहाण्याची, किंवा एकाही जलशास न जाण्याची किंवा कोणतेंही पुस्तक न वाचण्याची ताबडतोब शपथ घेतील.

पण कोणी म्हणेल की, कामगाराला चित्रकाराचा उपयोग का होऊं नये? प्रत्येक झोपडींत येशू ख्रिस्ताचें अथवा त्याच्या आईचें अगर संताचें किंवा इतर कसलीं तरी चित्रें असतातच; प्रत्येक शेतकरी व त्याची बायको गाणीं गातात, पुष्कळांजवळ वाद्यें असतात व कैक लोक कविता म्हणतात आणि पुष्कळसे पुस्तकेंही वाचतात. अशाप्रकारें जशी कुलुपाला किल्ली तशासारखी ज्या दोघांना एकमेकांची गरज असावीशी दिसते तीं दोघें एकमेकांपासून इतकीं दूर कशीं झालीं?

एखाद्या चित्रकाराला असें म्हणा की, "बाबा स्टूडिओच्या किंवा नग्नाकृतीच्या अगर पोषाखाच्या भानगडींत न पडतां तूं आपला एक आण्याला विकतां येतील अशीं चित्रें काढ." तो म्हणेल, "असें करणें म्हणजें मी जिला कला समजतों, त्या कलेला जलसमाधी देण्यासारखेंच आहे." एखाद्या गवयाला तूं फक्त एखादें वाद्य घेऊन खेडेगावांतील लोकांना गाणें शिकव

असें म्हणून पहा. एखाद्या कवीला किंवा लेखकाला, "तूं कविता, कादंबऱ्या किंवा अन्योक्ति-उत्प्रेक्षापूर्ण अवजड वाङ्मयाच्या भरीस न पडतां, अशिक्षितांना समजतील अशीं गाणीं, पुस्तकें, गोष्टी इ० लिही," असें म्हणून पहा. हे सर्व म्हणतील, 'तुम्हांला वेड लागलें आहे!' पण ज्यांनी लोकांच्या मानसिक गरजा भागवूं या सबबीवर स्वत:ला श्रममुक्त करून घेतलें आहे अशांना स्वकर्तव्याचा इतका विसर पडावा की, ज्यांच्याकरितां यांनी काम करायचें, त्यांना योग्य असें बौद्धिक खाद्य कसें निर्माण करावें, हें तर यांना उमजूं नयेच, पण यांनी स्वकर्तव्यपराङ्मुखतेलाच सद्गुण समजावें, —हा वेडाचा प्रकार अधिक वाईट नव्हे काय ?

"पण हें सर्वत्र असेंच आहे" असें उत्तर देण्यांत येतें.

असें असेल तर सर्वत्र चाललेला प्रकार केवळ मूर्खपणाचा आहे; आणि जोंवर श्रमविभागाच्या सबबोवर आणि लोकसेवा करण्याच्या मिषानें लोक स्वत:स श्रममुक्त करून जनतेचें श्रमफल भक्षण करीत आहेत, तोपावेतों हा प्रकार असाच मूर्खपणाचा राहणार. शास्त्रज्ञ व कलावंत हे जेव्हा (सामान्य) लोकांप्रमाणें (सामान्य) लोकांत राहून स्वत:चे कांहीं हक्क न सांगतां मोकळेपणीं लोकांना आपलें ज्ञान देतील, व लोकांना तें ग्रहण करण्याची किंवा त्याचा अव्हेर करण्याची मोकळीक असेल, तेव्हाच शास्त्र व कला यांजकडून लोकसेवा घडेल.

प्रकरण पास्तिसावें

आम्ही ज्याला शास्त्र व कला म्हणतों त्यांच्या प्रगतीमुळें मानव जातीची उन्नति होते असें म्हणणें व एखाद्या प्रवाहाबरोबर खाली जाणाऱ्या होडीला वेडींवाकडीं वल्हीं मारून बचावून नेतों असें म्हणणें, हीं दोन्ही सारखींच (हास्यास्पद) होत. (प्रवाहाबरोबर वाहाणाऱ्या होडीला वल्ह्यांची मदत होत नसते; त्यांमुळें गतिरोध मात्र होतो.)

ज्याला आम्हीं श्रमविभाग म्हणतों (अर्थात् ज्यांत लोकांच्या श्रमाची लूट होते) व जो श्रमविभाग शास्त्र व कलावंत यांच्या कलाकुसरीला अवश्य होऊन बसला आहे असा हा श्रमविभागच मानवजातीच्या उन्नतीच्या मार्गांतील खरी व मोठी धोंड होता व आहे. "पैशाच्या विषम वाटणीमुळे कामगारवर्गाला शास्त्रज्ञ व कलावंत यांच्या कर्तबगारीचा उपयोग होणें शक्य नसतें." अशी शास्त्रज्ञांनी दिलेली कबुली हाच वरील सिद्धान्ताचा खराखुरा पुरावा आहे.

आणि जसजशीं शास्त्र व कला हीं पुढे जातात तशी ही वाटणीची विषमता कमी होण्याऐवजीं अधिकअधिक वाढतच जाते. आणि यांत कांही आश्चर्य नाही. कारण स्वतःच्या फायद्याकरितांच जो श्रमविभाग शास्त्रज्ञ-कलावंतांनी शोधून काढला त्या श्रमविभागामुळेच ही विषम वाटणी उद्भवते. श्रमविभाग हा अभेद्य नियम आहे असें शास्त्र म्हणतें; पण या श्रमविभागामुळें होणारी विषम संपत्ति-विभागणी अन्यायी व अनिष्ट असल्याचें शास्त्राला दिसतें. आणि असें असूनही शास्त्र असें म्हणावयाला चुकत नाही की, या श्रमविभागावर अवलंबून असणारें आमचें कार्य शेवटीं मनुष्यमात्राचें कल्याणच करील. याचा मथितार्थ असा की, कांही लोक दुसऱ्याच्या श्रमांचा प्रत्यक्ष उपभोग घेतांना दिसतात; पण यांनी ही क्रिया तशीच पुष्कळ काळपर्यंत व वाढत्या प्रमाणावर चालू ठेविली तर संपत्तीची विषम विभागणी, म्हणजे एकाने दुसऱ्याचे श्रम लुबाडणें, आपोआप थांबेल ! असा शास्त्रज्ञांच्या म्हणण्याचा अर्थ होतो !

कांही माणसें एका फोंफावत्या झऱ्याच्या तोंडाशीं उभीं असून तो झरा तहानेल्या लोकांपासून बाजूला कलविण्याचा प्रयत्न करीत आहेत; पण तोंडाने मात्र, 'आम्ही पाणी उत्पन्न करीत असून लवकरच सर्वांना पुरेल इतकें पाणी होईल' असें म्हणत आहेत ! पण जें हें पाणी सतत वाहात होतें व आहे व ज्याने मनुष्यमात्राची तहान भागते, तें पाणी, झऱ्याच्या तोंडाशीं उभें राहून प्रवाहपरिवर्तन करूं पाहणाऱ्या लोकांनी उत्पन्न तर केलेलें नाहीच, पण (वास्तविक) तें यांच्या विरोधक प्रयत्नास न जुमानतां वाहतें व इतस्ततः पसरतें.

'विशिष्ट काळीं मनुष्यास उपलब्ध असलेल्या उच्चतम सत्यावर एकत्रित होऊन निष्ठा ठेवणारे लोक' या व्याख्येनुसार 'धार्मिक लोक' नेहमी अस्तित्वांत असतात. पण स्वतःस धर्ममार्तंड म्हणविणारे लोक मात्र हे नव्हत; त्याचप्रमाणें शास्त्र व कला हींही नेहमी अस्तित्वांत आहेत; पण 'आम्ही शास्त्र व कला आहोंत' असा जीं शंख करतात तीं खरीं शास्त्रेंच नव्हत.

त्या त्या कालच्या शास्त्रप्रवर्तकांना व कलावंतांना असें वाटत असतें की, आपण जें केलें व करीत आहोंत तें मोठें अद्भुत असून आपण आता कांही तरी चमत्कार घडवून आणणार आहोंत. आपणाव्यतिरिक्त खरें शास्त्र व कला पूर्वी नव्हती व आजही नाही; असाही यांचा समज असतो. सोफिस्ट, स्कूलमेन, अलकेमिस्ट, कॅबलप्रेमी व टालमडवाले*-आळीपाळीने या सर्वांचा वरप्रमाणें समज होता व आजच्या आमच्या 'शास्त्रीय शास्त्रज्ञां'चा व 'कलेकरितां कला वाल्या' कलावंतांचाही असाच समज आहे.

---

* सोफिस्ट : हे जुन्या काळचे सत्याभास उत्पन्न करणारे पटाईत वाक्पंडित होत.
स्कूलमेन : मध्ययुगाच्या उत्तरार्धातील तत्वज्ञानी.
अलकेमिस्ट : हलक्या धातूंपासून सोनें निर्माण करण्याच्या नादास लागलेले लोक.
'कॅबल' प्रेमी : कॅबल हा फ्रेंच Cabale शब्दापासून निघालेला शब्द आहे. याचा मूळ अर्थ "मूठभर राजकीय अगर इतर कटवाले." हा शब्द इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजाच्या प्रधान मंडळाकरितां वापरीत. त्या प्रधानमंडळांतील व्यक्तींच्या नावांचीं आद्याक्षरें c, a, b, a, l अशीं होती उ. Clifford, Arlington, Buckingham, Ashley, Lauderdale.
टालमड : यहुदी लोकांचा धर्मग्रंथ. मा. ज. का.

प्रकरण छत्तिसावें

§§ "ज्ञान शास्त्र व कला—ज्यांच्या भरवशावर सर्व मानवजात जीवंत आहे —यांनाच तुम्ही मानीत नाही (याचा अर्थ काय ?)." लोक मला नेहमी हा उलट प्रश्न विचारतात. माझे मुद्दे विचारांत न घेतां त्यांना निकालांत काढण्याची त्यांची ही शक्कल आहे.

"तो शास्त्र व कला यांना मुळीं मानीत नाही. माणसाने पुनः जंगली व्हावें असें त्याचें म्हणणें आहे—कशाला ऐकतां त्याचें, आणि त्याच्याशीं वाद करण्यांत अर्थ काय" ?

पण हें म्हणणें बरोबर नाही. मी शास्त्राला अर्थात् मनुष्याच्या तर्काधिष्ठित उद्योगांना व त्यांचें प्रतीक असणाऱ्या कलेला मानीत नाही असें नाही. इतकेंच नव्हे तर खुद्द हा तर्काधिष्ठित उद्योग व त्याचें प्रतीक यांच्या हिताकरितां व ज्या पशुतुल्य परिस्थितीप्रत मानवजात झपाटयाने जात चालली आहे—आमच्या काळांतील खोटया शिकवणीचा हा प्रभाव होय !—त्यांतून मानवजातीची मुक्तता व्हावी एवढयाचकरितां माझे मुद्दे पुढे मांडीत आहें.

खाद्यपेय व कपडे यांच्या इतकीच नव्हे, तर त्यांपेक्षाही अधिक शास्त्रें व कला माणसास अवश्य आहेत (हें खरें); पण आम्ही ज्यांना शास्त्र व कला म्हणूं तीं अवश्यक असलींच पाहिजेत असें आम्ही ठरवितों म्हणून नव्हे, तर खरें शास्त्र व खरी कला वस्तुतः मनुष्यमात्राला आवश्यक आहेत.

जर एखाद्याने माणसाचें खाद्य म्हणून गवत वाळविलें, तर मी स्वतःची बळेंच कितीही खात्री पटवून घेतली तरी, वाळलेलें गवत माणसाच्या खाण्यायोग्य ठरणें अशक्य आहे. "तुला अवश्य असें जें हें वाळलेलें गवत तें तूं का खात नाहीस ?" असें मी एखाद्याला विचारणें योग्य नाही. अन्न हें अवश्य आहे (खरें), पण मी जें अन्न म्हणून देण्याचा प्रयत्न करीत आहें तें कदाचित अन्नच नसेल.

आमच्या शास्त्राचा व कलेचा अगदी हा प्रकार झाला आहे. आम्हांला असें वाटतें की, कोणत्याही ग्रीक शब्दाला 'लॉजी' (logy) चें शेपूट

लावलें की, झालें तयार शास्त्र. नग्न स्त्रियांच्या नृत्यासारख्या एखाद्या अश्लील प्रकाराकरितां जर ग्रीक शब्द वापरला व त्याला आम्ही कला म्हटलें की, झाली ती कला. पण असा आम्ही कितीही शंख केला तरी पंखदार कीटांची मोजदाद करणें, आकाशगंगेचे रासायनिक घटक शोधण्याचा प्रयत्न करणें, जलविहारिणी देवतांचीं अगर ऐतिहासिक प्रसंगांचीं चित्रें काढणें, अगर गोष्टी किंवा गाणीं रचणें इ० जीं कामें आम्ही करतों, तीं जोंवर ज्यांच्या-करितां म्हणून हीं निर्माण केलीं जातात त्यांना स्वखुषीने शास्त्र व कला म्हणून मान्य झालीं नाहींत तोंवर तीं शास्त्र व कला ठरूं शकत नाहींत. आणि अजून तरी यांना अशी मान्यता मिळालेली नाही.

जर कांही विशिष्ट लोकांनाच अन्न तयार करण्याचा हक्क दिला, व इतरांना तें तयार करण्याची बंदी केली अगर त्यांना तें बनविणें अश-क्य करून सोडलें, तर मला वाटतें की, हें अन्न दिवसेंदिवस वाईट तयार होत जाईल. जर रशियन शेतकऱ्याकडे हा मक्ता दिला तर भाकरी, क्वास पेय, बटाटे व कांदे–हीं सर्व रशियन शेतकऱ्यांना आवडतात– याशिवाय इतर खाद्य मिळणार नाही; आणि अशाच रीतीने जर मोजक्या लोकांना सर्व हक्क दिले तर हाच प्रकार शास्त्र व कला या मनुष्याच्या सर्वोत्तम कामगिरींचाही होईल. फरक इतकाच की, (शारीरिक) अन्नाच्या बाबतींत सूपशास्त्री निसर्गाच्या विरुद्ध फार मोठ्या प्रमाणांत जाऊं शकणार नाही; कारण कांदाभाकर फारशी चविष्ट नसली तरी निदान पौष्टिक आहे. पण बौद्धिक अन्नाचे बाबतींत मात्र पुष्कळच फरक पडण्याचा संभव आहे. कांही विद्वान लोक बराच काळपावेतो लोकांना अनावश्यक, हानिकारक किंवहुना विषारी बौद्धिक खाद्य देत राहण्याचा यांत संभव आहे. शास्त्रज्ञ व कलावंत कदाचित् अफू अगर मदिरातुल्य बौद्धिक अन्न स्वत: सेवन करून (बौद्धिक) आत्महत्या करण्याचा व तेंच बुद्धिघातक अन्न लोकांनाही देण्याचा संभव आहे.

आणि सध्याचा प्रकारही असाच आहे. याचें कारण हें की, ज्ञानाच्या पुरवठ्याच्या बाबतींत शास्त्रज्ञ व कलावंत यांची एकमेवाद्वितीय स्थिति आहे. सध्याच्या मानवजातींत शास्त्र व कला हीं सर्व मानव-जातीच्या बौद्धिक उद्योगाचें एकत्रित फल नसून हया व्यवसायांचा मक्ता आपणाकडे घेतलेल्या अशा अगदी लहान वर्गाच्या उद्योगाचें फल आहे.

म्हणून यांनी शास्त्र व कला यांच्या खऱ्या उद्देशाचा विपर्यास केला आहे व स्वत:च्या धंद्याचा खरा अर्थच मुळी हे विसरून गेले आहेत. कांही थोडयाशा मूठभर आळशी गिऱ्हाईकांचें मनरंजन करून त्यांचा जीव दडपून टाकणारा कंटाळा दूर करणें एवढेंच त्यांचें काम होऊन बसलें आहे.

शास्त्राच्या अत्यंत सरळ व व्यापक अर्थाने शास्त्र पाहिलें असतां मनुष्याबरोबरच निर्माण झालें आहे. "मानव जातींतील संकलित ज्ञान" या अर्थी शास्त्र नेहमीच होतें; त्याशिवाय कोणासही जगणें अशक्य आहे. हें शास्त्र टीकातीत असून या शास्त्राचें समर्थन करण्याची गरजही नाही. पण "ज्ञाना"ची व्याप्ती इतकी मोठी आहे—यांत लोखंडाच्या पैदासीपासून ग्रहांच्या गतीपावेतों सर्वांचा समावेश होतो—की माणसाच्या दृष्टीनें सर्वांत जास्त महत्वाचें ज्ञान कोणतें हें ठरविण्याचें कोणतें तरी गमक त्याच्याजवळ असल्याशिवाय या ज्ञानारण्यांत त्याची वाट चुकणें अपरिहार्य आहे.

म्हणून, उपयुक्त ज्ञानाचें हें गमक शोधून काढणें व महत्वाच्या दृष्टीने निरनिराळ्या ज्ञानशाखांची नंबरवारी लावणें, हेंच मनुष्याच्या बुद्धिमत्तेचें उच्चतम ध्येय सदोदितचें होऊन बसलें आहे.

आणि अखिल ज्ञानाला मार्गदर्शक असें जें हें तारतम्य याला लोकांनी नेंहमी 'खरें शास्त्र' म्हणून संबोधलें आहे. माणूस प्रथम वन्यस्थितींतून बाहेर पडला तेव्हापासून तों थेट आमच्या कालापावेतों हें ज्ञान मानव-समाजांत अस्तित्वांत राहिलें आहे.

या खऱ्या व्याख्येप्रमाणें (खऱ्या) शास्त्रांत भर टाकणारे म्हणजें मनुष्यास अत्यंत आवश्यक असें ज्ञान सांगणारे आचार्य वेळोवेळीं निर्माण झाले. मनुष्यमात्राचें आणि प्रत्येक व्यक्तीचें ध्येय, व परिणामीं खरें कल्याण कशांत आहे याचा शोध करणें, हेंच या शास्त्राचें ध्येय असत गेलें. आणि या खऱ्या शास्त्राच्या कसोटीवरच, इतर सर्व ज्ञानशाखांचें, व शास्त्राचें प्रतीक जी कला, तिचेंही महत्त्व ठरत गेलें आहे.

या गमकाप्रमाणें मनुष्याचें कर्तव्य व कल्याण यांचा विचार करणाऱ्या व या ध्येयाच्या सर्वांत नजीक येऊन पोचणाऱ्या शास्त्राचा पहिला

नंबर लागला व सर्वांत कमी उपयोगी शास्त्राचा सर्वांत शेवटीं नंबर लागला. कान्फ्युशिअस, बुद्ध, मोझेस, सॉक्रेटीस, ख्रिस्त, महंमद इत्यादि लोकांचें शास्त्र या (पहिल्या नंबरच्या) शास्त्रांपैकी होय. असें हें शास्त्र आहे. असेंच हें असत आलें व लोकांनाही याच अर्थी हें उमजतेंही. फक्त आमच्या सुशिक्षित लोकांना शास्त्राचा हा अर्थ पटत नाही.

या खऱ्या शास्त्राचा स्वतः पहिला नंबर राहिला हें तर खरेंच, पण इतर शास्त्राचेंही कमी अधिक महत्त्व याच शास्त्राने ठरविलें आहें.

आणि या खऱ्या शास्त्राला जें इतकें महत्त्व आलें तें, आजच्या विद्वान समजल्या जाणाऱ्या लोकांचा जसा समज आहे त्याप्रमाणे या (खऱ्या) शास्त्राच्या (ठकबाज ?) प्रणेत्यांनी स्वतःच्या शास्त्राला महत्त्व दिलें म्हणून नव्हे, तर मनुष्याचें ध्येय कोणतें व त्याचें कल्याण कशांत आहे यासंबंधींचें शास्त्र उपलब्ध असल्याशिवाय आम्ही शास्त्रें किंवा कला यांची किंमत ठरविणें अगर त्यांची निवड किंवा अभ्यास करणें अशक्य आहे, याबद्दल प्रत्येकाचा अनुभव साक्ष देऊं शकेल. कारण वास्तविक पाहतां शास्त्रें असंख्य आहेत; या 'असंख्य' शब्दाला मी रेखांकित करतों; कारण मला त्या शब्दाचा अक्षरशः अर्थ अभिप्रेत आहे.

माणसाचें ध्येय कोणतें व कल्याण कशांत आहे याचें ज्ञान जर उपलब्ध नसेल, तर इतर शास्त्रें आजच्याप्रमाणें आळशीपणाचा खेळ होऊन बसतात. मानवजात आज कैक वर्षे अस्तित्वांत आहे; परंतु या ध्येयाचा व कल्याणाचा मार्ग दाखविणारें शास्त्र अस्तित्वांत नाही अशी स्थिति मानवजातीची कधीच नव्हती. बौद्ध, ब्राम्हण, यहुदी, ख्रिस्ती, कान्फ्युशियसचे अनुयायी, लावत्झेचे अनुयायी इत्यादि भिन्न मंडळींत असणारें या बाबतींतील ज्ञान प्रथमदर्शनीं भिन्न असावें असें वाटतें हें जरी खरें असलें, तरी या भिन्न शिकवणींचा थोडा विचार करतांच त्या सर्वांचें मर्म एकच आहे, हें पटण्यास वेळ लागत नाही. जेथें जेथें माणूस रानटी स्थितींतून बाहेर पडला, तेथें तेथें हें ज्ञान अस्तित्वांत असल्याचें आपणांस दिसतें; पण आज पहावें तों, ज्या या ज्ञानाने माणसांतील इतर ज्ञानाला आजवर मार्ग दाखविला, तेंच ज्ञान अकस्मात् सर्व बाबतींत (माणसाची) प्रगति खुंटविण्यास कारणीभूत होत आहे, असा लोकांचा अभिप्राय पडूं पाहत आहे !

माणसें एक इमारत उभारतात; निरनिराळें कारागीर आपल्या मतें भिन्न नकाशे काढतात; पण हे नकाशे एकमेकांपेक्षा थोडे निराळे असले (तरी कोणत्याही एका) नकाशाप्रमाणें जर इमारत बांधली तर ती पूर्ण होईल, हें कोणालाही पटण्यासारखें आहे; या अर्थी ते नकाशें बरोबर होत.

कान्फ्युशिअस, बुद्ध, मोझेस, ख्रिस्त हे या प्रकारचे कारागीर होत.

पण अकस्मात् कांही विद्वान् लोक येऊन म्हणूं लागतात, 'कशाला पाहिजेत नकाशे. फक्त नजरेने पाहून वाटेल तसे, वाटेल त्या बाजूने बांधा.' आणि पोप ज्याप्रमाणे स्वत:ला 'अत्यंत पवित्र' म्हणवून घेतो तसे शास्त्रज्ञही या 'वाटेल तशा' प्रकाराला 'अत्यंत नथकी शास्त्र' असें नांव देतात.

सर्व शास्त्रें, त्याचप्रमाणें माणसाचें ध्येय व कल्याण यांचें मर्म सांगणारें मुख्य शास्त्र, यांना लोक झुगारून देतात; व ही झिडकारण्याची क्रिया म्हणजेच खरें शास्त्र, असें ते मानतात. जगाच्या सुरवातीपासून वेळोवेळीं जे बुद्धिमान लोक झाले त्या सर्वांनी स्वत:ची बुद्धि व सदसद्विवेक यांनी प्रेरित होऊन नेहमी स्वत:ला (पुढील) प्रश्न विचारला, "आमचें ध्येय व कल्याण कशांत आहे?"—स्वत:चेंच नव्हे तर हरएकाचें.

ते स्वत:ला म्हणत, "ज्या चिच्छक्तीने आम्हांला उत्पन्न केलें व जी आम्हाला चालविते, ती चिच्छक्ति आमचेपासून कशाची अपेक्षा करते? स्वत:चें व जगाचें कल्याण करावें ही जी भावना मजमध्ये उद्भवते, तिच्या पूर्तीकरितां मी काय करावें?"

ते स्वत:ला म्हणत आले, "मीच विश्व आहें व अनंताचा मी एक परमाणु आहें. माझा, मजसारख्या इतर परमाणूंशीं संबंध काय? परमाणुसमुच्चयाशीं माझें नातें कोणतें?

आणि, स्वत:ची बुद्धि व सदसद्विवेक, त्याचप्रमाणे याच प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करणारे पूर्वी होऊन गेलेले व स्वत:चे समकालीन लोक, यांच्या विचारसाहाय्याने या आचार्यांनी सर्वांस समजेल व सर्वांना आचरतां येईल, असा एक सिद्धान्त निष्कासित केला आहे.

जगामध्ये अशा प्रकारचे प्रथम श्रेणीचे, दुसऱ्या नंबरचे, तिसऱ्या दर्जाचे व सामान्य असे महात्मे होऊन गेले. जग अशांनी भरलें आहे.

सर्व विचारशील माणसांना एकच प्रश्न पडतो, "स्वहित व स्वार्थ, आणि आखिल मानवजातीच्या हितार्थ झटण्यास सांगणारी सदसद्विवेक बुद्धी, यांचा मी कसा मेळ बसवूं ?"आणि याच—स्वार्थ व परमार्थ यांची सांगड घालावयाच्या—सूत्राने बुद्धि व विवेक यांशीं आधिकाधिक प्रमाणांत जुळणाऱ्या मार्गाचा विकास आजपर्यंत झालेला आहे व पुढेही व्हावयाला पाहिजें.

पण मध्येच शास्त्रज्ञांचीं एक नवी जात उत्पन्न होते व म्हणते 'हें सर्व झूट आहे. या सर्वाचा त्याग केला पाहिजें. ही सिद्धान्तानुगामी पद्धति झाली. (सिद्धान्तानुगामी व प्रमाणप्रधान पद्धतींत कोणता फरक आहे, हें अजून कोणासही समजलें नाही.) ही धर्मभोळया काळची पद्धति आहे. या नव्या शहाण्यांच्या मतें, जगाच्या सुरुवातीपासून ज्या निरनिराळ्या अद्वितीय विचारवंतांनी अंतस्फूर्तीने या विषयासंबंधीं विचार केला, व ज्या जीविताच्या ध्येयाबद्दल ते एकमेकांना सांगत आले (व ज्याला हें नवें शास्त्रज्ञ ऐन्द्रियिक कार्य असें नांव देतात), तो सर्व विचार टाकाऊ असून त्याचें कांहीच महत्त्व नाही.

या नव्या शास्त्रज्ञांच्या मतें, मनुष्य हा मानवजातरूपी सेंद्रिय जंतूचा एक परमाणू आहे, आणि या जंतूचें ऐन्द्रियिक कार्य निश्चितपणें ओळखणें, हेंच माणसाचें बौद्धिक कर्तव्य आहे. आणि हें साध्य होण्यास स्वत:खेरीज इतरांचें निरीक्षण केलें म्हणजें पुरे. परमाणुरूप तुम्ही विचार करतां, क्लेश भोगतां, बोलतां, उमजतां; म्हणून इतर तुम्हांप्रमाणेंच बोलणाऱ्या परमाणूंनांही, तुमच्याप्रमाणेंच क्लेश, आनंद इत्यादींचा अनुभव येतो की काय, हें विचारून स्वानुभवाचा पडताळा घेऊं शकतां; तुमच्यापूर्वी होऊन गेलेल्या परमाणूंनी या बाबतींत लिहून ठेवलेला स्वानुभव तुम्ही वाचूं शकतां; इतर लक्षावधि परमाणु या स्वानुभवाला मान तुकावतात; किंवा या सर्वांहून महत्त्वाची गोष्ट म्हणजें तुम्ही स्वत: जीवंत परमाणु असून मानवजातीच्या इन्द्रियव्यापाराचा युक्तायुक्तपणा स्वानुभवावरून ओळखतां—या सर्व गोष्टींना (तुम्हांला परमाणू ठरविणाऱ्या नव्या शास्त्रज्ञांच्या मतें) कांहीएक अर्थ नाही. हें सर्व वाईट असून ही (विचार) पद्धतीच मुळी खोटी आहे. खरी शास्त्रीय

पद्धति अशी : 'तुम्हाला जर स्वत:चें व अखिल मानवजातीचें कर्तव्य काय व कल्याण कशांत आहे, हें जाणून घेण्याची इच्छा असेल, तर तुम्ही तुमच्यांत व तुमच्या इतर बांधवांत प्रत्ययास येणारी बुद्धि व सदसद्विवेक यांचा वाद सोडला पाहिजें. मोठमोठ्या (खऱ्या) ज्ञात्यांनी जें सांगितलें तें तुम्ही विसरून गेलें पाहिजे, व त्यांना तुच्छ लेखून एकंदर विषयाला नव्यानेच श्रीगणेशापासून हात घातला पाहिजे. आणि ही आरंभापासून सुरवात करावयाची म्हणजे प्रथम सूक्ष्मदर्शक यंत्राच्या सहाय्याने जंतूंचें निरीक्षण करावयास हवें, किंवा यापेक्षाही सोपें म्हणजे स्वत: हें करण्याऐवजीं जे कधीही चुकणार नाही असें ज्यांना प्रमाणपत्र मिळालें असेल ते सांगतील त्यावर विश्वास ठेवावा म्हणजे झालें. या जंतूंच्या वागणुकीचें निरीक्षण करून त्यांनाही आपल्याप्रमाणें भावना आहेत असें ठरवायचें व त्यांना काय हवें, ते कशाचा प्रयत्न करतात, त्यांच्यांत कोणता विचार चालू आहे अगर त्यांना कशाची सवय आहे याबद्दलचेंही आपलेंच गणित त्यांच्यावर लादायचें आणि या निरीक्षणावरून (यापैकी प्रत्येक शब्दांत विचाराची किंवा रचनेची चूक असते) सरतेशेवटी मनुष्य व जंतु यांचें साम्य जमेस धरलें म्हणजे या प्रयोगांच्या सहाय्यानें तुमचें स्वत:चें व तुमच्यासारखे जे इतर मानव आहेत त्यांचें कल्याण कशांत आहे हें आपोआप उमजेल. साध्या डोळ्यांनी दिसणाऱ्या जंतूचाच नव्हे, तर न दिसणाऱ्या सूक्ष्म जंतूचा त्याचप्रमाणें एका जंतूचें दुसऱ्या जंतूंत होणारें जें रूपांतर कधी कोणी पाहिलें नाही व जें तुम्हांला नवकी दिसणार नाही त्या रूपांतराचाही अभ्यास केला पाहिजे.

हीच तऱ्हा कलेची. जेथे खरें शास्त्र होतें तेथें खऱ्या शास्त्राचें (मनुष्याचें कर्तव्य व कल्याण यांचें) व्यक्त स्वरूप या नात्याने कलाही अस्तित्वांत होती.

जगाच्या सुरुवातीपासून भिन्न ज्ञानवर्धक भिन्न चळवळींपैकी माणसानें स्वकर्तव्य व आत्मकल्याण यांच्या ज्ञानाची मुख्य चळवळ निवडली; (व्याप्त अर्थी) या निवडक ज्ञानाचें व्यक्त स्वरूप म्हणजेच कला. जगाच्या सुरुवातीपासूनच मनुष्याचें कर्तव्य व कल्याण यासंबंधींच्या शिकवणीचा ज्यांच्यावर आत्यंतिक परिणाम होतो असे भावनाप्रधान लोक नेहमीच होत

गेले आहेत व डफाच्या किंवा तुणतुण्याच्या साहाय्याने किंवा चित्राच्या अगर शब्दांच्या सहाय्याने, त्यांनी कर्तव्यपराङ्मुख करणाऱ्या विमूढतेशीं जें युद्ध केलें किंवा त्यांना त्यांत ज्या यातना झाल्या, चांगल्याचा जय होतोसें दिसल्यास त्यांना जो आनंद होई, अगर वाईटाचा जय होण्याचा संभव वाटतांच त्यांना जें नैराश्य वाटे, किंवा नजीक आलेल्या आनंदानुभवाच्या आशेने त्यांना जो आल्हाद वाटे त्याचें चित्र त्यांनी रेखाटलें आहे.

जगाच्या सुरुवातीपासून माणसाचें कर्तव्य व कल्याण कशांत आहे याचें स्पष्ट स्वरूपांत वर्णन करणें हेंच लोकांस आदर वाटणाऱ्या खऱ्या कलेचें कर्तव्य होतें. अगदी अलीकडेपावेतो कला जीवध्येयाचा प्रसार करीत आली व याच कलेवद्दल लोकांना आत्यंतिक आदर असे. नंतर या जीवध्येयाला 'धर्म' असें नांव पडलें. पण मानवी कर्तव्य व कल्याणाच्या खऱ्या शास्त्राच्या जागीं वाटेल त्याचें शास्त्र बनविणाऱ्या नव्या शास्त्राचा उदय होतांच, अर्थात् जेव्हापासून शास्त्राने आपल्या खऱ्या ध्येयाचा त्याग करून खऱ्या शास्त्राची टवाळी करण्याच्या उद्देशाने त्याला 'धर्म' म्हणून संबोधण्यास सुरुवात केली, तेव्हांपासून मानवी व्यवहारांतील महत्त्वाचा भाग या नात्याने कलेचें स्वरूप नष्ट झालें.

जोपावेतों धर्माने लोकांना त्यांच्या कर्तव्याचा व कल्याणाचा मार्ग दाखविण्याचें काम केलें तोपावेतों कलेने धर्मसेवा केली व ती खरी कला राहिली. पण कलेने धर्म सोडून वाटेल त्याची सेवा करणाऱ्या शास्त्राला वरतांच तिचें महत्त्व नष्ट झालें व आतां कलेने 'कला कलेचीच सेवा करते' असा कितीही अट्टाहास केला (व या अट्टाहासावरूनच हें स्पष्ट आहे की कला कर्तव्यभ्रष्ट झाली आहे) व स्वतःच्या पूर्वापार महत्त्वाचे कितीही गोडवे गाइले तरी कला ही आता धंदेवाईक झाली असून, लोकांना आवडेल तें त्यांच्या आवडत्या स्वरूपांत देणें हेंच आता कलेचें कार्य होऊन बसलें आहे. आणि म्हणूनच आजकालचे 'कोरस'गायक, सूपशास्त्रज्ञ, केशशास्त्रनिपुण सौंदर्यसंवर्धनशास्त्रज्ञ हे सर्व स्वतःला आजकालच्या कवी, चित्रकार व गायकांप्रमाणेच कलावंत समजतात.

आम्ही मागे नजर फिरविली तर हजारों वर्षांच्या कालांत लक्षावधि लोकांपैकी कान्फ्युशिअस, बुद्ध, सोलन, सॉक्रेतीस, सॉलोमन, होमर, इसाया,

ह्वेव्हिड-अशांसारख्या मूठभरच व्यक्ति प्रामुख्यानें नजरेस येतात. अर्थात हीं माणसें क्वचित्च दिसायचीं, पण (तरी) तीं त्या काळींही अमुक एका जातींतच न निघतां अखिल लोकसमुदायापैकी असत. खरें शास्त्र व खरें कलाजन्य आध्यात्मिक खाद्य तयार करणारे स्वाभाविकपणें दुर्मिळ असत आणि मानवजात या (दुर्मिळ) लोकांचा जो आदर करी व करते तोही विनाकारण नव्हे. पण आज मात्र या खरें शास्त्र व खरी कला यांच्या प्रणेत्यांचा जणूं काय आम्हांला कांही उपयोग उरला नाही असें दिसतें. आज श्रमविभागाच्या तत्त्वानुसार शास्त्रज्ञ व कलावंत हे, जणूं काय कारखान्यांतून जसे जिन्नस तयार होतात, तशासारखें तयार होणें शक्य आहे. आणि जगाच्या सुरुवातीपासून जितके (खरे) शास्त्रज्ञ व कलावंत झाले नाहीत तितके (खोटे) शास्त्रज्ञ व कलावंत आम्ही फक्त एका दहा वर्षांत निर्माण करूं शकतों.

सध्या तर शास्त्रज्ञ व कलावंत यांचा एक तांडाच्या तांडा उपलब्ध असून एका पूर्णत्वास गेलेल्या पद्धतीने सबंध जगाला बौद्धिक अन्न पुरविण्याचा मक्ता या मडळींनी घेतलेला आहे.

आणि या नव्या लोकांनी इतकें अन्न तयार करून ठेवलें आहे की, जून्या, प्राचीन अगर जवळच्या कालांतील प्रतिभाशाली महात्म्यांची आम्हांला आठवणसुद्धा ठेवण्याची गरज नाही. या पूर्वीच्या शहाण्यांचें कार्य धर्मप्रधान व तत्त्वप्रधान कालाकरितां होऊन गेलें. खरी शास्त्रीय कामगिरी काय ती फक्त पन्नास वर्षांपूर्वीपासूनच सुरू झाली व या पन्नास वर्षांत आम्ही इतकी घेंडें उत्पन्न केलीं की पूर्वी संबंध जगांत नव्हते इतके विद्वान् आज कोणत्याही एका जर्मन विश्वविद्यालयांत सांपडूं शकतील. आम्ही शास्त्रें तरी पहाना किती निर्माण केलीं तीं. सुदैवाने हें सोपेंही आहे. कारण (पूर्वी एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणे) कोणत्याही ग्रीक शब्दाला 'लॉजी'चें शेंपूट लावलें व त्याचें आंकडेवारीच्या कोष्टकाच्या द्वारें विवेचन केलें की, झालें शास्त्र ! आमची शास्त्रसंख्या इतकी विपुल आहे की, कोणी एकटयाने त्या सर्वांचा अभ्यास करण्याची गोष्ट तर बाजूलाच राहो. पण त्यांचीं नांवें सुद्धा एकटयाला पाठ होणें शक्य नाही. त्यांच्या नांवनिशीचा एक मोठा लठ्ठ कोश तयार होऊं शकेल व प्रत्यही त्यांच्या नांवांत भर पडतच आहे.

यांच्या कामगिरीकडें पाहिलें म्हणजे एका जमीनदाराने स्वतःच्या मुलांस मराठी शिकविण्यास ठेवलेल्या ज्या कानडी शिक्षकाने त्या मुलांस मराठीऐवजी कानडी शिकविलें त्या शिक्षकाची आठवण होते.* शास्त्रज्ञांनी आम्हांला मोठ्या सुंदर रीतीने शिकविलें; परंतु दुर्दैवाची गोष्ट इतकीच की, आमच्या स्वतःखेरीज तें इतरांना समजत नाही व इतर लोक या ज्ञानाला कवडीमोल समजतात.

पण शास्त्रज्ञांचा यावरही एक खुलासा आहे. ते म्हणतात लोकांवर अजून धर्माची छाप असल्यामुळे त्यांना शास्त्रशुद्ध ज्ञानाची किंमत कळत नाही. पण मौज ही की ज्या धर्मप्रवृत्त कालाचा हे उल्लेख करतात त्या काळीं मात्र—ज्यांना आमचे शास्त्रज्ञ मूर्ख समजतात त्या हिब्रू, चिनी, हिंदू अगर ग्रीक लोकांना त्यांचे त्या त्या काळचे विद्वान काय म्हणत तें सर्व समजें व पटे.

तें कसेंही असो. मनुष्यमात्रांत शास्त्र व कला हीं नेहमी अस्तित्वांत होतीं व आहेत. ज्यावेळीं हीं खरीं नाणीं होतीं त्यावेळीं तीं सर्व लोकांना समजत व त्यांना हवींशीही वाटत.

आम्ही मात्र ज्याला आम्ही शास्त्र व कला म्हणतों अशा कांही गोष्टींच्या मागें लागलों आहोंत परंतु वस्तुस्थिति अशी दिसून येऊं लागली आहे की आम्ही ज्याचा पिच्छा पुरवतों त्यांना शास्त्र अगर कला म्हणवून घेण्याचा तिळमात्र हक्क नाही.

---

* मुळांत कानडीऐवजीं 'फिन्निश' व मराठीऐवजीं 'फ्रेंच' या भाषांचा उल्लेख आहे. पण टालस्टॉय यांचा अभिप्रेत स्पष्टपणें कळावा म्हणून हा फेरफार केला आहे. मा. ज. का.

प्रकरण सदतिसावें

यावर लोक मला उत्तर देतात, 'पण तुम्ही शास्त्र व कला यांची एक निराळीच आणि अधिक संकुचित अशी व्याख्या करतां ती शास्त्राला मान्य नाही. आमच्या व्याख्येंत तुम्ही म्हणतां त्यांना वगळलें जात नाही. पण त्याशिवाय ज्यांनी शास्त्र व कला यांच्या सेवेला आयुष्य वाहिलें असे गॅलिलिओ, ब्रूनो, होमर, मायकेल, अँजेलो, बीथोव्हेन, वॅगनर हे व यांच्या मानाने गौण प्रतीचे इतर शास्त्रज्ञ व कलावंत, हे उरत नाहीत काय?' पूर्वीचे (खरे) शास्त्रज्ञ व कलावंत व आजचे (बेगडी) लोक यांचा दुवा बेमालूमपणे जुळवावा, हा या प्रत्युत्तराचा उद्देश आहे; पण इतर वेळीं हेच लोक स्वतःचा जुन्या लोकांशीं संबंध अगर साम्य मान्य करीत नाहीत. शिवाय वरील मुद्दा प्रतिपादन करतांना हे लोक, शास्त्र व कला यांची आज जी विशिष्ट मानाची परिस्थिति आहे, तिच्या मुळाशीं आपलें खास शोधून काढलेलें नवें श्रमविभागतत्व आहे हें विसरण्याचा प्रयत्न करतात.

एकतर पूर्वीच्या व आजच्या लोकांमधील दुवा अशा प्रकारें जुळविणें अशक्य आहे. पहिल्या ख्रिस्ती लोकांच्या पवित्र जीवनक्रमांत व नंतरच्या पोपांच्या जीवनक्रमांत जसें कवडीचें साम्य नाही, त्याचप्रमाणें गॅलिलिओ, शेक्सपियर व बीथोव्हेन यांच्यांत आणि टिंडाल, ह्यूगो, अगर वॅगनर यांत बिलकुल साम्य नाही. ज्याप्रमाणें पूर्वीच्या धर्मप्रवर्तकांनी आजच्या पोपांशीं आपलेपणाचा संबंध नाकारला असता, त्याचप्रमाणें पूर्वीच्या शास्त्रज्ञांनीही आजच्या शास्त्रज्ञांशीं संबंध नाकारला असता.

आणि दुसरें असें की, आजच्या शास्त्र-कलांनी स्वतःकरितां स्वतःच्या उपयुक्ततेचीं इतकीं स्पष्ट मापें ठरवून टाकलीं आहेत (व याबद्दल त्यांचे आपण आभार मानावयास हवे) की, याच मापांनी हीं शास्त्रें व या कला आपलें कर्तव्यपालन करतात की नाही हें आपणास पाहतां येईल; अर्थात् यामुळे आपणास केवळ मनःपूत निर्णय करावा न लागतां या सर्वमान्य मापानेंच, स्वतःस शास्त्र म्हणवणारा हा उद्योग खरोखरच शास्त्र या नांवास

पात्र आहे की नाही, याचा निश्चय करतां येईल.

पूर्वी इजिप्त व ग्रीसमध्ये धर्मपुरोहित इतरांपासून लपवून ठेवलेल्या कांही गूढ क्रिया करीत व याच क्रियांमध्ये सर्व शास्त्रें व कला अंतर्भूत आहेत असें ते म्हणत. पण त्यांच्या या क्रियांचा लोकांना किती उपयोग होतो, हें गमक लाऊन मला त्यांची कसोटी पाहतां येणें शक्य झालें नसतें, कारण ते स्वत:च्या क्रिया मानवी शक्तीबाहेरच्या होत असेंच प्रतिपादन करीत. पण आताचें आमचें माप मानवी शक्तीबाहेरचें नसून सोपें व स्पष्ट आहे. आजचें शास्त्र व कला मानवजातीच्या वा समाजाच्या हिताकरितां मानवजातीच्या मेंदूचें कार्य करीत आहेत. म्हणून लोकोपयुक्तता हाच उद्देश असणारीं व तो साध्य करणारीं असतील त्यांनाच शास्त्र अगर कला म्हणण्याचा आम्हांस हक्क आहे.

म्हणून जे लोक मोठ्या विचारपूर्वक फौजदारी अथवा दिवाणी अथवा आंतरराष्ट्रीय कायद्याचीं तत्त्वें शोधतात, तोफा व नवीं स्फोटक द्रव्यें शोधून काढतात, जे अश्लील नाटकें, प्रहसनें अगर कादंबऱ्या लिहितात, त्यांनी स्वत:ला कोणतेंही नांव घेतलें तरी त्यांच्या कामगिरीला शास्त्र अगर कला म्हणण्याचा आम्हांला हक्क पोचत नाही. कारण लोकहित हा या कामगिरीचा उद्देश नसून उलट यांमुळें लोकांचें नुकसानच होतें. म्हणून हें सर्व शास्त्रही नव्हे व कलाही नव्हे. त्याचप्रमाणें कृमिकीटकांचा अभ्यास, अगर दुर्बीण किंवा प्रकाशपृथक्करणयंत्रद्वारा निरीक्षण करणारे, पुराणवस्तुसंशोधन करून ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणारे, चित्रें काढणारे, किंवा गाणीं, कविता इ० रचणारे स्वत:ला कोणतेंही नांव घेवोत-खुद्द शास्त्राच्या व्याख्येनुसारच यांपैकी कोणालाही (त्यांचा त्या त्या विषयांत कितीही का उत्साह असेना) शास्त्रज्ञ अथवा कलावंत म्हणतां येणार नाही. कारण एकतर 'शास्त्रांकरितां शास्त्र,' व 'कलेकरितां कला' या तत्त्वावर त्यांची जी कामगिरी चालू आहे तिचें 'लोकहित' हें ध्येय असूंच शकत नाही. शिवाय प्रत्यक्षत:ही त्यांच्या कामगिरीमुळें लोकांचें कांही भलें होतांना आपण पाहत नाही. त्यांच्या कामगिरीने कांही विशिष्ट लोकांचें मनरंजन होऊन त्यांना सुख मिळतें एवढ्याचवरून त्यांना शास्त्रज्ञ अगर कलावंत म्हणण्याची खुद्द त्यांच्याच व्याख्येची परवानगी नाही.

अगदी याचप्रमाणें विजेचा उष्णता, उजेड किंवा यंत्रशक्तीकरितां उपयोग करण्याचे प्रकार शोधून काढणारे, किंवा नवी बारूद अगर सुंदर रंग तयार करणारे रसायनज्ञ, किंवा बीथोव्हेनची गाणीं विनचूक म्हणणारे गायक, चांगले नट, चित्रकार अगर कादंबरीकार–अर्थात् ज्यांचा ज्यांचा उद्देश केवळ श्रीमंतांचें मनरंजन करणें हा असतो—या सर्वांचें काम शास्त्र अगर कला या सदराखाली येऊं शकत नाही. कारण यांचें खरें ध्येय जंतू-तील मेंदूच्या परमाणूंप्रमाणें समाजसेवा हें नसतें, तर वैयक्तिक स्वार्थ, लाभ व द्रव्याशा यांकरितांच सदहू कामें केलीं जातात. म्हणून या जातीचीं स्वार्थ-प्रेरित कामें इतर अशाच स्वार्थपूर्ण कामांहून, उ० खाणावळवाले, जॉकी, शिपी, वेश्या इत्यादिकांच्या धंद्यांहून, भिन्न मानतां येणार नाहीत. कारण यांपैकी पहिले (समाजसंशोधक), दुसरे (शास्त्रज्ञ) व तिसरे (कलावंत) यांपैकीं कोणाचेंही काम शास्त्र व कला यांच्या व्याख्येंत बसत नाही. कारण शास्त्र व कला यांच्या व्याख्येंतच श्रमविभागतत्त्वानुसार आम्ही समाजकल्याण करूं असें आश्वासन (शास्त्रज्ञ-कलावंतांनी) दिलें आहे.

शास्त्र व कला यांची जी व्याख्या खुद्द शास्त्राने केली आहे ती योग्य आहे. पण दुर्दैवानें आजच्या शास्त्राची अगर कलेची कामगिरी या व्याख्येंत मोडत नाही. या शास्त्राचे व कलेचे कांही उपासक नकी हानिकारक कामें करण्यांत गुंतले आहेत; कांही निरर्थक कामांत मग्न आहेत व इतर कांही क्षुल्लक व फक्त श्रीमंतांनाच उपयोगी पडेल अशा उद्योगांत गढून गेले आहेत.

हीं सर्व फार चांगलीं माणसें असूं शकतील. पण खुद्द त्यांच्या स्वत:च्या व्याख्येप्रमाणें त्यांनी ज्या ज्या गोष्टींची हमी दिली त्यांपैकी ते कांहीच करीत नाहीत. म्हणून आजच्या पाद्र्याला तो आपलें कर्तव्यकर्म करीत नसल्यामुळे स्वत:ला ईश्वरी ज्ञानाचा दूत म्हणवून घेणें जसें अशक्य आहे तसेंच यांनाही आपण शास्त्रज्ञ किंवा कलावंत आहों असें म्हणण्याचा हक्क नाही.

आणि आज जे लोक शास्त्र व कला यांत गुंतले आहेत, ते स्वकर्तव्य-पालन कां करीत नाहीत अगर तसें करणें त्यांना कां अशक्य आहे, हें समज-णेंही फार सोपें आहे. कारण त्यांनी कर्तव्याला हक्काचें स्वरूप दिलें आहे.

जेंव्हा शास्त्र व कला हक्काची भाषा विसरून फक्त सेवाधर्म ओळखतात तेव्हाच त्यांच्याकडून कर्तव्यपालन होणें शक्य असतें.

शास्त्र हें नेहमी अशाच प्रकारचें असतें व स्वार्थत्याग हा त्याचा निसर्गसिद्ध धर्म असतो म्हणूनच जग त्याच्या कामगिरीची एवढी किंमत करतें.

स्वत:च्या बुद्धिमत्तेनें लोकसेवा करण्याची जवाबदारी ज्यांवर येते त्यांच्या वाटयाला कष्ट येणारच. कारण प्रसूतिवेदनावजा कष्ट सोसल्याशिवाय आध्यात्मिक ज्ञानाचा उदय होणें शक्य नाही.

ज्याअर्थी लोककल्याण हें शास्त्रज्ञ व कलावंतांचें ध्येय आहे त्याअर्थी कष्ट व स्वार्थत्याग हेच त्यांच्या वाटयाला येणार. लोक कष्टी आहेंत, त्यांना त्रास होतो व ते नाश पावतात. अशा परिस्थितींत (लोकसेवकाला) फुरसद अगर आराम कोठला ?

(खरा) विचारवंत (शास्त्रज्ञ) अगर कलावंत आपणास कल्पना करण्याची सवय झाली आहे त्याप्रमाणें (प्रासाद) शिखरावर बैठक देऊन राहणार नाही. 'मला जर स्फुर्ती झाली तर एखादा लोककल्याणाचा मार्ग सुचवून मला लोकहित साधतां येईल. पण काय करूं ? अजून तसें कांही होत नाही व मी लोकांना मार्ग सुचवूं शकलों नाही. आणि जर उद्यां मी मेलों तर ? ' अशा सारख्या विचाराने त्याच्या मनांत सतत खळबळ चालून तो चिंताग्रस्त राहील.

ज्या संस्थांतून विद्वान तयार होतात असा आमचा समज आहे (पण ज्यांतून खरोखर शास्त्र व कला यांचे विध्वंसकच पुढे येतात) अशा संस्थांतून पदव्या व प्रमाणपत्रें घेतलेल्यांतून वरच्यासारखा विचारवंत अगर कलावंत निर्माण होऊं शकणार नाही. परंतु शिक्षणसंस्थांतून जे ज्ञान स्वत:वर लादण्यांत आलें त्यावर विचार करून त्याचेंच प्रकाशन करण्याऐवजी, ज्याला अंतस्थ ऊर्मी व लोकांची गरज यांची निकड वाटून विशिष्ट लोककार्य केल्याशिवाय बरें वाटूं शकत नाही, असा माणूसच खरा विचारवंत किंवा कलावंत होऊं शकेल.

खरे विचारवंत किंवा कलाभिज्ञ चैनी, गुटगुटीत किंवा स्वयंमन्य असे असणें कधीही शक्य नाही.

लोकांना ज्याची खरोखर गरज आहे असें बुद्धिकार्य करणें व त्याचा प्रचार करणें हीं कामें अत्यंत कष्टसाध्य व कष्टदायक होत. ही सुळावरची पोळी आहे. आणि त्याग म्हणजे स्वत:मध्यें असलेल्या लोककल्याणशक्तीचा प्रत्यय देण्याकरितां स्वत:च्या स्वार्थावर पाणी सोडणें, हें या कामांत गुंतणाऱ्या माणसांचें निश्चित आणि एकमेव लक्षण होय.

स्वत:ला कांहीही त्रास न होतां जंतूंची संख्या, किंवा सूर्यावरचे डाग यांची माहिती देणें, अगर कादंबऱ्या नाटकें लिहिणें शक्य आहे; पण लोकांना त्यांचें हित समजावून देतांना स्वत: झीज सोसून लोकसेवा करावी लागते; व ही शिकवण लोकांना जोरदार रीतीने द्यायची तर स्वत:चे हाल करून घ्यावे लागतात.

जोंपर्यंत धर्मप्रचारक स्वत:चे हाल करून घेण्यास तयार होते तोंपावेतों धर्ममठांचें महत्त्व कायम राहिलें; पण हे लोक गुटगुटीत होतांच धर्मशिक्षण संपुष्टांत आलें.

आजकाल शेतकरी म्हणतात, "पूर्वी धर्मगुरू सोन्यासारखे असून मठांतलीं पात्रें लांकडी होतीं; पण आतां पात्रें सोन्याचीं झालीं असून धर्मगुरू मात्र लांकडी बनले आहेत."

येशू ख्रिस्त क्रुसावर मरण पावला त्याला कारण आहे; कष्टमय स्वार्थत्याग सर्वांना जिकतो.

आमचें शास्त्र व कला प्रमाणपत्रांकित असून त्यांची तर बरदास्त राखण्यांत येते, आणि ही बरदास्त अधिकाधिक कशी राखतां येईल (अर्थात् लोकसेवेस हीं अधिक नालायक कशीं बनतील) इकडेच लोकांचें अधिक लक्ष आहे.

खऱ्या शास्त्राचीं व कलेचीं दोन लक्षणें आहेत. पहिलें अंत:स्थ लक्षण असें की, हा शास्त्रज्ञ अगर कलावंत आपलें काम स्वार्थाकरितां करीत नसून उलट हें काम करीत असतां हाल सोसतो; व दुसरें बाह्य लक्षण हें की, ज्यांच्या हिताकरितां तो काम करतो त्या सर्व लोकांना समजेल असेंच त्याचें कार्य असतें.

सामान्य माणसांच्या मनीं जे जे त्यांचे व्यवसाय असतील व ज्या ज्या गोष्टी त्यांच्या हिताच्या असतील त्याच गोष्टी शास्त्र शिकवील, व कला

या शिकवणीला स्पष्ट स्वरूप देण्याचा प्रयत्न करील. सोलन व कानफ्यु-शिअस यांचे नियम अशा प्रकारचें शास्त्र होत. मोझेस व ख्रिस्त यांच्या शिकवणीला (असें) शास्त्र म्हणतां येईल. अथेन्समधील इमारती, डेव्हिडचीं स्तोत्रें, चर्चचीं गाणीं यांना कला मानतां येईल; पण पदार्थाचें चतुर्थमान शोधून काढणें किंवा रासायनिक संयुक्तांचें वर्गीकरण करणें इत्यादि गोष्टी पूर्वीही शास्त्रांत समाविष्ट नव्हत्या व या कधींही शास्त्र बनूं शकणार नाहींत. आमच्या काळांत खऱ्या शास्त्राची जागा धर्मशास्त्र व शासनशास्त्र यांनी पटकाविली आहे, व कलेची जागा धर्म व राजदरबारांतील समारंभांनी पटकाविली आहे. पण यांपैकी कशांतही लोकांचा खराखुरा विश्वास नाही व कोणी तिकडे लक्षही देत नाही. आमच्या काळांत आळशी लोकांचें रंजन करणाऱ्या आळशांच्या लीलाच शास्त्र व कला होऊन बसल्या आहेत. त्यांच्यापुढे लोककल्याणाचें ध्येय नसल्यामुळे त्यांचें गीड. बंगाल लोकांना तिळमात्र समजत नाही.

मनुष्याचा जेव्हापासून इतिहास उपलब्ध आहे तेव्हापासून प्रत्येक युगांत मानवी जीविताचें तात्पर्य काय याचें स्पष्टीकरण करण्याऐवजी त्याला धूमावृत करणाऱ्या एखाद्या बेगडी शिकवणीची कमालीची छाप लोकांवर असावी व या बेगडी ज्ञानाने स्वत:ला शास्त्र म्हणवावें असा प्रकार नेहमी दिसून येतो. हें बेगडी शास्त्र लोकांपासून खरा जीवितार्थ लपवून ठेवतें. हा प्रकार ईजिप्त, हिंदुस्थान व चीनमध्ये होता; इतकेच नव्हे, तर ग्रीस देशांत सुद्धा सत्याभास उत्पन्न करणारे 'सोफिस्ट' होतेच आणि हाच प्रकार नंतरच्या Mystics, Gnostics व Cabalists मध्यें आणि मध्ययुगांतील 'स्कूलमेन'मध्ये चालू असलेला प्रत्ययास येतो.

पण आजकालची शास्त्रीय चळवळ चुकून तर नाहीच, पण उलट कल्पनातीत यशस्वी असावी (शास्त्र आम्हांला सारखा असा भरवसा देत आहेच) आणि अशा या काळांत आम्हीं जन्मास यावें हें आमचें केवढें तरी नशीब बरें ! स्वत:चे दोष माणसाला दिसत नाहीत व ते कबूल करणेंही त्याला शक्य नसतें. याशिवाय या (सुदैवाचा) दुसरा कोणता बरें अर्थ असूं शकेल ?

पूर्वी जसे खडेंघाशी करणारे मोझेसच्या गादीवर बसले व स्वत: जवळ स्वर्गाच्या किल्ल्या धेऊन स्वत:ही स्वर्गात जाईनात व दुसऱ्यालाही

जाऊं देईनात तशासारखी आमची गत झाली आहे. शास्त्र व कला यांचें पंडेपण करणारे आम्हीच महान ठक आहोंत. पूर्वी भिक्षुकांपैकी अत्यंत ठकबाज व बदमाषालासुद्धा भिक्षुकीचा जितका हक्क असेल तितकासुद्धा आम्हाला शास्त्र व कला यांचें पंडेपण करण्याचा नाही. हें पंडेपण आम्ही लुच्चेगिरीने मिळविलें असून ठकवाजीनेच तें कायमही ठेवीत आहोंत.

पूर्वीचे ख्रिस्ती भिक्षुक व नंतरचे ख्रिस्ती भिक्षुक कितीही बदमाष असले तरी त्यांना भिक्षुकीचा, जेमतेम कां होईना, पण हक्क होता. लोकांना जीविताचें तात्पर्य समजावून त्यांना मुक्ति मिळवून देऊं असें ते म्हणत. ते लुच्चे होते असें सिद्ध करून आम्ही त्यांची हकालपट्टी करून त्यांची जागा पटकाविली, पण आम्ही लोकांना जीवनक्रम कसा घालवाव्हा याची कोठें शिकवण देत आहोंत ? पण तरीही आम्ही लोकांना पिळून काढतोंच व आमच्या मुलांनाही-त्यांची पाळी येईल तेव्हा त्यांनाही आमच्यासारखें परोपजीवी राहतां यावें म्हणून-आमचें गौडबंगाल, अर्थात ग्रीक व लाटिन भाषांचें व्याकरण, हें शिकवितों.

आम्ही म्हणतों : ' पूर्वी जाती होत्या पण आतां त्या नाहीत ' पण हें जर खरें, तर मग कांही माणसें व त्यांची मुलें राबतात व इतर राबत नाही हें कसें ? ज्याला आमची भाषा समजत नाही अशा एका हिंदूला युरोपमध्ये आणा व त्याला युरोपकडे किंवा रशियांत आमच्यांत पिढ्या-नपिढ्या प्रचलित असलेली समाजव्यवस्था पाहूं द्या. म्हणजे त्यांच्या देशांत जशा राबणाऱ्यांच्या व (ऐतखाऊ) आळशांच्या दोन जाती आहेत, तशा आमच्यांतही या दोन जाती त्याला दिसतील. त्यांच्यांत व आमच्यांतही आळसाचा हक्क विशिष्ट दीक्षा व संस्कार यांनी प्राप्त होतो. आम्ही या संस्काराला शास्त्र व कला किंवा सामान्यतः 'शिक्षण' असें नांव देतों.

ज्या आमच्या आश्चर्यकारक (सामाजिक) वेडामुळे आम्हाला अत्यंत स्पष्ट व निःसंशय गोष्टीही दिसत नाहीत, तें वेड या शिक्षणाने व आमच्या तदनुषंगिक भ्रष्ट विचारसरणीमुळे निर्माण झालें आहे.

एकीकडे आम्ही आमच्या बांधवांचे प्राण घेतों, पण आमचा समज मात्र आहेच की, आम्ही खरे ख्रिश्चन, कनवाळू, सुशिक्षित व न्यायी-ही आहोंत.

प्रकरण अडतिसावें

"तर मग आम्ही काय करावें ?' 'आम्ही काय करावें ?' सर्व दिशांनी हाच प्रश्न मला ऐकूं येतो. या प्रश्नांत एकीकडे आपला जीवनक्रम चुकीचा व वाईट असल्याची कबूली अंतर्भूत आहे; पण हा जीवनक्रम बदलणें अशक्य आहे असाही यांतून ध्वनि निघतो. आणि म्हणूनच माझ्या या पुस्तकाला मी हें प्रश्नात्मक नांव दिलें.

मला काय मानसिक यातना झाल्या, मी कसा (सत्य) शोध केला, व मी हा प्रश्न कसा सोडविला, याचें मी वर्णन केलें आहेच. मीही इतरांप्रमाणेंच माणूस आहें. माझ्यांत व माझ्या समाजांतील इतरांत फरक असलाच तर तो हा की, इतरांच्या मानानें मी या खोट्या शास्त्राला उचलून धरण्यास अधिक मदत केली, आणि या खोटेपणाकडे अधिक प्रमाणांत काणाडोळा केला. त्याचप्रमाणें आज दरचष्मा असणाऱ्या पक्षा-कडून मला प्रशंसेचा अधिक वाटा मिळाल्यामुळे इतरांच्या मानाने मी पुष्कळच बहकलों व माझा मार्ग त्यांचेपेक्षा अधिक चुकला.

म्हणून मला वाटतें की, मी या प्रश्नाची जी सोडवणूक काढली ती, ज्यांना या प्रश्नाने मजप्रमाणेंच सतावून सोडलें असेल, त्यांपैकी सच्च्या माणसांना पटावी. "आम्ही काय करावें ?" या प्रश्नाला मी प्रथम असें उत्तर दिलें : "मी खोटें बोलूं नये, व आत्मवंचनाही करूं नये. सत्य मार्गाचें शोधन करतांना काहीही निकाल लागला तरी मी भितां कामा नयें. दुसऱ्यांशीं खोटें बोलण्याचा काय परिणाम होतो हें जाणूनही आपण सर्वजण सकाळपासून संध्याकाळपावेतों सतत खोटें बोलत असतों. घरीं असलों तरी 'घरीं नाहीत,' एखादी गोष्ट आवडली नाही तरी 'वाः फार छान,' ज्याच्याबद्दल आदर वाटत नाही त्याला 'कृ. सा. न.', किंवा पैसा जवळ असूनही 'काय करावें एक छदामसुद्धा मजजवळ नाही,' अशा कितीतरी खोट्या उत्तरांचा आपणास सराव आहे. दुसऱ्यांशीं खोटें बोलणें—निदान अमुक एक प्रकारचें खोटें बोलणें—वाईट आहे असें आपण समजतों पण आत्मवंचना मात्र आम्ही निःशंकपणे करतों; पण परिणामाच्या

दृष्टीने जर विचार केला तर, दुसऱ्याशीं आपण कोणताही अत्यंत घाणेरडया प्रकारचा जो खोटेपणा करूं शकूं त्यापेक्षा, ज्या आत्मवंचनेच्या पायावर आम्ही आमचा सबंध जीवनक्रम उभारला आहे, ती आत्मवंचना मात्र फारच भयंकर आहे.

"आम्ही काय करावें ?" या प्रश्नाचें उत्तर आपणांस देतां यावें असें वाटत असेल तर आपला हा स्वत:शीच चाललेला खोटेपणा पुढे चालू राहतां उपयोगी नाही.

खोटया पायावर जर मी सर्व आयुष्यक्रमाची उभारणी केली, व हें खोटेंच खऱ्याऐवजी लोकांना देऊं लागलों व स्वत:ही खोटयाला खरें मानूं लागलों, तर या प्रश्नाचें उत्तर मला कसें देतां येईल बरें ? आत्मवंचनेच्या दृष्टीने विचार करतां, खऱ्याला न भिणें म्हणजेच खोटें न बोलणें, असा अर्थ होतो. विवेक व बुद्धि यांचीं अनुमानें दडपून टाकण्याकरितां सबब न शोधणें, किंवा दुसरे जर अशी सबब शोधून देतील तर तिचा अव्हेर करणें म्हणजेंच आत्मवंचना टाळणें होय. माझ्या सभोंवारच्या लोकांशीं मतभेद झाला तरी मी एकटयानेच स्वत:च्या सदसद्विवेकबुद्धीचें म्हणणें मान्य करणें, किंवा सत्यमार्गावर जात असतां ज्या मुक्कामावर पोचूं त्याला न घाबरणें, त्याचप्रमाणे सत्यमार्गावरील हीं अनुमानें कितीही विचित्र वाटलीं तरी तीं असत्यावर उभारलेल्या गोष्टींपेक्षा भयंकर असूं शकत नाहीत असा दृढविश्वास असणें, हा आत्मवंचना टाळण्याचा मार्ग होय. आम्ही बौद्धिक काम करणार म्हणून श्रेष्ठ, अशी आत्मवंचना करून घ्यायची नसेल तर, आमच्या कामाचा आढावा घेण्यास आम्ही भितां कामा नये. कदाचित आमच्या नांवें रकम इतकी असेल की, आम्हांला (आमच्या जमा रकमेंतून)ती भागवतां येणार नाही. पण तें कसेंही असलें तरी, आमची काय स्थिति आहे हें जाणून घेण्याचें टाळण्यापेक्षा, खऱ्या परिस्थितीला तोंड देणें बरें. आम्ही खोटया मार्गावर कितीही मजल मारली असली तरी, अजून त्याच मार्गाचा अवलंब करण्यापेक्षा, परतणें केव्हांही बरें. दुसऱ्याशीं खोटें बोलणें हें फक्त हानिदायकच असतें; कारण खऱ्याच्या साहाय्याने प्रत्येक बाबीचा ताबडतोब निकाल लागतो आणि खोटयामुळे निवाडयाच्या मार्गांत अडथळा उत्पन्न होतो. पण स्वत:शीं खोटें बोलण्याने म्हणजें आत्मवंचनेने तर स्वत:च्या आयुष्याचाच सर्वस्वीं नाश होतो.

एखाद्याने चुकीच्या मार्गाने प्रवास सुरू केला व बळेंच त्या मार्गाला तो योग्य समजूं लागला, तर प्रत्येक पावलागणिक तो आपल्या उद्दिष्टापासून अधिकाधिक लांब जाईल. आणि जर अशा प्रकारें चुकीच्या रस्त्यानें बराच लांब गेल्यावर त्याला त्याचा मार्ग चुकल्याची जाणीव झाली अगर त्याला तसें कोणी सांगितलें, परंतु 'आपण इतक्या दूर चालून आलों, आतां कसें परतावें' अशा विचाराने, आणि याही मार्गाने केव्हा तरी आपण खऱ्या मार्गावर पोचूंच अशी खोटी भावना करून, तो तसाच पुढे चालत राहिला, तर खऱ्या मार्गावर तो कधीही पोचूं शकणार नाही. एखाद्याला सत्याची भीति वाटल्यामुळें, सत्य दिसूनही तें मान्य करण्याचें जर तो टाळील आणि खोट्यालाच खरें म्हणून कवटाळून बसेल, तर त्याला 'काय करावें ?' या प्रश्नाचें कधीच उत्तर मिळणार नाही. आम्ही श्रीमंतच नव्हे, तर मिरासदारीयजा हक्क असलेले सुशिक्षित समजले जाणारे लोक, या चुकलेल्या रस्त्यावर इतके लांब गेलों आहोंत की, एक तर आम्ही कल्पनातीत मनोनिर्धार केल्याशिवाय किंवा खोट्या मार्गाचा अवलंब करीत असतां आम्हांला जबर अडचण घडल्याशिवाय, आमच्या राहणींतील खोटेपणा आम्हांला पटणार नाही.

मी खोट्या मार्गावर असल्यामुळें मला मानसिक हाल सोसावे लागले हें एकापरी बरेंच झालें. कारण त्यामुळे माझ्या जीवनक्रमांतील खोटेपणा मला पटला आणि हा खोटेपणा (प्रथमतः फक्त विचारसृष्टींतच) कबूल केल्यामुळे मला माझी बुद्धि व विवेक याचें म्हणणें ऐकण्याचें धैर्य आलें, व हीं मला कोणत्या मार्गावर नेऊन सोडतील याची मला बिलकुल कदर वाटली नाही. या (मनो)धैर्याचें मला बक्षीसही मिळालें. माझ्याभोंवती जो मिश्र, असंबद्ध व दुर्बोध असा सामाजिक गोंधळ चालू आहे त्याचा स्पष्ट अर्थ मला तावडतोब उमजला. आणि या गोंधळांतील जो माझी परिस्थिति पूर्वी मला फार विचित्र व अस्वस्थतादायक वाटे तीच आता स्वाभाविक व सोपी वाटूं लागली. कारण या नव्या दृष्टीने मी काय करावें याचा नक्की निश्चय झाला व माझें नवें काम पूर्वीच्या माझ्या कल्पनेहून अगदी निराळें व अधिक शांत, आनंददायक व पटण्यासारखें असें ठरलें. पूर्वी मला ज्याची भीति वाटे त्यानेच आता मला आनंद वाटूं लागला.

म्हणून मला वाटतें की, जो कोणी स्वत:ला "माझें कर्तव्य काय ?" हा प्रश्न विचारून आत्मवंचना न करितां बुद्धि व विवेक यांच्या साहाय्यानें उत्तर काढण्याचा प्रयत्न करील त्याला तें उत्तर केव्हांच मिळेल. जर तो फक्त आत्मवंचना करण्याचें टाळील तर त्याला काय करावें, कोठे जावें व कसें करावें यांचें ताबडतोब उत्तर मिळेल. पण स्वत:बद्दल खोटी व भलती उच्च भावना जर तो करून घेईल, तर त्याला हें उत्तर मिळण्याच्या मार्गांत अडथळा येण्याचा संभव आहे. माझें असेंच झालें. म्हणून 'काय करावें' याचेंच दुसरें उत्तर मला असें मिळालें (व हें पहिल्या उत्तरांतून आपोआप निघतें) की, प्रथम मी पूर्णपणे पश्चात्तापाने होरपळलों पाहिजे, अर्थात् मी स्वत:बद्दलची माझी (भलतीशी उच्च) भावना पूर्णपणें बदलली पाहिजे. आम्ही फार उपयोगी व महत्वाचे समाजघटक आहोंत असें समजण्याचें टाकून देऊन, आम्ही आपलें हानिकारकत्व व क्षुद्रत्व कबूल केलें पाहिजे. आमच्या शिक्षणाबद्दल अभिमान बाळगण्याचें टाकून देऊन आम्ही आमचें अज्ञान कबूल केलें पाहिजे. त्याचप्रमाणे आमचें दयालुत्व व नीतिमत्ता यांचा खोटा अभिमान टाकून आम्ही आमचें क्रौर्य व अनीतिमत्ता यांचीही कबुली दिली पाहिजे. आमचें महत्त्व फार आहे असें समजण्याऐवजी आम्ही आमचें क्षुद्रत्व कबूल केलें पाहिजे.

याचाच अर्थ असा की, आत्मवंचना तर मला टाळावी लागलीच, पण त्याबरोबरच मला पश्चात्तापही व्हावा लागला; कारण माझ्या मतें आत्मवंचना थांबली की, पश्चात्ताप मागोमाग येतोच. पण हें जरी खरें असलें तरी स्वत:च्या उच्चत्वाबद्दलची भ्रामक कल्पना माझ्यांत इतकी दृढमूल झाली होती की, मला पश्चात्ताप होऊन मी ती कल्पना टाकून देईतोवेतों, माझी आत्मवंचना कोणत्या थराला गेली होती, याचा मला अंदाजच लागला नाही. मला पश्चात्ताप होऊन, मी कोणी दुष्टाचार्य नसून इतरांप्रमाणे मीही सामान्य मनुष्य आहें असें पटल्यानंतरच, मला माझा मार्ग स्पष्ट दिसूं लागला.

त्यापूर्वी, 'मी काय करावें ?' याचें उत्तर मला देतां येईना. कारण माझा प्रश्नच मुळीं उलट पडे. मला पश्चात्ताप होईपावेतों माझ्या प्रश्नाचें असें स्वरूप असे, " माझ्यासारख्या बुद्धिवान व सुशिक्षित माणसाने काय करावें ? कार्याची कोणती दिशा निवडावी ? "

"मी शेंतकऱ्यांपासून जें घेतों त्याची माझ्या या शिक्षणाच्या व बुद्धीच्या मदतीने मी कशी भरपाई करूं?" हा प्रश्नच मुद्दलीं चूक आहे. कारण या प्रश्नांत मी इतरांप्रमाणें सामान्य मनुष्य नसून, चाळीस वर्षांच्या बौद्धिक कसरतीने तयार झालेला मी कोणी और प्राणी आहें व या बुद्धिमत्तेच्या व शिक्षणाच्या सहाय्याने मला लोकांच्या उपयोगी पडवयाचें आहे, असें गृहीत धरलें आहे. मी प्रश्न विचारला खरा, पण मला आवडणारा उद्योग करून मी लोकांची सेवा करणार हें मी आगाऊच ठरविलें असल्याचें त्या प्रश्नांत गर्भित होत असल्यामुळे माझ्या प्रश्नाचें मी आधीच उत्तर देऊन टाकल्याप्रमाणें होत होतें. चाळीस वर्षें परिश्रम करून पुष्कळसें ज्ञान मिळविलेला प्रतिभासंपन्न असा मी लेखक, म्यां कोणत्या रीतीने लोकांच्या उपयोगी पडावें? असा मी स्वतःस प्रश्न विचारला. एखाद्या धर्मपारंगत शास्त्र्याला जसा विचारावा तसा मला प्रश्न विचारला पाहिजे* आणि तो अशा स्वरूपांत असावा: "ज्या मी दुर्दैवाने अभ्यासास उत्कृष्ट असणारीं माझीं तारुण्याचीं उमेदीचीं वर्षें, काम करण्याचें शिकण्याऐवजी, फ्रेंच भाषा, पिआनो, व्याकरण, भूगोल, न्यायशास्त्र, काव्य, कथा, कादंबऱ्या, तत्त्वज्ञान व लष्करी कवाईत हीं शिकविण्यांत घालविलीं व ज्या मी हीं उत्कृष्ट वर्षें माझ्या आत्म्यास हीनत्वास पोचविणाऱ्या आळशीपणांत नष्ट केलीं, त्या मी—मागें झालें तें झालें पण निदान माता—मला ज्यांनी आजवर अन्न व कपडें पुरविले व अजून जे पुरवीत आहेत त्या लोकांकरितां काय करावें? पश्चात्ताप झाल्यावर माझ्यासमोर जसा या स्वरूपांत सदर्हू प्रश्न पुढे उभा राहिला, तसा तो पूर्वी येता तर, मला याचें उत्तर सहज मिळतें तें असें; "प्रथम स्वतःचें प्रामाणिकपणें पोषण करण्याचा प्रयत्न कर, अर्थात् परोपजीवी राहण्याचें कसें टाळतां येईल हें शीक, व हें शिकत असतां व शिकल्यावर, स्वतःचे हात, पाय, मेंदू, हृदय आणि इतर सर्व शक्ति खर्च करून ज्या प्रकारच्या सेवेची लोक मागणी करतील त्या प्रकारची लोकसेवा करण्याचा प्रयत्न कर."

---

* मुळांत 'धर्मग्रंथा'बद्दल 'टालमड' या ज्यू लोकांच्या धर्मग्रंथाचा व ज्यू शास्त्र्यांचा उल्लेख आहे. मराठी वाचकांच्या सोईकरितां त्यांत फेरफार केला आहे.

म्हणून मी म्हणतों की, आमच्या समाजांतल्या माणसांनी आत्मवंचना करण्याचें व लोकांशीं खोटें बोलण्याचें तर थांबविलें पाहिजेच, पण त्यावरोवरच त्यांना पश्चात्तापही झाला पाहिजे. म्हणजे आमच्या अंगावरचा अभिमानाचा जाड थर खरवडून निघेल. शिक्षण, सुधारणा, विद्वत्ता इत्यादींचा अभिमान सोडून लोकांवर उपकार करतों ही भावना, व आपण श्रेष्ठ दर्जाचे पुरुष लोकांस उपयुक्त ज्ञानाचा ठेवा वाटण्यास निघालों आहोंत ही समजूत सोडून आपण एक सर्वश: अपराधी, नासलेले व अजागलस्तनवत् प्राणी असून स्वत:ला सुधारण्यास निघालों आहोंत व दुसऱ्यावर उपकार करणें तर दूरच राहो, पण दुसऱ्यांना त्रास देण्याचें मात्र आपण बंद करावयास हवें, अशी आपली भावना झाली पाहिजे.

माझ्या लिखाणांतील टीकात्मक भाग ज्यांना मान्य होतात असे कैक चांगले तरुण मला विचारतात, "मग मी काय करूं ?" "मी ही अमुक अमुक डिग्री मिळविली आहे. लोकांना माझा उपयोग होईल, असें मी काय करूं?" हे प्रश्न ते विचारतात खरे, पण त्यांच्या अंत:करणाच्या अगदी आंतल्या कप्यांत अशी समजूत दबा धरून बसलेली असते की आपलें शिक्षण म्हणजे आपल्याला एक मोठाच लाभ प्राप्त झालेला असून त्याच्या सहाय्याने आपल्याला लोकसेवा करायची आहे; म्हणून त्यांनी मिळविलेलें शिक्षण व पदवी हीं खरोखरच कांही उपयोगाची आहेत की नाही याची प्रामाणिकपणें व सूक्ष्मपणें छाननी ते कधीही करणार नाहीत. जर ते आपल्या शिक्षणाचीच छाननी करतील तर, त्यांना त्यांचें शिक्षण व्यर्थ आहे असें पटून पुन: श्रीगणेशा केला पाहिजे, असें त्यांना दिसून येईल; व खरें म्हणाल तर, या (श्रीगणेशा)चीच खरी आवश्यकता आहे.

"काय करावें ?" या प्रश्नाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोणच चुकला असल्यामुळे त्यांना या प्रश्नाचें उत्तर मिळत नाही. प्रश्न असा विचारावयास हवा. 'मी एक हतबुद्ध आणि कुचकामाचा गृहस्थ असून दुर्दैवाने माझीं उमेदीचीं वर्षें मी आत्मघातकी शास्त्राचा अभ्यास करण्यांत घालविलीं. ही चूक दुरुस्त करून लोकसेवा करण्याचें मी आता कसें शिकूं ?' पण त्याला पडणाऱ्या प्रश्नाचें स्वरूप असें असतें,'मी जें हें अद्वितीय ज्ञान संपादन केलें त्याच्या साहाय्याने मी लोकांच्या उपयोगी कसा पडूं ?' म्हणून असा

प्राणी स्वत:ची फसवणूक थांबवून पश्चात्तापाने शुद्ध होई पावेतो 'काय करावें ?'या प्रश्नाचें उत्तर देऊं शकणार नाही.आणि जसें सत्य भयंकर असत नाही तसा हा पश्चात्तापही भयावह असत नाही. उलट ज्याप्रमाणें सत्य हें आनंददायक व (परिणामीं) गोड असतें, तसाच हा पश्चात्तापही आनंद-दायक व (परिणामीं) गोड असतो. आपण सत्याचा पूर्णपणें स्वीकार केला व मोकळेपणीं पश्चात्ताप केला म्हणजे कोणालाही कोणतेही हक्क नसून प्रत्येकाला असंख्य कर्तव्यांचें मात्र पालन करावयाचें आहे, व निसर्गाशीं चाललेल्या झगडयांत भाग घेऊन स्वत:च्या व इतरांच्या पालनपोषणास मदत करणें हें प्रत्येक मनुष्याचें आद्य कर्तव्य आहे, या गोष्टी पटावयास उशीर लागणार नाही.

आणि कर्तव्याची ही जाणीव होणें यांतच "काय करावें ?" या प्रश्नाच्या तिसऱ्या उत्तराचें सार आहे.

मी आत्मवंचना करण्याचें बंद करण्याचा प्रयत्न केला. नंतर स्वत:च्या श्रेष्ठतेबद्दलच्या माझ्या भ्रामक भावनांना हाकलून देऊन मनाला पश्चा-तापाची आच दिली. पण 'काय करावें ?' या प्रश्नाच्या उत्तराच्या मागांत एक तिसरीच अडचण उभी राहिली. करण्यासारख्या इतक्या असंख्य गोष्टी समोर आल्या की, त्यांपैकी कोणतें एक करावें याबद्दल स्पष्ट दिग्दर्श-नाची गरज वाटूं लागली. आणि मी ज्या दुष्टपणानें राहात होतों त्या दुष्टपणाबद्दल मन:पूर्वक पश्चात्ताप वाटल्यानंतर या अडचणींतून माझी सोडवणूक झाली. प्रत्येकजण 'काय करावें ?' हेंच विचारतो व मीही हेंच स्वत:स विचारीं, आणि स्वत:च्या शिक्षणाबद्दल जोंवर माझी खोटी कल्पना होती तोंवर, मलाही माझें पहिलें व निरपवाद कर्तव्य, स्वश्रमाने स्वत:स अन्न व वस्त्र, तसेंच घर, सर्पण इ. मिळविणें, व हें करीत असतां लोकांच्या उपयोगी पडणें हें आहे, हें दिसेना. कारण खरें पाहिलें तर जगाच्या सुरुवातीपासून हेंच मनुष्याचें आद्यकर्तव्य असत आलें आहे.

याच मार्गाने माणसाला पूर्णपणें शारीरिक व आत्मिक समाधान मिळूं शकेल. स्वत:च्या व स्वत:च्या आश्रितांच्या गरजा स्वत: भागविण्याने स्वत:चें शारीरिक समाधान होतें. इतरांकरितां हेंच करण्याने आत्मिक समाधान होतें.

या प्राथमिक कर्तव्याचें पालन झाल्यानंतरच माणसाचे इतर उद्योग न्याय्य ठरूं शकतील.

माणसाला स्वत:स योग्य धंदा कोणता याबद्दल त्याचें कांहीही मत असो, व राज्यकारभार, धर्म, शिक्षण, सुखसोयींचीं साधनें निर्माण करणें, निसर्गनियमांचा छडा लावणें, कलाकृतींमधून सत्याचा आविष्कार करणें यांपैकी कशाकडेही त्याचा कल असो,ही गोष्ट निश्चित की प्रत्येक बुद्धिप्रधान माणसाचे निसर्गाशी झगडा करून स्वत:च्या गरजा भागविणें व दुसऱ्यांच्या गरजा भागविण्यास मदत करणें, हेंच आद्य कर्तव्य राहील. हेंच नेहमी आद्य कर्तव्य राहील असें म्हणण्याचें कारण असें की, लोकांना सर्वांत ज्यास्त गरज जिवंत राहण्याची आहे, व म्हणून लोकांचें रक्षण करणें, त्यांना शिक्षण देणें किंवा त्यांचें जीवन अधिक सुखमय करणें इत्यादि गोष्टी करावयाच्या असतील तर प्रथम त्यांचें प्राणरक्षण झालें पाहिजे. पण प्राणरक्षणासाठी चाललेल्या उद्योगांत भाग घेण्याचें टाळून मी इतर लोकांचें श्रमफल लुबाडतों व त्यामुळें इतरांच्या जीविताच्या नाशास मी कारण होतों.

म्हणून एकीकडे लोकांचा प्राणघात करीत राहून दुसरीकडें लोकांची सेवा करण्याचा प्रयत्न करणें अशक्य व वेडेंपणाचें आहे.

प्राणरक्षणार्थ निसर्गाशीं झगडा करणें हें सदोदित मनुष्याचें आद्य व नि:संदिग्ध कर्तव्य राहील. कारण हा जीवननियम आहे व या बाबतींत कर्तव्यपराङ्मुख झाल्यास मनुष्याच्या शारीरिक जीवनाचा अगर बौद्धिक जीवनाचा नाश झाल्याशिवाय राहणार नाही. जर एखादा एकांतवासांत राहणारा मनुष्य हें कर्तव्य टाळील तर त्याला मृत्यु येईल. पण समाजांतील एखादी व्यक्ति जर हें कर्तव्य टाळील तर तिला शिक्षा हीच होते की तिचें जीवन तावडतोब अबुद्धिग्राह्य व अन्यायपूर्ण होतें.

माझ्या पूर्वीच्या जीवनक्रमाने मी इतका नासला होतों व परिश्रमाचा हा ईश्वरी किंवा नैसर्गिक नियम आमच्या समाजांत इतका नजरेआड असतो की, मला याचें पालन करणें विचित्र व भयंकर किंबहुना लाजिरवाणें वाटलें; जसें कांही एखाद्या त्रिकालाबाधित नियमाच्या भंगापेक्षा त्याचें पालनच अधिक विचित्र, भयंकर व बेशरमपणाचें असतें !

हें कर्तव्य पाळायचें तर कांही खास व्यवस्था असावी असें मला प्रथम वाटलें. सारख्या विचाराचे लोक, माझ्या कुटुंबातील मंडळीची संमति, किंवा खेड्यांत जाऊन राहणें, अशासारख्या गोष्टींची मला गरज वाटली.

नंतर आमच्या समाजांत सराव नसलेलीं अंगमेहनतीचीं कामें करून स्वत:चें प्रदर्शन करण्याची मला इच्छा आहे, असें लोकांना वाटेल की काय अशी मला शंका येऊन मी शरमलों; आणि कामास कशी सुरवात करावी हें मला समजेना.

पण हें माझ्या लक्षांत यावयास पाहिजे होतें की यांत एखादी विशेष योजना शोधून तिची व्यवस्था करण्याची नसून मी ज्या खोटया परिस्थितींत होतों तींतून निसर्गसिद्ध परिस्थितींत परतण्याचाच काय तो प्रश्न होता. माझ्या राहणींतील खोटेपणा काय तो दुरुस्त करायचा होता, हें लक्षांत घेतांच सर्व अडचणी शून्यवत् झाल्या.

वास्तविक कोणत्याही खास व्यवस्थेची, जुळणीची अगर लोकांच्या संमतीची वाट पाहण्याची गरज नव्हती. कारण की, सदासर्वकाळ मी कोणत्याही परिस्थितींत असलों तरी स्वत:लाच नव्हे, तर मलाही पोसणारे, कपडे पुरवणारे, किंवा स्वत:ची व माझी शेगडी पेटविणारे असे लोक सतत मजभोवतीं असतच व मजमध्ये पुरेशी शक्ति व मला पुरेसा वेळ असता तर हीं सर्व कामें स्वत:करितां व त्यांच्याकरितां मी कोठेही व केव्हाही करूं शकलों असतों.

शिवाय अशाप्रकारें मला संवय नसलेलीं कामें करतांना उगाच खोटी लाज वाटण्याचें कारण नव्हतें. कारण हीं न केल्याबद्दल मला आधीच खरीखुरी लाज वाटूं लागली होती. आणि ही जाणीव माझ्यांत उत्पन्न झाल्यावर व त्यापासून व्यवहार्य अनुमानें निघाल्यावर, मी या अनुमानांना व तीं ज्या अखेरच्या मुक्कामाला पोचवितील तेथपर्यंत जाण्याला न भ्याल्याबद्दल मला पारितोषिकही मिळालें.

तें व्यवहारोपयोगी अनुमान निघाल्याबरोबर, पूर्वी मला जें प्रश्न अत्यंत बिकट वाटत,ते किती सहज सुटले हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें.

'मी काय करावें ?' या प्रश्नाला मला असें उत्तर मिळालें. 'प्रथम तूं तुला अवश्य असणाऱ्या—स्वत: आपलें पेय (सामोव्हर) तयार करणें, स्टोव्ह

पेटवून घेणें, पाणी आणणें, कपड्यांची व्यवस्था करणें इ०—गोष्टी स्वतः कर आणि स्वतःचीं जितकीं कामें स्वतः करतां येतील तितकीं करून दाखव.' हें माझ्या चाकरमाणसांना जरा चमत्कारिक वाटेल असें मला वाटलें. पण हें चमत्कारिक वाटणें फक्त आठवडाभरच काय तें टिकलें. नंतर अशी स्थिति आली की मी जर पूर्वीसारखा राहूं लागलों असतों तर मात्र त्यांना चमत्कारिक वाटलें असतें.

हया शारीरिक कष्टाच्या कामासंबंधाने कांही विशेष संघटना करावी की काय आणि देशामध्ये अशा तऱ्हेचा एक ग्रामीण समाज बनवावा की काय, या प्रश्नाला, या सर्व गोष्टींची कांही जरूरी नाही, असेंच उत्तर मिळालें. आणि अनुभव असा आला की दुसऱ्यांचे श्रम राबवून घेऊन स्वतः आळशीपणाने राहणें हाच जो उद्देश आजकालच्या पैशाच्या पाठीमागें लागलेल्या लोकांचा असतो तो सोडून देऊन, केवळ स्वतःच्या वैयक्तिक गरजा भागविणें याच उद्देशाने करण्यांत येणारे श्रम स्वभावतःच मनुष्याला शहरामधून खेड्यापाड्यांत जाण्यास प्रवृत्त करितात. कारण असे श्रम खेड्यापाड्यांतच सुफलदायी व आल्हाददायी होऊं शकतात.

समाज अगर संस्था काढण्याचीही गरज नव्हती. कारण श्रम करण्याचें तत्व ज्यांनी अंगीकारिलें ते आपोआपच पूर्वीच्या श्रमजीवी समाजामध्ये मिसळून जातात.

"या कामांत मी गुंतलों तर माझा सर्व वेळ खर्ची पडून, ज्या बौद्धिक कार्याविषयीं मला प्रेम वाटतें, ज्याचा मला सवय आहे व जें मला क्वचित् अवश्यही वाटतें, तें काम करणें मला अशक्य होणार नाही काय?" या प्रश्नाचें मला अगदी अकल्पित उत्तर मिळालें. माझी बौद्धिक काम करण्याची शक्ति वाढली; मी ज्या प्रमाणांत चैनीच्या गोष्टी झुगारून देऊं लागलों व ज्या प्रमाणांत स्वतः काम करूं लागलों, तितक्या प्रमाणांत हया शक्तीची वाढ झाला.

(पूर्वी जो वेळ मी मला येणारा कंटाळा व जडपणा घालविण्याचा प्रयत्न करण्यांत करीत खर्च असें) तो सर्व वेळ म्हणजे पुरे आठ तास शारीरिक श्रम केल्यानंतरही मला आणखी आठ तास उरत व यांपैकी बौद्धिक कार्यासाठी मला फक्त पांचच तासांची गरज असे.

मला असें दिसून आलें की, ज्या मी चाळीस वर्षें लेखनाशिवाय कांहीच केलें नाही व अशा रीतीने सुमारें ५००० पानें लिहिलीं, अशा भक्कम लेखकाने जर तीं चाळीस वर्षें शेतकऱ्याचें काम केलें असतें व (सुट्या वगैरे वगळून) जर दररोज पांच तास वाचन केलें असतें व फक्त सुटयांच्या दिवशीं रोजीं दोनच* पानें या वेगाने लेखन केलें असतें (कधी कधी मी सोळा पानें सुद्धा लिहिलीं आहेत), तर मी लिहिलेलीं ५००० पानें फक्त चवदा वर्षांत लिहिलीं गेलीं असतीं.

एखाद्या सात वर्षांच्या मुलालाही जी गोष्ट कळेल अशी एक आश्चर्यकारक गोष्ट मला नव्यानेच पटली. दिवसांत २४ तास असतात. झोंपेचे आठ तास वगळल्यास बाकीचे सोळा तास उरतात. जर बौद्धिक काम करणारा यांपैकी पांचच तास काम करील तर त्याचे हातून कितीतरी काम होईल. बाकीच्या अकरा तासांचें काय होतें ?

शारीरिक कामाने बौद्धिक कामास अडथळा होण्याचें तर दूरच राहो, पण त्यांत वाढ होते, कामाची प्रत वाढते व बौद्धिक कामाला शारीरिक कामाने मदतच होते, असा मला अनुभव आला.

शारीरिक कामाने माझ्या अनेक निरागस करमणुकींमध्ये व्यत्यय व अडथळा येणार नाही काय ? उदाहरणार्थ, कलाकृतींचा आस्वाद घेणें, ज्ञान संपादन करणें, लोकांशीं गप्पा टप्पा मारणें इ० जीवनांतील आनंदांना मला मुकावें लागणार नाही काय ? या प्रश्नाचें उत्तरही मला उलटच मिळालें. शारीरिक काम जितकें अधिक जोमाचें असेल–जितकें या कामांत व शेतीच्या कठीण कामांत जास्त साम्य असेल–तितका जास्त अनुभव व आनंद मिळतो व तितका लोकांशीं सलोख्याचा संबंध वाढून स्वतःचें जीवन अधिक सुखमय होतें.

पुष्कळ अभाविक लोक मला विचारतात की, "कांहो तुम्ही जो गठ्ठाभर दुसऱ्यांच्या श्रमफलाचा अपहार करतां, त्या मानाने तुम्ही जी

---

* हा हिशेब थोडा चुकलेला दिसतो. दोनचे एवजीं टॉलस्टायने चार म्हणावयास हवीं होतीं असें दिसतें. रविवार व इतर सुट्यांचे दिवस मिळून शेतकऱ्यांचे वर्षामध्यें ९० दिवस मोकळे जातात. तेव्हा ९० दिवस × ४ पानें × १४ वर्षें = ५०४० अशा गणितानें टॉलस्टॉयने जितकीं पानें प्रत्यक्ष लिहिलीं तेवढा जवळजवळ हिशेब होतो.

शारीरिक मेहनत करणार, ती समुद्रांत पाण्याचा थेंब अशासारखीच नाही का होणार ?" या प्रश्नालाही मोठें आश्चर्यकारक व कल्पनातीत उत्तर मिळालें.

प्रत्यक्ष अनुभवाने मला असा प्रत्यय आला की, शारीरिक मेहनतीला मी माझ्या नेहमीच्या कार्यक्रमांत कायमचें स्थान दिल्याबरोबर माझ्या आळसाशीं संलग्न असणाऱ्या माझ्या वाईट व खर्चिक सवयी आपोआप गळून पडल्या. रात्रीचा दिवस व दिवसाची रात्र करण्याची खोड तर जाऊंच द्या, पण माझ्या बिछान्याची तऱ्हा, माझी सांप्रदायिक स्वच्छता, माझ्या अन्नाचे प्रकार, इ० सर्व गोष्टी, ज्या शारीरिक श्रमांत गुंतलेल्याला त्रासदायक व अशक्य होतात, त्या पूर्णपणें बदलून गेल्या.

पूर्वी मला जें गोड, श्रीमंती, मसालेदार व चमचमीत जेवण आवडे त्याऐवजी मला साधें व अत्यंत आल्हाददायक असें जेवण आवडूं लागलें. कोबीचा रस्सा, साकरी, चहा व थोडीशी साखर एवढ्यावर माझें उत्तम भागूं लागलें.*

अशा प्रकारें ज्या शेतकऱ्यांशीं माझें संघटन झालें त्यांच्याप्रमाणे मीही साधेपणाने राहूं तर लागलोंच, पण जसजशी मला कामाची सवय होऊं लागली तसतसा माझ्या कामाचा (समुद्रांतला) 'बिंदु' मोठा होऊं लागला, व ज्या मानाने माझें स्वतःचें काम जास्त उत्पादक होऊं लागलें त्या मानाने मला दुसऱ्यांच्या श्रमांवर कमी दिसंबून राहावें लागलें. अशा प्रकारें जें साधें जीवन, मी श्रमजीवी झालों नसतों तर, माझ्या कल्पनेंत सुद्धा येणें कठीण होतें, अशा जीवनाजवळ मी अधिकाधिक जाऊं लागलों. मला असें दिसून आलें की, निव्वळ कटाळवाणेपणा घालवण्याकरितां व मोठेपणाच्या भरीस पडून मी लोकांना जी मजकरितां मेहनत करण्यास भाग पाडीत असें, तिचा उगम माझ्या आळशी जीवनापासून होई.

शारीरिक काम करूं लागल्यावर मोठेपणाची कल्पनाही शिल्लक उरली नाही व मनरंजनाचीही गरज नाहीशी झाली. कारण माझा वेळ चांगला जाऊं लागला व थकवा आल्यानंतर चहा घेतांघेतां किंवा पुस्तक

---

* रशियांतील शेतकरी सवय व काटकसर म्हणून चहांत साखर घालण्याऐवजी साखरेचे लहान खडे तोंडांत ठेऊन वरून बिनसाखरेचा चहा घेतात.

वाचीत किंवा गप्पा करीत आराम करण्यांत, नाटक, पत्ते, गायन, जलसा किंवा इतर सामाजिक समारंभ अशा कल्पनातीत खर्चिक गोष्टींपेक्षा, अतुलनीय असा जास्त आनंद मला वाटूं लागला.

माझी प्रकृति खराब होईल की काय व असें झालें तर मी लोकांच्या उपयोगी (बौद्धिक काम करून) कसा पडूं शकेन, या शंकेचाही निरास झाला. प्रमुख प्रमुख डाक्टरांनी मला असें सांगितलें होतें की, इतक्या उतार वयांत जबर शारीरिक श्रमाने प्रकृतीला अपाय होईल तेव्हा मी या श्रमांऐवजीं स्वीडिश जिमनास्टिक्स, कडकचंपी इत्यादि-अनिसर्गसिद्ध-मार्गांचा अवलंब करावा. परंतु डाक्टरांचें हें भाकीत खोटें ठरून मी जितकी अधिक मेहनत करूं लागलों तितकें मला अधिक बरें, सशक्त, उल्हसित व सुप्रवृत्त वाटूं लागलें. यामुळे माझी खात्री झाली की, ज्याप्रमाणे वर्तमानपत्रें, नाटकें, तमाशे, गाणीं, नाचरंग, पत्ते-कादंबऱ्या इत्यादि हीं माणसाच्या बुद्धीला अनैसर्गिक परिस्थितींत कायम ठेवणारीं घातपणाचीं साधनें आहेत, त्याप्रमाणेंच आमचीं आरोग्यभुवनें व आरोग्याच्या नांवाखाली सुरू असलेलीं विशेष खाद्यपेयें, घरें, कपडे, औषधें. औषधी पाण्याचे झरे, विजेचे उपचार इ० हीं सुद्धा माणसाच्या शरीराची अनैसर्गिक परिस्थितींत जोपासना करणारीं घातकी साधनें होत. निसर्गसिद्ध शारीरिक परिश्रमांना टाळा देण्याच्या कार्यांत माणसाला मदत करणें हें या घातकी कल्प्यांचें ध्येय आहे. ज्याप्रमाणें एखाद्याने रोपांना शुद्ध हवा मिळावी म्हणून, खिडकी मोकळी केली म्हणजे भागण्यासारखें असतां, खोली सीलबंद करून वैज्ञानिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने पाणी उकळून रोपांना मानवेल असें हवामान उत्पन्न करण्याचा प्रयत्न करावा, तशासारखा हा प्रकार आहे. कृत्रिम साधनांनी प्रकृतिस्वास्थ्य रक्षण करण्याच्या खटपटीपेक्षा,खाल्लेल्या अन्नाने उत्पन्न झालेल्या शक्तीचा योग्य व्यय करण्याकरितां शारीरिक श्रम करणें, हा प्रकृतिस्वास्थ्याचा सोपा मार्ग आहे.

आमच्या (श्रीमंत) वर्गांतील लोकांत औषधें व आरोग्यरक्षण यांच्या ज्या यातायाती व सव्यापसव्यें रूढ आहेत,त्यांची तुलना,एखाद्या एंजिनिअरने बॉयलरचीं सर्व तोंडें (व्हाल्व) घट्ट बंद केल्यानंतर वाफेने बॉयलर फुटूं नये म्हणून योजिलेल्या यांत्रिक युक्त्यांशीं करतां येईल.

हें जेव्हा माझ्या लक्षांत आलें तेव्हा मला मोठा विस्मय वाटला. शंकाकुशंका, खोल विचार व आत्मशोध इतक्या उपायांनी डोंगर पोखरल्यावर मला समजलें काय, तर ईश्वराने माणसाला डोळे पाहण्याकरितां, कान ऐकण्याकरितां, पाय चालण्याकरितां व हात काम करण्याकरितां दिले असून, यांचा उपयोग जर माणूस न करील तर त्याचें नुकसान होईल!

माझ्या एका मित्राच्या उत्तम घोड्यांचा जो प्रकार झाला तोच आम्हा हक्कदार वर्गांतील लोकांचा होत आहे, असें मी अनुमान काढलें.

त्याच्या मोतद्दाराला घोड्यांचें कांही समजत नव्हतें व तो त्यांची पर्वाही करीत नसे. माझ्या मित्राने आपल्या मोतद्दाराला उत्कृष्ट घोडे निवडून विक्रीकरितां घोड्यांच्या बाजारांत नेण्याचा हुकूम दिला. मोतद्दारानें कळपांतून कांही घोडे निवडून त्यांना तबेल्यांतून ठेवलें व तो त्यांना ओट व पाणी देऊं लागला. या किमती घोड्यांची विशेष काळजी घ्यावी म्हणून त्याने त्या घोड्यांवर कोणासही स्वारी करूं दिली नाही, त्यांना गाडीला जुंपूं दिलें नाही, किंवा कोणत्याही रीतीने व्यायाम करूं दिला नाही. सर्व घोड्यांची चाल बिघडली व ते सर्व कुचकामाचे झाले.

आमचाही प्रकार असाच झाला आहे. फरक इतकाच की, घोड्यांना ठक्कविणें शक्य नसल्यामुळे त्यांनी बाहेर जाऊं नये म्हणून त्यांना दोरखंडांनी बांधून ठेवावें लागे. पण, आम्ही त्या घोड्यांप्रमाणेंच अनिसर्गसिद्ध व विनाशक परिस्थितींत रहावें म्हणून, आम्हांला दोरखंडाऐवजी अनेक प्रकारचे मोह व लालुची यांनी बांधून ठेवलें आहे. शारीरिक व नैतिक दोन्ही दृष्टींनी विचार करतां आमचा जीवनक्रम आम्ही कृत्रिम करून ठेवला आहे, आणि जीवनक्रम असाच कृत्रिम असावा अशाबद्दल लोकांची खात्री पटवून देण्यांत आम्ही आपलें शक्तिसर्वस्व खर्च करीत आहोंत. आम्ही ज्याला 'संस्कृति' म्हणतों ती संस्कृति, शास्त्रें, कला व आयुष्यांतील सुखोपभोगाचीं साधनें हीं सर्व, माणसाच्या ज्या शारीरिक व नैतिक गरजा व जबाबदाऱ्या आहेत, त्यांची हकालपट्टी करणाऱ्या शक्तला होत. आमचें आरोग्यशास्त्र व वैद्यक हीं माणसाच्या शारीरिक निसर्गसिद्ध गरजांकडे कानाडोळा करण्याचीं साधनें आहेत. पण या निरनिराळ्या सर्व वंचनांना व फसवणुकींना कांही कमाल मर्यादा असून आम्ही ही कमाल मर्यादा सध्या गाठलेली आहे.

जर मानवी जीवनाचा हाच अर्थ असेल तर त्यापेक्षा न जगलेलेंच बरें, असें शोपेनहार व हार्टमन यांचें रूढ व समाजमान्य तत्त्वज्ञान म्हणतें. आमच्या सुशिक्षित समाजांत ज्या वाढत्या आत्महत्या होत आहेत त्या सुद्धा हेंच सांगतात की,'जर हेंच जीवन असेल तर यापेक्षा मेलेलें बरें.' आणि खुद्द विज्ञान वैद्यकशास्त्राशीं संगनमत करून व संततिप्रतिबंधक इलाज पुढे करून हेंच म्हणतें की, 'याच रीतीने जर जन्म जावयाचा असेल तर पुढची पिढी न जन्मलेलीच बरी.'

बायबलमध्ये म्हटलें आहे की 'माणसाने निढळाच्या घामाने भाकरी मिळवावी व कष्ट सोसून संतति उत्पन्न करावी हा निसर्गनियम आहे.'

बोंडारेव्ह नांवाच्या शेतकऱ्याने यासंबंधीं एक लेख लिहिला त्या लेखाने या वचनाबद्दल मला पूर्ण कल्पना येण्यास मदत झाली. (माझ्या सबंध आयुष्यांत माझ्या विचारसरणीवर परिणाम करून जीवना-बद्दलचा माझा दृष्टिकोण साफ करण्यांत दोघाजणांचें नैतिक वजन फार उपयोगीं पडलें. हे दोघे विख्यात कवी किंवा विद्वान किंवा धर्मप्रचारक नव्हते. हे दोघेही शेतकरी होते पण लक्षांत ठसण्यासारखे होते. यांचीं नांवें स्युटेव्ह व बोंडारेव्ह. हे दोघेही अजून जीवंत आहेत.*)

मॉलिएरच्या एका नाटकांत एक पात्र वैद्यकीय शास्त्रासंबंधीं बोल-तांना पुष्कळच चुका करतें, व शरीरांत यकृत डाव्या आंगाला असतें असेंही विधान करतें. कोणी खोडून काढण्याचा यत्न केला असतां तें पात्र म्हणतें, "अहो, आम्ही हें सर्व बदलून टाकलें आहे." शास्त्रज्ञही हेंच म्हणतात, "आम्ही सर्व बदलून टाकलें आहे. आता उदरंभरणाकरितां माणसाने कष्ट करण्याची गरज नाही. यंत्रें सर्व काम करतील व स्त्रियांनीही गर्भ-धारणा करण्याची गरज नाही. कामें करण्याच्या नव्या युक्त्या शास्त्र आम्हांला सांगेल, व लोकसंख्या आज आहे ती पुरेशी आहे.

क्रापिव्हेन्स्की जिल्ह्यांत (याच जिल्ह्यांत टॉलस्टायच्या जमीनदा-रीचें यासनाया-पॉलयाना गांव होतें) एक चिप्या घातलेला (वेडसर) शेतकरी हिंडतो. लढाईंत (रूसो-टर्किश लढाई १८८७-८) त्याला धान्य विकत घेण्याच्या कामावर असणाऱ्या एका ऑफिसराने नोकरीस

---

* टॉलस्टायने हा मजकूर लिहिल्यानंतर कांही वर्षांनी हे मरण पावले.

ठेविलें. याच्या नोकरींत लागतांच त्याला असें वाटूं लागलें की, आता काम करण्याची गरज न पडतां इतर 'सभ्य' लोकांप्रमाणे आपणालाही बादशहाकडून पोटगी मिळेल. तो आता स्वत:ला 'माननीय सेनापति प्रिन्स ब्लॉखीन –सर्व सैन्याला धान्य पुरविणारे कंत्राटदार' असें म्हणवतो. तो म्हणतो, "मी सर्व दर्जांची नोकरी केली असून आता माझी सैन्यांतील नोकरी संपली आहे. यापुढें मला सरकारकडून हवे तितके पैसे (बँकेंतून काढण्याची परवानगी), कपडे, युनिफार्म, घोडे, गाडी, चहा, वाटाणे, नोकरचाकर इ० सर्व मिळणार आहे."

त्याला विचारलें की, तुला कांही काम नको काय ? तर तो उत्तर देतो, "मी तुमचा आभारी आहें–तें सर्व शेतकरी करतील."

जर कोणी म्हटलें की, "शेतकऱ्यांना सुद्धा काम करणें आवडणार नाही." तर तो म्हणतो (त्याला नेहमीं बोजड शब्दप्रयोग आवडतो) की, "शेतकऱ्यांना काम करण्यांत कांहीच अडचण वाटणार नाही. त्यांना सुलभ रीतीने काम करतां यावें म्हणून अलीकडे यंत्रें शोधण्यांत आलीं आहेत. त्यांना कामाचा कंटाळा वाटत नाही." याउपर त्याला विचारलें, "मग तूं काय करतोस ?" तर तो उत्तर देतो, "फक्त वेळ घालवितों."

या माणसाकडे आरशाच्या नात्याने मी पाहतों. कारण की, यांत मला माझें व आमच्या सर्व वर्गाचें प्रतिबिंब दिसतें.

जन्मभर फक्त वेळ घालविण्याकरितां मुबलक पैशाची तरतूद होईल असा एखादा हुद्दा मिळविणें व ज्या शेतकऱ्यांच्या साहाय्यार्थ यंत्रसामग्री शोधण्यांत आली आहे त्यांनी यांचीं सर्व कामें सतत करणें—यांत आमच्या समाजाच्या पागलपणाच्या ध्येयाची पूर्ण कल्पना येते.

आम्ही जेव्हा "तर मग आम्ही काय करावें ?" हें विचारतों, तेव्हा वास्तविक आम्ही कोणताही प्रश्न विचारीत नसून निराळ्या शब्दांत पण स्पष्टपणें सांगत असतों की, आम्हाला कांहीच करायचें नाही. फरक इतकाच की, आम्ही हें वर उल्लेखिलेल्या वेडसर शेतकऱ्याइतकें स्पष्ट रीतीने मात्र म्हणत नाही.

जो शुद्धीवर येईल त्यानें हा प्रश्न विचारणेंच शक्य नाही. कारण की, एकीकडे, ज्या ज्या जिन्नसांचा तो उपभोग घेतो त्या सर्व माणसाच्या-

च परिश्रमाने बनलेल्या असतात व दुसरीकडे, तो जेवला की, जेवण पचविण्याकरितां लगेच त्याला हातपाय व डोकें हालविण्याची गरज भासते. तो जर जाणून बुजून टाळणार नाही तर त्याला सहज काम सांपडेल व करतांही येईल. ज्याला काम करण्याची लाज वाटते—ज्याप्रमाणे एखादी बाई आपल्या पाव्हण्याला दार उघडण्याचे श्रम पडूं नयेत म्हणून नोकरास हाक मारून तो येईपर्यंन्त पाव्हण्याला उभा ठेवते त्याप्रमाणे—त्यालाच "काय करावें" हा प्रश्न पडेल.

"काय करावें" याकरितां काम शोधण्याची गरज नाही. कारण की, तुमच्या व इतरांच्या गरजा भागविण्याचेंच काम करतां करतां तुमच्या नाकीं नऊ येतील. "मी स्वत:च्या चैनीकरतां खातों व निजतों" ही खोटी विचारसरणी टाकून देण्याची खरी गरज आहे. माणूस हें एक यंत्र असून त्याला अन्नाची गरज आहे; म्हणून सतत खात जाणें पण काम न करणें हें लाजिरवाणें, त्रासदायक व अशक्य आहे; आणि खाणें पण काम न करणें ही भयंकर स्थिति एखाद्या वणव्यासारखी आहे, ही विचार-सरणी मनाला पटण्याचीच काय ती खरी गरज आहे. (शेतकरी याच विचारसरणींत जन्मास येतात व वाढतात.) ही जाणीव जर प्रत्येकांत उत्पन्न झाली तर हरएकाला पुरेसें काम मिळेल व तें केल्यास शारीरिक व आत्मिक गरजा भागून मोठा आल्हाद वाटेल.

मला हा प्रकार एकंदरींत असा वाटला. जेवणाने आमच्या दिव-साचे चार भाग पडतात. (१) उजाडल्यापासून न्याहारीपर्यंत (२) न्याहारीपासून दुपारच्या जेवणापर्यंत (३) नंतर दुपारपासून सायंकाळच्या जेवणापावेतो व (४) सायंकाळ. मनुष्याची निसर्गसिद्ध कामगिरीही अशीच चतुर्विध आहे. (१) शारीरिक मेहनतीचें घाम निथळणारें काम (२) कलाकुसरीचीं कामें (३) बौद्धिककाम (४) सामाजिक दळणवळण. माणूस ज्या सुखसोयींचा उपभोग घेतो त्या सुखसोयीही चार प्रकारच्या आहेत. धान्य, गुरें, इमारती, विहिरी, तळीं इत्यादि कठीण शारीरिक श्रमाने मिळणाऱ्या गोष्टी. नंतर कपडे, जोडे, भांडीं इत्यादि कमी श्रमाच्या पण कलाकुसरीच्या गोष्टी. तिसऱ्या बौद्धिक परिश्रमजन्य गोष्टी उ०—शास्त्रें व कला, व चौथा प्रकार म्हणजे सामाजिक सुखसोयी—उ० मोळस-

देख, मैत्री इ०. या विचारानंतर मला असें वाटलें की, सर्वांत उत्तम पक्ष म्हणजे हा की प्रत्येकाने आपला दिवसाचा वेळ विभागून व माणसाच्या सर्व प्रकारच्या शक्तींचा उपयोग करून चारी प्रकारच्या गोष्टी निर्माण कराव्या' म्हणजे सर्व वेळेचा सदुपयोग होईल. पहिला काळ (न्याहारीपर्यंत) शारीरिक श्रमांत, दुसरा काळ (जेवणापर्यंतचा) मानसिक परिश्रमांत, तिसरा (सायंकाळच्या जेवणापावेतोचा) कलाकुसरीच्या कामांत व शेवटची सायंकाळ मित्रमंडळीच्या समागमांत, असा काळ घालवावा. अशा रीतीने जर कामाची प्रत्येकाला वाटणी करतां आली तर उत्तमच, पण नाही तर निदान काम करण्याबद्दलच्या जबाबदारीबद्दल तरी प्रत्येकाला सतत जाणीव असावी. निदान वेळेचे सर्व तुकडे योग्यपणीं खर्च करण्याची प्रत्येकाची जबाबदारी आहे. असें झालें तरच आमच्यांत रूढ असलेला अन्यायी श्रमविभाग नष्ट होऊन नवा व मनुष्याच्या सुखास आडकाठी न आणणारा श्रमविभाग शक्य होईल असें मला वाटलें.

मी माझें सर्व आयुष्य बौद्धिक कामांतच खर्च केलें आहे. मी स्वत:शीं विचार केला की, मी जो श्रमविभाग कल्पिला तो, मी माझें विशेष असें बुद्धिप्रधान काम म्हणजे लेखन करावें, व इतरांनी माझीं इतर आवश्यक कामें करावीं–अशा प्रकारचा होता. (मी त्यांना भाग पाडलें म्हणाना!) या व्यवस्थेंतील अन्याय तर घटकाभर बाजूला राहूं द्या; पण ज्या बौद्धिक कामासं सोईची म्हणून ही व्यवस्था ठरविली, त्या बौद्धिक कामासाठीच ही पद्धति गैरसोईची ठरणारी आहे.

सबंध आयुष्यभर मी माझा जेवणखाण, निजणें फिरणें, करमणूक इत्यादि सर्व कार्यक्रम याच एका (बौद्धिक) कामाच्या सोईने ठरविला असून याव्यतिरिक्त मी कांहीही केलें नाही.

याचा परिणाम असा झाला की, माझ्या ज्ञानाचें व अनुभवाचें क्षेत्र मी स्वत: होऊनच आकुंचित करून बसलों; कधी कधी मला कशावर विचार करावा हेंच मुळी सुचेनासें होई.

पुष्कळ वेळां मी जेव्हा व्यक्तींच्या जीवनाचें चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करीं, (आणि मानवी व्यक्तींचें जीवन हा विचारशक्तीला सतत काम देणारा कायमचा विषय आहे) तेव्हा मला माझें अज्ञान दिसून येई;

व एखाद्या विशिष्ट विषयाच्याच व्यासंगांत गढून न गेलेलीं अशीं जीं साधीं माणसें असत त्यांपैकी प्रत्येकाला माहीत असणाऱ्या गोष्टींची मला माहिती नसल्यामुळे त्यांची मला विचारपूस करावी लागे. शिवाय मी लिहावयास बसें तेव्हा अंत:स्फूर्ति होत नसे. आणि कोणास माझे लेख त्यांतील विचारांकरितां हवे होते असें नसून, वर्तमानपत्रांना फक्त माझ्या नांवाचा शक्य तो उपयोग करून घेण्याची काय ती इच्छा होती. माझ्या स्वत:पासून जितकें म्हणून पिळून काढतां येईल तितकें पिळून काढण्याचा मी प्रयत्न करीं. कधीं कांहीच मिळत नसे व कधी थोडेंच मिळे, व त्यामुळे मला असंतोष वाटून निरुत्साह होई. असें झालें म्हणजे पुनः पुनः आठवडेच्या आठवडे तसेच जात, व त्या अवधींत मी खाणें पिणें, झोपणें, शेंकणें यांखेरीज कांहीही करीत नसें; किंवा लोकांना ज्याचा उपयोग नाही असें कांही तरी करीं. म्हणजे कामकऱ्याच्या जातीचे लोक जो गुन्हा बहुतकरून कधींही करीत नाहीत असा घाणेरडा गुन्हा मी करीत असें. पण जेव्हा मला शारीरिक श्रमाचें तत्त्व पटलें अधिक मेहनतीचीं व कलाकुसरीचीं दोन्हीं जातीचीं कामें करावींशीं वाटूं लागलीं तेव्हा अगदी निराळा प्रकार झाला. कितीही क्षुल्लक प्रमाणांत का होईना, पण माझा वेळ उपयोगी कामांत खर्ची पडूं लागला, व त्यामुळे मला आनंद वाटून माझ्या ज्ञानांतही भर पडूं लागली. म्हणून ज्या वेळीं मला अंत:स्फूर्तीचा विशेषच जोर वाटे व लोकांकडून माझ्या लेखासाठी प्रत्यक्ष मजकडे मागणी करण्यांत येई तेव्हाच मी या उपयुक्त व आनंददायक व्यवसायापासून स्वत:ला तोडून काढीं. लोक मागणी करीत तेव्हा कशा प्रकारचें व कोणत्या दर्जाचें लिखाण हवें हें आपोआपच ठरे, व म्हणून हें माझें विशिष्ट कामही मूल्यवान व आल्हाददायक होई.

याचा अर्थ असा की, इतरांप्रमाणेंच मलाही अवश्य असणारें शारीरिक काम माझ्या बौद्धिक कामांत व्यत्यय आणीत नसे. इतकेंच नव्हे, तर माझें बौद्धिक काम उपयुक्त, उत्तम दर्जाचें व सुखावह होण्यास शारीरिक काम अत्यंत आवश्यक आहे असेंच ठरलें.

पक्ष्याचा उडणें, चालणें, चोंच मारणें, विचार करणें हा सर्व सहजधर्म आहे. या सर्व क्रिया जर तो करील तर त्याला सुख होईल व त्याला

यथार्थत: पक्षी म्हणतां येईल. हीच गोष्ट माणसाची. जर माणूस चालणें, फिरणें, उचलणें, ओढणें, (पाणी) काढणें, बोटांचीं कामें करणें व डोळे, कान, डोकें यांचा सर्वांगीण उपयोग करणें, इत्यादि गोष्टी करील तरच त्याला सुख होईल व त्याला माणूस म्हणतां येईल.

काम करणें हा आपला धर्म आहे, याची ज्याला जाणीव असेल तो स्वत:च्या अंतर्बाह्य गरजा व्यवस्थितपणें भागाव्या असाच कामाचा कार्यक्रम नियमित करील; व जर लोकांकडून एखादी विशिष्ट प्रकारची जोरदार मागणी करण्यांत येईल व त्यालाही अंत:स्फूर्ति वाटेल तरच तो त्या विशिष्ट कामाकडे ओढला जाईल.

माणसाच्या निरनिराळ्या गरजा भागविण्यास अवश्य असणाऱ्या कामांमध्यें स्वभावत:च आलट पालट होत असल्यामुळे त्यांचा कंटाळा न येतां त्यांमुळे उलट आनंदच वाटतो. ज्या पद्धतीने स्वत:ला विशिष्ट प्रकारच्या कामाच्या बोजापासून सोडवितां येईल, व जीमुळे इतरांना जबरदस्तीने तीं कामें करणें भाग पडेल, असा श्रमविभाग, फक्त तशाच लोकांना पटेल की ज्यांना कष्ट करणें हें एक भयंकर संकट आहे असें वाटतें.

कामाच्या विभागणीच्या या चुकीच्या कल्पनेने आमच्यावर इतका पगडा बसविला आहे की, एखादा चांभार, यंत्रशास्त्रज्ञ, लेखक किंवा गायक यांनी इतर निसर्गसिद्ध श्रम न करतां तेंच काम करीत राहणें अधिक श्रेयस्कर आहे असें आम्हांला वाटतें.

जेथे जुलमाच्या किंवा आळसांतील सुखाबद्दलच्या खोट्या कल्पनेच्या आधारावर कांहीजण दुसऱ्यांचें श्रमफल लुबाडीत नाहीत, तेथे विशिष्ट प्रकारचें काम करतां यावें म्हणून कोणीही निसर्गसिद्ध श्रमांपासून स्वत:ची सोडवणूक करून घेणार नाही. कारण, एखादें विशेष काम करण्याची योग्यता, हें फायद्याचें कलम नसून स्वतःची आवड व लोकांची गरज यांच्या पूर्त्यर्थ करावयाचा तो स्वार्थत्याग होय.

एखाद्या खेडेगांवांतील चांभार, जर शेतांतील आनंददायक काम सोडून शेजारपाजाऱ्यांचे नवे जोडे करीत असेल अगर जुने सुधारीत असेल तर याचें कारण हेंच की त्याला हें जोडे शिवायचें काम विशेष आवडतें; व इतर कोणीही त्याच्यासारखें काम करूं शकत नसल्यामुळे, तो जर लोकांचें

हें काम करील तर लोक त्याचे आभार मानण्याचा संभव आहे. पण सबंध जन्मभर त्याला स्वत:ला आवडेल असा कामाचा पालट करतां येऊं नये असें त्याला वाटणें शक्य नाही. हाच प्रकार शिक्षकाचा, लेखकाचा किंवा मेकॅनिकचा समजावयाचा. आमच्या भ्रष्ट कल्पनेमुळेच.आम्हाला असें वाटतें की, जर एखाद्या बँक मॅनेजरने एखाद्या कारकुनाला बडतर्फ करून शेतकामावर घाडलें, अथवा एखादा सरकारी अधिकारी बडतर्फ होऊन हद्दपार केला गेला तर ती त्यांना एक शिक्षा झाली व त्यामुळे त्यांची स्थिति पूर्वीहून वाईट झाली. वास्तविक पाहतां यांत त्यांचा फायदा होत असतो. त्याचें विशिष्ट व त्रासदायक काम जाऊन त्यांना त्याऐवजी आल्हाददायक काम मिळत असतें.

निसर्गसिद्ध समाजरचनेंत हा प्रकार अगदी निराळा असतो. मला एका लहानशा खेडेवजा समाजसंघाची माहिती आहे.* यांतील लोक आपलें धान्य स्वत: पिकवीत. यांपैकी एक सभासद दुसऱ्यापेक्षा जास्त शिकलेला असल्यामुळे त्याला इतरांकरितां व्याख्यानें द्यावीं लागत. त्याला दिवसास हीं तयार करावीं लागत व संध्याकाळीं तो व्याख्यान देई. तो हीं व्याख्यानें मोठ्या आनंदाने देई. कारण त्याला वाटे की, अशा प्रकारें आपण इतरांच्या उपयोगी पडत आहोंत. पण त्याला नेहमी मानसिक परिश्रमच करण्याचा कंटाळा येऊं लागला व त्याची प्रकृति बिघडली. इतर लोकांना त्याची दया आली व त्याला त्यांनी शेतांत काम करण्यास बोलाविलें.

ज्यांना 'श्रम' हें जीवनाचें सार व सुखाची किल्ली आहे हें पटतें, त्यांना निसर्गाशीं झगडत राहणें म्हणजे जमिनीची मशागत, हस्तकौशल्याचीं कामें आणि मानसिक श्रम हीं करणें आणि मनुष्यामनुष्यांमध्यें स्नेहसंबंध स्थापित करणें हा सर्व जीवनाचा पाया होय हें पटेल.

ज्या वेळीं अमुक एक काम आपण इतरांपेक्षा चांगलें करतों व हें काम लोकांकरितां अवश्य आहे असें एखाद्याला वाटतें व लोकांकडूनही त्या कामाची मागणी होते, तेव्हाच तो माणूस स्वार्थत्यागपूर्वक वरीलपैकी सर्व अथवा कांही कामें सोडून त्या विशिष्ट कामाच्या मागे लागतो. या एकाच पद्धतीने स्वभावसहज श्रमविभाग अस्तित्वांत येऊं शकेल. कारण

---

* ऐमर मॉडच्या "टॉलस्टॉयचा जीवनवृत्तांत भाग २ रा" या पुस्तकाच्या ६ व्या प्रकरणांत यासंबंधीं माहिती आली आहे.

कोणीही मनुष्य एकतर निखालसपणें उपयुक्त व आनंददायक अशाच कामांत गुंतलेला राहील किंवा जर कोणी एखाद्या विशिष्ट कठीण कामांत गुंतला असेल तर तो स्वार्थत्यागपूर्वक जाणून बुजून इतरांच्या फायद्याकरितां तें काम करीत असेल.

"पण कामाची पोट विभागणी जास्त फायदेशीर आहे!" होय, फायदेशीर आहे. पण कोणाकरितां ?

ही पोटविभागणी चिटाचें कापड व बूट तयार करण्याच्या दृष्टीन बरी आहे. पण हे बूट किंवा छपाईचें कापड कोणास करावें लागणार ? तर ज्यांनी पिढ्यान् पिढ्या फक्त टांचण्या तयार केल्या त्यांना ! मग हें त्यांना फायदेशीर कसें होणार ?

जर शक्य तितके जास्त बूट अगर टांचण्या तयार करणें हेंच आमचें मुख्य कर्तव्य असेल तर हें ठीक आहे. पण आमचें खरें उद्दिष्ट लोक व लोककल्याण हें आहे. माणसाचें कल्याण त्याच्या जीवनांत आहे, व जीवन श्रमावलंबित आहे. असें जर आहे, तर त्रासदायक व नीच काम करावयास भाग पाडणें हें फायदेशीर कसें होऊं शकेल ?

दुसऱ्यांचें काय होतें याबद्दल बेफिकीर राहून, कांही थोड्या मूठभर लोकांचें कल्याण करणें हा जर आमचा उद्देश असेल, तर कांही लोकांनीं इतरांना खाणें हेंच सर्वोत्कृष्ट ठरेल; आणि नरमांस खरोखर स्वादिष्ट लागतें असेंही म्हणतात. पण मला (कांहीचें कल्याण नको असून) ज्यांनी सर्वांचें जास्त कल्याण होईल अशा गोष्टीच माझ्याकरितां पाहिजेत. अर्थात मला माझ्या शरीरास अवश्य व माझ्यांत असलेली बुद्धि, विवेक व सारासार विचार यांना पटणाऱ्या सर्व सुखदायक गोष्टी पाहिजेत. हें मला साध्य होण्यास फक्त एकाच गोष्टीची गरज होती. ती म्हणजे भ्रमनिरास. क्रापिव्हेन्स्कीच्या ज्या वेड्या शेतकऱ्याचा उल्लेख मागे आला आहे, त्याप्रमाणें माझ्या ज्या वेडसर कल्पना–उ० उच्चवर्गीयांनीं काम करणें वाईट आहे, सर्व काम ठरावीक इतर लोकांनीच केले पाहिजे इ०—होत्या, त्या टाकून स्वतःस आवश्यक व निसर्गसिद्ध अशीं कामें सुरू करणें एवढ्याचीच फक्त गरज होती. हें मला दिसून आल्यावर माझी खात्री पटली की, माणसाला अवश्य असणाऱ्या गरजा भागविण्याकरितां निरनिराळ्या प्रकारचीं कामें

अवश्य आहेत, व सर्व कामें आपापल्यापरी आल्हाददायक असून तीं कंटाळवाणीं नाहीत. इतकेंच नव्हे, तर एक काम सोडून दुसऱ्या कामाकडे लागणें आरामशीरही असतें.

थोडक्यांत ढोबळ मानाने मी या कामाचे माझ्या गरजांना अनुसरून भाग पाडले (मी पाडलेले विभागच बरोबर आहेत असा माझा मुळीच आग्रह नाही) व यांची चतुष्टयी दिवसाच्या चार भागांत बसविली व अशा प्रकारें माझ्या गरजा भागविण्याचें सुरू केलें.

अशा प्रकारें माझ्या "तर मग आम्ही काय करावें ?" या प्रश्नाला खालील उत्तरें मिळालीं.

(१) आत्मवंचना करूं नये; व आपला मार्ग सारासार विचाराने दर्शविलेल्या मार्गापासून कितीही चुकला असेल तरी सत्याला भिऊं नये.

(२) स्वत:च्या आयुष्यक्रमाचें न्यायीपण, व इतरांपेक्षा मी निराळा आहें असें भासविणारे आपल्यांतील विशेष, यांबद्दलचा भ्रम टाकून देऊन स्वत:च्या दोषाचें माप पदरांत घ्यावें.

(३) निसर्गसिद्ध श्रमजीवनाचा अबाधित व सनातन नियम पाळून निसर्गाशीं झगडा करुन स्वत:च्या व इतरांच्या निर्वाहाची सामग्री पैदा करावी.

प्रकरण एकोणचाळिसावें

एवढ्यांशीं संबंध असणाऱ्या सर्व गोष्टींचा उल्लेख होऊन गेल्यामुळें माझें म्हणणें येथे संपलें; पण इतरांशीं संबंध असणाऱ्या गोष्टींचा उल्लेख केल्याशिवाय आणि मी काढलेले निष्कर्ष सर्वसामान्य विचारांच्या कसोटीस लावून पडताळून पाहिल्याशिवाय मला राहवत नाही.

माझ्या वर्गांतील बव्हंश लोक मी काढलेलीं अनुमानेंच अखेर काढतील असें मला का वाटतें, हें मी सांगूं इच्छितों; व मूठभर लोकांनी जरी हीं अनुमानें मान्य केलीं तरी काय परिणाम होईल, हेंही सांगावें अशी माझी इच्छा आहे.

आमच्या वर्गांतील लोक व सुखाची लालसा असणारे तरुण जर सभोंवार निरीक्षण करतील तर त्यांचें सर्वनाशानुगामी जीवन घटकोघटकीं कसें वाढत्या प्रमाणांत कष्टी होत आहे, हें पाहून त्यांना भीतीच वाटेल. सद्सद्विवेक जाग्यावर असणारांना त्यांच्या जीवनांतील अमानुषपणा व अन्याय पाहून भीति वाटेल व भेकड माणसाला स्वत:च्या जीवास असणारा धोका पाहून भीति वाटेल.

आमच्या जीवनाची दु:खमयता

आमच्या (कृत्रिम) जीवनाला आम्ही कसेही आधार दिले व शास्त्र व कला यांची कितीही मदत घेतली, तरी आम्ही दिवसेंदिवस अशक्त, रोगी व दु:खीच होत आहोंत; प्रतिवर्षी आत्महत्या व मातृपदवर्जन वाढतच आहे; दरवर्षी आमचें जीवन अधिकच भयाण होत आहे.

यावरून हें स्पष्ट आहे की, वैद्यकीय चिकित्सा, कृत्रिम दांत व केंस, श्वसनव्यायाम, कडकचंपी इत्यादि सर्वांची मदत घेऊन जीवनांतील चैनी व सुखें यांची वृद्धि करण्याचा जो आमचास ध्याचा मार्ग आहे, त्याने श्रेय:-प्राप्ति होणार नाही. या विधानाचें सत्य लोकांना इतकें पटलें आहे की, श्रीमंतांकरितां ज्या पाचक चूर्णांच्या जाहिराती छापल्या जातात त्या 'गरिबांस मिळालेला ईश्वरी प्रसाद' अशा मथळचाखाली छापल्या जातात

व त्यांत असें म्हटलेलें असतें की फक्त गरिबांचीच पचनशक्ति चांगली असते आणि श्रीमंतांना पचनासाठी बाह्य उपायांची जरूरी असून हीं चूर्णें अशा बाह्योपायांपैकीच आहेत.

ही स्थिति नाटकतमाशे, सुखसोई किंवा चूर्णें यांनी सुधारणार नाही. ती सुधारण्यास जीवनक्रमच बदलला पाहिजे.

आमचें जीवन व सदसद्विवेक बुद्धि यांतील विरोध:

आम्ही मानवजातीशीं जी बेइमानी करतों तिचें आम्ही कसेंही समर्थन केलें, तरी प्रत्यक्ष वस्तुस्थितीचें निरीक्षण करतांच हें सर्व समर्थन मातींत मिसळतें. आमच्या सभोवार लोक, खायला नाही किंवा कपडें नाहींत म्हणून मृत्युमुखीं पडत आहेत; व आम्ही अन्न, कपडे व मजूरी यांचा, केवळ मनोरंजन व्हावें म्हणून, उपयोग करीत आहोंत. म्हणून आमच्या वर्गांतील कोणत्याही मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि, जर तिचा एखादा कण तरी त्याच्या अंगीं उरला असेल तर, स्वस्थ राहत नाही, व त्याला इतरांच्या श्रमांमुळें—जे तीं कामें करीत असतां मृत्युमुखीं पडतात अशा बांधवांच्या श्रमांमुळे—मिळणाऱ्या सर्व जिन्नसा व सोई ती विषवत् करून टाकते.

हें सदसद्विवेक शाबूत असणाऱ्या प्रत्येक माणसाला तर पटतेंच (त्याला विसरावेसें वाटलें तरी आजच्या युगांत त्याला शक्य नाही), पण ज्या शास्त्र व कलेने आपलें खरें व मूळ ध्येय अजून पुढें ठेवलें आहे, तें शास्त्र व ती कला, हीं आमच्या जीवनक्रमांतील क्रौर्य व अन्याय यांची आम्हांला सतत आठवण देत आहेत. पूर्वीची सर्व मजबूत समजलीं जाणारीं समर्थनें नष्ट झालेलीं आहेत, व 'शास्त्राकरितां शास्त्र' व 'कलेकरितां कला' या घर्तींचीं जी नवीं क्षणभंगुर शास्त्र–कला–जन्य समर्थनें उद्भवत आहेत त्यांच्या तर सामान्य तारतम्य बुद्धीपुढे ठिकऱ्या उडतात.

नव्या सबबींनी मनुष्याची सदसद्विवेकबुद्धि झोंपी जाणें शक्य नाही. सदसद्विवेकबुद्धीच्या टोंचणीला थांबवायचें तर आम्हांला आमचा जीवनक्रमच बदलला पाहिजे. म्हणजे पुढे समर्थनाचीच गरज उरणार नाही.

आमच्या जीवनक्रमाच्या पद्धतींतील धोका

आम्ही आमच्या डोळ्यांवर कितीही कातडें ओढलें तरी, ज्यांवर आम्ही जुलूम करीत आहोंत; त्यांची सहनशक्ति संपून (ते उलटण्याचा) स्पष्ट, साधा व भयंकर धोका आहे हें निर्विवाद आहे. आम्ही वाटेल तशी ठकबाजी, जुलूमजबरदस्ती अगर शढच्छल केला तरी हा धोका प्रतिक्षणीं वाढतच आला आहे; व आज तो इतका परिपक्व झाला आहे की, आमच्या लहानग्या बोटीवरून या भयानक समुद्राचे तुषार सरसं उडूं लागले असून यांच्या असंतोषसमुद्रांत घटकोघटकीं आम्ही गडप होतों की काय अशी भीति वाटत आहे. कामकऱ्यांच्या रक्तपातपूर्ण आणि विध्वंसक क्रान्तीचें आम्हांला प्रतिक्षणीं भय आहे; इतकेंच नव्हे, तर गेलीं तीस वर्षें आम्ही या तोफेच्या तोंडाशींच उभे आहोंत. येनकेन प्रकारेण आम्ही ही तोफ डागली जाण्याचा समय लांबवीत आहोंत इतकेंच. हीच स्थिति युरोपमध्यें आहे. आमची हीच परिस्थिति आहे व आमचेकडे सेफ्टीव्हाल्व्ह (बचावसाधनें) नसल्यामुळे आमची परिस्थिति विशेषच बिकट आहे. झारशिवाय इतर जे लोक जनतेवर जुलूम करतात त्यांना लोकदृष्टया कोणतेंही समर्थन शिल्लक नाही. जनतेला सध्या निव्वळ जुलूम, ठकबाजी व संधिसाधूपणा (opportunism) यांच्या जोरावर कह्यांत ठेवलें आहे. पण जनतेचे जे चांगले प्रतिनिधी आहेत त्यांना आमचेबद्दल तिरस्कार व जहाल प्रतिनिधींच्या मनांत आमचेबद्दल त्वेष हीं प्रतिक्षणीं वाढत आहेत.

गेल्या तीन चार वर्षांतच पूर्वी मी कधीही न ऐकलेला 'ऐतखाऊ' या अर्थाचा शब्द सामान्य जनतेंत प्रचारांत आलेला आहे. हा शब्द रस्त्यांतून मोठ्या अर्थपूर्ण रीतीनें आमचेबद्दल वापरला जातो.

जुलमाखाली दडपले जाणारांच्या मनांतील त्वेष व तिरस्कार वाढत आहे व जुलूम करणारांचें शारीरिक व नैतिक बल कमी होत आहे. ज्या भ्रमावर सर्व डोलारा उभा आहे तो भ्रमही विरघळत आहे व या भयंकर परिस्थितींत श्रीमंतांना सान्त्वन करून घेण्याचें एकही साधन उपलब्ध नाही.

जुन्या मार्गावर (श्रमजीवनाच्या) जाणें अशक्य आहे; त्याचप्रमाणें चिंधडया झालेला बोजही पुनः मिळविणें अशक्य आहे. अशा परिस्थितींत

सांपडलेल्या व स्वत:चा जीवनक्रम बदलण्याची इच्छा नसणाऱ्या श्रीमंतांना आपण जिवंत आहोंत तोंपर्यंत तरी सध्याची परिस्थिति टिकली म्हणजें झालें—मग काय व्हावयाचें असेल तें होईनां का—अशी आशा करीत राहण्याचा एकच मार्ग मोकळा आहे.

आमच्या आंधळ्या श्रीमंतांची झुंड हेंच करीत आहे. पण धोका वाढत असून ती कराल प्रलयवेला जवळजवळ येत आहे.

स्वत:चा जीवनक्रम बदलण्याचीं तीन कारणें श्रीमंत लोकांच्यापुढें स्पष्ट आहेत. स्वत:चें व आप्तांचें सुख व स्वार्थ, सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीला थांबविण्याची गरज व बाह्य उपायांनी न टळूं शकणारा भावी अनर्थ. या तीन्ही कारणांचा परिणाम होऊन वास्तविक श्रीमंतांना स्वत:चा जीवनक्रम बदलून अनर्थ टाळण्याची आणि आपल्या सदसद्विवेक बुद्धीचें समाधान करून आपलें कल्याण साधण्याची बुद्धि व्हावी

आणि हा बदल एकच. ठकबाजी थांबविणें, पश्चात्ताप करणें व श्रमजीवन हें अनर्थावह नसून आनंदमय आहे हें ओळखणें. पण लोक म्हणतात की, "मजजवळ असणाऱ्या पैशाकरितां जें काम करावयास हजारों शेतकरी मिळूं शकतात, त्या कामांत मी पांच ते दहा तास खर्च करण्यांत कोणता शहाणपणा आहे?"

याचें उत्तर असें की, या फेरबदलाने तुम्ही जास्त आनंदी, निरोगी, सुयोग्य व सुप्रवृत्त व्हाल, व जें जीवनरहस्य तुम्ही ओळखलें नाही किंवा तुमचेपासून लपवून ठेवलें गेलें तें तुम्हाला कळेल. दुसरें असें की तुम्हांला जी सदसद्विवेकाची सतत टोचणी आहे ती थांबेल व स्वकर्तव्य बजावल्याबद्दलचें आत्यंतिक समाधान वाटेल. सध्या वाइटाचा तुमच्याजवळ इतका संचय झाला आहे की त्यामुळे दुसऱ्यांचें भलें करणें तुम्हांस अशक्य झालें आहे, ती परिस्थितीही बदलेल. तुम्हाला मोकळेपणा वाटेल. ज्या नैतिक वातावरणाचे सर्व दरवाजे तुमच्याकरितां बंद होते त्या नव्या वातावरणांत तुम्ही एक मार्ग स्वत:ला खुला केल्यासारखें होईल. आणि शेवटीं सध्या तुम्ही करीत असलेल्या वाइटाबद्दल सूड उगवला जाण्याची जी तुम्हाला सतत भीति वाटते त्याऐवजी तुम्ही स्वत: तर वांचालच, पण इतरही जे अशाच धोक्यांत आहेत त्यांनाही आपण वांचवूं शकतों असें

तुम्हाला वाटेल. पददलित जनतेचाही आपण त्वेष व तिरस्कार या विषारी भावनांपासून बचाव करितों असा तुम्हांला अनुभव येईल.

पण यावर लोक सामान्यत: असें म्हणतात की, "आम्ही मिनिस्टर, सीनेटर, प्रोफेसर, कलावंत, गायक, इ० ज्या आमचीं पंधरा मिनिटें सुद्धा बहुमूल्य आहेत त्या आम्हीं, आमचे नोकरच नव्हे, तर ज्या इतरांना आमच्या कार्याची किंमत वाटते असे सहस्रावधि लोक जीं हलकीं सलकीं कामें आमचेकरितां करूं शकतात–उदाहरणार्थ बुटाला पॉलिश करून घेणें, कपडें धुणें, कोंबड्यांना दाणे चारणें, जनावरांकडे लक्ष देणें इ०–अशा कामांत गुंतावें व तिकडे आमच्यापुढे आ वासून उभे असलेले तत्वज्ञान, विज्ञान, राजकारण, धर्म, समाज यासंबंधीचे गहन प्रश्न उपेक्षिले जावे हें हास्यास्पद नव्हे काय ?" याला उत्तर प्रश्नात्मकच. पूर्वी जीं अनेक कामें आमचे गुलाम आमचेकरितां करीत, तीं कामें, उ० कपडे करणें, चेहरा धुणें, पाहुण्यांना खुर्ची देणें, दरवाजे उघडणें–लावणें, गाडींत चढतांना हात देणें, इ० अनेक कामें आम्हीं कां करूं लागलों ? कारण हीं कामें आम्ही केलीं पाहिजेत असें आम्हांला वाटूं लागलें. हीं करण्यांत आपल्या माणुसकीला बाध येत नाही, इतकेंच नव्हे तर हें आमचें कर्तव्यच आहे, अशी आमची भावना झाली.

हीच गोष्ट शारीरिक श्रमाची आहे. श्रम करणें यांतच माणसाचा मोठेपणा आहे. हेंच त्याचें कर्तव्य व जबाबदारी आहे. माणसाने सतत आपल्या हातापायांचा उपयोग करून खाल्लेलें अन्न जिरविणें व अन्नसामग्री उत्पन्न करणें व आपल्या अवयवांना अजागलस्तनवत् न बनूं देणें हेंच त्याचें परम कर्तव्य आहे. निव्वळ तोंडांत अन्न, पाणी व सिगारेटी कोंबण्याकरितांच हातापायांचा उपयोग करणें व त्याप्रीत्यर्थंच त्यांना धुणें एवढ्यानेंच माणसाचें कर्तव्य संपत नाही.

शारीरिक श्रमाचें प्रत्येक माणसाच्या दृष्टीने असें महत्त्व आहे. पण या निसर्गनियमाच्या भंगामुळे ज्या आमच्या वर्गावर संकट येऊं पहात आहे त्यांच्या दृष्टीने तर याचा आणखीं विशेष अर्थ आहे. इतरांना हा एक धडा घालून दिल्याप्रमाणें होणार आहे व जें भयंकर अनर्थ मानवजातीला भेडसावीत आहेत त्यांना प्रतिबंध करण्याचा हा एक उपाय

आहे. एखादें देऊळ बांधलें जात असतां प्रत्येक दगड व्यवस्थितपणें जागचे जागीं बसविण्यांत काय अर्थ आहे असें विचारणें, व सुशिक्षित माणसाला याची काय गरज अथवा महत्त्व आहे असें विचारणें, हे दोन्ही प्रश्न सारखेच (मूर्खपणाचे) आहेत.

सर्व महत्त्वाचीं कामें गाजावाजा न करतां अगदी साध्यासुध्या रीतीनें केलीं जातात. नांगरणें, घरें बांधणें, गुरें चारणें किंवहुना विचार करणें हीं कामें झकपक उजेडांत अगर तोफांच्या कडकडाटांत किंवा युनिफार्म पोषाखांत होत नाहीत. हीं जीं आमच्या परिचयाचीं बाह्य उपकरणें आहेत, व ज्यांच्याशीं कार्याची महत्त्वाची कल्पना संलग्न आहे असें आम्ही समजतों, तीं, खरोखर त्या त्या कृत्यांना स्वतःचें अंगभूत असें कांहीच महत्त्व नाही याचें द्योतक असतात.

मोठीं व खरीं कामें हीं नेहमी साधेपणानें नटलेलीं असतात.

आम्ही ज्या विपर्यस्त स्थितींत आपलें जीवन घालवितों तिचा निरास करणें हें जें अत्यंत महत्त्वाचें कार्य आमच्यापुढे आहे त्याची अवस्था देखील अशीच आहे. आमच्या जीवनांतील विपर्यास किंवा बोलणें व करणें यांतील विसंगति ही अशाच लहानशा, विनबोभाटपणें होणाऱ्या व बाह्यात्कारीं हास्यास्पद दिसणाऱ्या अशा क्षुद्र्यांनी नाहीशी होणार आहे. तीं कृत्यें म्हणजे स्वतःचीं व शक्य झाल्यास दुसऱ्यांचीं शारीरिक श्रमाचीं कामें स्वतः करणें हींच होत. आम्ही श्रीमंत जर आमच्या परिस्थितींतला धोका व अन्याय उमजूं लागलों तर आम्ही स्वतःचीं कामें करून शक्य तर लोकांच्या उपयोगीही पडावयास लागूं.

मी आणि इतर मूठभर लोकांनी श्रमजीवन हें वाईट नसून सुख, स्वास्थ्य व सुरक्षितता यांकरितां तें अवश्य आहे असें मानण्यास सुरुवात केली तर एवढ्यानेंच काय होईल ? याचा निदान इतका अर्थ होईल की, दुसऱ्या कोणाशींही विरोध न येतां आणि सरकारच्या अगर कांतिकारकांच्या जबरदस्तीची गरज न पडतां आम्ही मूठभर लोकांनी सगळ्या जगाला त्रास देणारा हा प्रश्न आपल्यापुरता सोडवला. निदान एवढेच लोक चांगल्या रीतीने राहूं लागतील व त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीचें समाधान होऊन त्यांच्यामागची भीति तरी नष्ट होईल. इतरांना हें उदाहरण

पाहून असें वाटेल की, ज्याचा आपण शोध करीत आहों तें स्वहित जवळच आहे. प्रत्यक्ष परिस्थिति व सदसद्विवेकाची उर्मी यांत दिसणारा विरोध जो बाह्यात्कारीं मोठा बिकट व अनिवार्य वाटतो तो नाहीसा करणें फार सोपें व आनंददायक आहे ही गोष्ट त्यांस दिसून येईल व आमच्या भोवतालच्या (सामान्य) लोकांची आम्हांला भीति वाटण्याऐवजी आम्ही त्यांना जवळ करून त्यांवर प्रेम केलें पाहिजे, हेंही त्यांना पटेल.

हा जो वरपांगी कठीण आर्थिक व सामाजिक प्रश्न वाटतो त्याची सुटका क्रायलॉव्हच्या पेटीप्रमाणें आहे. या पेटीला मुळी कुलुप लागलें नव्हतेंच, पण तिला उघडण्याचा प्रयत्न करणारे, कुलूप लागलें आहे या समजुतीने तसा प्रयत्न करून अयशस्वी झाले. पण पेटी उघडण्यास फक्त झाकण वर करण्याचीच काय ती गरज होती.

पण जोंवर लोक अगदी पहिली व अत्यंत साधी झाकण वर करण्याची क्रिया करणार नाहीत तोंवर मात्र पेटी उघडणार नाही.

न सुटणारा जो प्रश्न दिसतो तो जुनाच—कांहींनी दुसऱ्यांचें श्रमफल लुबाडणें हा होय. आमच्या काळांत या प्रश्नाने 'मालमत्ते'चें स्वरूप घेतलें आहे.

पूर्वी लोक—गुलामांपासून—साक्षात् बळजबरीनें काम घेत. आज आम्ही तेंच कार्य आमच्या मालमत्तेच्या जोरावर करीत आहोंत.

सर्व कटकटीचें मूळ आज मालमत्तेंत आहे. मालमत्ता ज्यांच्याजवळ आहे अगर असलेली कोणत्याही कारणाने नाहीशी झाली आहे, त्यांस तिचा त्रास सोसावा लागतो; जे मालमत्तेचा दुरुपयोग करतात त्यांस सदसद्विवेकबुद्धीची टोचणी लागते; आणि ज्यांच्याजवळ मालमत्ता जरूरीपेक्षा जास्त आहे त्यांचा ज्यांच्यापाशीं तिचा अभाव आहे त्यांच्याशीं खटका उडण्याचा पदोपदीं संभव असतो. अशा रीतीने सर्व कटकटींचें मूळ मालमत्तेंत असूनही आजची आमची सर्व कर्तबगारी मालमत्ता मिळविण्याच्याच रोखाने योजिली जाते. सर्व जगाचा कारभार आज मालमत्तेच्या रोखाने चालला आहे.

सरकारें व देश मालमत्तेकरतांच लढाया करतात. यांना ह्वाईनदीच्या कांठचा मुलूख, तर त्यांना आफ्रिकेंतली जमीन, आणखी तिसऱ्यांना

चीन किंवा बाल्कन द्वीपकल्प हवें असतें. पेढीवाले, व्यापारी, कारखानदार, जमीनदार हे मालमत्तेकरितांच शवकली लढवीत असतात. व स्वत: हाल सोसून दुसऱ्यांचे हाल करितात. सरकारी कामगार व कारागीर मालमत्तेकरितांच झगडतात, फसवेगिरी करितात, जुलूम करितात व त्रास भोगतात. न्यायकोर्टे व पोलीस मालमत्तेचेंच रक्षण करतात. आमचे तुरुंग, काळेपाण्याच्या जागा व दडपशाहीच्या इतर सर्व भयंकर योजना मालमत्तेमुळेंच अस्तित्वांत आल्या आहेत.

मालमत्ता ही सर्व अरिष्टाचें मूळ आहे; आणि मालमत्तेची विभागणी व संरक्षण या कामांतच सर्व जग गुंतलें आहे.

अशी ही मालमत्ता काय चीज आहे ?

मालमत्ता म्हणजे माणसाच्या खरोखरी मालकीची कांही तरी वस्तु असा लोकांचा समज आहे. म्हणून आम्ही तिला मालमत्ता म्हणतों. आपला हात व घर यांचा 'माझें घर', 'माझा हात' असा आम्ही सारखाच उल्लेख करतों.

पण ही चूक आहे. ही भ्रामक समजूत आहे.

आम्हाला माहीत नसलें, तरी सहज कळूं शकतें की, मालमत्ता हें लोकांचें श्रमफल लुबाडण्याचें साधन मात्र आहे. परंतु दुसऱ्यांचें काम माझें होऊं शकत नाही. वास्तविक याच्यांत (दुसऱ्याने केलेल्या कामांत) व 'स्वत:च्या मालकीची वस्तु' ही जी मालमत्तेसंबंधींची कल्पना तिच्यांत कांहीच साम्य नाही. ज्यावर स्वत:ची हुकमत चालते त्याला, म्हणजे स्वत:च्या शरीराला, मालमत्ता म्हणायचें ही रूढि आहे. पण जें स्वत:चें नाही त्यानेही स्वत:च्या शरीराप्रमाणें आपल्या इच्छेनुसार चालावें व वागावें अशी इच्छा करणें ही चूक आहे. याने आपण भ्रम उत्पन्न करून घेऊन दु:ख ओढवतों व इतरांसही दु:ख भोगावयास लावणें आपणास भाग पडतें.

माणूस स्वत:ची बायको, मुलें व गुलाम यांना 'माझीं' म्हणतो; पण अनुभवांतीं हा समज चुकीचा आहे असाच त्याला सदोदित प्रत्यय येतो व शेवटीं त्याला एक तर हा समज तरी घालवावा लागतो किंवा स्वत: त्रास सोसून त्यांना त्रास द्यावा लागतो.

आजच्या काळांत आम्हीं माणसावरची सत्ता सोडून दिली आहे. पण सरकार व पैसा यांच्या मेहेरबानीने आम्ही आता पैशावर हक्क सांगूं लागलों आहोंत; याचाच अर्थ असा की आता आम्ही दुसऱ्याच्या श्रमावर हक्क सांगतों.

पण ज्याप्रमाणें बायकामुलें व गुलाम यांच्यावर मालकी असण्याचा भ्रम खोटा ठरून तो भ्रम उराशीं बाळगणाराला शेवटी कष्ट होतात (कारण माझ्या शरीरावर जशी माझी सत्ता चालते तशी त्यांचेवर चालत नाही) त्याचप्रमाणें द्रव्यरूपी मालमत्ता ही माझी कधीच होऊं शकत नाही. तिच्या योगाने फसवणूक मात्र होऊन सरतेशेवटीं ती त्रासास मात्र कारण होते. माझें शरीर हीच माझी खरी मालमत्ता राहणार. कारण शरीर माझा हुकूम बिनशर्त ऐकतें व माझ्या आत्मभावनेशीं तें संलग्न आहे.

आम्हांला सवय झाल्यामुळेंच मालमत्तेची कल्पना उपयुक्त आहे, व तिच्यापासून कांही धोका नाही असा आमचा समज होऊं शकतो. पण घटकाभर विचार केल्यास आम्हांला हें कळून येईल की, हा भ्रम असून यापासून भयंकर परिणामही होऊं शकतात.

आपण अगदी साधीं उदाहरणें घेऊं या !

समजा, मला जेवण तयार करावयाचें आहे. दुसऱ्याच्या श्रमांवर माझी सत्ता आहे असा माझा जर गैरसमज नसेल, तर स्वयंपाकाचें काम मी माझ्या मालमत्तेला–शरीराला–शिकवीन. पण मी हें काम माझ्या काल्पनिक मालमत्तेला–नोकराला–शिकवितों. पण कोणत्याही कारणामुळे हा नोकर जर माझें ऐकेनासा झाला किंवा पळाला व मला माझा स्वयंपाक मिळेनासा झाला, तर मला सवय नसल्यामुळे स्वतः स्वयंपाक करितां येत नाही. व स्वयंपाक करायला शिकण्यास पुरला असता इतका वेळ त्या स्वयंपाक्याच्या विवंचनेंत जातो. हाच प्रकार इमारती, भांडीं, जमीनजुमला व रोकड यांसंबंधीं घडतो. या सर्व मानीव मालमत्तेमुळे मला अनेक अप्रशस्त गरजा वाटूं लागतात व माझ्या खऱ्या मालमत्तेला–स्वतःच्या शरीराला–जें ज्ञान, जें कौशल्य, ज्या सवयी व जी पूर्णावस्था प्राप्त करून घेतां आली असती ती प्राप्त करून घेण्याची शक्यता नाहीशी होते.

याचा परिणाम सदोदित असा होतो की, माझ्या खऱ्या मालमत्तेची–शरीराची–हेळसांड करून मी, जी माझी मालमत्ता नाही अशा गोष्टींवरच माझा सर्व वेळ किंबहुना आयुष्याचें आयुष्य खर्च करतों.

माझी मालमत्ता म्हणून ज्यांबद्दल माझा भ्रम असतो अशा 'माझें पुस्तकालय', 'माझी चित्रशाळा', 'माझी खोली किंवा कपडे', इत्यादींची मी व्यवस्था लावतों व मला हवें तें विकत घेण्यासाठी 'माझा' पैसा मिळविण्याचा प्रयत्न करितों. या सर्व काल्पनिक मालमत्तेच्या खटपटीत मी माझी खरी मालमत्ता–म्हणजे ज्याच्यावर मी खरोखर परिश्रम करूं शकतों, जें माझी खरी सेवा करूं शकतें व जें माझ्या नेहमी कह्यांत राहील असें माझें शरीर–व खोटी मालमत्ता–जी माझी कधीच राहूं व होऊं शकत नाही—या दोहोंतील भेदाकडे माझें दुर्लक्ष होतें.

आम्ही जोंवर शब्दांना बुद्धिपुरस्सर खोटा अर्थ लावीत नाही तोंवर शब्दांचा अर्थ नेहमी स्पष्ट व सरळ असतो.

मग 'मालमत्ते'चा खरा अर्थ काय ? जें सर्वस्वीं माझें आणि केवळ माझेंच आहे, व ज्याचें मी काय पाहिजे तें करूं शकेन तिचें नांव मालमत्ता. जें माझ्याजवळून आमरण कोणीही घेऊं शकत नाही व ज्याचा उपयोग करण्याची व ज्याची वाढ व सुधारणा करण्याची जबाबदारी मजवर आहे ती माझी मालमत्ता.

या दृष्टीने पाहतां प्रत्येकाची खरी मालमत्ता फक्त त्याचें शरीर होय.

पण याच अर्थी आपण इतरही गोष्टी 'माझी मालमत्ता' असें समजतों, व याच मानीव मालमत्तेकरितां (ज्या आपल्या स्वतःच्या होऊंच शकणार नाहीत अशा बाह्य वस्तु आपल्याशा करण्याच्या अशक्यप्राय खटाटोपाकरितां) जगांतील सर्व घोरअरिष्टें उद्भवतात. लढाया, फाशी, न्यायकोर्टें, तुरुंग, चैन, अनाचार, खून व लोकांचा नाश हीं सर्व या खटपटीपासून उद्भवतात.

मग कायहो ! जर थोड्याशा लोकांनी गरजूपणामुळे नव्हे तर त्यांना हें शारीरिक श्रमाचें तत्त्व पटलें म्हणून नांगरणें, लांकडें फोडणें, जोडें तयार करणें इत्यादि कामें करावयास सुरुवात केली तर काय होईल ?

मूठभरच का मी तर म्हणतों की एका माणसाने जरी याप्रमाणें (शारीरिक) कामें सुरू केलीं तर इतरांची खात्री पटेल की, ज्या कारणामुळे लोकांना दुर्धर कष्ट होत आहेत तें कारण म्हणजे प्रारब्ध किंवा ईश्वरी इच्छा किंवा इतिहासोद्भूत आवश्यकता, यांपैकी कोणतेंही नसून त्यांचें खरें कारण म्हणजे एक भ्रामक समजूत होय. ही भ्रामक समजूत मोठी जबरदस्त व भयानक आहे अशांतला भाग नसून ती अगदीच दुर्बळ व क्षुल्लक आहे. इतकी की ती नाहीशी होण्यास तिच्यावर आपण ठेवलेला विश्वास काढून घेण्याचीच काय ती जरूरी आहे. विश्वास नाहीसा झाला की एखाद्या विरल कोळिष्टकाप्रमाणें ती नाहीशी होईल.

स्वत: काम करण्याचा आनददायक कार्यक्रम जे लोक सुरू करतील त्यांची, अनेक अनर्थांची जननीच अशा या मालमत्तेच्या भ्रामक समजुतीपासून सुटका होईल व जगांतील ज्या संस्था आज बाह्य व खोट्या मालमत्तेचें रक्षण करण्यास उपयोगी पडत आहेत त्या त्यांना निरुपयोगीच नव्हे तर त्रासदायक वाटूं लागतील व सर्वांना स्पष्टपणें कळेल की या सर्व संस्थांशिवाय आपलें चालणें शक्य आहे व यांचा उपयोग फक्त आपलें खोटें व कृत्रिम जीवन कायम ठेवणें एवढ्याकरितांच असूं शकतो.

जो व्यक्ति काम करण्याचा कंटाळा करण्याऐवजीं त्यांत आनंद मानील तिला स्वशरीरबाह्य अशा वस्तूंना मालमत्ता मानण्याची, म्हणजेच दुसऱ्याच्या श्रमावर हक्क सागण्याची गरज उरणार नाही व तिला हें त्रासदायक सुद्धा वाटेल.

मला जर स्वयंपाक करण्याची आवड असेल व मला तो करण्याची सवय असेल तर दुसऱ्याने माझा स्वयंपाक केल्यास मला सवय असलेलें काम करण्याची संधि नाहीशी होईल व मला काम करण्याचें समाधान मिळणार नाही. शिवाय या स्वयंपाक्यावरील माझ्या मालमत्तेवजा सत्तेची मला गरजच उरणार नाही. ज्याला श्रम हेंच जीवन वाटतें व जो सतत श्रम करतो त्याला रिकाम्या वेळेची भरपाई करण्याकरितां मालमत्तेची, म्हणजेच इतरांच्या श्रमांची, गरज कमी असते; अर्थात् त्याला स्वत:चें जीवन (रिकामा वेळ) अशा परश्रमोत्पादित साधनांनी सुखमय करण्याची गरज भासत नाही.

जर माणसाचा सर्व वेळ श्रमांत गुंतला तर त्याला निरनिराळ्या खोल्या, तऱ्हतऱ्हेचे ऐटबाज पोषाख किंवा फर्निचर लागणार नाही. त्याला सार्धे अन्न चालतें व त्याला गाडी घोडे अगर मनरंजनाच्या गोष्टीही लागत नाहीत.

सर्वांत महत्वाची गोष्ट म्हणजें ज्याला श्रमांतच जीवनसर्वस्व व सुख वाटतें, त्याला दुसऱ्याला काम करावयास लावून स्वतःचे श्रम कमी करण्याची बुद्धि होणार नाही.

जो मनुष्य काम म्हणजेंच जीवन असें मानतो तो, जसजशी काम करण्यामधील कुशलता व चिकाटी त्याच्या अंगी अधिकाधिक येत जाईल तसतसें अधिकाधिक काम करून आपलें जीवन उद्योगाने भरून टाकण्याचा यत्न करीत राहील.

जो मनुष्य श्रमांपासून मिळणाऱ्या फलाची, किंवा मालमत्ता संपादन करण्याची फिकीर न बाळगतां निवळ श्रमांतच जीवनसर्वस्व मानील त्याला श्रमाच्या साधनसामग्रीसंबंधाने, कधीही प्रश्न पडणार नाही. हा मनुष्य नेहमी अत्यंत उत्पादक असेंच साधन निवडील पण जरी याला अनुत्पादक साधनांनिशी काम करावेंच लागलें तरी याला वाईट वाटणार नाही.

जर वाफेचा नांगर असेल तर तो वापरील. पण हा नसलाच तर बैल जुंपून नांगरणी करण्यांत त्याला मुळीच हरकत वाटणार नाही. बैलही न मिळाले तर तो फावड्याने जमीन उकरण्यास सुद्धा मागे पुढे पाहणार नाही. एवंच कोणत्याही परिस्थितींत इतरांच्या उपयोगी पडेल अशा कामांत आयुष्य व्यतीत करण्याचा आपला उद्देश त्याला सफल करितां येईल व त्यामुळें त्याला पूर्ण समाधान प्राप्त होईल.

या माणसाची अंतर्बाह्य स्थिति व परिस्थिति मालमत्तेच्या नादीं लागलेल्यापेक्षा केव्हाही अधिक समाधानीपणाची राहील.

बाह्यतः या माणसाला कशाचीही वाण पडणार नाही, कारण याची काम करण्याची तयारी पाहून याचें काम शक्य तितकें अधिक उत्पादक व्हावें यासाठी इतर लोक प्रयत्न करतील, आणि यासाठीच त्याला चांगलें व सुरक्षितपणीं जीवंत राहतां यावें अशीही लोक योजना करतील. मालमत्तेच्या मागें लागलेल्याकरितां हें करावयास लोक तयार नसतात,

आणि जीवनास लागणाऱ्या भौतिक साधनांची सुरक्षितता व सुलभता यांचीच काय ती मनुष्याला जरूरी असते.

अंतस्थतः हा मनुष्य मालमत्तेच्या मागें लागलेल्यापेक्षा नेहमी समाधानी राहील; कारण मालमत्तेसाठी धडपडणाऱ्याला स्वतःचें ईप्सित कधीच प्राप्त होणार नाही, परंतु काम करणाऱ्याला काम केल्याचें समाधान त्याच्या शक्त्यनुसार केव्हाही मिळेल. हा अशक्त व म्हातारा होऊन मरूं घातला तरी 'हातांत हत्यार असलेल्या' या कामकऱ्याला स्वतःचें समाधान, व लोकांचें प्रेम व सहानुभूति हीं मिळतील.

सारांश, कांही विक्षिप्त (?) लोक जर सिगारेटी ओढणें, पत्ते खेळणें किंवा फुरसतीचे सुमारें दहा तास मनाची ग्लानि व कंटाळा यांचें ओझें बरोबर घेऊन इतस्ततः भटकणें याऐवजीं नांगरणें, जोडे शिवणें वगैरे कामें करूं लागले तर वर वर्णन केलेले निरनिराळे (चांगले) परिणाम होतील.

' परंतु ज्याचें म्हणणें इतर कोणालाही पटत नाही असा एकटाच माणूस त्याच्याशीं न जमणाऱ्या असंख्य जनसमूहामध्यें काय करूं शकणार ?'

या प्रश्नाच्या योगाने तो विचारणाराचा अप्रांजळपणा व खोटेपणा मात्र स्पष्ट दिसून येतो.

बोटवाले होडीला प्रवाहाविरुद्ध ओढण्याचा जेव्हा प्रयत्न करतात, तेव्हा मी एकटाच ही बोट ओढण्यास असमर्थ आहें या सबबीवर आपल्या दोरीच्या टोकाला शिकस्तीने न ओढणारा होडक्या अजून कोणी पाहिला आहे काय ?

आहारनिद्रादिकांनी युक्त असें पशुजीवन जगण्याचा हक्क बजावण्याशिवाय लोकांसाठीही माझें कर्तव्य म्हणून कांही आहे हें जाणणाऱ्याला होडीवाल्याप्रमाणेंच आपलें कर्तव्य कशांत आहे तें माहीत असतें. तो नेहमी आपणास करण्याजोगें काय आहे इकडे पाहील व तें कसें करावें हें विचारील. जो मोष्ट वर उल्लेखिलेल्या होडीवाल्यांची तीच कोणत्याही सामान्य व सर्वांस आवश्यक असणाऱ्या कामांत गुंतलेल्या लोकांची आणि तीच सर्व मानवजातीची. प्रत्येकाने मुख्य व्यक्ति निर्देश करील त्या दिशेने आपल्या दोराच्या टोकाला शिकस्तीचा जोर लावणें एवढेंच प्रत्येकाचें

कर्तव्य आहे. ही दिशा चुकूं नये एवढ्याकरितां आपणांस ईश्वराने सारासार विचार दिला आहे.

आणि ही दिशा आपणामोवतालच्या सर्व माणसांच्या जीवनांत आणि प्रत्येक मनुष्याच्या सदसद्विवेकबुद्धींत आणि प्रज्ञावान मनुष्यांच्या उद्गारांत इतक्या स्पष्टपणें आणि इतक्या निःसंदिग्धपणें दिग्दर्शित केली गेली आहे की ज्याला काम करण्याची इच्छाच नाही तोच मनुष्य ती दिशा मला दिसत नाहीं असें म्हणण्याचें धाष्टर्य करू शकेल.

'याच्यांतून काय निष्पन्न होईल?'

निष्पन्न हेंच होईल की, एखादा दुसरा माणूस होडी ओढूं लागेल. नंतर तिसराही ओढण्यास सुरुवात करील व हळूहळू इतर उत्तमोत्तम माणसेंही हातभार लावतील आणि असा क्रम चालू झाला म्हणजे येथपर्यंत पाळी येईल की ज्यांना 'काय' करावें आणि 'कसें' करावें हें समजत नाही असे लोकसुद्धा या क्रमाकडे ओढले जातील.

श्रमजीवनाच्या ईश्वरनिर्मित नियमाचें बुद्धिपुरस्सर पालन करण्यास झटणारे जे लोक निघतील त्यांना, हा मार्ग अर्धवट पटलेले व अर्धवट श्रद्धेने स्वीकारणारे असे लोक प्रथम येऊन मिळतील. त्यानंतर बरेचसे लोक केवळ पुरोगामी लोकांवर असलेल्या श्रद्धेमुळेच या मार्गास येऊन मिळतील. पुढे त्यांची सुद्धा खात्री पटेल आणि त्यानंतर सरतेशेवटीं सर्वच लोक या मार्गांत पडून आत्मनाश थांबवितील आणि सुखाचा ठेवा प्राप्त करून घेतील. आमच्या सुशिक्षित समाजांतील लोक जेव्हा (व हें लवकरच घडून येणार आहे) स्वतः पायखाने साफ करणें व गाड्या हांकणें याची लाज न बाळगतां दुसऱ्यांकडून हीं कामें करून घेण्यांत लाज मानूं लागतील तेव्हा हें घडून येईल. जेव्हा अनवाणी लोकांसमोरून त्यांनीच बनविलेले जोडे चटचटावीत चालण्यापेक्षा स्वतः बनविलेले जोडे घालून जाण्यांत आम्हांला जास्त भूषण वाटेल; किंवा स्वयंपाक न येतां जेवण्यांत फ्रेंच भाषा न येणें अगर ताजी बातमी माहीत नसणें यापेक्षां जास्त लाज जेव्हा वाटूं लागेल; किंवा कडकडीत इस्तरीचा स्वच्छ शर्ट न घालण्यांत लाज वाटण्याजोगें कांही नाही हें पटून आमच्या आळसाचा द्योतक असा स्वच्छ पोषाख करण्याचीच जेव्हा आम्हांला शरम वाटेल; अथवा आलस्यजन्य

स्वच्छ हातपायांपेक्षा मेहनतीमूळे राकट व मातकट झालेल्या हातांबद्दल आम्हांला अधिक अभिमान वाटेल;--तेव्हाच हें सर्व घडून येईल.

लोकमताने जोराची मागणी केली म्हणजे हें सर्व घडून येईल. आणि सत्यावर आवरण टाकणारे लोकांचे भ्रम जेव्हा नष्ट होतील तेव्हा लोकमताची ही मागणी पुढे येईल. या दृष्टीने पाहतां माझ्या आठवणींत सुद्धा पुष्कळ फेरफार घडले आहेत. व हे फेरबदल लोकमताच्या बदलामुळेंच घडले आहेत. श्रीमंतांनी चार घोड्यांच्या बगीशिवाय अगर दोन हुजऱ्यांशिवाय फिरावयास जाणें किंवा श्रीमंतांना पोषाख चढविण्यास, बूट चढविण्यास, स्नान घालण्यास नोकर नसणें कमीपणाचें समजलें जात असे तो काळ माझ्यासमोरचा, माझ्या आठवणींतला आहे. पण आता मात्र एकाएकीं स्वत: आपला पोषाख न करणें, किंवा स्वत: जोडे न घालणें किंवा हुजरे घेऊन बग्गीवर फिरणें हें लज्जास्पद होऊन बसलें आहे. याला कारण लोकमत.

सध्या लोकांच्या मनोवृत्तींत जे फेरबदल शिजत आहेत ते लक्षांत येण्यासारखे नाहीत काय ? जमिनीवरील कुळांच्या दास्याचें समर्थन करणाऱ्या शब्दावडंबराचे डोलारे उध्वस्त करतांच पंचवीस वर्षांपूर्वीच्या, प्रशंसनीय कोणतें व लज्जास्पद कोणतें याविषयींच्या लोकांच्या कल्पना पार बदलल्या व तदनुसार जीवनक्रमही बदलला. त्याचप्रमाणें पैशाची आज जी मनुष्यावर हुकुमत चालते त्यासबंधींचें जें समर्थनात्मक शब्दावडंबर आहे त्याचा नाश करतांच याही बाबतीत खरी लाज कशाची वाटावी व कशाची वाटूं नये याविषयींच्या कल्पना पार बदलून जातील व जीवनक्रमही बदलेल.

द्रव्याधिष्ठित सत्तेचें समर्थन करणाऱ्या तर्कविडंबराचा निरास होण्यास व त्याबाबतच्या लोकांच्या समजुतींत फरक होण्यास आजच्या घटकेस अपाटच्याने सुरुवात झाली आहे. आमच्या तर्कविडंबराचें खरें स्वरूप स्पष्ट होऊं लागलें आहे व सत्यावरचें भ्रमपटल आता अगदी जीर्ण झालें आहे. थोडचा सूक्ष्म दृष्टीने पाहतांच दिसून येईल की लोकमतांत फरक व्हावा अशी स्थिति नसून फरक प्रत्यक्ष होत आहे. लोकांनाही हा दिसत आहे पण प्रत्यक्ष कार्यांत त्याचें रूपांतर व्हावयाचें आहे. आमच्यांतील अगदी सध्याच्या काळच्या एखाद्या थोडें बहुत शिक्षण घेतलेल्या माणसाने जगाच्या स्वरूपाविषयीं आपली काय विचारसरणी आहे याविषयीं

जर विचार केला तर त्याची अशी सहज खात्री पटेल की चांगलें काय व वाईट काय किंवा प्रशंसनीय कोणतें आणि लज्जास्पद कोणतें यांचें केवळ 'पीछेसे आई और आगे चली' या नात्याने चालत आलेलें मूल्यमापन आपल्या जगताविषयींच्या एकंदर विचारसरणीशीं साक्षात् विरोधी आहे.

केवळ मूढतेमुळे पूर्वापार चालत आलेल्या जीवनक्रमापासून एक क्षणभर अलिप्त होऊन, आजकालच्या मनुष्याने जगत्स्वरूपाच्या आपल्या कल्पनेस अनुसरून आपल्या हया जीवनाचें पृथकपणें निरीक्षण व महत्त्वमापन केलें तर जगत्स्वरूपाच्या कल्पनेच्या आधाराने आपल्या जीवनाची जी व्याख्या ठरते ती पाहतांच त्याच्या डोळ्यापुढे अंधारीच येईल.

तरुणांत जोम पुष्कळ असतो व स्वत:बद्दलचो कल्पना अस्पष्ट असते. अशा एका कोणत्याही प्रवृत्तीच्या श्रीमंत तरुणाचें उदाहरण घेऊं. असा प्रत्येक मर्यादशील तरुण एखाद्या बालकाला, स्त्रीला अगर वृद्धाला मदत न करणें हें लज्जास्पद समजतो; एखाद्या अनेकांनी मिळून करावयाच्या कामामध्यें दुसऱ्या कामकऱ्याचा जीव अगर आरोग्य धोक्यांत घालून स्वत:चो मात्र कातडी बचावणें हेंही तो निंद्य समजतो. किरगिझ प्रांतांतील लोकांबद्दल शूलर जसें वर्णन करतो की, वादळ उठलें असतां ते लोक आपल्या तंबूंचे तणावे घट्ट धरून ठेवण्यास आपल्या बायकांना व वृद्ध स्त्रियांना पाठवून स्वत: तंबूच्या आंत खुशाल चैनींत मद्यप्राशन करीत बसतात—तशा तऱ्हेचें वर्तन करणें आपणांतील प्रत्येक जण रानटी व लज्जास्पद मानतो. एखाद्या दुबळ्या मनुष्यास आपणाकरितां काम करण्यास भाग पाडणें प्रत्येकास लाजिरवाणें वाटतें. एखाद्या धोक्याच्या प्रसंगीं, उदाहरणार्थ, एखाद्या जहाजाला आग लागली असतां इतर दीन दुबळ्यांस मागे ढकलून स्वत:च पुढे होऊन प्राणरक्षक होडयांतून पहिल्याने चढणें हें तर कोणासही अधिकच लाजिरवाणें व निंद्य वाटेल. सर्वांना या सर्व गोष्टींची लाज वाटते व कांही विशिष्ट परिस्थितींत अशा गोष्टी कधीही कोणी करणार नाही. पण सामान्य जीवनक्रमांत हे लोक अशींच किंबहुना यापेक्षाही वाईट कर्में सतत करीत आहेत, परंतु मोहांत गुंतल्यामुळे त्यांच्या तीं नजरेस मात्र येत नाहीत.

थोडा विचार करितांच हें त्यांना दिसून येईल व दिसतांच त्यांच्या अंगावर कांटा उभा राहील.

एखादा श्रीमंत तरुण रोज स्वच्छ शर्ट घालतो. हा शर्ट नदीवर नेऊन कोण धुतें ?* ही बाई असते. ती कशाही स्थितींत असेल; ती या तरुणाची आजी किंवा आई शोभेल इतकी म्हातारी असेल किंवा ती आजारीही असूं शकेल. जर एखाद्या मनुष्याने स्वत:चा पुरेसा स्वच्छ असलेला शर्ट निव्वळ लहर म्हणून बदलून आपणास आई शोभेल अशा म्हातारीला तो धुण्यास घाडलें तर स्वतः हा श्रीमंत तरुणच त्याला काय म्हणेल बरें ?

एखादा श्रीमंत ऐटीकरितां म्हणून घोडे ठेवतो व एखादा त्याचा बाप किंवा आजा शोभेल असा म्हातारा त्या श्रीमंताकरितां स्वत:चा जीव घोक्यांत घालून घोडयांना गाडी ओढण्यास अगर स्वारीस योग्य असें शिक्षण देतो. घोडा उघळून जीव घोक्यांत येणार नाही इतपत तो घोडा शिकला म्हणजेच हा श्रीमंत त्या घोडयावर बसूं लागतो. जो मनुष्य स्वत:चा जीव बचावून स्वत:च्या सुखाकरितां दुसऱ्याचा जीव धोक्यांत घालतो अशाला हाच तरुण श्रीमंत काय म्हणेल बरें ?

आणि श्रीमंतांच्या जीवनक्रमांत पावलोंपावलीं अशा गोष्टी भरल्या आहेत. म्हाताऱ्यांना, स्त्रियांना व मुलांना कंबर मोडेतों काम करावें लागणें, व केवळ आमच्या लहरीकरितां लोकांनी आपला जीव धोक्यांत घालणें, यांची आमच्या जीवनक्रमांत रेलचेल आहे. एखादा कोळी आमचेकरितां मासे धरतांना बुडून मरतो; धोबिणीना थंडी लागून त्या मरतात; लोहार आंधळा होतो; कारखान्यांतील कामगार आजारी होतात किंवा लुलेपांगळे बनतात; लांकडें तोडणारे अंगावर झाडें पडून मरतात; घरावरून कामकरी लोक पडून मरतात व शिवणकाम करणाऱ्या बायांना क्षय होतो. सर्व खरें काम अशा रीतीने धोक्याच्या व नुकसानीच्या परिस्थितींत केलें जातें. या सर्व गोष्टी लपवून ठेवणें व त्यांच्याकडे डोळेझाक करणें अशक्य आहे. जर स्वत:ला भेकंड व बदमाश असें स्वत:च म्हणण्याची पाळी यावयास नको असेल तर यांतून खरी व एकच सुटका आहे. दुसऱ्यांपासून जीवनास अवश्य त्याच गोष्टी घेऊन ज्यांत खरे परि-

---

* रशियांत नदीवर कपडे नेऊन धुण्याची चाल आहे.

श्रम आहेत व जीवास धोका आहे अशीं कष्टाचीं कामें आम्ही स्वतः करूं लागलें पाहिजे.

पंचपक्वान्नाचें जेवण तर जाऊंच द्या पण स्वतः न शिजविलेलें अन्न खाणें हीसुद्धा शरमेची गोष्ट होऊन बसेल असा काळ लवकरच येईल, नव्हे येत आहे. अशा काळीं चपल घोड्यांच्या बगींतून फिरणें तर दूरच राहो, परंतु स्वतःच्या पायांनी चालणें शक्य असतां भाड्याच्या सार्वजनिक गाडींतून जाणेंसुद्धा लाजेची गोष्ट होऊन बसेल. काम करण्याच्या दिवशीं ज्यांमुळे काम करतां येत नाही असे कपडे, बूट व हातमोजे घालण्यांत लाज वाटूं लागेल. दुसरे मजकरितां काम करीत असतां मी मात्र १५०० किंवा ५० रुपयांचा पिआनो वाजवावा हें वाईट आहे असें वाटेल. लोकांना खाण्यास नसतां माझ्या मोत्या कुत्र्यास मात्र दूधरोटी द्यावी असें करण्यांत शरम वाटेल. कामाशिवाय विनाकारण मेणबत्त्या–दिवे जाळण्याचें धैर्य होणार नाही. व इतरांना अन्न शिजविण्याकरितां स्टोव्ह मिळत नसतां आपण मात्र निव्वळ ऊब मिळावी म्हणून स्टोव्ह जाळण्याचें मनांत येणार नाही. अशा दृष्टिकोणाकडे आम्ही फार जलद आणि अपरिहार्य गतीने जात आहोंत. आम्ही या फेरबदलाच्या अगदी तोंडाशीं उभें आहोंत. हें नवें मत प्रस्थापन करण्याचें काम लोकमताचें आहे. व हें लोकमत फार जलद तयार होत आहे. स्त्रिया नेहमी लोकमत तयार करीत असतात, व आमच्या काळांत स्त्रियाच विशेषेंकरून प्रभावशाली बनल्या आहेत.

प्रकरण चाळिसावें

हृदयबलमध्ये म्हटल्याप्रमाणें पुरुषांचा धर्म श्रम करणें आणि स्त्रियांचा धर्म संततीला जन्म देणें हा आहे. आमचें शास्त्र जरी 'आम्ही तें सर्व बदलून टाकलें आंहे' असें म्हणत असलें तरी हा निसर्गनियम अजूनही अबाधितच राहिला असून या नियमाचा भंग करणाऱ्याला मृत्यूची शिक्षा निश्चयेंकरून पतकरावी लागते.

फरक इतकाच की सर्व पुरुष जर स्वकर्तव्याची सररास टाळाटाळ करतील तर त्याबद्दल मृत्युरूपी दंड इतक्या लवकर भोगावा लागेल की त्याला तात्कालिक दंड म्हणणेंच शोभेल, परंतु स्त्रियांनी स्वकर्तव्याच्या केलेल्या टाळाटाळीचा परिणाम अधिक कालानंतर दृग्गोचर होईल. अखिल पुरुषजातीची स्वधर्मच्युति पुरुषांचा नाश ताबडतोब घडवून आणील तर अखिल स्त्रीजातीने केलेला निसर्गनियमाचा भंग पुढच्या पिढीचा नाश करील. परंतु कांही थोड्याशाच पुरुषांनी व थोड्याशाच स्त्रियांनी जर स्वधर्माची उपेक्षा केली तर त्यामुळे मनुष्यजात नष्ट होत नसून नियमभंग करणाऱ्या व्यक्ति मात्र मनुष्यत्वाच्या सम्यक् प्रकृतीपासून भ्रष्ट होतात.

जे वर्ग इतरांवर जबरी करूं शकले अशा वर्गांतील पुरुषांमध्ये, श्रमजीवनाचा जो स्वधर्म त्याची हेळसांड व्हावयास फार पूर्वीच्या काळीं सुरवात झाली. आणि ही स्वकर्तव्याची उपेक्षा एकसारखी वाढत वाढत आता अशा थराला येऊन पोचली आहे की तिजमुळे मनुष्य बहकून गेला आहे. स्वकर्तव्योपेक्षेलाच त्याने ध्येय बनविलें आहे; त्या ध्येयाचें प्रिन्स ब्लॉखिनने प्रतिपादन केलें असून रेनां आणि सर्व सुशिक्षित जगत् यांनी त्या ध्येयाचा स्वीकार केला आहे: (तें असें की) सर्व काम यंत्रांनी करावयाचें आणि मनुष्यांनी सुखाचा उपभोग घेणारे ज्ञानतंतूंचे जुंबाडें बनावयाचें ! स्त्रियांनी स्वकर्तव्याची हेळसांड चालविली असल्याचें मात्र पूर्वी बहुतकरून कोठेही दिसून येत नसे. वेश्याव्यवसायामध्ये व तुरळक

घडणाऱ्या गर्भपातांमध्ये मात्र अशा प्रवृत्तीचें अस्तित्व भासमान होई. संपन्न वर्गांतील पुरुष जरी स्वकर्तव्यच्युत झालेले असले तरी त्या वर्गांतील स्त्रियांनी अझून आपला धर्म सोडला नव्हता. त्यामुळे स्त्रियांचा पगडा व त्यांचें वजन अधिकाधिक वाढत आलेलें असून स्वधर्मभंग करणाऱ्या आणि त्यामुळेच आपली तारतम्यबुद्धि घालवून बसलेल्या पुरुषांवर त्यांचा अंमल चालत आहे, आणि तें योग्यच आहे.

पुष्कळ वेळां असें म्हणण्यांत येतें की स्त्रिया (विशेषेंकरून पारिस. मधील व त्यांतही संतान नसलेल्या) सुधारणेने निर्माण केलेल्या कृत्रिम शोभेच्या साधनांचा उपयोग करीत असल्यामुळे इतक्या भुरळ घालणाऱ्या बनल्या आहेत की आपल्या मोहनास्त्रांमुळे त्यांनी पुरुषांना दास बनवून टाकलें आहे. हें म्हणणें केवळ चुकीचें आहे इतकेंच नव्हे तर वस्तुस्थिति याच्या बरोबर उलट आहे. संतानहीन ललनेने पुरुषास वश केलेलें नसून पुरुष कर्तव्यभ्रष्ट झाला असतांही स्वतःच्या निसर्गप्राप्त कर्तव्यास सादर होणाऱ्या मातेने त्याच्यावर कबजा मिळविला आहे.

जी स्त्री कृत्रिम रीतीने स्वतःस वांझ बनविते आणि स्वतःच्या स्कंधप्रदेशाने व केशकलापाच्या योगाने पुरुषास भुरळ घालते ती स्त्री पुरुषावर प्रभाव गाजविणारी महिला नसून पुरुषाने भ्रष्टविल्यामुळे त्याच्याच इतकी अधःपतित झालेली, त्याच्याच प्रमाणें स्वकर्तव्यच्युत झालेली आणि मानवी जीवनाचें सम्यक् आकलन करण्याची जिची शक्ति नष्ट झालेली आहे, अशी स्त्री होय.

(स्त्रियांच्या कर्तव्याविषयींच्या) या चुकीच्या कल्पनेपासूनच 'स्त्रियांचे हक्क' या विलक्षण खुळाचा जन्म झालेला आहे.

या हक्कांचा इत्यर्थ असा : स्त्री पुरुषास म्हणते की "हे पुरुषा ! तूं आपला श्रमजीवनाचा स्वधर्म सोडलास आणि आम्ही मात्र आमच्या कर्तव्याचा बोजा उचलावा असें तुला वाटतें ! असें जर असेल तर, नाही. आम्ही सुद्धा तुझ्याप्रमाणेंच बँका, धर्मसंस्था, विद्यापीठें, पाठशाला, कलागृहें इत्यादिकांमध्ये शिरून श्रमाचें ढोंग करूं शकतों; आणि तुझ्याच प्रमाणे श्रमविभागाच्या सबबीखाली दुसऱ्यांच्या श्रमफलाचा उपभोग घेऊन स्वतःच्या इंद्रियलालसातृप्तीसाठीच जगावयाचें अशी मनीषा बाळगतों."

त्या असें म्हणतात आणि प्रत्यक्ष वागणुकीने असें सिद्ध करून देतात की काम केल्याचा देखावा स्त्रियांना पुरुषांपेक्षाही अधिक सफाईने करितां येतो.

हा स्त्रियांचा नामधारी प्रश्न खऱ्या श्रमजीवनाचा धर्म ज्यांनी सोडला होता अशा पुरुषांमध्येच निर्माण झाला व होऊं शकला. त्या धर्माकडे पुन: वळण्याचा अवकाश, की हा स्त्रियांचा प्रश्न मुळी उत्पन्नच होऊं शकणारच नाही.

ज्या स्त्रीला स्वधर्मानुसार विशिष्ट, वादातीत आणि अपरिहार्य असे कष्ट भोगावयाचे आहेत ती पुरुषाच्या खाणींतील किंवा शेतकामांतील श्रमांमध्ये भाग घेण्याची मागणी कधीही करणार नाही. ती फक्त धनिक लोकांच्या दिखाऊ श्रमांमध्ये भाग घेण्याचीच मागणी करूं शकेल.

आमच्या वर्गांतील स्त्री पूर्वी पुरुषापेक्षा अधिक सामर्थ्यशाली होती, व अझूनही आहे, ती आपल्या मोहकतेमुळे किंवा पुरुषाप्रमाणे श्रमाचा कृत्रिम देखावा करण्याच्या चातुर्यामुळे नव्हे—तर तिने स्वधर्माचा त्याग केलेला नाही म्हणून होय. तिने (संतति प्रसविण्याचे) अत्यंत धोक्याचे खरेखुरे कष्ट भगीरथ प्रयत्नांनी सहन केले–अशा खऱ्या कष्टांना धनिक वर्गांतील पुरुषांनी कधीच टाळा दिलेला होता–म्हणून तिचें सामर्थ्य अबाधित राहिलें आहे.

पण माझ्या डोळ्यांदेखत या स्त्रियांचाही अध:पात सुरू झाला असून त्यांनीही कर्तव्यास फाटा द्यावयास सुरुवात केली आहे व याचें प्रमाण दिवसेंदिवस वाढीवर आहे.

स्त्रीला स्वधर्माचा विसर पडला असून आपलें भुलविणारें रूप-सौंदर्य किंवा बौद्धिक श्रमांचें नाटक करून दाखविण्याचें चातुर्य, हेंच आपलें सामर्थ्य होय, असा तिला भ्रम जडला आहे.

परंतु या दोन्ही गोष्टींना मुळे अडचणीसारखीं होऊन बसतात. म्हणून शास्त्राच्या साहचाने (आणि शास्त्र हें नेहमीच वाटेल तें घाणेरडें काम करावयास तयार असतें) माझ्या आठवणींत गर्भनाश करण्याचे डझनावारी उपाय धनिक वर्गांतील स्त्रियांमध्ये प्रचलित झाले आहेत. संततिप्रतिबंधाचीं साधनें हीं आता वेणीफणीपैकी जिनसा होऊन

बसल्या आहेत; आणि अशा रीतीने ज्या धनिक वर्गांतील स्त्रिया माता या नात्याने सामर्थ्यवान होत्या त्याच आता बाजारी स्त्रियांशीं चढाओढ करण्याच्या बुद्धीने आपलें सामर्थ्य गमावूं लागल्या आहेत.

हें अरिष्ट फार दूरवर पसरलें आहे आणि दररोज अधिकाधिक पसरत आहे. लवकरच धनिक वर्गांतील सर्व स्त्रियांपर्यन्त याचा पल्ला जाऊन पोचेल; आणि मग त्या स्त्रिया आपल्या वर्गांतील पुरुषांच्या संपर्कातळींत येतील आणि त्यांच्याच प्रमाणें जीवनाचें स्वरूप यथायोग्य रीतीने आकलन करण्यास त्या असमर्थ होऊन बसतील. आणि मग हा सबंध वर्ग कायमचा अधःपतित होईल; परंतु अद्याप यास अवकाश आहे.

कसेंही असलें तरी आज सुद्धा पुरुषांच्या मानाने आपलें निसर्गदत्त कर्तव्य करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे, म्हणून त्यांच्यांत सद्बुद्धि व विवेक जागृत असणाऱ्या स्त्रिया अजूनही सांपडतात; या स्त्रियाच आमच्या वर्गाला कदाचित् अजूनही तारूं शकतील.

या स्त्रियांना आपल्या योग्यतेची, आपल्या सामर्थ्याची जाणीव उत्पन्न होऊन जर त्या आपले पति, पुत्र, बंधु यांचा—सगळ्या मानव-जातीचा—उद्धार करण्याकरितां आपल्या शक्तींचा उपयोग करतील तर काय बहार होईल !

श्रीमंतांतील मातांनों ! ज्या दुर्दशेने आम्ही आजच्या जगांतील पुरुष पछाडले गेलों आहोंत तिच्यांतून तुम्हीच आमचा उद्धार करूं शकतां.

स्वतःचीं शरीरें सुंदर करून पुरुषांवर मोहनी टाकण्याच्या भरीस पडलेल्या व नाइलाजाने व चुकून मातृपद मिळाल्यास मुलांसाठी अंगावर पाजणाऱ्या दाया ठेवणाऱ्या स्त्रिया हें काम करूं शकणार नाहीत. किंवा युनिवर्सिटयांमधील लेक्चरें ऐकणाऱ्या आणि मानसिक प्रेरणाकेंद्रें आणि सूक्ष्मसंख्याभेद इत्यादिकांविषयीं बडबड करणाऱ्या अशा ज्या स्त्रिया स्वतःचा मानीव 'मनोविकास'—म्हणजेच मूढपणा—संपादन करण्याच्या मार्गांत अडथळा येऊ नये म्हणून गर्भधारणा टाळूं पाहतात अशा स्त्रियाही ही कामगिरी करूं शकणार नाहीत. तर, मातृपद टाळतां येणें शक्य असूनही ज्या स्त्रिया या अपरिवर्तनीय आणि सनातन धर्माला शिरसावंद्य मानितात व या स्वधर्मपालनामुळे होणारा त्रास सोसणें हेंच आपलें खरें कर्तव्य आहे

याची ज्यांना जाणीव आहे त्याच हें उद्धाराचें काम करूं शकतील. दुर्गति-पंकांत रुतलेल्या आम्हा पुरुषांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य इतर कोणा-पेक्षाही ज्यांच्या अंगीं अधिक प्रमाणांत वसत आहे अशा धनिक वर्गांतील हयाच महिला–माता होत. या ईश्वरप्रणीत वर्तननियमाला खुषीने सादर होणाऱ्या मातृपदाधिष्ठित महिलांनो, आमच्या या हतभागी बुद्धिभ्रष्ट वर्गामध्ये तुम्हीच केवळ अशा आहांत की ज्यांना ईश्वरप्रणीत धर्मानुसार जीविताचें खरें रहस्य, खरें तात्पर्य काय, याची पुरी जाणीव आहे. आणि, ईश्वरी इच्छेला मान वाकवून कृतार्थ बनलेल्या जीवनाचा खरा आनंद कसा असतो हें, त्या आनंदाला आपण होऊन पारखे झालेल्या पुरुषांना, तुम्हीच आपल्या स्वत:च्या उदाहरणाने दाखवूं शकाल. दैवी नियमांना टाळा न देतां पुरुष वागला असता तर त्याच्याही वाटचाला जें आलें असतें तें परमसुख, ती कृतार्थता, सर्व जीवाला व्यापणारा तो हर्ष फक्त तुमच्याच अनुभवाला येतो. पतीच्या प्रणयाचा तो अखंड आनंद, जो इतर आनंदांप्रमाणे नाशवंत नसून अपत्यवत्सलतेच्या रूपाने पुन: प्रादुर्भूत होतो, तो तुम्हीच जाणतां. आमच्या वर्गांतील लोक ज्याला श्रम म्हणतात तें युनिफार्म घालून सुप्रकाशित दालनांमध्ये केलेलें श्रमाचें हास्यास्पद सोंग असतें; त्याकडे न वळतां ईश्वरी इच्छेच्या अधीन होऊन साधेपणाने तुम्ही राहिलांत म्हणजे ईश्वराने आपल्या मागे लावून दिलेले जे खरेखुरे श्रम आहेत ते तुमच्याच अनुभवास येतांत आणि त्या श्रमांबद्दल मिळ-णारीं पारितोषकें आणि त्यांपासून प्राप्त होणारें परमसुख हींही तुमच्याच वाटयास येतात.

प्रणयाचा आनंद उपभोगल्यानंतर जेव्हा तुम्ही भय, आशा, उत्सु-कता, क्षुब्धता यांनी युक्त होत्साल्या गर्भारपणामुळे होणाऱ्या असह्य व मरणप्राय यातनांची प्रतीक्षा करीत राहतां आणि त्या असह्य हालांचा कळस होऊन त्यापुढे प्राप्त होणारें तुमच्याच अनुभवास येणारें जें अनि-र्वचनीय सुख त्याकडे उल्लसित मनाने दृष्टि लावून ज्यावेळीं तुम्ही असतां त्या वेळीं खरे श्रम म्हणजे काय चीज आहे याचें तुम्हांला ज्ञान होतें.

हया असह्य कष्टांनंतर लगेच, तिळभर उसंत न खातां, जेव्हा निराळयाच कष्टांच्या मालिकेला तुम्ही स्वत:ला जुंपून घेतां त्या वेळीं

बसल्या आहेत; आणि अशा रीतीने ज्या धनिक वर्गातील स्त्रिया माता या नात्याने सामर्थ्यवान होत्या त्याच आता बाजारी स्त्रियांशीं चढाओढ करण्याच्या बुद्धीने आपलें सामर्थ्य गमावूं लागल्या आहेत.

हें अरिष्ट फार दूरवर पसरलें आहे आणि दररोज अधिकाधिक पसरत आहे. लवकरच धनिक वर्गांतील सर्व स्त्रियांपर्यन्त याचा पल्ला जाऊन पोचेल; आणि मग त्या स्त्रिया आपल्या वर्गांतील पुरुषांच्या संमपातळींत येतील आणि त्यांच्याच प्रमाणें जीवनाचें स्वरूप यथायोग्य रीतीने आकलन करण्यास त्या असमर्थ होऊन बसतील. आणि मग हा सबंध वर्ग कायमचा अधःपतित होईल; परंतु अद्याप यास अवकाश आहे.

कसेंही असलें तरी आज सुद्धा पुरुषांच्या मानाने आपलें निसर्गदत्त कर्तव्य करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे, म्हणून त्यांच्यांत सद्बुद्धि व विवेक जागृत असणाऱ्या स्त्रिया अजूनही सांपडतात; या स्त्रियाच आमच्या वर्गाला कदाचित् अजूनही तारूं शकतील.

या स्त्रियांना आपल्या योग्यतेची, आपल्या सामर्थ्याची जाणीव उत्पन्न होऊन जर त्या आपले पति, पुत्र, बंधु यांचा—सगळ्या मानवजातींचा—उद्धार करण्याकरितां आपल्या शक्तींचा उपयोग करतील तर काय बहार होईल !

श्रीमंतांतील मातांनों ! ज्या दुर्दशेने आम्ही आजच्या जगांतील पुरुष पछाडले गेलों आहोंत तिच्यांतून तुम्हीच आमचा उद्धार करूं शकतां.

स्वतःचीं शरीरें सुंदर करून पुरुषांवर मोहनी टाकण्याच्या भरीस पडलेल्या व नाइलाजाने व चुकून मातृपद मिळाल्यास मुलांसाठी अंगावर पाजणाऱ्या दाया ठेवणाऱ्या स्त्रिया हें काम करूं शकणार नाहीत. किंवा युनिवर्सिटचांमधील लेक्चरें ऐकणाऱ्या आणि मानसिक प्रेरणाकेंद्रें आणि सूक्ष्मसंख्याभेद इत्यादिकांविषयीं बडबड करणाऱ्या अशा ज्या स्त्रिया स्वतःचा मानीव 'मनोविकास'—म्हणजेच मूढपणा—संपादन करण्याच्या मार्गांत अडथळा येऊ नये म्हणून गर्भधारणा टाळूं पाहतात अशा स्त्रियाही ही कामगिरी करूं शकणार नाहीत. तर, मातृपद टाळतां येणें शक्य असूनही ज्या स्त्रिया या अपरिवर्तनीय आणि सनातन धर्माला शिरसावंद्य मानितात व या स्वधर्मपालनामुळे होणारा त्रास सोसणें हेंच आपलें खरें कर्तव्य आहे

याची ज्यांना जाणीव आहे त्याच हें उद्धाराचें काम करूं शकतील. दुर्गति-पंकांत रुतलेल्या आम्हा पुरुषांचा उद्धार करण्याचें सामर्थ्य इतर कोणा-पेक्षाही ज्यांच्या अंगीं अधिक प्रमाणांत वसत आहे अशा धनिक वर्गांतील हयाच महिला—माता होत. या ईश्वरप्रणीत वर्तननियमाला खुषीने सादर होणाऱ्या मातृपदाधिष्ठित महिलांनो, आमच्या या हतभागी बुद्धिभ्रष्ट वर्गामध्ये तुम्हीच केवळ अशा आहांत की ज्यांना ईश्वरप्रणीत धर्मानुसार जीविताचें खरें रहस्य, खरें तात्पर्य काय, याची पुरी जाणीव आहे. आणि, ईश्वरी इच्छेला मान वाकवून कृतार्थ बनलेल्या जीवनाचा खरा आनंद कसा असतो हें, त्या आनंदाला आपण होऊन पारखें झालेल्या पुरुषांना, तुम्हीच आपल्या स्वत:च्या उदाहरणाने दाखवूं शकाल. दैवी नियमांना टाळा न देतां पुरुष वागला असता तर त्याच्याही वाटचाला जें आलें असतें तें परमसुख, ती कृतार्थता, सर्व जीवाला व्यापणारा तो हर्ष फक्त तुमच्याच अनुभवाला येतो. पतीच्या प्रणयाचा तो अखंड आनंद, जो इतर आनंदांप्रमाणे नाशवंत नसून अपत्यवत्सलतेच्या रूपाने पुन: प्रादुर्भूत होतो, तो तुम्हीच जाणतां. आमच्या वर्गांतील लोक ज्याला श्रम म्हणतात तें युनिफार्म घालून सुप्रकाशित दालनांमध्ये केलेलें श्रमाचें हास्यास्पद सोंग असतें; त्याकडे न वळतां ईश्वरी इच्छेच्या अधीन होऊन साधेपणाने तुम्ही राहिलांत म्हणजे ईश्वराने आपल्या मागे लावून दिलेले जे खरेखुरे श्रम आहेत ते तुमच्याच अनुभवास येतांत आणि त्या श्रमांबद्दल मिळ-णारीं पारितोषकें आणि त्यांपासून प्राप्त होणारें परमसुख हींही तुमच्याच वाटचास येतात.

प्रणयाचा आनंद उपभोगल्यानंतर जेव्हा तुम्ही भय, आशा, उत्सु-कता, क्षुब्धता यांनी युक्त होत्साल्या गर्भारपणामुळे होणाऱ्या असह्य व मरणप्राय यातनांची प्रतीक्षा करीत राहतां आणि त्या असह्य हालांचा कळस होऊन त्यापुढे प्राप्त होणारें तुमच्याच अनुभवास येणारें जें अनि-र्वचनीय सुख त्याकडे उल्लसित मनाने दृष्टि लावून ज्यावेळीं तुम्ही असतां त्या वेळीं खरे श्रम म्हणजे काय चीज आहे याचें तुम्हांला ज्ञान होतें.

हया असह्य कष्टांनंतर लगेच, तिळभर उसंत न खातां, जेव्हा निराळ्याच कष्टांच्या मालिकेला तुम्ही स्वत:ला जुंपून घेतां त्या वेळीं

श्रमजीवनाचें खरें रहस्य तुम्हाला कळून चुकतें. हचा अपत्यसंगोपनाच्या कष्टांमध्ये व्यक्तिमात्राला अत्यंत आवश्यक अशी जी निद्रा तिचाही अपत्यप्रेमास आणि कर्तव्यभावनेस वश होऊन तुम्ही त्याग करितां आणि एकसारखे महिन्यांमागून महिने आणि वर्षांमागून वर्षे निवांत झोंप नाही अशा स्थितींत तुम्ही काढतां आणि पुष्कळदा तर आपल्या हाताचा पाळणा करून इकडून तिकडे येरझारा घालीत छातीशीं तोडणाऱ्या रुग्ण बालकाला हलवीत झुलवीत सबंध रात्रीच्या रात्री जागून काढतां.

आणि अशा तऱ्हेने कोणाच्याही दृष्टीपुढे न झळकतां कोणीही आपणाकडे लक्ष देत नाही, आपलीं स्तुतिस्तोत्रें गात नाही, अशा स्थितींत कोणाकडूनही बक्षिसाची अगर प्रशंसेची अपेक्षा न करितां, मोठी बहादरी म्हणून नव्हे, तर केवळ आपलें कर्तव्य म्हणून, जेव्हा तुम्ही हें सर्व करतां त्या वेळीं तुम्हांला मानवी प्रशंसेच्या आशेने केलेले नकली, दिखाऊ श्रम कोणते आणि ईश्वरी योजनेनुसार केलेले खरे श्रम कोणते हें समजतें, आणि त्याची खूण तुमच्या अंतःकरणाला पटते.

खऱ्या आईची परीक्षाच ही. कोणी आपले कष्ट पाहत नाही अगर आपली प्रशंसा करीत नाही—कारण लोक समजतात की आईने हें करावयासच हवें, त्यांत काय जास्त आहे—इतकेंच नव्हे तर खुद्द ज्याच्या करितां आपण कष्ट करतों तें मूल सुद्धा कृतघ्न निघेल अगर प्रत्यक्ष त्रास देणारें होईल, हें तुम्हांला दिसत असतें तरी देखील पुनः दुसऱ्या मुलाच्या वेळीं तुम्ही पूर्वीप्रमाणेंच वागतां : पुनः तुम्ही तोच त्रास सोसाल, पुनः गुप्तपणें हाल सोशीत असतां कोणी तुमचेकडे लक्ष देणार नाही, पुनः तुम्ही बक्षिसाची अपेक्षा करणार नाही, आणि पुनः तुम्हांला तोच आनंद होईल. जर तुम्ही अशा असाल तर तुमचें वजन माणसावर पडलेंच पाहिजे व त्यांचा उद्धारही तुमचे हातूनच होणार. पण दररोज तुमची संख्या कमी होत आहे. तुमच्यांतील कांही बाया पुरुषांना भुलविण्याच्या उद्योगांत व्यापृत होऊन, बाजारू स्त्रियांची बरोबरी करूं पहात आहेत; कांही स्त्रिया पुरुषांच्या कृत्रिम व क्षुद्र व्यवसायांत शिरून त्यांच्याशीं स्पर्धा करण्याचा प्रयत्न करीत आहेत; ज्या कांही स्त्रिया स्वधर्माशीं अद्याप बाह्यतः बेइमान झाल्या नाहीत त्यांना मनांतून तो नकोसा झाला आहे.

त्या मातृपदाची जबाबदारी पार पाडीत असतात, परंतु हें सर्व त्या नाइलाजाने, कुरकुरत करितात. त्यांना उच्छृंखल वांझोट्या स्त्रियांचा हेवा वाटतो. ईश्वरी योजनेची परिपूर्ति केल्यामुळे होणारें अंत:करणाचें समाधान हें जें त्यांचें एकमेव पारितोषक त्याला त्या मुकतात आणि अशा प्रकारें मातृपदापासून त्यांना जें सुख व्हावयाचें त्याऐवजीं त्यांना त्रास होतो.

आमच्या खोट्या जीवनक्रमामुळें आमचा इतका गोंधळ झाला आहे—आमच्या वर्गांतील पुरुषांमधून जीवनाच्या यथार्थ स्वरूपाची जाणीव इतकी अजीबात पुसून गेली आहे—की आमच्या मधला तरतमभाव आता नाहीसा झाला आहे. आपल्याला पोषक द्रव्यें पुरविण्याच्या कामीं खपणाऱ्या लोकांचा जे नाश करून टाकतात अशा लोकांना बदमाष व भेकड हींच विशेषणें लागूं शकतात. पण आम्ही श्रीमंतांनी जीवनांतील सबंध बोजा व धोका दुसऱ्यांच्या पाठीवर लादला असूनही हीं विशेषणें स्वत:स लावण्यास असमर्थ आहोंत.

पण बायकांत अजूनही वर्गीकरण करतां येणें शक्य आहे. मानवतेचा अत्युच्च आविष्कार ज्यांच्यामध्ये झालेला दृष्टीस पडतो अशा खऱ्याखुऱ्या मानव स्त्रिया आणि बाजारबसव्या असें त्यांचें वर्गीकरण करणें शक्य आहे. पुढील पिढी हा फरक तर ओळखीलच पण आम्हांलाही हा फरक केल्यावाचून चालणार नाही.

जी स्त्री विषयोपभोगापासून अलिप्त न राहतां मातृपद मात्र टाळते ती स्वत:ला कांहीही म्हणो, कसाही पोषाख घालो, किंवा ती कितीही सुधारलेली असो, तिला बाजारबसवीच म्हणावें लागेल. व बुद्धिपुरस्सर सतति निर्माण करण्याच्या कर्तव्यास वाहून घेणारी स्त्री कितीही अध:पतित असली तरी जीवनांतील उच्चतम कामगिरी पार पांडणारी म्हणून तिला श्रेष्ठच मानावें लागेल.

जर तुम्हीं अशा कर्तव्यपरायण असलां तर, तुम्हांला दोन मुलें झालीं असोत किंवा वीस झालीं असोत, ज्याप्रमाणें अंगांत शक्ति असलेला व खाण्यापिण्याची गरज असलेला (कर्तव्यपरायण) शेतकरी पन्नास वर्षांचा झाला तरी "आता काम पुरे" असें कधीच म्हणणार नाही त्याप्रमाणें तुम्हींही "आता गर्भधारणा पुरे" असें म्हणणार नाही. त्याचप्रम.णें जसा

एखादा शेतकरी स्वत: सुरू करून स्वत:च संपवीत आणलेलें काम शेवटीं शेवटीं दुसऱ्याकडे सोपविणार नाही त्याप्रमाणें तुम्हीं जर कर्तव्यपरायण असाल तर स्वत:च्या मुलांचें संगोपन करण्याचें काम भाडोत्री आयांकडे सोपविणार नाही; कारण त्या कामांत तुमचें जीवनसर्वस्व ओतलेलें असतें आणि तें काम जितकें जास्त मिळेल तितकें तुमचें जीवन अधिक पूर्ण व सुखमय होतें.

पुरुषांच्या सुदैवाने अशा स्त्रिया अजूनही आहेत. या स्त्रिया ईश्वरी योजनेनुसार प्राप्त झालेला जो स्वधर्म त्याचें परिपालन करीत असल्यामुळे स्वत:चा पति व मुलें व आपले आप्तस्वकीय हे सुद्धा आपापल्यापरी (निसर्गदत्त) कर्तव्यपरायण व्हावे अशा रीतीने त्यांच्या जीवनक्रमालाही वळण लावण्याचें कार्य यांचेकडून होईल.

कर्तव्य करतांना स्वार्थत्याग करावा लागतो, कोणी त्याबद्दल शाबासकी अगर इनाम देत नाही, प्रसंगीं जीवसुद्धा धोक्यांत घालावा लागतो व दुसऱ्या जीवांचें रक्षण करण्यांत कमालीची झीज सोसावी लागते, तेव्हाच कर्तव्यपालनाचें समाधान माणसाला प्राप्त होणें शक्य आहे. हा जर तुमचा स्वत:चा अनुभव आहे तर हीच कसोटी तुम्ही इतरांना लावून त्यांच्याकडून अशाच श्रमांची अपेक्षा कराल, स्वत:च्या पतीला असे श्रम करण्यास प्रवृत्त कराल आणि लोकांची योग्यता तुम्ही अशाच श्रमांच्या मापाने मोजाल आणि आपल्या मुलांना अशाच श्रमजीवनासाठी तयार कराल.

जिला गर्भधारणा म्हणजे संकट वाटतें, जिच्या मतें विषयोपभोग, चैन, शिक्षण व समाजसुख यांतच जीवनाचें सार सांठलें आहे, ती आपल्या मुलांना सुखोपभोग शक्य तितक्या अधिक प्रमाणांत मिळावे अशा घोरणाने त्यांना वाढवील. त्यांना ती सुग्रास अन्न देईल, चांगला पोषाख देईल, कृत्रिम करमणुकीचीं साधनें घेऊन देईल. आणि (मुलांमुलींना दोघांनाही) स्वत:चा जीव धोक्यांत घालून स्वार्थत्यागपूर्वक लोकांसाठीं झिजण्याचें सामर्थ्य ज्याच्या योगाने प्राप्त होईल असें शिक्षण न देतां त्यांना सरकारी नोकरी व इतर धंद्यांत प्रवेश मिळण्यास उपयोगी पडतील अशीं प्रमाणपत्रें मिळविण्यास उपयोगी पडेल असें शिक्षण देईल, व त्यांना

श्रम करण्याची गरज न पडेल अशी व्यवस्था करील. अशा प्रकारें, जिला स्वत:च्या जीवनाचें खरें मर्म समजलें नाही तिलाच, ज्याच्या योगाने दुसऱ्या लोकांचे श्रम लुबाडतां येतात, असें आपला नवरा करीत असलेलें फसवणुकीचें, वरपांगी काम मनापासून आवडेल. अशी स्त्री स्वत:ला जांवईसुद्धा असाच निवडील. आणि स्वत: व्यक्ति कशी आहे, हें पाहण्याऐवजीं तिचा हुद्दा, संपत्ति आणि दुसऱ्यांचे श्रम स्वाहा करण्याची तिची शक्ति, या बाह्य उपाधींवरूनच ती कोणाही व्यक्तीची योग्यता ठरवील. खरी आई मात्र स्वत:ला अनुभवाने ईश्वराचा आदेश पटल्यामुळें स्वत:च्या मुलांना तोच समजावून देण्याचा प्रयत्न करील. अशा आईचें मूल जरी खादाड, अशक्त व पोषाखी झालें तर तिला वाईट वाटेल, कारण अशांकडून ईश्वरी नियमाप्रमाणें कर्तव्यपालन होणें फार कठीण, याची जाणीव तिला असते.

अशी आई कामचोरपणा केल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या मोहांचा पगडा ज्याच्यामुळे आपल्या मुलांवर बसेल अशा तऱ्हेचें शिक्षण त्यांना देणार नाही; तर ज्याच्यामुळे जीवनाचे कष्ट सहन करण्याची पात्रता त्यांच्या अंगीं येईल असेंच शिक्षण त्यांना लावील. मुलांना काय शिकवावें व कसें तयार करावें हें विचारण्याची तिला गरज पडणार नाही. पुरुषाचें कर्तव्य काय आणि त्याला काय शिकवावें व कशाकरितां तयार करावें हें तिला स्वत:ला उत्तम कळतें. अशी स्त्री आपल्या पतीला केव्हांही इतरांच्या श्रमांची लूट करणें हेंच ज्यांचें उद्दिष्ट असतें असे नकली उद्योग करण्यास उत्तेजन देणार नाही, उलट अशा उद्योगाविषयीं तिला कमालीचा तिटकारा वाटेल, कारण त्यामुळे तिच्या मुलांनाही वाईट उदाहरण घरींच उपलब्ध होईल. अशी स्त्री स्वच्छ हातांचा व दरबारी शिष्टाचारांचा जांवई कधीही निवडणार नाही, उलट खरे श्रम कोणते आणि नकली काम कोणतें हें ती उत्कृष्ट रीतीने जाणत असल्यामुळे सर्व काळीं आणि सर्व स्थळीं—अगदी आपल्या नवऱ्याच्या बाबतींत सुद्धा—खऱ्या श्रमांविषयी ती आदर दर्शवील आणि खऱ्या श्रमांपासून माणसाची मुक्तता करणें हेंच ज्यांचें साध्य अशा खोटचा दिखाऊ श्रमांचा धिक्कार करील.

स्त्रीधर्माचा त्याग करून स्त्रियांच्या हक्कांचा मात्र उपयोग'घेऊं इच्छिणाऱ्या स्त्रिया जर असें म्हणूं लागल्या, की जीवनाविषयींचा हा

दृष्टिकोन मातेला स्वीकारणें अशक्य आहे, कारण तिची आपल्या मुलां-विषयींची माया च इतकी बलवत्तर असते की त्यामुळे ती मुलांना गोड घोड खाऊं घालणार, त्यांना खेळणीं घेऊन देणार, सुंदर कपडे लेववणार, आपल्या मुलीला उत्पन्नदार जावई पाहून देणार व आपल्या पुत्रांच्या 'सुशिक्षणा'-विषयींही काळजी बाळगणार,—तर तें म्हणणें बरोबर होणार नाही. हें सर्व खोटें, साफ खोटें आहे.

खरी आई असें कधीच म्हणणार नाही. मुलांना खाऊ, खेळ देणें अगर सर्कशीला नेणें टाळतां येणार नाही काय ? त्यांना तुम्ही विषारी फळें देत नाही किंवा एकटयानेच बोटींत बसूं देत नाही, किंवा अश्लील गाणीं चालणाऱ्या हॉटेलांत नेत नाही. तुम्हांला हें जर टाळतां येतें तर तें कां टाळतां येऊं नये ?

याचें कारण तुमच्या बोलण्यांत अर्थ नसतो.

तुम्ही म्हणतां की, "माझ्या मुलांवर फार प्रेम असल्यामुळे मला त्यांच्या जीवाची काळजी वाटते, थंडी वारा, तहानभूक यांपासून त्यांना होणाऱ्या पीडेबद्दल भय वाटतें, म्हणून माझ्या पतीकडून जें त्यांचें संरक्षण होतें तें आवश्यक आहे." पण तुमच्या पतीची पारस्थिति अन्यायमूलक आहे हें तुम्हांलाही पटत असतें.

मुलांवर कदाचित् येणाऱ्या भावी संकटाची तुम्हांला इतकी भीति वाटते की, ज्या गोष्टी तुम्हांला स्वतःलाच असमर्थनीय वाटतात अशा गोष्टी करण्यास तुम्ही आपल्या पतीला उत्तेजन देतां. पण तुमच्या आजच्या परि-स्थितींत घडणाऱ्या अहितकारक प्रसंगांपासून मुलांचें रक्षण करण्याचा कोणता प्रयत्न तुम्ही सध्या करीत आहांत ?

तुमचा कितीसा वेळ मुलांच्या संगतींत जातो बरें ? संबंध दिवसाचा दहावा हिस्सा मुलांबरोबर तुम्ही घालवीत असाल तर नशीब !

बाकीचा वेळ तुमचीं मुलें तिऱ्हाइतांच्या, रस्त्यावरच्या भटक्या-मधून निवडलेल्या भाडोत्र्यांच्या किंवा शारीरिक व नैतिक कुसंसर्गाचा धोका जेथे बसत असतो अशा संस्थांच्या ताब्यांत असतात.

तुमचीं मुलें जेवतात, खातात. तुमच्या मुलांचें खाणें पिणें कोण व कसें तयार करीत असतो याची बहुधा तुम्हांला दाद सुद्धा नसते. त्यांची नैतिक विचारसरणी कोण तयार करीत असतो याचीही तुम्हांला कल्पना

नसते. म्हणून आम्ही मुलांचें भावी कल्याण करण्याच्या बुद्धीने वाईट काम करतों असें म्हणूं नका. तें खोटें आहे. तुम्हांलाच तें वाईट काम प्रिय आहे म्हणून तुम्हीं तें करतां.

खरी माता, जिला मुलांना जन्म देऊन त्यांचें संगोपन करणें यांतच स्वत:ची इतिकर्तव्यता व ईश्वरी योजनेची परिपूर्ति आहे अशी जाणीव झालेली आहे, ती असें म्हणणार नाही.

खरी माता असें म्हणणार नाही, कारण स्वत:ला काय सोयीचें वाटेल किंवा आजच्या घटकेस लोकांची प्रवृत्ति कशी आहे, हें पाहून तदनुसार मुलांना तयार करणें हें तिचें काम नाही. मुलें—म्हणजेच पुढील पिढी—ही या जगांत मनुष्याला प्राप्त होणारी सर्वांत अधिक महत्त्वाची व अधिक पवित्र अशी वस्तु होय, आणि आपलें सर्वस्व अर्पण करून या वस्तूची सेवा करणें हें आपल्या जीवनाचें सार्थक होय, ही गोष्ट तिला पटलेली असते.

स्वत: नेहमी जीवन आणि मृत्यु यांच्या मर्यादारेषेवर कसरत करीत असल्यामुळे, आणि मोठ्या सायासांनी उमलणाऱ्या जिवाला जपण्याचा अनुभव असल्यामुळे जगणें आणि मरणें या गोष्टी आपल्या हातांतल्या नाहीत, तर जगणाऱ्यांची सेवा करणें इतकेंच काय तें आपल्या हातांत आहे, हें तिला स्वत:ला कळत असतें आणि म्हणूनच अशी सेवा करण्याचे आपल्या हाताशीं असलेले मार्ग टाकून देऊन द्राविडी प्राणायामाचे नकली मार्ग ती घुंडाळीत बसणार नाही.

अशी आई अपत्यांचा भार पोटांत नऊ मास धारण करील, त्यांना स्वत: पाजील, आपण खाण्याच्या पूर्वी ती दुसऱ्याला खाऊं घालील, मुलांचें जेवण ती स्वत: तयार करील, त्यांचें घुणें व शिवण टिपण करील, त्यांना शिकवील, त्यांना जवळ घेऊन निजेल व त्यांच्याशीं गप्पा मारील; कारण हेंच आपलें जीवितकार्य आहे, असें तिला वाटत असतें. प्रत्येक जीवनाची खरी सुरक्षितता श्रम करण्यांत आणि श्रम करण्याची पात्रता असण्यांतच आहे, हें तिला पटलेलें असतें, आणि म्हणून आपल्या मुलांना नवऱ्याच्या पैशांनी अगर त्यांनी स्वत: मिळविलेल्या पदव्यांच्या योगाने सुरक्षितता प्राप्त व्हावी अशी ती इच्छा करणार नाही; तर ज्या धर्माचें ती स्वत: पालन करीत असते त्या ईश्वरप्रणीत धर्माचें स्वार्थत्याग-पूर्वक परिपालन करण्याची, अर्थात् अत्यंत घोक्याचे व शक्तिव्यय कर-

णारे परिश्रम सहन करण्याची, पात्रता त्यांच्या अंगीं यावी, अशा दिशेनें ती प्रयत्न करील.

अशी माता, स्वतः काय करावें, हें दुसऱ्यांना विचारणार नाही, कारण तिला तें सर्व आपण होऊनच समजेल. ती कशालाही भिणार नाही व ती नित्य संतुष्ट राहील, कारण आपलें कर्तव्य आपण बजावलें आहे, असा आत्मविश्वास तिला वाटेल.

पुरुषांना व अपत्यहीन स्त्रियांना ईश्वरी इच्छेचें परिपालन करण्याचा मार्ग जरी नीटसा उमगला नाही तरी मातेला तो मार्ग स्पष्टपणें आखलेला असा दिसत असतो; आणि त्या मार्गाचें अनुसरण जर ती लीनतेने आणि प्रांजळ अंत:करणाने करील तर ती मनुष्य प्राणी जितक्या म्हणून पूर्णावस्थेला पोचणें शक्य आहे तितक्या पूर्णावस्थेला पोचलेली व्यक्ति बनेल, आणि ईश्वरप्रणीत धर्माचें पालन करण्याच्या बाबतींत इतर सर्वांना ती आदर्शभूत होऊन राहील.

ज्यानें आपल्याला जगामध्ये धाडलें त्या परमेश्वराची त्याने निर्दिष्ट केलेल्या मार्गाने—म्हणजें प्राणांहून प्रिय अशा आपल्या अपत्यांना जन्म देऊन व त्यांचें संगोपन करून—खरीखुरी सेवा अशी या जगांत माताच करूं शकते. म्हणूनच एकटी माताच काय ती आपल्याला निर्माण करणाऱ्या परमेश्वराला मृत्यूच्या पूर्वी शांत चित्ताने म्हणूं शकते की, 'हे देवा, समाधानाने मरण्याचें हें भाग्य तूं या तुझ्या सेविकेला देत आहेस!' सर्व माणसें ज्या स्थितीप्रत पोचण्याची इच्छा करतात ती ही मानवी पूर्णावस्थेची सीमा होय.

अशा कर्तव्यनिष्ठ स्त्रियांची पुरुषांवर सत्ता असते व त्या पुरुषांना ध्रुवताऱ्याप्रमाणें मार्गदर्शक होऊं शकतात. अशाच स्त्रिया लोकमत बनवितात व भावी पिढ्या तयार करतात, म्हणूनच त्या अत्यंत शक्तिशाली होत. आम्हांला जें संकट व जो अनर्थ भेवडावीत आहे त्यापासून आमचें रक्षण करण्याचें सामर्थ्य त्यांच्याच अंगीं आहे.

होय! महिलांनो! मातांनो! इतर कोणापेक्षाही जगाचा उद्धार करण्यास तुम्हीच अधिक समर्थ आहांत.

फेब्रुवारी, १४ सन १८८६

समाप्त

सूची

अगाफ्या, उपाशीं मरूं घातलेली भिकारीण, ४८, ६०
अरिस्टॉटल, १३४
अर्थशास्त्र, ११६;—कृत्रिम विभागणी, ९५; सरळ प्रश्न टाकतें, १०१;
—ची घूळफेंक १३७;—ची नजरबंदी, १३९
आशाळभुतें–सुस्थितिच्युत, ३५
अनुल्लंघ्य भित–श्रीमंत गरिबांतील, ७७
आळस, हाही श्रमाचाच भाग, ८९
अवडंबर, कलांचें, निरुपयोगी, २४५
आत्मवंचना, २७३
इसाया, १८३
उत्क्रांतिवाद, २१९
कामगिरी, वैज्ञानिक व कलावंतांची, १९९; सरकारी, १९६; औद्योगिक
वाद्यांची, १९८
कॅथरीन, दि ग्रेट २०६, २२६
कम्यून, कान्सासमधील, २९२
कांट, इमॅन्युएल २१८
काम्टे, आगस्ट, १९०, २१६–२०
कॉनस्टंटाईन, दि ग्रेट, २३८
कारखानदार, १९८
किरगिझ लोकांची विचित्र वागणूक, ३१०
क्रायलॉव्हची पेटी, ३०१
खानेसुमारी, १४ (आणि पुढची पानें),ची शेवटची रात्र ५१–५३
खित्राव्ह मार्केट, ६–७
खूळ, डार्विनच्या उत्क्रांतिवादाचें, २१९
खरें शास्त्र, खरें कल्याण सांगणारें, २५७
गिरण्या,–चे पोंगे, १६५
गवत, अन्न बनूं शकत नाही, २५५

गुलामगिरी, १२२-२४; द्रव्यजन्य १२८, १३२-३४, १४३;-आर्थिक, फिजी बेटांतील, १११
चाळणींतील दोहन, ९१
चरक, इंग्रजी व्यापाऱ्यांचा, १०७
चतुर्विध उपभोग व कर्तव्ये, २८९
जमीनदारी पद्धति, १०४
जॉर्ज हेन्री, १४५
जर्मन विश्वविद्यालय, २६३
जॉन दि बाप्टिस्ट, १४८
जमिनीची मालकी, १३२-३४
जुलूमबाज, १४०-४५
जंतु, मानवसमाज हा सेंद्रिय जंतु आहे, २१५
झेनोफोन, १३४
झानोव्ह हौस, ५२, ५३;-मधील प्रकार २३;-ची मालकीण २८
टॉलस्टॉय, लेखाचा बोजवारा, १९;-च्या मदतीची गरज नव्हती, २९;-ला लेख साधेना, ६१;-चा भ्रमनिरास, ७३;-च्या दातृत्वाची चिकित्सा, ७५;-ची लाज, ८३;-चा जीवनक्रम पूर्ण बदलला, १५१
टोळधाड, फिजी बेटांवर अमेरिकनांची, १०५
डार्विन, १९०, २१९
डाइव्ज आणि लॅझॅरस, १४८
ड्रेव्हलिअन, १०३, ११२
तुच्छ, पूर्वींच्या ज्ञात्यांना तुच्छ माना, २६१
थाकोंबा, फिजी लोकांचा राजा, १०४-०७
दुराचारी स्त्रिया, ३८
दया, खरी-म्हणजे काय, ८१
धर्मपुरोहित, ग्रीस-इजिप्तचे, २६६
नवलपूर्ण प्रमेय (उत्क्रांतिवादाचें), २३१
नरमांस, स्वादिष्ट लागतें, २९३
निर्दयपणा, श्रीमंती जीवनांतील, ३११

ल्वेटो, १३४
परवाने, आळसाचे, २३०
पैसा, देवघेवीचें साधन, ११३, पैशाचा खरा अर्थ, ११७–१९; कर स्क्रूप्रमाणें पिळतात, १२९, १३३; कागदी पैसा अर्थात नोटा, ११४;–सर्व आपत्तीचें मूळ, ९३;–जुलुमाचें साधन, ११७;–देवघेवीसाठी जरूर नसते, १२१
पीटर, एक आरेकस, ४
पॉलिनेशिअन कंपनी, १०७
पोप, २५९
पुगाशेव्ह, २२६
पारिस, मधील शिरश्च्छेद, ११
फिजी बेटें, १०४ (आणि पुढील पानें)
फ्रेडरिक, दि ग्रेट
फारिसी लोक, १९२
बेबंदशाही, २३८
बर्नहार्ट, सारा, १७
बायबल, २८६, ३१३;–लांतील चैनबाजीचा निषेध १७९
ब्लॉखिन, एक वेडा, २८७, ३१३
बोंडारेव्ह, शेतकरी लेखक, २८६
बागुलबोआ, नामधारी शास्त्रांचा, १८९
बेबलचा बुरुज, २११
भूमि, भांडवल व श्रम, ९५
मॉस्कोंतील भिकारी, १–३
मुलें, झानोव्ह हाउसमधील, २१, ४७; टॉलस्टायचीं ४७;–विषयीं टॉलस्टायची भूमिका ४५
मंत्रसिद्ध थैली, ९१
मालथस, १८९, २१३, २१९
मानवजात, सेंद्रिय जीव आहे, २१४
मास्को, ६५

मोझेंस,–चें तत्वज्ञान, २१९
येशू ख्रिस्त, १४८, २०९
यांझूल, प्रोफेसर, १०४
रेल्वेंचा शेतकऱ्यावर परिणाम, २४२
रॉबिन्सन, सर हर्क्युलीस (लार्ड रासमीड), १०९
रशिअन वसाहत्ये, ९७
ल्यापिन होस, ७ (आणि पुढचीं पानें)
लक्षणें, खऱ्या शास्त्राचीं व कलेचीं, २६९
वेश्या, खाणावळींतील, ३९; शेजारधर्मिष्ठ ४१
वरचष्मा, शास्त्रज्ञ वर्गाचा, २०७
शास्त्र २५५ (आणि पुढे)
शास्त्रज्ञ, हानिकारक कृत्यांत गुंतलेले, २६७
शिक्षण, त्याचें घोरण, ७९
श्रमविभाग, २६६ (व पुढचीं पानें)
शॉपेनहार, २८६
"शेतकऱ्यांना पिळून काढा" ११३
संततिप्रतिबंध, साधनें, ३१५
स्वच्छता, ७८
सक्तीचें शिक्षण, २४९
सरकार–री कामगिरी, १९६;–री [illegible] १०७, १९५ १८
साडें सत्रा देव, २२५
सिद्धांतानुगामी व प्रमाणप्रधान पद्धति,
सूटेव्ह, ४५, ७२–७३, २८६
सेमेन, एक आरेकस, ८४
सेरेझा, ४५ (व पुढील पानें)
सिद्धांत, अपहारक वर्गाचे तीन, २०५
स्पेन्सर हर्बर्ट, २२२, २२७
हेगेल, १८९, २१०–११

REFBK-0005238
५२३८